
# कला व साहित्य यांविषयी

## ( वैचारिक लेख )

## भाग – ३.

## चं. प्र. देशपांडे.



१३ ऑगस्ट २०२१ च्या पुढे --

अमूर्त चित्रात जसे रंग आणि आकार तसेच कवितेत शब्द आणि रचना –

अमूर्त चित्रात जर अमुक वस्तू, आकार वा दृश्य असे ओळखता येण्याची गरज नाही तर कवितेत तरी अमुक विचार वा अनुभव तरी ओळखता येण्याची काय गरज आहे ? अमूर्त कविता का असू नये ?

अभिप्रायार्थ माझ्याकडे येणारी पुस्तके

काही लेखक व कवी त्यांची पुस्तके माझ्याकडे अभिप्रायार्थ पाठवत असतात. काही असे अभिप्राय मी इथे पोस्टही करत असतो. त्याबाबत काही मुद्दे स्पष्ट करावेत असे वाटल्याने ही पोस्ट --

१. माझा अभिप्राय म्हणजे काही आकाशवाणी नव्हे, हे मी समजून असतो. एखाद्या पुस्तकाबाबतचे माझे आकलन अपुरे वा चुकीचेही असू शकते. त्यामुळे, माझे अनुकूल वा प्रतिकूल लिहिणे हेही चुकीचे असू शकते.

२. माझ्या दृष्टीने ७० टक्के चांगले असलेल्या पुस्तकाला मी ८० टक्के चांगले म्हणू शकतो पण माझे प्रतिकूल आकलन असेल तर ते मी अनुकूल करून सांगत नाही.

३. प्रतिकूल अभिप्राय असेल तर आधी मी तो संबंधित लेखकाला दाखवतो आणि त्याला वाटले तरच त्याची इथे पोस्ट देतो.

४. माझेही काही लेखन-वाचनाचे काम चालू असते, त्यामुळे, आलेले पुस्तक वाचायला माझ्याकडून उशीरही होऊ शकतो.

५. सर्वच प्रकारची पुस्तके माझ्या आवडीच्या क्षेत्रात येतील, असे नाही. असे होऊ शकते की वाचायला सुरुवात करताच न आवडणे, वाचनीय न वाटणे. असे झाल्यास ते पुस्तक मी वाचण्याची शक्यता नाही, हेही कृपया समजून घ्यावे. न वाचता अभिप्राय लिहिणे हे मला जमत नाही.

६. आणि इतकेही करून माझी अभिप्राय-पोस्ट वाचतात किती लोक, तर १०-२०-२५. हाही मुद्दा विचारात घ्यावाच. उगीचच मला पाठवण्यात पुस्तकांच्या प्रती वाया जाऊ नयेत म्हणून ही पोस्ट दिली आहे.

--- ००० ---

खालील पोस्ट नीट विचार करून द्यावी असे वाटत होते पण अडचण अशी झाली आहे की मी लिहिलेले सेव्हच होत नाही आहे -- पुन्हा कुठे हे लिहीत बसणार -- म्हणून आहे तशी देतो आहे --

‘ तंबाखूची टपरी ‘ च्या निमित्ताने –

अनुसर्जित कवितांचा माझा हा संग्रह वर्णमुद्रा प्रकाशन काढेल असे ठरून अनेक महिने होऊन गेले. त्याबाबतच्या संपर्कासाठी कायप्पावर एक समूहही करण्यात आला. त्या समूहात आजवर मला एकही मेसेज आलेला नाही, हा भाग वेगळा. दर काही महिन्यांच्या अवकाशाने मी दोनतीनदा विचारले तर ' लौकरच ' असे समजले. नंतर या कोरोना संकटामुळे काही अडचणी येत आहेत, असेही समजले. शिवाय त्यांनी आधी ठरवलेली काही पुस्तके रांगेत असणार, असेही दिसते आहे. सारखे विचारण्याचा मला संकोच वाटत असल्याने आता हा संग्रह मी माझ्या संकेतस्थळावर द्यायचे ठरवले आहे. संकेतस्थळावर एवढ्यात देऊ नये, हे माझे मीच स्वीकारलेले बंधन होते. पण एकूण परिस्थितीमुळे त्याचा पुनर्विचार करावा लागतो आहे. अर्थात याने पुस्तकावर ( प्रकाशित झाल्यास ) काही परिणाम होईल असे मला वाटत नाही. कारण मला भेटणारे-दिसणारे कोणतेही मराठी वाचक हेच म्हणतात की आम्हाला वेबवर वाचणे नाही जमत, आम्हाला पुस्तकच लागते हातात. याला दुसरा पुरावा म्हणजे माझ्या संकेतस्थळाचा उल्लेख वा कणभरही दखल कुठे घेतल्याचे दिसणार नाही. ( ' पल भर के लिये कोई हमे प्यार कर ले झूठा ही सही ' -- असेही नाही ! ) लेखनच मुळात खास काही नसल्याने असे होत असेल, हीही शक्यता मी नाकारत नाही. निरनिराळ्या परदेशांतले काही वाचक या वेबसाईटला भेट देत असतात, हे मात्र समाधानाचे वाटते. मराठीत इथे म्हणाल तर ही वेबसाईट असली काय आणि नसली काय, काही फरक पडत नाही. तरीही, मी हा निर्णय घेतल्यामुळे, ते पुस्तक प्रकाशित करायचा निर्णय बदलावा असे प्रकाशकांना वाटू शकते. कोणत्याही कटुतेशिवाय माझे याला दिलखुलास अनुमोदन असेल.

आपोआप आलेल्या सहकार्यामुळे वेळोवेळी माझी काही पुस्तके निघाली. मी त्यासाठी खूप आटापिटा केला नाही. मराठीतला एकूण पुस्तकव्यवहार पाहता मला त्याबद्दल फारशी आत्मीयता नाही. मी ना कुठल्या टोळीचा सभासद आहे ना माझे सारखे कुठे जाणेयेणे वा भेटीगाठी असे काही असते. लेखन, कला हे एकटेपणातून येणारे काम आहे, असे मला वाटते. त्यामुळे मी कुणाला ' आपला ' वाटण्याची शक्यता फारच कमी असते. आणि कुणाच्याही लेखनात असून असून काय असणार आहे – गेले काही वगळले तरी काय मोठे बिघडणार आहे, हे मान्यच करावे लागते. त्यात परत माझे बरेचसे लेखन कळत नाही अशी तक्रार असतेच. आणि लेखक आणि वाचक यांतला एक दुवा म्हणावा अशी ' समीक्षक ' नामक जमात तर इथे कधीच मृत्यू पावलेली आहे. हे सगळे लक्षात घेऊनच मी हा संकेतस्थळाचा मार्ग अनुसरला आणि चालू ठेवला. " अरे, काढत नाही त्याची पुस्तके कुणी " अशीही कुजबूज माझ्या कानावर आली. एकूण आहे या वातावरणात हे असे काही ना काही असणारच. या सगळ्याकडे दुर्लक्ष करायचे मी ठरवले.

आपण कवितेचे उदाहरण घेऊ. माझ्या दृष्टीने कविता ही एक सर्जक प्रक्रिया आहे आणि वाचकाकडून ती वाचली जाणे यात तिची पूर्तता आहे. नंतर पुस्तक निघणे, त्याला बक्षीस मिळणे, कवीचा गौरव होणे या गोष्टींचा त्या सर्जक प्रक्रियेशी काहीही संबंध नसतो. त्यामुळे, कविता वाचायला उपलब्ध असणे हेच महत्त्वाचे. आणि ते काम माझ्या वेबसाईटने होते. फारच अगदी कुणाला आरामात पडून हातात पुस्तक असल्यासारखेच वाचायचे असेल तर तो त्याचा प्रिंट आऊट काढून घेऊ शकतो. अर्थात, पुन्हा तो प्रश्न आहेच -- नाही वाचले तरी काय बिघडणार आहे ? तर

याचा सारांश हाच आहे की मला महत्त्वाचे वाटल्याने किंवा मला ते आवडत असल्याने किंवा करमणूक म्हणून हे लेखन मी करत आलेलो आहे. यथावकाश ही वेबसाईटही बंद पडेल आणि सगळे मातीत जाईल ! चलता है !

--- ००० ---

२५ ऑगस्ट २०२१.

मृषा -- absurd.

जयंत पवार

आमच्या फार काही भेटी झाल्या असे नाही. तीनचारदा भेटी आणि दोनचारदा फोन. पण एकमेकांबद्दल आम्हाला आस्था आणि आपुलकी होती. माझ्या अनेक नाटकांची परीक्षणे त्याने मटातून लिहिली. त्याचे स्वत:चे काही विचार असले तरी कलेकडे व्यापक मानवी दृष्टिकोणातून पाहू शकणारा असा तो एक खरोखरचा स्वतंत्र समीक्षक, लेखक, कलावंत होता. त्याची एकूणच नाट्यसमीक्षणे वाचणे हे एक नाट्यप्रशिक्षणच असे. माझ्या नाटकाबाबत लिहिताना, कुणालाही न सुचलेला असा एक मुद्दा त्याने मांडला होता – तो होता अभिनयाबद्दलचा. माझ्या नाटकात अभिनय वेगळा का, कसा लागतो हे त्याने सांगितले होते. हा एक स्वत:चे चिंतन असलेला लेखक होता. त्याच्या चिंतनात असलेला एक महत्त्वाचा प्रश्न माझ्या लक्षात आहे. त्याला असे दिसत होते की वास्तव फार वेगाने बदलते आहे. त्यामुळे, लेखकाला-कलावंताला या बदलत्या वास्तवाचे आकलन होऊन ते त्याच्या कलेतून अभिव्यक्त व्हायच्या आतच वास्तव खूपच बदलून गेलेले असते. मग लेखक ‘ आजचे ‘ कसे लिहिणार ? असे गंभीर प्रश्न पडणे हेच खरे तर कोणत्याही सर्जकतेचे लक्षण आहे. त्याच्या या प्रश्नावर मी एक लेख लिहिला होता. ' ढोलताशे ' या माझ्या नाटकाच्या निमित्ताने, अरुण नाईकांच्या ' नाटक ' या त्रैमासिकासाठी त्याने माझी एक मुलाखत घेतली होती.

या प्रेमळ, शहाण्या मित्राला मन:पूर्वक आदरांजली !

--- ००० ---

संकेतस्थळाचे अद्यावतीकरण

माझ्या संकेतस्थळाचे २५-०८-२०२१ पर्यंतचे अद्यावतीकरण पूर्ण झालेले आहे. इतर सर्व मजकूराबरोबरच

तंबाखूची टपरी ( अनुसर्जित कविता )

हा कवितासंग्रहही आता यात दिलेला आहे. याचे पुस्तक निघणार होते म्हणून हा संग्रह इथे दिला नव्हता. पण, मराठी सारस्वताच्या दुर्दैवाने सध्या तरी हा संग्रह पुस्तक रूपात येणे शक्य नाही. त्यामुळे, निदान, कुणाला वाचायचे असल्यास, उपलब्ध असावा म्हणून आता इथे दिला आहे.

संकेतस्थळ --

www.champralekhan.com

परमेश्वरा, कवितेत-साहित्यात मी काय करतोय ते ज्यांना समजत नाही त्यांना माफ कर !

Ravindra Damodar Lakhe

Septemfbipeora 4 ilath l10:02 AnMrr •

'तंबाखूची टपरी'

Link http://www.champralekhan.com/

चंप्र देशपांडें यानी अनुवादित केलेल्या जगभरच्या निवडक कवितांचा 'तंबाखूची टपरी' हा कविता संग्रह त्यांच्या वेबसाईटवर वाचला.

वाचून होताक्षणी असं वाटलं की अरे हा तर चंप्रंच्याच कवितांचा संग्रह आहे.

असं का वाटलं याचा विचार करताना लक्षात आलं की अनुसर्जन हा शब्द सार्थ करणारा हा कवितासंग्रह आहे. यात जागतिक पातळीवरच्या कवींच्या कवितांचे अनुवाद आहेत आणि अनुवादकर्त्याची सर्जकताही आहे.

अनुवादकर्त्याच्या सर्जकतेमुळे या संग्रहाला एकसंधता प्राप्त झाली आहे.

000

जॅक पोलॉक नामक एक चित्रकार होता. त्याच्या चित्र शैलीला ठिबक चित्र वा कृती चित्र वा सर्वंकष चित्र म्हटले जाते. त्या शैलीत लिहिलेली ही एक कविता आहे.

ठिबक कविता

अमुक अशी असायला हवी कविता

एका ठिकाणी दिलेली कॉमेंट -- कुणालाही हे पटवून देण्याची वा यावर वाद घालण्याची जबाबदारी न घेता इथे खाली पोस्ट म्हणून देत आहे --

sentimentalism, emotionalism ( भावनिकता ) टाकून देणारी खूप कविता लिहिली जाते जगभर -- इथेही कुणाला त्या मार्गाने आपोआप जायचे असेल तर जाऊ द्यावे -- आपण जी बुद्धिप्रधानता म्हणतो ती बऱ्याचदा बुद्धीला वा तर्काला बांधील नसते, हेही समजून घ्यायला हवे. मराठी कवितेत व्यक्तिगत सुखदु:खे, मूडस आणि राग-लोभ-क्रोध यांचे प्रचंड स्तोम माजलेले आहे. वेगळी कविताही येत राहणारच. स्वागतशील राहायचे की नाही हा वाचकांचा प्रश्न आहे. एलियट escape from emotion ( भावनेपासून सुटका ) का म्हणतो, anti poetry ( न -- कविता ) कोणत्या कारणांनी येते, हेही समजून घ्यायला हवे. इथली माती, तिथली माती याच तत्त्वज्ञानात ज्यांना अंतिम वाटत असेल त्यांचा प्रश्नच नाही. भावनिकतेत डुंबून राहणे हे मराठी कवितेचे डबके होण्याचे प्रमुख कारण आहे.

Girish Patke तू म्हणतो आहेस ते खरेच आहे -- बघू -- दोनचार दिवसांत, ही पोस्ट वाचून मनोज काही म्हणतो का, ते पाहू --

Manoj Pathak

सर,

सर्वप्रथम वर्णमुद्रा तर्फे व व्यक्तिश: मी आपली जाहीर माफी मागतो.तुमच्या पुस्तका सोबतच इतर अनेक मित्रांची पण पुस्तकं मागील वर्षभरात रखडली आहेत.त्या बद्दलची सगळीच कारणे इथे सांगता येण्यासारखी नाहीत.' तंबाखूची टपरी ' आपल्याला (च) काढायचे आहे , असेही स्वत:ला अनेकदा बजावून सांगितले होते, पण तरीही त्यासाठी आवश्यक त्या सर्व गोष्टी काही जुळून आल्या नाहीत.अगदी आजही सगळेच अनिश्चित आहे.वर्णमुद्राचे पुढे काय करायचे आहे यावर विचार सुरू आहे, लवकरच काही निश्चित ठरू शकले तर तुमचे पुस्तक प्रकाशित करण्यात आनंदच होईल.अर्थातच त्यावेळी तुमची संमती असली तरच.दरम्यान तुम्ही म्हणताहात तशा कविता वेबसाईट वर टाकावयास काहीच हरकत नाही, त्यामुळे पुस्तक प्रकाशित करण्यात काही अडचण येणार नाही.

कृपया आपण समजून घ्याल व मनमोकळ्या पणाने, मोठेपणाने मला क्षमा कराल अशी अपेक्षा व्यक्त करतो.
🙏🙏🙏

Champra Deshpande

Manoj Pathak हे अत्युत्तम आणि मान्य !

देव जोडे तरी करावा अधर्म । अंतरे ते कर्म नाचरावे ।।

अभ्यासू, समतोल विचाराचा समीक्षक ! ( जयंत पवार )

खरोखरच -- इग्नाशियस डायस यांच्या कविता अप्रतिम आहेत !

कोणताही मानसिक पवित्रा म्हणजे पोझिशनच -- मराठी सारस्वताला फिट बसणारी टोपी ! ( तिळव्यांची कविता )

कोणत्याही कलाकृतीत ' सगळे ' कधीच नसते -- ती कलाकृती सगळे सुचवू मात्र शकते ! तेही वाचक खुला राहिला तरच ! वाचकाला त्याची अपेक्षापूर्ती हवी असेल तर ती कधीच ' सगळी अवस्था ' असू शकणार नाही.

मूल्यमापन ही नंतरची बाब आहे -- त्या कामाची आवड जो तो जोपासत राहीलच. प्रश्न, कविता म्हणजे असेच, अमूकच, असे म्हणण्याचा आहे.

sentimentalism, emotionalism टाकून देणारी खूप कविता लिहिली जाते जगभर -- इथेही कुणाला त्या मार्गाने आपोआप जायचे असेल तर जाऊ द्यावे -- आपण जी बुद्धिप्रधानता म्हणतो ती बऱ्याचदा बुद्धीला वा तर्काला बांधील नसते, हेही समजून घ्यायला हवे. मराठी कवितेत व्यक्तिगत सुखदु:खे, मूडस आणि राग-लोभ-क्रोध यांचे प्रचंड स्तोम माजलेले आहे. वेगळी कविताही येत राहणारच. स्वागतशील राहायचे की नाही हा वाचकांचा प्रश्न आहे. एलियट escape from emotion का म्हणतो, anti poetry कोणत्या कारणांनी येते, हेही समजून घ्यायला हवे. इथली माती, तिथली माती याच तत्त्वज्ञानात ज्यांना अंतिम वाटत असेल त्यांचा प्रश्नच नाही. भावनिकतेत डुंबून राहणे हे मराठी कवितेचे डबके होण्याचे प्रमुख कारण आहे.

Balkrishna Kawathekar तुमचे हे मत आहे -- मला मान्य नाही. असो.

हा तर एक प्रचंड अनपेक्षित प्रकार आहे -- हा साचा वाटणे ही या कवितेसारखीच एक गंमत !

जॅक पोलॉक नामक एक चित्रकार होता. त्याच्या चित्र शैलीला ठिबक चित्र वा कृती चित्र वा सर्वंकष चित्र म्हटले जाते. त्या शैलीत लिहिलेली ही एक कविता आहे.

अर्थपूर्ण कविता लिहिणारे खूप आहेत -- अर्थहीनचासुद्धा आवाका घ्यायलाच हवा -- आणि कवी जेव्हा प्रामाणिकपणे काही पाहात असतो तेव्हा इतरांनी कृपया त्याला सल्ले देऊ नयेत --Aniket Sonavane वा रे वा ! अत्युत्तम कॉमेंट ! धन्यवाद !

एक तर यात एकाच व्यक्तीची वाक्ये नाहीत आणि कवितेतला मी म्हणजे मी स्वत: नाही.

23-09-21.

कवितांचे परीक्षण

बऱ्याच कविता या खालीलपैकी एक वा अनेक वैशिष्ट्यांत सामावतात, असे दिसते --
१. कोणत्याही बाबतीत गांभीर्य नसून, मिळवलेली भाषा आणि विद्वत्ता यांतून विविध गुणदर्शन करत राहणारी कविता.
२. अनिश्चितता पूर्ण सोडून दिलेली, समजून घेण्या ऐवजी सांगण्याच्या भूमिकेत असलेली हिंसक कविता.
३. व्यक्तिगत भावभावना आणि मूडस यांचे स्तोम माजवणारी कविता.

४. सामान्य अनुभवांना ओळी, सांगीतिक लय, अलंकार, प्रतिमा यांतून मांडणे म्हणजेच कविता, अशा समजातून लिहिलेली कविता.

५. माझ्यापेक्षा वेगळे काही समजणारे मूर्ख आहेत असे समजणारी कविता.

६. माणसांचे आणि घटनांचे अंतिम मूल्यमापन सांगणारी कविता.

७. व्यवस्था म्हणजे काय हे आपले मत ठरवून व्यवस्था बदलायला निघालेली कविता.

८. कविता तथाकथित ' काव्या ' तून जे सांगत आहे ते सरळ गद्य उताऱ्यातून पूर्णपणे सांगून संपू शकते, अशी सूचकतेच्या अभावाची कविता.

९. अहंकारी, घमेंडी, आत्ममग्न, अस्मितांच्या बंधनांत अडकलेली, उर्मट, मग्रूर म्हणावी, अशी कविता.

१०. निसर्ग, आठवणी, दृश्ये इत्यादींची नुसती वर्णने करण्यात रमणारी कविता.

--- अशा कवितांचा आवाका फारसा मोठा नसतो. रंगून-रमून जायला त्या चांगल्या असू शकतात, पण, एकूणात, त्या कविता खुज्या असतात. सर्व माणसांना प्रस्तुत ठरावे असे काही तत्त्व त्यांच्यांत नसते. हे सर्व लक्षात घेऊन ' मराठी कविता ' या विषयावर एक सविस्तर लेख लिहिण्याचा विचार आहे. माझे इतरही काही लेखन चालू आहे. वेळ लागू शकतो, पण हे काम तर योजलेले आहेच. मतभेद असू देत, पण या कामाला तरी शुभेच्छा असाव्यात, ही विनंती.

--- ००० ---

साहित्यव्यवहारासाठी एक अतिमहत्त्वाचा लेख

टिचकीसरशी उडवू नका -- सुनीळ सामंत

( आज दिनांक २६-०९-२१ रविवार मटा )

" पुस्तके खपत नाहीत याचे महत्त्वाचे कारण त्यांची किंमत. पुस्तके स्वस्त न होण्याचे कारण त्यांच्या आवृत्तीची संख्या व पडून राहण्याचा काळ. पुस्तके स्वस्त करण्यात इंटरनेट महत्त्वाचे साधन बनू शकते. वाचकसंख्या वाढवण्यासाठी इंटरनेट महत्त्वाची भूमिका बाजावू शकते. इ-बुक, इंटरनेट, आणि नवीन तंत्रज्ञानाच्या नावाने बोटे मोडाल तर मोडून पडाल. " -- हे या लेखातले एक वाक्य आहे. हा पूर्ण लेखच, विशेषत: लेखक-कवींसाठी फारच महत्त्वाचा आहे.

माझी www.champralekhan.com ही वेबसाईट ( संकेतस्थळ ) २००९ पासून  असल्याचे तुम्हाला माहीतच आहे. आयुष्यभरचे माझे सर्व लेखन मी इथे मोफत उपलब्ध करून दिलेले आहे. ही पोस्ट देण्याच्या निमित्ताने मी यातली आकडेवारी तपासून घेतली. वर्षाला साधारण किती वेळा लोक इथे व्हिजिट करतात हे पाहिले असता खालील माहिती मिळाली --

२०१५ -- ३९५८

२०१६ -- ३३९६

२०१७ -- ३९६५

२०१८ -- २३००

२०१९ -- २७६८

२०२० -- २९२८

२०२१ -- २७०५ ( सप्टेंबर पर्यंत )

भारत, अमेरिका, जर्मनी, कॅनडा, चीन, रशिया, ग्रेट ब्रिटन, थायलंड, ग्रीस, आयर्लंड, नेदरलँड, स्वीडन आणि फ्रान्स -- या देशांतून ही वेबसाईट व्हिजिट झालेली ( पाहिली गेलेली ) आहे. यातले काय काय डाऊनलोड केले गेले त्याचेही रेकॉर्ड आहे. अर्थात ही सगळी त्या त्या देशातली मराठी माणसेच असणार. माझ्यासारखा लेखक म्हणणार, वाचले जातेय ना, बास ! आणि इथे मराठीत हे असले लिहून लेखकाला मिळून मिळून पैसे मिळणार किती ? सारांश, मी काळाची पावले ओळखून चाललोय, असे वाटते.

--- ००० ---

champralekhan.com

www.champralekhan.com

मोकळी हवा

थोडी मोकळी हवा ज्यांना चालत असेल त्यांच्यासाठी ही पोस्ट. आधीच क्लियर करतो की ही माझ्या कवितांच्या समर्थनार्थ देत नाहीय. माझ्या कविता या अनेक कारणांनी कविताच नाहीयत. तो जाऊ दे विषय. जेम्स टेट नामक, माझ्या मते ग्रेट असलेल्या, कवीच्या या दोन कविता वाचा. आता अनुसर्जन बास. तशी इथे कशाचीच फारशी गरज नाहीय. भाषेत कविता असावी म्हणून थोडेफार कौशल्य आत्मसात करत थोडी कलाबिला करत राहिले की बास. स्वत:लाही मुळे हलवणारे प्रश्न नकोत आणि वाचकांच्याही डोक्यांना नको जास्त ताप. खाली लिंक देतोय. ज्यांना ' इथल्या मातीतले नसलेले ' चालू शकते त्यांनी वाचून पहा. वाचून झाल्यावर आपण नक्कीच म्हणू -- असेल पुलित्झर मिळालेला पण कविता म्हणून गद्य खपवत होता हा माणूस. आणि तिथले वाचकही च्युत्ते फसत होते. बघा –

https://granta.com/two-poems-tate/?fbclid=IwAR2iCJUtlEhRuMNO2dfSsZL3BrfgQPTfnR6R4hBiFRV1VpbBgoM_qEe7Txk

जॅक पोलॉक नामक एक चित्रकार होता. त्याच्या चित्र शैलीला ठिबक चित्र वा कृती चित्र वा सर्वंकष चित्र म्हटले जाते. त्या शैलीत लिहिलेली ही एक कविता आहे.

ठिबक कविता

अमुक अशी असायला हवी कविता
एका ठिकाणी दिलेली कॉमेंट -- कुणालाही हे पटवून देण्याची वा यावर वाद घालण्याची जबाबदारी न घेता इथे खाली पोस्ट म्हणून देत आहे --
sentimentalism, emotionalism ( भावनिकता ) टाकून देणारी खूप कविता लिहिली जाते जगभर -- इथेही कुणाला त्या मार्गाने आपोआप जायचे असेल तर जाऊ द्यावे -- आपण जी बुद्धिप्रधानता म्हणतो ती बऱ्याचदा बुद्धीला वा तर्काला बांधील नसते, हेही समजून घ्यायला हवे. मराठी कवितेत व्यक्तिगत सुखदु:खे, मूडस आणि राग-लोभ-क्रोध यांचे प्रचंड स्तोम माजलेले आहे. वेगळी कविताही येत राहणारच. स्वागतशील राहायचे की नाही हा वाचकांचा प्रश्न आहे. एलियट escape from emotion ( भावनेपासून सुटका ) का म्हणतो, anti poetry ( न -- कविता ) कोणत्या कारणांनी येते, हेही समजून घ्यायला हवे. इथली माती, तिथली माती याच तत्त्वज्ञानात ज्यांना अंतिम वाटत असेल त्यांचा प्रश्नच नाही. भावनिकतेत डुंबून राहणे हे मराठी कवितेचे डबके होण्याचे प्रमुख कारण आहे.

परमेश्वरा, कवितेत-साहित्यात मी काय करतोय ते ज्यांना समजत नाही त्यांना माफ कर !

Ravindra Damodar Lakhe
Septemfbipeora 4 ilath l10:02 AnMrr •
'तंबाखूची टपरी'
Link http://www.champralekhan.com/
चंप्र देशपांडें यानी अनुवादित केलेल्या जगभरच्या निवडक कवितांचा 'तंबाखूची टपरी' हा कविता संग्रह त्यांच्या वेबसाईटवर वाचला.
वाचून होताक्षणी असं वाटलं की अरे हा तर चंप्रंच्याच कवितांचा संग्रह आहे.
असं का वाटलं याचा विचार करताना लक्षात आलं की अनुसर्जन हा शब्द सार्थ करणारा हा कवितासंग्रह आहे. यात जागतिक पातळीवरच्या कवींच्या कवितांचे अनुवाद आहेत आणि अनुवादकर्त्याची सर्जकताही आहे.
अनुवादकर्त्याच्या सर्जकतेमुळे या संग्रहाला एकसंधता प्राप्त झाली आहे.

संकेतस्थळाचे अद्यावतीकरण

माझ्या संकेतस्थळाचे २५-०८-२०२१ पर्यंतचे अद्यावतीकरण पूर्ण झालेले आहे. इतर सर्व मजकूराबरोबरच
तंबाखूची टपरी ( अनुसर्जित कविता )

हा कवितासंग्रहही आता यात दिलेला आहे. याचे पुस्तक निघणार होते म्हणून हा संग्रह इथे दिला नव्हता. पण, मराठी सारस्वताच्या दुर्दैवाने सध्या तरी हा संग्रह पुस्तक रूपात येणे शक्य नाही. त्यामुळे, निदान, कुणाला वाचायचे असल्यास, उपलब्ध असावा म्हणून आता इथे दिला आहे.

संकेतस्थळ --

www.champralekhan.com

न फसणारे शहाणे जे आहेत त्यांना असे एका ठिकाणी थांबू नका हे सांगण्याचा हा प्रयत्न आहे. मनाला लावून घेणे ? ये तो हो ही नही सकता ! तुकाराम ही व्यक्ती वा नाव याचा नाही प्रश्न -- ' मलाच कळते ' हे अडथळा होऊ लागले तर ते हटवायचा प्रयत्न होणारच ! वाईट वाटून घेऊ नये -- 🙂😀 जाता जाता या कविता कशा वाटल्या त्यावरही बोल ना -- नुसतीच मौलिक चर्चा नको -- राग आला तर मुद्दा टाळला जातो -- तसे होऊ नये --मीही तुझ्याबद्दल आदर बाळगूनच बोलतोय -- तू ज्याला टाकाऊ म्हणतो आहेस ते अनेकांना महत्त्वाचे वाटते आहे -- त्यामुळे तुझे मत टाकाऊ असण्याची एक शक्यता राहू दे समोर -- तुला त्या दोन कवितांबद्दल बोलायचे टाळावे लागले हेही लक्षात घे -- या असल्या स्थितिशील हेकटपणामुळेच मराठी कवितेची वाट लागलेली आहे -- ते मी अर्थात सकारण उदाहरणांसहित मांडणार आहे -- नुसतेच ' टाकाऊ ' वगैरे निरर्थक शब्द नाही वापरणार -- ' मराठी कविता ' या माझ्या कवितेबद्दल तू काहीच बोलू शकला नाहीस -- एक उथळ चर्चा केलीस -- नुसतेच काही कंडेम करण्याला काय किंमत राहणार ? टाकाऊ, भरताड हे नुसते कंडेम करणारे शब्द आहेत -- तुझ्या असल्या शब्दांमुळे मला पुन्हा कॉमेंट द्यावी लागली -- माझ्या कविता ज्यांना गांभीर्यपूर्वक चांगल्या वाटताहेत त्यांनाही कृपया क्षुद्र लेखू नकोस -- मतभेद असणारच पण नुसतेच हेटाळणीचे शब्द वापरायचे असे चीप स्वरूप येऊ नये चर्चेला --मुळात तो शब्द हवेतला आहे -- त्या वाचकांना आपण च्युत्ते म्हणणार का ? तुझी असतील काही तत्त्वे आणि निकष -- जग त्यावरच चालावे असे म्हणता येत नाही -- अजूनही तू त्या दोन कविता आणि माझी ' मराठी कविता ' हे का टाकाऊ आहे त्यावर लिही -- मी उत्सुकतेने वाचेन --पुन्हा तेच ! आता टाकाऊ, भरताड यांच्या ऐवजी सामान्य हा शब्द वापरला आहेस ! तुला माझ्या कविता आवडत नसतील म्हणून अशी चिडचिड करून काय उपयोग आहे ? तुझ्याकडे बोलण्यासारखे काहीच नाही आहे, नुसताच आवडीनिवडीचा प्रश्न आहे. तुझ्यासारखेच काही आणखीही कवितेचे वाचक आहेत, त्यांना या कविता खूप चांगल्या वाटताहेत. या कवितांच्या आशयाबद्दल माझी मला क्लॅरिटी आहे, हे एक आहेच. तू वाचणे आणि तुझी नावड सांगणे, हे फायनल नाही असू शकत. तुझा प्रॉब्लेम मला आलाय लक्षात, पण, त्याला मी काही करू नाही शकत. कवितांच्या बाबतीत बोलायची -- नुसतेच हेटाळणीचे शब्द वापरायची ही तुझी पद्धत अतिसामान्य आहे, हे समजून घे, जमल्यास यात बदल कर. तुझी नुसतीच निरर्थक चिडचिड तू व्यक्त करत राहिल्यामुळे -- जी चर्चा सुरूही नाही झाली ती आता खुंटलेली आहे. असो. थांबू या इथे.

अर्थात, तेही व्हावेच --

सवंग काय आणि मूल्यवान काय याचीही चिकित्सा व्हायलाच हवी --

Shridhar Tilve

You caught the ethos perfectly.

मराठीत एक तर समीक्षक नाहीत -- इतरांत बरेच फिक्स मतांचे बंदिस्त लोक आहेत आणि आपण कुठल्या टोळीतही नाही -- या वातावरणातच जर लाज नाहीय तर आपण लाजावे कशाला ? बेधडक आपले प्रामाणिक मत सांगून टाकावे ! 😀सगळ्या टोळ्या स्वत:ला प्रामाणिकच समजतात ! ते सगळे आपली मते फायनल समजणारे, थांबलेले लोक असतात ! कला ही टोळीबाहेरच असू शकते हे समजणारेही काही असणारच ! त्यांना नाकारले जाण्याची खेदखंत करून चालतच नाही. पण स्वत:ला उभे राहण्यापुरती तरी जागा करून घेण्यासाठी जमेल तेवढे परखड राहावे लागते. ही सदर कविता काहींना नसेल आवडली पण बऱ्याचजणांना ती महत्त्वाची वाटलेली आहे. हे चालतच राहणार. ' मोकळी हवा ' आणि ' कवितांचे परीक्षण ' या माझ्या पोस्टही पाहाव्यात. ये काम तो जोरसे चलेगा. सारख्या अशा कविताच लिहिल्या पाहिजेत असे नाही. आपल्या कामाची आपल्याला क्लॅरिटी असेल तर मतमतांतरांबद्दल सहिष्णू राहता येते. इथे स्वत:ला ' महाकवी ' म्हणवून घेणारेही काहींना गोड वाटलेले आहेत. त्यामुळे, समजून राहात आपले काम करत राहणे हाच उपाय. ' तुम्ही असे करा ' असे सल्ले द्यायला लागला माणूस की तो कलेतले फारच प्राथमिक नियम मोडतोय, आणि हे बरे नव्हेच.मी जो लेख लिहिणार आहे त्यात सविस्तर सगळे येईल -- या कवितेत हीच नावे का आली, हेही येईल -- आणखी का आली नाहीत, हेही येईल -- स्वत:ला उभे करण्यालाच महत्त्व द्यायचे असते तर मराठीत खूप सोपे मार्ग आहेत -- ते न स्वीकारल्यामुळेच तर परखडपणा लागतोय -- मराठीतले ९९ टक्के कवी हे स्वत:ला प्रोजेक्ट करत बसणारे आहेत -- वेगळी कविताही असणारच -- मूल्यमापनही चालूच असते -- कविता अमुक अशी नसेल तर ती कविताच नव्हे असे म्हणणारे मूल्यमापनच करत असतात -- तेच स्वातंत्र्य सगळ्यांना असणार -- आपापले लिहीतही राहू आणि मूल्यमापनही करत राहू -- मी जो लेख लिहिणार आहे त्यात सकारण मूल्यमापनही असणारच आहे -- सारांश, लिहीत राहावे, हेच खरे -- तुला नावांचा राग आलाय की काय अशी शंका येते -- यात कुणालाही महा वा ग्रेट म्हटलेले नाहीय -- या मार्गाने कोण गेले, असे आहे -- तुला काही खटकले असेल, आवडले नसेल, हे समजू शकतो पण हे होत राहणारच ना ! लेख झाला की तो तुलाच छापायचा आहे !🙂
चलो, जय हिंद, जय महाराष्ट्र !

नाटकात ' नाट्यात्म विधान ' आणि एकूणच कलेत ' हाताला काही लागणे ' या अपेक्षा कलेतली सर्जकता खतम करणाऱ्या आहेत. मराठीत तरी या खुज्या अपेक्षांचा उच्छाद आहे !
२८-०९-२१.

सांगून सुपरहिट

मी एक नाटक लिहिले होते. त्यात त्या काळातल्या हिंदी सिनेमाची एक बनावट स्टोरी ( गोष्ट नव्हे ) होती. त्याचे नाव होते, ‘ जागचं हलायचं नाही ‘. माझा ग्रेट दिग्दर्शक मित्र प्रकाश बुद्धिसागर याला ते खूप आवडले होते. तंत्राच्या अनेक करामती करून लोकांना चकित करत त्या नाटकाचा एक झगमगता प्रयोग त्याला व्यावसायिक रंगभूमीवर सादर करायचा होता. ते नाटक अर्थातच आहे तसे प्रायोगिक गरिबीत नसते आले. प्रकाशने त्याच्या आत्मविश्वासातून त्याचे नाव ठरवले होते, ‘ सांगून सुपरहिट ‘ ! पण, सुरुवातही न होता, तालमीतही न जाता, ती योजना बोंबलली आणि पुन्हा एकदा सवयीतले अपयश माझ्या खात्यात जमा झाले. नंतर खूप वर्षांनी, पुनर्लिखित स्वरूपात त्या नाटकाचा म्हणायला एकच प्रयोग, ‘ गोळ्या काढलेले पिस्तूल ‘ या नावाने झाला ! हे सांगायचे कारण म्हणजे, कविता लिहिण्याचे एक, सांगून सुपरहिट तंत्र मी आज इथे उघड करणार आहे. त्याच त्याच प्रकारच्या रटाळ कविता लिहिण्या-वाचण्याचा ज्यांना कंटाळा येत नाही त्यांच्यासाठी हे नाही आहे. नावीन्य आणि स्वत:ची मर्मदृष्टी यांचे नवविधा संगम करत राहावे असे ज्यांना वाटते त्यांच्यासाठीच ही पोस्ट आहे. मुख्यत: वैचारिक पायावर उभे राहून सामान्य अनुभवांची सौंदर्ययुक्त री ओढत राहणे म्हणजे कविता, अशी बाळबोध समज स्वीकारणाऱ्यांसाठी हे नाही आहे.

तंत्र म्हटले तर सोपे आहे. तुमचे जे काही आकलन असेल जगण्याच्या प्रक्रियेचे ते यातून व्यक्त होऊ शकेल. तरीही, मुख्यत: क्षणोक्षणी दिसणारी विसंगती आणि निरर्थकता ज्यांना जाणवत असेल त्यांच्यासाठी तर ही एक खाणच ठरू शकते. साधे कोणत्याही दिवसाचे एखादे वर्तमानपत्र घ्यायचे. मग कोणत्याही पानावरचे, त्या त्या वेळी समोर येईल ते ते वाचत, आपल्या आकलनाच्या अंगाने मांडत जायचे. यात, आपल्या डोक्यात असलेले वा सुचणारे असेही काही काही समाविष्ट करत जायचे. कविता म्हणजे हेच, असेच, अमुकच असे काही पकडून बसायचे नाही. बुद्धिगम्य अर्थाचा विचारही करायचा नाही आणि त्याच्या अभावाची भीतीही बाळगायची नाही. मानवी अनुभवाचे एक विश्वदर्शन यातून खुले होऊ शकते. याचा अर्थ जुन्या अभिव्यक्तिपद्धती नष्ट होतात, असे काही नाही. काही लोकांना असे म्हणायची एक हौस असते की आता मूर्षावादाचा काळ संपला, स्वच्छंदतावादाचा संपला, अतिवास्तववादाचा संपला. तर तसे काही होत नसते. मानवी मनाच्या सर्व शक्यता चालूच राहतात. ( मराठीत वास्तववादाचा काळ कधीच संपत नाही ! ) हे पाहता, भावनिक आणि माणुसकीच्या प्रचाराच्या कविता लिहिणाऱ्यांनी निर्धास्त राहायला हरकत नाही. काही कवी हयातभर एकाच प्रकारची आवड जोपासणारे असतात तर काही, माणसांतल्या निरनिराळ्या प्रवृत्तींना खुश करणारे विविध गुणदर्शन करण्यात माहीर असतात. त्यांचे ते काम चालू राहू शकतेच. हेही काही असू द्या बाबा, अशी आपण त्यांना विनंती करू शकतो. हा एक वेगळा प्रकार, एवढेच राहू द्या सध्या. पण, अर्थातच, हे तंत्र, माझ्या त्या नाटकाप्रमाणे पूर्ण अपयशीही होऊ शकते. नाही तरी इथे कुठे कसला बौद्धिक अर्थ व्यक्त करायचा आहे, फेल झाले तर होऊ दे, असा विचार मी करतो – ही अर्थात सर्वांच्याच ‘ बसकी बात ‘ नाही याची मला जाणीव आहेच.

तर मी इथे प्रात्यक्षिक दाखवणार आहे. त्यासाठी मी घेतला आहे आज, मंगळवार, दिनांक ०५-१०-२१ चा पुणे मटा. चलो, शुरू करते हैं –

कल्पना

एखादी व्यक्ती अमुक असे वागते आहे, असे दोनतीनदा आपल्या लक्षात येते. ते आपल्याला आवडत नाही. ती व्यक्ती हेतूपूर्वक असे वागते आहे या कल्पनेने आपण त्या नात्यातला आपला पवित्राही बदलतो. फक्त एवढेच कशाला असे म्हणत कधी आपला एकूणच पवित्राही आपण बदलतो. ही सगळीच आपली कल्पना असू शकते. आपल्या आयुष्याची आखणी करत जायला या असल्या कल्पनेशिवाय आपल्याकडे असतेच काय ? म्हणजे, पवित्रे, भूमिका ठरवत जाणे हेच जगणे ? पवित्रा कोणताही असो, तो एक ताण निर्माण करणारा आणि त्रासदायकच प्रकार असतो. म्हणजेच , आपण सतत एक काल्पनिक आयुष्य जगतो की काय ? असे ताण निर्माण करत जगणे हेच जगणे असेल का अटळ ? -- असा प्रश्न कुणाला पडला तर तो आध्यात्मिक म्हणून फेटाळू नये, असे वाटते.

--- ००० ---

स्वातंत्र्य -- एक कलामूल्य

कवीचे अभिव्यक्तिस्वातंत्र्य तसेच वाचकाचे आकलनस्वातंत्र्य ! कविता लिहून झाल्यावर कवीने बाजूला व्हायला हवे, मौन पत्करायला हवे. " अहो, अशी नाहीय ती कविता, असा नाहीय तिचा अर्थ, अहो, खरे तर अर्थच नाहीय या कवितेला -- " अशी कवितेची बाजू घेण्याची भूमिका त्याने घेऊ नये. मग, रोमँटिक कवितेचे उपरोधिक अर्थ वा आध्यात्मिक कवितेचे राजकीय अर्थ, असे काहीही होवो. हे असे सर्व असलेला समाज हा खूपच स्वातंत्र्यप्रेमी असणार. कवी, कलावंतांप्रमाणेच इथले वाचकही जिवंत आणि सर्जकतेने ओथंबलेले असणार ! तर, प्रश्न असा येतो की अशा एकूणच सर्जकतापरिप्लुत समाजात कवितेची वा कलेची गरजच काय ? ' करमणूक ' हे एक त्रिकालाबाधित मूल्य सोडले तर हवीय कशाला कविता ?

--- ००० ---

कविता वाचण्या-समजण्या-मुरण्या ला लागणारा वेळ, काळ या विषयावर आपले मित्र गणेश कनाटे यांची एक पोस्ट वाचली. तीवर दिलेली माझी कॉमेंट --

ही पोस्ट वाचून माझ्या मनात काहीसे अपराधी भाव जागे झाले. मी तर कवितासंग्रह घेतला वाचायला की तो पूर्णच वाचतो. लगेच त्यावर अभिप्रायही देतो. असे अनेक कवितासंग्रहांबाबत घडलेले आहे. उदाहरणार्थ कालच राहुल पुंगलियांच्या ' गावाबाहेर ' वर मी लिहिले आहे. यावर विचार करता मला असे दिसते की कविता वाचताना मी खूप लवचिक, तरल असतो. माझी लुडबूड थांबवून कवितेलाच बोलू देतो. याचाच अर्थ कविता मला ' पोचणे ' हे माझे नसतेच कर्तृत्व. मी स्वत:ला त्या वेळी खूपच ' कमी ' केलेले असते. याचा सारांश असा दिसतो की कविता ' मला ' कधीच नाही समजत. ती ' मी नसण्याला ' समजते. त्यामुळे, ' मला ' अपराधी वाटण्याचे काही कारणच नाही.

--- ००० ---

उत्तर-आधुनिकता

आधुनिकतावादाच्या एका अवस्थेत, " मानवी स्वातंत्र्य आणि मुक्तीच्या नावाखाली प्रबोधनामूल्ये ही सार्वत्रिक जुलूम-जबरदस्ती करू पाहतात, असा संशय बळावू लागला. " ( आधुनिक समीक्षा-सिद्धान्त – मालशे-जोशी- पान २९. )

संहिता आणि वाचक यांवर हे पहा – " या सर्व प्रक्रियेला लेखकरूपी मूळ नसते, तर वाचकरूपी अंतिम साध्य असते. वाचकामध्ये, खरे म्हणजे वाचकत्वामध्ये, संहितेच्या अर्थाची जुळणी होण्याचे कार्य घडत असते. तेव्हा एका दृष्टीने पाहता लेखकत्वाच्या संकल्पनेचा अंत म्हणजे वाचकत्वाच्या संकल्पनेचा उदयच असतो, अशी भूमिका बार्थने घेतलेली आहे. " ( त्याच पुस्तकातले पान १५८. ) म्हणूनच, उत्तरआधुनिकतावादात असे म्हटले जाते की लेखकाची मूळ संहिता असे काही नसतेच तर फक्त वाचकांच्या कॉपीज असतात.

याचा आपण आपल्या साध्या पद्धतीने अर्थ पाहिला तर काय दिसते ? आंबेडकरवादकेंद्री कवीने लिहिलेली कविता समजा मराठावादकेंद्री वा ब्राम्हणवादकेंद्री वाचकाने वाचली तर तो तो वाचक त्याच्या अवस्थेतून ती कविता वाचणार वा तिचा अर्थ लावणार, म्हणजे मूळ आंबेडकरवादी कविता अस्तित्वातच नाही असणार. किंवा समजा ( समजा म्हणतोय ) एखाद्या तालिबान्याने ग्रेसची कविता वाचली तर तो स्वत:ची तालिबानिगिरी पक्की ठेवूनच तिच्याकडे पाहणार. हे असले विवेचन म्हणजे, माणसाचा हलकटपणा, हिंसकपणा, क्रूरपणा, द्वेष, महत्त्वाकांक्षा, स्ववर्चस्वाची इच्छा, सुखलालसा हे सगळे सर्वांचे सतत अबाधितच असणार असे गृहीत धरणे आहे. असे जर असेल तर मूल्यात्मकता हा शब्दच रद्द होतो. उत्तरआधुनिकता हेच म्हणते. सत्य, स्वातंत्र्य वगैरे असले काही नसतेच, हाच इथे आकलनाचा पाया असतो. असे असेल तर मग कलानिर्मिती हवीच कशाला याचा विचार करायची वेळ येते.

माझ्या आकलनाप्रमाणे चांगली कलाकृती ही तिच्या निर्मात्याच्या प्रभावयुक्ततेतून बाहेर पडण्याची त्याची प्रक्रिया असते आणि तिचे वाचकाने वाचन करणे हे त्याने स्वत:च्या प्रभावयुक्ततेतून बाहेर पडणे असते. हीच तर कवी आणि वाचक यांनी एकमेकांना भेटण्याची शक्यता असते. आणि ती असतेच. अन्यथा, ज्याच्या त्याच्या आवडीची करमणूक एवढेच कलेचे कार्य आहे, असे म्हणावे लागेल. त्यामुळे, मला असे दिसते की उत्तरआधुनिकतावाद हा माणसाचा हलकटपणा आणि मूर्खपणा हेच फक्त सत्य असते, असे मानणारा आहे. कलानिर्मिती आणि मानवी मूल्य यांचा संबंधच नसतो, असे मानणारा आहे.

मला हे मुळीच पटत नाही. प्रत्यक्ष जगण्यात स्वातंत्र्याची म्हणजे स्वत:च्या प्रभावयुक्ततेतून बाहेर पडण्याची शक्यता निश्चितच असते, असे मला दिसते. जगातल्या अनेक मोठमोठ्या कलावंतांनी याला दुजोरा दिलेला आहे. तुम्हाला काय वाटते ?

--- ००० ---

जे. कृष्णमूर्ती

जे. कृष्णमूर्ती स्वत:कडे कोणतेही ग्लॅमर घेत नाहीत आणि जर कुणी असे ग्लॅमर मिरवत असेल तर त्याला जुमानू नका असे सांगतात. माणसाच्या जगण्यात येणारे प्रश्न आणि समस्या यांवर आयुष्यभर ते बोलत राहिले, अनेकांशी चर्चा करत राहिले. जगातले अनेक तत्त्वज्ञ, मानसशास्त्रज्ञ, वैज्ञानिक, कलावंत त्यांत सामील होत राहिले. माणसाला त्याच्या दु:खातून बाहेर पडता येईल का, हा प्रश्न हजारो वर्षे अनेक धर्मांनी हाताळलेला होता. त्याचे धार्मिक अस्मितेचे आणि ओळखीचे स्वरूप घालवून कृष्णमूर्तींनी हे मैत्रीपूर्ण चर्चेच्या स्तरावर आणले. गुरुबाजी नाकारली. कोणतीही तथाकथित धार्मिक परिभाषा वा कर्मकांडांची अवडंबरे नाकारली. पुस्तकी ज्ञान कचऱ्यात टाकायला सांगितले. तू स्वत: तुझ्या प्रश्नांना सामोरे जाणे हा एकच मार्ग, असे त्यांनी सांगितले. यात कोणत्याही तडजोडी नाकारल्या. मानवजातीत हे काही क्रांतिकारक घडत होते. पण क्रांती बाहेर कुठे नाही तर स्वत:तच घडावी लागेल, हे त्यांनी सांगितले. सर्व समस्यांबाबत टप्प्याटप्प्याने, अगदी वैज्ञानिक पद्धतीने त्यांनी विवरण केले. " कशासाठी येता ४०-४० वर्षे माझे बोलणे ऐकायला -- ही काही धार्मिक करमणूक नव्हे ", असे ते म्हणत. ' वर्तमानात जगा ' आणि ' आत्ता नाही तर कधीच नाही ' असे ते म्हणत. जग असे संघर्षमय, हिंसक का होत चाललेले आहे, यावर ते अत्यंत गंभीरपणे बोलत.

यात खरे तर कुणाला काही प्रॉब्लेम असायचे कारणच नव्हते. पण धार्मिक खोटेपणा आणि पुस्तकी साम्राज्ये उभी करणारे यांची सिंहासने यामुळे आपोआप डळमळीत होत होती. त्याची त्यांना भीतीही वाटत होती. तसले अनेक लोक कृष्णमूर्तींबाबत अत्यंत संतापून बोलत. अजूनही बोलतात. एक तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक तर ' हा भडवा काय सांगतो -- हे सगळे गीतेत सांगितलेले आहे ' अशा प्रकारे संतापताना मी पाहिलेले आहेत. प्रत्यक्ष स्वत: कोणत्याही समस्येला तोंड न देता ज्यांना शाब्दिक अधिकारपदे टिकवायची असत ते सगळे कृष्णमूर्तींच्या बाबतीत शत्रू होत. मला स्वत:ला अगदी बालपणापासून जगण्याबाबत गंभीर समस्या भेडसावत आलेल्या असल्याने मला त्या समजून घेण्याच्या प्रक्रियेत कृष्णमूर्तींची खूप मदत झाली. कोणतीही व्रतवैकल्ये, पूजा-अर्चा, दिवे लावणे, जयंत्या-पुण्यतिथ्या असले काहीही मला नको होते. आणि असे माझ्यासारखे जगात खूप लोक होते. ते आस्थेने कृष्णमूर्तींचे ऐकत-वाचत असत.

ज्यांना हे नाही आवडत त्यांनी आपापल्या गल्ल्या, राजधान्या संभाळत बसाव्यात ना. कृष्णमूर्तींना शिव्या देण्याचे, त्यांच्यावर इतके चिडण्याचे काय कारण, असे मला वाटे. कृष्णमूर्ती त्यांच्या श्रोत्यांनाही अनेकदा म्हणत की मी तुमच्यावर अवलंबून नाही, तुम्हीही माझ्यावर अवलंबून राहू नका. आहे तसे सुखासीन जगत राहू इच्छिणाऱ्यांना असा माणूस धोक्याचा वाटू शकतो, हे कळून आले.

अजूनही ज्यांना परंपरेतच फिट राहायचे आहे ते तसे राहातातच. ज्यांना नको आहे कोणतेही अवडंबर ते कृष्णमूर्ती ऐकतात-वाचतातच.

--- ००० ---

०२ सप्टेंबर' २१ ला मी, प्रा. मधुकर देशपांडे या माझ्या एका चुलत भावाबद्दल इथे एक ' जिंदगी का सफर ' ही पोस्ट दिली होती. कॅन्सरचे निदान झालेले असूनही, त्याने आणि त्याच्या कुटुंबाने ते सर्व एक वस्तुस्थिती म्हणून स्वीकारणे

आणि बाकी रूटीन आहे तसे चालू ठेवणे, यावर ती पोस्ट होती. तो काल रात्री निवर्तला. रात्री साडेअकरानंतर त्याच्यावर अंत्यविधी झाला. स्मशानातून सुमारे साडेबाराला आम्ही घरी परतलो.
आमच्या पिढीतल्या भावंडांत पहिला नंबर त्याने लावला ! बाकी शांतता आणि स्मृतीस अभिवादन !

बिंदी-गिंदी, बासुंदी, मटण, कबाब, वगैरे.
माझा माझ्या एका मित्राशी संवाद चालला होता. मी त्याला विचारले की एखाद्या प्रांतात अमुक एका जातीची टक्केवारी जास्त आहे म्हणून त्या प्रांतात त्याच जातीचे, राजकारणासह सगळीकडे प्राबल्य असावे, इतर जातींना नाइलाजापुरतेच स्थान मिळावे, यामागे तर्क कोणता असतो ? तर तो म्हणाला की लोकशाहीत असे होणारच ना, संख्येवर संधीही मिळणारच ना ! पण क्षणात तो असेही म्हणे की धार्मिक ध्रुवीकरण वाईट, तो निव्वळ वेडेपणा आहे, अमुक धर्माचे लोक जास्त आहेत म्हणून त्यांचे प्राबल्य असावे, असे म्हणण्यात कोणताही शहाणपणा नाही ! हे आठवायचे कारण सध्या उडत असलेला सांस्कृतिक आणि उदारमतवादी यांच्यांतला धुरळा. आपण असे म्हणू शकतो की लोक सामान्यत: -- हिंदुत्ववादी, मुस्लिमवादी, धर्मनिरपेक्षतावादी आणि पुरोगामी अशा गटांत विभागले गेलेले दिसतात. एकदा असे गट वा भेद मान्य केले की ‘ शहाणपणा ‘ या विषयाला तिलांजली द्यावीच लागते. ‘ शहाणपणा ‘ हा शब्दही कुठे चर्चेत नसतो. जाती, धर्म, भाषा एवढेच काय देश यांवर आधारित एकदा माणसे विभागली गेली की शहाणपणा वगैरे काही मुद्दा राहातच नाही. काय, शहाणपणा म्हणजे ? तर त्याचे उत्तर, मी म्हणतो तेच – असेच येणार. शासनव्यवस्था कोणत्याही प्रकारची असो, कशाचाही गौरव करायला लोकांना आवडत असो, कायदा सर्वत्र निर्बुद्धपणाचा – जंगलाचा कायदाच चालणार, हे ठरलेले आहे. नुसते ठरलेलेच नाही तर ते पूर्ण मानवजातीने स्वीकारलेलेही आहे.  मुळात ‘ शहाणपणा ‘ ( wisdom ) म्हणजे काय, हे कुणालाही सांगता येत नाही. समजा अमेरिकेच्या कृती  ‘ चूक ‘ आहेत, तर काय ? निर्णय होणार ते ताकदीवर, जोरावर, जबरदस्तीवर. पूर्ण मानवजातीने ठरवले तर जगातली गरिबी चुटकीसरशी खतम होऊ शकते. पण तसे होऊ नाही शकत कारण पूर्ण मानवजातच समतेच्या, माणुसकीच्या विरोधात असते. ही रचना सर्वांनाच मान्य असते. त्यासाठी सैन्यावर, शस्त्रास्त्रांवर अब्जावधी रुपये खर्च करणे सर्वांनाच मान्य असते. शक्तिमान असणे, प्रबळ असणे हाच ‘ शहाणपणा ‘ हे सर्वांनाच मान्य असते. एकदा कोणतेही विभाजन, भेद मान्य केले की मग ‘ शहाणपणा ‘ या विषयावर कुणीही बोलण्यात अर्थ राहात नाही.
अशा  परिस्थितीत, ‘ शहाणपणा ‘ असे काही असू शकते का आणि काय, कसे असेल ते जगणे – असे प्रश्न काहींना पडू शकतात. ‘ आध्यात्मिक ‘ पळपुटे अशी त्यांची संभावना सर्वच सक्रिय भूमिकाधारकांकडून होऊ शकते. सर्वांचे म्हणणे एकच असते की कोणती का असे ना, एक बाजू घ्या आणि पेटवत, धडाधड भडकवत ठेवा सगळ्यांचे जगणे ! भाषेचा अभिमान बाळगणाऱ्यांना भाषेचे कितपत असते देणे-घेणे, तसेच धर्माचा अभिमान बाळगणाऱ्यांचा धर्माशी कवडीचा तरी संबंध असतो का, हे प्रश्न विचारले पाहिजेत. तसेच ‘ पुरोगामी ‘ हीही एक मूर्ख ओळख होऊन बसलेली आहे नुसती, हेही पाहायला हवे. अमुकच फक्त शहाणे, तेही जगात, इथे महाराष्ट्रातच फक्त उपलब्ध आहेत, असे कुणीच म्हणू शकणार नाही.

अलगता, ओळख, विभाजन आणि वैचारिक बांधिलकी – हे आहेत मूलप्रश्न. हे लक्षात येऊन तरी उपयोग काय ? एक तर संघर्षात सहभागी व्हा नाही तर पळपुटे म्हणून ख्यातनाम व्हा, यांतच निवड करावी लागणार !

कबाब खा, वर बासुंदी प्या – समानता ठेवा, म्हणजे झाले !

--- 000 ---

जगण्याचा मार्ग

आज मी जरा म्हणजे मला मुळीच न कळणाऱ्या विषयावर लिहितोय. याचा अर्थ, एरवी, मी मला कळणाऱ्या विषयावरच लिहितो, असा माझा दावा नाही. बारावीनंतर प्रवेश कसा कुठे घ्यावा, हा तो विषय. सामान्यत: विद्यार्थ्यांना असो की त्यांच्या पालकांना, नेमके काय करावे याची स्पष्टताच नसते. मग, अमुक ठिकाणी, अमुक शिक्षण झाल्यावर मोठ्या पॅकेजच्या नोकऱ्या कशा मिळतात, हेच एकूण विचाराचे आणि निर्णयाचे सूत्र बनते. आर्टस आणि कॉमर्स सध्या सोडा, तिथे फार डोके चालवण्याचा प्रश्न नसतो. आपल्याला हवे ते कॉलेज मिळाले की झाले, असा तो एक सोपा निर्णय असतो. सायन्स वाल्यांचे मात्र फारच अवघड असते. पूर्वी विद्यार्थी जरा हुशार असला की त्याने डॉक्टर वा इंजिनियर व्हायचे, हे ठरलेले असे. आताही बरेचसे तसेच असले तरी महाविद्यालये, विविध कोर्सेस यांचा खूपच गुंताडा दिसतो. ( शिवाय ठिकठिकाणच्या फी, देणग्या, बाहेरगावी गेल्यास येणारे खर्च, वगैरे मुद्दे वेगळेच ! ) काय केले म्हणजे नोकरी उत्तम मिळेल, हेच असते विचारात. कुठे कोणत्या कंपन्या येतात मुलाखतींना, मुले निवडायला, ही माहितीही महत्त्वाची ठरते. क्वचितच एखाद्या विद्यार्थ्याला त्याला काय करायचे आहे याची स्पष्टता असते. खरे तर अशा वेळी निर्णय सोपा व्हायला हवा. पण तिथेही पालकांचे विचार वा इच्छा वेगळ्या असतात, त्यामुळे अशा वेळी संघर्ष होतात. प्रवेशासाठी जे फॉर्म भरावे लागतात त्यांत आपल्या निवडींचे क्रम देणे हे फारच बुद्धिमत्तेचे काम असते, असे दिसते ! त्या कामात योग्य ती दृष्टी नसल्यामुळे बऱ्याच हुशार मुलांनाही त्यांना हवे ते कोर्सेस मिळत नाहीत, असे कळते. म्हणजे ही एक लॉटरीच आहे एक प्रकारची ! मुलांनी आणि पालकांनी मिळून खेळायची तीन पत्ती ! यातून सगळे जे जसे घडत जाईल त्यातून घडत जाणार या देशाचे पुढील शिल्पकार ! कधी कधी म्हटले जाते की मुख्य म्हणजे जगण्यातल्या अनिश्चिततेचे शिक्षण मुलांना दिले जावे याची आपल्या शिक्षणात सोयच नाही आहे. आता, या प्रवेश प्रक्रियेत मात्र ते घडून येत आहे ! बरीच मुले नाराज होऊन उत्तम शिक्षणाचे मार्ग पत्करत आहेत ! हे सर्व पाहता माझे साधे भरडे जीवन बरे गेले असे मला वाटते !

--- ००० ---

मंगला आठलेकरांचा हा लेख खूपच विचारांना चालना देणारा आहे --

https://www.loksatta.com/.../dr-mangala-athalekar.../...

मंगला आठलेकर यांच्या भाषणाची लोकसत्तेची एक लिंक मी इथे विचारार्थ दिली होती. त्यावर राहुल पुंगलिया यांनी चांगले लिहिलेले असून त्याची पोस्ट दिलेली आहे. तिथे देण्यासाठी मी कोमेन्ट लिहिली पण ती जास्त शब्दसंख्येमुळे तिथे घेतली जात नाही आहे. त्यामुळे ती मी इथे माझी पोस्ट म्हणून देत आहे --

पुरस्कार, वगैरे.

मंगला आठलेकर यांच्या लोकसत्तेतल्या एका भाषणाची लिंक मी चर्चेसाठी इथे पोस्ट केली होती. त्यावर समंजसपणे वाचकांनी आपापले विचार, आकलने मांडावीत, अशी अपेक्षा होती. प्रथमच, त्यावर, राहुल पुंगलिया यांनी काही चांगले विचार मांडलेले असून ते नक्कीच चर्चेला चालना देणारे आहेत. पुंगलियांच्या कविता जरी मला आवडत असल्या तरी त्याचा अर्थ आमची एकमताची वा एका ' भूमिके ' ची टोळी असते, असे नाही. त्यामुळे, माझ्या आकलनाप्रमाणे मी लिहीत आहे.

कोणतीही सत्ता ही स्थिर असते आणि स्थिर राहण्याच्या प्रयत्नात असते. सर्जकता ही प्रवाही असते – स्थिरतेशी तिला काही देणेघेणे नसते. त्यामुळे, कलावंतांचा, साहित्यिकांचा सत्तेबरोबर सतत संघर्ष असणारच. हा संघर्ष, खरोखर प्रवाही असणारे कलावंत आणि वेगळ्या प्रकारची स्थिरता हवी असणारे कलावंत – या दोघांचाही सत्तेशी असणारा वेगवेगळा संघर्ष असा असू शकतो. तसे पाहायला गेले तर अनुभव, स्वभाव, विचार या सर्वच बाबतीत कोणत्याही दोन व्यक्ती एकसारख्या नसतात, याचाच अर्थ त्या छुप्या वा उघड संघर्षातच असतात. वैचारिक स्तरावर आदर्श, सर्वसमावेशक, अलगता निर्माण न करणारे काही असू शकते का ? तर याचे उत्तर ' नाही ' असेच येणार. कोणतीही वैचारिक मांडणी सर्वांच्या दृष्टीने परिपूर्ण, निर्दोष वा ' न गोंधळलेली ' असू शकत नाही. त्यामुळेच, आठलेकर बाईंना पुरस्कारवापसीवाले गोंधळलेले वाटतात, पुंगलियांना आठलेकर बाई गोंधळलेल्या वाटतात, मला पुंगलिया गोंधळलेले वाटतात आणि आता मी हे जे लिहितो आहे तेही आणखी कुणाला गोंधळलेले वाटू शकते. त्यामुळे, एकमेकांना गोंधळलेले म्हणण्यात फारसा अर्थ नाही.

पुंगलिया म्हणतात ते बरोबरच आहे – वशिलेबाजी, भ्रष्टाचार हा कुठेही असू शकतो. मग ते अर्ज करणाऱ्यांना दिलेले पुरस्कार असोत की अर्ज न करता दिलेले असोत. कोणतीही व्यक्ती, संस्था वा सरकार हे कोणत्याही कलावंताच्या विचाराशी एकरूप असू शकत नाही. विचारवंतांचे खून असोत की निवडणुकीच्या काळात होणारे कार्यकर्त्यांचे खून असोत, त्यांत मूल्यात्मक फरक करता येणार नाहीत. एक वा अनेक शेतकऱ्यांच्या, आता एसटी कर्मचाऱ्यांच्या वा विद्यार्थ्यांच्या आत्महत्या होत राहणे हे तितकेच भयानक असते. गरीबीचे अस्तित्व वर्षानुवर्षे टिकून असणे, शिक्षण, आरोग्य यांत समानता नसणे, हेही सगळे भयानकच असते. हे सर्व पाहता, कोणत्याही कलावंताने खरे तर पुरस्काराच्या फंदातच पडू नये. कथा सांगून द्रव्याची अपेक्षा ठेवणाऱ्याला तुकाराम शिव्या देतो. कलेचे कार्य हे मानवी जगण्याला मूल्यात्मकता देण्याचे आहे, हे मान्य असेल तर तेही एक धर्मकार्यच आहे. ही काही उपयुक्त उत्पादनांची व्यापारी देवघेव नाही असू शकत. कलावंतांना जर श्रेयसासाठी काम करायचे असेल तर तुकारामाचे म्हणणे नक्कीच महत्त्वाचे ठरते. आणि एकूण मानवी व्यवहार पाहता कोण त्या अर्थाने मूल्यात्मक काम करत आहे, हे एकमताने ठरणे अशक्य आहे. तसे तर देशात धर्मभेद असणे, जातीवर आधारित राजकारण असणे हेही प्रचंड हिंसक आणि घातक आहे. अशा अनेक गोष्टींना जनतेचा पाठिंबा आणि प्रोत्साहनही असल्याचे दिसते.

एक तर पुरस्कार न घेणेच बरे आणि घ्यायचे असतील तर सर्व भेदाभेदांपासून मुक्त असे आपण आहोत का, हेही पाहायला हवे. युद्धविरोध हे मूल्य असेल तर ते आपल्या आकलनात, आचरणात आहे का, हेही कलावंताने पाहायला हवे. नाही तर एकमेकांना गोंधळलेले म्हणत आहे ते चालू ठेवणे, हेच घडत राहील. आणि अमुक मूल्य महत्त्वाचे, तमुक नाही, असे तरी काही असते का, याचेही आत्मचिंतन कलावंताच्या जगण्यात असायला हवे. की सर्व मूल्यांमध्ये एकात्मता असते – हाही प्रश्न विचारात घ्यायला हवा. असे जर नसेल घडत तर आपल्याला फक्त आपापले राजकीय स्वार्थ साधायचे असून मूल्यात्मकतेशी आपल्याला काही देणेघेणे नाही हे स्पष्टपणे पाहायला हवे. मग, आता चालतेय तसेच, लोकशाहीच्या तत्त्वाप्रमाणे संख्येची शक्ती याच तत्त्वावर सगळे चालत राहणार, यात शंकाच नाही.

--- ००० ---

लोकशाही आणि सत्ता

लोकशाहीत प्रभावी ठरण्यासाठी वा सत्तेवर येण्यासाठी खालील उपाय होत असतात –

१. लोकांना आपुलकीने, प्रेमाने आपले विचार पटवणे.

२. धाक, दहशत, पैसा वा इतर शक्य ते सर्व अशा कोणत्याही माध्यमातून मते मिळवणे.

३. परिस्थिती अशी तयार करणे की जीमुळे लोक आपल्याकडे वळतील.

४. निवडणुकीची व्यूहरचना अशी करणे की तुल्यबळ विरोधकाची मते विभागली जावीत.

५. जात, धर्म, इतिहास, विभूती हे मुद्दे वापरून लोकांना आपल्याकडे वळवणे.

६. वरीलपैकी अमुक मुद्दे कसे घातक आणि अहिताचे आहेत त्याचा प्रचार करणे.

७. उत्तम, आकर्षक आणि हितकारी जाहीरनामा तयार करणे. ( जरी तो वाचून त्यावर आधारित मतदान फारसे कुणी करणार नाही, हे माहीत असले तरी. )

वरील सर्व उपाय वा मार्ग प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे वैधच समजले जातात. त्यांतले काही आपण वापरले तर वैध, दुसऱ्याने वापरले तर अवैध, असे असते. परंतु, सर्वच संबंधित व्यक्ती या जनहिताची कळकळ बाळगणाऱ्या आहेत, हे मान्य करूनच सर्व डावपेच आखणे क्रमप्राप्त असते. हे सर्व असे करणे हे कोणत्याही हुकूमशाहीपेक्षा नक्कीच चांगले, यावर सर्वांचे एकमत असणे म्हणजेच लोकशाही.

( माध्यमचर्चा, मते आणि उथळ निरीक्षणे यांवर आधारित अशी ही पोस्ट आहे. फार गांभीर्याने घेऊ नये. )

--- ००० ---

आत्मप्रेम, आत्मरती, आत्मगौरव

मानसशास्त्रातले कोणतेच संशोधन हे सत्य धरून चालू नये कारण ते सारखे बदलत असते, असे म्हणणारे लोक आहेत. तुम्ही कोणती विचारसरणी स्वीकारणार हे तुमच्या जनुकनकाशावर अवलंबून असते, असे संशोधन समोर आले की काहीजण खूपच संतापतात कारण आपली असाधारण बुद्धी आणि अथक अभ्यास यांच्या तपस्येतून आपण

आपली मते, भूमिका वा विचारसरण्या ठरवल्या आहेत, ही त्यांची खात्री असते. या समजाला धक्का बसणे म्हणजे त्यांनी मानलेला तो एक भ्रम होता फक्त, असे होते. ते त्यांच्या जगण्याला परवडणारे नसते. आता, अलीकडेच माणसात नार्सिसिस्टिक प्रवृत्ती का असतात यावर एक संशोधन झालेले आहे. आत्मप्रेम, आत्मरती, आत्मगौरव यांचे एवढे काय महत्त्व असते मानवी जगण्यात, हा तो मूळ प्रश्न आहे. " मराठ्यांच्या मुलींना ज्या हाताने फुगडी घालता येते त्याच हाताने शत्रूची गर्दनही छाटता येते " असे काही वाक्य सध्या एका मालिकेच्या जाहिरातीत टीव्हीवर सतत चालू आहे. अरे, हो ना ! पण आता का अशा कानठळ्या बसवताय आणि गरज का वाटते हे सध्या सांगायची आणि कुणाला ? की फक्त हे एक जुने ऐतिहासिक सत्य एंजॉय करणे आहे ? फक्त एक करमणूक नुसती ? हाच विचार पुढे नेला तर असे दिसते की शिवाजी, बाजीराव, आंबेडकर, गांधी, सावरकर अशा अनेक विभूतींच्या गौरवाची गरज सततच निरनिराळ्या समूहांना वाटत असते. काहींना वाटते की बाबा हिंदू धर्मात जेवढा तत्त्वज्ञानाचा विचार झालेला आहे तेवढा जगात कुठेच नाही झालेला, त्यामुळे, आम्हीच होणार जगद्गुरू ! काहींना वाटते की आम्हीच होणार जगातली महासत्ता ! पण काय गरज काय हे असे होण्याची ? सारखेच इतरांनी तुम्हाला शूर, पराक्रमी, शहाणे म्हणत तुम्हाला आरत्या ओवाळत राहावे, अशी ही परावलंबी अपेक्षा असायचेच काय कारण सतत मनात ? यावर काही संशोधन झालेले आहे. कारण याचे बरेवाईट परिणामही घडत असतात.

त्यात एक मुद्दा असा आहे की व्यक्तिगत स्तरावर या लोकांना एक न्यूनगंड असतो. एक तर आपण कमी पडतोय किंवा इतर लोक आपल्याला आपल्या योग्यतेप्रमाणे मोजत नाही आहेत, आपल्याला योग्य ते स्थान वा मान दिला जात नाही आहे, अशी यामागे भावना असते. तज्ञ म्हणतात की काही प्रमाणात हा आत्मगौरव जरूर असावा, तो उपयोगी असतो – आत्मविश्वास देतो, कार्यशक्ती देतो. होय, पण काही म्हणजे किती प्रमाणात ? काही लोक म्हणतातच ना की बाबा महत्त्वाकांक्षा, स्पर्धा, द्वेष, सूडभावना, हिंसा हेही सगळे लागणारच जगण्यात जसे प्रेम, मार्दव, संवेदनशीलता, वगैरे. होय, पण म्हणजे किती ? दिसते असे की माणसाला असे सर्व गोष्टींचे प्रमाण ठरवून काही जगता येत नाही. एकूणात जगण्याची बोंबच होत राहते. व्यक्तिगत वा सामूहिक आत्मगौरवाचे रूपांतर शेवटी पूर्वग्रह, द्वेष, हिंसा या दिशेनेच जात राहते. अतिरेकीपणा, नक्षलवाद हे आपण वाईटच म्हणतो पण याच्याही मागे अशी काही न्यूनगंडाची, योग्य सन्मान मिळत नसल्याची – तशा भावनांची कारणे असू शकतील. राजकारणी, लेखक, कवी, कलावंत यांनाही वाटत असते की माझ्या कामाला योग्य स्थान दिले जात नाही आहे. मग तेही टोळ्या करायचे मार्ग अवलंबतात. म्हणजे ज्यांनी समंजसपणा, परिपक्वता यांच्या दिशेने जावे तेच हिंसकपणाच्या दिशेने जातात !

यावर सामूहिक प्रबोधनाने काही मार्ग सापडेल ? आणि करणार कोण हे प्रबोधन ? की प्रत्येक व्यक्तीला स्वत:चे मन समजून घ्यावे लागेल ? या एकूण प्रकाराच्या दोन लिंक्स खाली देत आहे –

https://www.theatlantic.com/.../group-narcissism/620632/...

आणि –

https://getpocket.com/.../11-mental-tricks-to-stop...

हे माणसाच्या जगण्यातले महत्त्वाचे प्रश्न आहेत. की अमुक एका विचारसरणीची सत्ता आली की सगळे आलबेल होणार आहे ?

--- ००० ---

मराठीत एक तर समीक्षक नाहीत -- इतरांत बरेच फिक्स मतांचे बंदिस्त लोक आहेत आणि आपण कुठल्या टोळीतही नाही -- या वातावरणातच जर लाज नाहीय तर आपण लाजावे कशाला ? बेधडक आपले प्रामाणिक मत सांगून टाकावे ! 😀सगळ्या टोळ्या स्वत:ला प्रामाणिकच समजतात ! ते सगळे आपली मते फायनल समजणारे, थांबलेले लोक असतात ! कला ही टोळीबाहेरच असू शकते हे समजणारेही काही असणारच ! त्यांना नाकारले जाण्याची खेदखंत करून चालतच नाही. पण स्वत:ला उभे राहण्यापुरती तरी जागा करून घेण्यासाठी जमेल तेवढे परखड राहावे लागते. ही सदर कविता काहींना नसेल आवडली पण बऱ्याचजणांना ती महत्त्वाची वाटलेली आहे. हे चालतच राहणार. ' मोकळी हवा ' आणि ' कवितांचे परीक्षण ' या माझ्या पोस्टही पाहाव्यात. ये काम तो जोरसे चलेगा. सारख्या अशा कविताच लिहिल्या पाहिजेत असे नाही. आपल्या कामाची आपल्याला क्लॅरिटी असेल तर मतमतांतरांबद्दल सहिष्णू राहता येते. इथे स्वत:ला ' महाकवी ' म्हणवून घेणारेही काहींना गोड वाटलेले आहेत. त्यामुळे, समजून राहात आपले काम करत राहणे हाच उपाय. ' तुम्ही असे करा ' असे सल्ले द्यायला लागला माणूस की तो कलेतले फारच प्राथमिक नियम मोडतोय, आणि हे बरे नव्हेच.मी जो लेख लिहिणार आहे त्यात सविस्तर सगळे येईल -- या कवितेत हीच नावे का आली, हेही येईल -- आणखी का आली नाहीत, हेही येईल -- स्वत:ला उभे करण्यालाच महत्त्व द्यायचे असते तर मराठीत खूप सोपे मार्ग आहेत -- ते न स्वीकारल्यामुळेच तर परखडपणा लागतोय -- मराठीतले ९९ टक्के कवी हे स्वत:ला प्रोजेक्ट करत बसणारे आहेत -- वेगळी कविताही असणारच -- मूल्यमापनही चालूच असते -- कविता अमुक अशी नसेल तर ती कविताच नव्हे असे म्हणणारे मूल्यमापनच करत असतात -- तेच स्वातंत्र्य सगळ्यांना असणार -- आपापले लिहीतही राहू आणि मूल्यमापनही करत राहू -- मी जो लेख लिहिणार आहे त्यात सकारण मूल्यमापनही असणारच आहे -- सारांश, लिहीत राहावे, हेच खरे -- तुला नावांचा राग आलाय की काय अशी शंका येते -- यात कुणालाही महा वा ग्रेट म्हटलेले नाहीय -- या मार्गाने कोण गेले, असे आहे -- तुला काही खटकले असेल, आवडले नसेल, हे समजू शकतो पण हे होत राहणारच ना ! लेख झाला की तो तुलाच छापायचा आहे !🙂
चलो, जय हिंद, जय महाराष्ट्र !

नाटकात ' नाट्यात्म विधान ' आणि एकूणच कलेत ' हाताला काही लागणे ' या अपेक्षा कलेतली सर्जकता खतम करणाऱ्या आहेत. मराठीत तरी या खुज्या अपेक्षांचा उच्छाद आहे !

मग राहते काय, पुस्तकाची समीक्षा होणे आणि त्याला पुरस्कार मिळणे ! समीक्षक संपलेले आहेत आणि पुरस्कारांची मला फिकीर नाही !

या बाबतीत मला चित्रकार गायतोंडे यांचे हे वाक्य महत्त्वाचे वाटते -- " चित्र काढत असतानाच फक्त मी चित्रकार असतो, एरवी मी फक्त एक माणूस असतो. " मीही सतत लेखकबिखक नसतो !

न फसणारे शहाणे जे आहेत त्यांना असे एका ठिकाणी थांबू नका हे सांगण्याचा हा प्रयत्न आहे. मनाला लावून घेणे ? ये तो हो ही नही सकता ! तुकाराम ही व्यक्ती वा नाव याचा नाही प्रश्न -- ' मलाच कळते ' हे अडथळा होऊ लागले तर ते हटवायचा प्रयत्न होणारच ! वाईट वाटून घेऊ नये -- 🙂😀 जाता जाता या कविता कशा वाटल्या त्यावरही बोल ना -- नुसतीच मौलिक चर्चा नको -- राग आला तर मुद्दा टाळला जातो -- तसे होऊ नये --मीही तुझ्याबद्दल आदर बाळगूनच बोलतोय -- तू ज्याला टाकाऊ म्हणतो आहेस ते अनेकांना महत्त्वाचे वाटते आहे -- त्यामुळे तुझे मत टाकाऊ असण्याची एक शक्यता राहू दे समोर -- तुला त्या दोन कवितांबद्दल बोलायचे टाळावे लागले हेही लक्षात घे -- या असल्या स्थितिशील हेकटपणामुळेच मराठी कवितेची वाट लागलेली आहे -- ते मी अर्थात सकारण उदाहरणांसहित मांडणार आहे -- नुसतेच ' टाकाऊ ' वगैरे निरर्थक शब्द नाही वापरणार -- ' मराठी कविता ' या माझ्या कवितेबद्दल तू काहीच बोलू शकला नाहीस -- एक उथळ चर्चा केलीस -- नुसतेच काही कंडेम करण्याला काय किंमत राहणार ? टाकाऊ, भरताड हे नुसते कंडेम करणारे शब्द आहेत -- तुझ्या असल्या शब्दांमुळे मला पुन्हा कॉमेंट द्यावी लागली -- माझ्या कविता ज्यांना गांभीर्यपूर्वक चांगल्या वाटताहेत त्यांनाही कृपया क्षुद्र लेखू नकोस -- मतभेद असणारच पण नुसतेच हेटाळणीचे शब्द वापरायचे असे चीप स्वरूप येऊ नये चर्चेला --मुळात तो शब्द हवेतला आहे -- त्या वाचकांना आपण च्युत्ते म्हणणार का ? तुझी असतील काही तत्त्वे आणि निकष -- जग त्यावरच चालावे असे म्हणता येत नाही -- अजूनही तू त्या दोन कविता आणि माझी ' मराठी कविता ' हे का टाकाऊ आहे त्यावर लिही -- मी उत्सुकतेने वाचेन --पुन्हा तेच ! आता टाकाऊ, भरताड यांच्या ऐवजी सामान्य हा शब्द वापरला आहेस ! तुला माझ्या कविता आवडत नसतील म्हणून अशी चिडचिड करून काय उपयोग आहे ? तुझ्याकडे बोलण्यासारखे काहीच नाही आहे, नुसताच आवडीनिवडीचा प्रश्न आहे. तुझ्यासारखेच काही आणखीही कवितेचे वाचक आहेत, त्यांना या कविता खूप चांगल्या वाटताहेत. या कवितांच्या आशयाबद्दल माझी मला क्लॅरिटी आहे, हे एक आहेच. तू वाचणे आणि तुझी नावड सांगणे, हे फायनल नाही असू शकत. तुझा प्रॉब्लेम मला आलाय लक्षात, पण, त्याला मी काही करू नाही शकत. कवितांच्या बाबतीत बोलायची -- नुसतेच हेटाळणीचे शब्द वापरायची ही तुझी पद्धत अतिसामान्य आहे, हे समजून घे, जमल्यास यात बदल कर. तुझी नुसतीच निरर्थक चिडचिड तू व्यक्त करत राहिल्यामुळे -- जी चर्चा सुरूही नाही झाली ती आता खुंटलेली आहे. असो. थांबू या इथे.

अर्थात, तेही व्हावेच --

सवंग काय आणि मूल्यवान काय याचीही चिकित्सा व्हायलाच हवी –

अणुरणिया थोकडा म्हणजे प्रभावयुक्तता ( किंवा प्रभावग्रस्तता ) आनंतता म्हणजे तीतून बाहेर पडणे -- निव्वळ प्रतिक्रियात्मक नसणे -- एलकुंचवार त्याबद्दलच बोलत असावेत --
व्यक्तिगत प्रभावयुक्ततेतून बाहेर पडणे म्हणजेच अनंतता. कलेचे हे मूल्य वैशिष्ट्य हे इथल्या आणि जगातल्या अनेक कलावंतांनी सांगितलेले आहे. याचा अर्थ कला निव्वळ प्रतिक्रियात्मक नसणे. याची आच वा तातडी नसलेले अनेकजण असू शकतात. हे कुणी कुणाला ' पटवून ' देण्याचे मूल्य असूच नाही शकत.

कोणत्याही कवितेची वा कवीची कोणत्याही कारणाने हेटाळणी वा हिडिसफिडीस करणे हे फारच बालिश कट्टरपणाचे असते. असल्या मतप्रदर्शनाला किंमत देऊ नये. लोकांना कविता लिहावीशी वाटते हेच मुळात महत्त्वाचे समजायला हवे. कोणत्याही कवितेत वा कवीत कुणाला काही त्रुटी वा दोष आढळल्यास ते सभ्य भाषेत सांगता येतात. पण अर्थात ते सांगताना सांगणारा उघडा पडण्याचा धोका असणारच. स्वमताबद्दल इतक्या आग्रही असणाऱ्याने तो पत्करायला हवा. कवितेचे तंत्र-मंत्र कुणालाही जन्मत: प्राप्त नसते. कुणालाही नाउमेद करायचा हक्क कुणीही स्वत:कडे घ्यावा, हे घातक आहे. येऊ द्यात कविता -- मुबलक येऊ द्यात ! आणि तुलना कशाला ? कवितेच्या अनुभवद्रव्यावर तिचे मूल्य अवलंबून नसतेच. अभिव्यक्तीच्या नमून्यावरही नसते. मग काय ? असा प्रश्न विचारायची हिंमत आधी असायला हवी. हजारो प्रकारच्या शैलींतून उत्तम कविता येऊ शकतात, हे प्राथमिक भान तरी सर्वांना असायला हवे.

अनुभव दलिताचा आहे की मध्यमवर्गीय आहे, युद्धाचा आहे की ऑफिसातला आहे यावर साहित्याचे मूल्य अवलंबून नसते. तसेच, शैली रोमँटिक आहे की वास्तववादी की अतिवास्तववादी यावरही ते अवलंबून नसते.

घरी एकट्याने बसून कलासंपर्क करणारे, समूहात बसून एंजॉय करणारे, गंभीर, विद्रोही, विनोदी असे सर्व प्रवाह कलेत असणार. प्रश्न हा आहे की जगण्यातल्या मूलभूत प्रश्नांचा आवाका घेणारे, जगण्यातल्या जटिलतेचे समग्र भान निर्माण करणारे असे कलावंतच फारसे निर्माण झाले नाहीत. ती आच आणि तातडी वाटणे हे फारसे घडले नाही. त्यामुळे भाषावैभव आणि थोडेफार तंत्रकौशल्य आणि चमत्कृती यांचे स्तोम माजले. विविध गुणदर्शनाची कला निर्माण होत राहिली. वाचक-प्रेक्षक यांच्या अपेक्षा धुडकावून, नुसत्याच प्रस्थापित बौद्धिक, नैतिक मूल्यांना महत्त्व न देता सखोल समजूत निर्माण करणारे कलाकारच फारसे आले नाहीत. दुसरे म्हणजे तशा कलेची इथे कुणाला फारशी अपेक्षाही नाही आहे.

१६ नोव्हेंबर २०२१.

‘ सजग ‘ आणि देशीवाद .

मित्रवर्य सतीश तांबे यांच्या नेतृत्वाखाली ‘ सजग ‘ ची वजनदार वाटचाल चालू आहे, हे खूपच आनंदाचे आहे. या अंकाच्या प्रवासात जुलै-सप्टेंबर २०२१ च्या अंकाची दुसरी आवृत्ती काढावी लागत आहे, हे आजच कळले. ही अर्थातच मराठी साहित्याची शेवटची धुगधुगी ठरणार नाही याची खात्री वाटते. नुसताच क्रिया-प्रतिक्रियांच्या जंजाळात सापडलेला आपला साहित्यविचार अधिक मोकळा होत जाईल अशी आशा बाळगायला बळ देणारी ही घटना आहे.

या अंकात आपले मित्र गणेश कनाटे यांचा ‘ नेमाडेप्रणीत देशीवादाची कालबाह्यता ‘ हा एक अत्यंत अभ्यासपूर्ण असा सविस्तर लेख असून हा लेख साहित्यविचारात नेहमीच मौलिक मानला जाईल यात शंका नाही. नेमाड्यांच्या देशीवादाचा इत्थंभूत धांडोळा आणि झाडाझडती घेणारा असा हा लेख आहे. या लेखामुळे नेमाडपंथीयांच्या डोळ्यांत अंजन पडेल आणि जग त्यांना नव्याने दिसू लागेल, असे वाटते.

या लेखात अंतर्भूत असलेला अभ्यास आणि अनेक संदर्भ आणि त्यांवरच्या चर्चा या अंगाने फार सविस्तर काही मी लिहू शकणार नाही. पण या एकूण प्रकारात गोची कशामुळे होते एवढ्याच विषयावर बोलणार आहे. नेमाडे असोत की देशीवादाची भलावण करणारे रसाळ सर असोत, यांची सगळी भिस्त माणसाच्या प्रभावयुक्ततेवर आणि प्रभावग्रस्ततेवरही ( conditioning ) असल्याचे दिसते. साहित्य वा कलानिर्मिती म्हणजे कलावंताने आपापल्या प्रभावयुक्ततेतून आपापले जगण्याचे अनुभव मांडत जाणे, असे हे दोघेही गृहीत धरतात. एकूणात बुद्धिप्रामाण्यवादी आणि सध्याचे द ग्रेट पुरोगामी यांचाही हाच घोळ होत असतो. लेखक आणि वाचक दोघेही प्रभावबद्धच फक्त जगू शकत असतील तर कलेतली सर्जकता म्हणजे काय, या प्रश्नाची कुणीच चर्चा करत नाही. नुसतीच प्रभावयुक्तता म्हणजे, मराठी नाटकाप्रमाणे कधी विनोद, कधी सुखदु:खे एवढेच चालू राहते, याकडे कुणी पाहात नाही. आणि अशा मर्यादेतच जर सर्व कलाव्यवहार घडत असेल तर त्याला सांस्कृतिक मूल्यात्मकतेचे अंगडेटोपडे तरी कशाला, हे विचारात घेणे सुचत नाही. शेक्सपियर, बेकेट, पिरांदेल्लो, आयनेस्को वा पेसोआ विचारात घेतले तर त्यांच्या कलेत कोणतेच प्रभावद्रव्य ‘ आपले ‘ नसते आणि तरी ते एकूणच मानवजातीला महत्त्वाचे कशामुळे ठरतात, हे विचारात घ्यावेच लागेल. आणि नुसते परदेशी वा परभाषिकच कशाला, इथलेच कलावंत घेतले तरीही सर्वांची प्रभावयुक्तता खूपच भिन्न भिन्न असते – तीही सर्वांची ‘ आपली ‘ नसते. त्याचे काय ? प्रभावयुक्तता ही निव्वळ मतमतांतरांच्या मर्यादेत फिरते. तिला मूल्यात्मकता असू शकत नाही. त्यामुळेच मग, जातिव्यवस्था की जातीयता, असली फालतू, निरर्थक मखलाशी करत बसावे लागते. स्त्री-पुरुष समानतेचा विचार करताना स्त्रीला गर्भाशय असते, अशा बालिश मुद्द्यावर हुशारी करत बसावे लागते. हे असले लोक टीकाकार, समीक्षक म्हणून गाजतात पण आशयाच्या पाण्यात उतरण्याची हिंमत फारशी करत नाहीत, त्याचे कारण म्हणजे हीच मूठ झाकली ठेवण्याची चलाखी, हेच असते. EXISTENCE precedes essense या प्रकाराला हे स्पर्शही करू शकत नाहीत. कारण इसेन्स म्हणजे नंतर जमवलेले अनुभवाचे साठे हेच फक्त त्यांना ‘ शक्य ‘ वाटते. कनाट्यांच्या या लेखात वैश्विकतेचा मुद्दा येतो. ती कधी अवतरते कलेत ? यावर जाणिवेच्या भाषेतच फक्त आणि दाखवता येणाऱ्या तार्किक पुराव्याशिवायच बोलावे लागणार. वैश्विकतेची प्रक्रिया असलेल्या मान्यताप्राप्त कलाकृती पाहिल्या तर त्यांचे निर्माते या ना त्या पद्धतीने, प्रभावयुक्ततेतून बाहेर पडण्याचे बोलतात असे दिसून येते. ‘ परि त्या विश्वंभरे बोलविले’, ‘ परतत्त्वाचा स्पर्श ‘, गाओ

सांगतो तो distanced gaze, वर्डस्वर्थ सांगतो ती tranquility, एलियट सांगतो तो escape from personality या गोष्टींचा विचार न करता गेली ४० वर्षे हे देशीवादाचे दळण दळले जात आहे. त्यातून फक्त काही किरकोळ मखलाशी आणि बहुतांश कचरा निर्मितीच होत आलेली आहे, याचे कारण हेच आहे. कृष्णाने अर्जुनाला कर्तृत्व स्वत:कडे न घेण्याबद्दल सांगणे, जगत असतानाही दु:खातून मुक्त असणे शक्य असते, हे बुद्धाचे सांगणे यांसारखेच सार्त्रच्या ' फ्लाईज ' या नाटकाचे उदाहरणही पाहता येते. भाऊ आणि बहीण दोघे मिळून त्यांच्या आईच्या खुनाची योजना ठरवतात, प्रत्यक्षात भाऊ तलवार खुपसतो पण तो त्या कृत्याच्या प्रभावाच्या बाहेर राहतो आणि बहीण मात्र पश्चात्तापाच्या घोंघावत्या माशांना बळी पडते ! कला वैश्विक होण्याची कारणे अनेक कलाकृतींच्या प्रक्रियांमध्येच दिसू शकतात पण प्रभावयुक्ततेशिवाय काही असूच नाही शकत, हे या संकुचित, मूल्यहीन, आपमतलबी लोकांना गृहीत धरायचे असते.

कनाटे यांचा हा लेख अत्यंत उद्बोधक आणि देशीवादातली हवा घालवणारा आणि या अर्थाने मौल्यवान झालेला आहे. आपले अनेक देशीवादी, बुद्धिप्रामाण्यवादी आणि पुरोगामी यांचा कलानिर्मिती क्षेत्रातला वावर पाहता अनेकदा जाणवणारा हा प्रश्न आहे. जे असेल ते सगळे विचारपद्धतीत, विचाररचनेत आणि अनुभवसाठ्यातच असते, हा भ्रम त्यांना टिकवायचा असतो ! सर्जकताहीन क्षुद्रपणा चालू ठेवायचा असेल तर तत्त्वज्ञानाचे म्हणावेत असे प्रश्न टाळावेच लागतात !

--- ००० ---

कलाजाणीव

आशय आणि तंत्र एकत्रच असते वगैरे ठीकच आहे, पण, कलाजाणीव हा एक सोयीसाठी स्वतंत्र प्रकार मानायला हरकत नाही. माझी कलाजाणीव समजा वाचन-लेखनातून विकसित होत आलेली आहे. ती जी काय असेल ती विकसित होण्यात वेगवेगळ्या माध्यमांतल्या अनेक कलावंतांची मला मदत झालेली असते -- त्यांचे संस्कारही मी स्वीकारलेले असतात. गेली काही वर्षे, माझ्या कलाजाणीवेला सचेत ठेवण्यासाठी मी आणखी एक विशेष प्रकार करत असतो. नेटवर उत्तमोत्तम चित्रकारांची खास म्हणावीत अशी खूप अमूर्त चित्रे उपलब्ध आहेत. त्यांतले त्या त्या वेळी आवडेल ते एक चित्र निवडून मी ते माझ्या डेस्कटॉप पार्श्वभूमीवर घेत असतो. दर ८-१५ दिवसांनी हे चित्र मी बदलतो. यामुळे, प्रत्येक वेळी संगणकावर काम सुरू करण्यापूर्वी मला या चित्राचे दर्शन होते ! या उपक्रमाचा आपली कलाजाणीव विकसित व्हायला खूप उपयोग होतो ! करून बघा ! प्रत्येक वेळी त्या त्या चित्रातले नवे काही कळते -- खूप रिच वाटते ! बघा तर करून !

--- ००० ---

साहित्य संमेलनाच्या निमित्ताने

डॉ. जयंत नारळीकर हे येत्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष आहेत. त्यांच्या विज्ञान कथा आणि कादंबऱ्या ही त्यांची मराठी साहित्याला विशेष देन आहे. मराठीलाच काय, जगालाही आदर वाटावा अशी काही कामे त्यांनी विज्ञान क्षेत्रात केलेली आहेत. त्यांचे गुरु हॉईल यांच्या समवेत त्यांनी केलेले काम जगन्मान्य झालेले आहे. मोठा दणका ( Big bang ) उपपत्ती रद्द ठरवणे आणि वैश्विक गुरुत्वाकर्षणाच्या क्षेत्रात न्यूटन व आईन्स्टीन यांच्याही पुढची सत्ये उलगडणे, अशी त्यांची अद्वितीय कामगिरी आहे. त्यामुळे, एकूणात, मराठी सारस्वताने ( हा शब्द वापरला म्हणून कृपया रागावू नये, त्यात थोडा उपरोधाचा अंशही आहे ) त्यांना अध्यक्ष म्हणून स्वीकारलेले आहे.

या निमित्ताने काही प्रश्न समोर येतात, त्यांबाबतच्या विचारांसाठी ही पोस्ट आहे. मला स्वत:ला म्हणाल तर या सोहळ्याचे कधीही सोयरसुतक नव्हते आणि अजूनही नाही. त्यामुळे, ना देणे ना घेणे, अशा दृष्टीने मी यावर लिहू शकतो. मीही एक काहीसा लेखक असल्याने मराठीतल्या अशा ‘ सांस्कृतिक ‘ घटना मला दिसणे आणि त्यांबद्दल काही विचार माझ्या मनात येणे, हे क्षम्य समजता येऊ शकेल. या वेळी, अध्यक्ष म्हणजे नारळीकर, पूर्ण तीन दिवस हजेरी लावणार की मधून मधून ऑन लाइन डोकावणार, असाही विषय चर्चिला गेल्याचे कळते. पण ते पूर्ण तीन दिवस तिथे असणार, हे आता ठरलेले आहे. पण हा प्रश्न निघणे साहजिक होते. ते जरी ८२ वर्षांचे असले तरी त्यांचे अध्यापनाचे आणि संशोधनाचे काम चालू आहे. तीन दिवस, या साहित्य सोहळ्यासाठी ते थांबवावे का, हा प्रश्न महत्त्वाचा आहेच. एरवीही त्यांना असे प्रश्न पडत असणारच. वैज्ञानिक व्यतिरिक्त इतर मराठी वाचनाला कितपत वेळ द्यावा ? आणि थोडक्या वेळात नेमके वाचावे तरी काय ? ही शक्यता लक्षात घेतली तर मराठी साहित्याची सद्यस्थिती आणि एकूणातच इथे महत्त्वाचे काम करून गेलेले लेखक, कवी यांचे वाचन जाऊ द्या, माहिती तरी त्यांना असेल का याची शंका वाटते. या पार्श्वभूमीवर, त्यांच्या अध्यक्षीय भाषणात जर राजन खान, सतीश तांबे, रवी लाखे, प्रेमानंद गज्वी असे उल्लेख आले तर तो एक सुखदाश्चर्याचा मोठा दणका ठरेल, हे नक्की ! ( Big bang ).

हे पाहता, आपापल्या क्षेत्रात अद्वितीय काम केलेल्या आणि मराठीत थोडेफार लेखन केलेल्या कुणाचाही, खरे तर या पदासाठी विचार व्हायला हवा. उदाहरणार्थ, अभिनय क्षेत्र घेतले तर, हंसा वाडकर, दादा कोंडके, प्रभाकर पणाशीकर, डॉ. श्रीराम लागू, विजया मेहता यांची आत्मचरित्रे आहेत. ती महत्त्वाचीच आहेत ना ? लेखन किती पानांचे आहे, असा निर्बुद्ध निकष तर आपण स्वीकारणार नाही. याचप्रमाणे, खेळाडू, उद्योगपती, राजकारणी यांचीही आत्मचरित्रे आहेत. त्यांनाही या पदासाठी योग्य समजायला हवे.

साहित्य म्हणजे प्रामुख्याने कथा, कादंबरी, कविता, नाटक वा समीक्षा ही कल्पना सोडून दिली तरी चालू शकते. कळत-नकळत आपला प्रयत्न काय चालू आहे तर साहित्यातल्या एकूण प्रवाहांची, आज साहित्यात काय घडते आहे याची दखल घेणे आणि त्यावर सभान चर्चा, चिंतन होणे, हे बंदच व्हावे. राजकारणाशिवाय साहित्य असू शकत नाही तर राजकारण म्हणजे साहित्यच ठरते. त्यामुळे, ही एक यशस्वी होणारी युक्ती ठरू शकते की थोडेफार काही लिहिलेले इतर क्षेत्रांतले मान्यवरच अध्यक्ष म्हणून निवडत जायचे. याचे फायदे दोन होतील. एक तर त्यांच्या साहित्यबाह्य कामाबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे आणि फुकटच्या, निरुपयोगी साहित्यचर्चा टाळणे वा त्यांना विरामच देणे. मध्येच एखादा बळीचा बकरा म्हणून साहित्याबाबत बोलणारा घ्यावा आणि त्याच्यावर हल्ले करून त्याला नामोहरम करावे. याचाही साहित्यचर्चा संपवायला उपयोग होईल.

आता हे तरी करायची गरज का आहे ? तर एक परिस्थिती समजून घ्यायला हवी. एकूणच मराठीत, सध्या, देशीवाद, बुद्धिप्रामाण्यवाद आणि पुरोगामीपणा यांची चलती आणि प्रभाव आहे. या प्रकारचे लोक सामान्यत: साहित्यातल्या विविध प्रवाहांबद्दल स्वागतशील नसतात. ते आपल्या भूमिका आणि मते यांनी बद्ध असतात. त्यामुळे, जगातले तर जाऊच द्या, इथलेही अनेक प्रकारचे लेखक, कवी ते आत्मीयतेने आणि चिकित्सेने वाचू शकत नाहीत. त्यामुळे, साहित्याचा बराच भाग त्यांच्या आवाक्याबाहेरच राहतो. ते समजून घेण्याचा प्रयत्नही न केल्याने ते काही समजतच नाही. मग, ते तसले सगळे बिनमहत्त्वाचे आणि असंवेदनशील लेखन असते असा कांगावा करत राहावे लागते. त्यांनी कोंबडे झाकले म्हणून सूर्य उगवायचा थांबत नाही. त्यातून मग त्यांना न्यूनगंड येतो आणि ते आक्रमक होतात. त्यांना नको असलेले साहित्य नष्टच व्हावे, असे त्यांना वाटू लागते. आणि तसे प्रयत्न घडत राहतात. लोकशाहीत, अर्थातच, हे स्वीकारावेच लागेल. ज्याने त्याने आपापल्या समजुतीने, आकलनाने काम करत राहणे, हाच एकमेव मार्ग आहे. तरीही, या अशा पोस्टसारख्या अर्धवट, चुकीच्या पद्धतीने का असे ना, हा सगळा प्रकार आपल्या समोर असणे, विचारात असणे, वाया जाणार नाही, असे वाटते.

--- ००० ---

मित्रवर्य तिळवे यांच्या एका पोस्टवर, मी २३ घरे बदलल्याचे लिहिले होते -- त्या बाबतीत १० नोव्हे ' १८ च्या ' सामना ' मध्ये आलेली, अनुराधा राजाधयक्ष यांनी घेतलेली माझी मुलाखत -- ( हा फोटो तिथे देता न आल्याने इथे दिला

आहे -- )

समृद्ध करणारा २३ घरांचा प्रवास ( अनुराधा राजाध्यक्ष यांनी घेतलेली मुलाखत – ‘ लेखकाचे घर ‘

फुलोरा पुरवणी ‘ सामना ‘ दिनांक १०-११-१८. )

Champra Deshpande

घरांची यादी अशी आहे --

विजापूर -----१

मालाड ----- २

पुणे -------- ८

कोल्हापूर -- २

राहुरी --- १

राहुरी फॅक्टरी १

वाळकी ----- १

संगमनेर --- १

अकोले --- १

लोहारा ---- ३

अ' नगर --- २

-----------------

एकूण ----- २३.

-----------------

आकर्षकपणा

सामान्य माणसाचे डोके निकामी करणाऱ्या हजारो घटना रोज घडत असताना त्यात आता ही आणखी एक अजब नवी भर ! आजच्या पुणे मटातल्या दोन एकाच विषयावरच्या बातम्या ! एका बातमीत खासदार शशी थरूर यांचा सहा महिला खासदारांबरोबरचा सेल्फी आहे. त्यावर ट्वीट करताना थरूर त्यांना ' आकर्षक ' म्हणालेत ! याचा अर्थ त्यांनी स्त्रियांचे वस्तूकरण केले असा त्यावर आक्षेप आहे. आता त्याच मटाच्या पुरवणीत दुसरी एक बातमी आहे ती यामी गौतम या अभिनेत्रीबद्दलची आहे. आता लौकरच येणाऱ्या तिच्या ' दसवी ' या चित्रपटात ती जेलरच्या भूमिकेत असणार आहे. तर इथे एक वेगळाच प्रश्न आहे. या पोलिसी भूमिकेतून ती कशी काय लोकांना नेहमीप्रमाणे आकर्षित करणार -- हा तो प्रश्न ! गौतमी म्हणते पहा तर माझे काम ! आधीच कशाला चिंता ? म्हणजे दिसेलच ती आकर्षक, असा तिचा दावा दिसतोय !

या दोन बातम्यांमुळे काही प्रश्न निर्माण होतात, ते असे --

१. स्त्रिया आकर्षक असतात की नसतात ?

२. स्त्रियांचा आकर्षकपणा वगळून फक्त त्यांच्या कामाबद्दलच बोलावे, हे अनेकांना का जमत नसावे ?

३. एखाद्या अभिनेत्रीची ' आकर्षक ' हीच प्रसिद्धी असेल तर तेच तिचे कामही असल्याने तिचे वस्तूकरण व्हायचे राहते का ?

४. स्त्रियांना स्वत:ला त्या आकर्षक वाटणे हा अपमान वाटतो का ?

५. आकर्षकपणाचा मुद्दा कधी येऊच नये यासाठी स्त्रियांना काय करता येईल ?

६. त्यांचा आकर्षकपणा जाणवूच नये यासाठी पुरुषांनी काय करायला हवे ?

७. आणखीही काही प्रश्न आणि त्यांची उत्तरे काय असतील ?

-- नसता डोक्याला खुराक !

--- ००० ---

04 December 2021.

२८ नोव्हेंबरच्या माझ्या पोस्टमध्ये एका कात्रणाचा फोटो दिला होता -- तो लेख वाचता येत नव्हता -- आता तो लेख उपलब्ध झाल्याने खाली देत आहे ---

फुलोरा --- ( सामना १० नोव्हेंबर २०१८. )
लेख 30 ( लेखकाचे घर )
चं. प्र. देशपांडे

समृद्ध करणारा २३ घरांचा प्रवास

चं. प्र. देशपांडे यांची ' नातं ' ही एकांकिका मी पूर्वी केली होती. कामाचा अवर्णनीय आनंद आणि सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार ज्यांच्या लेखनानं मिळाला होता, त्यांच्याच लिखाणामागची ऊर्मी जाणून घेता येईल असं वाटलं सुद्धा नव्हतं.. पण अतर्क्य, अनपेक्षित गोष्टींनी आयुष्य विणलं जातं, म्हणूनच जगणं सुंदर होतं, ही माझी धारणा, चंप्रं शी बोलताना अधिकच दृढ झाली... ते म्हणाले, " मानवी संबंधात ,विचार आणि बुद्धीचा उपयोग शून्य आहे.. प्रत्येकाचं मनाचं प्रोग्रामिंग वेगळं असतं ..त्यामुळे व्यक्त होण्याच्या पद्धती वेगळ्या असतात.. म्हणूनच रिलेशनमध्ये घर्षण असतंच.. आणि त्यावर बौद्धिक, वैचारिक सोल्युशन नसतं .. फक्त वैयक्तिक पातळीवरच नाही,

तर देशा देशातल्या संबंधात सुद्धा हेच दिसतं .. एक प्रकारची absurdity आहे ही.. मी बुद्धिप्रामाण्यवादी नाही.. त्यामुळे अमुक एक प्रकारचं वागलं की माणसाचं भलं होईल, वगैरे पद्धतीचं लेखन मी कधीच केलं नाही.." जगण्याची मूल्यं एकापेक्षा जास्त असतील, तर जगण्याचीच वाट लागते " असं त्यांचं म्हणणं.. त्यांचं ' सामसूम ' नावाचं नाटक ,नीती आणि न्याय, या दोन मूल्यांची टक्कर दाखवणारंच आहे ..त्यांचं म्हणणं असं, की समजा नीती हे एकच तत्त्व जरी पाळायचं ठरवलं, तरी आपल्या मनातच मुळात दोन प्रवाह असतात, त्यांची टक्कर होतेच.. जसं की व्यभिचार करू नये हे सांगणारं एक मन असतं, जे आपल्यावर नियंत्रण ठेवतं आणि त्याच वेळी, संधी मिळाली तर व्यभिचार करायला हरकत नाही, असं दुसरं मन सांगत असतं ..अशा वेळी कोणत्याही मनाचं ऐकायचं ठरवलं, तरी संघर्ष सुरू होतोच मनात ... आपण तर जगताना चार-चार तत्त्वं पाळायला जातो.. मग टक्कर अपरिहार्यच .. मला हे जे जाणवलं आहे, ते नुसतं बोलण्यापेक्षा नाटकातून दाखवावं असं वाटतं, म्हणून लिहितो मी.. मी जगण्याच्या प्रक्रियेत मला झालेलं आकलन व्यक्त करण्यासाठी लिहितो ..घरातल्याही माणसांची जगण्याची उद्दिष्टं वेगवेगळी असतात.. त्यातून होणारं घर्षण ज्या घरात कमी होतं, ते घर समजूतदार घर असतं, असं ते म्हणाले.. चंप्रं ची बँकेची नोकरी.. निरनिराळ्या गावांत, खेड्यांत, बदली... त्यासाठी घराचा सगळा बाडबिस्तरा घेऊन वारंवार केलेली स्थलांतरं.. एकूण 23 घरांतून आजवर झालेला प्रवास... बँकेची नोकरी करून लेखनासाठी काढलेला वेळ.. त्यामुळे बऱ्याच घरांत जे साचेबद्ध सुखाचे आकृतिबंध असतात, त्याला दिला गेलेला छेद.. या सगळ्यांना समजून घेणारी पत्नी आणि मुलं, यांनी चंप्रंच्या घराला, त्यांच्या "घर" या संकल्पनेतलं घरपण दिलं.. त्यांचं नाट्यवर्तुळ, त्या निमित्तानं अनेकांची होणारी वेळी-अवेळी ऊठबस, रात्री उशिरापर्यंत रंगलेल्या चर्चा, त्या वेळी बायकोनं समजूतदारपणे दिलेली साथ, त्यांना खूप महत्त्वाची वाटते.. मी घाईघाईनं ऑफिसला जाताना लिहून अर्धवट ठेवलेले कागद न आवरता गेलो, तर त्यातला एकही कागद इकडचा तिकडे झालेला नसायचा..हा मुलांचा समजूतदारपणा अधोरेखित करताना त्यांचा २३ घरांचा प्रवासही त्यांनी सांगितला.."माझं पहिलं घर विजापूर.. कर्नाटकातलं.. मराठी पेक्षा कानडी जास्त चांगलं यायचं मला.. मित्रमंडळी कानडी... तिथली माझ्या आयुष्यावर प्रचंड परिणाम करणारी गोष्ट म्हणजे डांग्या खोकला... जो गेलाच नाही.. त्यातून दमा सुरू झाला.. हे आजारपण कित्येक वर्षे टिकलं ..लहानपणापासून विचारात पडायला कारणीभूत ठरलेली ही घटना.. वाटायचं असं असतं का आयुष्य ? वडील शिक्षक ..त्यांना मुंबईत पार्ले टिळक विद्यालय मध्ये नोकरी मिळाली.. मालाड पश्चिमेला आम्ही राहायला आलो.. एकटेपणा, आत्मकीव, यात गुंतलेला असायचो मी, कारण आजारपण.. ' मी आहे ' हे सिद्ध करण्याचा मार्ग म्हणजे वाचन आणि लेखन असं वाटलं मला ..भरपूर हिंदी चित्रपट पहाणं हे करमणुकीचं साधन होतं माझं. पडद्याला चिकटून बाकडं असायचं..ती जागा पकडायला आधीच्या शो च्या मध्यंतरात रांगेत जाऊन उभा राहायचो.. ३१ नवे पैसे तिकीट होतं त्याचं .. "

" पहिली कविता सतराव्या वर्षी लिहिली..इस्माईल युसुफ कॉलेजमध्ये होतो . .

शंकर वैद्य सर होते शिकवायला ..त्यांना कविता दाखवल्या.. त्यांनी मराठी वाङ्मय मंडळात कार्यक्रम ठेवला.. एम ए ची मुलगी माझ्या कवितांचा अभ्यास करून तिथे बोलली.. विजय तेंडुलकर, चिं. त्र्यं. खानोलकर, शांता शेळके अशी थोर मंडळी, शंकर वैद्यांकडेच भेटली...पुण्यात सेंट्रल बँक ऑफ इंडियात नोकरी लागली ..अनेक ठिकाणी बदल्या

झाल्या, त्यांत कोल्हापूर सगळ्यात आवडलेलं गाव.. अभिनेते, दिग्दर्शक ,चित्रकार यांचा तिथे ग्रुप होता.. मी नाटक लिहिण्याच्या अगोदरच, प्रसन्न कुलकर्णीनं जाहीर करून टाकलं होतं की या वर्षी राज्य नाट्य स्पर्धेत चंप्रंचं नाटक करणार .. त्या माझ्यावरच्या प्रचंड विश्वासामुळेच, ‘ एक गगनभेदी किंचाळी ‘ हे पहिलं नाटक लिहून झालं.. माझ्या घरातच ‘ प्रत्यय ‘ या संस्थेची स्थापना झाली आणि ते नाव सुद्धा मीच सुचवलं.. ‘ दिनकर पुरोहितचा खून ‘ हे दुसरं नाटक प्रकाश बुद्धिसागरनं दिग्दर्शित केलं, तेही तिथेच लिहून झालं.. दूरदर्शननं एक स्पर्धा घेतली होती.. महाराष्ट्रातल्या ८५ संघांनी तीत भाग घेतला होता.. तेव्हा ‘ नातं ‘ हा दीर्घांक तयार होता... त्याचीच एकांकिका करून त्या स्पर्धेत सादर झाली आणि पहिली आली. ‘ नातं ‘ कशी सुचली ते सांगताना ते म्हणाले, टीव्ही वर्तमानपत्र आणि आजूबाजूच्या घटनांचे पडसाद उमटतच असतात मनावर.. पती-पत्नीच्या नात्यात काही विशिष्ट आडाखे आहेत, की पतीनं पत्नीचं रक्षण करावं, वगैरे.. वाटलं, नातं कंडिशनल असेल, म्हणजे अमुक एक केलं तरच नातं टिकतं वगैरे, तर अशा नात्यांचा धांडोळा घेतला पाहिजे.. म्हणून एक भयंकर सिच्युएशन घेतली, की बायकोवर बलात्कार झाला, तेव्हा नवरा पळून गेला ...आणि मग म्हटलं बघूया काय होतंय ते.. लिहायला लागल्यावर जाणवलं, कुठल्याच गोष्टीत तथ्य नाहिये ...मी वास्तववाद घेतो आणि जगणं कसं absurdity नं भरलेलं आहे ते दाखवतो..आणि याच्या अवेअरनेस मध्येच त्यातून सुटका आहे, असं मला वाटतं... खूप गावं, माणसं बघितल्यामुळे विचारात लवचिकता आली माझ्या हे तर नक्कीच.. जळगाव जिल्ह्यातल्या लोहारा या ठिकाणी बदली झाली, तेव्हा दोन खोल्यांचं घर मी आधीच निवडलं होतं.. त्यात जो कडबा साठवलेला होता, तो मी राहायला येण्यापूर्वी साफ करून द्यायचं मालकांनी कबूल केलं होतं..पण बायकोसह ट्रक मधून प्रवास करत तिथे गेल्यावर मालक म्हणाला, आता भाड्यानं घर देण्याचा विचार आम्ही कॅन्सल केला आहे.. मग त्या वेळी तात्काळ दुसरं घर शोधलं.. ते धाब्याचं होतं.. तिथे रात्री उंदीर धावायचे छतावरून.. एकदा एका उंदराला सापानं पकडलेलं बघितलं आणि माझं धाबं दणाणलं.. मग तात्काळ घर बदललं.. काही घटना आयुष्यात अशा घडल्या की आपल्याच बाबतीत असं का घडतंय हे प्रश्न पडले..त्यातूनच हस्तरेषांचा अभ्यास केला .. सात-आठ वर्षं जगातले सगळे पामिस्ट वाचले.. लक्षात आलं, की हस्तरेषा ही अंधश्रद्धा नाही.. आयुष्यात जे घडणार ते हातावर उमटलेलं असतं यात काही शंका नाही.. पण या अभ्यासात, लेखन ,वाचन, बंद झालं होतं..म्हणून हस्तरेषांचा अभ्यास करणं बंद म्हणजे बंद करून टाकलं.. बँकेत काम करून फावल्या वेळात, कधी रात्री जागून, कधी सुट्टीच्या वा रजेच्या दिवशी लिखाण करत राहिलो. कारण खेळाडूंना जशा सवलती बँकेतून मिळतात तशा लेखकांना मिळत नाहीत.. मला पडलेल्या प्रश्नांची उकल करताना जाणवलेल्या गोष्टी सांगण्याची पॅशन होती, म्हणून माझ्याकडून लिखाण झालं... पुण्यातल्या घरामध्ये घर मालकाशी झालेल्या वादातून पोलिस कंप्लेंट पर्यंत मजल गेली आणि ' धागेदोरे ', ' वस्तू ' या कलाकृतींत पोलीस इन्स्पेक्टर या पात्राची रचना झाली..मुलं मार्गी लागल्यानंतर नोकरी सोडली.. खूप मेहनतीनं सगळ्या लिखाणाचं संगणकीकरण केलं.. त्यातून वेबसाईट तयार झाली.. आज त्यावर माझं सगळं साहित्य मोफत उपलब्ध आहे.. सुमारे पंधरा देशांतून वर्षाला चार हजार लोक त्या वेबसाईटला भेट देतात.. लेखकाचं घर असं माझं घर कधीच नव्हतं.. दोन पोती भरून पुस्तकं होती, ती बदलीच्या गावी घेऊन जायचो.. पोत्यातच ठेवायचो..वेगळी जागा देऊ शकलो नाही त्यांना कधी ..थोडक्यात नलेखकाचं असं माझं घर..ननाट्यासारखं .. " पण आता मात्र त्यांची स्वतंत्र खोली आहे, जी लेखकाची खोली

वाटावी अशीच आहे.. पुस्तकं, संगणक, संदर्भ ग्रंथ, पुरस्कार, यांनी भरलेली.. " पुरुषोत्तम दारव्हेकर यांच्या बाबतीत असं म्हणतात की ते नाटकाचा तिसरा अंक पहिल्यांदा लिहू शकतील इतकी त्यांची नाटकाची बांधणी डोक्यात पक्की असायची.. पण पुढच्या पानावर काय लिहिणार हे देखील मला माहिती नसतं... इतकंच कशाला, एखादा विनोद जर माझ्याकडून लिहिला गेला, तर तो लिहिता लिहिता मजेत मीच हसतो ", असं चंप्र जेव्हा म्हणाले तेव्हा त्यांच्या लेखणीच्या उत्स्फूर्ततेचं उत्तर मिळालं .. चंप्र शी बोलताना, अतर्क्य गोष्टी अनपेक्षितपणे आयुष्यात येण्याची खात्री इतकी समजूतदार झाली, की अनेक प्रश्नांच्या जंजाळात अडकून आलेली अस्वस्थता खरोखरच दूर पळाली...' नातं ' या एकांकिकेच्या निमित्तानं जोडलं गेलेलं हे नातं, आयुष्याच्या एका वळणावर, विचारांना स्वच्छ वळण देऊन गेलं.. अवेअरनेस इटसेल्फ इज फ्रीडम हे त्यांचं वाक्य खऱ्याअर्थानं प्रत्ययाला आलं..

--- अनुराधा राजाध्यक्ष

anuradharajadhyaksha@gmail.com

घरांची यादी अशी आहे --

विजापूर -----१

मालाड ----- २

पुणे -------- ८

कोल्हापूर -- २

राहुरी --- १

राहुरी फॅक्टरी १

वाळकी ----- १

संगमनेर --- १

अकोले --- १

लोहारा ---- ३

अ' नगर --- २

-----------------

एकूण ----- २३.

-----------------

--- ००० ---

ही मुलाखत रेकॉर्डवर घ्यायची राहिली होती -- ते काम पूर्ण केले ---

११-०५-२०१९ च्या ‘ सामना ‘ मध्ये नमिता वारणकर यांनी घेतलेली माझी मुलाखत आली होती. तिचा मजकूर --

ज्येष्ठ नाटककार, लेखक चं. प्र. देशपांडे यांनी आपले सर्व साहित्य संकेतस्थळावरून वाचकांसाठी खुले केले आहे. अगदी येणारे नवे पुस्तकही वाचकांना येथे उपलब्ध होईल.

नव्या वाटेवरची बुजुर्ग पावले !

० वाचकांसाठी संकेतस्थळाच्या माध्यमातून आपले लेखन विनामूल्य उपलब्ध करून देण्यामागे काय विचार आहे ?

--- संकेतस्थळ तयार करण्यामागे खास विचारपूर्वक, योजनापूर्वक असं काही झालेलं नाही. सुरुवातीला माझी काही पुस्तकं निघाली. नंतर मी नोकरीच्या निमित्ताने निरनिराळ्या गावी फिरत होतो. त्यामुळे, कुणाशी फारसा संपर्क राहिला नाही आणि पुस्तके प्रकाशित होण्याबाबतचे माझे प्रयत्न त्या काळात झाले नाहीत. त्यानंतर १९९६ साली म्हणजे माझ्या वयाच्या ५० व्या वर्षी मी स्वेच्छानिवृत्ती घेतली तेव्हा आपल्या लेखनासाठी प्रकाशक मिळवण्यापेक्षा त्याचं संगणकीकरण करू आणि त्याची सीडी तयार करू, असा विचार करून २००३ साली ती सीडी प्रकाशित केली. त्या कामाला प्रतिसाद फारसा मिळाला नाही. त्यातूनच पुढे याची वेबसाईट सर्वांना उपलब्ध करून द्यायचे ठरवले. २००९ साली ती वेबसाईट सुरू केली. २०१० साली महाराष्ट्र राज्याचं सुवर्णमहोत्सवी वर्ष होतं. त्या वेळी शासनाने मराठी संकेतस्थळ स्पर्धा आयोजित केलेली होती. त्या स्पर्धेत या संकेतस्थळाला पारितोषिक मिळालं. हे सगळं ठरवून झालं नाही. घडत गेलं.

संकेतस्थळ --

www.champralekhan.com

० आपल्या नाट्यलेखनाच्या शैलीविषयी काय सांगाल ?

--- माझ्या दृष्टीने माणसाच्या जगण्यातले सगळे प्रश्न हे मानसिक, बौद्धिक किंवा प्रतिक्रियांचे असतात. मी लिहायला सुरुवात करतो आणि नाटक घडत जातं. दिसणाऱ्या समस्या आणि पडणारे प्रश्न यांतून विषय सुचतात. मुख्यत: कुठल्याही तात्त्विक आणि मूलभूत प्रश्नांमधूनही विषय सुचतात. उदाहरणार्थ, माणसांमध्ये संघर्ष का होतात, हिंसा का होते, बरोबर वागणं वा कृती म्हणजे काय – या अशा प्रश्नांशी आपल्या सगळ्या समस्या निगडित आहेत. त्यामुळे, अनुभव, वाचन, माहिती यांद्वारे मनात जे साठलेलं असतं ते त्याभोवती जमायला लागतं. त्यातून नाट्यलेखन प्रक्रिया घडत जाते.

० वाचक, कलाकार आणि रंगकर्मींना आपल्या संकेतस्थळाचा कसा फायदा होईल ?

--- माझी सगळीच नाटकं, एकांकिका संकेतस्थळावर उपलब्ध असल्यामुळे त्यांना निवड करणं सोपं होईल. निरनिराळ्या कारणांनी लोक असा शोध घेत असतात. ते सहज एका क्लिकवर उपलब्ध असेल. तसेच कविता, वैचारिक लेख वगैरेही वाचक कधीही सवडीने वाचू शकतील. जगात कुठेही ते सहज मिळेल. फारसे खर्चिकही नाही. प्रयोग करायला वा काही सिनेमा काढायचा असेल तर मात्र मानधन पडेल. अभ्यासाला, वाचायला माझ्या परवानगीची गरज नाही.

० मोफत लेखन उपलब्ध करून देणारं हे असं पहिलं संकेतस्थळ आहे. याबद्दल लेखक म्हणून काय भावना आहेत ?

--- संकेतस्थळाचं काम ओघाओघात घडत गेलं. त्यामुळे, मी समाधानी आहे. पुस्तकांच्या किंमतीही भरामसाट आहेत. वितरण व्यवस्थेच्या अडचणी आहेत. विक्रेत्यांचे कमिशनही असणारच. अडथळे खूप आहेत. पाचशे वा हजाराची आवृत्ती संपायला दहा वा जास्त वर्षे लागतात. महाराष्ट्रात हजारभर तरी वाचनालये असतील. तरीसुद्धा पुस्तकांच्या आवृत्त्या संपत नाहीत. लक्ष ठेवून साहित्य विकत घेणं हा प्रकार कमी आहे. त्यामुळे, माझं लेखन संकेतस्थळावर प्रसिद्ध करणं मला सोयीस्कर वाटतं.

० व्यावसायिक नाटक आणि प्रायोगिक नाटक यांविषयी काय वाटतं ?

--- व्यावसायिक नाटक प्रेक्षकांच्या सवयींना धक्का लावत नाही. ते त्यांच्या मानसिक सवयी संभाळतं. तर प्रायोगिक नाटक प्रेक्षकांच्या मानसिक सवयींची फिकीर करत नाही. ते आशयाच्या अंगानं जातं. म्हणूनच ते सर्जक नाटक असतं. सर्जकता म्हणजे स्वत:च्या सवयीतून बाहेर पडून जगण्याचे भान घेणे. असं नसेल तर ते करमणुकीचं नाटक असतं किंवा वास्तवदर्शी असतं

---------- मुलाखत – नमिता वारणकर

---------- namita.warankar@gmail.com

--- 000 ---

जिंदगी का सफर

माझा एक चुलत भाऊ आहे. प्रा. मधुकर देशपांडे. माझ्यापेक्षा फक्त सहा महिन्यांनी लहान. शाळकरी वयात आमच्या आवडी सेम होत्या. तो पुण्यात, मी मुंबईत. आम्ही खूप चित्रपट पाहायचो. माझी मुंबईतली ठरलेली टॉकिजे म्हणजे न्यू इरा आणि कस्तुरबा, मालाड. आणि त्याची पुण्यातली विजयानंद आणि अल्पना. तो मराठी, हिंदी, इंग्रजी सर्वच पाही, मी फक्त हिंदी. त्यांच्या पुण्यातल्या घरी कधी कधी सुट्टीला आमचे येणे होई. एम आर आय मध्ये घालावे अशा त्यांच्या चिंचोळ्या  जिन्यात बसून आम्ही दोन चित्रपट कथाही लिहिल्या होत्या. पण चांगल्याला जगात किंमत नाही, असे ठरवून आम्ही ते कागद फाडून टाकले होते. तरीही, एकमेकांना, पाहिलेल्या चित्रपटांच्या कथा, बारीक सारीक तपशीलांसह सांगणे हा छंद मात्र आम्ही नेमाने पार पाडत असू. पुढे तो एका लहान गावात मराठीचा प्राध्यापक म्हणून गेला आणि मी बँकेत नोकरीला लागून इकडेतिकडे जात राहिलो. मग संपर्क फार राहिले नाहीत. नात्यातल्या कार्यात वगैरे भेटी होत. तेव्हा मस्त हास्यविनोद, गप्पा होत. गेली काही वर्षे आता आम्ही दोघेही निवृत्तीचे जीवन जगत आहोत. या काळात त्याने भारत बघणे आणि परदेश बघणे हे कार्यक्रम बऱ्यापैकी राबवले. मी

त्या मानाने फारसा कुठे फिरलो नाही. दोघेही पुण्यातच असूनही अंतरे जास्त आणि एकूण व्यापताप यांमुळे फारसे भेटणे होत नसले तरी मधून मधून फोनवर बोलणे होई. शिक्षण क्षेत्रातल्या काही गंमती तो सांगे. मराठी साहित्याचे बर्बादीकरण यावर मी बोले. बोलण्याला कोणतेही पुरावे वगैरे लागत नसल्याने मजा येई.

तर या माझ्या भावाला सुमारे सहा महिन्यांपूर्वी अमुक एक प्रकारचा कॅन्सर झाला. संपर्क फारसा नसल्याने मला माहीतच नव्हते. योगायोगाने काल कळले. म्हणून मग मी त्याला फोन केला. त्याला वेदना वगैरे नाहीत पण अशक्तपणा खूप आलेला आहे. कुणाच्यातरी आधारानेच चालावे लागते. आयुर्वेदिक आणि अलोपथिक अशी दोन्ही प्रकारची औषधे चालू आहेत. या वयात सर्जरी नको असे डॉक्टरी सल्ल्याने ठरलेले आहे. हे तपशील सोडले तर आमच्या गप्पा नेहमीप्रमाणेच झाल्या ! वाचन, टीव्ही यांत त्याचा बराच वेळ जातो. ज्या गावात त्याने आयुष्यभर काम केले तिथे त्याची खूप प्रेमाची माणसे आहेत. कुणी भेटायला येतात, कुणी फोन करतात. गावातल्या एका प्रतिष्ठित असामींचा फोन आला – हे काय हो सर, देवाची काहीतरी चूक झालेली दिसते – त्यावर हा म्हणाला – अहो, मी पाहून आलो त्यांचे दप्तर, चूक काही नाही आहे, माझेच नाव आहे तिथे ! नंतर मग आम्ही साहित्य प्रांतात आलो. मनोज पाठकने माझ्या ‘ तंबाखूची टपरी ‘ या कवितासंग्रहातल्या माझ्या प्रस्तावनेतल्या काही भागाचे केलेले वाचन यू ट्यूबवर होते, ते त्याने ऐकले होते. साहित्यातली आमची इंटरेस्ट वेगवेगळी असली तरी मराठी माणसाच्या जगण्यातले साहित्याचे स्थान लोप पावत चाललेले आहे यावर नेहमीच आम्ही शिक्कामोर्तब करतो, तसे आताही केले. मग पथ्यपाण्याचा विषय निघाला. तो म्हणाला, गेले काही महिने भाकरी आणि मुगाचे वरण खातोय, त्याचा मात्र आता  कंटाळा आला आहे. यावर मी म्हणालो की तेच आनंदाने खा म्हणजे लोक तुला संत म्हणतील !

विशेष म्हणजे त्या पूर्ण कुटुंबानेही या त्याच्या आजाराची वस्तुस्थिती स्वीकारलेली आहे. नो टेंशन, नो सतत नाराजी ! जेव्हा या आजाराचे निदान झाले तेव्हा अर्थातच धक्का बसला, वाईट वाटले, डोळे पाणावले, पण, आता ते काही नाही. हसत-खेळत जिंदगी चालू आहे ! जेवढी किल्ली असेल तेवढी चालेल गाडी आणि खूप झाले की तसे, असे तो म्हणतो. आयुष्यभर तो प्राध्यापक म्हणून शिकवत आला, आता, आताचे हे त्याचे मस्त जगणे पाहूनही, वाटल्यास, कुणालाही बरेच काही शिकता येईल. त्याच्याशी बोलून मस्त मजा आली !

--- चं. प्र. देशपांडे.

--- ००० ---

खिन्नता रोग आणि  तदनुषंगिक काही

एकूणच हल्लीच्या काळात आणि विशेषत: या कोरोना काळात ही खिन्नता रोगाची समस्या वाढत चालल्याचे वाचनात येते. धर्मातली बाकीची कर्मकांडे यात्राजत्रा वगैरे द्या सोडून पण ध्यान ( याला खरे तर धार्मिक वगैरेही म्हणायची गरजच नाही ) हे मात्र या समस्येवरच नुसते नव्हे तर एकूण जगण्यावरच उपकारक ठरणारे प्रकरण आहे, हे शास्त्राने

सिद्ध झालेले आहे. ‘ रिव्हर्सल ऑफ हार्ट डिसीझ ‘ लिहिणारा डीन ऑर्निश तर आहेच पण यावर जगभर सतत संशोधन चालू असून त्याचे निष्कर्षसुद्धा ही बाब अधोरेखित करणारे आहेत, हे लक्षात घ्यायला हवे. ध्यानाचे बरेच प्रकार सांगितले जातात. त्यातले काही तज्ञांकडून शिकावे लागतात, असे म्हणतात. पण ध्यानाचा सगळ्यात सोपा प्रकार, आपल्या महाराष्ट्राचे कायमचे डॉक्टर संत तुकाराम यांनी सांगितलेला आहे. तो आहे नामजपाचा. हाच मार्ग अनेक संतांनी सांगितलेला आहे. ( मी स्वत: नामजप करत नाही हे इथे नमूद करून ठेवतो. माझी स्वत:चे मन समजून घेण्याची प्रक्रिया चालू असते, एवढे मी म्हणेन. ) नामजप असो किंवा दिवसातून पाच वेळा नमाज पढणे असो – याने ईश्वरसेवा वा भक्ती तर घडत असेलच पण मुख्यत: मानसिक समस्याग्रस्ततेच्या सातत्यात ते खंड पाडते. असा खंड पडला की त्या समस्येची तीव्रता जाते. शारीरिक म्हणाल तर ध्यानामुळे हृदयरोग, बीपी, मधुमेह, दमा एवढेच काय तर एका ठिकाणी कॅन्सरही वाचले – हे रोग आटोक्यात येतात. ध्यानाने होणारे खालील फायदे शास्त्रीय संशोधनातून पुढे आलेले आहेत –

१. कामातली लक्षपूर्वकता वाढते.
२. मेंदूवर होणारे वयाचे परिणाम कमी होतात.
३. डोक्यातला मीपणा किंवा सैतान कमी होतो.
४. चिंताकाळज्या, खिन्नता आणि वेदना कमी होतात.
५. मेंदूच्या महत्त्वाच्या भागांची वाढ होते.
६. व्यसनाधीनता कमी होते.
७. वगैरे.

हे सगळे आपल्या तुकारामबुवांना एखाद्या प्रयोगशाळेतून असे कळलेले नव्हते. त्यांच्या स्वत:च्या चिंतनातून किंवा उत्स्फूर्ततेतून कळलेले होते. तरीही नामजपाबद्दल ते काय म्हणतात ते पहा –

याविण असता आणीक साधन । वाहातसे आण विठोबाची ।।
किंवा – नलगे हालावे चालावे बाहेरी । अवघेचि घरी बैसलिया ।।
त्यांचे एवढेच म्हणणे आहे --
ठाउकाचि आहे संसार दु:खाचा । चित्ती सीण त्याचा वाहो नये ।।

सुचवायचे एवढेच आहे की जे भक्तिमार्गात असतील ते आत्मनिवेदनाच्या स्थितीला पोचतील तेव्हा पोचतील पण नामजप ही निश्चितच एक संजीवनी आहे. जे नास्तिक असतील त्यांनी ‘ दगड दगड ‘ म्हटले तरी चालू शकेल. पण नामजप करणाऱ्यांना अंधश्रद्ध ठरवून वा मूर्ख, हास्यास्पद ठरवून त्यांची हेटाळणी करू नये. आणि अर्थातच नामजप

करणाऱ्यांनीही त्यांची हेटाळणी करणाऱ्यांना किंमत देऊ नये. जास्तीत जास्त लोक भरकटण्यापासून वाचणे हे सर्वांच्याच हिताचे आहे, हे तर निर्विवाद आहे.

--- ००० ---

पाच वर्षांपूर्वीचीच अवस्था अजून तशीच आहे की झालीय काही प्रगती ? की खरोखर झालीय का प्रगती तेही कळलेलेच नाही ?

5 Years Ago

See Your Memories

Champra Deshpande updated his status.

SeltpSitgemSber o6,gnso g2s01re6 • Shared with Public

Public

लोकांना बुद्ध अजून कळलाच नाही.

लोकांना गांधी अजून कळलेच नाहीत.

लोकांना आंबेडकर अजून कळलेच नाहीत.

( आता तर, ' लोकांना आचार्य अत्रे अजून कळलेच नाहीत ' ! )

-- हे आपण नेहमीच ऐकत असतो.

असे म्हणणाऱ्याला तरी ते ते कळलेले असते, हेच त्यात एक समाधानाचे असते !

( पण, लोकांना मार्क्स अजून कळलेलाच नाही -- असे कधी कानावर येत नाही.

कारण, सगळे मार्क्सवादी अमर्याद हुशार असतात ! त्यांना कळले नाही,

असे होऊच शकत नाही ! )

तर मग आता करावे काय ?

त्या त्या विभूती कुणाला समजल्या आहेत, ते आधी ( एकमताने ! ) ठरवून,

ते सगळे आधी त्या त्या समझदाराकडून सर्वांनी समजून घेत बसावे ?

ते मुळात पूर्ण होणारे काम नाही -- आणि तेवढ्यात --

लोकांना शरद पवार अजून समजलेच नाहीत,

लोकांना मायावती अजून समजल्याच नाहीत

-- हे सुरू होणार !

तर मग करावे काय ?

वेदना

मी कोल्हापूरला असताना मला एकदा प्रचंड दाढदुखी आणि फ्लू हे एकत्र झाले होते ! वेदनेची ती तीव्रता, उंची आणि खोली पुन्हा कधीच आयुष्यात आली नाही. सध्याही माझे दात-पुराण चालू आहे, त्यावरून आठवले. ऐसी वेदना तो मै यूं पार कर लेता हूं !

जॅक पोलॉक नामक एक चित्रकार होता. त्याच्या चित्र शैलीला ठिबक चित्र वा कृती चित्र वा सर्वंकष चित्र म्हटले जाते. त्या शैलीत लिहिलेली ही एक कविता आहे.
ठिबक कविता

अमुक अशी असायला हवी कविता

एका ठिकाणी दिलेली कॉमेंट -- कुणालाही हे पटवून देण्याची वा यावर वाद घालण्याची जबाबदारी न घेता इथे खाली पोस्ट म्हणून देत आहे --
sentimentalism, emotionalism ( भावनिकता ) टाकून देणारी खूप कविता लिहिली जाते जगभर -- इथेही कुणाला त्या मार्गाने आपोआप जायचे असेल तर जाऊ द्यावे -- आपण जी बुद्धिप्रधानता म्हणतो ती बऱ्याचदा बुद्धीला वा तर्काला  बांधील नसते, हेही समजून घ्यायला हवे. मराठी कवितेत व्यक्तिगत सुखदु:खे, मूडस आणि राग-लोभ-क्रोध यांचे प्रचंड स्तोम माजलेले आहे. वेगळी कविताही येत राहणारच. स्वागतशील राहायचे की नाही हा वाचकांचा प्रश्न आहे. एलियट escape from emotion ( भावनेपासून सुटका ) का म्हणतो, anti poetry ( न -- कविता ) कोणत्या कारणांनी येते, हेही समजून घ्यायला हवे. इथली माती, तिथली माती याच तत्त्वज्ञानात ज्यांना अंतिम वाटत असेल त्यांचा प्रश्नच नाही. भावनिकतेत डुंबून राहणे हे मराठी कवितेचे डबके होण्याचे प्रमुख कारण आहे.

माझी प्रिय मैत्रीण सोनाली

एकदा एका ठिकाणी आम्ही काही लेखक, कलावंत मंडळी जमलो होतो. आमच्यांत कोल्हापूरची ही ग्रेट हस्ती सोनालीही होती. तिचे सगळे हिंडणे-फिरणे व्हील चेअरवरूनच चालते. अत्यंत साधी आणि प्रसन्न ' असण्याची '  ही व्यक्ती ओळख होताच जिगरी मैत्रीणच झाली ! त्या वेळी तिच्याशी जे एकदोनदा बोलता आले त्यावरून हिचे असणे हे, ही दिसते याहून खूपच प्रचंड आहे, हे लक्षात आले. तिच्या मनातला सर्वांबद्दलचा स्नेह जाणवत राहिला. जगण्यातल्या काही त्रुटी या किरकोळ दिसू लागल्या. तिच्या जिद्दीचे कौतुक करण्यापेक्षा तिच्या ' असण्याबद्दलच ' आदर आणि प्रेम बाळगायला हवे, हे समजले. या सगळ्यात कहर म्हणजे आमच्यासमोर तिने केलेले सुमारे पाऊण तासाचे भाषण ! मानवी जगण्याची समज ओतप्रोत भरलेले आणि स्वत:चे चिंतन मांडताना कोणताही मुलाहिजा न बाळगता, कोण काय म्हणेल याचे विचार तडीपार फेकून देऊन, ती बोलली ! सर्वांचे डोळे उघडणारे तर ते होतेच पण मधून मधून डोळ्यांत संवेदनशीलतेचे पाणी आणणारेही होते. मी तिचे ते भाषण कधीच विसरणार नाही.

तिच्या मर्यादा संभाळूनही ती काय काय करत असते हे मधून मधून कळत राहिले. तिच्याबद्दलचा आदर दुणावत राहिला. तिला आता तिने केलेल्या एका अनुवादासाठी साहित्य अकादेमीचे पारितोषिक मिळाल्याचे कळले आणि खूप आनंद वाटला ! आज नुसते फेसबुकवर थोडे फिरून पहा -- तिने कमावलेल्या प्रेमादराचे प्रचंड दर्शन होईल !

त्यानंतर पुन्हा आमची भेट झाली नाही. पण तिला मनातच स्थान दिलेले असल्याने प्रश्नच येत नाही !
माझ्यासारखीच अनेकांची अवस्था आहे !

प्रिय सोनाली, तुझे खूप मन:पूर्वक अभिनंदन ! बघू, हे कोव्हिड डिपार्टमेंट बंद झाल्यावर खास तुझ्या भेटीला कोल्हापूरला यायचे मनात आहे. जमल्यास भेटूच !
--- ००० ---

कवळी पण जून कथा

' कवळी ' हे विशेषण असले की आकर्षक असते पण ते जर नाम म्हणून आले तर रक्तच काढते. मी सध्या त्या मार्गात आहे म्हणून त्यावर लिहितोय. एका वेळी किती दात काढले जाऊ शकतात, ते बरे व्हायला किती दिवस लागतात, वगैरे अभ्यास सध्या चालू आहे. त्यात निरनिराळ्या समस्याही समोर येत आहेत.

एकाने एक फारच विचित्र बाब सांगितली. तो एकदा प्रवासात असताना एका सहप्रवाश्याने रात्री त्याची कवळी काढून, स्वच्छ करून, व्यवस्थित पॅक करून बॅग उघडून तीत कुलुपात ठेवून दिली. ते पाहून त्या एकाने विचारले, का हो, कवळी तर आहे, एवढी कुलुपात कशाला ठेवताय ? तर तो म्हणाला, तुम्हाला माहिती दिसत नाही, कवळ्या चोरीला जातात ! काही शहरांमध्ये त्या रस्त्यावर विकायला असतात. जातायेता कुणीही आपल्याला फिट बसणारी कवळी विकत घेऊन जातो. ना डॉक्टरकडे चकरा मारणे ना मापे देणे ! आणि स्वस्त काम ! आता ती कवळी इंपोर्टेड मटेरियलची आहे की स्वस्तातली याचे त्यांना काही देणेघेणे नसते. बरे, कवळीला काही चासिस नंबर वगैरे नसतो, त्यामुळे ती कुणाची कुठून आणली वगैरे प्रश्नच नाही येत. ते सांगतात की या रिजेक्टेड ( नाकारलेल्या ) कवळ्या आम्ही विकतोय ! ( यात काही मृत व्यक्तींच्याही कवळ्या असतात म्हणे ! )

एका दृष्टीने हे बरेही असावे. माझ्या माहितीत एकजण आहेत, त्यांनी उत्तम कवळी घेतली करून पण ती त्यांना सूट नाही झाली. मग, ते ती फक्त जेवताना वापरतात आणि काढून ठेवून देतात !

म्हणजे कवळीचोर लोक ही समस्या सोडवून देतात ! टेस्ट करा, तुम्हाला सुटेबल कवळी घ्या आणि फुटा !

इट हॅपन्स ओन्ली इन इंडिया -- हे गाणे आठवणे इथे अत्यावश्यक !

--- ००० ---

मोकळी हवा

थोडी मोकळी हवा ज्यांना चालत असेल त्यांच्यासाठी ही पोस्ट. आधीच क्लियर करतो की ही माझ्या कवितांच्या समर्थनार्थ देत नाहीय. माझ्या कविता या अनेक कारणांनी कविताच नाहीयत. तो जाऊ दे विषय. जेम्स टेट नामक, माझ्या मते ग्रेट असलेल्या, कवीच्या या दोन कविता वाचा. आता अनुसर्जन बास. तशी इथे कशाचीच फारशी गरज नाहीय. भाषेत कविता असावी म्हणून थोडेफार कौशल्य आत्मसात करत थोडी कलाबिला करत राहिले की बास. स्वत:लाही मुळे हलवणारे प्रश्न नकोत आणि वाचकांच्याही डोक्यांना नको जास्त ताप. खाली लिंक देतोय. ज्यांना ' इथल्या मातीतले नसलेले ' चालू शकते त्यांनी वाचून पहा. वाचून झाल्यावर आपण नक्कीच म्हणू -- असेल पुलित्झर मिळालेला पण कविता म्हणून गद्य खपवत होता हा माणूस. आणि तिथले वाचकही च्युत्ते फसत होते. बघा –

https://granta.com/two-poems-tate/?fbclid=IwAR2iCJUtlEhRuMNO2dfSsZL3BrfgQPTfnR6R4hBiFRV1VpbBgoM_qEe7Txk

अगम्य ---शॅडो सेल्फी --- घर अमुचे आकाश – तीन फोटो.

कवितांचे परीक्षण

बऱ्याच कविता या खालीलपैकी एक वा अनेक वैशिष्ट्यांत सामावतात, असे दिसते --

१. कोणत्याही बाबतीत गांभीर्य नसून, मिळवलेली भाषा आणि विद्वत्ता यांतून विविध गुणदर्शन करत राहणारी कविता.

२. अनिश्चितता पूर्ण सोडून दिलेली, समजून घेण्या ऐवजी सांगण्याच्या भूमिकेत असलेली हिंसक कविता.

३. व्यक्तिगत भावभावना आणि मूडस यांचे स्तोम माजवणारी कविता.

४. सामान्य अनुभवांना ओळी, सांगीतिक लय, अलंकार, प्रतिमा यांतून मांडणे म्हणजेच कविता, अशा समजातून लिहिलेली कविता.

५. माझ्यापेक्षा वेगळे काही समजणारे मूर्ख आहेत असे समजणारी कविता.

६. माणसांचे आणि घटनांचे अंतिम मूल्यमापन सांगणारी कविता.

७. व्यवस्था म्हणजे काय हे आपले मत ठरवून व्यवस्था बदलायला निघालेली कविता.

८. कविता तथाकथित ' काव्या ' तून जे सांगत आहे ते सरळ गद्य उताऱ्यातून पूर्णपणे सांगून संपू शकते, अशी सूचकतेच्या अभावाची कविता.

९. अहंकारी, घमेंडी, आत्ममग्न, अस्मितांच्या बंधनांत अडकलेली, उर्मट, मग्रूर म्हणावी, अशी कविता.

१०. निसर्ग, आठवणी, दृश्ये इत्यादींची नुसती वर्णने करण्यात रमणारी कविता.

--- अशा कवितांचा आवाका फारसा मोठा नसतो. रंगून-रमून जायला त्या चांगल्या असू शकतात, पण, एकूणात, त्या कविता खुज्या असतात. सर्व माणसांना प्रस्तुत ठरावे असे काही तत्त्व त्यांच्यांत नसते. हे सर्व लक्षात घेऊन ' मराठी कविता ' या विषयावर एक सविस्तर लेख लिहिण्याचा विचार आहे. माझे इतरही काही लेखन चालू आहे. वेळ लागू शकतो, पण हे काम तर योजलेले आहेच. मतभेद असू देत, पण या कामाला तरी शुभेच्छा असाव्यात, ही विनंती.

--- ००० ---

साहित्यव्यवहारासाठी एक अतिमहत्त्वाचा लेख

टिचकीसरशी उडवू नका -- सुनीळ सामंत
( आज दिनांक २६-०९-२१ रविवार मटा )

" पुस्तके खपत नाहीत याचे महत्त्वाचे कारण त्यांची किंमत. पुस्तके स्वस्त न होण्याचे कारण त्यांच्या आवृत्तीची संख्या व पडून राहण्याचा काळ. पुस्तके स्वस्त करण्यात इंटरनेट महत्त्वाचे साधन बनू शकते. वाचकसंख्या वाढवण्यासाठी इंटरनेट महत्त्वाची भूमिका बाजावू शकते. इ-बुक, इंटरनेट, आणि नवीन तंत्रज्ञानाच्या नावाने बोटे मोडाल तर मोडून पडाल. " -- हे या लेखातले एक वाक्य आहे. हा पूर्ण लेखच, विशेषत: लेखक-कवींसाठी फारच महत्त्वाचा आहे.

माझी www.champralekhan.com ही वेबसाईट ( संकेतस्थळ ) २००९ पासून  असल्याचे तुम्हाला माहीतच आहे. आयुष्यभरचे माझे सर्व लेखन मी इथे मोफत उपलब्ध करून दिलेले आहे. ही पोस्ट देण्याच्या निमित्ताने मी यातली आकडेवारी तपासून घेतली. वर्षाला साधारण किती वेळा लोक इथे व्हिजिट करतात हे पाहिले असता खालील माहिती मिळाली --

२०१५ -- ३९५८

२०१६ -- ३३९६

२०१७ -- ३९६५

२०१८ -- २३००

२०१९ -- २७६८

२०२० -- २९२८

२०२१ -- २७०५ ( सप्टेंबर पर्यंत )

भारत, अमेरिका, जर्मनी, कॅनडा, चीन, रशिया, ग्रेट ब्रिटन, थायलंड, ग्रीस, आयर्लंड, नेदरलँड, स्वीडन आणि फ्रान्स -- या देशांतून ही वेबसाईट व्हिजिट झालेली ( पाहिली गेलेली ) आहे. यातले काय काय डाऊनलोड केले गेले त्याचेही रेकॉर्ड आहे. अर्थात ही सगळी त्या त्या देशातली मराठी माणसेच असणार. माझ्यासारखा लेखक म्हणणार, वाचले जातेय ना, बास ! आणि इथे मराठीत हे असले लिहून लेखकाला मिळून मिळून पैसे मिळणार किती ? सारांश, मी काळाची पावले ओळखून चाललोय, असे वाटते.

--- ००० ---

champralekhan.com

ही मित्रवर्य डहाके सरांची पोस्ट आहे – ( जेम्स टेटची  The government Lake – ही कविता.

Ganesh Kanate

तुम्ही जनस्थान पुरस्कार स्वीकारताना उद्धृत केलेली कविता! 👌👌👌

- Reply
- 14h

Champra Deshpande

आनंद वाटला ! हा ' कवी ' आवडणारे आणखीही कुणी आहेत मराठीत !

- Reply
- 14h

Vasant Dahake

Champra Deshpande आपली ही पोस्ट येण्यापूर्वी ही कविता मी वाचली होती व माझ्या भाषणात तिचा उल्लेख केला होता. आपण आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की कवितेच्या नावाखाली हा गद्य खपवीत होता. तर गद्य म्हणजे काय असा प्रश्न मला पडला. कथा, ललित लेख, निबंध, पत्र, रोजनिशी, दस्तऐवज, वार्तापत्र, भाष्य, बातमी, जाहीर सूचना, निविदा, अहवाल ? म्हणजे यांपैकी हा काय खपवीत होता ? ते पाहावे म्हणून हा मजकूर येथे टाकला.

1

- Reply

- 9h

Champra Deshpande

Vasant Dahake ते माझे नव्हते म्हणणे -- इथल्या काही लोकांना कविता म्हणजे ती अमुक अशीच असायला हवी असे वाटते, ते माझ्या काही कवितांना गद्य म्हणत होते -- त्यांना उद्देशून ती उपरोधिक पोस्ट होती. माझ्या दृष्टीने हा एक उत्तमच कवी आहे !

- Reply
- 22m

Champra Deshpande

तुमची परवानगी गृहीत धरून शेयर करतोय --

- Reply
- 1m

Vasant Dahake

जरूर

सांगून सुपरहिट

मी एक नाटक लिहिले होते. त्यात त्या काळातल्या हिंदी सिनेमाची एक बनावट स्टोरी ( गोष्ट नव्हे ) होती. त्याचे नाव होते, ' जागचं हलायचं नाही '. माझा ग्रेट दिग्दर्शक मित्र प्रकाश बुद्धिसागर याला ते खूप आवडले होते. तंत्राच्या अनेक करामती करून लोकांना चकित करत त्या नाटकाचा एक झगमगता प्रयोग त्याला व्यावसायिक रंगभूमीवर सादर करायचा होता. ते नाटक अर्थातच आहे तसे प्रायोगिक गरिबीत नसते आले. प्रकाशने त्याच्या आत्मविश्वासातून त्याचे नाव ठरवले होते, ' सांगून सुपरहिट ' ! पण, सुरुवातही न होता, तालमीतही न जाता, ती योजना बोंबलली आणि पुन्हा एकदा सवयीतले अपयश माझ्या खात्यात जमा झाले. नंतर खूप वर्षांनी, पुनर्लिखित स्वरूपात त्या नाटकाचा म्हणायला एकच प्रयोग, ' गोळ्या काढलेले पिस्तूल ' या नावाने झाला ! हे सांगायचे कारण म्हणजे, कविता लिहिण्याचे एक, सांगून सुपरहिट तंत्र मी आज इथे उघड करणार आहे. त्याच त्याच प्रकारच्या रटाळ कविता लिहिण्या-वाचण्याचा ज्यांना कंटाळा येत नाही त्यांच्यासाठी हे नाही आहे. नावीन्य आणि स्वत:ची मर्मदृष्टी यांचे नवविधा संगम करत राहावे असे ज्यांना वाटते त्यांच्यासाठीच ही पोस्ट आहे. मुख्यत: वैचारिक पायावर उभे राहून सामान्य अनुभवांची सौंदर्ययुक्त री ओढत राहणे म्हणजे कविता, अशी बाळबोध समज स्वीकारणाऱ्यांसाठी हे नाही आहे.

तंत्र म्हटले तर सोपे आहे. तुमचे जे काही आकलन असेल जगण्याच्या प्रक्रियेचे ते यातून व्यक्त होऊ शकेल. तरीही, मुख्यत: क्षणोक्षणी दिसणारी विसंगती आणि निरर्थकता ज्यांना जाणवत असेल त्यांच्यासाठी तर ही एक खाणच ठरू शकते. साधे कोणत्याही दिवसाचे एखादे वर्तमानपत्र घ्यायचे. मग कोणत्याही पानावरचे, त्या त्या वेळी समोर येईल

ते ते वाचत, आपल्या आकलनाच्या अंगाने मांडत जायचे. यात, आपल्या डोक्यात असलेले वा सुचणारे असेही काही काही समाविष्ट करत जायचे. कविता म्हणजे हेच, असेच, अमुकच असे काही पकडून बसायचे नाही. बुद्धिगम्य अर्थाचा विचारही करायचा नाही आणि त्याच्या अभावाची भीतीही बाळगायची नाही. मानवी अनुभवाचे एक विश्वदर्शन यातून खुले होऊ शकते. याचा अर्थ जुन्या अभिव्यक्तिपद्धती नष्ट होतात, असे काही नाही. काही लोकांना असे म्हणायची एक हौस असते की आता मूर्षावादाचा काळ संपला, स्वच्छंदतावादाचा संपला, अतिवास्तववादाचा संपला. तर तसे काही होत नसते. मानवी मनाच्या सर्व शक्यता चालूच राहतात. ( मराठीत वास्तववादाचा काळ कधीच संपत नाही ! ) हे पाहता, भावनिक आणि माणुसकीच्या प्रचाराच्या कविता लिहिणाऱ्यांनी निर्धास्त राहायला हरकत नाही. काही कवी हयातभर एकाच प्रकारची आवड जोपासणारे असतात तर काही, माणसांतल्या निरनिराळ्या प्रवृत्तींना खुश करणारे विविध गुणदर्शन करण्यात माहीर असतात. त्यांचे ते काम चालू राहू शकतेच. हेही काही असू द्या बाबा, अशी आपण त्यांना विनंती करू शकतो. हा एक वेगळा प्रकार, एवढेच राहू द्या सध्या. पण, अर्थातच, हे तंत्र, माझ्या त्या नाटकाप्रमाणे पूर्ण अपयशीही होऊ शकते. नाही तरी इथे कुठे कसला बौद्धिक अर्थ व्यक्त करायचा आहे, फेल झाले तर होऊ दे, असा विचार मी करतो – ही अर्थात सर्वांच्याच ' बसकी बात ' नाही याची मला जाणीव आहेच.

तर मी इथे प्रात्यक्षिक दाखवणार आहे. त्यासाठी मी घेतला आहे आज, मंगळवार, दिनांक ०५-१०-२१ चा पुणे मटा. चलो, शुरू करते हैं –

कल्पना

एखादी व्यक्ती अमुक असे वागते आहे, असे दोनतीनदा आपल्या लक्षात येते. ते आपल्याला आवडत नाही. ती व्यक्ती हेतूपूर्वक असे वागते आहे या कल्पनेने आपण त्या नात्यातला आपला पवित्राही बदलतो. फक्त एवढेच कशाला असे म्हणत कधी आपला एकूणच पवित्राही आपण बदलतो. ही सगळीच आपली कल्पना असू शकते. आपल्या आयुष्याची आखणी करत जायला या असल्या कल्पनेशिवाय आपल्याकडे असतेच काय ? म्हणजे, पवित्रे, भूमिका ठरवत जाणे हेच जगणे ? पवित्रा कोणताही असो, तो एक ताण निर्माण करणारा आणि त्रासदायकच प्रकार असतो. म्हणजेच , आपण सतत एक काल्पनिक आयुष्य जगतो की काय ? असे ताण निर्माण करत जगणे हेच जगणे असेल का अटळ ? -- असा प्रश्न कुणाला पडला तर तो आध्यात्मिक म्हणून फेटाळू नये, असे वाटते.

--- ००० ---

स्वातंत्र्य -- एक कलामूल्य

कवीचे अभिव्यक्तिस्वातंत्र्य तसेच वाचकाचे आकलनस्वातंत्र्य ! कविता लिहून झाल्यावर कवीने बाजूला व्हायला हवे, मौन पत्करायला हवे. " अहो, अशी नाहीय ती कविता, असा नाहीय तिचा अर्थ, अहो, खरे तर अर्थच नाहीय या कवितेला -- " अशी कवितेची बाजू घेण्याची भूमिका त्याने घेऊ नये. मग, रोमँटिक कवितेचे उपरोधिक अर्थ वा आध्यात्मिक कवितेचे राजकीय अर्थ, असे काहीही होवो. हे असे सर्व असलेला समाज हा खूपच स्वातंत्र्यप्रेमी

असणार. कवी, कलावंतांप्रमाणेच इथले वाचकही जिवंत आणि सर्जकतेने ओथंबलेले असणार ! तर, प्रश्न असा येतो की अशा एकूणच सर्जकतापरिप्लुत समाजात कवितेची वा कलेची गरजच काय ? ' करमणूक ' हे एक त्रिकालाबाधित मूल्य सोडले तर हवीय कशाला कविता ?

--- ००० ---

कविता वाचण्या-समजण्या-मुरण्या ला लागणारा वेळ, काळ या विषयावर आपले मित्र गणेश कनाटे यांची एक पोस्ट वाचली. तीवर दिलेली माझी कॉमेंट --

ही पोस्ट वाचून माझ्या मनात काहीसे अपराधी भाव जागे झाले. मी तर कवितासंग्रह घेतला वाचायला की तो पूर्णच वाचतो. लगेच त्यावर अभिप्रायही देतो. असे अनेक कवितासंग्रहांबाबत घडलेले आहे. उदाहरणार्थ कालच राहुल पुंगलियांच्या ' गावाबाहेर ' वर मी लिहिले आहे. यावर विचार करता मला असे दिसते की कविता वाचताना मी खूप लवचिक, तरल असतो. माझी लुडबूड थांबवून कवितेलाच बोलू देतो. याचाच अर्थ कविता मला ' पोचणे ' हे माझे नसतेच कर्तृत्व. मी स्वत:ला त्या वेळी खूपच ' कमी ' केलेले असते. याचा सारांश असा दिसतो की कविता ' मला ' कधीच नाही समजत. ती ' मी नसण्याला ' समजते. त्यामुळे, ' मला ' अपराधी वाटण्याचे काही कारणच नाही.

--- ००० ---

उत्तर-आधुनिकता

आधुनिकतावादाच्या एका अवस्थेत, " मानवी स्वातंत्र्य आणि मुक्तीच्या नावाखाली प्रबोधनामूल्ये ही सार्वत्रिक जुलूम-जबरदस्ती करू पाहतात, असा संशय बळावू लागला. " ( आधुनिक समीक्षा-सिद्धान्त – मालशे-जोशी- पान २९. )

संहिता आणि वाचक यांवर हे पहा – " या सर्व प्रक्रियेला लेखकरूपी मूळ नसते, तर वाचकरूपी अंतिम साध्य असते. वाचकामध्ये, खरे म्हणजे वाचकत्वामध्ये, संहितेच्या अर्थाची जुळणी होण्याचे कार्य घडत असते. तेव्हा एका दृष्टीने पाहता लेखकत्वाच्या संकल्पनेचा अंत म्हणजे वाचकत्वाच्या संकल्पनेचा उदयच असतो, अशी भूमिका बार्थने घेतलेली आहे. " ( त्याच पुस्तकातले पान १५८. ) म्हणूनच, उत्तरआधुनिकतावादात असे म्हटले जाते की लेखकाची मूळ संहिता असे काही नसतेच तर फक्त वाचकांच्या कॉपीज असतात.

याचा आपण आपल्या साध्या पद्धतीने अर्थ पाहिला तर काय दिसते ? आंबेडकरवादकेंद्री कवीने लिहिलेली कविता समजा मराठावादकेंद्री वा ब्राम्हणवादकेंद्री वाचकाने वाचली तर तो तो वाचक त्याच्या अवस्थेतून ती कविता वाचणार वा तिचा अर्थ लावणार, म्हणजे मूळ आंबेडकरवादी कविता अस्तित्वातच नाही असणार. किंवा समजा ( समजा म्हणतोय ) एखाद्या तालिबान्याने ग्रेसची कविता वाचली तर तो स्वत:ची तालिबानिगिरी पक्की ठेवूनच तिच्याकडे पाहणार. हे असले विवेचन म्हणजे, माणसाचा हलकटपणा, हिंसकपणा, क्रूरपणा, द्वेष, महत्त्वाकांक्षा, स्ववर्चस्वाची इच्छा, सुखलालसा हे सगळे सर्वांचे सतत अबाधितच असणार असे गृहीत धरणे आहे. असे जर असेल तर

मूल्यात्मकता हा शब्दच रद्द होतो. उत्तरआधुनिकता हेच म्हणते. सत्य, स्वातंत्र्य वगैरे असले काही नसतेच, हाच इथे आकलनाचा पाया असतो. असे असेल तर मग कलानिर्मिती हवीच कशाला याचा विचार करायची वेळ येते.
माझ्या आकलनाप्रमाणे चांगली कलाकृती ही तिच्या निर्मात्याच्या प्रभावयुक्ततेतून बाहेर पडण्याची त्याची प्रक्रिया असते आणि तिचे वाचकाने वाचन करणे हे त्याने स्वत:च्या प्रभावयुक्ततेतून बाहेर पडणे असते. हीच तर कवी आणि वाचक यांनी एकमेकांना भेटण्याची शक्यता असते. आणि ती असतेच. अन्यथा, ज्याच्या त्याच्या आवडीची करमणूक एवढेच कलेचे कार्य आहे, असे म्हणावे लागेल. त्यामुळे, मला असे दिसते की उत्तरआधुनिकतावाद हा माणसाचा हलकटपणा आणि मूर्खपणा हेच फक्त सत्य असते, असे मानणारा आहे. कलानिर्मिती आणि मानवी मूल्य यांचा संबंधच नसतो, असे मानणारा आहे.
मला हे मुळीच पटत नाही. प्रत्यक्ष जगण्यात स्वातंत्र्याची म्हणजे स्वत:च्या प्रभावयुक्ततेतून बाहेर पडण्याची शक्यता निश्चितच असते, असे मला दिसते. जगातल्या अनेक मोठमोठ्या कलावंतांनी याला दुजोरा दिलेला आहे. तुम्हाला काय वाटते ?

--- ००० ---

माझे दोस्त

सकाळ झाली की सुमारे पन्नास-साठ ती उडायला सुरुवात करतात. तोच एकच ठरलेला एरिया. इकडून तिकडे आणि तिकडून इकडे. मी माझ्या खिडकीतून जरा लांबून पाहतो. ही बहुतेक कुणीतरी पाळलेली कबुतरे असावीत. सकाळी जरा पंख मोकळे करायला, खुश व्हायला आणि व्यायाम म्हणूनही त्यांना कुणी सोडत असावेत. की ती आपली आपलीच राहतात एक टोळी करून, कोण जाणे. काम ना धंदा ! किती वेळ उडावे ? सुमारे पाच ते सहा तास किंवा आणखी जास्तच असेल ! आता ती तीच टीम इतका वेळ उडत असते की थोड्या थोड्या वेळाने ती बदलते, ते नाही माहीत. सतत उडत असतात ! कितीही स्पीड कमीजास्त होवो, चक्कर थोडी कमीजास्त होवो, यांची ना कुठे टक्कर होते ना रागसंताप. अत्यंत स्मूथ  चालते काम. बरे यात कुठला खेळबीळ काही नसते. शर्यत वगैरेही नसते कधी. खाणे आणि असा उनाडपणा करणे, हेच जगणे ! त्यांच्या पोरांना फारसे शिक्षणही देत बसण्याचा फारसा प्रश्न नाही. वर वर चढा, प्रगती, करा, मोठे व्हा असली काही भानगडच नाही. असावीत ती मराठीच पण साहित्याचा आणि राजकारणाचा संबंधच नसल्याने ती ना पुरोगामी ना प्रतिगामी असणार. मीच कसा विवेकी आणि बाकीचे कसे अविवेकी, अशी काही भानगडच नाही. ना कुणी ग्रेट ना कुणी छोटे !
असाच पांढऱ्या पक्ष्यांचा समूह असाच अनेक तास उडणारा मी लंडनमध्येही पाहिला होता. तिकडे आमच्या कन्येकडे आम्ही महिनाभर राहिलो होतो तेव्हा. ते तर अधिकच विलोभनीय होते. समोर विस्तीर्ण हिरवेगार मैदान आणि हे पांढरे शुभ्र दोस्त ! तिथे मात्र ते कधी कधी त्या मैदानात उतरून थोडा वेळ बसत असत. पण हे असेच ! तासंतास उडणे ! भांडणबिंडण काही नाही, मजा नुसती !
नेटवर एकदा पाहिले या निमित्ताने तर हजारो पक्ष्यांचे समूह, उडतानाची डिझाईन्स, नक्षी आणि स्पीडही बदलत बिनधास्त हवी तशी उडू शकतात ! टक्कर न होता !

मला एक तीव्र शंका आहे की त्यांना मन हा प्रकार फक्त कामापुरताच असणार ! बाकी सगळे सौंदर्य आणि मजाच ! माणसाचे बिचाऱ्याचे मन सतत कार्यरत असते त्यामुळेच बिचाऱ्याची वाट लागत जाते. त्यालाही, कामापुरते मन वापरत, ही सगळी प्रगती टिकवत आणि वाढवतही, जगता येईल का, हाच एक महत्त्वाचा वाटतो प्रश्न !

--- ००० ---

Abhimanyu Bhupathi is with ಮಂಜು ನಾರಾಯಣ್ and 7 others

.

Octo6gb1eporm fs3m20 ratel 9:138 AM96 •

'Chaduranga mattu Katte' happening at RANGASHANKARA today at 7 PM.

Originally written in Marathi by Sri Champra Deshpande

Translated to Kannada by Sri D.S. Chougale

Will be staged by Panchamukhi Natara Samuha.

Please do come and watch! Thanks in advance.

Octo6gb1eporm fs3m20 ratel 9:235 AM96 • Shared with Public

Public

आता, ' बुद्धिबळ आणि झब्बू ' कानडीत –

आणखी एक नाटक -- ' बुद्धिबळ आणि झब्बू ' -- कानडीत –

जे. कृष्णमूर्ती

जे. कृष्णमूर्ती स्वत:कडे कोणतेही ग्लॅमर घेत नाहीत आणि जर कुणी असे ग्लॅमर मिरवत असेल तर त्याला जुमानू नका असे सांगतात. माणसाच्या जगण्यात येणारे प्रश्न आणि समस्या यांवर आयुष्यभर ते बोलत राहिले, अनेकांशी चर्चा करत राहिले. जगातले अनेक तत्त्वज्ञ, मानसशास्त्रज्ञ, वैज्ञानिक, कलावंत त्यांत सामील होत राहिले. माणसाला त्याच्या दु:खातून बाहेर पडता येईल का, हा प्रश्न हजारो वर्षे अनेक धर्मांनी हाताळलेला होता. त्याचे धार्मिक अस्मितेचे आणि ओळखीचे स्वरूप घालवून कृष्णमूर्तींनी हे मैत्रीपूर्ण चर्चेच्या स्तरावर आणले. गुरुबाजी नाकारली. कोणतीही तथाकथित धार्मिक परिभाषा वा कर्मकांडांची अवडंबरे नाकारली. पुस्तकी ज्ञान कचऱ्यात टाकायला सांगितले. तू स्वत: तुझ्या प्रश्नांना सामोरे जाणे हा एकच मार्ग, असे त्यांनी सांगितले. यात कोणत्याही तडजोडी नाकारल्या. मानवजातीत हे काही क्रांतिकारक घडत होते. पण क्रांती बाहेर कुठे नाही तर स्वत:तच घडावी लागेल, हे त्यांनी सांगितले. सर्व समस्यांबाबत टप्प्याटप्प्याने, अगदी वैज्ञानिक पद्धतीने त्यांनी विवरण केले. " कशासाठी येता ४०-४० वर्षे माझे बोलणे ऐकायला -- ही काही धार्मिक करमणूक नव्हे ", असे ते म्हणत. ' वर्तमानात जगा ' आणि '

आत्ता नाही तर कधीच नाही ' असे ते म्हणत. जग असे संघर्षमय, हिंसक का होत चाललेले आहे, यावर ते अत्यंत गंभीरपणे बोलत.

यात खरे तर कुणाला काही प्रॉब्लेम असायचे कारणच नव्हते. पण धार्मिक खोटेपणा आणि पुस्तकी साम्राज्ये उभी करणारे यांची सिंहासने यामुळे आपोआप डळमळीत होत होती. त्याची त्यांना भीतीही वाटत होती. तसले अनेक लोक कृष्णमूर्तींबाबत अत्यंत संतापून बोलत. अजूनही बोलतात. एक तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक तर ' हा भडवा काय सांगतो -- हे सगळे गीतेत सांगितलेले आहे ' अशा प्रकारे संतापताना मी पाहिलेले आहेत. प्रत्यक्ष स्वत: कोणत्याही समस्येला तोंड न देता ज्यांना शाब्दिक अधिकारपदे टिकवायची असत ते सगळे कृष्णमूर्तींच्या बाबतीत शत्रू होत.

मला स्वत:ला अगदी बालपणापासून जगण्याबाबत गंभीर समस्या भेडसावत आलेल्या असल्याने मला त्या समजून घेण्याच्या प्रक्रियेत कृष्णमूर्तींची खूप मदत झाली. कोणतीही व्रतवैकल्ये, पूजा-अर्चा, दिवे लावणे, जयंत्या-पुण्यतिथ्या असले काहीही मला नको होते. आणि असे माझ्यासारखे जगात खूप लोक होते. ते आस्थेने कृष्णमूर्तींचे ऐकत-वाचत असत.

ज्यांना हे नाही आवडत त्यांनी आपापल्या गल्ल्या, राजधान्या संभाळत बसाव्यात ना. कृष्णमूर्तींना शिव्या देण्याचे, त्यांच्यावर इतके चिडण्याचे काय कारण, असे मला वाटे. कृष्णमूर्ती त्यांच्या श्रोत्यांनाही अनेकदा म्हणत की मी तुमच्यावर अवलंबून नाही, तुम्हीही माझ्यावर अवलंबून राहू नका. आहे तसे सुखासीन जगत राहू इच्छिणाऱ्यांना असा माणूस धोक्याचा वाटू शकतो, हे कळून आले.

अजूनही ज्यांना परंपरेतच फिट राहायचे आहे ते तसे राहातातच. ज्यांना नको आहे कोणतेही अवडंबर ते कृष्णमूर्ती ऐकतात-वाचतातच.

--- ००० ---

Manojchandra Mishra

Otchtober9 20hl at7 110n1f31:107 PMotied1 •

सुंदर आरसा दाखवणारी माणसं.

तुम्हीही त्यातलेच चंप्र.

Thanks for letting me share Champra Deshpande.

Champra Deshpande was with Jaydeep Apte.

iOuScmu2ltpo6ober36 2gr7 agt l89:37 AM • Shared with Public

Public

नाटक -- ' ए, आपण चहा घ्यायचा ? ' --

खूप शुभेच्छा, जयदीप !

०२ सप्टेंबर' २१ ला मी, प्रा. मधुकर देशपांडे या माझ्या एका चुलत भावाबद्दल इथे एक ' जिंदगी का सफर ' ही पोस्ट दिली होती. कॅन्सरचे निदान झालेले असूनही, त्याने आणि त्याच्या कुटुंबाने ते सर्व एक वस्तुस्थिती म्हणून स्वीकारणे आणि बाकी रूटीन आहे तसे चालू ठेवणे, यावर ती पोस्ट होती. तो काल रात्री निवर्तला. रात्री साडेअकरानंतर त्याच्यावर अंत्यविधी झाला. स्मशानातून सुमारे साडेबाराला आम्ही घरी परतलो.
आमच्या पिढीतल्या भावंडांत पहिला नंबर त्याने लावला ! बाकी शांतता आणि स्मृतीस अभिवादन !

बिंदी-गिंदी, बासुंदी, मटण, कबाब, वगैरे.
माझा माझ्या एका मित्राशी संवाद चालला होता. मी त्याला विचारले की एखाद्या प्रांतात अमुक एका जातीची टक्केवारी जास्त आहे म्हणून त्या प्रांतात त्याच जातीचे, राजकारणासह सगळीकडे प्राबल्य असावे, इतर जातींना नाइलाजापुरतेच स्थान मिळावे, यामागे तर्क कोणता असतो ? तर तो म्हणाला की लोकशाहीत असे होणारच ना, संख्येवर संधीही मिळणारच ना ! पण क्षणात तो असेही म्हणे की धार्मिक ध्रुवीकरण वाईट, तो निव्वळ वेडेपणा आहे, अमुक धर्माचे लोक जास्त आहेत म्हणून त्यांचे प्राबल्य असावे, असे म्हणण्यात कोणताही शहाणपणा नाही ! हे आठवायचे कारण सध्या उडत असलेला सांस्कृतिक आणि उदारमतवादी यांच्यांतला धुरळा. आपण असे म्हणू शकतो की लोक सामान्यत: -- हिंदुत्ववादी, मुस्लिमवादी, धर्मनिरपेक्षतावादी आणि पुरोगामी अशा गटांत विभागले गेलेले दिसतात. एकदा असे गट वा भेद मान्य केले की ' शहाणपणा ' या विषयाला तिलांजली द्यावीच लागते. ' शहाणपणा ' हा शब्दही कुठे चर्चेत नसतो. जाती, धर्म, भाषा एवढेच काय देश यांवर आधारित एकदा माणसे विभागली गेली की शहाणपणा वगैरे काही मुद्दा राहातच नाही. काय, शहाणपणा म्हणजे ? तर त्याचे उत्तर, मी म्हणतो तेच – असेच येणार. शासनव्यवस्था कोणत्याही प्रकारची असो, कशाचाही गौरव करायला लोकांना आवडत असो, कायदा सर्वत्र निर्बुद्धपणाचा – जंगलाचा कायदाच चालणार, हे ठरलेले आहे. नुसते ठरलेलेच नाही तर ते पूर्ण मानवजातीने स्वीकारलेलेही आहे. मुळात ' शहाणपणा ' ( wisdom ) म्हणजे काय, हे कुणालाही सांगता येत नाही. समजा अमेरिकेच्या कृती ' चूक ' आहेत, तर काय ? निर्णय होणार ते ताकदीवर, जोरावर, जबरदस्तीवर. पूर्ण मानवजातीने ठरवले तर जगातली गरिबी चुटकीसरशी खतम होऊ शकते. पण तसे होऊ नाही शकत कारण पूर्ण मानवजातच समतेच्या, माणुसकीच्या विरोधात असते. ही रचना सर्वांनाच मान्य असते. त्यासाठी सैन्यावर, शस्त्रास्त्रांवर अब्जावधी रुपये खर्च करणे सर्वांनाच मान्य असते. शक्तिमान असणे, प्रबळ असणे हाच ' शहाणपणा ' हे सर्वांनाच मान्य असते. एकदा कोणतेही विभाजन, भेद मान्य केले की मग ' शहाणपणा ' या विषयावर कुणीही बोलण्यात अर्थ राहात नाही.
अशा परिस्थितीत, ' शहाणपणा ' असे काही असू शकते का आणि काय, कसे असेल ते जगणे – असे प्रश्न काहींना पडू शकतात. ' आध्यात्मिक ' पळपुटे अशी त्यांची संभावना सर्वच सक्रिय भूमिकाधारकांकडून होऊ शकते. सर्वांचे म्हणणे एकच असते की कोणती का असे ना, एक बाजू घ्या आणि पेटवत, धडाधड भडकवत ठेवा सगळ्यांचे जगणे ! भाषेचा अभिमान बाळगणाऱ्यांना भाषेचे कितपत असते देणे-घेणे, तसेच धर्माचा अभिमान बाळगणाऱ्यांचा धर्माशी कवडीचा तरी संबंध असतो का, हे प्रश्न विचारले पाहिजेत. तसेच ' पुरोगामी ' हीही एक मूर्ख ओळख होऊन बसलेली

आहे नुसती, हेही पाहायला हवे. अमुकच फक्त शहाणे, तेही जगात, इथे महाराष्ट्रातच फक्त उपलब्ध आहेत, असे कुणीच म्हणू शकणार नाही.

अलगता, ओळख, विभाजन आणि वैचारिक बांधिलकी – हे आहेत मूलप्रश्न. हे लक्षात येऊन तरी उपयोग काय ? एक तर संघर्षात सहभागी व्हा नाही तर पळपुटे म्हणून ख्यातनाम व्हा, यांतच निवड करावी लागणार !

कबाब खा, वर बासुंदी प्या – समानता ठेवा, म्हणजे झाले !

--- 000 ---

माझे जागतिक प्रतिनिधी

जानेवारी २०२२ मध्ये सिंगापूरला जगातल्या निवडक तरुण शास्त्रज्ञांना एका महान समिटमध्ये सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. ‘ ग्लोबल यंग सायंटिस्टस समिट ‘ असे त्याचे नाव आहे. यात अनेक नोबेल पारितोषिक विजेते शास्त्रज्ञ सहभागी होणार आहेत. त्यांची भाषणे ऐकायला मिळण्याबरोबरच त्यांच्यासमोर आपापल्या विषयातले काही सादरीकरण करण्याचीही संधी या तरुण शास्त्रज्ञांना मिळणार आहे. शिवाय, त्यांच्या निवडीप्रमाणे त्यांतल्या एखाद्या शास्त्रज्ञाशी एका छोट्या गटात होणाऱ्या चर्चेतही त्यांना सहभागी होता येणार आहे. विशेष म्हणजे यात माझे खास दोन प्रतिनिधी असणार आहेत ! चि. दुर्गा पारखी ही माझी नात ( कन्येची कन्या ) आणि तिचे नियोजित पती चि. श्रीजय देशपांडे – या त्या दोन व्यक्ती ! हा आनंद तुमच्याबरोबर शेयर करणे हे तर आहेच, पण, त्याचबरोबर, आता तरी तुम्हाला पटावे की मी लिहितो ते किती महत्त्वाचे आहे, हाही एक छुपा अजेंडा आहेच ! जगातल्या अत्यंत तीव्र स्पर्धेतून या दोघांची, आणखी काही तरुणांबरोबरच निवड झालेली आहे ! जय हिंद !

--- ००० ---

जगण्याचा मार्ग

आज मी जरा म्हणजे मला मुळीच न कळणाऱ्या विषयावर लिहितोय. याचा अर्थ, एरवी, मी मला कळणाऱ्या विषयावरच लिहितो, असा माझा दावा नाही. बारावीनंतर प्रवेश कसा कुठे घ्यावा, हा तो विषय. सामान्यत: विद्यार्थ्यांना असो की त्यांच्या पालकांना, नेमके काय करावे याची स्पष्टताच नसते. मग, अमुक ठिकाणी, अमुक शिक्षण झाल्यावर मोठ्या पॅकेजच्या नोकऱ्या कशा मिळतात, हेच एकूण विचाराचे आणि निर्णयाचे सूत्र बनते. आर्टस आणि कॉमर्स सध्या सोडा, तिथे फार डोके चालवण्याचा प्रश्न नसतो. आपल्याला हवे ते कॉलेज मिळाले की झाले, असा तो एक सोपा निर्णय असतो. सायन्स वाल्यांचे मात्र फारच अवघड असते. पूर्वी विद्यार्थी जरा हुशार असला की त्याने डॉक्टर वा इंजिनियर व्हायचे, हे ठरलेले असे. आताही बरेचसे तसेच असले तरी महाविद्यालये, विविध कोर्सेस यांचा खूपच गुंताडा दिसतो. ( शिवाय ठिकठिकाणच्या फी, देणग्या, बाहेरगावी गेल्यास येणारे खर्च, वगैरे मुद्दे वेगळेच ! ) काय केले म्हणजे नोकरी उत्तम मिळेल, हेच असते विचारात. कुठे कोणत्या कंपन्या येतात मुलाखतींना, मुले निवडायला, ही माहितीही महत्त्वाची ठरते. क्वचितच एखाद्या विद्यार्थ्याला त्याला काय करायचे आहे याची स्पष्टता असते. खरे तर अशा वेळी निर्णय सोपा व्हायला हवा. पण तिथेही पालकांचे विचार वा इच्छा वेगळ्या

असतात, त्यामुळे अशा वेळी संघर्ष होतात. प्रवेशासाठी जे फॉर्म  भरावे लागतात त्यांत आपल्या निवडींचे क्रम देणे हे फारच बुद्धिमत्तेचे काम असते, असे दिसते ! त्या कामात योग्य ती दृष्टी नसल्यामुळे बऱ्याच हुशार मुलांनाही त्यांना हवे ते कोर्सेस मिळत नाहीत, असे कळते. म्हणजे ही एक लॉटरीच आहे एक प्रकारची ! मुलांनी आणि पालकांनी मिळून खेळायची तीन पत्ती ! यातून सगळे जे जसे घडत जाईल त्यातून घडत जाणार या देशाचे पुढील शिल्पकार ! कधी कधी म्हटले जाते की मुख्य म्हणजे जगण्यातल्या अनिश्चिततेचे शिक्षण मुलांना दिले जावे याची आपल्या शिक्षणात सोयच नाही आहे. आता, या प्रवेश प्रक्रियेत मात्र ते घडून येत आहे ! बरीच मुले नाराज होऊन उत्तम शिक्षणाचे मार्ग पत्करत आहेत ! हे सर्व पाहता माझे साधे भरडे जीवन बरे गेले असे मला वाटते !

--- ००० ---

मंगला आठलेकरांचा हा लेख खूपच विचारांना चालना देणारा आहे --

https://www.loksatta.com/.../dr-mangala-athalekar.../...

मंगला आठलेकर यांच्या भाषणाची लोकसत्तेची एक लिंक मी इथे विचारार्थ दिली होती. त्यावर राहुल पुंगलिया यांनी चांगले लिहिलेले असून त्याची पोस्ट दिलेली आहे. तिथे देण्यासाठी मी कोमेन्ट लिहिली पण ती जास्त शब्दसंख्येमुळे तिथे घेतली जात नाही आहे. त्यामुळे ती मी इथे माझी पोस्ट म्हणून देत आहे --

पुरस्कार, वगैरे.

मंगला आठलेकर यांच्या लोकसत्तेतल्या एका भाषणाची लिंक मी चर्चेसाठी इथे पोस्ट केली होती. त्यावर समंजसपणे वाचकांनी आपापले विचार, आकलने मांडावीत, अशी अपेक्षा होती. प्रथमच, त्यावर, राहुल पुंगलिया यांनी काही चांगले विचार मांडलेले असून ते नक्कीच चर्चेला चालना देणारे आहेत. पुंगलियांच्या कविता जरी मला आवडत असल्या तरी त्याचा अर्थ आमची एकमताची वा एका ‘ भूमिके ‘ ची टोळी असते, असे नाही. त्यामुळे, माझ्या आकलनाप्रमाणे मी लिहीत आहे.

कोणतीही सत्ता ही स्थिर असते आणि स्थिर राहण्याच्या प्रयत्नात असते. सर्जकता ही प्रवाही असते – स्थिरतेशी तिला काही देणेघेणे नसते. त्यामुळे, कलावंतांचा, साहित्यिकांचा सत्तेबरोबर सतत संघर्ष असणारच. हा संघर्ष, खरोखर प्रवाही असणारे कलावंत आणि वेगळ्या प्रकारची स्थिरता हवी असणारे कलावंत – या दोघांचाही सत्तेशी असणारा वेगवेगळा संघर्ष असा असू शकतो. तसे पाहायला गेले तर अनुभव, स्वभाव, विचार या सर्वच बाबतीत कोणत्याही दोन व्यक्ती एकसारख्या नसतात, याचाच अर्थ त्या छुप्या वा उघड संघर्षातच असतात. वैचारिक स्तरावर आदर्श, सर्वसमावेशक, अलगता निर्माण न करणारे काही असू शकते का ? तर याचे उत्तर ‘ नाही ‘ असेच येणार. कोणतीही वैचारिक मांडणी सर्वांच्या दृष्टीने परिपूर्ण, निर्दोष वा ‘ न गोंधळलेली ‘ असू शकत नाही. त्यामुळेच, आठलेकर बाईंना पुरस्कारवापसीवाले गोंधळलेले वाटतात, पुंगलियांना आठलेकर बाई गोंधळलेल्या वाटतात, मला पुंगलिया

गोंधळलेले वाटतात आणि आता मी हे जे लिहितो आहे तेही आणखी कुणाला गोंधळलेले वाटू शकते. त्यामुळे, एकमेकांना गोंधळलेले म्हणण्यात फारसा अर्थ नाही.

पुंगलिया म्हणतात ते बरोबरच आहे – वशिलेबाजी, भ्रष्टाचार हा कुठेही असू शकतो. मग ते अर्ज करणाऱ्यांना दिलेले पुरस्कार असोत की अर्ज न करता दिलेले असोत. कोणतीही व्यक्ती, संस्था वा सरकार हे कोणत्याही कलावंताच्या विचाराशी एकरूप असू शकत नाही. विचारवंतांचे खून असोत की निवडणुकीच्या काळात होणारे कार्यकर्त्यांचे खून असोत, त्यांत मूल्यात्मक फरक करता येणार नाहीत. एक वा अनेक शेतकऱ्यांच्या, आता एसटी कर्मचाऱ्यांच्या वा विद्यार्थ्यांच्या आत्महत्या होत राहणे हे तितकेच भयानक असते. गरीबीचे अस्तित्व वर्षानुवर्षे टिकून असणे, शिक्षण, आरोग्य यांत समानता नसणे, हेही सगळे भयानकच असते. हे सर्व पाहता, कोणत्याही कलावंताने खरे तर पुरस्काराच्या फंदातच पडू नये. कथा सांगून द्रव्याची अपेक्षा ठेवणाऱ्याला तुकाराम शिव्या देतो. कलेचे कार्य हे मानवी जगण्याला मूल्यात्मकता देण्याचे आहे, हे मान्य असेल तर तेही एक धर्मकार्यच आहे. ही काही उपयुक्त उत्पादनांची व्यापारी देवघेव नाही असू शकत. कलावंतांना जर श्रेयसासाठी काम करायचे असेल तर तुकारामाचे म्हणणे नक्कीच महत्त्वाचे ठरते. आणि एकूण मानवी व्यवहार पाहता कोण त्या अर्थाने मूल्यात्मक काम करत आहे, हे एकमताने ठरणे अशक्य आहे. तसे तर देशात धर्मभेद असणे, जातीवर आधारित राजकारण असणे हेही प्रचंड हिंसक आणि घातक आहे. अशा अनेक गोष्टींना जनतेचा पाठिंबा आणि प्रोत्साहनही असल्याचे दिसते.

एक तर पुरस्कार न घेणेच बरे आणि घ्यायचे असतील तर सर्व भेदाभेदांपासून मुक्त असे आपण आहोत का, हेही पाहायला हवे. युद्धविरोध हे मूल्य असेल तर ते आपल्या आकलनात, आचरणात आहे का, हेही कलावंताने पाहायला हवे. नाही तर एकमेकांना गोंधळलेले म्हणत आहे ते चालू ठेवणे, हेच घडत राहील. आणि अमुक मूल्य महत्त्वाचे, तमुक नाही, असे तरी काही असते का, याचेही आत्मचिंतन कलावंताच्या जगण्यात असायला हवे. की सर्व मूल्यांमध्ये एकात्मता असते – हाही प्रश्न विचारात घ्यायला हवा. असे जर नसेल घडत तर आपल्याला फक्त आपापले राजकीय स्वार्थ साधायचे असून मूल्यात्मकतेशी आपल्याला काही देणेघेणे नाही हे स्पष्टपणे पाहायला हवे. मग, आता चालतेय तसेच, लोकशाहीच्या तत्त्वाप्रमाणे संख्येची शक्ती याच तत्त्वावर सगळे चालत राहणार, यात शंकाच नाही.

--- ००० ---

लोकशाही आणि सत्ता

लोकशाहीत प्रभावी ठरण्यासाठी वा सत्तेवर येण्यासाठी खालील उपाय होत असतात –

१. लोकांना आपुलकीने, प्रेमाने आपले विचार पटवणे.

२. धाक, दहशत, पैसा वा इतर शक्य ते सर्व अशा कोणत्याही माध्यमातून मते मिळवणे.

३. परिस्थिती अशी तयार करणे की जीमुळे लोक आपल्याकडे वळतील.

४. निवडणुकीची व्यूहरचना अशी करणे की तुल्यबळ विरोधकाची मते विभागली जावीत.

५. जात, धर्म, इतिहास, विभूती हे मुद्दे वापरून लोकांना आपल्याकडे वळवणे.

६. वरीलपैकी अमुक मुद्दे कसे घातक आणि अहिताचे आहेत त्याचा प्रचार करणे.
७. उत्तम, आकर्षक आणि हितकारी जाहीरनामा तयार करणे. ( जरी तो वाचून त्यावर आधारित मतदान फारसे कुणी करणार नाही, हे माहीत असले तरी. )
वरील सर्व उपाय वा मार्ग प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे वैधच समजले जातात. त्यांतले काही आपण वापरले तर वैध, दुसऱ्याने वापरले तर अवैध, असे असते. परंतु, सर्वच संबंधित व्यक्ती या जनहिताची कळकळ बाळगणाऱ्या आहेत, हे मान्य करूनच सर्व डावपेच आखणे क्रमप्राप्त असते. हे सर्व असे करणे हे कोणत्याही हुकूमशाहीपेक्षा नक्कीच चांगले, यावर सर्वांचे एकमत असणे म्हणजेच लोकशाही.
( माध्यमचर्चा, मते आणि उथळ निरीक्षणे यांवर आधारित अशी ही पोस्ट आहे. फार गांभीर्याने घेऊ नये. )
--- ००० ---

आत्मप्रेम, आत्मरती, आत्मगौरव

मानसशास्त्रातले कोणतेच संशोधन हे सत्य धरून चालू नये कारण ते सारखे बदलत असते, असे म्हणणारे लोक आहेत. तुम्ही कोणती विचारसरणी स्वीकारणार हे तुमच्या जनुकनकाशावर अवलंबून असते, असे संशोधन समोर आले की काहीजण खूपच संतापतात कारण आपली असाधारण बुद्धी आणि अथक अभ्यास यांच्या तपस्येतून आपण आपली मते, भूमिका वा विचारसरण्या ठरवल्या आहेत, ही त्यांची खात्री असते. या समजाला धक्का बसणे म्हणजे त्यांनी मानलेला तो एक भ्रम होता फक्त, असे होते. ते त्यांच्या जगण्याला परवडणारे नसते. आता, अलीकडेच माणसात नार्सिसिस्टिक प्रवृत्ती का असतात यावर एक संशोधन झालेले आहे. आत्मप्रेम, आत्मरती, आत्मगौरव यांचे एवढे काय महत्त्व असते मानवी जगण्यात, हा तो मूळ प्रश्न आहे. “ मराठ्यांच्या मुलींना ज्या हाताने फुगडी घालता येते त्याच हाताने शत्रूची गर्दनही छाटता येते “ असे काही वाक्य सध्या एका मालिकेच्या जाहिरातीत टीव्हीवर सतत चालू आहे. अरे, हो ना ! पण आता का अशा कानठळ्या बसवताय आणि गरज का वाटते हे सध्या सांगायची आणि कुणाला ? की फक्त हे एक जुने ऐतिहासिक सत्य एंजॉय करणे आहे ? फक्त एक करमणूक नुसती ? हाच विचार पुढे नेला तर असे दिसते की शिवाजी, बाजीराव, आंबेडकर, गांधी, सावरकर अशा अनेक विभूतींच्या गौरवाची गरज सततच निरनिराळ्या समूहांना वाटत असते. काहींना वाटते की बाबा हिंदू धर्मात जेवढा तत्त्वज्ञानाचा विचार झालेला आहे तेवढा जगात कुठेच नाही झालेला, त्यामुळे, आम्हीच होणार जगद्गुरू ! काहींना वाटते की आम्हीच होणार जगातली महासत्ता ! पण काय गरज काय हे असे होण्याची ? सारखेच इतरांनी तुम्हाला शूर, पराक्रमी, शहाणे म्हणत तुम्हाला आरत्या ओवाळत राहावे, अशी ही परावलंबी अपेक्षा असायचेच काय कारण सतत मनात ? यावर काही संशोधन झालेले आहे. कारण याचे बरेवाईट परिणामही घडत असतात.
त्यात एक मुद्दा असा आहे की व्यक्तिगत स्तरावर या लोकांना एक न्यूनगंड असतो. एक तर आपण कमी पडतोय किंवा इतर लोक आपल्याला आपल्या योग्यतेप्रमाणे मोजत नाही आहेत, आपल्याला योग्य ते स्थान वा मान दिला जात नाही आहे, अशी यामागे भावना असते. तज्ञ म्हणतात की काही प्रमाणात हा आत्मगौरव जरूर असावा, तो उपयोगी असतो – आत्मविश्वास देतो, कार्यशक्ती देतो. होय, पण काही म्हणजे किती प्रमाणात ? काही लोक

म्हणतातच ना की बाबा महत्त्वाकांक्षा, स्पर्धा, द्वेष, सूडभावना, हिंसा हेही सगळे लागणारच जगण्यात जसे प्रेम, मार्दव, संवेदनशीलता, वगैरे. होय, पण म्हणजे किती ? दिसते असे की माणसाला असे सर्व गोष्टींचे प्रमाण ठरवून काही जगता येत नाही. एकूणात जगण्याची बोंबच होत राहते. व्यक्तिगत वा सामूहिक आत्मगौरवाचे रूपांतर शेवटी पूर्वग्रह, द्वेष, हिंसा या दिशेनेच जात राहते. अतिरेकीपणा, नक्षलवाद हे आपण वाईटच म्हणतो पण याच्याही मागे अशी काही न्यूनगंडाची, योग्य सन्मान मिळत नसल्याची – तशा भावनांची कारणे असू शकतील. राजकारणी, लेखक, कवी, कलावंत यांनाही वाटत असते की माझ्या कामाला योग्य स्थान दिले जात नाही आहे. मग तेही टोळ्या करायचे मार्ग अवलंबतात. म्हणजे ज्यांनी समंजसपणा, परिपक्वता यांच्या दिशेने जावे तेच हिंसकपणाच्या दिशेने जातात !

यावर सामूहिक प्रबोधनाने काही मार्ग सापडेल ? आणि करणार कोण हे प्रबोधन ? की प्रत्येक व्यक्तीला स्वत:चे मन समजून घ्यावे लागेल ? या एकूण प्रकाराच्या दोन लिंक्स खाली देत आहे –

https://www.theatlantic.com/.../group-narcissism/620632/...

आणि –

https://getpocket.com/.../11-mental-tricks-to-stop...

हे माणसाच्या जगण्यातले महत्त्वाचे प्रश्न आहेत. की अमुक एका विचारसरणीची सत्ता आली की सगळे आलबेल होणार आहे ?

--- ००० ---

‘ सजग ‘ आणि देशीवाद .

मित्रवर्य सतीश तांबे यांच्या नेतृत्वाखाली ‘ सजग ‘ ची वजनदार वाटचाल चालू आहे, हे खूपच आनंदाचे आहे. या अंकाच्या प्रवासात जुलै-सप्टेंबर २०२१ च्या अंकाची दुसरी आवृत्ती काढावी लागत आहे, हे आजच कळले. ही अर्थातच मराठी साहित्याची शेवटची धुगधुगी ठरणार नाही याची खात्री वाटते. नुसताच क्रिया-प्रतिक्रियांच्या जंजाळात सापडलेला आपला साहित्यविचार अधिक मोकळा होत जाईल अशी आशा बाळगायला बळ देणारी ही घटना आहे.

या अंकात आपले मित्र गणेश कनाटे यांचा ‘ नेमाडेप्रणीत देशीवादाची कालबाह्यता ‘ हा एक अत्यंत अभ्यासपूर्ण असा सविस्तर लेख असून हा लेख साहित्यविचारात नेहमीच मौलिक मानला जाईल यात शंका नाही. नेमाड्यांच्या देशीवादाचा इत्थंभूत धांडोळा आणि झाडाझडती घेणारा असा हा लेख आहे. या लेखामुळे नेमाडपंथीयांच्या डोळ्यांत अंजन पडेल आणि जग त्यांना नव्याने दिसू लागेल, असे वाटते.

या लेखात अंतर्भूत असलेला अभ्यास आणि अनेक संदर्भ आणि त्यांवरच्या चर्चा या अंगाने फार सविस्तर काही मी लिहू शकणार नाही. पण या एकूण प्रकारात गोची कशामुळे होते एवढ्याच विषयावर बोलणार आहे. नेमाडे असोत की देशीवादाची भलावण करणारे रसाळ सर असोत, यांची सगळी भिस्त माणसाच्या प्रभावयुक्ततेवर आणि

प्रभावग्रस्ततेवरही ( conditioning ) असल्याचे दिसते. साहित्य वा कलानिर्मिती म्हणजे कलावंताने आपापल्या प्रभावयुक्ततेतून आपापले जगण्याचे अनुभव मांडत जाणे, असे हे दोघेही गृहीत धरतात. एकूणात बुद्धिप्रामाण्यवादी आणि सध्याचे द ग्रेट पुरोगामी यांचाही हाच घोळ होत असतो. लेखक आणि वाचक दोघेही प्रभावबद्धच फक्त जगू शकत असतील तर कलेतली सर्जकता म्हणजे काय, या प्रश्नाची कुणीच चर्चा करत नाही. नुसतीच प्रभावयुक्तता म्हणजे, मराठी नाटकाप्रमाणे कधी विनोद, कधी सुखदु:खे एवढेच चालू राहते, याकडे कुणी पाहात नाही. आणि अशा मर्यादेतच जर सर्व कलाव्यवहार घडत असेल तर त्याला सांस्कृतिक मूल्यात्मकतेचे अंगडेटोपडे तरी कशाला, हे विचारात घेणे सुचत नाही. शेक्सपियर, बेकेट, पिरांदेल्लो, आयनेस्को वा पेसोआ विचारात घेतले तर त्यांच्या कलेत कोणतेच प्रभावद्रव्य ' आपले ' नसते आणि तरी ते एकूणच मानवजातीला महत्त्वाचे कशामुळे ठरतात, हे विचारात घ्यावेच लागेल. आणि नुसते परदेशी वा परभाषिकच कशाला, इथलेच कलावंत घेतले तरीही सर्वांची प्रभावयुक्तता खूपच भिन्न भिन्न असते – तीही सर्वांची ' आपली ' नसते. त्याचे काय ? प्रभावयुक्तता ही निव्वळ मतमतांतरांच्या मर्यादेत फिरते. तिला मूल्यात्मकता असू शकत नाही. त्यामुळेच मग, जातिव्यवस्था की जातीयता, असली फालतू, निरर्थक मखलाशी करत बसावे लागते. स्त्री-पुरुष समानतेचा विचार करताना स्त्रीला गर्भाशय असते, अशा बालिश मुद्यावर हुशारी करत बसावे लागते. हे असले लोक टीकाकार, समीक्षक म्हणून गाजतात पण आशयाच्या पाण्यात उतरण्याची हिंमत फारशी करत नाहीत, त्याचे कारण म्हणजे हीच मूठ झाकली ठेवण्याची चलाखी, हेच असते. EXISTENCE precedes essense या प्रकाराला हे स्पर्शही करू शकत नाहीत. कारण इसेन्स म्हणजे नंतर जमवलेले अनुभवाचे साठे हेच फक्त त्यांना ' शक्य ' वाटते. कनाट्यांच्या या लेखात वैश्विकतेचा मुद्दा येतो. ती कधी अवतरते कलेत ? यावर जाणिवेच्या भाषेतच फक्त आणि दाखवता येणाऱ्या तार्किक पुराव्याशिवायच बोलावे लागणार. वैश्विकतेची प्रक्रिया असलेल्या मान्यताप्राप्त कलाकृती पाहिल्या तर त्यांचे निर्माते या ना त्या पद्धतीने, प्रभावयुक्ततेतून बाहेर पडण्याचे बोलतात असे दिसून येते. ' परि त्या विश्वंभरे बोलविले', ' परतत्त्वाचा स्पर्श ', गाओ सांगतो तो distanced gaze, वर्डस्वर्थ सांगतो ती tranquility, एलियट सांगतो तो escape from personality या गोष्टींचा विचार न करता गेली ४० वर्षे हे देशीवादाचे दळण दळले जात आहे. त्यातून फक्त काही किरकोळ मखलाशी आणि बहुतांश कचरा निर्मितीच होत आलेली आहे, याचे कारण हेच आहे. कृष्णाने अर्जुनाला कर्तृत्व स्वत:कडे न घेण्याबद्दल सांगणे, जगत असतानाही दु:खातून मुक्त असणे शक्य असते, हे बुद्धाचे सांगणे यांसारखेच सार्त्रच्या ' फ्लाईज ' या नाटकाचे उदाहरणही पाहता येते. भाऊ आणि बहीण दोघे मिळून त्यांच्या आईच्या खुनाची योजना ठरवतात, प्रत्यक्षात भाऊ तलवार खुपसतो पण तो त्या कृत्याच्या प्रभावाच्या बाहेर राहतो आणि बहीण मात्र पश्चात्तापाच्या घोंघावत्या माशांना बळी पडते ! कला वैश्विक होण्याची कारणे अनेक कलाकृतींच्या प्रक्रियांमध्येच दिसू शकतात पण प्रभावयुक्ततेशिवाय काही असूच नाही शकत, हे या संकुचित, मूल्यहीन, आपमतलबी लोकांना गृहीत धरायचे असते.

कनाटे यांचा हा लेख अत्यंत उद्बोधक आणि देशीवादातली हवा घालवणारा आणि या अर्थाने मौल्यवान झालेला आहे. आपले अनेक देशीवादी, बुद्धिप्रामाण्यवादी आणि पुरोगामी यांचा कलानिर्मिती क्षेत्रातला वावर पाहता अनेकदा जाणवणारा हा प्रश्न आहे. जे असेल ते सगळे विचारपद्धतीत, विचाररचनेत आणि अनुभवसाठ्यातच असते, हा भ्रम

त्यांना टिकवायचा असतो ! सर्जकताहीन क्षुद्रपणा चालू ठेवायचा असेल तर तत्त्वज्ञानाचे म्हणावेत असे प्रश्न टाळावेच लागतात !

--- ००० ---

कलाजाणीव

आशय आणि तंत्र एकत्रच असते वगैरे ठीकच आहे, पण, कलाजाणीव हा एक सोयीसाठी स्वतंत्र प्रकार मानायला हरकत नाही. माझी कलाजाणीव समजा वाचन-लेखनातून विकसित होत आलेली आहे. ती जी काय असेल ती विकसित होण्यात वेगवेगळ्या माध्यमांतल्या अनेक कलावंतांची मला मदत झालेली असते -- त्यांचे संस्कारही मी स्वीकारलेले असतात. गेली काही वर्षे, माझ्या कलाजाणीवेला सचेत ठेवण्यासाठी मी आणखी एक विशेष प्रकार करत असतो. नेटवर उत्तमोत्तम चित्रकारांची खास म्हणावीत अशी खूप अमूर्त चित्रे उपलब्ध आहेत. त्यांतले त्या त्या वेळी आवडेल ते एक चित्र निवडून मी ते माझ्या डेस्कटॉप पार्श्वभूमीवर घेत असतो. दर ८-१५ दिवसांनी हे चित्र मी बदलतो. यामुळे, प्रत्येक वेळी संगणकावर काम सुरू करण्यापूर्वी मला या चित्राचे दर्शन होते ! या उपक्रमाचा आपली कलाजाणीव विकसित व्हायला खूप उपयोग होतो ! करून बघा ! प्रत्येक वेळी त्या त्या चित्रातले नवे काही कळते -- खूप रिच वाटते ! बघा तर करून !

--- ००० ---

साहित्य संमेलनाच्या निमित्ताने

डॉ. जयंत नारळीकर हे येत्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष आहेत. त्यांच्या विज्ञान कथा आणि कादंबऱ्या ही त्यांची मराठी साहित्याला विशेष देन आहे. मराठीलाच काय, जगालाही आदर वाटावा अशी काही कामे त्यांनी विज्ञान क्षेत्रात केलेली आहेत. त्यांचे गुरु हॉईल यांच्या समवेत त्यांनी केलेले काम जगन्मान्य झालेले आहे. मोठा दणका ( Big bang ) उपपत्ती रद्द ठरवणे आणि वैश्विक गुरुत्वाकर्षणाच्या क्षेत्रात न्यूटन व आईन्स्टीन यांच्याही पुढची सत्ये उलगडणे, अशी त्यांची अद्वितीय कामगिरी आहे. त्यामुळे, एकूणात, मराठी सारस्वताने ( हा शब्द वापरला म्हणून कृपया रागावू नये, त्यात थोडा उपरोधाचा अंशही आहे ) त्यांना अध्यक्ष म्हणून स्वीकारलेले आहे.
या निमित्ताने काही प्रश्न समोर येतात, त्यांबाबतच्या विचारांसाठी ही पोस्ट आहे. मला स्वत:ला म्हणाल तर या सोहळ्याचे कधीही सोयरसुतक नव्हते आणि अजूनही नाही. त्यामुळे, ना देणे ना घेणे, अशा दृष्टीने मी यावर लिहू शकतो. मीही एक काहीसा लेखक असल्याने मराठीतल्या अशा ‘ सांस्कृतिक ‘ घटना मला दिसणे आणि त्यांबद्दल

काही विचार माझ्या मनात येणे, हे क्षम्य समजता येऊ शकेल. या वेळी, अध्यक्ष म्हणजे नारळीकर, पूर्ण तीन दिवस हजेरी लावणार की मधून मधून ऑन लाइन डोकावणार, असाही विषय चर्चिला गेल्याचे कळते. पण ते पूर्ण तीन दिवस तिथे असणार, हे आता ठरलेले आहे. पण हा प्रश्न निघणे साहजिक होते. ते जरी ८२ वर्षांचे असले तरी त्यांचे अध्यापनाचे आणि संशोधनाचे काम चालू आहे. तीन दिवस, या साहित्य सोहळ्यासाठी ते थांबवावे का, हा प्रश्न महत्त्वाचा आहेच. एरवीही त्यांना असे प्रश्न पडत असणारच. वैज्ञानिक व्यतिरिक्त इतर मराठी वाचनाला कितपत वेळ द्यावा ? आणि थोडक्या वेळात नेमके वाचावे तरी काय ? ही शक्यता लक्षात घेतली तर मराठी साहित्याची सद्यस्थिती आणि एकूणातच इथे महत्त्वाचे काम करून गेलेले लेखक, कवी यांचे वाचन जाऊ द्या, माहिती तरी त्यांना असेल का याची शंका वाटते. या पार्श्वभूमीवर, त्यांच्या अध्यक्षीय भाषणात जर राजन खान, सतीश तांबे, रवी लाखे, प्रेमानंद गज्वी असे उल्लेख आले तर तो एक सुखदाश्चर्याचा मोठा दणका ठरेल, हे नक्की ! ( Big bang ).

हे पाहता, आपापल्या क्षेत्रात अद्वितीय काम केलेल्या आणि मराठीत थोडेफार लेखन केलेल्या कुणाचाही, खरे तर या पदासाठी विचार व्हायला हवा. उदाहरणार्थ, अभिनय क्षेत्र घेतले तर, हंसा वाडकर, दादा कोंडके, प्रभाकर पणशीकर, डॉ. श्रीराम लागू, विजया मेहता यांची आत्मचरित्रे आहेत. ती महत्त्वाचीच आहेत ना ? लेखन किती पानांचे आहे, असा निर्बुद्ध निकष तर आपण स्वीकारणार नाही. याचप्रमाणे, खेळाडू, उद्योगपती, राजकारणी यांचीही आत्मचरित्रे आहेत. त्यांनाही या पदासाठी योग्य समजायला हवे.

साहित्य म्हणजे प्रामुख्याने कथा, कादंबरी, कविता, नाटक वा समीक्षा ही कल्पना सोडून दिली तरी चालू शकते. कळत-नकळत आपला प्रयत्न काय चालू आहे तर साहित्यातल्या एकूण प्रवाहांची, आज साहित्यात काय घडते आहे याची दखल घेणे आणि त्यावर सभान चर्चा, चिंतन होणे, हे बंदच व्हावे. राजकारणाशिवाय साहित्य असू शकत नाही तर राजकारण म्हणजे साहित्यच ठरते. त्यामुळे, ही एक यशस्वी होणारी युक्ती ठरू शकते की थोडेफार काही लिहिलेले इतर क्षेत्रांतले मान्यवरच अध्यक्ष म्हणून निवडत जायचे. याचे फायदे दोन होतील. एक तर त्यांच्या साहित्यबाह्य कामाबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे आणि फुकटच्या, निरुपयोगी साहित्यचर्चा टाळणे वा त्यांना विरामच देणे. मध्येच एखादा बळीचा बकरा म्हणून साहित्याबाबत बोलणारा घ्यावा आणि त्याच्यावर हल्ले करून त्याला नामोहरम करावे. याचाही साहित्यचर्चा संपवायला उपयोग होईल.

आता हे तरी करायची गरज का आहे ? तर एक परिस्थिती समजून घ्यायला हवी. एकूणच मराठीत, सध्या, देशीवाद, बुद्धिप्रामाण्यवाद आणि पुरोगामीपणा यांची चलती आणि प्रभाव आहे. या प्रकारचे लोक सामान्यत: साहित्यातल्या विविध प्रवाहांबद्दल स्वागतशील नसतात. ते आपल्या भूमिका आणि मते यांनी बद्ध असतात. त्यामुळे, जगातले तर जाऊच द्या, इथलेही अनेक प्रकारचे लेखक, कवी ते आत्मीयतेने आणि चिकित्सेने वाचू शकत नाहीत. त्यामुळे, साहित्याचा बराच भाग त्यांच्या आवाक्याबाहेरच राहतो. ते समजून घेण्याचा प्रयत्नही न केल्याने ते काही समजतच नाही. मग, ते तसले सगळे बिनमहत्त्वाचे आणि असंवेदनशील लेखन असते असा कांगावा करत राहावे लागते. त्यांनी कोंबडे झाकले म्हणून सूर्य उगवायचा थांबत नाही. त्यातून मग त्यांना न्यूनगंड येतो आणि ते आक्रमक होतात. त्यांना नको असलेले साहित्य नष्टच व्हावे, असे त्यांना वाटू लागते. आणि तसे प्रयत्न घडत राहतात. लोकशाहीत, अर्थातच, हे स्वीकारावेच लागेल. ज्याने त्याने आपापल्या समजुतीने, आकलनाने काम करत राहणे, हाच एकमेव

मार्ग आहे. तरीही, या अशा पोस्टसारख्या अर्धवट, चुकीच्या पद्धतीने का असे ना, हा सगळा प्रकार आपल्या समोर असणे, विचारात असणे, वाया जाणार नाही, असे वाटते.

--- ००० ---

आकर्षकपणा

सामान्य माणसाचे डोके निकामी करणाऱ्या हजारो घटना रोज घडत असताना त्यात आता ही आणखी एक अजब नवी भर ! आजच्या पुणे मटातल्या दोन एकाच विषयावरच्या बातम्या ! एका बातमीत खासदार शशी थरूर यांचा सहा महिला खासदारांबरोबरचा सेल्फी आहे. त्यावर ट्वीट करताना थरूर त्यांना ' आकर्षक ' म्हणालेत ! याचा अर्थ त्यांनी स्त्रियांचे वस्तूकरण केले असा त्यावर आक्षेप आहे. आता त्याच मटाच्या पुरवणीत दुसरी एक बातमी आहे ती यामी गौतम या अभिनेत्रीबद्दलची आहे. आता लौकरच येणाऱ्या तिच्या ' दसवी ' या चित्रपटात ती जेलरच्या भूमिकेत असणार आहे. तर इथे एक वेगळाच प्रश्न आहे. या पोलिसी भूमिकेतून ती कशी काय लोकांना नेहमीप्रमाणे आकर्षित करणार -- हा तो प्रश्न ! गौतमी म्हणते पहा तर माझे काम ! आधीच कशाला चिंता ? म्हणजे दिसेलच ती आकर्षक, असा तिचा दावा दिसतोय !

या दोन बातम्यांमुळे काही प्रश्न निर्माण होतात, ते असे --

१. स्त्रिया आकर्षक असतात की नसतात ?

२. स्त्रियांचा आकर्षकपणा वगळून फक्त त्यांच्या कामाबद्दलच बोलावे, हे अनेकांना का जमत नसावे ?

३. एखाद्या अभिनेत्रीची ' आकर्षक ' हीच प्रसिद्धी असेल तर तेच तिचे कामही असल्याने तिचे वस्तूकरण व्हायचे राहते का ?

४. स्त्रियांना स्वत:ला त्या आकर्षक वाटणे हा अपमान वाटतो का ?

५. आकर्षकपणाचा मुद्दा कधी येऊच नये यासाठी स्त्रियांना काय करता येईल ?

६. त्यांचा आकर्षकपणा जाणवूच नये यासाठी पुरुषांनी काय करायला हवे ?

७. आणखीही काही प्रश्न आणि त्यांची उत्तरे काय असतील ?

-- नसता डोक्याला खुराक !

--- ००० ---

‘अस्तित्व ‘ आयोजित

कल्पना एक, आविष्कार अनेक – या स्पर्धेसाठी सुचवलेली कल्पना --

‘ हे किरकोळ, ते महत्त्वाचे ‘ ----- २०१३.

प्रमुख पाहुणे वापरतील

निर्भय अभिव्यक्तिस्वातंत्र्य !

वही तो होगी शुरुआत !

साहित्य संमेलनाची सुरुवात -- ही बातमी देताना टीव्ही ९ ने
तिथले मल्लखांबाच्या खेळाचे मनोहारी दृश्य दाखवले !

याची सत्यासत्यता ज्याची त्याने पाहावी -- चर्चा करून हे वा ते एकमेकांना पटवून देण्याचा हा विषय नाही --
1. All political action is divisive.
2. A man who is passionate about the world and the necessity for change, must be free from political activity, religious conformity and tradition - which means, free from the weight of time, free from the burden of the past, free from all the action of will: this is the new human being. This only is the social, psychological, and even the political revolution.
-- JK.

मालमसाला

एकूणच साहित्याचा मालमसाला कोणता ? तर मानवी जगण्यातल्या समस्या, हाच ! एक राजकारणी म्हणाले, खरे तर आम्हीच तुम्हाला भरपूर मालमसाला मिळेल याची तरतूद करत असतो -- तरीही, साहित्यिकांच्या व्यासपीठावर आम्हाला नको म्हणणे हा कृतघ्नपणा आहे ! ( त्यांचे शब्द हेच, असेच नव्हते -- ते सोडा. )
त्यांनी इतके प्रयत्न करूनही जर साहित्याची भरभराट होत नसेल तर तो साहित्यिकांचा करंटेपणा म्हणावा लागेल.
--- ००० ---

रॅगिंग न करण्याचे हमीपत्र ऑनलाइन भरा -- विद्यापीठाच्या प्राचार्यांना सूचना -- ( आजचा पुणे मटा पान ३. )

अध्यक्ष
नुकत्याच झालेल्या साहित्य संमेलनाचे सूप वाजले असले तरी येत्या चारच महिन्यांत होणाऱ्या पुढील साहित्य संमेलनाची दवंडीही पिटली गेलेली आहे. आता, कधी कधी, वृद्धत्वापर्यंत केलेल्या साहित्य सेवेचा मान म्हणून एखाद्याला या संमेलनाचा अध्यक्ष करायची इच्छा होत असे. पण आता, अध्यक्ष हा हिंडताफिरताच असायला हवा, असे एक ठरल्याचे दिसत आहे. त्याचबरोबर, अलीकडेच पडलेल्या पायंड्याप्रमाणे, तो ' योग्य ' राजकीय भूमिकाही मांडणारा असायला हवा, हेही ठरलेले आहे, असे मानायला हरकत नाही. ( तशा भूमिकेच्या अभावी नारळीकरांचे भाषण तसे वायाचे गेले, असे काहींना वाटू शकते. ) ज्या साहित्यात राजकीय भूमिकाच नाही, ते कसले साहित्य

आणि त्या तसल्या साहित्याचे संमेलन तरी कशाला -- हाही विचार मान्य झालेला आहे, असे मानायला हरकत नाही. त्यामुळे, अध्यक्ष ' योग्य ' राजकीय भूमिका मांडणारा असावा, ही झाली दुसरी अट. आता काही लोक पारंपरिक वेडे म्हणावेत असे असतात. त्यांना वाटते की अध्यक्षाने साहित्यावर वा साहित्याच्या एका भागावर तरी थोडे बोलावे. साहित्य म्हणजे राजकारणच असले तरी साहित्य हे साहित्यही असते, यालाही, थोडी तरी मान्यता असावी. ही अट जर मान्य झाली तर तशा अध्यक्षाला तयारीसाठी किमान तीन महिने तरी देणे हे उचित होईल. तर, सारांशरूपाने, हिंडताफिरता असणे, भूमिकावाला असणे आणि साहित्याबाबतही, जाता जाता का असे ना, बोलणारा असला पाहिजे -- या तीनही अटी पाळू शकणारे कोण कोण सुचताहेत ? की, हिंडताफिरता असणे आणि साहित्याबाबत बोलणारा असणे, या दोनच अटी बास होतील ? आपापली मते आणि अपेक्षित अटी पाळून अध्यक्षपद कोण भूषवू शकेल त्यांची नावे सुचवावीत. रागलोभ, चिडचिड न करता, शांतपणे हे काम होऊ शकले तर संभाव्य अध्यक्ष समोर दिसू लागल्याने, लगेचच येणाऱ्या या उत्सवाच्या आनंदाला सुरुवात करता येईल. खुलेपणाने नावे सुचवावीत.

आता, माझा आणि संमेलनाचा काय संबंध -- मी का ही उठाठेव करावी, हा प्रश्न योग्यच आहे, पण, आपलाच एक मराठी बांधव म्हणून एवढे चालवून घ्यावे, ही विनंती.

--- ००० ---

उदास गाणी

जे का रंजले गांजले – हे लिहिणारा तुकाराम काही एखादा पंडित वा प्रयोगशाळेत प्रयोग करून सिद्धांत सांगणारा माणूस नव्हता. माणसाच्या मनाचे सखोल उत्खनन करणे आणि उलट प्रक्रियेने बाहेरून पूर्ण मन पाहणे हे त्याला त्याच्या चिंतानातून साध्य झालेले होते. Empathy या शब्दाला नेमका मराठी शब्द वापरात नाही. मला सापडलेला ‘ समानुभूती ‘ हा शब्द मला योग्य वाटतो. किंवा मग ‘ संवेदनशीलता ‘ आहेच. दु:ख वा औदासीन्य यांच्या कल्पनेने घेतलेल्या अनुभवानेही मेंदूत आरोग्यकारक आणि सर्जक क्रिया घडतात, असे संशोधन आहे. शोकांतिका पाहून जगण्यात विरेचन ( catharsis ) ही क्रिया घडते असे अरिस्टॉटल म्हणून गेला. त्यातून एक प्रकारची प्रगल्भता येते, अशी ती मांडणी होती. अलीकडच्या काळात झालेले संगीतविषयक संशोधन हेच सांगते आहे. आपण उदास गाणी का ऐकतो, विशेषत: आपल्या तरुणपणातली आपली आवडती उदास गाणी आपल्या मेंदूत काय घडवतात यावर संशोधन झालेले आहे. अशी गाणी मेंदूची कल्पनाशक्ती आणि सर्जकता वाढवतात कारण अशा गाण्यांमुळे मेंदूतल्या आंतरजोडण्या अधिक सक्षम होतात आणि मेंदूत आरोग्यकारक रसायने उद्दीपित होतात, असे दिसून आलेले आहे. संगीत म्हणजे नुसते लिखित गीत नव्हे तर त्याची चाल, वाद्यमेळ, गायकाचा चिंतनशीलतायुक्त आवाज, हे सगळेच असते. त्यामुळे, इथे एक लक्षात घ्यावे लागते की मंगेश पाडगावकर, ग. दि. माडगूळकर, शांता शेळके, सुरेश भट, जगदीश खेबुडकर, गुरू ठाकूर, वैभव जोशी, संदीप खरे – हे गीतकारही मराठी लोकांचे आरोग्य जोपासत आलेले आहेत. हिंदी चित्रपट संगीताची इथली वर्षानुवर्षांची लोकप्रियताही हेच

काम करत आलेली आहे. संगीताचा हा अप्रत्यक्ष गुण आपल्या अवधानात नसतो, पण, ही एक अत्यंत महत्त्वाची बाब आहे. संगीत खिन्नता घालवू शकते, काळजी आणि वेदनाही कमी करू शकते, असे संशोधन आहे. ' साथी न कोई मंजिल ', ' कोई हमदम न रहा ', ' अकेला हूं मै ', ' सौ बार जनम लेंगे ' वगैरे पूर्वी आपल्याला आवडून गेलेली आणि आता ऐकताना तो काळ मनात जिवंत करणारी गाणी अशा बाबतीत विशेष कार्यक्षम असतात. ज्यांना शास्त्रीय संगीत समजते आणि आवडते ते तर या बाबतीत श्रीमंतच म्हणायला हवेत.

सगळेच संगीत असे हितकारक असते, असे नाही. कानठळ्या बसवणारे, क्रोध-संताप व्यक्त करणारे, आक्रमक वा हिंसक संगीत जगण्यात असे अर्थपूर्ण तर नाहीच ठरत, पण, अहितकारक ठरते. मानवी जगणे बिघडवणारे, सौहार्द नष्ट करणारे ठरते. इथे हेही लक्षात घ्यायला हवे की संगीत-शत्रू असणे ही काही फारशी भूषणावह बाब नाही. तसे असणे म्हणजे स्वत:च्या जगण्यातली समृद्धी कमी करून घेणे तर आहेच, पण, नीट, मानवी जगण्याच्या शक्यताही घालवून घेणे आहे. महाराष्ट्रात संतवाङमय , कीर्तने, भजने, लोकगीते ही दिलासा देण्याबरोबरच आरोग्याचेही काम करत आलेली आहेत, हे लक्षात घ्यायला हवे.

कला म्हणजे नुसतीच करमणूक वा टाईमपास नव्हे. इतरांची सुखदु:खे ही आपली सर्वांची सुखदु:खे आहेत याची जाणीव आणि समज कला देत असते. धर्म, तत्त्वज्ञान आणि विचारसरण्या माणसाचे भले करण्यात फेल गेलेल्या आहेत – अपयशी झालेल्या आहेत. आता विविध कलांचे अस्तित्व हीच फक्त आशा आहे. कला क्षेत्रातल्या सर्व शक्यता ओपन – खुल्या ठेवणे आणि कलेतल्या समावेशकतेचे महत्त्व ओळखणे – समजणे, हे फार महत्त्वाचे आहे. तीच, तेवढीच फक्त आता मानवी जगण्यात मौलिकता येण्याची आणि सतत प्रवाही राहण्याची शक्यता आहे.

--- ००० ---

गणेश ह.दिघे

Decemube08ari7 om1n10g0o,3 02021 •

आज संध्याकाळी माझे विद्यार्थी , Champra Deshpande आणि Premanand Gajvee या दोन "महान" मराठी नाटककारांच्या नाटकांचे नाट्यवाचन " रंगशाळे"त करणार आहोत. व्हिडीओ फक्त मागेल त्यालाच पाठवील. बाकी नाटककारांना "मानधन" हवे असेल तर मी काय देतो हे तुम्ही जाणताच. 😊

गरीब झालोय. गुलाबाचे एक फुल एवढेच मानधन आगामी सहा महिन्यात देऊ शकतो.

गणेश ह.दिघे

Deucethmbe0cptr o10hfrt, 200215 •

Champra Deshpande गेले तीन दिवस रंगशाळेत " ढोलताशे " वाजताहेत सर. मुलांना तुम्हाला भेटायचे आहे. तुमच्या सवडीने वेळ द्या, तुम्ही नाटक "कसे "लिहिता याची प्रचंड उत्सुकता आहे मुलांना. तुमच्या तिरकस भाषेचे आणि कठोर रंगसंवादाचे चाहती आहेत माझी मुले.
Girish Patke आणि Nisarg Deshmukh तुम्ही सरांची मुलाखत घ्यावी अशी इच्छा आहे.
सध्या रंगशाळेची आर्थिकस्थिती मानधन देण्याइतकीही नाही ☹ याल ?
प्रबुध्द विचारधारेतील महान आणि आदरणीय नाटककार Premanand Gajvee सर, तुम्हाला वेळ असेल तेव्हा याल रंगशाळेत? " आंबेडकरी नाट्यलेखन कार्यशाळा " घेतोय. या विषयावर महाराष्ट्रात तुम्हाला पर्याय नाही. सध्या माझीच आर्थिक स्थीती अत्यंत खराब आहे,मी मानधन देऊ शकणार नाही.माझ्या मुलांना तुम्हाला ऐकायचे आहे, तुमची मुलाखत मी किंवा टेक्सासदादा घेईल. याल ?
( जाहीर पोस्ट टाकायचे कारण एवढेच की "काही" नाटकं करता येत नाहीत )

टेलर्स

जळगाव जिल्ह्यातल्या लोहारा या गावी असताना माझा जो टेलर होता त्याचे नाव होते दिलखुश टेलर्स. बालपण आजारपणात करपून गेलेला मी माणूस. त्या पार्श्वभूमीवर माझ्या आयुष्यातला सगळ्यात मोठा विनोद त्याने केला होता. बरेचसे दणदणीत शेतकरी असलेल्या त्या गावात त्याच्या मते तीन उत्तम तब्येतीची माणसे होती – त्यांत मी एक होतो ! डोळ्यांत आनंदाश्रू यावेत असा विनोद ! अर्थात तोवर माझी तब्येत खरेच चांगली झालेली होती म्हणा. माझी मुले शिकायला मुंबईत असूनही त्यांचेही कपडे इथेच शिवले जात. एखाद्या वेळी उशीर झाला तर सकाळी सहाची लाल परी सुटायच्या आत तो कपडे तिथे स्टँडवर आणून देई ! आज हा खरे तर नंतर आठवला – याच्या आधी आठवला तो कोल्हापूरचा बॉम्बे टेलर्स ! तो एका पायाने अधू होता. बिंदू चौकातून खाली लक्ष्मीपुरीकडे जाताना त्याचे दुकान होते. अत्यंत प्रेमळ माणूस ! " आपण ही अशी करू या तुमची कॉलर – " असे तो म्हणे. माझ्या शर्टात जणू त्याला प्राणपणाने इंटरेस्ट होते ! किंवा जणू तो शर्ट आम्ही दोघे आलटून पालटून वापरणार होतो ! चांगले आत्मीयतेने वागणारी माणसे वर्षानुवर्षे असंख्य मनांतून कशी जगत असतात, याचे हे एक उदाहरण !
आज टेलर याच विषयाने माझे मन गजबजून टाकायला तसेच कारण घडले. शर्टाचा साईज मला ४२ घट्ट होतो आणि ४४ दुसऱ्या कुणाचा तरी उधार आणल्यासारखा मोठा होतो. यावर, मुलगा म्हणाला की बाबा, आज तुम्हाला एक वेगळाच टेलर दाखवतो. तुमची मापे इथे घेणार आणि मग तुम्ही निवडाल त्या कापडाचा शर्ट तुम्हाला मुंबईहून शिवून घरपोच येणार. रेडीमेडचा बाप म्हणावा असा असतो तो शर्ट ! म्हणून मग मी, मुलगा आणि माझी धाकटी नात, जिचा सल्ला आम्ही सगळेच ऐकतो, असे तिघेजण गेलो. आमच्या घरापासून बरेच लांब. कोरेगाव पार्कला. याच्याही दुकानाचे नाव ' बॉम्बे शर्ट कंपनी '. एका मोठ्या आलीशान हॉलमध्ये हे दुकान आहे. तो परिसर आणि हे दुकान एकदम शांत. पुस्तकांप्रमाणे बाईंड केलेले कापडांचे नमूने होते. त्यांतले, विशेषत: नातीच्या सल्ल्याने एक निवडले. त्या टेलरने अत्यंत सौजन्यशील बोलत आदबशीरपणे, बारकाईने मापे घेतली. " तुम्हाला ही बटणांची नको

कॉलर, ही बिनाबटणांची अशी घेऊ या – " तो म्हणाला. " आणि ही बटणे बघा – ही परफेक्ट होतील ! " म्हटले होय, मान्य ! च्यायला, हा बॉम्बे म्हणजे त्या कोल्हापूरच्या बाँबेचा भाऊच दिसतोय, माझ्या मनात आले. मग सगळे, माझे नाव, पत्ता, फोन, ईमेल, वगैरे झाले. लगेच ती सर्व नोंद मला मेसेजमध्ये आली. यापुढे, तुम्ही नुसते कापड आणि हा तुमचा नंबर कळवलेत की आठ दिवसांत शर्ट तुमच्या घरी पोचेल, तो म्हणाला. त्यानंतर असाच सगळा कार्यक्रम माझ्या मुलाच्या बाबतीतही झाला. मध्येच त्याने बिसलेरीच्या बाटल्याही दिल्या. तो एकटाच होता दुकानात.

डॉक्टर्स, इंजिनियर्स, आर्किटेक्टस किंवा मोठमोठे व्यापारी किंवा कारखानदार हे आपापल्या क्षेत्रात स्पेशलच असतात, हे आदरासह माहीत होते. पण यात टेलर या व्यक्तीचा समावेश करावा लागेल, असे कधीच वाटले नव्हते. अत्यंत शांत, सौजन्यपूर्ण आणि अत्यंत ब्रिलियंट माणूस ! कापडांचे प्रकार, शिलाईचे दोरे, ते कधी वेगळ्या रंगांचे असावेत, यापासून ते कोणत्या प्रसंगी कसे कपडे हवेत याची जणू त्याने डॉक्टरेटच घेतलेली असावी, असे वाटले ! त्याच्या दुकानात गर्दी नसते. एकेकदा मापे देऊन गेलेली अशी बांधलेली गिर्हाइके. आम्ही इथे कुठे आलोय असे वाटावे अशी सगळी थोर मंडळी. त्याने नावेही सांगितली, ती इथे नाही सांगत. लाखभर रुपयांचा शर्टही त्याच्याकडून मिळू शकतो ! आम्हालाही त्याने त्याच इज्जतीची वागणूक दिली ! माझ्या चेहऱ्यावर दिसणाऱ्या मराठी लेखकाच्या तेजाचा तो परिणाम असावा ! नाही, नाही, तोच एक चांगला माणूस आहे, त्यामुळेच !

--- ००० ---

## माझ्या कविता

माझ्या कवितांचा आशय एकच असला तरी त्या कविता मात्र असंख्य प्रकारच्या असतात. माझी अमुक एक अशी ठरलेली शैली नाही. या अर्थाने कविता हे एकच माध्यम नसून कवितेची अनेक माध्यमे माझी कविता वापरते. आशयाची स्पष्टता असल्याने कशातूनही, कुठूनही कविता सुरू होते आणि अनपेक्षित आकार घेत जाते. ही स्पष्टता वैचारिक नसते. विचाराच्या मर्यादा, अपुरेपणा, निरुपयोगीपणा आणि त्याची विध्वंसकताही दाखवणारी असते. त्यामुळे प्रत्येक कविता तशी जरा हाताबाहेरच राहते. तरीही, मी लिहीत असलेल्या कवितांचे प्रकार असे सांगता येतात -- सुबोध, दुर्बोध, काव्यमय कविता, गद्य कविता, काव्यमय गद्य, प्रतिमांची कविता, प्रतिमाहीन कविता, अब्सर्ड, अतिवास्तववादी, अस्तित्ववादी, अमूर्त, निरर्थक, भाषेचा गौरव करणारी, भाषेचा नाश करणारी, गंभीर, विनोदी, उपरोधिक, विसंगतींचे दर्शन घडवणारी, चित्रमय, चित्रहीन, वगैरे. असे असले तरी, माझी कविता कशी नसते तेही सांगायला हवे -- ती एक मूड गिरवत गुंग करणारी नसते, संगीत लयीचा वापर ती फारसा करत नाही, ती एखाद्या अनुभवाचा प्रत्यय देणारी नसते, रूटीन सुखदु:खांचे सामान वापरत हसू वा रडू निर्माण करण्यात तिला रस नसतो, ती कोणत्याही व्यावहारिक कृतीला प्रवृत्त करत नाही, वगैरे. मग असते तरी काय ती ? तर मुख्यत: ती वैचारिक अर्थ लावण्याची सवय मोडणारी असते. माहितीच्या क्षेत्रात मावणारी नसते. असे तरी का, तर, मानवी

समस्यांची मुळे पाहणे हे तिचे काम असते, म्हणून. समस्या समजण्याचा क्षण ही एकमेव अशी चाकोरीतून बाहेर पडण्याची शक्यता असते, म्हणूनही. थोडक्यात, ती कोणतीही वैचारिक चाकोरी वा दिशा स्वीकारणारी नसते. इतक्या प्रकारची कविता असल्यामुळे, सगळ्याच कविता सगळ्याच वाचकांना पोचल्या नाहीत तरी अनेक कविता खूप वाचकांना पोचू शकतात. या अर्थाने, कवितेचे प्रेम टिकवणे आणि वाढवणे, ही कामेही या कविता करत असतात. अर्थात, यात माझा दावा असा कुठलाच नाही. कारण, कोणतेही श्रेय मिळवण्यासाठी नसतातच या कविता. सतत काही ना काही मिळवण्याचे जगणेच प्रश्नांकित करणाऱ्या या कविता स्वत: कशी कुठली इच्छा वा हाव बाळगू शकतील, कोणते उद्दिष्ट ठरवू शकतील ?

कविता ही शब्दांत वा ओळींत नसून समोर दिसणाऱ्या घाटाच्या बाहेर असते आणि तेच वाचकाला जाणवावे यासाठीचे, माझ्या कुवतीतले कौशल्य ही कविता वापरते.

--- ००० ---

## कॉलेज प्रवेश आणि सल्लामसलतींचे महापूर

तुम्हाला पहिल्या राऊंडमध्ये मिळालेले मेकॅनिकलच ठेवा, ते कॉलेज दर्जेदार आहे -- पण मेकॅनिकल ला नोकऱ्या कमी पगाराच्या  मिळतात -- अहो, सध्या सी एस च्या मागे पळताहेत सगळे पण चार वर्षांनंतर बाहेर पडणाऱ्या या सगळ्यांना थोड्याच मोठ्या नोकऱ्या मिळणार आहेत -- दुसऱ्या फेरीत तुम्ही सी एस, आय टी , आणि इ एन टी सी यासाठी जरा कमी नावाजलेली कॉलेजेस दिलीत तरी योग्य होईल -- देणगी देऊन त्या कॉलेजात सी एस घेण्यात काही अर्थ नाही -- खेळ वा नाटकबिटक यांत इंटरेस्ट असेल तर उपस्थितीच्या बाबतीत खूप कडक नसलेली बघा कॉलेजेस --खाजगी कॉलेजांत फी जास्त असते पण मोकळीक जरा जास्त मिळते -- नाही तरी हे करता करता ते करावेच लागते मग हे काय वाईट आहे -- नुसते बी इ ला कुणी विचारत नाही हो -- पुण्याबाहेरचे ऑप्शन्स नाहीतच का -- आणि मुलाखतींना कुठे कुठल्या कंपन्या येतात त्याला फार नका महत्त्व देऊ -- आमच्या माहितीतली एक मुलगी साध्या या कॉलेजातून मेकॅनिकल होऊन सरळ  थेट बोईंगमध्ये लागली नोकरीला -- पण या स्वायत्त कॉलेजात सी एस मिळत असेल तर सोडू नका संधी -- अहो नशीब वेगळेच चालते -- माझ्या माहितीत दोन मित्र बी इ झाले आणि धंदा पोल्ट्री फार्मचा करतात -- दूसरा राऊंड हा बेटरमेन्टचा म्हणजे अधिक चांगली शक्यता निवडण्याचा असतो, हे लक्षात ठेवा -- म्हणजेच यात असेच पर्याय मागा की ज्यातले काहीही मिळाले तरी सध्या मिळालेल्याचा त्याग करायची तयारी आहे -- पुढच्या सहा वर्षांचे प्लॅनिंग हवे -- जग इतके अस्थिर झालेय -- आणि आर्टिफिशियल इंटेलिजेन्स चे प्रस्थ वाढत जाणार आहे -- तेव्हा सगळे चित्रच पालटत जाईल --

हे फक्त इंजिनियरिंगचे -- आणखी खूप आहेत अभ्यासक्रम -- खूप, असंख्य सल्ले, हितचिंतकांचे तळमळीचे शब्द यांचे महापूर येत राहतील -- निर्णय एका मार्गानेच शक्य आहे -- आणि तोही तुम्हाला हवे तेच मिळण्यात यशस्वी होईलच असे नाही -- आणि तुम्हाला जे हवेसे वाटतेय ते बरोबर वा योग्यच ठरेल असेही नाही -- जगणे समजायला याहून आदर्श अशी कोणती असू शकेल समस्या ?

--- ००० ---

एवढे काय असेल

झी बिझिनेस वर आजच सकाळी एक बाटली आणि तिचे आवरण खोके दाखवले गेले. आसाम दिब्रुगढ चहा चे ! ती एक किलो चहाची होती बाटली. किंमत ऐकून उडाल दहा फूट ! आदरातिथ्याचे, प्रेमाचे, सद्भावनेचे माध्यम म्हणून वापरले जाणारे चहा इतके लोकप्रिय पेय नाही. कारण चहा परवडायलाही बरा असतो ! शिवाय जरा तरतरी आणतो, ते वेगळेच. म्हणून तर गरिबापासून श्रीमंतापर्यंत हा एक कायमस्वरूपी स्नेहाचे प्रतीक म्हणून अढळ स्थानावर आहे. पण, हा काही वेगळाच दिसतोय प्रकार ! या चहाची किंमत आहे एक लाख रुपये किलो ! च्यायला, एवढे काय असेल यात ? तीव्र वा सौम्य किक देणारी दारू वा इतर कोणतेही द्रव्य आपण समजू शकतो -- पण, चहा ? हे शोभून नाही दिसत. त्या चॅनेलवर या चहाची वैशिष्ट्ये काही सांगितली गेली नाहीत. मला तर कल्पनेनेही ती कळू शकत नाहीत. आपल्याला अमृततुल्य असतो माहीत, पण, हे साक्षात अमृतच असेल की काय ? मला कदाचित जरा अज्ञानामुळेही हे प्रश्न पडत असतील. पण, इतर कुणी याबाबत काही सांगू शकेल काय ? एक तर वास्तव माहिती वा काल्पनिकही चालेल. एवढे काय असेल यात ? ( नेटवर मिळणाऱ्या माहितीप्रमाणे, हा चहा एका वेगळ्याच क्लोनपासून मिळतो, याचे उत्पादन बरेच खर्चिक आणि अवघड आहे , वगैरे. ते ठीक हो, पण आहे काय एवढे विशेष यात, ते सांगा ना -- )

--- ००० ---

( नक्की आठवत नाही, पण, ) जीएंच्या ' तुती ' या कथेतली आई तिच्या मुलाला म्हणते, " तू बाकी काही हो न हो पण दगड मात्र नक्की हो ! " याचप्रमाणे, विंदांची ' माझ्या मना बन दगड ' आहेच माहिती आपल्याला. या दोन महान कलावंतांच्या या अभिव्यक्तींवरून आपल्याला या एकूण विवेकी महाराष्ट्राच्या जगण्याचा स्तर अंतर्यामी माहीत असतोच. आता आले सांताक्लॉजचे दिवस ! खूप सांताक्लॉज आपापली कामे करून जातील, पण शेवटी त्याच टोपीतला तोच सांता ग्रेट ठरेल जो एखाद्या विद्वान मुलाच्या हातात अध्यक्षपदाचे खेळणे देऊन जाईल ! बाकी काही जमो न जमो, असा सांता व्हायला जमले पाहिजे !

समन्वय

१. बैलगाडा शर्यतींसाठी बैलांना खास तयार केले जाते, त्यांना उत्तम पोषक आहार दिला जातो, पैलवानांसारखी त्यांची बडदास्त ठेवली जाते. अशा तंदुरुस्त बैलांची पैदास व्हावी म्हणून गायींनाही छान पोसले जाते. त्यामुळे, अशा शर्यती कायद्याने बंद करणे म्हणजे गायीबैलांवर अन्याय करणे आहे.

२. या शर्यतींच्या जल्लोषासाठी बैलांचे हाल केले जातात, त्यांचा छळ केला जातो. दारू पाजून त्यांना त्यांच्या नैसर्गिक कुवतीच्या बाहेर पळवले जाते. मुळात बैल हा प्राणी अशा शर्यतींसाठी योग्यच नाही आहे. बैलांवर स्वत:च्या करमणुकीसाठी असे अन्याय करणे हा भयानक क्रूरपणा आहे.
३. या दोन्ही बाजूंचा आणि न्यायालयाचाही मान राखणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी समन्वयाचा मार्ग -- उपाय हा असा करता येईल -- बैलांना पोषक आहार वगैरे चालूच ठेवायचे, वाटल्यास, त्यांना आवडत असल्यास त्या समारोहात त्यांना दारूही पाजायची. पण, शर्यत नाही लावायची. ही शर्यत आहे, असे सांगून त्यांच्यावर दडपण आणायचे नाही. त्यांना रमतगमत, गप्पा मारत चालू द्यायचे. त्यात, त्यांनाही नकळत जी बैलजोडी पहिली येईल तिच्या मालकाला द्यायचे बक्षीस !
माणूस ज्या समस्या निर्माण करतो त्या बटाटा आणि पतंग यांच्या असतात. दोन्हींचा काही संबंधच नसतो. त्यांची तुलनाही नाही होऊ शकत. बैलांना चांगले पोसणे आणि त्यांचा छळ करणे हे दोन विभागच वेगळे आहेत ! त्यांच्यांतून समन्वयाचा मार्ग काढणे म्हणजेच absurdity -- मिथ्यानाट्य वा मूर्षानाट्य ! मानवी बुद्धी असे असंख्य चमत्कार करत जीवन नाट्यमय करत असते !
😀😀
--- ००० ---

God is dead. Marx is dead. And I don’t feel so well myself.
-- Eugene Ionesko.

## इहवाद आणि कला

इहवाद म्हणजे जे इंद्रियगम्य आणि तर्काधिष्ठित आहे तेच सत्य मानणे. इहवाद म्हणजे बुद्धिप्रामाण्यवाद, वैज्ञानिक दृष्टिकोण, नास्तिकता. परलोक, स्वर्ग-नरक, पुनर्जन्म, मोक्ष-मुक्ती वगैरे न मानणे. श्रद्धा, भक्ती, नियती असले सर्व नाकारणे. याच्या उलट समजा भक्तिमार्गी वा आस्तिक असतात. पण अशा या दोन प्रकारांत – त्यांच्या जगण्यात मूलभूत असा काही फरक असतो का ? दोन्ही प्रकारची माणसे दु:ख भोगणारी, महत्त्वाकांक्षी, भीतिग्रस्त, वर्चस्ववादी, हिंसक, प्रेमळ, क्रूर, युद्धखोर, वगैरे असलेली दिसतात. दोन्ही प्रकारांत अलगता आणि अस्मिता यांचा प्रभाव दिसतो. एक म्हणतो, देव योग्य तेच करतो, दुसरा म्हणतो, ‘ माणसा माणसा माणूस हो ! ‘ दोघांचीही मने सारखीच विदीर्ण, वखवखलेली, सूडाने पेटलेली आणि अमानुष असतात. त्यामुळे, दोघांपैकी कुणीही, आपण फार शहाणे, शूर, श्रेय समजणारे, विशाल समजुतीचे आहोत, असा भ्रम बाळगायचे कारण नाही. धर्म, तत्त्वज्ञान, विचारसरण्या हे सगळे माणसाच्या भल्याच्या बाबतीत अपयशी ठरलेले आहेत. आणि आता आशा बाळगावी असे एकच क्षेत्र उपलब्ध आहे,

ते म्हणजे कलेचे. मानवी जगण्यात काही मूल्यात्मता असू शकते का याचा शोध फक्त कलेतूनच घेतला जाण्याची शक्यता आहे. सर्जकता, स्वातंत्र्य, दु:खमुक्ती ही जर मूल्यात्मता मानली तर कलेबद्दल काय बोलता येईल ? माणसाच्या जगण्यात मूल्यात्मता नसण्याची कारणे कोणती ? प्रभावयुक्त असणे, अलगता, अस्मिता, अस्थिरतेची-अनिश्चिततेची भीती, वर्चस्वाची इच्छा – हीच. ही कारणे तर इहवादाची व्यवच्छेदक लक्षणे आहेत. असे असूनही तेच अगदी पोटतिडिकीने समता, बंधुत्व, स्वातंत्र्य यांचा जयघोष करत असतात. माणसाच्या मेंदूची कुवत आणि त्याची परिस्थितीसापेक्षता – हा तर इहवादाचा पायाच म्हणावा लागेल. कारण, जे आहे त्यातून मुक्ती हा विषयच वर्ज्य आहे. बुद्धाची निर्वाण कल्पना ही मरणोत्तर मिळणारे रत्न-पारितोषिक नाही. ते जिवंतपणी, याच आयुष्यात असणारे मूल्य आहे. इथे हेही लक्षात घ्यायला हवे की मूल्यात्मता ही धर्मातली वेगळी, वैचारिक वेगळी आणि कलेतली वेगळी, असे असू शकत नाही. ती एकच असते – असावी लागते. ती म्हणजे ‘ स्वनिरपेक्ष समावेशकता ‘ हीच फक्त असू शकते. फक्त विचाराच्याच क्षेत्रात जगणारे आस्तिक असोत की नास्तिक, दोघेही ती नाकारत असतात. स्वत:ला इहवादी म्हणवणारे तर ती अधिक शूरपणे आणि कट्टरपणे नाकारत असतात. आणि त्यात ते नुसते आत्मतुष्टच नाही तर दुरभिमानी आणि आक्रमक जगत असतात. इहवाद्यांमध्ये या बाबतीत जराही लवचिकपणा असू शकत नाही. ‘ इतर लोकांना ‘ दु:खमुक्ती वा स्वातंत्र्य यांच्या शक्यता तरी मान्य असल्याने ते अधिक लवचिक असू शकतात. त्यामुळे, कलेतून जर असे समावेशक भान व्यक्त होत असेल तर ते स्वीकारू शकतात. टी. एस. एलियटने स्वमुक्ती म्हणणे, वर्डस्वर्थने शांततेतली स्मृती म्हणणे, गाओने दुरून अवलोकन म्हणणे यांतून त्याच मूल्यात्मतेचा निर्देश होतो, हे इथे समजून घ्यायला हवे. तुकाराम जेव्हा म्हणतो की हे माझे नाहीत शब्द – परि त्या विश्वंभरे बोलविले, किंवा ज्ञानेश्वरांनी सांगितलेला परतत्त्वाचा स्पर्श – हे सगळे तेच आहे.

त्यामुळे, संतांची कविता ही तिच्यातला दु:खमुक्तीचा आशय सोडून नुसती कविता म्हणून पाहू, असे म्हणणे हे जगण्यातलीच मूल्यात्मता नाकारणे असते, हे नीट पाहायला हवे. हे सर्व पाहता, इथे असे म्हणायचे आहे की इहवादी कला असे काही असेल तर ती कला मूल्यात्म असणे शक्यच नाही. मुळात इहवादच मूल्यात्म असणे शक्य नाही. इहवादाचा आणि मूल्यात्म कलेचा काही संबंधच नाही असू शकत. कलेच्या क्षेत्रात ते उपरे आणि फुकटचा टेंभा मिरवणारे लोक असतात. माणुसकीच्या, समतेच्या निरर्थक गप्पा मारत काळ व्यतीत करणारे ते आळशी, डल लोक असतात. कलाक्षेत्र जेव्हा अशा लोकांच्या ताब्यात जाते तेव्हा मूल्यात्मतेची वेगाने वाट लागत राहते आणि ते लोक जी शाब्दिक रूपातली मूल्ये मानत असतात ती अधिकाधिक दुरावत जातात, यात शंकाच नाही.

--- ००० ---

कादंबरी

त्या त्या काळाचा दस्तावेज तयार करण्याचे कामही कादंबरी करत असते, असे मानलेही जाते आणि काहींची तशी अपेक्षाही असते. आता काळाचे दस्तावेज तयार होण्याचे अनेक मार्ग आणि साधने अस्तित्वात आहेत. हे पाहता, आता, कादंबरीच्या दस्तावेजाचे कितपत महत्त्व आहे ?

काल माझी नात चि. दुर्गा ( मुलीची मुलगी ) हिचा विवाहसोहळा पुण्यात संपन्न झाला ! ती तिच्या सासरी नागपूरला रवाना झाली !

९५ व्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून भारत सासणे या आपल्या उत्तम कथाकाराची निवड ! मन:पूर्वक स्वागत !

प्रकाश बुद्धिसागर

राजेश देशपांडे यांच्या पोस्टमुळे समजले -- आज प्रकाश बुद्धिसागर या मराठीतल्या एका ग्रेट दिग्दर्शकाचा वाढदिवस आहे ! माझा जिगरी दोस्त ! विनोदसम्राट नट असतात तसा हा विनोदसम्राट दिग्दर्शक ! मराठी नाट्यसृष्टीत माझी प्राणप्रतिष्ठापना याने आणि विनायक पडवळने केली ! प्रकाशने बसवलेली माझी ' नातं ' ही एकांकिका ८५ स्पर्धकांत पहिली आली होती ! शिवाय त्याने, ' उत्सव ', ' दिनकर पुरोहितचा खून ', ' पोत्यातून गोत्यात ', ' संसाराणूपेंडघार ' या माझ्या संहिता रंगभूमीवर आणल्या ! प्रकाशला माझ्या खूप खूप शुभेच्छा !

कोरोनामुळे पति-पत्नी अधिक जवळ आल्याने आपण एकत्र नाही राहू शकत हे त्यांना कळले -- त्यामुळे सहसंमतीेचे घरस्फोट वाढले ! ( आजचा मटा )

९५ व्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष
भारत सासणे

आम्ही मराठी लेखक खूप समंजस असतो. बऱ्याचदा आम्ही मित्रही असतो पण आम्ही एकमेकांचे काहीही वाचलेले नसते. नोकरी-धंदा सांभाळत, कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडत आम्ही जमेल तसे वाचत-लिहीत आलेले असतो. बऱ्याच जणांच्या हातून बरेच लिहून होते याचे मुख्य कारण असते पॅशन – आच. हे सांगायचे कारण म्हणजे आताचे साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष भारत सासणे. त्यांचा, ‘ लाल फुलांचं झाड ‘ हा कथासंग्रह मी वाचला होता. तो माझ्या संग्रहीही आहे. ही पोस्ट लिहिण्यापूर्वी तो मी पुन्हा एकदा वाचला. शिवाय, निरनिराळ्या दिवाळी अंकांतून त्यांच्या काही कथा मी वाचलेल्या होत्या आणि त्या मला खूपच आवडलेल्या होत्या. वास्तवाला हवे तसे रूप देत, सत्य आणि कल्पित यांचे अजब रसायन तयार करणारा हा लेखक आहे. त्यांचे अलिकडचे संग्रह वा कादंबऱ्याही खूप महत्त्वाच्या आहेत, असे कळले. पण, आता मी खूपच कमी वाचतो आणि जमेल तेवढे लिहितो. त्यामुळे, जगात वाचण्यासारखे खूप आहे पण इलाज नाही, अशी एक समंजस शहाणीव मी बाळगून असतो. ( २००३ साली मला महाराष्ट्र फौंडेशन पुरस्कार मिळाला होता, तेव्हा त्यांनाही तो मिळाला होता. त्या वेळी थोडी ओळखही झाली होती.

विशेष म्हणजे त्या वेळी मुंबईच्या कांदिवलीतून पुरस्कार विजेत्या लेखकांची मिरवणूक काढण्यात आली होती. पूर्ण कार्यक्रमासाठी प्रत्येक विजेत्याबरोबर एकेक स्वयंसेवक देण्यात आलेला होता. )

नुसताच एखादी राजकीय भूमिका घेणारा किंवा दलित-वंचित-पीडितांचे जग अभिव्यक्त करणारा लेखक व्यवहारात कदाचित उपयोगी ठरत असेलही पण दीर्घकाळ तो मौल्यवान ठरू शकत नाही. लेखकाचा कस त्याने वापरलेल्या अनुभवरूपी कच्च्या मालातही नसतो आणि तो किती विद्वान आहे यातही नसतो. माणसाच्या मनाच्या हालचाली, बारकावे, त्यातले उथळ वा सखोल प्रभाव आणि अशा अनेक मनांचे संबंध यांचे सहज आकलन असल्याशिवाय कुणीही लेखक ' सिद्धहस्त ' ठरत नाही. माझ्या आकलनाप्रमाणे भारत सासणे हे तसे सिद्धहस्त लेखक आहेत. त्यांच्या कथा या मनावरच्या त्यांच्या मास्टरीने समृद्ध असतात. अशा अभिव्यक्तीच्या संपर्कात येणारे वाचकही त्या समृद्धीचा स्पर्श मिळाल्याने अधिक परिपक्व होतात, असे मला वाटते. त्यांच्या सर्वच कथांतून मला हे जाणवत आलेले आहे. कुठे काही तांत्रिक दोष जाणवतात, कुठे कथेचा शेवट उरकलेला दिसतो, तरीही, ' मोठेपणा ' तो मोठेपणाच ! मराठीतला हा एक मोठा लेखक आहे.

खूप मोठे लटांबर न घेता त्यांची ' मनातला मोर ' ही कथा बघा. एक श्रीमंती वाडा, एकत्र कुटुंब, घराण्याची प्रतिष्ठा, स्त्रियांनी क्वचित एखाद्या उत्सवाला घरातून बाहेर पडणे आणि बाकी सतत वाड्यात बंद असणे – असे एकूण वातावरण. त्यात एक नवी सून येते. ती झुंबर साफ करते, वगैरे. मुख्य म्हणजे तिला एकदा मोरदर्शन होते – लोक म्हणतात, ते मोहिनीबुवाने झपाटणे आहे. हळूहळू आपल्या लक्षात येत जाते की हा तिच्या मनातला मोर आहे. त्याने तिला या बाहेरच्या बंधनांतून मोकळेच केलेले आहे. कलेत वास्तव आणि वैज्ञानिक दृष्टिकोण वगैरे विसरून जायचे. या कथेत सासण्यांची लेखक म्हणून अगाध मास्टरी दिसते-जाणवते. मानसिक प्रक्रियांवर असते हुकमत तेव्हा भाषेवर आपोआप येते. बाकीचे नुसते शैलीसम्राट वा शब्दप्रभू अशा लेखनापुढे फिके पडतात. ही कथा, काय घडले या उत्सुकतेसाठी नुसती नाही वाचायची, हिच्या शब्दा शब्दातून झिरपणाऱ्या सखोल भानासाठी वाचायची. बाहेरच्या वातावरणाला प्रतिक्रिया देण्याचे न जगता ती सून ' तिचे जगणे ' जगू लागते, हे मराठी कथेत अपवादात्मक आहे. सारांश, ही कथा सावकाश, घाई न करता, वाचायला हवी.

तर असे हे आपले एक मोठे लेखक संमेलनाचे अध्यक्ष झालेले आहेत. ते नुसत्याच, त्याच त्या अनेकदा ऐकलेल्या राजकीय गप्पा हाणून वेळ साजरी करून नेणार नाहीत याची खात्री वाटते. सासण्यांचे अध्यक्षीय भाषण नक्कीच साहित्याच्या दृष्टीने महत्त्वाचे असेल. ' या वेळचे संमेलन वाङमयीन दृष्ट्या अर्थपूर्ण असेल ' असे कुणा संबंधिताने जाहीर केलेले आहेच. ( आजचा पुणे मटा पुरवणी पान ३. ) तसे घडेल याबद्दल शंका नाही.

--- ००० ---

साहित्य संमेलनाच्या अध्यक्षाचे भाषण

१. ही एक उरकायची औपचारिकता आहे असे न समजता हेच सर्वात जास्त महत्त्वाचे समजावे.

२. उद्घाटन समारंभात वक्त्यांची संख्या कमी ठेवावी.

३. प्रत्येक वक्ता, विशेषत: राजकीय पुढारी, त्याचे भाषण सुरू करण्यापूर्वी जे विष्णुसहस्रनाम घेतो त्याला फाटा द्यावा.
४. जो कुणी वक्ता, विशेषत: राजकीय पुढारी, अध्यक्षाच्या भाषणाला, त्याच्या स्वत:च्या इतर ‘ महत्त्वाच्या व्यस्ततेमुळे ‘ थांबू शकणार नसेल त्याला स्वत:चे भाषण करायची संधी देऊ नये.
५. आपापली भाषणे उरकून, टाळ्या खाऊन राजकीय पुढाऱ्यांनी, अध्यक्षाच्या भाषणाला न थांबता, त्याचा अपमान करून निघून जायचे, हीच पद्धत चालू ठेवायची असेल तर त्यांची भाषणे चालू असताना अध्यक्षालाही पुस्तकांचे स्टॉल्स बघत हिंडण्याची मुभा द्यावी.
६. अध्यक्ष म्हणजे फक्त एक गुळाचा गणपती – नाइलाज म्हणून चालवून घ्यावा लागणारा माणूस, असे समजत गेल्यामुळेच या संमेलनांचा दर्जा खालावत चाललेला आहे – यात दुरुस्ती अत्यावश्यक आहे.
७. आयोजकांच्या आणि वक्त्यांच्या राजकीय उद्दिष्टांना आवर घालावा. साहित्यात राजकारण वर्ज्य नसते असे म्हणत या संमेलनातून साहित्यच वर्ज्य करायचे, असले लोकांना वेडे बनवायचे थांबवावे.

--- ००० ---

सुधीर दामले

हे नाट्यदर्पणच्या जंगी मैदानी कार्यक्रमाचे शिल्पकार ! अत्यंत आकर्षक आणि नाट्यकर्मींना सन्मान देणारा असे तो कार्यक्रम. दोन वेळा मला त्या प्रसिद्ध नाट्यदर्पण पुरस्काराच्या काळ्या कभिन्न नट-मूर्ती मिळाल्या होत्या ! हातात मुखवटा बाळगणाऱ्या. पाहात राहावे अशा मूर्ती ! कै. दामले यांच्या प्रती कृतज्ञता आणि आदर ! त्यांच्या स्मृतीस अभिवादन !

--- ००० ---

आश्चर्य म्हणजे, आज एक कावळा आनंदाने, चालीवर कावकाव करताना ऐकला ! जगाच्या दृष्टीने हे एक शुभचिन्ह असावे !

मिलिंद शिंत्रे यांनी पोस्ट केलेल्या, नरहर कुरुंदकरांच्या, ' मी आस्तिक का नाही ' या लेखावर मी दिलेली कॉमेंट --
माणूस आस्तिक असो की नास्तिक, त्याचे जगणे वैचारिक पद्धतीनेच चालते. याचाच अर्थ तो स्वत:ची वेगळी ओळख मानतो. स्वत:ला ' अलग ' समजतो. स्वत:ची बुद्धी, अनुभव, प्रभाव हे विश्वासार्ह मानतो. आत्मकेंद्रित जगतो. आस्तिक असो की नास्तिक, दोघेही दु:खी वा सुखी होतात, दोघांनाही वर्चस्व हवे असते, दोघेही अनीतीमान आणि हिंसक असतात. मी, माझे नेते, माझ्या विभूती, माझा देश यांच्या आधारावर दोघेही भेद मानतात आणि प्रसंगी कोणतीही मूल्ये पायदळी तुडवतात. आस्तिक म्हणजे कर्मकांड करणे आणि देवळात जाणे, हाच अर्थ रूढ झालेला आहे. संतांनी देवाबद्दल काढलेले उद्गार असे नाही आहेत. बुद्ध वा जे. कृष्णमूर्ती, तुकाराम वा ज्ञानेश्वर हे सगळे बासनात बांधून ठेवून हा लेख लिहिलेला आहे. वैचारिक स्तरावर जगणाऱ्यांत हित वा अहित कारक कोण हे सिद्ध करत बसण्याचा हा प्रयत्न मूळ मुद्दा सोडून असल्याने बावळट म्हणणे भाग आहे. तुझी हिंसा वाईट, माझी चांगली, असा हा प्रकार आहे. अनीती वा हिंसा यांतून, तुम्ही वैचारिक स्तरावर फक्त जगत असाल तोवर सुटका होणे शक्य नाही. हे दिसल्यानेच मृषा ( absurd ) कलेचा जन्म झालेला आहे. मी, माझी विचारसरणी, माझा धर्म, माझी भाषा,

माझा पक्ष, माझा देश -- आणि यांतून येणारे संघर्ष, हे आहेत प्रश्न -- उगीचच, मी कसा शहाणा म्हणून काही उपयोग नाही. सारांश, कुरुंदकरांचा हा लेख मला उथळ वाटतो.

--- 000 ---

१२ जानेवारी २०२२.

कॉमेंटस मधून –

पिरांदेल्लो , आयनेस्को , बेकेट , काफका, पेसोआ -- असे सगळे लोक हवापाण्याचे बोलत होते किंवा राजकारण करत होते, असे मी तरी नाही म्हणणार. ज्यांना तसे वाटते त्यांच्याशी चर्चा करण्याची कुवत माझ्यात नाही याची मला जाणीव आहे. ते स्वत: त्यांच्या लेखनाबद्दल जे बोललेले आहेत, ते मी खोटे समजत नाही.
सध्याचा ट्रेंड तर साहित्य म्हणजे फक्त राजकारण -- असाच दिसतो आहे !जो राजकीय भूमिका व्यक्त करण्यासाठी लिहितो तोच फक्त ! ही मराठी साहित्यात रुजवली गेलेली कल्पना साहित्याचा गळा घोटणारी आहे -- जगात सर्व माणसांना प्रस्तुत ठरणारे साहित्य हे तत्त्वज्ञानाच्या वा बुद्धाला महत्त्वाच्या वाटलेल्या प्रश्नांचे चिंतन असते. अनेक महत्त्वाचे लेखक-कवी यावर बोललेले आहेत, पण, आपण त्याकडे दुर्लक्ष करून आपले ते रेटायचे ठरवलेले आहे. तुम्ही स्वत: सध्या बोधी तर्फे तत्त्वज्ञानी लेखकांचा शोध घेत आहात -- राजकीय भूमिकावाले असे शोधावे नाही लागणार ! असे म्हणणारेही काही आहेत -- याहून वेगळे बोलणारे नामवंतही बरेच आहेत -- मराठीत राजकारण हेच सर्वस्व होऊन बसलेले आहे ! म्हणूनच ' संपादन ' म्हणजे ' भूखंड संपादन ' !प्रत्येकाचा मानसिक समय वेगळा असतो, प्रत्येकाचे वास्तव वेगळे असते -- या सत्यासह त्याचा विचार करावा लागेल -- समय म्हणजे राजकारण हे फारच निरर्थक होईल. साहित्य संमेलनाचे चार अध्यक्ष साहित्याचे अवाक्षर न बोलता फक्त राजकारण बोलून गेले ! ते बोलणेही असे की तशा विचारांचा कोणताही साधा कार्यकर्ता बोलू शकेल. साहित्य म्हणजे राजकीय विचारसरणी असे बिंबवून घेतल्यामुळे साहित्य समावेशकतेने वाचायचे इंद्रियच गळून गेलेले आहे !

पुस्तकांची नुसती नावे कळून किंवा त्यांची मुखपृष्ठे पाहून कितपत जाहिरात होत असेल याबाबत मला शंका आहे. एखादा आवडता लेखक असेल तर त्याचे नवे पुस्तक आलेले कळणे फार तर घडत असेल. त्या त्या पुस्तकाच्या आशयाबद्दल अभ्यासपूर्वक कुणी बोलणे, लिहिणे नक्कीच महत्त्वाचे ठरेल. पण समीक्षक ही जमातच खतम होत चाललेली आहे. याचे मुख्य कारण एकूण समाजच सर्जक कलेबाबत उदासीन झालेला आहे. लेखकांनी प्रमोशन करून यात कितपत फरक पडेल ? पण काळ बदलला आहे, अशा गोड कल्पनेत लेखक ( नाइलाजाने ) करत राहतात हे !
समस्या ही दिसते की पुस्तक म्हणजे काही शेव्हिंग क्रीम नाही -- तुम्ही काय विकू इच्छिता हे सांगणार कसे ? पुस्तक ही काही एखादी व्यावहारिक गरज भागवणारी बाब नाही. उदाहरणार्थ समजा, लारव्यांचा ' रीलया ' हा कथासंग्रह घेऊ. म्हणजे काय आहे हे ? आपण काय घेतोय विकत हे घेणाऱ्याला कळणार कसे ? मग पुढचा टप्पा म्हणजे

लेखकानेच त्याच्या पुस्तकाचे राईटअप प्रसिद्ध करणे. त्याच्या पुढे म्हणजे ही कविता कशी वाचावी याचे एक मॅन्यूअलही देणे.

Champra Deshpande
कोणत्याही कवितेची वा कवीची कोणत्याही कारणाने हेटाळणी वा हिडिसफिडीस करणे हे फारच बालिश कट्टरपणाचे असते. असल्या मतप्रदर्शनाला किंमत देऊ नये. लोकांना कविता लिहावीशी वाटते हेच मुळात महत्त्वाचे समजायला हवे. कोणत्याही कवितेत वा कवीत कुणाला काही त्रुटी वा दोष आढळल्यास ते सभ्य भाषेत सांगता येतात. पण अर्थात ते सांगताना सांगणारा उघडा पडण्याचा धोका असणारच. स्वमताबद्दल इतक्या आग्रही असणाऱ्याने तो पत्करायला हवा. कवितेचे तंत्र-मंत्र कुणालाही जन्मत: प्राप्त नसते. कुणालाही नाउमेद करायचा हक्क कुणीही स्वत:कडे घ्यावा, हे घातक आहे. येऊ द्यात कविता -- मुबलक येऊ द्यात ! आणि तुलना कशाला ? कवितेच्या अनुभवद्रव्यावर तिचे मूल्य अवलंबून नसतेच. अभिव्यक्तीच्या नमून्यावरही नसते. मग काय ? असा प्रश्न विचारायची हिंमत आधी असायला हवी. हजारो प्रकारच्या शैलींतून उत्तम कविता येऊ शकतात, हे प्राथमिक भान तरी सर्वांना असायला हवे.

अनुभव दलिताचा आहे की मध्यमवर्गीय आहे, युद्धाचा आहे की ऑफिसातला आहे यावर साहित्याचे मूल्य अवलंबून नसते. तसेच, शैली रोमँटिक आहे की वास्तववादी की अतिवास्तववादी यावरही ते अवलंबून नसते.

जगण्यातल्या मूलभूत प्रश्नांबद्दल असा सखोल विचार करायला लागावा असे साहित्य मराठीतही निर्माण होत राहो, हीच या निमित्ताने सदिच्छा !

कलेच्या क्षेत्रात मतभेद असायला हरकत नाही पण एकमेकांना हिडीसफिडीस करणे नसावे. कला ही माणसांना एकत्र आणणारी बाब आहे, भांडणे निर्माण करणारी नाही.

ही पोस्ट वाचून माझ्या मनात काहीसे अपराधी भाव जागे झाले. मी तर कवितासंग्रह घेतला वाचायला की तो पूर्णच वाचतो. लगेच त्यावर अभिप्रायही देतो. असे अनेक कवितासंग्रहांबाबत घडलेले आहे. उदाहरणार्थ कालच राहुल पुंगलियांच्या ' गावाबाहेर ' वर मी लिहिले आहे. यावर विचार करता मला असे दिसते की कविता वाचताना मी खूप लवचिक, तरल असतो. माझी लुडबूड थांबवून कवितेलाच बोलू देतो. याचाच अर्थ कविता मला ' पोचणे ' हे माझे नसतेच कर्तृत्व. मी स्वत:ला त्या वेळी खूपच ' कमी ' केलेले असते. याचा सारांश असा दिसतो की कविता ' मला ' कधीच नाही समजत. ती '
Premanand Gajvee मित्रवर्य, तुम्ही फार महत्त्वाचे काम करत आहात ! ही आच आणि भान यांचा प्रवाह वाहात असणे हे एकूणच माणसाच्या दृष्टीने आणि विशेषत: कलेच्या क्षेत्रात अत्यावश्यक आहे ! ( तत्त्वचिंतक नाटककाराचा शोध )

" या कवितांचे वैशिष्ट्य म्हणजे त्या इंग्रजी भाषेच्या व्यावहारिक वापरातले व्याकरणाचे सगळे नियम पाळून लिहिल्या गेलेल्या कथनात्म कविता (Narrative Poems) आहेत. अनेकदा गद्यलेखनात ज्याप्रमाणे आपण Left Aligned वाक्ये लिहितो तश्या त्या Left Aligned Text आहेत. परंतु त्या गद्यसदृश्य लिखाणात जे 'काव्यमूल्य' निर्माण होते ते प्रशंसनीय आहे.

मराठी कवी, कवितेचे अभ्यासक, समीक्षक आणि वाचक यांनी याप्रकारच्या Narrative Poemsकडे सहृदयतेने आणि काळजीपूर्वक बघितले तर एक मोठा प्रश्न निकालात निघेल आणि मराठी कवितेचे एक पाऊल का होईना पुढे पडेल, अशी आशा वाटते. " -- हे तुमचे विवेचन मला विशेष महत्त्वाचे वाटले. तुमच्या सहृदयतेचे उदाहरण तुमच्याच लेखनात आलेले आठवले -- " एवढेच नव्हे तर सामान्यतः जिला परंपरेने काव्यभाषा म्हटले जाते तिचा अभाव असलेल्या "अकाव्यात्म' भाषेतही कविता लिहिली जाऊ शकते हे अगदी समकालात कविता लिहिणारे श्रीधर तिळवे, चंप्र देशपांडे, सलील वाघ इत्यादी कवींच्या रचनांतून दाखविले जाऊ शकते. "

-- 'अप्रगल्भ समीक्षका'चे कवितावाचन ' – गणेश कनाटे. – १२ जुलै २०२०.

-- हे मूल्यात्म विधान असेल वा नसेल, पण, यात स्वीकार नक्कीच आहे. कोणताही कवी आता मी प्रयोग करतो, वेगळे लिहितो, असे ठरवून काही करत नसतो. त्याच्या जगण्याच्या प्रक्रियेतून ते येत असते. ही समज अधोरेखित करणारे हे विवेचन मला आपल्या इथल्या वातावरणात खासच वाटते.

Champra Deshpande

अणुरणिया थोकडा म्हणजे प्रभावयुक्तता ( किंवा प्रभावग्रस्तता ) आनंतता म्हणजे तीतून बाहेर पडणे -- निव्वळ प्रतिक्रियात्मक नसणे -- एलकुंचवार त्याबद्दलच बोलत असावेत --

व्यक्तिगत प्रभावयुक्ततेतून बाहेर पडणे म्हणजेच अनंतता. कलेचे हे मूल्य वैशिष्ट्य हे इथल्या आणि जगातल्या अनेक कलावंतांनी सांगितलेले आहे. याचा अर्थ कला निव्वळ प्रतिक्रियात्मक नसणे. याची आच वा तातडी नसलेले अनेकजण असू शकतात. हे कुणी कुणाला ' पटवून ' देण्याचे मूल्य असूच नाही शकत.

भूतकाळाशिवाय मन -- असे काही म्हणत असाल तर ते आध्यात्मिक होईल ! विचार व्हावा !

' मराठी कविता ' यावर मी एक लेखच लिहिणार आहे -- पूर्वी क्षकिरण झाले, आता ज्ञकिरण येतील !

कवितेतले अनुभवद्रव्य स्वानुभवातले असो की वर दिलेल्या तंत्रातून येणारे असो, निर्माण होणाऱ्या कवितेत कवीची कलासमज आणि त्याची आकलनप्रक्रिया हेच व्यक्त होत असते. ती प्रक्रिया जर उथळ असेल तर कितीही काबाडकष्ट वा आदळ आपट करा, कविता उथळच येणार. बांधणे, सुचणे, जे असेल ते त्या प्रक्रियेतच घडायला हवे.

' तुमचे जे काही आकलन असेल ते ' असे म्हटलेच आहे आणि ही सर्वांच्याच ' बसकी बात ' नाही हेही !उदाहरणादाखल एक अट्टाहासदर्शक कविता विडंबनात्मक केली पाहिजे. ' मराठी कविता ' यावर मी एक लेखच लिहिणार आहे -- पूर्वी क्षकिरण झाले, आता ज्ञकिरण येतील ! सर्वांच्याच ' बसकी बात ' नाही -- हे मान्यच आहे -- धन्यवाद !

घरी एकट्याने बसून कलासंपर्क करणारे, समूहात बसून एंजॉय करणारे, गंभीर, विद्रोही, विनोदी असे सर्व प्रवाह कलेत असणार. प्रश्न हा आहे की जगण्यातल्या मूलभूत प्रश्नांचा आवाका घेणारे, जगण्यातल्या जटिलतेचे समग्र भान निर्माण करणारे असे कलावंतच फारसे निर्माण झाले नाहीत. ती आच आणि तातडी वाटणे हे फारसे घडले नाही. त्यामुळे भाषावैभव आणि थोडेफार तंत्रकौशल्य आणि चमत्कृती यांचे स्तोम माजले. विविध गुणदर्शनाची कला निर्माण होत राहिली. वाचक-प्रेक्षक यांच्या अपेक्षा धुडकावून, नुसत्याच प्रस्थापित बौद्धिक, नैतिक मूल्यांना महत्त्व न देता सखोल समजूत निर्माण करणारे कलाकारच फारसे आले नाहीत. दुसरे म्हणजे तशा कलेची इथे कुणाला फारशी अपेक्षाही नाही आहे.

पूर्वग्रह सोडून वाचता यावी कविता -- अन्यथा ज्यालात्याला कळलेले ज्याच्यात्याच्या जवळ आहेच -- कविता वाचायची गरजच नाही --व्यक्तिवाद आणि समूहावाद या द्वंद्वाच्या चाकोरीत अडकलेल्या रोगट मनांबाबत आहे ही कविता -- तुम्ही घिसीपिटी नासमझ कॉमेंट दिल्यामुळे हे सांगावे लागते आहे --

साहित्यिक, कलात्मक समृद्धीचे प्रेम सगळीकडेच ओसंडून वाहात असल्याने, आणखी एक मुद्दा -- साहित्य संमेलनाच्या अध्यक्षाने त्याच्या भाषणात साहित्याबद्दलही काही बोलावे -- नुसत्याच राजकीय गप्पा हाणून निघून जाऊ नये. चार अध्यक्ष राजकीय भाषणे करून निघून गेले म्हणून हा मुद्दा दिला आहे --
तसे तर नरसिंह रावांनी आपल्या अध्यक्षापेक्षा भारी भाषण केले होते. परभाषेतल्या कुणाही चांगल्या लेखक, कवीला बोलवावे -- जरूर ! त्याचेही भाषण साहित्य, कला यांना योग्य ते महत्त्व देणारे असावे म्हणजे झाले !

असले मतभेद मी नाही बाळगत -- राजकीय मारामाऱ्यांचे महत्त्व वाटणाऱ्यांनी ते पाहून घ्यावे --ते ठीक -- पण, साहित्य संमेलनात अध्यक्षाने साहित्याबद्दल बोलावे, हेही एक ' मत ' ठरावे, हे दुर्दैव आहे ! तसे तर, राजकीय भूमिका घेत नाही तो साहित्यिकच नाही, अशी सदोदित साहित्यिकांना अक्कल शिकवणारेही काही कमी नाहीत ! तेही खूपच वाईट आहे, हेही माझे एक मत घ्या ! आणि माझे वाक्य नीट बघा -- अमुक बोलू नये असे मी म्हटलेले नाही -- ' साहित्याबद्दलही काही बोलावे ' असे म्हटलेले आहे -- असो -- मुळात साहित्य संमेलन ही एक साहित्याशी फारच कमी संबंध असलेली गोष्ट आहे -- एवढी मते आणि मतभेद खूप झाले ! धन्यवाद !

कुणाच्याही तुच्छतेला किंमत देऊ नये. फेसबुक हे माध्यम वापरत खूप जणांनी खूप लिहावे, असेच मला वाटते.

स्वत:चा स्वभाव, विचार -- अशा प्रकारे अलग पडत जाणे, हीच परात्मता.

बरोबर भूमिका-चूक भूमिका, पूर्ण विचार-अर्धवट विचार, कुणात ना कुणात खंत निर्माण करणारे विचार- कधीच कुणातही खंत निर्माण न करणारे विचार -- या असल्या द्वंद्वांना कितपत असतो अर्थ ? कशावर आधारित ? तुम्ही नुसतेच कुत्सित बोलताय, उत्तर काही नाहीय तुमच्याकडे, हे पाहून मला खंत वाटतेय ! ' मीच एक शहाणा ' हे प्रमेय सोडणे अनेकांना अशक्य असते, हेच खरे
येऊ द्या सविस्तर --
गंभीरपणे संवादासाठीच दिली आहे ही पोस्ट -- तो जरूर होऊ द्या. भूमिका वेगवेगळ्या का असतात, ते आधी पाहायला हवे. तेच तपशील निवडणे, त्याच तपशीलांना एकसारखेच महत्त्व देणे आणि तर्काचा वापर एकसारखाच म्हणजे ' आदर्श ' करणे -- असे होत नाही -- त्यामुळे निष्कर्ष वेगवेगळे असतात ! अशा चर्चा नेहमी ' माझेच योग्य - - बरोबर ' यावर संपतात ! टीव्हीवरच्या चर्चा तुम्ही पाहात असालच. याने आणलेली रद्दी वेगळी असते आणि त्याने आणलेली वेगळी असते ! सिद्ध काहीच होत नाही -- नुसती आपापली मते मांडणे घडू शकते. खरे तर तेवढेच घडू शकते -- भुंकण्या-बोचकारण्याचा काहीच उपयोग नसतो. हे समजून चर्चा झाल्या तरच त्यांना ' सहिष्णू ' चर्चा म्हणता येईल. अन्यथा सगळे निरर्थक आणि निरुपयोगीच ठरणार.

इथे काहीही म्हणणे धोक्याचे आहे -- एक ललित मजकूर म्हणू या ! ( ' चिमणी ' या कवितेबद्दल )

प्रयोग परिवार, नाशिक यांचा हा प्रयोग मराठीतल्या एकूणच निवडक प्रयोगांपैकी एक होता ! नंतर पुन्हा एकदा हा प्रयोग अतुलनेच दिग्दर्शित केला होता ! ज्यांनी हे प्रयोग बघितले ते भाग्यवान ! ( वेटिंग फॉर गोदो )

खूप शुभेच्छा ! पारधी सरांनी माझ्या ' धागेदोरे ' या नाटकावर खूप चांगले परीक्षण लिहिले होते !

राजन अपरंपार -- " याच्या उलट समजा भक्तिमार्गी वा आस्तिक असतात. पण अशा या दोन प्रकारांत – त्यांच्या जगण्यात मूलभूत असा काही फरक असतो का ? दोन्ही प्रकारची माणसे दु:ख भोगणारी, महत्त्वाकांक्षी, भीतिग्रस्त, वर्चस्ववादी, हिंसक, प्रेमळ, क्रूर, युद्धखोर, वगैरे असलेली दिसतात. दोन्ही प्रकारांत अलगता आणि अस्मिता यांचा प्रभाव दिसतो. " -- हे लिहिले आहेच ना ! आणि इहवाद म्हणजे विदीर्णता असेल तर तेच मूल्य समजायचे का ? आणि जे असेल ते सगळे इहवादच असेल तर इहवाद असे वेगळे म्हणावे का लागते ? हजारो मूल्ये असणारच, असे समर्थन केले तर मग ते जाते एका निराशावादाकडे. मग कलेला सर्जक वा श्रेयस्कर म्हणायचेही कारण राहणार नाही.

सगळे हिंसक आणि विनाशकच असणार, असा त्याचा अर्थ होतो. पण, तुम्ही म्हणत आहात तसे खरेच लिहा यावर सविस्तर, ही विनंती.
खरे तर यावर या पोस्टमध्ये लिहिलेले आहे. प्रभावयुक्तता आणि परिस्थितिसापेक्षता हेच फक्त सत्य असे मानणाऱ्या कुणाचाही मूल्याशी संबंध असू शकत नाही -- अशी ही स्पष्ट मांडणी आहे.
नुसते फेसबुकवर नीट पाहिलेस तरी अशी माणसे दिसतील -- बुद्धी ही प्रभावयुक्त आणि परिस्थितिसापेक्ष असल्याने तिचा वापर वेगवेगळा होतो -- त्यामुळे, प्रत्येकाची मूल्यात्मता वेगळी असते, असले भोंगळ बोलावे लागते ! आणि हा वेगळेपणा हाच निष्कर्ष असेल तर मूल्य हा शब्द रद्दच होईल !

छोड दो फिर ! याहून स्पष्ट काय लिहिणार ? हे अनेकांना समजतेय -- काहींना आवडतेय, काही रागही व्यक्त करतआहेत -- म्हणजे मराठी योग्य आहे. तुमचा काय आहे प्रॉब्लेम तो तुम्हालाच सापडू शकेल !

कविता वा कला मूल्यात्म असते -- हे वाक्य बहुधा इहवादालाही मान्य असावे. तर काय असते ही इहवादी मूल्यात्मता -- हे एखाद्या इहवाद्याने थोडक्यात सांगावे. म्हणजे ही चर्चा खूप मूल्यात्म होऊ शकेल.

इतके सखोल, इतके उत्तुंग असे हे मराठीतले अपवादात्मक चिंतन आपल्या एकूणच कलाक्षेत्राला वर्षानुवर्षे प्रकाश देत राहील ! ( रवी लाखे )

ते काम नसतेच -- तो आकलनाचा सहज प्रवाह असतो -- पण सगळे वैचारिकच असते असे गृहीत धरायचे झाले तर मी म्हणेन की जगातल्या सगळ्या कविता बाद असतात ! या निमित्ताने तुम्हाला एक विनंती आहे -- कोणतेही काम लावून न दिलेली, जबाबदारी नसलेली, न भांबावलेली, न सैरभर झालेली -- अशी तुमची जी आदर्श कवितेची कल्पना आहे, तशा कवितेची दोनचार उदाहरणे द्या ना -- अन्यथा, नुसतेच तुम्हाला माझ्या कवितांना बाद म्हणायचे आहे, एवढेच त्यातून दिसते !म्हणूनच केलीय ना विनंती -- कारण तुमच्यासमोर काही ' आदर्श ' कविता असणार, हे उघड दिसते आहे. आणि माझी पूर्ण पोस्ट नीट वाचलीत तर त्यात काम नाही. विचार, उद्दिष्ट, दिशा, अमुक एक साधणे, असे काही नाही. त्यामुळे, तुम्हाला खटकणे हे मला खटकले !

अशी विधाने कवितेत आली तर ती सामान्य समजुतींवर आधारित असतात -- अचूक खानेसुमारीवर नव्हे. एक मारवाडी मला म्हणाला होता की खूप विद्वान होणे ही आमची आकांक्षाच नसते -- विद्वानांना विकत घेऊन नोकरीवर ठेवणे, ही असते. आता तो मारवाडी म्हणजे तुम्ही नव्हे. पण या समजुतींच्या पार ही कविता काही व्यक्त करते का, ते पाहावे -- तसे काही नसेल तर कवितेला बाद करावे. कवितेबाबतही मतमतांतरे असणार.मुळात इथे नैतिक-अनैतिक वा चांगले-वाईट असे कुणाला मूल्यात्मक काही ठरवण्याचा प्रश्नच नाहीय. कोणत्याही प्रकारची व्यग्रता दु:खच

निर्माण करते आहे -- हा आहे विषय. आणि जे नैतिक म्हटले जातेय तेही ' स्वर्ग ' निर्माण करत नाहीय. ' नैतिक तयारी ' म्हणजे काय ? तशी कुणाची असेल तर ती वैचारिक म्हणून दांभिक असेल. ' समाजाच्या दोन पावले पुढे ' असणारे तौलनिक नैतिक अधिष्ठान निरर्थकच असणार -- मी तसले काही शोधत नाही.याहून जास्त आपण एकमेकांना काही पटवत नको बसायला -- सुसंगत वैचारिक नैतिकता हा तुमचा प्रांत असावा -- माझा नाही. त्यामुळे, संवादच अशक्य !

माझा जिगरी दोस्त ! विनोदसम्राट नट असतात तसा हा विनोदसम्राट दिग्दर्शक ! मराठी नाट्यसृष्टीत माझी प्राणप्रतिष्ठापना याने आणि विनायक पडवळने केली ! प्रकाशने बसवलेली माझी ' नातं ' ही एकांकिका ८५ स्पर्धकांत पहिली आली होती ! शिवाय त्याने, ' उत्सव ', ' दिनकर पुरोहितचा खून ', ' पोत्यातून गोत्यात ', ' संसाराणूपेंडघार ' या माझ्या संहिता रंगभूमीवर आणल्या ! प्रकाशला माझ्या खूप खूप शुभेच्छा ! ( प्रकाश बुद्धिसागर )

या निमित्ताने -- सुहास हा एक उत्तम नट ! त्याने विनायक पडवळने दिग्दर्शित केलेल्या माझ्या ' समुदाय ' या एकांकिकेत काम केले होते. ( सुहास पळशीकर ) .

जे जे तशा मन:स्थितीत असतात त्यांचा ! आणि आपण तर अभिव्यक्तिस्वातंत्र्याचे भोक्तेच आहोत ना ! बरेच काही कंडेम करण्याची महामूर्ख सवय, हा आहे विषय. अशी सवय जातिविशिष्ट असते ?
या कवितेबद्दल चाललेय --

एक सूचना मांडून ठेवावी, असे वाटते -- राजकीय पुढाऱ्यांना थोडक्यात आवरायला सांगावे -- अध्यक्षांच्या भाषणाला पुरेसा वेळ द्यावा.

अगदी परफेक्ट आहे. नरसिंह रावांसारखा कुणी साहित्याबाबत बोलणारा असेल तर त्याचे भाषण जरूर व्हावे.

मुळात कवितेतला मी म्हणजे कवी स्वत: नसतो हे प्राथमिक सत्यच आपल्याला अनेकदा सांगावे लागते. एखादा वाचक कवितेला भ्रामक म्हणतो तेव्हा सत्य म्हणजे काय, हे त्याला विचारायचे नाही ? आणि उत्तरात परेलकर काय म्हणताहेत -- सत्याचे निश्चित काही सांगता येत नाही ! माझ्या कवितेत वा कोणत्याही लेखनात कुणाला ' विचारसरणी ' सापडत असेल तर मी फक्त ' धन्य ' म्हणू शकतो ! ' संभ्रम उचंबळून येणे ' तुम्हाला आवडते, परेलकरांना नाही -- ते संभ्रमाला दोष समजतात. ' सृजनात्म मूड ', ' तात्कालिक मनोवस्था ' यांचे तुम्ही स्तोम का माजवत आहात ? सृजनात्मक मूड हा तद्दन निरर्थक विचार का प्रसृत करत आहात ? व्यक्तिगत नसणे म्हणजे वैचारिक असणे हे प्रमेय मनात धरून तुम्ही कविता वाचत असाल तर खेदाची बाब आहे. मी असल्या वैचारिक मतांना कधीच महत्त्व न देता माझी कलाभिव्यक्ती करत आलेलो आहे, हे विदित व्हावे. ' अनुभव आणि माहिती

मेंदूची त्रस्तता कमी नाही करत ' या ओळी तुम्ही कोणत्या वैचारिकतेतून वाचल्या हे समजले नाही. माझे असे निरीक्षण आहे की तुमची जी कुठली असेल विचारसरणी ती डिस्टर्ब करणारे कुठे काही असू नये, असे तुम्हाला वाटत असावे. पण आपण तर अभिव्यक्तिस्वातंत्र्याचे जानेमाने भोक्ते आहोत ! तरीही, कवितांना अप्रस्तुत फाटे फोडू नयेत, ही विनंती करून ठेवतो.
ठीक -- या एकूणातून पुन्हा आपापल्या आकलनाच्या मार्गांनी जाऊ -- कविता ही काही निष्कर्ष काढण्याची प्रक्रिया नव्हे -- धन्यवाद !
१२ जानेवारी २०२२.

अभिव्यक्तिस्वातंत्र्याला पहिला ब्रेक असतो, ' लोक काय म्हणतील ' याचा ! या लोकांत कुटुंबातले लोक, नातेवाईक, मित्रमंडळी, समाज, असे सगळे येतात. कोणत्याही कलावंताने हे खालील गाणे नुसते पाठ करून उपयोग नाही -- सारखे सगळ्यांना म्हणून दाखवत राहिले पाहिजे ! निळू फुले यांनी एकदा विंगेची रेषा ओलांडली की ते निळू फुले राहात नसत ! ----- ऐ दिल अब कहीं न जा – ब्लफ मास्टर – ना कोई मेरा –

के. र्‍यान या स्त्री कवीच्या मुलाखतीतला एक भाग ---
INTERVIEWER
Do you use scientific information in your work in order to accurately depict the real world?
RYAN
I like the sound of facts, but I don’t care about them as facts. I like them as texture. As for reality, I don’t even have any interest in that word.

शेकाप चे एन. डी. पाटील
आणीबाणीच्या काळात मी कोल्हापुरात होतो. ( मला त्या वेळी इंदिरा गांधींची राजवट आणि त्यांचे निर्णय पटत होते, ते जाऊ द्या. ) तर त्या काळात मी एन. डी. पाटील यांची दोन भाषणे तिथे ऐकली होती. विनोद आणि उपरोध यांचे असे जहाल मिश्रण मी कधी कुठे ऐकले नाही ! त्या काळात कुटुंब नियंत्रण शस्त्रक्रियांचा बराच जोर होता. ' वरच्यांना ' खुश करण्यासाठी तो एक तूफान कार्यक्रम चालू होता. त्या संदर्भात ते जे बोलले ते अजून माझ्या लक्षात आहे -- " अहो, इथले सगळे आठवडे बाजार ओस पडलेत. कुणी फिरकतच नाही तिकडं. कारण हे लोक तिथे तंबू टाकून वाटच बघत बसलेले असतात. तरुण असो, म्हातारा असो, पकडून आत नेतात आणि शस्त्रक्रिया करूनच सोडतात. कुणी कितीही नको नको म्हटले तरी ते ऐकत नाहीत. त्यामुळं जातच नाही कुणी तिकडं ! तर या पद्धतीनं खूप झाल्या आहेत शस्त्रक्रिया ! भारतभर ! तडाखाच लावलाय ! आता तुम्ही म्हणाल की किती झाल्या बाबा शस्त्रक्रिया ? तर ते त्याचा आकडा जाहीर नाही करू शकत. कारण त्यात एक प्रॉब्लेम आहे ! झालंय काय की

भारतातले सगळे शस्त्रक्रियांचे आकडे एकत्र करून बेरीज केल्यावर ती टोटल भारताच्या एकूण लोकसंख्येहून जास्त येतेय ! " इथे प्रचंड हशा ! त्यांची मी ऐकलेली ती दोन्ही भाषणे मला खूप आवडली होती !
त्यांचे ९३ व्या वर्षी निधन झाल्याचे कळते. त्यांच्या स्मृतीला माझे आदरपूर्वक अभिवादन !
--- ००० ---

माझ्या ' बुद्धिबळ आणि झब्बू ' चा कानडी अवतार ---

झाले बाबा एकदाचे ! ( संकेतस्थळ )
माझ्यासारख्या लेखकाने संकेतस्थळ करणे आणि ते अद्ययावत ठेवणे हे तसे खूप कष्टाचे काम आहे. तांत्रिक सराव कमी असल्याने आणि असल्या कामाचा कंटाळा असल्यानेही ते कष्ट जास्त वाटत असतील. पण, आनंद हा की ११ जानेवारी २०२२ पर्यंत माझ्या संकेतस्थळाचे ( वेबसाईटचे ) अद्यावतीकरण पूर्ण झालेले आहे. आयुष्यभरात लिहिलेला सर्व मजकूर तिथे आहे. पुढेमागे कधी कुणाला हे सगळे एकत्र पाहावेसे वा अभ्यासावेसे वाटले तर ती सोय पूर्ण करून ठेवलेली आहे. अन्यथा, ज्यांना उत्सुकता असत… See more
champralekhan.com
www.champralekhan.com   १८-०१-२२ ची पोस्ट.

अवकाश कलामंच, पुणे

कोल्हापूरच्या आमच्या नाटकसमूहाने जसे मी सुचवलेले ' प्रत्यय ' हे नाव स्वीकारले तसेच पुण्याच्याही आमच्या नाटकसमूहाने मी दिलेले ' अवकाश ' ( space या अर्थी ) हे नाव स्वीकारले. पुण्यातला हा समूह स्थापन करताना मुख्यत: विद्यासागरचा पुढाकार होता. तालमीला मनपाच्या शाळेत जागा मिळावी म्हणून आणि नंतर तिच्या नूतनीकरणासाठी अनेकदा विद्यासागर आणि मी शिक्षण मंडळाच्या अध्यक्षाच्या केबिनबाहेर तीन तीन तास वाट पाहण्याचे काम केलेले आहे. विद्यासागर म्हणजे विद्यासागर अध्यापक -- माझ्या ' धागेदोरे ' , ' समतोल ', ' ट्रेलर ', ' साक्ष मावळत्या सूर्याची ' या संहितांचा दिग्दर्शक आणि नंतर व्यावसायिक रंगभूमीवरची, ' आधी बसू, मग बोलू ', आणि ' साखर खाल्लेला माणूस ' ही खास यशस्वी नाटके लिहिणारा लेखक. आमच्या या समूहाबरोबर असणारे अनेकजण आता कलेच्या क्षेत्रात काही ना काही कामे करत आहेत. प्रशांत तपस्वी याने अनेक मराठी चित्रपटांतून कामे केलेली आहेत. गणेश सागडे हा टीव्ही चॅनेलवर प्रबंधक आहे. अनिल भागवत, विश्वास गद्रे हे उत्तम नट तर आमच्या बरोबर होतेच. मधुराणी गोखलेही ( 'आई कुठे -- ' वाली ) तेव्हा आमच्याबरोबर असायची. नंतर तिने माझ्या, ' तुमचं आमचं सेम असतं ' या नाटकात काम केले. तसेच आनंद अलकुंटे हा एक उत्तम अभिनेताही आमच्या या नाटकसमूहात होता. त्याने त्या वेळी माझ्या ' धागेदोरे ' आणि ' साक्ष -- ' या संहितांत कामे केली. त्यानंतर त्याने हिंदी मालिकांमध्येही कामे केली. हे सगळे सांगायचे कारण म्हणजे, आता तो ' मुलगी झाली हो ' या

मालिकेतल्या विलास पाटील या भूमिकेत दिसणार आहे, अशी बातमी आहे ! तो त्याच्या या भूमिकेचे सोने करील यात शंकाच नाही !

' अवकाश कलामंच, पुणे ' झिंदाबाद !

--- ००० ---

## गोडसे आणि अभिव्यक्तिस्वातंत्र्य

नथुराम गोडसे हा एक वाईट माणूस होता – तो कलाकृतीतही वाईट माणूस म्हणूनच आला पाहिजे. एखाद्या नटाचे अभिव्यक्तिस्वातंत्र्य म्हणजे तो कसा आणि किती वाईट आहे हे व्यक्त करण्याचे कौशल्य. ते प्रत्येक नटाचे वेगवेगळे असू शकेल. कुणी म्हणेल, असे नाही, तो चांगला होता. तो कसा चांगला होता हे तुमचे स्वतंत्र कौशल्य वापरून तुम्ही दाखवू शकता. म्हणजे काय, तर पात्रांबद्दलची तुमची मते, तुमची भूमिका व्यक्त करण्यात तुम्ही कितीही कौशल्य दाखवू शकता. तेच तुमचे अभिव्यक्तिस्वातंत्र्य. हा प्रश्न ऐतिहासिक टाइप नाटकांत वगैरे अधिक उघडा पडतो. इतरही बहुसंख्य कलाकृतींत, चांगल्याला चांगले म्हणा, वाईटाला वाईट म्हणा, हे असतेच. गब्बर हा खल म्हणूनच सादर झाला पाहिजे. सामान्यत: करमणुकीच्या क्षेत्रात तर चांगल्याचा विजय वगैरे या मार्गानेच कलाकृती जावी लागते, मग ते काम करण्यासाठी लागणारे कौशल्य वापरण्याचे हवे तेवढे स्वातंत्र्य दिले जाते – राजकीय पुढाऱ्यांपासून सगळेच त्या स्वातंत्र्याचे भोक्ते आणि पाठिराखे असतात. कला ही ‘ योग्य ‘ भूमिका मांडण्यासाठी असते, अशी कलेबाबतची एक अत्यंत बावळट, निर्बुद्ध समज याच्या मुळाशी असते. आजही उत्तमोत्तम कलाकृतींची निर्मिती पाहिली तर ती अशी बिनडोक नसते, हे सहज समजू शकते. सतीश तांबे वा राजन खान यांच्या चांगल्या कथा-कादंबऱ्या घ्या. उत्तम कलेत पात्रांचे मूल्यमापन हा मुद्दाच नसतो. पात्रांना चांगले-वाईट ठरवत जाणारा लेखक जगण्याच्या प्रक्रियेचा मोठा आवाका घेऊच नाही शकत. आता, किंग लियर, हॅम्लेट, मॅक्बेथ हे चांगले की वाईट ? पात्रांना चांगले-वाईट म्हणणे ही कलेतली अगदीच बालिश पातळी झाली.

एरवी कुणी याच्या फंदात पडत नाही पण राजकीय प्रवाहावर भले-बुरे परिणाम होण्याची शक्यता असेल तर खूप लोकांना जाग येते. ऐतिहासिक नाटक हे एक तर विभूतिपूजेसाठी किंवा दुष्टपणा उघडा पाडून त्याला शासन करण्यासाठीच असले पाहिजे, अशी आपली भूमिका असते. त्यामुळे त्या क्षेत्रात काहीही मौल्यवान निर्माण होणे अशक्य होऊन बसते. मते, अस्मिता, कट्टरता हे व्यक्त करण्यासाठीच कला असते असे एकदा गृहीत धरले की अभिव्यक्तिस्वातंत्र्य ही एक भातुकली होऊन बसते. इथे तेच, तेवढेच हवे आहे. गोडसेचे विचार मान्य असणाऱ्याने गोडसे सादर करणे आणि ते मान्य नसणाऱ्याने सादर करणे, हा एक भेद आणि त्याची भलावण होते आहे का की नाही हा दूसरा भेद – एवढ्या वर्तुळात आपली विद्वत्ता फिरताना दिसते. मग, एकमेकांना ढोंगी म्हणणे, मग खरे ढोंगी कोण हे ठरवत बसणे – असे ते रंगत राहते. एक तर कला म्हणजे करमणूक असे समजणारे बहुसंख्य लोक

यापलीकडे काही पाहू इच्छितच नाहीत – तसेच आपले ‘ भूमिका ‘ वाले ! त्यांनाही अशा वैचारिक निष्कर्षांतच कला असते, असे वाटते.

मुळात कलावंताचे व्यक्तिगत विचार आणि कला यांचा संबंधच लावत बसू नये. कलाकृतीच पाहावी. एखादा गुन्हेगारही उत्तम कलावंत असल्याची उदाहरणे आहेत. एझ्रा पाउंड हा कवी हिटलर-मुसोलिनीचा चाहता असूनही हेमिंग्वे म्हणतो  की जोवर इंग्लिश असेल तोवर पाउंड असेल !

चांगली सर्जक कला ही आधी मतमतांतरांपासून स्वतंत्र असते. ती जगण्याच्या प्रक्रियेचे समग्र भान घेत जाणारी असते. कोणता तरी वैचारिक साचा वाचकांवर वा प्रेक्षकांवर बिंबवत राहणे, हे तिचे कामच नसते. कलेबद्दल असल्या बालिश कल्पना जोपासणाऱ्या समाजात असले फालतू वाद आणि बोंब चालूच राहणार.

--- 000 ---

गिरीश पतके

मुंबईच्या रुईया महाविद्यालयाने आयोजित केलेल्या, विष्णुशास्त्री चिपळूणकर या व्याख्यानमालेतले दुसरे पुष्प गुंफताना थोड्याच वेळापूर्वी आपले मित्र गिरीश पतके यांनी, ' गेल्या अर्धशतकातली मराठी रंगभूमी ' या विषयावर व्याख्यान दिले. सुमारे सव्वा तासात त्यांनी अनेक महत्त्वाच्या विषयांना आणि प्रश्नांना उलगडण्याचा प्रयत्न केला. याचा एक सविस्तर लेख ते तयार करणार आहेत. तो लेख अभ्यासकांना नक्कीच काही दिशा देणारा ठरेल यात शंका नाही.

अभिनंदन, गिरीश !

--- ००० ---

डॉ. अनिल अवचट

यांचे ७७ व्या वर्षी निधन झाल्याचे कळते. एक विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते आणि लेखक म्हणून ते प्रसिद्ध होते. त्यांच्या लेखनातून मिळालेली एक माहिती आणि गोदावरी परुळेकर यांच्या पुस्तकातली एक माहिती यांचा ' सामसूम ' हे नाटक लिहिताना मला उपयोग झाला होता.

त्यांच्या स्मृतीस सादर अभिवादन !

--- ००० ---

कवी आणि वाचक

स्वत:चा अनुभव व्यक्त करणारे, परिवर्तनवादी, आध्यात्मिक प्रश्नांना सामोरे जाणारे तसेच रूटीन भावभावनांच्या रचनांची गीते लिहिणारे – असे विविध प्रकारचे कवी असतात. तसेच वाचकही विविध आवडींचे, अभिरुचींचे,

अपेक्षांचे असतात. त्यामुळेच, कोणत्याही पूर्वग्रहाशिवाय आणि अपेक्षारूपी मताशिवाय वाचकाने कविता वाचणे हीच त्यातल्या त्यात चांगली प्रक्रिया असू शकते. कवी आणि वाचक यांच्या प्रक्रिया जर वेगवेगळया वा संघर्षात असल्या तर कवितेचे बालिश अर्थ लावले जाणे, हेतूपूर्वक चेष्टा होणे, आपल्याला न समजणाऱ्या कवितेचे गांभीर्य राहूच नये असे तिचे ' प्रामाणिक ' विरूपीकरण करणे, असे प्रकार होऊ शकतात. कवीने एकदा कविता लिहून झाली की तिच्या भवितव्याची काळजी करू नये. कवीने असल्या प्रकारांत बोलायला जाणे म्हणजे त्या कवितेला खुरटवणारे ठरते. तिला मर्यादा घालणारे ठरते. लिहिताना कवीलाही स्वत:ची कविता ' पूर्ण ' कळते, असे होत नाही. त्यामुळे एकूणात त्याने यात न पडणेच चांगले असते. समजा, कविता खुलेपणाने वाचू न शकणाऱ्या वा कवितेवर रागावणाऱ्या वाचकांच्या प्रतिक्रियांमुळे त्या कवितेची वाट लागली तरी कवीने स्वत: गप्पच राहावे. कवितेत असेलच काही आशयद्रव्य तर कदाचित काही गंभीर वाचकांपर्यंत ते पोचूही शकते. यासाठी, वाचकांनी एकमेकांच्या प्रतिक्रियांचा स्वत:च्या वाचनावर परिणाम घडू द्यायचा नाही, हे पाहायला हवे. या कशावरच, अर्थात, कवीचा कोणताच ताबा वा अधिकार असू शकत नाही. हे ओळखून कवीने, आपली कविता फडतूस ते ग्रेट काहीही ठरू शकते हे समजून असावे. कविता एकदा लिहून झाली की वाचकांच्या प्रवाहात तिला सोडून द्यावे आणि तिचे जे काही होईल त्याच्या परिणामापासून स्वत:ला लांब ठेवावे. याची नसेल तयारी तर ' एकट्याच्या ' चिंतनातून येणाऱ्या कविता लिहूच नयेत. आणि दुसरे महत्त्वाचे म्हणजे आपली कविता खुलेपणाने वाचली जात नाही आहे असे वाटत असले तरी पुढील कविता लिहिताना त्याचा आपल्या सर्जकतेवर परिणाम होऊ देऊ नये. थोडक्यात म्हणजे कवीने स्वत: त्याच्या कवितेच्या कोणत्याही, कशाही प्रकारच्या यशापयशाबद्दल टची वा हळवे राहू नये. अमुक करावे, तमुक करू नये, हे काही सल्ले नाहीत. कवितेच्या स्वतंत्र वाढीसाठी हे आवश्यक वाटल्याने सुचवले आहे. ' जो होगा सो होगा ' असा एक सारांशही असू शकतो.

--- ००० ---

सतीश तांबे यांच्या एका प्रश्नावरचे माझे विचार --

वाचकांचे ' वाटणे '

कवीच्या चिंतनात त्याला महत्त्वाचे वाटते ते येत असते -- वाचकाच्या अपेक्षेत ते बसत नसेल तर त्याने ती कविता वाचू नये. पण कवीने काय करायला हवे, वगैरे सांगत बसू नये. कविता वाचकाला ' खरी ' वाटण्याची चिंता कवीने मुळीच करू नये. रूटीन मनाला ' खोटंनाटं / भलतंसलतं / अतिशयोक्त ' वाटणारेच तर असते कलेत. ' ट्रायल ' कादंबरी कोणत्या रूटीन मनाच्या गावी असू शकते ? न-कविता, अतिवास्तववादी कविता ही, फक्त परिवर्तनवादी अपेक्षा ठेवणाऱ्यांना भाषेने केलेली फसवणूकच वाटू शकते. हे पाहून कवीने तीच ती रटाळ री ओढत बसावी ? एखादी कविता निरर्थक, रद्दड म्हणून टाकून देण्याचे स्वातंत्र्य वाचकाला असतेच -- त्यात कवी ढवळाढवळ करूच

नाही शकत. ' नेहमीच्या ' मनाचा ताबा सोडून मुक्तपणे कविता लिहिणे हे आता नवीन राहिलेले नाही. पण, हे मान्यच नसलेले वाचक असू शकतातच.

--- ००० ---

एक कलावंत म्हणून नम्र विनंती

मुळात मी कलावंत तरी आहे का, हा काहींचा प्रश्न असू शकतो, याची मला जाणीव आहे. त्याबद्दल माझे काही म्हणणे नाही. पण, मला स्वत:ला मी लेखक, कवी, कलावंत आहे असे वाटत असल्याने ही पोस्ट लिहीत आहे. खरे तर माझी लेखनप्रक्रिया आणि माणसाच्या जगण्यातले कलेचे स्थान यावर मी अनेकदा लिहिलेले आहे. तरीही, पुन्हा एकदा, इथे काही स्पष्ट करावे, असे वाटते. मी लिहितो त्या सर्व साहित्यप्रकारांबद्दल वेगवेगळे बोलत न बसता, कविता हे माध्यम धरून लिहितो.
मी एकाच प्रकारच्या कविता लिहीत नाही. पण, एक नक्की असते की भावनिक उद्रेक, सांगीतिक लय, पारंपरिक प्रतिमांचे जंजाळ, माझी स्वत:ची सुखदु:खे, मते, विचारप्रणाली वगैरे मांडण्यासाठी वा कुणाला काही पटवून देण्याच्या हट्टाग्रहासाठी मी लिहीत नाही. माझ्या प्रत्येक कवितेतला मी म्हणजे ती कविता लिहिणारा मी आहे, असे नसते. मानवी जगणे, त्यातले संघर्ष, विसंगती आणि भ्रम यांच्या मला दिसणाऱ्या प्रक्रिया मी व्यक्त करत असतो. त्यासाठी मला कवितेचा प्रकार वा घाट कोणताही चालतो – कविता, गद्यकविता, काव्यगद्य, ललित मजकूर असे तुम्ही त्याला काहीही म्हणू शकता. मी ते कविता विभागात घेतो याने कुणीही रागवायचे वा विचलित व्हायचे कारण नाही. ती एक कलात्मक अभिव्यक्ती म्हणून पाहिले तरी चालू शकते. मुळात त्यात काही कलात्मकही नसते असे वाटणाऱ्यांनी त्याचा नाद सोडून द्यावा आणि दुर्लक्ष करावे. कवितेच्या इतर प्रकारांत, वास्तववादी, अतिवास्तववादी, मूर्षात्मक, असंगत, अनियंत्रित, निरर्थक – असे कवितेचे सर्व प्रकार माझ्या लेखनात येऊ शकतात. त्याचप्रमाणे, गंभीर, हलकेफुलके, विनोदी, उपरोधिक असे शैलीचेही अनेक प्रकार असू शकतात. हे असे सगळे ज्यांना चालणारच नसेल त्यांनी या लेखनाचा कृपया नाद सोडून द्यावा. कवितेचा प्रकार आणि घाट यांबद्दल ठरलेल्या आणि आग्रही अपेक्षा असणाऱ्यांनी माझ्या कविता वाचायचा त्रास घेऊ नये.
दैवावर वगैरे मला काही बोलायचे नसले तरी दुर्दैवाने आपल्या वाचकांमधल्या बऱ्याच वाचकांची मने केवळ राजकारणग्रस्त आहेत, असे मला दिसते. प्रत्येक अणुरेणूत तुकारामाला जसा ईश्वर दिसायचा तसेच यांना फक्त राजकारण दिसते. कला ही पूर्ण मानवी जगण्याबद्दल असण्याची शक्यताच त्यांना मान्य नसते. ते स्वत: चोवीस तास मोदी, राहुल गांधी, हिंदुत्ववाद, गांधीवाद, आंबेडकरवाद आणि कोणती राजकीय मते बरोबर वा चूक यातच गुंतलेले आणि गढलेले ( आणि माझ्या मते गाडले गेलेले ) असतात. त्यांनी कसे जगावे याचे सल्ले देण्यासाठी मी लिहीत नाही. त्याचप्रमाणे, मी कसे लिहावे हेही कुणी मला सांगू नये. अभिव्यक्तिस्वातंत्र्य म्हणजे फक्त वेगवेगळी मते व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य नव्हे – ती तर सक्ती ठरेल. मतांमध्ये गुरफटलेले जगत राहण्यामुळे आपण सर्वांचेच जगणे घाण

करत राहतो, हा प्रश्न ज्याला दिसत असेल त्याला त्याही मार्गातले चिंतन व्यक्त करायचे स्वातंत्र्य असायला हवे. अर्थात, ते स्वातंत्र्य मी कुणाकडे मागत नसून घेतच असतो.

माझ्या दृष्टीने एक वेगळाच गंभीर प्रश्न अस्तित्वात येतो तो म्हणजे माझ्या अनेक पोस्टवर काहींच्या राजकीय मतांचे व्यक्त होणे वा माझ्या अभिव्यक्तीला राजकीय अर्थ देण्याचे प्रयत्न होणे. वाचकांनी काय करावे हे त्यांचे स्वातंत्र्य आहे, हे मला समजते. पण, इथे माझ्या पोस्ट खुलेपणाने आणि योग्य त्या गांभीर्याने वाचणारे काही वाचक आहेत. त्यांना विक्षेप निर्माण करण्याचे काम कुणी करू नये, ही नम्र विनंती आहे. राजकीय भूमिका हेच आयुष्य हे ज्यांचे ठरलेले आहे त्यांनी कृपया माझे काही वाचू तर नयेच पण मित्रयादीतूनही वजा व्हावे ही विनंती. कारण मी त्यांच्यासाठी लिहीत नाही. आणि खूप वाचक असण्याचीही या लेखनाला गरज नाही. नुसतेच फाटे फुटणे आणि विषय-आशय सोडून भरकटणे यात सर्वांच्याच वेळेचा अपव्यय आहे. तरीही, सारखे राजकीय विचारांनी ग्रस्त असणे जरा बाजूला ठेवून जे इथले काही वाचू इच्छितात त्यांचे स्वागतच आहे. कुणाचा उपमर्द करायचा हेतू नाही. माझेही सगळे, या पोस्टसह, सगळे राजकीयच आहे, असेही काहींना वाटू शकते – त्यांना  रामराम !

राजकीय मते व निष्ठा स्थगित ठेवून वाचू शकणाऱ्या खुल्या वाचकांना एक विनंती आहे की कृपया कुणाचेही शेरे न वाचता त्यांनी स्वतंत्रपणेच वाचावे.

एवढा कशाला हवाय विचार कोणत्याही लेखनाचा असे ज्यांना वाटत असेल त्यांनीही हाच माझा रामराम समजावा, ही विनंती.

--- ००० ---

०६-०२-२२.

तुम्ही, मी, शंकर वैद्य, पु. शि. रेगे, पु. ल. देशपांडे आणि मर्ढेकर अशा महान लोकांचा कॉमन धागा ( इस्माईल युसुफ कॉलेज ) ! आपणच काय आपल्याला शुभेच्छा द्यायच्या -- तरीही – ( मनीषा कुलकर्णी ).

' शब्दरत्नाकर ' मध्ये किंकाळणे आणि किंचाळणे ही दोन्ही क्रियापदे दिलेली आहेत. तरीही, किंकाळी आहे पण किंचाळी नाहीय. माझ्या एका नाटकाला हे नाव देताना मला क पेक्षा च अधिक त्रासदायक -- कर्कश वाटला होता.

Vidyasagar Adhyapak, Anand Alkunte, Madhurani Gokhle, Prashant TapasvI, Ganesh Sagade.

सध्या लोकांना माहीत असलेले घेतले, इतकेच, नाही तर आणखी खूपच आहेत -- विसरेन कसा ?

खरे मत ? ते माझ्याकडेही नाही आणि तुमच्याकडेही ! कलेच्या प्रक्रियेत मताची किंमत शून्य -- तेच तर मांडलेय !

कोणतीही मतमतांतरे वा कट्टरता अशी ना कलेची जबाबदारी असते ना तिचे कर्तव्य -- असे जगातले अनेक मोठे कलावंत, विचारवंत म्हणून गेलेले आहेत. -- असे म्हणणे हीच एक कट्टरता आहे, असा तर्क यावर सुरू होऊ शकेल ! त्यामुळे, याहून जास्त, तेच तेच बोलत न बसता, ज्याचे त्याने समजून घ्यावे, हे बरे.
कवीच्या चिंतनात त्याला महत्त्वाचे वाटते ते येत असते -- वाचकाच्या अपेक्षेत ते बसत नसेल तर त्याने ती कविता वाचू नये. पण कवीने काय करायला हवे, वगैरे सांगत बसू नये. कविता वाचकाला ' खरी ' वाटण्याची चिंता कवीने मुळीच करू नये. रूटीन मनाला ' खोटंनाटं / भलतंसलतं / अतिशयोक्त ' वाटणारेच तर असते कलेत. ' ट्रायल ' कादंबरी कोणत्या रूटीन मनाच्या गावी असू शकते ? न-कविता, अतिवास्तववादी कविता ही,
फक्त परिवर्तनवादी अपेक्षा ठेवणाऱ्यांना भाषेने केलेली फसवणूकच वाटू शकते. हे पाहून कवीने तीच ती रटाळ री ओढत बसावी ? एखादी कविता निरर्थक, रद्दड म्हणून टाकून देण्याचे स्वातंत्र्य वाचकाला असतेच -- त्यात कवी ढवळाढवळ करूच नाही शकत. ' नेहमीच्या ' मनाचा ताबा सोडून मुक्तपणे कविता लिहिणे हे आता नवीन राहिलेले नाही. पण, हे मान्यच नसलेले वाचक असू शकतातच.
खरे आहे -- वाचकांचे अभिप्राय, आधी लिहून गेलेले लेखक-कवी, इतर कलांचे संपर्क या सर्वांतून लिहिणारा शिकत असतोच. मला तर वाटतेच की माझी कविता मी एकटाच नाही लिहीत -- अनेक लेखक-कलावंत मिळून लिहितो – अर्धवट, सोयीस्कर, आपमतलबी आणि आक्रमक संवेदनशीलता -- हा आहे शाप !
' सोवळी ' हा शब्दच कंडेम करणारा आहे. अशा दृष्टीचा उल्लेख केलेला आहेच. माझ्या लेखनाला काही मारक ठरते असे मला दिसत असेल तर या माझ्या वॉलपुरते बोलायचा मला हक्क आहे. इथे अप्रस्तुत कीचड चर्चा नसावी म्हणून ही पोस्ट दिलेली आहे. आपापल्या वॉलवर वाटल्यास या लेखनाबद्दल फक्त राजकीय लिहीत बसावेसे कुणाला वाटले तर माझी हरकत कशी असेल ?अहो, ते पूर्ण स्वातंत्र्य आहेच ना वाचकाला ! हे लेखन कसे राजकीय आहे वा प्रतिगामीपणाचे आहे वा मानवी समाजाला हानिकारक आहे ते लिहू-बोलू द्या ना कुणालाही -- मी कसा अडवणार ? इथे काही गंभीरपणे, खुलेपणाने वाचणारे वाचक आहेत त्यांना विक्षेप नका आणू, एवढाच आहे मुद्दा. माझ्याच वॉलवर माझ्या कवितेची मोडतोड, नासधूस करण्याचे स्वातंत्र्य मी कुणाला का द्यावे ? आणि मी आग्रही नाही याचा अर्थ हे असले चालवून घ्यावे, असे मुळीच नाही. आता हे माझे म्हणणे चुकीचे आहे असे कुणी म्हणू शकेल पण ते माझ्या स्वातंत्र्यात आणि हक्कात बसणारे आहे. याहून जास्त काय बोलणार ?
अहो, हे अनेकदा स्पष्ट करावे लागते, इतके वातावरण प्रदूषित आहे !
असे होऊ शकेलच -- उदाहरणार्थ अनियंत्रित किंवा अतिवास्तववादी कवितेला बौद्धिक संगती नाही लागत -- ती असायलाच हवी, असा आग्रह तिथे कामाचा नसतो.
०५-०२-२२./ ०६-०२-२२.

विवाद्य

समजा एखादा विषय/प्रश्न विवाद्य आहे. साहजिकच त्यावर अनेक भूमिका असणार. काही मराठी लोक म्हणतील की त्यांतली ' विवेकी ' भूमिका कोणती, ते बघायचे. अर्थातच, सगळेच म्हणणार की आम्हीच ' खरे विवेकी ' !
कोणत्याही समूहावर हेत्वारोप करणे वा हे सगळे राजकीय आहे, असे म्हणणे हे यातून मार्ग निघायला काही उपयोगाचे होणार नाही. ( तसे तर पूर्वी, मुंबईत तरी, सरकारी कार्यालयांत लुंगीबंदी झाली होती, असे आठवते. ते कायद्याने झाले होते की नुसत्याच परिपत्रकाने, आणि मुळात तसे काही झाले तरी होते का – असे अनेक फाटे आणि धागेदोरे यात असू शकतील ). यातली नेमकी विवेकी भूमिका कोणती हे सांगू शकणारे विद्वान आपल्याकडे नाहीत, असे नाही. पण त्यांचा यात फारसा उपयोग नाही. अनेक भूमिकांमध्ये प्रामाणिकपणा, पोटतिडीक आणि प्राणप्रियता असते तेव्हा सर्वच विवेक्यांचे विचार आणि तर्क हे निरर्थक ठरतात. मग काय करावे ? सरळ, भूमिका आणि विवेक यांचा काही उपयोग नाही, हे आधी ओळखावे. हे ओळखण्यात जो शहाणपणा आहे तो कुणाच्याही विवेकापेक्षा श्रेष्ठच असणार आहे. उपलब्ध कायद्याप्रमाणे काय निघतोय मार्ग, हेच फक्त महत्त्वाचे आहे. संविधानभक्ती सगळेच दाखवत आहेत तर हे मान्य होण्यात अडचण येऊ नये. नाही तरी हे प्रकरण कोर्टामध्ये गेलेलेच आहे असे दिसते. थांबावे ना जरा – कशाला हा आरडाओरडा, आगपाखड आणि आरोप-प्रत्यारोप ? आणि समजा कोर्टाचा निकाल काहींच्या विवेकाला पटणारा नाही लागला तर त्यांनी निवडून येऊन संविधानमान्य पद्धतीने कायद्यात बदल करावेत ना !
सगळ्यांच्याच भूमिका विवेकी आहेत असे म्हणून खूप वाद आणि मारामाऱ्या माजवू नयेत, असे वाटते. एक अत्यंत सामान्य नागरिक म्हणून हे मत मांडलेले आहे.

--- ००० ---

माझ्या डोळ्यांत आनंदाश्रू

काल संध्याकाळची घटना आहे. माझी मुलगी-जावई आणि त्यांचा मुलगा चि. आदित्य ( म्हणजे अर्थातच माझा प्रिय नातू जो नुकताच बारावी झालेला आहे. ) एका लग्नाच्या स्वागत समारंभाला गेले होते. कार्यक्रम नात्यातलाच होता. तिथल्या हॉलच्या बाहेर एक पोहण्याचा तलाव होता. तिथे बसू जरा वेळ म्हणून ते तिघे बसले होते. त्या वेळी एक ३-४ वर्षांचा मुलगा त्या हॉलमधून तिकडे आला आणि त्याला काही कळले नसावे -- तो त्या तलावात पडला. हे दिसताच काहीही विचार न करता माझा नातू तिकडे धावला आणि त्याने पाण्यात उडी मारली. त्या छोट्या मुलाच्या पोटात तोवर पाणी गेलेले होते. माझ्या नातवाने त्याला बाहेर काढले ! त्या छोट्या मुलाचे आई-वडील दोघेही डॉक्टर आहेत. त्यांनी योग्य ते उपचार केले आणि तो मुलगा वाचला. ती घटना घडली तेव्हा तिकडे कुणीच नव्हते. हे तिघे तिथे बसलेले असल्याने त्यांना दिसले आणि तो मुलगा वाचला ! त्याचे आई-वडील म्हणाले की याच्या ऋणातून आम्ही कधीच मुक्त होणार नाही ! नंतर त्यांनी ते कायप्पावरही प्रसृत केले.
पुढे बाजूला जाऊन कपडे पिळून माझ्या नातवाने तशाच ओल्या कपड्यांनीच त्या समारंभात भाग घेतला. या प्रकारात भिजून त्याचा मोबाईलही खराब झाला. ते अर्थातच फार किरकोळ आहे. त्या समारंभात चि. आदित्य जणू एक सेलेब्रिटीच झाला होता !

आज सकाळीच माझ्या मुलीने मला हे सगळे फोनवर सांगितले. सांगताना अभिमानाने ती तर सद्गदित झाली होतीच, पण, इकडे माझेही डोळे आनंदाश्रूंनी भरून आले होते !

आमचा चि. आदित्य म्हणजे एक अमूल्य रत्न आहे रत्न ! की हिरा म्हणू -- अधिकच ग्रेट ?

--- ००० ---

मराठीची समस्या

दोनतीन गोष्टी आधीच क्लियर करतो. मला मराठीबद्दल अस्मिता नाही पण ती माझी भाषा असल्याने आत्मीयता आहे. मी मराठीतला एक लेखक/कवी असलो तरीही मला या भाषेतले माझे स्थान कुणितरी निश्चित करून द्यावे याची गरज वाटत नाही. तशी कुवत असलेले समीक्षकही आता नाहीत. मी ज्या कारणासाठी लिहितो तसल्या साहित्याची इथे फारशी कुणाला गरज नाही, हे मला माहीत आहे. स्वामित्वधनाचे पैसे वगैरे याची स्वप्नेही मला पडत नाहीत. राहता राहिली काही घसघशीत रकमेची पारितोषिके. त्यांच्याकडेही मी आशाळभूतपणे पाहात बसलेलो नाही. आणि मुख्य म्हणजे मी आत्ता हे जे लिहितो आहे ते गाढा व्यासंग, अभ्यास आणि पुरावे यांवर आधारित लिहीत नसून माझी इम्प्रेशन्स म्हणजे समजुती यांवर आधारित लिहितो आहे. काहीही बोलले तरी त्यात थोडे तरी तथ्य असतेच, हे याचे आधारभूत तत्त्व समजायला हरकत नाही. पुढे मी जे लिहितो आहे ते नीट वाचले जावे म्हणून हे थोडे सांगितले. मला काहीही सिद्ध करायचे नाहीय वा मी खाली लिहितोय ते कुणाला पटवूनही देत बसायचे नाहीय. हे मुद्दे घ्यायचे तर घ्या विचारात नाही तर द्या सोडून, मेरा काम तो निरपेक्ष चलता रहेगा.

आज मातृभाषा दिन म्हणून मराठीचे यज्ञ ठिकठिकाणी चालू आहेत. यज्ञ शब्द आला म्हणून चिडू नये, भाषेत आहे तो शब्द, त्याला माझा इलाज नाही. इथल्या अर्थापुरताच त्याचा उपयोग केलेला आहे. तर इंग्रजीचे आक्रमण, मराठी शाळा बंद होणे, व्यवहारात या भाषेला फारशी किंमत नसणे, शास्त्रांचे वा तंत्रशिक्षण या भाषेत नसणे, वगैरे प्रश्नांची चर्चा सर्वत्र चालू आहे. मातृभाषेतून शिक्षण व्हायला हवे, हे तर जगातले सगळेच शिक्षणतज्ञ म्हणत असतात. ते माहीत असूनही इथे काय झालीय प्रगती ? त्यामुळे, ज्या गोष्टींवर रडून फारसा काही उपयोग नाही तेच दर वर्षी रडत बसण्यात काय अर्थ आहे ? वाट्टेल ते होवो, मराठी भाषा मरणार नाही, ती जिवंत राहीलच – यात समाधान मानत बसणेही एक प्रकारे सपाटच वाटू लागलेले आहे. आणि ही भाषा जिवंत राहणार हा हमखास दिलासा अधिक कोण वापरते, हेही पाहायला हवे. नवशिक्षित आणि नवसाहित्यिक मंडळींना याची जास्त गरज वाटते, असे दिसते. ओळख मिळवण्याचे हे एक क्षेत्र आता सापडलेय तर ते टिकावे असे एक इच्छाचिंतनही त्यात आहे.

गेल्या काही वर्षांत दलित-शोषित-वंचित-पीडित-ग्रामीण या लेखकांचे बरेच साहित्य मराठीत येत गेले. इथल्याच जीवनाचे जे कप्पे साहित्यात कधी आले नव्हते ते खोलले गेले. त्यात मानवी जगणे पाहात जाणे असे वेगळ्या भानाचेही काही आले असले तरीही, मुख्यत: जगण्याच्या त्या त्या नमून्यांनाच महत्त्व दिले गेले. जगण्याचा कच्चा माल जितका अधिक दरिद्री आणि क्लेशकारक आणि अन्यायकारक तितका साहित्यात तो अधिक मौल्यवान असे

झाले. काही काळ असे होणे साहजिकही होते. पण, आता तो काळ संपत आला आहे. परिवर्तनाच्या सामाजिक-राजकीय चळवळी करत राहणे वेगळे आणि तेच तेच नमूने गिरवत राहात साहित्यात श्रेष्ठ ठरण्याची आकांक्षा बाळगणे वेगळे. साहित्य म्हणजे नुसताच एक वस्तुस्थितीचा ऐतिहासिक ऐवज तयार करणे नव्हे. त्याला एक सांस्कृतिक अंग असते. ते दुर्लक्षिण्याकडे कल होत गेला.

काय असते सांस्कृतिक म्हणजे ? किल्ले, वस्तुसंग्रहालये, काही विभूति आणि उत्सव ? संस्कृतीची ही फारच उथळ कल्पना आहे. संस्कृती म्हणजे जगण्यातल्या प्रश्नांना/समस्यांना सामोरे जात राहण्याची प्रक्रिया. ( त्यांपासून पलायन करण्यासाठी निर्माण होणारे करमणुकीचे प्रकार म्हणजे संस्कृती नव्हे. ) सामोरे जाणे म्हणजे नुसत्याच सुखदु:खांच्या प्रतिक्रिया देत राहणे नव्हे, हे इथे लक्षात घ्यायला हवे. प्रॉब्लेम असा झालेला आहे की त्यासाठी लागणारी चिंतनशीलता यांतल्या बहुसंख्य लेखकांकडे नाहीय आणि तरीही प्रतिष्ठा मिळण्याचे रस्ते गमवायचे नाही आहेत. साहित्य वा कला म्हणून आता त्यांच्या कच्च्या मालाचा कंटाळा येण्याचे दिवस सुरू झालेले आहेत. आणि सांस्कृतिक प्रक्रिया म्हणावे असे तर काही महत्त्वाचे त्यात वाटत नाहीय. संख्येच्या आणि सामाजिक न्यायाच्या जोरावर आजवर आघाडीवर राहता आले, पण ते सतत जमणार नाही. यातून या नवलेखकांत एक न्यूनगंड तयार होऊ लागतो आणि साहित्य म्हणजे ' हे आणि ते ' यांच्यांतली स्पर्धा असते, अशा बावळट कल्पना ते बाळगू लागतात. एखादा विद्वानही तसली कुस्तीची विधाने करण्यात धन्यता मानतो.

अशी अंतर्गत दुश्मनी निर्माण होण्याचे आणखी एक कारण दिसते. ते आहे प्रमाण भाषेचे. बऱ्याचजणांना प्रमाण भाषेवर प्रभुत्व तर मिळवता येत नाही आणि नुसत्याच बोली भाषेत लिहावे तर वाचणार कोण, असा प्रश्न निर्माण होतो आहे. बोली भाषांचे कितीही उदात्तीकरण करा आणि प्रमाण भाषेचा कितीही तिरस्कार करा ( प्रमाण भाषा ब्राम्हणी आहे म्हणूनही तिचा द्वेष असल्याचे कधी कधी दिसते. ब्राम्हणांचा प्रभाव असलेला एक काळ होऊनही गेला, त्यामुळे भाषा प्रभावित झालेलीच आहे, हा भाग वेगळा. ) पण यातून साध्य काय होणार ? उलट या आंतरद्वंद्वात सापडून शक्तिनाश होत राहणार.

सारांश, अनुभवक्षेत्रे आणि प्रमाण भाषा या दोन कारणांमुळे या भाषेत दोन विरोधी गट तयार झालेले आहेत. हे जणू एक छुपे युद्धच सुरू आहे. त्यामुळे, या भाषेत चालणारी मुख्य प्रक्रिया ही आत्मघाताची आहे. " संगमनेरला जायला पुण्याहून संध्याकाळी पाच वाजता एस्टी आहे " – ही भाषा जिवंत राहणे आणि त्यात समाधान मानणे ही आत्मवंचना होईल. जगण्यातल्या प्रश्नांना सामोरे जाण्यासाठी आजची भाषा, आजचे घाट, आजची कौशल्ये वापरली जाणे, भाषेचा अर्थसंपृक्त वापर होत राहणे म्हणजे खरे तर भाषा जिवंत राहणे. भाषेची अभिव्यक्तीची ताकद आणि शक्यता वाढत जाणे आणि समांतरपणे ते सगळे समजून घेण्याची एकूणच समाजाची कुवत वाढत जाणे म्हणजे भाषा जिवंत राहणे. भाषा ही संस्कृतीची वाहक असायला हवी ती या अर्थाने. हे सगळे वगळून भाषा जिवंत राहण्याचा अभिमान वा गर्व वा अस्मिता काय कामाची ?

--- ००० ---

देशाचे आरोग्य

सध्या रशिया-युक्रेन युदधामुळे हे स्पष्ट होते आहे की किती मोठ्या संख्येने आपली मुले शिक्षणासाठी परदेशांत जात आहेत. प्रामुख्याने ही मुले मेडिकल शिक्षणासाठी तिकडे जातात, असे दिसते. अलोपथी हा सर्वांत आघाडीवर असलेला शिक्षण प्रकार घेतला तर दोन प्रश्न दिसतात. सरकारी कॉलेजांत प्रवेश मिळणे अशक्य होणे आणि खाजगी कॉलेजांत फीचे प्रमाण प्रचंड असणे. नुसत्या पदवीधर डॉक्टरला व्यवहारात फारसा वाव नाही राहात, म्हणजे त्याला एम. डी. व्हावे लागते. ते होईपर्यंतचा खर्च तीन कोटींपर्यंत जातो, असे कानावर येते. याचा अर्थ असाच होतो की साधी सर्दी झालेला पेशंट आला तरी डॉक्टरने त्याला मेंदूचे ऑपरेशन करायला सांगावे. अन्यथा झालेल्या खर्चाचे व्याज तरी मिळू शकेल का ? मध्यंतरी एका मालिकेत असे दाखवले होते की डॉक्टर्स एका मेलेल्या पेशंटचे हार्टचे ऑपरेशन करायला सांगत असतात – अर्थात तो मेलेला आहे, हे लपवून ! मला हे खोटे वा काल्पनिक नाही वाटत. असे प्रकार कमीजास्त तीव्रतेचे घडतच असणार आहेत. " आमचा गरीब माणूस " असा ऊठबस गरिबाबद्दल कळवळा व्यक्त करणारे आपले पुढारी आणि अर्थातच शिक्षणसम्राटही यांना हे कळत नसेल ? की बरेचसे पुढारीच आहेत शिक्षणसम्राट ? किती लोकांना किती डॉक्टर्स असायला हवेत त्याचे प्रमाण सांगितले जाते. त्याच्या जवळपास तरी आपण आहोत का ? नुसतीच ' शाहू-फुले-आंबेडकर ' ही जपमाळ ओढत राहून काही उपयोग नाही. आरोग्य व्यवस्था सर्वांसाठी चांगली असावी, हे पाहायलाच हवे. ( हे नेहमीच्या रोगांचे झाले, मानसिक आजारांसाठी काय आहे व्यवस्था ? अंगारे-धुपारे आणि मांत्रिक हेच ना ? )

दुवक्त कॉलेजेस

मागेही एकदा मी हा उपाय सुचवला होता. प्रवेश देणे आता आहे तसेच चालू द्या. उरलेल्यांसाठी रात्रपाळीची चालू द्यात कॉलेजेस. काही चांगली सरकारी आणि खाजगी कॉलेजेस यांना हे सक्तीचे करावे. तीच, आहेत तीच संसाधने वापरून अधिकच्या खूप विद्यार्थ्यांना संधी मिळू शकेल. संसाधने आहेत तीच वापरायची असल्याने खर्चही कमी येईल. मुलांना बाहेरचे देश शोधावे लागणार नाहीत. असेही ऐकण्यात आले की बाहेरच्या काही देशांतले शिक्षण आपल्या इथल्या दर्जाचे नाही आहे. हा अमुक देशात शिकलेला आहे, हा आरक्षणातला आहे – असे भेदभाव न करता, बाकीचे जाऊच द्या, हे पुढारी आणि शिक्षणसम्राट तरी स्वत:साठी व स्वत:च्या कुटुंबियांसाठी डॉक्टर्स निवडतात का, याचीही तपासणी व्हावी. इथल्या शिक्षणाच्या चाकोरीतून बाहेर पडलेले सगळे समानच समजले जायला हवेत.

सारांश, दुवक्त कॉलेजेस सुरू केली तर या प्रश्नावर उपाय निघू शकतो. आणि इतक्या मोठ्या देशातली मुले शिक्षणासाठी दरदर भटकत जगभर कुठेही जातात, ही नामुष्कीही कमी होऊ शकते.

एक सामान्य नागरिक म्हणून हे लिहिले आहे. तज्ञ लोकांनी यातल्या खाचाखोचा ओलांडून अधिक सफाईदार कार्यक्रम तयार करता येईल. नुसतेच वरवरचे प्रश्न सोडवत बसण्यापेक्षा थोड्याफार प्रमाणात मुळातलेही काम होत राहायला हवे, असे वाटते.

--- ००० ---

## समानता

सगळे देश सारखे कुठे असतात ? काही महासत्ता असतात, काही महासत्ता होण्याची आकांक्षा बाळगणारे असतात तर काही, आपापला वकूब आणि शक्ती ओळखून धोरणे आखत जगणारे असतात. शिक्षक आणि डॉक्टर हे सारखे नाहीच असू शकणार. दुकानदार आणि शास्त्रज्ञ सारखे कसे असतील ? पानपट्टीचा दुकानदार आणि टीव्ही-वॉशिंग मशीन यांचा दुकानदार हे सारखे कसे असतील ? खेड्यातला प्राथमिक शिक्षक वेगळा आणि इंजिनियरिंग कॉलेजातला प्राध्यापक वेगळा. नुसती कुटुंबे हा विभाग घेतला तरी काही सधन आणि काही गरीब हे भेद असतात. काही कुटुंबांत मुले जास्त असतात, काहींचे कुटुंबप्रमुख व्यसनाधीनतेत सगळे उद्ध्वस्त करणारे असतात. काही अपंग, आजारी असतात तर काही अकाली मृत्यू पावलेले असतात. याचाच अर्थ, विषमतेची असंख्य कारणे असू शकतात आणि दृश्य समानता हा एक भ्रम असतो. अन्न, पाणी, निवारा, आरोग्य आणि शिक्षण यांच्या संधी तरी समान उपलब्ध असतात का ? सामाजिक स्तरावर हे सर्व सर्वांना उपलब्ध असणे हे साधारणपणे साध्य होऊ शकते, असे म्हणता येईल. सरकारी संस्था, खाजगी संस्था, सरकारी इस्पितळे, खाजगी इस्पितळे – हे असे फरक असतातच. सामाजिक अन्यायामुळे मागे पडलेले लोक ही एक मोठीच समस्या असते आणि ती नष्ट व्हायला हवी, हे सर्वांनाच पटत असते. तसे प्रयत्नही चालू असतात. सतीची चाल, केशवपन हे बंदच व्हायला हवे होते. स्त्रियांनी वा समाजातल्या अमुक एका वर्गाने शिक्षण घ्यायची गरज नाही – हे हटवणे आवश्यकच होते. ते घडले आणि घडते आहे. स्त्रियांनी अमूकच एखाद्या क्षेत्रातले शिक्षण घ्यावे, असेही आता फारसे बंधन राहिलेले नाही. शारीरिक शक्ती वा भेद यांचेही आता फारसे स्तोम माजवले जात नाही. तरीही, सर्व मुलांना-मुलींना हवे ते शिक्षण मिळणे, एका उत्तम दर्जाचे शिक्षण मिळणे, असे काही घडत नाही. मानवी जगण्यातले विषमतेचे आणि अन्यायाचे आविष्कार पूर्ण नष्ट होऊ शकतात का, हा एक प्रश्नच आहे.

प्रत्येक व्यक्ती वा प्रत्येक कुटुंब यांचे जगण्याचे नमूने वेगवेगळेच असणार. परिस्थिती, क्षमताही वेगवेगळ्याच असणार. पूर्ण समानता म्हणजे वेगळेपणाचा अभाव, हे लक्षात घेतले तर तसे कधीही नाही घडणार, हे समजून घ्यायला हवे. वेगळेपणा हा नुसता वेगळेपणा नसतो तर तुलनात्मक असतो. खेड्यातल्या शिक्षकापेक्षा शहरातला डॉक्टर श्रेष्ठ – असे भेद आपण कामाच्या स्वरूपावरूनही पाडलेले असतात. पुढाऱ्याला मान द्यायचा पण कारकुनाला नाही – हे भेदभावाचे मूल्यमापन समाजमान्य असते. कामावरून माणसाचे मूल्य ठरवणे हा मनाचा रोग गेल्याशिवाय न्याय, स्वातंत्र्य आणि समता येणार कुठून ?

त्यामुळे, समानता ही वेगळेपणासहच असावी लागेल, हे समजून घ्यायला हवे. काम, यश आणि आर्थिक प्राप्ती आणि मुख्य म्हणजे सत्ता – यांवरून जोवर माणसे झुकतात वा मग्रूर राहतात तोवर अपेक्षित समानता शक्य नाही. याचाच अर्थ, मिळेल त्या संधींचा लाभ घेत स्त्रियांनी वा पुरुषांनी आपापली सर्जकता – कोणत्याही क्षेत्रात कल्पकतेने, जोमाने काम करण्याची कुवत कमवायला हवी. समानता आणखी दहा वर्षांनंतर येणार आहे, ही कल्पनाच टाकून द्यावी आणि आजपासूनच समानतेनेच जगायला सुरुवात करावी. समानता ही वेगळेपणातल्या तौलनिक प्रतिष्ठेत नसून आपापले काम आवडीने, प्रेमाने करत राहण्यातच आहे, हे लक्षात घ्यावे. काही सामाजिक समजुती व दडपणे यांमुळे येणारे अडथळे दूर होत आहेत, झालेही आहेत. तौलनिकता आणि समानता यांच्यांतले संबंध नीट समजणे ही सर्वांत महत्त्वाची गोष्ट आहे. ‘ मी ‘ इतर प्रत्येकाचे मूल्य कसे ठरवतो याकडे आपले लक्ष असायला हवे.

--- ००० ---

०८-०३-२०२२.

हिंदुत्ववादी कला, पुरोगामी कला, मध्यमवर्गीय कला, ग्रामीण कला, शहरी कला अशी विभागणी करत कला ' आस्वादणारे ' वेडे म्हणजेच एकूणच कलेचे कर्दनकाळ दिसू लागतात तेव्हा कवितेतून ते असे व्यक्त होते. हा उपरोध दुर्लक्षून ही कविता वाचण्याचा काही उपयोग नाही. या कवितेपासूनच तुम्ही आधी मुक्ती मिळवावी, हे बरे !

कला म्हणजे कलावंताच्या स्वभावातून -- त्याच्या मानसिक ठेवणीतून उगवणारी संकुचित रोपटी, असे ज्या ज्या भूमिकावाल्यांना वाटते त्यांना माझ्या कवितेतला आणि तुमच्या कोमेंटमधला उपरोध लागू आहे !
' ओलांडणे ' महत्त्वाचे -- हे मान्य !

मूर्छावाद हा मी काही ऐकलेला नाही पण मराठीत तो अप्रत्यक्षपणे लोकप्रिय आहे, असे फार तर म्हणता येईल. 😊
आणि मृषावाद म्हणजे absurdity. ती जगभर माहीत आहे.

सीडॅक ने केलेल्या मराठी युनिकोडमध्ये हे अक्षर तर होतेच पण शिवाय प्रत्येक अक्षराची बटणे ठरलेली होती. इथे मात्र निवड करावी लागते किंवा लिहून झाल्यावर दुरुस्त्या करत बसावे लागते. एकदा जमलेले काम या गुगलवाल्यांना का जमवता नाही येत, हे एक गूढच आहे. त्यांना पैसे कमी पडत असले तर आपण वर्गणी काढू पण हे काम व्हायलाच हवे आहे.

शिवीच्या आगेमागे जी मोकळी स्पेस असते तीही शिवीच असते -- याहून अधिक ज्ञान हवे असेल तर ते फक्त आत्मचिंतनातूनच मिळू शकेल –

समस्या निर्माण करणे हेच मनाचे ' असणे ' आहे -- इकडे लक्षच न देणे –

मनाचे संबंध अर्धवट, आपमतलबी, संघर्षमय आणि विदीर्ण का, याकडे पाहावे –

09-03-22.

यशपूजकता आणि आळशीपणा यांतला जो संबंध इथे दाखवलेला आहे तो अर्थपूर्ण आहे ! ( सतीश तांबे ).

म्हणजे, संधीतली समता नाकारली जावी, असा अर्थ होतोय या पोस्टचा ? धन्य ! तुम्हाला ही पोस्ट कळलेली नाही, हे माझे मत सांगून तुमच्याशी चर्चा संपवतो. धन्यवाद !

ठीक आहे -- आता तुमचे आणि माझे वाचून आपले मित्र काय समजून घ्यायचे ते पाहतील –

०८-०३-२०२२.

शाब्दिक व्यंगचित्रे काढतोय ! त्या लाईट पद्धतीनेच वाचले जावे -- पण, कुणाच्याही बाजूने भूमिका घेणाऱ्यांना वेगळे वाटू शकते याची जाणीव आहे !

कोणतीही मानसिकता अर्धवट आणि हिंसकच असते -- म्हणून तर मला जिथेतिथे अबसर्डिटीचे दर्शन होत असते !

माझ्या कोणत्याही मित्रांच्या मतांना मी बांधील नाही -- मला दिसणारी अबसर्डिटी व्यक्त करायचे मला स्वातंत्र्य असावे, ही विनंती. भावनिकपणे इकडे वा तिकडे गुंतण्यात मला अबसर्डिटी दिसते, त्याला काय करणार ?

हे एक वेळ तथाकथित धार्मिकांच्या डोक्यात शिरेल, पण, पुरोगाम्यांना कळणे अवघड दिसते.

( श्रीधर तिळवे यांच्या पोस्टवरची कॉमेंट ).

14-03-22.

माझे प्रतिगामी असणे

अमेरिकेचे ट्विन टॉवर्स अतिरेक्यांनी पाडल्यानंतर अमेरिकेचे अध्यक्ष म्हणाले की आता आमचे अतिरेक्यांविरुद्ध युद्धच सुरू झालेले आहे. जे या युद्धात आमच्याबरोबर असतील ते ठीकच पण जे आमच्याबरोबर असणार नाहीत ते अतिरेक्यांबरोबर आहेत, असे आम्ही समजणार ! आपल्याकडच्या बऱ्याच पुरोगाम्यांचे हेच असते तत्त्वज्ञान ! तुम्ही आमच्यासारखे विचार मांडा नाही तर आम्ही तुम्हाला प्रतिगामी म्हणणार ! याला घाबरून, माझी ‘ खरी ‘ प्रतिगामी प्रतिमा लपवत, बोटचेपेपणाने लिहीत त्यांच्याही टाळ्या आणि बक्षिसे मिळवण्यासाठी मी खोटेपणा करत राहतो, असे काहींना वाटत असल्याचे दिसते. मुळात समोरच्या लेखनापेक्षा लेखकाचेच मूल्यमापन करायची अत्यंत निरर्थक आणि रोगट सवय हे तर एकूणच मराठीचेच वैशिष्ट्य म्हणता येईल, अशी परिस्थिती आहे. ते काहीही असो, मी असल्या खोट्या टाळ्यांची स्वप्ने कधी पाहिली नाहीत आणि पाहातही नाही, हे स्पष्ट करणे आवश्यक वाटते.

फेसबुकवर आणि त्याबाहेरही, इतके लिहूनही ही असली शंका या लेखनाबद्दल घेतली जाणे हे या लेखनाचे अपयशच आहे. तरीही, हा मुद्दा अधिक स्पष्ट करण्यासाठी एक विनंती करू इच्छितो. माझी एक वेबसाईट ( संकेतस्थळ ) असून त्याच्या पहिल्याच पानावर मी जाहीरपणे काय लिहिले आहे ते कृपया वाचावे. कोणत्याही लेखकाकडून पुरोगाम्यांच्या ज्या काही अपेक्षा असतील त्या सर्व मी नाकारलेल्या आहेत. मी त्यासाठी लिहीत नाही, हे स्पष्ट सांगितलेले आहे. त्यामुळे, मला कुणी प्रतिगामी म्हणेल की काय याच्या काळजीत मी असतो, असा गैरसमज नसावा. संकेतस्थळ -- www. Champralekhan.com

आता पुरोगाम्यांबद्दल एक प्रश्न – कलाच काय माणसाचे सगळे जगणेच राजकीय असते, असे प्राणपणाने सांगणारे हे लोक ‘ कश्मिर फाइल्स ‘ हा सिनेमा राजकीय आहे, हा दोष म्हणून कसा सांगतात ? म्हणजे बिगर राजकीय कला खरी अर्थपूर्ण असते, असेही त्यांचे आणखी एक मत असते का ?

आणखी एक प्रश्न – धार्मिक ध्रुवीकरण टाळले जायला हवे, असे म्हणणारे हे लोक, उलट, तशा ध्रुवीकरणाला गतीच देतात, हे त्यांना समजतच नाही का ? ते ‘ दुसरी बाजू ‘ लढवतात, तेव्हा काय घडते ?

--- ००० ---

17-03-22.

विचार करा ना जरा -- दोन बाजू लढवल्या जात राहणे, हेच ध्रुवीकरण नाही का ?

मुळात तर्कशुद्ध भूमिका असे काही नसते -- प्रत्येक भूमिका अर्धवट आणि पूर्वग्रहाचीच असते. एक तर मूक प्रेक्षक बना नाही तर तेढ वाढवा या दोन्हींतूनच निवड करायची हे नक्की आहे तर चालू द्या. ' काय नेमके करायचे ' अशी निराकरणे तुमच्याकडे आहेत आणि इतर काही भूमिकावाल्यांकडे त्यांचीही निराकरणे आहेत. मग, आहे ते चालू ठेवा, दुसरे काय !

17-03-22.

कलेची मूल्यात्मता

कलेची मूल्यात्मता ही नुसतीच रचनेच्या कौशल्यावर अवलंबून नसते तर तिच्यातल्या आशयावर अवलंबून असते. दुसरे एक महत्त्वाचे तत्त्व म्हणजे कलेतली मूल्यात्मता ही एका एका गटापुरती मर्यादित नसते तर ती पूर्ण मानवजातीसाठी असते.

ही पोस्ट लिहिण्याचे कारण म्हणजे, ‘ कश्मीर फाइल्स ‘ या चित्रपटावर लिहिलेली माझी पोस्ट. ती पोस्ट माझ्या काही मित्रांना गोंधळाची वाटली. त्यांना मी खालील उत्तरे दिली --

“ या चित्रपटाच्या विषयाबद्दलच मतभेद आणि गोंधळ असणे, हा एक मुद्दा, प्रत्यक्षात चित्रपट पाहताना काय घडते आहे, हा दूसरा मुद्दा आणि मग या समस्येचे आकलन वा तिच्यापासून मुक्ती म्हणजे काय, हा तिसरा मुद्दा -- या मार्गाने ' सगळे ' पाहिले आहे. कदाचित काही व्यक्तिगत मतांची आग्रही अपेक्षा ठेवल्यामुळे तर हे गोंधळाचे वाटत नसेल ? “

“ मानवी बुद्धी असल्या समस्यांवर कशी निकामी आहे, ते जर दिसत असेल तर ते का म्हणायचे नाही ? कुणी कशी मात करावी हा एक मार्ग झाला, पण, समस्येला आपले मन घडवते याचा निर्देश करणे महत्त्वाचे आहे. एक काही पक्के ठरवून बोंबलत युद्धे करत सर्वांच्या जगण्याचा विध्वंस करत राहणे हा जर शहाणपणा नसेल तर समस्येकडे पाहायलाच हवे. आपल्या आणि इतरांच्या मनांची चिरफाड करत जगणे, हेच ' नॉर्मल ' म्हणावे का, हा प्रश्न येतोच. हा प्रश्न कोणत्याही समाजाला नाही पडत, व्यक्तीला पडतो. व्यक्तीच्या प्रत्येक संबंधात ही समस्या उपस्थित असते. “

‘ कश्मीर फाइल्स ‘ हा चित्रपट नक्कीच एक बाजू घेणारा, एक भूमिका घेणारा आणि या अर्थाने राजकीयही आहे. पण, आपल्याकडच्या बऱ्याच लोकांचे हेच म्हणणे असते की कला अशीच असायला हवी. त्यांनी हा सिनेमा राजकीय आहे म्हणून रडण्यात काही अर्थ नाही. इथे त्यांची मांजरी पिशवीतून बाहेर येऊ शकते. त्यांना म्हणायचे असते की कला माझ्या मताची, मला योग्य वाटणारी अशी बाजू घेणारी आणि त्याला अनुकूल असे राजकारण करणारी असायला हवी. हे काही कलेचे मूल्य होऊ शकत नाही. ती एका एका गटाची निवड असू शकते.

या दृष्टीने पाहता, ‘ कश्मीर फाइल्स ‘ हा चित्रपट मौल्यवान ठरत नाही. तो एका गटाची निवड निश्चितच असू शकतो. माझ्या मते, बाजू आणि भूमिका घेणारी कोणतीही कला मौल्यवान असू शकत नाही. दुर्दैवाने, नायक आणि खलनायक अशा द्वंद्वापलिकडे आपली समज जातच नाही. करमणुकीचे बरेच चित्रपट, नाटके वगैरे याच तत्त्वावर आधारित असतात. पूर्ण मानवजातीसाठी त्यातून मूल्यात्मक वा सांस्कृतिक काही घडू शकत नाही. याच कारणाने इथे डोक्यावर घेतले गेलेले, ‘ उद्ध्वस्त धर्मशाळा ‘ हे नाटक मूल्यात्मक ठरू शकत नाही. जिथे अन्यायित गट आणि अन्याय करणारा गट अशी विभागणी असते आणि त्यावर आधारित रागलोभ असतात त्या कलाकृती यामुळे दर्जेदार ठरू शकत नाहीत. कारण, मानवी संबंधांचा समावेशक, व्यापक आणि पूर्वग्रहविरहित आवाका घेण्याची त्यांची इच्छाही नसते, समजही नसते. याच पद्धतीने सर्वच कलेकडे पाहायला हवे. जे जे दलित वा वंचितांचे साहित्य अशा सुष्ट-दुष्ट विभागणीवर आधारित असेल तेही यामुळे कमी दर्जाचे ठरते. याच कारणाने, विभूतिपूजक कलाही मूल्यात्मतेपासून दूरच राहते. गांधी, आंबेडकर, फुले, कर्वे, छ. शिवाजी महाराज, गजानन महाराज, तुकाराम महाराज यांच्यावरच्या कलाकृती मौल्यवान असू शकत नाहीत. मानवी संबंधांतली गुंतागुंत, माणसाची घडण, त्याचे पूर्वग्रह बनण्याची प्रक्रिया यांचा आवाका त्या कलाकृती घेत नाहीत. मी, माझी ओळख, माझा समाज, माझी अस्मिता अशा वैचारिक सापळ्यातून तत्त्वज्ञान सांगणाऱ्या कोणत्याच कलाकृती या मौल्यवान वा सांस्कृतिक असू शकत नाहीत. कोणतीही मते वा पूर्वग्रह माणसाला परिपक्वता नाही देऊ शकत. त्यासाठी कलावंताकडे निरपेक्ष भान असावे लागते. या बाबतीत जगातले अनेक मोठे कलावंत बोलून गेलेले आहेत. पण, ‘ मतवाले हम ‘ म्हणून आत्मगौरवात मग्न असलेले कुणीही ते विचारात घेणार नाही.

इथे व्यक्त झालेले हे आकलन अनेकांना आवडणार नाही. आपापले आकलन जरूर मांडावे, पण, एकमेकांना शिवीगाळ वा व्यक्तिगत मूल्यमापन करायचे प्रयत्न टाळावेत. एखादी गोष्ट समजून घेण्याची प्रक्रिया, असे याकडे पाहू. यासाठी आवश्यक तो स्तर सोडून कुणी बोलू लागल्यास ते बोलणे उडवण्यात येईल आणि तशा व्यक्तीस ब्लॉक करण्यात येईल. विषयाचे गांभीर्य राखून बोलावे, ही विनंती.

--- ००० ---

प्रकाशनासाठी आवाहन

पुस्तक : --- ‘ तंबाखूची टपरी ‘ ( अनुसर्जित कविता ) – चं. प्र. देशपांडे.

जगातल्या अनेक कवी-कवयित्रींच्या कवितांचे मराठीत अनुवाद असलेले हे पुस्तक आहे. सुमारे २०० पानांचे. पाहण्यासाठी ते माझ्या www.champralekhan.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

कामाचे स्वरूप

१. हे पुस्तक अभ्यासासाठी व अकादेमिक कारणांसाठी खाजगी वितरण या स्वरूपात असेल. ते विक्रीसाठी असणार नाही.

२. त्याच्या १०० प्रती काढायच्या असून त्याचा खर्च मी स्वत: देणार आहे.

३. त्यांतल्या ७० प्रती मी दिलेल्या यादीतील व्यक्तींना, त्यांचे पत्ते मिळवून प्रकाशकाने परस्पर पाठवायच्या आहेत.

४. १५ प्रती प्रकाशकाला व १५ मला मिळतील.

५. या पुस्तकाला मुखपृष्ठ लागणार नाही. नुसते नाव व अनुसर्जकाचे नाव, एवढे बास.

६. सर्व मजकूर ब्लर्बसह मुद्रितशोधन झालेला युनिकोडमध्ये तयार आहे.

७. या पुस्तकाची निर्मिती अत्युत्तम नको पण चांगली आणि वाचनसुलभ असावी.

८. हे काम करून देणाऱ्याचे नाव प्रकाशक म्हणून देण्यात येईल.

--- हे काम करू इच्छिणाऱ्यांनी खालील बाबी स्पष्ट करून त्यांच्या ऑफर्स माझ्या champrade@gmail.com या ईमेलवर कळवाव्यात --

हे काम किती दिवसांत पूर्ण करणार, मी याचा खर्च किती व कधी द्यावा लागेल.

पुस्तक प्रकाशनाचा काही पूर्वानुभव असल्यास तोही कळवावा.

आलेल्या ऑफर्समधून निवड करण्याचा अधिकार अर्थातच माझाच असेल.

वाट पाहात आहे. धन्यवाद !

--- ००० ---

champralekhan.com

www.champralekhan.com

प्रा. विजय कारेकर

३५ वर्षे मैत्री असलेला माझा मित्र प्रा. विजय आज गेल्याचे कळले. कित्येक भेटी, गप्पा, वाचने, चर्चा आणि शिवाय बार बार साहित्य-कला समाचार यांत आम्ही अनेकदा एकत्र होतो. तो एस. पी. कॉलेजात तत्त्वज्ञानाचा प्राध्यापक

होता. नंतर तो टिळक महाराष्ट्र विद्यापीठात डीनही होता. अनेक विषयांवर त्याच्याशी बोलणे फलदायी होत असे. भरताचे नाट्यशास्त्र, सार्त्रचा अस्तित्ववाद आणि जे. कृष्णमूर्ती हे त्याचे खास अभ्यासाचे विषय होते. या विषयांवर त्याने अनेक ठिकाणी व्याख्यानेही दिली. तो स्वत: एक उत्तम कवी, नाटककार आणि चित्रकारही होता. ' स्वगत ' आणि ' छळछावणी ' या त्याच्या नाटकांचे प्रयोग अनेक स्पर्धांतून झाले. त्याने काही उत्तम कथाही लिहिल्या होत्या. अत्यंत बुद्धिमान आणि हरहुन्नरी मित्र !

एकदा एका नाट्यलेखन स्पर्धेत मी एक परीक्षक होतो. सुमारे १००-१२५ संहिता आल्या होत्या. नावेबिवे नव्हती. ' स्वगत ' वाचताक्षणी म्हटले हे कुणी परिपक्व माणसाने लिहिलेले आहे ! ते नाटक स्पर्धेत पहिले आले ! नंतर कळले की ते विजयचे आहे ! याचाच अर्थ, आपल्याला नक्कीच नाटकातले काही कळत असणार याबाबत माझी खात्री झाली !

विजय, दिलीप जगताप आणि मी असे आमचे त्रिकूट होते. एकमेकांची नाटके पाहणे आणि त्यांवर साधक-बाधक बोलणे हे आमचे व्रतच होते. आपल्या जगण्यात अनेकजण समजुतीची, ज्ञानाची भर टाकत असतात. अशा व्यक्ती आपल्या मैत्रीत असणे हे तर भाग्याचेच असते. विजय त्यांतला एक, तसा होता.

विजयच्या स्मृतीस मैत्रीपूर्ण अभिवादन !

--- ००० ---

## वास्तव, भ्रम आणि सत्य

९५ व्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष भारत सासणे साहित्याच्या प्रांतात उभे राहून बरेचसे साहित्याबद्दल बोलले ही एक स्वागतार्हच बाब म्हणावी लागेल. त्यांचे भाषण अनुभव, वाचन आणि अभ्यास यांसह स्वत:च्या चिंतनावर आधारित होते. त्यामुळे एकूणात ते गंभीर होते. त्यांच्या दमदार आवाजाने आणि स्पष्ट वाणीने ते खूपच प्रभावी झाले होते. अशा भाषणांची लोकांची सवय जात चाललेली आहे. मंडपातल्या श्रोत्यांत तर चुळबूळ दिसत होतीच पण, व्यासपीठावर असलेल्यांपैकी शरद पवार सोडून आणखी कुणाचे त्या भाषणाकडे नीट लक्ष होते का याची शंका येत होती. अध्यक्षांच्या भाषणाला ( महत्त्वच नसल्याने, नेहमीप्रमाणे ) उशीर झाला होता असे वर्तमानपत्रातल्या बातमीवरून समजले. उद्घाटनाच्या भाषणाने जास्त वेळ खाल्ला की काय ? तसे असले तरी, शरद पवार, अध्यक्षांचे भाषण ऐकायला पूर्ण वेळ थांबलेले होते, हे खास नोंद घेण्याजोगेच होते.

" साहित्यिकांनी कोणत्याही विचाराधारेला बांधील नसावे. कारण अशा बांधिलकीतून मतप्रणाली तयार होते. ती बुद्धिभेद करणारी, ध्रुवीकरण करणारी, विषारी स्वरूपाची आणि राष्ट्रहिताला बाधा आणणारी असू शकते. समान अंतरावर राहून त्याकडे त्रयस्थप्रमाणे पाहावयास हवे. " – हे शरद पवारांचे विवेचन खास महत्त्वाचे ठरावे, असे आहे. नोबेल विजेता गाओ झिंगझिआन जे लेखकाच्या दूरीभावाबाबत बोलला होता त्याच्याशी हे साम्य सांगणारे वाटते. मत म्हणजे सत्य नव्हे हेही यातून सूचित होते.

याउलट सासण्यांचे भाषण मात्र या बाबतीत गोंधळलेले वाटते. कदाचित नेमाड्यांचा वास्तववाद त्यांना नाकारायचा होता म्हणून असेल, वास्तवाबाबत ते असे म्हणाले की एकच एक असे वास्तव नसते. या विवेचनात त्यांनी वास्तववादाचा पायाच उखडला. नंतर ते असे म्हणाले की हे भ्रमाचे युग आहे. सामान्य माणूस भ्रमित होतो आहे. कोण सामान्य माणूस ? आर्थिक दृष्ट्या कमकुवत असणारा की ब्राह्मण सोडून इतर सर्व जातिधर्मांचा समुदाय की महाविद्यालयीन शिक्षणापासून वंचित राहिलेले लोक ? आणि लेखक-कवी-कलावंत या सामान्य माणसात येतात की नाही ? जर  तेही यात येत असतील तर, लेखकाने सत्य मांडले पाहिजे म्हणजे काय ? त्याचा भ्रम प्रामाणिकपणे मांडणे ? की साहित्यिक-कलावंत हे जन्मानेच ‘ सत्य समजलेले ‘ असतात ? की त्यांना काही साक्षात्कार झालेला असतो ? की ते इतरांपेक्षा जास्त विचार करतात म्हणून त्यांना जास्त समजते ? आणि वास्तवच मुळात एकच एक नसेल तर सत्य म्हणजे काय ? एकीकडे जुनाच मायावाद नव्या भाषेत मांडायचा पण सत्यासाठी अध्यात्माकडे न जाता साधेच एखाद्या मतप्रणालीकडे यायचे, असा हा खोटा गंभीरपणा (   mock seriousness ) दिसतो. अध्यात्म टाळायचेच होते तर सत्य असे काही नसतेच अशा मृषेकडे ( absurdity कडे ) जाता आले असते. पण सासण्यांनी, शेवटी सत्याची कास सोडून एक भ्रमच सत्य म्हणून स्वीकारायचे ठरवलेले दिसते. समजा विदूषकाच्या हातात सत्ता जाणे वाईट आहे पण कोण विदूषक आणि कोण जाणकार यावर मतभेद असतात त्याचे काय ? आणि लोकशाहीत बहुमत हे सत्य मानायचे ठरवले तर लेखकाने कोणते सत्य मांडायचे ?
ते काहीही असो, साहित्य, कला या प्रांतात नुसताच राजकीय मतांचा गदारोळ महत्त्वाचा नसतो तर वास्तव, भ्रम, सत्य असे तात्त्विक विषयही महत्त्वाचे असतात, हे या भाषणात अधोरेखित झाले. पवार साहेबांच्या आकलनाप्रमाणे सत्य हे एखाद्या मतात नाही असू शकत तर सासण्यांच्या आकलनाप्रमाणे ते मतातच असते. सासण्यांच्या कथा आठवल्या तर सासणे स्वत:चे हे आकलन ओलांडतात, असे दिसते. हल्ली हे इतके वैचारिक झेपण्याचा काळच नाहीय. त्यामुळे, माझा हा तात्पुरता गोंधळ इथे मांडून टाकला, इतकेच.

--- ००० ---

## तंबाखूची टपरी

मुळात आपल्याला हे जमेल का, इथपासून, आज होईल, उद्या होईल असे होत होत आपोआप दिवस कोणता आला तर ' जागतिक पुस्तक दिन ' ! २३ एप्रिल २०२२ रोजी हे पुस्तक, कोणत्याही समारंभाशिवाय, प्रकाशित झाले ! हे काम, कुठेतरी नोंद असावी, कुणाला तरी माहीत असावे, या किरकोळ इच्छेतून मी स्वखर्चाने केले आहे. याच्या मोजक्याच प्रती काढलेल्या असून हे फक्त खाजगी वितरणासाठी आहे. विक्रीसाठी नाही. त्यामुळे, कृपया, कुणीही मागणी करण्याचा प्रश्नच नाही, हे लक्षात घ्यावे. हे पुस्तक कोणत्याही दुकानात उपलब्ध असणार नाही.
हे काही एक बरे काम झाले आहे असे माझे मलाच वाटत होते. त्यामुळे, आपल्या नसलेल्या, प्रकाशनाच्या क्षेत्रात थोडी आगाऊगिरी झाली. आता, मिळालेल्या अनुभवातून, हे असे काम करणे फारसे अवघड नाही, हे समजले आहे. या ज्ञानाचा पुढेमागे, वाटल्यास, उपयोग करता येईल !

ही पोस्ट फक्त माहितीसाठी दिलेली आहे.

--- ००० ---

Girish Patke

tdeSpprg l1l32A2it8li60u •

हे एक अत्यंत महत्त्वाचे काम आहे.

आपल्याकडच्या मराठी व नवसाहित्याला वाहिलेल्या तथाकथित प्रकाशकांची अनास्था दुर्लक्षित करून एक जागतिक ऐवज आपण स्वखर्चाने कवितेच्या आणि साहित्याच्या अभ्यासकांना उपलब्ध करून देत आहात यासाठी Champra Deshpande यांचे मनःपूर्वक अभिनंदन आणि खूप शुभेच्छा!

--- ००० ---

माझी अमूर्त चित्रं!

कल्पनांच्या ऋतुतील बहर

चित्रात दिसू लागले की

माझी चित्रं मुळापासून

उपटायचे भान आपसूकच

येऊ लागते!

एखादी कविता वाचून आपल्यातील दडलेली सुप्त कल्पना योग्य शब्दाद्वारे उमलू लागणे या सारखी सुखद गोष्ट काय असू शकते!

खुप खुप धन्यवाद चं प्र देशपांडे! आपल्या कवितेच्या पुस्तकामुळे हे सर्व सहज प्राप्त झाले! 💖💖

Champra Deshpande ! ( तंबाखूची टपरी – या पुस्तकाबद्दल )

## अन्न

आज वा काल मी कुठे बातमी वाचली की टीव्हीवर पाहिले ते आठवत नाहीय, पण, जगात प्रचंड प्रमाणावर अन्नाची नासाडी चालू असते. साठवण नाही म्हणून, पावसात भिजून वगैरे तर ती होतेच, पण, शिवाय, माणसे पानात खूप अन्न टाकून वाया घालवतात. हॉटेले, पंगती आणि बऱ्याच घरांतूनही हे दिसते. या प्रकाराची मला अक्षरक्ष: घृणा आहे. असे प्रचंड अन्न वाया जाण्याचे मला घडलेले आणि माझ्या मेंदूत कोरले गेलेले पहिले दर्शन मुंबईतले आहे. मी एस एस सी ला अंधेरी ते विरार या विभागात पहिला आलो होतो आणि त्यासाठी मुंबईतल्या एका अतिप्रचंड नामांकित क्लबतर्फे एक पारितोषिक होते. माझे आईवडील आणि मी असे त्यासाठी निमंत्रित होतो. त्यांचे काही गेट टुगेदर वगैरे होते, त्यात ते पारितोषिक आणि मग जेवण असा कार्यक्रम होता. तसे आम्ही म्हणजे कशीबशी दोन टोके जुळवणाऱ्या अशा गरीब वर्गातलेच होतो. माझ्या आईने मला बालपणापासून एक सवयच लावलेली होती की पानात

काहीही टाकून जायचे नाही. त्या पार्श्वभूमीवर तिथल्या लांबलचक टेबलांवरून दोन्ही बाजूंना जेवणे होऊन गेलेली ताटे पाहिली तर ते दृश्य धक्कादायकच होते ! शाकाहार, मांसाहार सर्व तऱ्हेचे पदार्थ प्रचंड प्रमाणात पानांत टाकून लोक निघून चालले होते. ते दृश्य अजून माझ्या डोक्यात कोरलेले आहे.

मी फारसा भक्तिबिक्ती वा तीर्थस्थळे वगैरे यांतला नाही. पण, माझी पत्नी गजानन महाराजांची भक्त आहे. माझी त्याला मुळीच हरकत नसते. त्यावर टोमणे मारणे वा उपरोधिक बोलणे असलेही मी काही करत नाही. तिच्याबरोबर दोनदा माझे शेगावला जाणे झाले होते. तिथल्या हॉटेलात, महाराज प्रगट होतानाच्या प्रसंगाचे चित्र लावलेले आहे. ते उकिरड्यावरचे अन्न शोधून खात आहेत, असे ते चित्र आहे. ( आता ते आहे की नाही ते माहीत नाही. ) हा भक्तांसाठी एक अति-मौल्यवान संदेशच आहे ! एक तर अन्न उकिरड्यावर जाऊ नये आणि ते सहज सर्वांना मिळायला हवे, हा तो संदेश. यासाठी त्या महाराजांचे चरित्रकार दासगणूंना सलामच ठोकायला हवा !

सारांश, अन्न वाया जाता कामा नये याची सर्वांनीच कटाक्षाने काळजी घ्यायला हवी !

--- ००० ---

तंबाखूची टपरी

~~~~~~~~

'तंबाखूची टपरी आणि अनेक अनुसर्जित कविता'

ज्येष्ठ नाटककार, कवी चंप्र (चं.प्र. ) देशपांडे यांनी भावानुवादीत केलेल्या जगभरातल्या ठळक कवींच्या कवितांचं हे संकलन. जगभरातले कवी म्हणजे मूळ इंग्रजी, जर्मन, इटली, फ्रेंच, ब्रिटीश, स्पॅनिश, पोर्तुगीझ, जपानी या भाषातून लिहिणारे कवी. या कवींच्या इंग्रजीत अनुवादीत झालेल्या कवितांचं मराठी भाषेतलं अनुसर्जन म्हणजे या कविता. या अनुवाद कामाविषयी देशपांडेंनी आपलं अप्रतिम चिंतनगर्भ मनोगत मांडलंय. त्यात त्यांनी एके ठिकाणी फारच सुंदर म्हटलंय. ते म्हणालेत, " मुळात लिखित कविता हीच प्रत्यक्ष सत्य नसून सत्याची अभिव्यक्ती असते असे म्हटले तर ती मूळ कविता हाच सत्याचा पहिला अपलाप असतो. तिचा अनुवाद हा दुसरा अपलाप म्हटला तर अनुवादाचा अनुवाद हा तिसरा अपलाप म्हणावा लागतो. तर, सारांशाने मी कोणत्याही कवितेचा दुसरा वा तिसरा अपलाप करत असतो."

देशपांडेनी आपल्या भावलेल्या ५८ कवींच्या कवितांचं अनुसर्जन केलंय. सर्व कवितांचं अनुसर्जन हे इंग्रजी अनुवादावरून त्यांनी केलेलं आहे. हे काम करताना विविध भाषातले हे कवी, त्यांच्या कविता, व त्यांतून जाणावणारी मानवी मनाची परस्पर संवाद क्षमता याविषयीही त्यांनी आपलं चिंतन मांडलंय. मराठी भाषिक रसिक, कवी, अभ्यासक यांच्यासाठी बऱ्यापैकी अपरिचित असलेल्या या काव्यविश्वाचा ते ओळख करून देतात. मराठी भाषिकांशीही या कवितांचे बंध जुळू शकतात असा त्यांना वाटणारा ठाम विश्वास या अनुसर्जनाच्या कामाच्या मुळाशी
~~~~~~~~

आहे. त्यांनी आपल्या मनोगतात म्हटलंच आहे, "...मानवी मेंदूचे प्रोग्रामिंग ओलंडणे हेच तर कवितेचे सांस्कृतिक काम चालू असते "

अनुसर्जनाच्या रुपातून जागतिक कविता आस्वादण्याची अप्रतिम संधी देशपांडेंनी दिलीच आहे. पण आपले कवितेविषयीचे अनेक समज, अपसमज, गैरसमज तपासून बघत कवितेचं निराकार रूप कल्पिण्याचीही संधी देशपांडेनी दिली आहे. भारतीय मन हे कमालीचं भावविवश, बुद्धीविरोधी, असं आहे. शिवाय रस, ध्वनी, उक्ती अशा मुल्यांच्या आधारावर या भूमीत आणि या भूमीतील भाषांमधून  काव्याची निर्मिती व विचार झालेला आहे. आपली कवितेची अभिरुची, आकलन आणि ज्ञान याच मुल्यांवर पोसली गेलेली आहे. अशा पार्श्वभूमीवर जगातल्या या विविध भाषातील कविता वाचताना आपल्याला अनेक सायास पडू शकतात. मात्र हे सायास जिज्ञासू मनाने केल्यास कवितांची अपरिमित, अथांग, अनंत अशी सृष्टी नजरेला पडू शकते. भारतीय ( सगुण ) कवितेपासून ते जागतिक ( निराकार ) कवितेपर्यंत घेऊना जाणारा हा प्रवास आहे. देशपांडेनी कवितेचा हा वैश्विक प्रवास आपल्याला घडवलेला आहे.

वाचूया, समृद्ध होऊया !

संग्रह मला भेट म्हणून पाठवल्याबद्दल तुमचे शतश: आभार आणि तुम्हाला नमस्कार सर !

~

" तंबाखूची टपरी

आणि अनेक अनुसर्जित कविता "

परिहार प्रकाशन, पहिली आवृत्ती- एप्रिल २०२२

संग्रह केवळ खाजगी वितरणासाठी.

~

टीप: हिंदी कवी रामधारीसिंह दिनकर यांनी असंच अनुसर्जनाचं अप्रतिम काम केलंय. जमल्यास त्याविषयी माहितीपर लिहिन इथे.

~सा ने क र

---

२ । ५ । २२ ।

सतीश तांबे ---

लिहिण्यासाठी लागणारा वेळ विचारात घेता कविता हा सर्वात बहुप्रसव साहित्यप्रकार आहे ह्याबाबत दुमत नसावे. ' कविता झाली गवतासारखी उदंड ' हे गेली सुमारे ५० वर्षे ऐकू येते आहे . लघुअनियतकालिकांची जी 'साठोत्तरी' चळवळ मराठीमध्ये उदयाला आली त्यामध्ये कविता प्रकाशित करायला पुरेशी जागा नसणे हे व्यावहारिक कारण महत्वाचे होते !

नंतर नव्वदोत्तरीनेही त्यांच्या पिढीसाठी ह्याच कारणामुळे नवीन नियतकालिके सुरु केली . फेसबुक आल्यानंतर मात्र अचानकच कवितेसाठी मुबलक जागा बेलगाम उपलब्ध झाली . साहजिकच कविता लिहिणारे तर वाढलेच , पण कवितांचे वाचक देखील वाढले . तर त्यामुळे कवितासंग्रह प्रकाशित होण्याचे तसेच विकत घेण्याचे प्रमाण वाढते आहे का ? हा प्रश्न मनात उफाळून आला तो चं प्र देशपांडे ह्यांनी स्वखर्चाने प्रकाशित करून त्यांना जे कुणी त्यासाठी पात्र वाचक वाटतात त्यांना सस्नेह पाठवलेला ' तंबाखूची टपरी ' हा अनुसर्जक कवितासंग्रह पाहून .

चं प्र हे नाटककार म्हणून कळायच्या आधी सत्यकथेत चंद्रकांत प्रभाकर देशपांडे ह्या नावाने कविता लिहीत होते . त्यांची कविता सुरवातीपासूनच  विलास सारंग ह्यांच्याप्रमाणे बौद्धिक वळणाने जाणारी असल्यामुळे भावनिक आत्मनिष्ठ कवितांच्या बेसुमार गर्दीत ती कायम मुलुखावेगळीच, परिणामी अनुल्लेखित / दुर्लक्षित  राहिली . पण चं प्र मात्र निष्ठेने कविता लिहितच राहिले . मधल्या काळात त्यांनी नाटकावर लक्ष केंद्रित केलं आणि तिथेही बौद्धिक समजली जाणारी नाटके लिहिली.

फेसबुकवर आल्यापासून त्यांनी पुन्हा आपल्या वॉल वर नित्यनेमाने कविता लिहायला सुरुवात केली . कवितेविषयी विचारही ते समांतरपणे  करत/लिहीत राहिले. तसेच जगभरातील त्यांना महत्वाच्या वाटणाऱ्या कवितांची भाषांतरे (त्यांचा शब्द अनुसर्जन ) देखील ! तर हा संग्रह अशाच ५८ कवींच्या अनुसर्जनांचे संकलन आहे .

खरं पाहता , मराठी कवी आणि वाचकांसाठी हे एक मौलिक काम आहे , पण ५०+ वर्षे कविता लिहीणार्या चं प्र ना ह्यासाठी प्रकाशक मिळाला नाही आणि वाचक मिळण्याचीही खात्री नाही ह्यामुळे त्यांना हे काम स्वखर्चाने करावे लागले. माझ्या मते चं प्र हे आजघडीला वसंत आबाजी डहाके वगैरे सर्वात ज्येष्ठ लिहित्या मोजक्या कवींपैकी एक असावेत. तर ५०+ वर्षे पुरेशा गांभीर्याने आणि निष्ठेने लिहिलेल्या कवीला हक्काचा प्रकाशक मिळू नये आणि स्वखर्चाने संग्रह काढायला लागावा, ही वस्तुस्थिती पडताळणे गरजेचे आहे. अर्थात हे काही नव्याने घडते आहे अशातला भाग नाही .

 मराठीतील  जागतिक दर्जाचे अव्वल कवी मानले गेलेल्या अरुण कोलटकर ह्यांनी देखील सुमारे २०+ वर्षांपूर्वी 'द्रोण' त्यांचा कवितासंग्रह २०० प्रती काढून कवितेच्या त्यांना गंभीर वाटणाऱ्या वाचकांना वाटला होता . अलीकडे तर असे  कवितासंग्रह स्वखर्चाने प्रकाशित करण्याकडे वाढता कल आहे .

ह्यातील एक गाजलेला संग्रह म्हणजे अनेक वर्षे कुठेही प्रकाशित न केलेल्या व फेसबुकवरही काही वर्षे वावरल्यानंतर तुरळक कविता पोस्ट केलेल्या Ganesh Kanate ह्यांचा ' सॅक्सफोन हे काही वरातीत  वाजवायचे वाद्य नाही ' हा कवितासंग्रह . देखणी निर्मिती आणि नव्या/ वेगळ्या जाणिवेची कविता असल्यामुळे हा संग्रह चर्चेचा विषय ठरला. म्हणजे  एक तर स्वखर्चाने प्रकाशित करा अन्यथा २५-३० वर्षे रखडा , ह्या रखडण्याचे  ताजे उदाहरण म्हणजे वसंत दत्तात्रय गुर्जर ह्यांचा' कोलाहल ' हा अलीकडेच आलेला संग्रह. कमालीच्या मिताक्षरी अर्थसंपृक्त कवितांसाठी गुर्जर हे जाणकारांनी नावाजलेले कवी आहेत . शिवाय ' गांधी मला भेटला ... ' ह्या कवितेमुळे त्यांना सनसनाटी स्वरूपाची प्रसिद्धीही लाभली होती . पण तरीही त्यांचा संग्रह काही प्रकाशित होत नव्हता . अखेरीस  कवितांविषयी कमालीची आत्मीयता आणि जाण  असणाऱ्या  चंद्रकांत पाटील ह्यांनी आपल्या ' तुला ' प्रकाशनातर्फे तो प्रसिद्ध केला .

तर कवितासंग्रहाच्या बाबतीत ही जी अनास्था आहे , त्याचा दोष केवळ प्रकाशकाला देऊन चालणार नाही , तर त्याला कारण इथली वाचन-संस्कृती आहे , जी अजूनही विकसित / परिपक्व झालेली नाही .

अलीकडच्या काळात कॉपरकॉइन, वर्णमुद्रा अशा काही प्रकाशकांनी कवितासंग्रह प्रकाशित करण्याचा धडाकाच लावला होता . पण ह्यासाठी त्यांनी कविताप्रेमी ग्राहकांची  हक्काची यादी तयार करून एक हुकुमी वितरण व्यवस्था उदयाला आणली असावी . एक प्रयोग म्हणून हे ठीक आहे .त्याआधी सुमारे १० वर्षांपूर्वी Sushrut Kulkarni ने कवितेवरील प्रेमामुळे असेच धडाधड ९-१० कवितासंग्रहकाढले होते . पण त्याने अशाप्रकारची ग्राहकश्रृंखला तयार न केल्यामुळे त्याला अखेर आपले प्रकाशन बंद करण्याची वेळ आली. Sanjay Bhaskar Joshi देखील पुस्तक पेठेत कवितासंग्रहांना चांगली मागणीअसल्याचे सांगतो, पण तो त्याच्या विक्री कौशल्याचा एक भाग आहे .

आणि  नीट विचार केला तर कळतं की कवितेबाबतची ही अनास्था तशी पूर्वापार आहे. ह्याचं एक ठळक उदाहरण म्हणजे दिलीप पुरुषोत्तम चित्रे ह्यांचे कविता हे त्यांच्या वयाच्या अवघ्या २१ व्या वर्षी मौजेसारख्या मातब्बर प्रकाशनसंस्थेने प्रकाशित केलेले पुस्तक. ह्या पुस्तकासाठी चित्रेंना म्हणे एक वर्ष १२ आणे रॉयल्टी आली होती . आणि चित्रेंसारख्या आंतरराष्ट्रीय व्यासंग आणि मान्यता असलेल्या कवीलाही जर 'समग्र चित्रे ' प्रकाशित करायला वर्षानुवर्षे प्रकाशक मिळत नसेल , आणि मिळाल्यावरही त्या कविता टाइपसेट करून न घेता स्कॅन वर बोळवण करायला लागत असेल, तर परिस्थिती खरोखरच चिंताजनक किमान चिंतनीय तर आहेच .

 मला बर्याचदा अशी शंका येते की मराठीमध्ये लेखनेच्छूंची संख्या ही वाचकांपेक्षा अधिक तर नाही ना ? विशेषतः कवितेच्या बाबतीत तर हे प्रकर्षाने जाणवतं.  हे असं घडण्याचं कारण हे जाणवतं की नव्याने लिहीणार्या बहुतेकांची धारणा मुक्तछंदाने आपल्याला मोकाट सोडलंय अशी आहे. फेसबुकने  तर  कविता प्रकाशित करण्याच्या जागेचाही प्रश्न सोडवला आहे जिथे दाद देणारे नवखे वाचकही मुबलक आहेत . त्यामुळे मराठीत आजवर जे महत्वाचे गणले गेले आहेत अशा पूर्वसुरींच्या कविता वाचण्याची गरजही कुणाला जाणवत नसावी . कवितासंग्रह न खपण्याचे मुख्य कारण हेच आहे की नव्याने कविता लिहू इच्छिणार्यांना समकालीन किंवा पूर्वसुरींच्या कवितांचे वाचन करण्याची गरजच वाटत नाही . शालेय /क्रमिक पुस्तकातून वाचलेल्या कविता , मुक्तछंदाने केलेली सोय  आणि प्रकाशित करण्यासाठी संपादकांचा अडसर दूर झालेली आणि like / कौतुक करणारे हक्काचे वाचक पुरवणारी फेसबुक वॉल  , एवढी शिदोरी त्यांना पुरेशी वाटत असावी .

चं प्र सारखा ५०+ वर्षे सातत्याने कविता लिहिणारा निष्ठावान कवी जगभरातील ५८ कवींच्या कविता , commissioned काम म्हणून नव्हे तर स्वयंप्रेरणेने अनुसर्जित करतो , ही गोष्ट कविता लिहिण्यासाठी न केवळ आपल्या भाषेतील / देशातील  तर जगभरच्या कविता वाचणे किती गरजेचे आहे , हे जाणवून देण्यासाठी पुरेशी आहे . आणि चं प्र सारखा ५०+ वर्षे सातत्याने कविता लिहिणाऱ्या  निष्ठावान कवीला ह्या कवितांचा संग्रह स्वखर्चाने प्रकाशित करून निवडक मंडळींना पाठवावा  लागतो, ही गोष्ट कवितासंग्रह मन घालून वाचण्यासाठी आपल्या संग्रही असावेत

असे न वाटण्याचा पुरावा आहे .

असो. ' झालं ते झालं ' पण ह्यापुढे तरी कविता लिहिण्याचा गृहपाठ आणि रियाझ म्हणून समकालीन तसेच पूर्वसुरींच्या कविता वाचण्याची जाणीव वाढून ह्या कवितासंग्रहाची पुढची आवृत्ती पुरेसे ' ऍडव्हान्स बुकिंग ' करून निघाली तरच
ही चं प्र अनुसर्जित 'तंबाखूची टपरी ' सार्थकी लागेल.
--- सतीश तांबे .

खूप खूप शुभेच्छा!!!
मागील वर्षी म्हटल्याप्रमाणे "तंबाखूची टपरी" टाकून त्यांनी काव्य क्षेत्रात अजून एक महत्त्वपूर्ण लखलखीत कामगिरी केली आहे. भविष्यातही अशा अनेक टपऱ्या उघडण्यासाठी चंप्रंना निरोगी व सर्जक आयुष्याची अजून किमान २८ वर्षे लाभोत हीच प्रार्थना !! – गिरीश पतके.

Dear Chandra Pr Sir
The gap between the two words written by you also speaks. New meanings open up. The widespread of your gestures is amazing. Always a fascination to read again. Happy anniversary and best wishes with this prayer that the fascination remains forever🌹❤️🎁🎂💐--- कुमार बडगुजार.

संस्कृती म्हणजे काय रे भाऊ ?

आपलाच काय, पूर्ण जगाचाच सांस्कृतिक स्तर खालावतच काय ढासळत चाललाय – असे म्हणणारे लोक अनेकदा भेटतात. कधी कधी तर ते प्रामाणिकपणे हेही कबूल करतात की आपण सगळेच याला कारणीभूत आहोत. तो युद्धाची तयारी करतोय तर मी शांत बसून कसे चालेल ? तो त्याचे वर्चस्व आणायला बघतोय, ते मी का चालवून घ्यावे ? – हे प्रश्न सगळ्यांच्याच डोक्यांत असतात. म्हणजे काय तर सगळे जग आधी होऊ द्या सुसंस्कृत मग लगेच मीही होईन ! म्हणजे, एका क्षणात, जगावरून अशी एक जादू फिरायला हवी की, वा, झाले की सगळे सुसंस्कृत ! असे ! आणि हे तर कदापि होणे शक्य नाही, हे सगळ्यांनाच माहीत असते.
आपण जे जे वापरतो ती सगळी सभ्यता ( civilization ) आणि आपण जे जे आहोत ती आपली संस्कृती, असे थोडक्यात म्हटले जाते. दळणवळणाची साधने, इमारती, धरणे, कारखाने, मॉल्स, वगैरे ही झाली सभ्यता. आणि धर्म, तत्त्वज्ञान, विचारसरणी, कला, संस्कार, प्रभाव – ही झाली संस्कृती ( culture ). मनांच्या अवस्था याही मर्यादितच असल्याने वस्तुरूपच मानल्या तर संस्कृती ही सभ्यतेचा एक भाग असते, असे म्हणणारेही काही आहेत.
जंगलीपाणा, रानटीपणा, अमानुषपणा, दुष्टपणा, हिंसकपणा यांपेक्षा सुसंस्कृत असणे कधीही चांगलेच, असे सर्वांनाच वाटते. माणसा माणसा माणूस हो – अशी वाक्ये सर्वांनाच आवडतात. पण, ही वाक्ये म्हणायची वेळच का येते, हा

प्रश्न कुणाला पडत नाही. वातावरण असंस्कृत होतेच का मुळात, हा प्रश्न आलाच समजा समोर तर – प्रस्थापित व्यवस्थेमुळे, ब्राम्हणांमुळे, मुस्लिमांमुळे, भांडवलदारांमुळे, शोषकांमुळे – अशी काही समाधान देणारी उत्तरे तयार असतात. आणि मग वातावरण चांगले ठेवायला उरतात कोण तर दलित, शोषित, वंचित, पीडित, वगैरे सत्ताहीन, संधीहीन लोक ! मग करावे तरी काय, हे सुचत नाही. कोण म्हणतो हिंदुत्वाने रामराज्य येईल तर कोण म्हणतो कम्युनिझम आला की सुसंस्कृतता आलीच समजा ! पण तोवर ते दोघे मिळून आणि इतरही सगळेच संघर्ष, छळ, विध्वंस यांचे यज्ञकुंड धगधगत ठेवतात. आपण जे आहोत ते फायनल आहोत असे प्रत्येकालाच वाटत असते. जाती, धर्म, पक्ष यांची रूपे तर सोडाच प्रत्येकाला आपापली प्रतिमा ही प्राणाह्न प्रिय आणि अति-महत्त्वाची वाटत असते. त्यामुळे, भ्रष्टाचार वा एखाद्या अनैतिक कारणाने ती प्रतिमा मोडली गेली तर पूर्ण विश्वच विस्कटले जाण्याची कल्पना भीतीने मन खाऊ लागते. या बाबतीत आपली बरीच नेते मंडळी खरोखरच शूर असतात. तर सारांश म्हणजे माझे आणि मी जे महत्त्वाचे मानतो त्याचे सातत्य टिकायलाच हवे, हाच असतो पाया प्रत्येकाच्या जगण्याचा. आणि हा असा पाया प्रत्येक व्यक्ती आणि प्रत्येक समूह यांचा वेगवेगळा असतो. त्यामुळे, संघर्ष आणि बाँब अटळ होतात. मराठीसाठी युपीतल्या लोकांशी पंगा घेणारा माणूस हिंदू म्हणून टिकू पाहू लागला तर यूपीतले हिंदूही विरोध करणार ! असे मृषायुक्त – absurd प्रकारही घडत राहतात.

तर आपण ज्याला संस्कृती म्हणतो ती असते मानसिक अवस्थेच्या सातत्याची भोक्ती म्हणजेच असंस्कृत ! घाण निर्माण करणारी. मग इथे प्रश्न येतो की मग सातत्याची गरज नसलेले असे प्रवाही जगणे असू शकते का ? असे असूच नाही शकत हे एकमुखी उत्तर असेल तर संस्कृतीच्या गप्पा बंदच करायला हव्यात. तुकारामबुवा म्हणतात की होय, असे आणि असेच जगायला हवे. ‘ लागला झरा अखंड आहे । ‘ किंवा ' सरे ऐसा नाही झरा । ' असे ते म्हणतात. तुकारामाचे सामाजिक काम यावर आपण खूप बोलू पण बाकी त्याला आध्यात्मिक म्हणून हेटाळून, फेटाळून लावू. सारांश, मनाची प्रभावयुक्त अवस्था जिला आपण संस्कृती म्हणतो ती असते खरे तर एक स्थितिशील हिंसक असंस्कृत अवस्था ! पण हे असेच असणार हे गृहीत धरून संस्कृतीच्या गप्पा मारत राहणे कधीही चांगलेच ना !

—--००० -- -

आर्ट एक्स्पो पुणे

काल हे चित्र-शिल्प प्रदर्शन पाहिले. माझ्या धाकट्या नातीला चित्रकलेची आवड असल्याने तीही बरोबर आलेली होती. तिथे आत प्रवेश करताच समोर पेन्सिलने केलेली प्रचंड आणि अगाध म्हणावीत अशी नाक्षिचित्रे होती. चकित व्हावे अशी ! मी चित्रकारांची नावे नोंदवून घेतली नाहीत पण त्यांचे काम पाहून झालेला आनंद तोंडीस तोंड व्यक्त केला. यानंतर मात्र, मधले स्टॉल्स सोडून सरळ १८ नंबरला गेलो. हा स्टॉल होता माझे कोल्हापूरचे मित्र अनिल सडोलीकर यांचा मुलगा निस्सीम याचा. तो आर्किटेक्ट असून चित्रकारही आहे. अनिल स्वत:ही चित्रकार आहे. ( ‘ कोरी कविता ‘ नामक माझा एक कवितासंग्रह पूर्वी निघाला होता, त्याचे मुखपृष्ठ अनिलचे होते. ) अनिलच्या पत्नी

म्हणजे सुनीता याही बाटीक चित्रकलेत प्रवीण आहेत. त्यांचीही काही चित्रे तिथे होती. निस्सीमसुद्धा ती कला त्यांच्याकडून शिकतो आहे. तिथल्या एका बाटिक चित्रात, त्यातल्या काही भागांच्या कडेकडेने पांढऱ्या जाड दोऱ्याची एक टीप घालण्यात आलेली आहे – ती ते चित्र छानच उठावदार करणारी आहे. त्यांच्याच या स्टॉलवर त्यांचे मित्र पिता-पुत्र शरच्चंद्र आणि ऋषिकेष मोघे यांचीही चित्रे आहेत. वास्तववादर्शी आणि अमूर्त अशा अनेक प्रकारच्या चित्रांचे संमेलन इथे पाहिले. दिल खुश हुवा ! अनिलच्या सूनबाई या उत्कृष्ट शास्त्रीय गायिका आहेत. पुण्यात मी तिचे गाणे ऐकले होते. हे पूर्ण कुटुंबच या ना त्या कलेशी संबंधित आहे ! अपवादात्मक म्हणावे असेच हे आहे ! या सर्वांवर कळस म्हणजे निस्सीमचा छोटा मुलगा ! त्याला मी त्याचे नाव विचारले तर म्हणाला – हमीर – हमीर म्हणजे राग – आपल्याला येतो तो नव्हे, गाण्यातला राग ! मग मी विचारले, कितवीत आहेस – यावर सदर चिरंजीव म्हणाले की थांबा जरा, मला एक फोन आलाय, तो घेऊन येतो ! – असे म्हणून तो सरळ समोरच्या स्टॉलकडे निघून गेला ! अनिलशी खूप गप्पा झाल्या. त्यात माझ्या विशेष लक्षात राहिले ते हे की प्रख्यात अक्षरकवी र. कृ. जोशी जेव्हा कोल्हापुरात आले होते तेव्हा ते खूपच आस्थेने आमचा कविमित्र अनिल द्रविड याचा शोध घेत होते आणि या अनिलने त्यांची भेट घडवून आणली होती !

ते प्रदर्शन खूप मोठे होते. अनेक स्टॉल्स होते. नव्याजुन्यांचा संगम होता. एका स्टॉलवर दोन सुमारे पन्नाशीतल्या चित्रकार मित्रांची चित्रे होती. एक वास्तवदर्शी चित्रकलेतला मास्टर होता तर दूसरा अमूर्त शैलीतला. अत्युत्तम होती चित्रे. अक्षरक्ष: चकित व्हावे अशी. माझ्या चेहऱ्यावर ते आलेच असणार. त्यांनी अभिप्राय देण्याची विनंती केली. चित्रांबद्दल काय वाटले ते लिहून शेवटी मी लिहिले की या चित्रांनी जो आनंद दिला त्याबद्दल मनापासून आभारी आहे ! तो त्यांना वाचूनही दाखवला. ते तर खुश झालेच पण आमच्या शेजारी एक कॉलेज कन्यका उभी होती – तीही माझ्या या अभिप्रायाने आनंदली !

पुढेही खूप तरुण व मध्यवयीन असे अनेक चित्रकार भेटले. एका ठिकाणची दोन अमूर्त चित्रे मला खूप आवडली. मी त्या चित्रकाराला म्हणालो – ही चित्रे हे सांगताहेत की stop thinking and see ! मी कुणी मोठा समीक्षक वगैरे असणार असे वाटून त्याने आनंदाने हस्तांदोलन केले ! माझी नात, काही तिला आवडलेल्या चित्रांचे फोटो काढून घेत होती. एका ठिकाणी, तिच्या चित्रांइतकीच सुंदर एक चित्रकार होती. चित्रे पाहण्यातली आमची आस्था पाहून किती काय बोलू या चित्रांबद्दल, असे तिला झाले ! एक तर तरुण स्त्री इंजिनियर झालेली असून तिने तीन वर्षे नोकरीही केली होती. पण, चित्रकलेचे प्रेम तिला तिकडे रमू देई ना – नोकरी सोडून, होईल ते होईल म्हणून ती या क्षेत्रात आली ! असे खूप काही पाहिले आणि अनेक चित्रकारांशी संवादही साधला.

हे सगळे पाहून एक प्रश्न आला डोक्यात – नुसत्या या एका प्रदर्शनात जर इतके आणि इतक्या विविध प्रकारचे कलाकार आहेत तर असे देशात, जगात किती असतील ? ! हे सगळे थोडेच क्ली वा पोलोक वा पिकॅसो वा गायतोंडे वा हुसेन होणार आहेत ? पण यांतल्या बऱ्याचजणांची तशी स्वप्ने असूही शकतील. मग या सगळ्या प्रकाराला एक वेडेपणाच म्हणावे का ? कोणताही कलाकार काहीतरी होण्यासाठी वा काहीतरी मिळवण्यासाठी त्याच्या कलेचा वापर करेल तर त्याच्या कलेला त्या उद्दिष्टाची मर्यादा पडून ती कला खुजी होईल, असे मला दिसते. ' मोठे ' होण्याची उद्दिष्टे तुम्ही व्यावसायिक कलेत ठेवू शकता पण गंभीर सर्जक कलेत नाही. या अर्थाने कला ही व्यावहारिक उपयोगाची

चीजच नाही. कीर्तन करून दक्षिणेची अभिलाषा ठेवणाऱ्याला तुकाराम धि:कारतो, हे इथे लक्षात घ्यायला हवे. जगणे समजून घेण्याची प्रक्रिया हेच असू शकते, या अर्थाने व्यक्तिनिरपेक्ष असणाऱ्या सर्जक कलेचे काम. त्यामुळे, कुणीही कुणालाही वेडे म्हणण्यात अर्थ नाही. हे असे ‘ निरुपयोगी ‘ काम हेच आपले मिशन आहे, असे काहींना वाटणे हे त्या त्या समाजाचे भाग्यच म्हणावे लागेल. याचे काय होईल, एखादे चित्र कोटीत जाईल का, असे प्रश्न इथे अप्रस्तुतच ठरणार.

हे सर्व पाहून पुढे गेलो, पण तिथून बाहेर पडायचा मार्ग आहे का की पुन्हा मागे फिरून जावे लागेल हे माहीत नव्हते. तिथे बाहेर एका खुर्चीवर एक माणूस बसलेला होता. त्याला विचारले की इथून बाहेर पडता येते का ? तर तो एकदम विचलितच झाला ! चिडलाच ! तिकडे पुढे विचारा, म्हणाला. अरे बेटा, आपले डोके सदोदित बिथरत का असते याचा शोध घेणारा समुद्र आहे रे तुझ्या जवळ, इथेच , पण करंटे हो तुम – असे मनात म्हणत पुढे गेलो.

--- ००० ---

## उडाणटप्पू

उडाणटप्पू हा शब्द एकूणच आजच्या मराठी संस्कृतीला लावला तरी चालेल. पण इथे बोलताना आपण साहित्य या क्षेत्रापुरती मर्यादा आखून घेऊ. आणि तेही इतके कोण घुसळत बसणार ( नुसतीच कचऱ्यावर प्रक्रिया करत बसणे ! ) म्हणून कविता घेऊ. इथले कवी मुळातच कविता लिहितात ते कवी म्हणून ओळखले जाण्यासाठी, तशी मान्यता मिळवण्यासाठी, मोठे कवी म्हणून टिकून राहण्यासाठी आणि जनमानसाचा आदर मिळवून आत्मतुष्ट होण्यासाठी. याचाच अर्थ कविता लिहिण्याचा मूळ हेतूच कविताबाह्य असतो. यामुळे साहजिकच मग रूटीन, सामान्य अनुभव, विचार, नीतीकल्पना, न्याय, समता वगैरे अभिलाषित मूल्ये, भावभावनांचे पुन:प्रत्यय आणि थोडेफार चकित करणारी तंत्रकौशल्ये या मर्यादेत ही कविता खेळत-बागडत राहते. अगदी तथाकथित दु:खाची कविताही. एकदा उद्दिष्ट कविताबाह्य मान्यतेचे असले की पुनरावृत्ती हे एकच कवितेचे कार्यक्षेत्र बनते. मग भाषेवर आणि तंत्रावर हुकमत असलेले काही कवी इथे निव्वळ विविधगुणदर्शन दाखवत अमर होतात. त्यांच्या कवितेत सलग गांभीर्य कसलेच नसते. पार अनिलबिनिलांपासून उदात्त अशा कुसुमाग्रजांपर्यंत.  यांना जगण्याबाबत एकही समस्या सखोलपणे दिसत नाही कारण पाहायचीच नसते. कमी कुवतीचे रटाळ, सेफ जगणे हीच एक आस असल्यावर जनमान्य मार्गाने आयुष्य रेखाटत जाणे हे बंधनकारक ठरते. जनमान्य दु:खाचा माफक डोस आणि जनमान्य अस्मितांचे उदात्तीकरण यात हे कवी रमतात. यांना स्वत:ला एखादे दु:ख महत्त्वाचे वाटले, मूळापासून त्याकडे पाहावेसे वाटले, असे घडत नाही. कुसुमाग्रज इथले प्रातिनिधिक भाषा पुढारी होतात – त्यांच्या नावे भाषादिन साजरा होतो, हा याचा पुरावा आहे. हे असले कवी धर्म, भक्ती, प्रेम, आस्तिक, नास्तिक, वारकरी, शूर, देशभक्त, बांधिलकी, युद्धसमर्थक असे सगळे असतात. या प्रत्येक विभागातल्या कविता लिहून ते लोकप्रिय होत राहतात. थोडक्यात म्हणजे यांना कशाचेच फारसे गांभीर्य नसते आणि कोणत्याही समस्येला सामोरे जायची आचही नसते.

दुसरा प्रकार विद्रोहीवाल्यांचा आणि त्यातच घुसलेल्या समतावाद्यांचा. यांना उत्तरे आधीच माहीत असतात, दु:खांना जबाबदार कोण हे यांचे ठरलेले असते, आता फक्त सुधारणा करत गेले की झाले – हा एकूण यांचा ढाचा असतो. यातले जे रुळलेले मार्ग असतात त्या त्या मार्गावरच्या टोळ्या असतात. बाहेर राजकारणात जी वैचारिक ‘ तयारी ‘ लागते तीच इथेही लागते. इथे जरा भाषा थोडीफार यावी लागते, इतकेच. हे नुसतेच एक वैचारिक आक्रमण असल्याने हेही पुनरावृत्तीच्या रोगाने ग्रस्त असते. याचीही उद्दिष्टे कविताबाह्य – व्यवस्था बदलणे आणि कवी म्हणून गाजणे, हीच असल्याने इथेही प्रत्यक्ष जगणे आणि त्यातली गुंतागुंत ‘ पाहणे ‘ हे घडू शकत नाही. या विभागातले लेखक-कवी म्हणतात की आम्हाला कवितेचे महत्त्वच नाहीय -- ती फक्त साधन आहे एक. आम्ही म्हणतोय त्या समस्या सत्वर मिटून आमची कविता कालबाह्य व्हावी हीच आमची इच्छा आहे.
मान्यताप्राप्त प्रतिक्रिया देत आयुष्य कंठणारे लोक सर्जक म्हणजे काय असणार ? यांचे सगळे लेखन हे ‘ माहीत असणे ‘ या क्षेत्रातले असते. आपला स्वभाव, मते, आग्रह यांचा किनारा सोडून ‘ जे आहे ते ‘ पाहण्याची – त्याच्या लौकिक यशापयशाबद्दल बेफिकीर राहण्याची यांची हिंमत नसते. मराठी समाजालाही असले काही नकोच असते. त्यामुळे, उंदराला मांजर साक्षी अशा पद्धतीने दोघेही एकमेकांचा उपयोग करत राहतात. नुसतीच मतमतांतरे सोडून जे तत्त्वज्ञानातले किंवा अध्यात्मातले प्रश्न असतात त्यांना इथे हेटाळले जाते कारण ते प्रश्न असतात किनारा सोडायला लावणारे. इथे तर भित्रट सुरक्षिततेत खेळायचे आहे. आणि मग हेच लोक एकत्र जमून रडत विचारतात की मराठी कविता जागतिक का होत नाही ? !
--- ००० ---

कवितेचे पोचणे

आजच्या, २२-०५-२२ च्या, पुणे मटाच्या ' संवाद ' पुरवणीत पान २ वर आपले मित्र हेमंत गोविंद जोगळेकर यांचा, रजनी परुळेकर या अलीकडेच दिवंगत झालेल्या कवयित्रीवर ' शोकांतिकेची नायिका ' हा लेख आलेला आहे.
त्यातला काही भाग --
" ' कविता दशकाची ' मधील रजनी परुळेकरांवरील टिपणात संपादिका शिरीष पै यांनी, ' रजनीच्या एका कवितेत दोन मैत्रिणींतील समलिंगी आकर्षणाचा धीट आविष्कार आहे ' असे म्हटले होते. त्या काळी समलैंगिकतेकडे घृणेने पाहिले जाई. आसोरकरांनी त्या कवितेवर टीकेची झोड उठवली. सत्रानंतर जेवणाच्या वेळी रजनी परुळेकरांनी त्या कवितेत समलैंगिकता अभिप्रेत नव्हती, असे सांगितले. ‘ हे तुम्ही शिरीषताईंना का सांगितले नाही ‘ असे विचारल्यावर रजनी म्हणाल्या, ‘ शिरीषताईंचे पुस्तकातील टिपण वाचल्यावर मी त्यांच्याशी बोलले, तर त्या म्हणाल्या, खरं सांगू का, मला ती कविता कळलीच नव्हती. पाडगावकरांनी मला ती त्या अर्थाने समजावून सांगितली. – आता मी काय करणार ? ‘ “
यावर मराठीत एक जालिम उपाय उपलब्ध आहे. जो काही मजकूर आहे तो कविता आहे असे वाटण्यासाठी यमके, प्रतिमा, सांगीतिक लय हे सगळे वापरायचे पण कवितेचा आशय सरळ वैचारिक गद्यात सांगता यावा याची काळजी

घ्यायची. रूपात कविता पद्य असायला हवी पण आशयात ती गद्यच असली पाहिजे ! ती ठराविक पद्धतीनेच पोचली पाहिजे. मग कशाला असले अर्थाचे अनर्थ होतील ?

--- ००० ---

२६-०५-२२.

माझ्या संकेतस्थळाचे ( वेबसाईटचे ) अद्यावतीकरण दिनांक २६-०५-२०२२ पर्यंत पूर्ण झाले ! त्यात आता

गद्य कविता

आणि

म्हणजे काय रे भाऊ

या दोन फाईल्स नव्या दिल्या आहेत.

बघा --

www.champralekhan.com

२८-०६-२२.

आवर्तने द्रुत शून्याची ------ आरती प्रभू.

घटाघटका अशा चालल्या आहेत संपूर्ण
संपूर्ण विदीर्ण होत संपूर्णपणें चालल्या आहेत
मागे ठेवून कित्येक सावल्या एकाच हृदयाच्या
हृदयावरील हृदयांतील जशा की मिटल्या डोळ्यांतील
केवळ फक्त कांहीं वास्तवाबद्दलच्या 'केवल ' हालचाली
घटकघटका धुऊन निघताहेत विरळविरळ
विरळता भरून येतेय जशीं कीं आवर्तनें द्रुत शून्याचीं
छेद घेताहेत प्रकाशगतीशीं... देताहेत उल्कापातांसम
कित्येक स्मृतिचिन्हांना ठिणग्या... क्षणार्ध पडसाद
अडतात ...अडखळतात. ओकेपणावर उभा अवकाश.
आणि काय उरावें ? उरीं भरून यावी कुठून हांक ?
सायंकालीन घंटानाद कोषांतून थरथरत्या दिव्यांचा आवाठ
आताआतां स्तब्ध... कुठल्या घरट्यांतील चोंच असेल
मध्यरात्रीहि आपल्याच पिसांत न खुपसलेली जागी ?
फक्त तयार असेल संपादकाच्या डोक्यांत परवाचा अग्रलेख.
हें तर असेंच सगळे अमानवी रहस्य बंद आपोआप

सतत सुरू सतत बंद यामधील रेषेवर
कःपदार्थ कुठलाहि कण भयंकर स्फोटक आणि त्याचीच
सूत्रें संवेदनांची मानवी कण्याशीं परंपरागत संलग्न
मुंगीच्याही ओठी अगदी शुभ्र कणाची साखर पेरलीय त्यानें.
बांबूच्या वनांतील वाऱ्याची चिरफाड किर्रता
(उदासीन आसमंत जसा की नामानिराळा हवेंत कुठेतरी
राहतो दीर्घ तानेचा तुकडा) प्राणही देहांतील होतोय
फक्त थडग्यांतील दिवा... होतोय जवळ जवळ मिटण्यासाठों
जमा समुदाय काळ्या पाकळ्यांचा... एकांत शोकगीतापूर्वीच ...

- आरती प्रभु

काळाच्या अपूर्ण जाणिवेत जखडलेल्या मनाचा हा एक यूनिक अनुभव. काळाची संपूर्ण जाणीव असू शकते का, असल्यास ती कशी असते यासंबंधीच्या कोणत्याही सूचनेचा तसा प्रश्न नाही. पण अपूर्णतेत होणारे काळाचे विघटन आणि त्यातल्या अनेक जाणिवा यांचे हे स्पष्ट आणि भरीव चित्र. काळाच्या विघटनासारखा विचित्र आणि तितकाच भरभन्नाट अनुभव आणि तो व्यक्त होण्यातली सर्वस्वता हेच या कवितेचे वैशिष्ट्य आणि सामर्थ्य.

'घटकाघटका अशा चालल्या आहेत संपूर्ण'

या ओळीत समोरून जाणाऱ्या काळाच्या सलग तुकड्यांची संपूर्णता कळते न कळते तोवर लगेच पुढच्या ओळीत ती संपूर्णता विदीर्ण होत असल्याचे कळते. आणि ठिकऱ्या ठिकऱ्या उडणाऱ्या क्षणांच्या अद्वितीय अनुभवात कविता तडक शिरते. या सगळ्या घटनेला कुठेतरी अटळ असे एकाच हृदयाचे केंद्र आहे. यातून साचत जाणाऱ्या उरणाऱ्या सावल्या हृदयातील वा हृदयावरील - पण अपरिहार्यपणे हृदयाशी निगडित अशाच आहेत. हृदयाच्या, हृदयावरील, हृदयांतील हे शब्द जसे अलीकडचा आशय विस्तारतात तसाच पुढचाही. मिटल्या डोळ्यांतील हालचालींची अप्रत्यक्षता या एकाच हृदयाच्या हालचालींना आहे. या हालचाली केविलवाण्या आहेत, कारण त्या फक्त हालचालीच आहेत; आणि त्या 'केवळ फक्त काही वास्तवाबद्दलच्या' आहेत. वास्तवाचे सर्वस्व आवाक्यात नाही, आणि वास्तवाचे भाग विदीर्ण होत चाललेले – अशा या अटळ जाचातला हा केविलवाणेपणा.

पहिले कडवे 'घटका घटका' असे काळाचे संपूर्ण असे कल्पित तुकडे घेऊन सुरू होते तर दुसरे कडवे 'घटका घटका' असे सुरू होऊन विघटनेची प्रक्रिया पुढे ओढते. घटकांची ही धूप सबंध भान विरळतेने भरून टाकते. आणि हा अनुभव चित्रांकित दृश्यांकित होतो तो असा

'जशीं की आवर्तनें द्रुत शून्याचीं
छेद घेताहेत प्रकाशगतीशीं... देताहेत उल्का पातांसम
कित्येक स्मृतिचिन्हांना ठिणग्या...'

'आवर्तनें द्रत शून्याचीं', 'प्रकाशती', 'उल्कापात', 'ठिणग्या' यांतल्या गतिमानतेशी अगदी विसंगत-थंड अशा पुढच्या ओळी येतात.
'क्षणार्ध पडसाद अडतात...अडखळतात. ओकेपणावर उभा अवकाश.'

तीन शब्दी वाक्याचे दोन शब्द वर, एक शब्द खाली आणि एका ओळीत दोन पूर्णविराम; अशा प्रकारे सगळ्याच गतीला ब्रेक लागून एक प्रकारचा बेसावध हरवलेपणा निर्माण होतो. आणि 'ओकेपणावर उभा अवकाश' असे एक प्रचंड भयाण चित्र दिसायला लागते.

तिसऱ्या कडव्यात याही सगळ्याशी विसंगत असे एक साधे-दैनंदिन घटनांचे सहज दृश्य येते. 'आणि काय उरावे ? उरीं भरून यावी कुठून हाक ?' या चालू विचाराला जोडूनच पण एकदम एका वेगळ्या मूडमधे नेणारे दिनक्रमातील काळाच्या उदास-करुण निरर्थकतेची जाणीव देणारे दुसरे एक चित्र येते.

यानंतरचे कडवे या सगळ्या कालविघटनाचे सार शोधू जाते- म्हटले तर तत्त्वही शोधू जाते. आवर्तनांची 'गती' आणि ओकेपणावर उभ्या अवकाशातली ' स्थिती ' अशा या सतत सुरू आणि सतत बंद यांमधील रेषेवरचे हे रहस्य. 'अमानवी रहस्य.', 'बंद आपोआप रहस्य ?', ' आपोआप सतत सुरू, सतत बंद यांमधील रेषेवर' चे रहस्य. त्या रेषेवरचा कःपदार्थ असा कुठलाही कण भयंकर स्फोटक, आणि त्याचीच सूत्रे संवेदनांनी मानवी कण्याशी परंपरागत संलग्न. मुंगीच्याही ओठी अगदी शुभ्र कणांची साखरपेरणी करून परमेश्वराने गळी मारलेले हे गूढ. भयंकर स्फोटक अशा त्या कणांची संवेदनसूत्रे मानवी कण्याशी संलग्न झाल्यापासून या अमानवी रहस्याची सुरुवात. हालचालींची गती अपरिहार्यपणे एकाच हृदयाशी निगडित राहण्याच्या स्थितिशीलतेचे हे गूढ.

पुढल्या कडव्यातील पहिल्या ओळीत 'सतत सुरू सतत बंद' असे हे रहस्य चित्ररूप घेते -- 'बांबूच्या बनातील वाऱ्याची चिरफाड किर्रता.' उदासीन आसमंत, नामानिराळा दीर्घ तानेचा तुकडा – सगळेच प्रस्तुतापासून तुटलेले --- अलगलेले. देहातला प्राणही फक्त थडग्यातला दिवा वाटायला लागतोय. या सगळ्यातून झोप आल्याप्रमाणे- भोवळ आल्याप्रमाणे जवळजवळ मिटण्यासाठी काळ्या पाकळ्यांचा समुदाय जमा होतोय. (मृत्युरूप) एकांत शोकगीतापूर्वीचा. 'होतोय जवळ जवळ मिटण्यासाठी' हे पाकळ्यांच्या समुदायाइतकेच थडग्यातील दिव्यालाही लागू. 'जत्रा समुदाय...' यातल्या 'जत्रा' या आघातातून अचानकपणे आणि थंडपणे जमायला लागणाऱ्या

पाकळ्यांची भेसूरता जाणवते. 'एकांत शोकगीतापूर्वीचा...' इथे कवित संपते. म्हणजे काळाच्या विघटनाच्या अनुभवाच्या अटळ परिणतीच्या अगदी संपृक्त अवस्थेत संपते.

तर्काच्या क्षेत्रात कधीही समजावून न देता येणारा पण ज्याचे अस्तित्वही नाकारता येणार नाही असा हा अनुभव या कवितेत फार समर्थपणे व्यक्त झालेला आहे. विचार भावना यांच्याही बुडाशी कुठेतरी असणाऱ्या रहस्याकडे लागलेला या कवितेचा रोख एक अपरिहार्य अशी अनिश्चितता आणि धूसरता घेऊनच येतो. त्यामुळेच कविता 'समजल्या' नंतरही न समजता केवळ जाणवूनच घेता येईल असे कवितेचे फार मोठे अस्तित्व उरते. आरती प्रभूंच्या अनेक चांगल्या कवितांचे हे महत्त्वाचे वैशिष्ठ्य या कवितेत विशेष जाणवते.
-चंद्रकांत प्रभाकर देशपांडे
--- ००० ---

सध्या विश्राम गुप्ते यांचे, ' नवं जग, नवी कविता ' हे पुस्तक वाचतो आहे. त्यातले पुढील वाक्य इथे चर्चेला घ्यावे असे वाटले -- " जागतिकीकरणाने मूल्यपतन झालं हे समजणारे ' मूल्य ' नावाचं अचल तत्त्व मनात आणून त्याच्या पतनावर शोक करतात. पण प्रत्येक मूल्य स्खलनशील आणि परिवर्तनशील आहे हे लक्षात घेतलं की मूल्यसापेक्षतेचा विचार शक्य होतो. "  ( पान ३६९ ).
म्हणजे स्थलकालपरिस्थिती यापरत्वे मूल्ये वेगवेगळी असतात का आणि असे असेल तर कलेची मूल्यात्मता म्हणजे काय -- हे प्रश्न इथे उपस्थित होतात. की समावेशक मूल्यात्मता असे काही नसतेच, असे म्हणून हा प्रश्न निकाली काढावा ?

हरिश्चंद्र थोरात यांचा १९९८ चा अरुण कोलटकरांवरचा लेख देणारी येशू पाटील यांची पोस्ट महत्त्वाची आहे. थोरात सरांचे बरेच विश्लेषण पटत जाणारे आहे. पण, विचारांना तीव्र चालना देणाऱ्या एका थांब्यापाशी ते सगळे येते तेव्हा अर्थातच थबकणे घडते. तो महत्त्वाचा आव्हानात्मक मुद्दा हा असा आहे --
" केवळ कवितेतच राहणाऱ्या या क्रांतिकारकतेला कविताबाह्य जगाचे संदर्भ असते, सकारात्मक मूल्यांचे अधिष्ठान असते तर कोलटकरांची कविता मराठी कवितेतील तेजस्वी उद्गार ठरली असती, यात शंका नाही. "
या मुद्याबाबत घुसळण होणे अगत्याचे आहे.

बरेचजण स्वत:ची सुखदु:खे, रागलोभ आणि मते व्यक्त करण्यातच धन्यता मानतात !

काफ्काची कादंबरी ' ट्रायल ', पिरांदेल्लो, बेकेट, आयनेस्को, सार्त्र यांची नाटके, पेसोआच्या कविता, तुकाराम व ज्ञानेश्वर --हे सर्व लेखन म्हणजे अमुक काळाला आलेल्या अमुक व्यक्तींच्या प्रतिक्रिया होत्या केवळ, असे दिसत नाही. ते सर्व काळ मूल्यात्मक राहिलेले दिसते. ते कशामुळे ? आणि प्रतिक्रिया हेच जर तत्त्व असेल तर प्रत्येक

काळात प्रत्येक व्यक्तीच्या प्रतिक्रिया वेगळ्या असतात. या अर्थाने अमुक एक काळ असेही काही अस्तित्वातच नसते, असे म्हणावे लागेल. एकूणात कलेचे क्षेत्र म्हणजे प्रतिक्रियांच्या गावगप्पांचा ( gossip ) आखाडा, असे म्हणावे लागेल. थोडक्यात, ' मूल्य ' हा शब्द कुचकामी असून ' संस्कृती ' हा शब्दही निरर्थक आहे, असेच म्हणावे लागेल. अनेक कलावंत, लेखक असे म्हणून गेलेले आहेत की कला ही प्रतिक्रियेच्या मर्यादा ओलांडणारी असते. तसे नसेल तर, सामाजिक-राजकीय परिवर्तनाचे प्रयत्न आणि करमणूक यांशिवाय कलेचे काम काय उरते मग ?
२३-०८-२०२२.

ही ओसंडती भाषा चकित करणारी आहे --
' स्थिरता नाहीं येक क्षण । चपळविशई अग्रगण । ' -- हे मला प्रवाही वर्तमानाचे दर्शन वाटते --

समास दुसरा : गणेशस्तवन
॥ श्रीराम ॥
ॐ नमोजि गणनायेका । सर्व सिद्धिफळदायेका ।
अज्ञानभ्रांतिछेदका । बोधरूपा ॥ १॥
माझिये अंतरीं भरावें । सर्वकाळ वास्तव्य करावें ।
मज वाग्सुंन्यास वदवावें । कृपाकटाक्षेंकरूनी ॥ २॥
तुझिये कृपेचेनि बळें । वितुळती भ्रांतीचीं पडळें ।
आणी विश्वभक्षक काळें । दास्यत्व कीजे ॥ ३॥
येतां कृपेची निज उडी । विघ्नें कापती बापुडीं ।
होऊन जाती देशधडी । नाममात्रें ॥ ४॥
म्हणौन नामें विघ्नहर । आम्हां अनाथांचे माहेर ।
आदिकरूनी हरीहर । अमर वंदिती ॥ ५॥
वंदूनियां मंगळनिधी । कार्य करितां सर्वसिद्धी ।
आघात अडथाळे उपाधी । बाधूं सकेना ॥ ६॥
जयाचें आठवितां ध्यान । वाटे परम समाधान ।
नेत्रीं रिघोनियां मन । पांगुळे सर्वांगी ॥ ७॥
सगुण रूपाची टेव । माहा लावण्य लाघव ।
नृत्य करितां सकळ देव । तटस्त होती ॥ ८॥
सर्वकाळ मदोन्मत्त । सदा आनंदे डुल्लत ।
हरूषें निर्भर उद्दित । सुप्रसन्नवदनु ॥ ९॥
भव्यरूप वितंड । भीममूर्ति माहा प्रचंड ।

विस्तीर्ण मस्तकीं उदंड । सिंधूर चर्चिला ॥ १०॥
नाना सुगंध परिमळें । थबथबा गळती गंडस्थळें ।
तेथें आलीं षट्पदकुळें । झुंकारशब्दें ॥ ११॥
मुर्डीव शुंडादंड सरळे । शोभे अभिनव आवाळें ।
लंबित अधर तिक्षण गळे । क्षणक्षणा मंदसत्वी ॥ १२॥
चौदा विद्यांचा गोसांवी । हरस्व लोचन ते हिलावी ।
लवलवित फडकावी । फडै फडै कर्णथापा ॥ १३॥
रत्नखचित मुगुटीं झळाळ । नाना सुरंग फांकती कीळ ।
कुंडलें तळपती नीळ । वरी जडिले झमकती ॥ १४॥
दंत शुभ्र सद्दट । रत्नखचित हेमकट्ट ।
तया तळवटीं पत्रें नीट । तळपती लघु लघु ॥ १५॥
लवथवित मलपे दोंद । वेष्टित कट्ट नागबंद ।
क्षुद्र घंटिका मंद मंद । वाजती झणत्कारें ॥ १६॥
चतुर्भुज लंबोदर । कासे कासिला पितांबर ।
फडके दोंदिचा फणीवर । धुधूकार टाकी ॥ १७॥
डोलवी मस्तक जिव्हा लाळी । घालून बैसला वेटाळी ।
उभारोनि नाभिकमळीं । टकमकां पाहे ॥ १८॥
नाना याति कुशुममाळा । व्याळपरियंत रुळती गळां ।
रत्नजडित हृदयकमळा- । वरी पदक शोभे ॥ १९॥
शोभे फरश आणी कमळ । अंकुश तिक्षण तेजाळ ।
येके करीं मोदकगोळ । तयावरी अति प्रीति ॥ २०॥
नट नाट्य कळा कुंसरी । नाना छंदें नृत्य करी ।
टाळ मृदांग भरोवरी । उपांग हुंकारे ॥ २१॥
स्थिरता नाहीं येक क्षण । चपळविशाई अग्रगण ।
साजिरी मूर्ति सुलक्षण । लावण्यखाणी ॥ २२॥
रुणझुणा वाजती नेपुरें । वांकी बोभाटती गजरें ।
घागरियासहित मनोहरें । पाउलें दोनी ॥ २३॥
ईश्वरसभेसी आली शोभा । दिव्यांबरांची फांकली प्रभा ।
साहित्यविशाई सुल्लभा । अष्टनायका होती ॥ २४॥
ऐसा सर्वांगे सुंदरु । सकळ विद्यांचा आगरु ।
त्यासी माझा नमस्कारु । साष्टांग भावें ॥ २५॥

ध्यान गणेशाचें वर्णितां । मतिप्रकाश होये भ्रांता ।
गुणानुवाद श्रवण करितां । वोळे सरस्वती ॥ २६॥
जयासि ब्रह्मादिक वंदिती । तेथें मानव बापुडे किती ।
असो प्राणी मंदमती । तेहीं गणेश चिंतावा ॥ २७॥
जे मूर्ख अवलक्षण । जे कां हीणाहूनि हीण ।
तेचि होती दक्ष प्रविण । सर्वविशई ॥ २८॥
ऐसा जो परम समर्थ । पूर्ण करी मनोरथ ।
सप्रचीत भजनस्वार्थ । कल्लौ चंडीविनायेकौ ॥ २९॥
ऐसा गणेश मंगळमूर्ती । तो म्यां स्तविला येथामति ।
वांछ्या धरूनि चित्तीं । परमार्थाची ॥ ३०॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
गणेशस्तवननाम समास दुसरा ॥ २॥
--- 000 ---

कविता ही आधी खुद्द कवीलाच अनपेक्षित असायला हवी.

मराठीतला पुस्तक व्यवहार.

सध्या फेसबुकवर मराठीतले कवितासंग्रह, त्यांचे प्रकाशन, किंमती आणि खप या विषयांवर चर्चा चालू आहे. विशेषत: संजय भास्कर जोशी आणि गणेश कनाटे या आपल्या मित्रांच्या पोस्ट पाहण्यासारख्या आहेत. खरे तर मी या विषयावर बोलू नये कारण त्या पुस्तक जगापासून मी कधीच लांब गेलेलो आहे. माझे संकेतस्थळ असून त्यावर माझे सर्व लेखन मोफत उपलब्ध ठेवून मी तो प्रश्न माझ्यापुरता मिटवलेला आहे. जगभरातल्या पंधरा देशांतून दर वर्षी या संकेतस्थळाला ४००० भेटी होतात. त्यांतले निम्मे वा १००० लोक यातले काही वाचत असतील असे म्हटले तरी या भंगार वाचन संस्कृती असलेल्या मराठीच्या मानाने ते खूप झाले ! माझे तर मत असे आहे की एखाद्या भाषेचा भूतकाळ तपासून त्या भाषेला ‘ अभिजात ‘ वगैरे दर्जा देऊच नये. आज वर्तमानात या भाषेचा समाज त्याच्या भाषेचे काय करतो आहे, तीत कसली निर्मिती चालू आहे, हे पाहून ठरवावे. असे केल्यास, माझ्या मते मराठीला अभिजात नव्हे तर चीप म्हणजे स्वस्त भाषेचा दर्जा द्यावा लागेल. केंद्राकडून कोट्यवधी रुपये मिळवून ही भाषा ते कशावर खर्च करणार आहे ? भवने बांधणे आणि उत्सव भरवणे ? की अस्मितांचे गुलाल उधळणे ?
इथे निरनिराळे रोगनिवारण, पाककृती, सौंदर्यवर्धन आणि धर्मसंकीर्तन यांपलिकडे खरे तर पुस्तकांची गरजच नाही आहे. तरीही, त्यातल्या त्यात, इतिहास, लढाया, प्रवासवर्णने आणि चरित्रे चालू शकतील. कादंबरी, कथा, नाटक,

कविता वा कोणतेही ललित लेखन यांची इथे फारशी गरज नाही. त्यांतलेही काही करमणूकप्रधान आणि ' डोक्याला ताप न देणारे ' असे काही असेल तर चालू शकेल. जगणे समजून घेण्याची प्रक्रिया जिवंत असणे म्हणजे संस्कृती असे जर काही असेल तर इथे ते अभावानेच अस्तित्वात आहे. जगण्यातल्या आपापल्या अनुभव क्षेत्रांना स्वमतावगुंठित अभिव्यक्ती देत राहणे यापलीकडे साहित्य, कला यांना इथे अस्तित्व नाही. ' मग दुसरे असते तरी काय ' असे इथले विद्वानही तोंड वर करून विचारतील, अशी अवस्था आहे. या संदर्भात, मराठी दिनाच्या दिवशी मी इथे दिलेल्या पोस्टचा मजकूर पुन्हा एकदा खाली देत आहे –

मराठीची समस्या

दोनतीन गोष्टी आधीच क्लियर करतो. मला मराठीबद्दल अस्मिता नाही पण ती माझी भाषा असल्याने आत्मीयता आहे. मी मराठीतला एक लेखक/कवी असलो तरीही मला या भाषेतले माझे स्थान कुणितरी निश्चित करून द्यावे याची गरज वाटत नाही. तशी कुवत असलेले समीक्षकही आता नाहीत. मी ज्या कारणासाठी लिहितो तसल्या साहित्याची इथे फारशी कुणाला गरज नाही, हे मला माहीत आहे. स्वामित्वधनाचे पैसे वगैरे याची स्वप्नेही मला पडत नाहीत. राहता राहिली काही घसघशीत रकमेची पारितोषिके. त्यांच्याकडेही मी आशाळभूतपणे पाहात बसलेलो नाही. आणि मुख्य म्हणजे मी आत्ता हे जे लिहितो आहे ते गाढा व्यासंग, अभ्यास आणि पुरावे यांवर आधारित लिहीत नसून माझी इम्प्रेशन्स म्हणजे समजुती यांवर आधारित लिहितो आहे. काहीही बोलले तरी त्यात थोडे तरी तथ्य असतेच, हे याचे आधारभूत तत्त्व समजायला हरकत नाही. पुढे मी जे लिहितो आहे ते नीट वाचले जावे म्हणून हे थोडे सांगितले. मला काहीही सिद्ध करायचे नाहीय वा मी खाली लिहितोय ते कुणाला पटवूनही देत बसायचे नाहीय. हे मुद्दे घ्यायचे तर घ्या विचारात नाही तर द्या सोडून, मेरा काम तो निरपेक्ष चलता रहेगा.
आज मातृभाषा दिन म्हणून मराठीचे यज्ञ ठिकठिकाणी चालू आहेत. यज्ञ शब्द आला म्हणून चिडू नये, भाषेत आहे तो शब्द, त्याला माझा इलाज नाही. इथल्या अर्थापुरताच त्याचा उपयोग केलेला आहे. तर इंग्रजीचे आक्रमण, मराठी शाळा बंद होणे, व्यवहारात या भाषेला फारशी किंमत नसणे, शास्त्रांचे वा तंत्रशिक्षण या भाषेत नसणे, वगैरे प्रश्नांची चर्चा सर्वत्र चालू आहे. मातृभाषेतून शिक्षण व्हायला हवे, हे तर जगातले सगळेच शिक्षणतज्ञ म्हणत असतात. ते माहीत असूनही इथे काय झालीय प्रगती ? त्यामुळे, ज्या गोष्टींवर रडून फारसा काही उपयोग नाही तेच दर वर्षी रडत बसण्यात काय अर्थ आहे ? वाट्टेल ते होवो, मराठी भाषा मरणार नाही, ती जिवंत राहीलच – यात समाधान मानत बसणेही एक प्रकारे सपाटच वाटू लागलेले आहे. आणि ही भाषा जिवंत राहणार हा हमखास दिलासा अधिक कोण वापरते, हेही पाहायला हवे. नवशिक्षित आणि नवसाहित्यिक मंडळींना याची जास्त गरज वाटते, असे दिसते. ओळख मिळवण्याचे हे एक क्षेत्र आता सापडलेय तर ते टिकावे असे एक इच्छाचिंतनही त्यात आहे.
गेल्या काही वर्षांत दलित-शोषित-वंचित-पीडित-ग्रामीण या लेखकांचे बरेच साहित्य मराठीत येत गेले. इथल्याच जीवनाचे जे कप्पे साहित्यात कधी आले नव्हते ते खोलले गेले. त्यात मानवी जगणे पाहात जाणे असे वेगळ्या भानाचेही काही आले असले तरीही, मुख्यत: जगण्याच्या त्या त्या नमून्यांनाच महत्त्व दिले गेले. जगण्याचा कच्चा

माल जितका अधिक दरिद्री आणि क्लेशकारक आणि अन्यायकारक तितका साहित्यात तो अधिक मौल्यवान असे झाले. काही काळ असे होणे साहजिकही होते. पण, आता तो काळ संपत आला आहे. परिवर्तनाच्या सामाजिक-राजकीय चळवळी करत राहणे वेगळे आणि तेच तेच नमूने गिरवत राहात साहित्यात श्रेष्ठ ठरण्याची आकांक्षा बाळगणे वेगळे. साहित्य म्हणजे नुसताच एक वस्तुस्थितीचा ऐतिहासिक ऐवज तयार करणे नव्हे. त्याला एक सांस्कृतिक अंग असते. ते दुर्लक्षिण्याकडे कल होत गेला.

काय असते सांस्कृतिक म्हणजे ? किल्ले, वस्तुसंग्रहालये, काही विभूति आणि उत्सव ? संस्कृतीची ही फारच उथळ कल्पना आहे. संस्कृती म्हणजे जगण्यातल्या प्रश्नांना/समस्यांना सामोरे जात राहण्याची प्रक्रिया. ( त्यांपासून पलायन करण्यासाठी निर्माण होणारे करमणुकीचे प्रकार म्हणजे संस्कृती नव्हे. ) सामोरे जाणे म्हणजे नुसत्याच सुखदु:खांच्या प्रतिक्रिया देत राहणे नव्हे, हे इथे लक्षात घ्यायला हवे. प्रॉब्लेम असा झालेला आहे की त्यासाठी लागणारी चिंतनशीलता यांतल्या बहुसंख्य लेखकांकडे नाहीय आणि तरीही प्रतिष्ठा मिळण्याचे रस्ते गमवायचे नाही आहेत. साहित्य वा कला म्हणून आता त्यांच्या कच्च्या मालाचा कंटाळा येण्याचे दिवस सुरू झालेले आहेत. आणि सांस्कृतिक प्रक्रिया म्हणावे असे तर काही महत्त्वाचे त्यात वाटत नाहीय. संख्येच्या आणि सामाजिक न्यायाच्या जोरावर आजवर आघाडीवर राहता आले, पण ते सतत जमणार नाही. यातून या नवलेखकांत एक न्यूनगंड तयार होऊ लागतो आणि साहित्य म्हणजे ' हे आणि ते ' यांच्यांतली स्पर्धा असते, अशा बावळट कल्पना ते बाळगू लागतात. एखादा विद्वानही तसली कुस्तीची विधाने करण्यात धन्यता मानतो.

अशी अंतर्गत दुश्मनी निर्माण होण्याचे आणखी एक कारण दिसते. ते आहे प्रमाण भाषेचे. बऱ्याचजणांना प्रमाण भाषेवर प्रभुत्व तर मिळवता येत नाही आणि नुसत्याच बोली भाषेत लिहावे तर वाचणार कोण, असा प्रश्न निर्माण होतो आहे. बोली भाषांचे कितीही उदात्तीकरण करा आणि प्रमाण भाषेचा कितीही तिरस्कार करा ( प्रमाण भाषा ब्राम्हणी आहे म्हणूनही तिचा द्वेष असल्याचे कधी कधी दिसते. ब्राम्हणांचा प्रभाव असलेला एक काळ होऊनही गेला, त्यामुळे भाषा प्रभावित झालेलीच आहे, हा भाग वेगळा. ) पण यातून साध्य काय होणार ? उलट या आंतरद्वंद्वात सापडून शक्तिनाश होत राहणार.

सारांश, अनुभवक्षेत्रे आणि प्रमाण भाषा या दोन कारणांमुळे या भाषेत दोन विरोधी गट तयार झालेले आहेत. हे जणू एक छुपे युद्धच सुरू आहे. त्यामुळे, या भाषेत चालणारी मुख्य प्रक्रिया ही आत्मघाताची आहे. " संगमनेरला जायला पुण्याहून संध्याकाळी पाच वाजता एस्टी आहे " – ही भाषा जिवंत राहणे आणि त्यात समाधान मानणे ही आत्मवंचना होईल. जगण्यातल्या प्रश्नांना सामोरे जाण्यासाठी आजची भाषा, आजचे घाट, आजची कौशल्ये वापरली जाणे, भाषेचा अर्थसंपृक्त वापर होत राहणे म्हणजे खरे तर भाषा जिवंत राहणे. भाषेची अभिव्यक्तीची ताकद आणि शक्यता वाढत जाणे आणि समांतरपणे ते सगळे समजून घेण्याची एकूणच समाजाची कुवत वाढत जाणे म्हणजे भाषा जिवंत राहणे. भाषा ही संस्कृतीची वाहक असायला हवी ती या अर्थाने. हे सगळे वगळून भाषा जिवंत राहण्याचा अभिमान वा गर्व वा अस्मिता काय कामाची ?

--- सारांश म्हणजे चहू बाजूंनी मरणपंथाला लागलेली ही भाषा आहे. उगीचच, पुस्तके स्वस्त केली म्हणजे खपतील, वगैरे बोलण्यात काही अर्थ नाही. पण एक मात्र या भाषेची ग्रेट शक्यता सांगता येईल – पैसा, प्रसिद्धी, प्रतिष्ठा असली

लौकिक अपेक्षा न ठेवणारे निस्पृह लेखकच या भाषेत काही लिहीत राहतील ! अफाट शब्दसंपत्तीने श्रीमंत असलेली ही भाषा प्रत्यक्षात एक दरिद्री, स्वस्त भाषा आहे, हे डोळे उघडून पाहायला हवे.

माझे मित्र असलेल्या एका पुस्तक विक्रेत्यांच्या दुकानात एकदा गप्पा मारत बसलो होतो. ते म्हणाले, कोणताही चांगला पुस्तक विक्रेता कविता, एकांकिका आणि नाटके यांच्या पुस्तकांसाठी आपल्या दुकानातली जागा वाया घालवणार नाही. मुख्य कारण म्हणजे खप नाही हे असले तरी, त्यांनी दिलेले एक उदाहरण बोलके आहे. उदाहरणार्थ, एकांकिका घ्यायला एखाद्या नाट्य समूहातले ४-५ जण येतात. त्यांना काहीही माहिती नसते. ते बराच वेळ कौंटर अडवून ठेवतात. ते म्हणतात, स्त्रीपात्रविरहित कमी पात्रांच्या एकांकिका दाखवा किंवा एकच स्त्रीपात्र असलेल्या विनोदी दाखवा ! ते साठोत्तरी आणि नव्वदोत्तरी असले भुक्кड विभाग इथे नाही लागत ! तर, तसे, गिऱ्हाईकांना अपेक्षित अशा पद्धतीची विभागणी करून ठेवलेले गठ्ठे त्यांनी मला दाखवले !

कुछ नही होगा. साहित्य, कला हे सगळे राजकारणच असते हे मान्य करणारा हा समाज आहे. मग हवेच कशाला साहित्य ? राजकारणच चालू द्या ना ! टोमणे, उपरोध, कोट्या आणि धमक्या – एवढे साहित्य इथे पुरेसे आहे ! जय हिंद, जय महाराष्ट्र !

( जरा कटू भाषेचा वापर केल्याशिवाय लक्ष कोण देणार – याही विचाराने हे सत्य मांडले आहे. )

--- ००० ---

## कशासाठी कविता

लोक कविता वाचत नाहीत, ती वाचली गेली पाहिजे, कवितासंग्रह खपले पाहिजेत – हे ठीक. पण का, कशासाठी व्हायला हवेय हे ? नेटवर सहज पाहिले तर खालील कारणे दिसली –

१. ती शैक्षणिक वाढीला उपकारक असते.

२. तिच्यामुळे संकल्पना सुधारतात.

३. ती कवीसाठी एक उपचार म्हणून काम करते.

४. ती वाचकासाठी एक उपचार म्हणून काम करते.

५. तिच्यामुळे शब्दांचे अर्थ समजतात.

६. तिच्यामुळे माणसे समजतात.

७. तिच्यामुळे कौशल्ये वाढतात.

८. तिच्यामुळे आत्मज्ञान होते.

--- पण यात, मेरिटमध्ये येता येते, राजकारणात यश मिळते, उघडकीला न येता पैसे खाता येतात, नोकरी मिळते, आपल्याला हवे तसे सामाजिक-राजकीय परिवर्तन करता येते, अभिनय वा गाणे यात गाजता येते – अशी वा यासम काही कारणे दिसत नाहीत. आणखी कुणाला काही सुचताहेत का चांगली कारणे ? न जाणो आपण कविता का

वाचायला हवी हे लक्षातच नसेल येत लोकांच्या जसे की दारू का प्यायला हवी, हे येते. तर आपल्या तथाकथित वाचकांना मार्गदर्शन होईल, असे कुणाला काही सुचत असल्यास इथे नोंदवावे. का, कशासाठी वाचायची कविता याचे कारण आणि त्याची निकड समजली तर न जाणो भराभर खपू लागतील कवितासंग्रह ! नुसतेच, लोक वाचत नाहीत असे म्हणत बसण्यापेक्षा हे काही विधायक होईल. सोचो –

--- ००० ---

पुरुषोत्तम करंडक स्पर्धा २०२२.

या स्पर्धेत करंडकपात्र एकांकिका सादर झाली नाही या कारणाने कुणालाही करंडक न देण्याचा एक ऐतिहासिक निर्णय घेतला गेला ! त्यावर अर्थातच लेख, टिपणे, चर्चा हे सर्व होणे साहजिकच होते. काल दिनांक २२-०९-२२ रोजी पुण्यातल्या सुदर्शन हॉलमध्ये यावर चर्चा झाली. काही कौटुंबिक कारणांमुळे मी तिकडे जाऊ शकलो नाही, परंतु, माझे या बाबतीतले विचार मी लिहून पाठवले होते. चर्चेचे सूत्रसंचालक माझे मित्र मिलिंद शिंत्रे यांनी ते तिथे वाचून दाखवले. तेच माझे टिपण मी खाली पोस्ट म्हणून देत आहे --

पुरुषोत्तम करंडक स्पर्धा --- चं. प्र. देशपांडे.

माझ्या एका एकांकिकेला पुरुषोत्तम करंडक, एका एकांकिकेला सर्वोत्तम प्रायोगिक आणि एका एकांकिकेला द्वितीय पुरस्कार मिळाला होता. अनेकदा मी या स्पर्धेतल्या एकांकिका पाहिलेल्याही आहेत. त्या आधारावर सध्याच्या, करंडक न देण्याच्या वादावर थोडे बोलतोय.

एक लक्षात घ्यायला हवे की हा निकाल आयोजक आणि परीक्षक यांनी सहमतीने जाहीर केलेला दिसतो आहे. करंडकास पात्र एकांकिका सादरच झालेली नसेल तर करंडक दिला जाणार नाही, असे स्पर्धेच्या नियमावलीत स्पष्ट म्हटले असल्याचे जाहीर झालेले आहे. स्पर्धेच्या अंतिम फेरीसाठी परेश मोकाशी हे एक उत्तम लेखक-दिग्दर्शक, हिमांशू स्मार्त हे एक उत्तम लेखक-दिग्दर्शक-व्याख्याते आणि पौर्णिमा मनोहर या एक उत्तम अभिनेत्री होत्या. तिथे नाराजीला काही जागा आहे असे मला वाटत नाही. असे परीक्षक होते हे संबंधितांनी दिलखुलास स्वीकाराचेच समजायला हवे. नियमात असलेल्या तरतुदीप्रमाणेच त्यांनी हा निकाल दिलेला असणार यात शंकाच नाही. आणि ‘ परीक्षकांची समज ’ हाही इथे विवाद्य मुद्दा ठरू नये. ( प्राथमिक फेरीच्या परीक्षकांनी अंतिम फेरीसाठी नऊ एकांकिका निवडून द्यायच्या होत्या, ते काम त्यांनी केले, हे पाहता त्यांचा प्रश्न येत नाही. )

पुरुषोत्तम करंडक या स्पर्धेला गेली अनेक दशके नाट्यक्षेत्रात एक प्रतिष्ठा आहे हे सर्वांनीच मान्य केलेले आहे. ती प्रतिष्ठा जपली जाण्याचे प्रयत्न होणे हे चुकीचे म्हणता येणार नाही. नुसतीच वासरात लंगडी गाय अशी पारितोषिके देऊन ती प्रतिष्ठा राहणार नाही हे स्पष्टच आहे. सारांश म्हणजे आयोजक आणि परीक्षक यांनी साधक-बाधक विचार करून हा निर्णय घेतला असणार आणि तो त्यांचा अधिकार आहे, हे आधी मान्य व्हायला हवे. ( ‘ तो त्यांचा

अधिकार आहे ' हे वाक्य आपले अजितदादा दिवसातून किमान तीनदा निरनिराळ्या संदर्भांत म्हणत असतात, हे इथे लक्षात घ्यावे. ) या वर्षीचा हा निर्णय ऐतिहासिक आहे, असे पूर्वी कधीच झाले नव्हते, त्यामुळे, यावर चर्चा होणे साहजिक आहे.

प्रत्येक स्पर्धेत ' स्पर्धकांना न्याय मिळणे ' ही एक कल्पना चर्चेत असते. मुळात प्रत्येक वेळी उत्तम, जाणकार परीक्षक मिळणे अवघड नव्हे, अशक्यच असते, हे आपण समजून घ्यायला हवे. जरा अतिशयोक्ती करायची झाली तर एखाद्या नाटकाला पहिली, दुसरी, तिसरी अशा घंटा दिल्या होत्या या अनुभवावरही एखादा माणूस इथे परीक्षक म्हणून येऊ शकतो. तुम्ही परीक्षकांना मानधन काय देणार, त्यांच्या राहण्या-जेवण्याचे काय करणार इथपासून प्रश्न असतात. लाख्यांनी माझे ' समतोल ' हे नाटक राज्य नाट्य ला केले होते. तेव्हा, यातले एक पात्र खिडकीत उभे राहून वाट पाहते आहे, असे असूनही नेपथ्यात खिडकीच नव्हती, अशी एक प्रचंड त्रुटीही परीक्षकांनी काढली होती. माझे ' एक गगनभेदी किंचाळी ' हे नाटक कोल्हापूर केंद्रात झाले होते. तेव्हा हे नाटक आणि सांगलीतून आलेले ' काळोख देत हुंकार ' हे दिलीप परदेशींचे नाटक ही दोन नाटके गाजत होती. वर्तमानपत्रे आणि प्रेक्षक यांत हीच दोन नावे होती. पण, प्रत्यक्ष निकालात आमचे नाटक शून्यावर राहिले होते ! साधे एखादे उत्तेजनार्थ पारितोषिकही नव्हते ! त्याला काय करणार ? हे अनेकदा आणि कितीही ठिकाणी घडू शकते. राज्याच्या, देशाच्या वा जागतिक पातळीवरच्या स्पर्धांमध्येही असे मतभेद आणि चर्चा चालू असतात. कलेच्या वा साहित्याच्या क्षेत्रातही एकमत म्हणावे असे निकष नसतात. त्यात पुनः, डिलान थॉमस या कवीची एकच कविता पाहून, हा एक अत्यंत महत्त्वाचा कवी आहे, असे समजणारे आणि इकडे-तिकडे कानोसा न घेता आत्मविश्वासाने म्हणू शकणारे टी. एस. एलियटसारखे समीक्षक आहेत कुठे इथे ? त्यामुळे, कोणत्याही कलेच्या क्षेत्रात काही वेगळेच, नवे कुणी काही करत असेल तर प्रस्थापितांच्या ते डोक्यांत न शिरल्याने अन्याय होण्याचा धोका असणारच. आता एक साधा प्रश्न घ्या की बाबा नाट्य स्पर्धेतले पारितोषिक हे प्रयोगाला असते की आशयाच्या दर्जाला ? तुकारामाचा आशय वगळून त्याला नुसताच कवी म्हणून ग्रेट म्हणता येईल का ? असे अनेक प्रश्न आहेत आणि असणार. त्यांची जाणीव ठेवावीच लागणार. नुसतीच एखादी एकांकिका वंचितांच्या जीवनावर किंवा ग्रामीण जीवनावर आधारित आहे म्हणून ग्रेट ठरू शकते का ? कलेतले अनुभव-मटेरियल महत्त्वाचे असते की लेखकाचा आवाका, समजूत, मानवी जगण्याचे भान ? यावर विचार व्हायलाच हवा. अनेकदा अनुभव-क्षेत्र कोणते आहे याचाही बक्षीस मिळवायला उपयोग होतो, असा एक काळ येऊन गेलाच ना. कधी कुणी तंत्राच्या भडिमारानेही पारितोषिके मिळवली. या उलट तंत्र हे जरूरीपुरतेच असायला हवे, असे दामू केंकरे आणि सत्यदेव दुबे असे आपले सन्मान्य नाट्यकर्मी म्हणून गेलेले आहेत.

आहे त्या उपलब्ध परिस्थितीत त्यांतल्या त्यांत चांगले परीक्षक मिळवून या स्पर्धा भरवल्या जातात, हे आपण मान्यच करावे लागणार. न्याय, योग्य निकष या गोष्टी विवाद्य राहणारच. मला काही वेगळेच म्हणायचे आहे. या एकूणच स्पर्धांमधली पारितोषिके ही व्यावहारिक महत्त्वाची ठरत गेल्यामुळे स्पर्धक मंडळी आडाखे-केंद्रित होऊ लागली असे मला वाटते. अनुभव क्षेत्र, समस्या कोणत्या घ्याव्यात, तांत्रिक प्रभाव कसे निर्माण करावेत यांचाच जास्त विचार सुरू झाला. दिल्लीच्या एन एस डी मध्ये आम्ही एक नाटक पाहिले त्यात शंभर दिवे वापरले होते ! हे कसे व्हायला लागते – माझा एक मित्र होता, तो स्वत: कधी मटका खेळायचा नाही, पण, मटक्याचे आकडे जे फुटतात त्यांत एक डिझाईन

असते असे त्याला समजलेले होते आणि ते डिझाईन तो क्रॅक करू शकत असे. या त्याच्या प्रसिद्धीमुळे काही लोक ऑफिसातही त्याला आकडे विचारायला येत. मुळात हे लक्षात घ्यायला हवे की तुम्ही आडाखे वापरा वा न वापरा तुम्हालाच बक्षीस म्हणजे न्याय मिळेल असे काही नाही. इतर परीक्षा वगैरे ठीक पण, कलेच्या क्षेत्रात तर हे असे यश मिळवण्याच्या भिकारडेपणाचा त्यागच केला पाहिजे. अलीकडेच गोदार्द नामक एक जगविख्यात सिने-दिग्दर्शक वारला. त्याचा पहिला ‘ ब्रेथलेस ‘ हा चित्रपट चित्रपट तरी म्हणावा का इथून चर्चा होती. पण तो नव्या लाटेतला एक महत्त्वाचा चित्रपट ठरला. कलेच्या क्षेत्रात ज्याला कलांतर्गत आत्मनिष्ठा म्हणतात ती असायलाच हवी. तुम्हाला उत्तम, करमणुकीची, विनोदी कलाकृती निर्माण करायची आहे, हरकत नाही – तेच करा, आडाखे नकोत. आता उत्तर-आधुनिक तत्त्वज्ञानाप्रमाणे तर सत्य, मूल्य, वैश्विक आशय-बिशय काही नसते. ज्याला जे वाटेल ते तसे करायचे. हे जर खरोखर तीव्रतेने वाटत-दिसत असेल तर तशी येऊ द्या कलाकृती. कला म्हणजे जगणे समजून घेण्याची प्रक्रिया किंवा निव्वळ करमणुकीची प्रक्रिया – जे खरोखर वाटत असेल तशीच कलाकृती निर्माण व्हायला हवी. या आत्मनिष्ठेकडे दुर्लक्ष होत गेले तर कलेचा दर्जा खालावत जाणे अटळ आहे.

आज आपल्याकडे साहित्यकलेत गटतट, टोळ्या आहेत, याची चर्चा होत असते. काय प्रमोट करायचे, काय यशस्वी करायचे, कोणती पुस्तके अभ्यासाला लावायची, अशी सगळी फील्डिंग लावणे असते. मग काय करावे ? तेच राजकारण ? यातून कलेचे सांस्कृतिक अस्तित्व काय राहील ? नाही तरी गुणवत्ता आणि समज यांवर आधारित तुमच्या कामाकडे पाहिले जाईल याची खात्री नाहीच. त्यामुळे, स्पर्धकांनी कलेतील यश मिळवण्याची हाव सोडून दिली पाहिजे. या निमित्ताने आपल्याला रंगमंच उपलब्ध होतो, प्रेक्षक मिळतात यालाच महत्त्व दिले पाहिजे. आपल्या अभिव्यक्तीचा कस हाच प्रामाणिकपणे मांडला गेला पाहिजे. तरच, नुसता स्पर्धांचाच नाही तर आपल्या एकूणच सांस्कृतिक कृतींचा दर्जा वाढेल – त्या अर्थपूर्ण होतील. तसे नसेल घडणार तर बक्षिसे मिळण्याची प्रतिष्ठा तरी कितपत राहील ? आपल्या अभिव्यक्तीला महत्त्व देणे हेच घडत राहायला हवे. अन्यथा या स्पर्धा आपल्या कलेला मारक ठरताहेत असेच म्हणावे लागेल.

--- चं. प्र. देशपांडे.

--- ००० ---

रे आर्मनट्रॉट या कवयित्रीच्या कविता मला आवडल्या होत्या. तिच्या कविता पुन्हा वाचायची इच्छा झाली. सर्च देताना काही स्पेलिंग चूक झाली, तर हा एक वेगळाच कवी सापडला ! याच्याही कविता भारी आहेत. नमून्यादाखल एक देतोय खाली, पण, आता अनुसर्जन बास ! कुणाला वाटल्यास जरूर ते काम करावे --

Poetics

by A. R. Ammons

A. R. Ammons

I look for the way
things will turn
out spiralling from a center,
the shape
things will take to come forth in
so that the birch tree white
touched black at branches
will stand out
wind-glittering
totally its apparent self:
I look for the forms
things want to come as
from what black wells of possibility,
how a thing will
unfold:
not the shape on paper -- though
that, too -- but the
uninterfering means on paper:
not so much looking for the shape
as being available
to any shape that may be
summoning itself
through me
from the self not mine but ours.
--- ००० ---

ग्रेट नाटककार ---

"Life is a very sad piece of buffoonery, because we have the need to fool ourselves continuously by the spontaneous creation of a reality (one for each and never the same for everyone) which, from time to time, reveals itself to be vain and illusory."
~ Luigi Pirandello

**न-भाषा कविता**

इंग्लिश मध्ये ज्या कवितेला Language Poetry म्हणतात त्यासाठीच मी हा मराठी प्रतिशब्द योजला आहे. न-कविता किंवा प्रतिकविता हे इंग्लिश मधल्या Anti Poetry ला प्रतिशब्द होऊ शकतात. तिथेही कवितेची काही पारंपरिक वैशिष्ट्ये नाकारलेली असतातच. पण, इथे जरा वेगळे आहे. न-नाट्य म्हटले तरी जसे ते नाटकच असते तसेच न-भाषा म्हटले तरी ही असते भाषाच. पारंपरिकता नाकारणे हेच यातले प्रमुख वैशिष्ट्य असते. त्यांच्या भाषा-कवितेची वैशिष्ट्ये पाहून मला ' भग्नभाषा ' हा एक प्रतिशब्द सुचला होता – fractured language -- या अर्थी, पण, तसेही कुंपण नको म्हणून मी न-भाषा म्हणत आहे.

हे काहीतरी नुसतेच तिकडचे उचलून इकडे कॉपी मारणे, असे नाही आहे. कॉपी-पेस्ट हे आपल्या विद्वान डॉक्टर लोकांचे काम. कवी त्या मानाने खूपच बरे असतात. माणसाचे अनुभवजीवन स्थलकालपरिस्थितीप्रमाणे वेगवेगळे असले तरी त्याचे भावजीवन जगभर एकसारखेच असते. तो सारखेपणा मन वापरण्याच्या समान पद्धतीमुळे येतो. यामुळेच ती जी भाषाकविता म्हटली जाते तिची अनेक वैशिष्ट्ये इकडच्या आपल्याही कवितेत असतातच. आपण या ना त्या चाकोरीत रममाण होणारे खुशमिजाज लोक असल्याने आपले त्याकडे विशेष लक्ष गेलेले नसते, इतकेच. मुळात मानवी मनाचा वापर हेच तर नसेल जगण्याचा राडा होण्याचे कारण – हा प्रश्नच तुरंत फेटाळून लावायची आपली पद्धत आहे. आहे त्या मनाचे थोडेफार बदलते अनुभव, शक्य तो अभिव्यक्ति पद्धतीही फारशा न बदलता सुखेनैव देत राहणे हेच आपले ' सर्जक ' काम राहात आलेले आहे.

उदाहरणार्थ आपण विद्रोही वा आणखी काही कारणांनी उपरोधिक वगैरे असणाऱ्या कविता पाहू. मुळात निसर्गात समानता नाही आहे – एक दणकट तब्येतीचा आहे तर एक कमकुवत, एक बुद्धिमान आहे तर एक डल, एक राजबिंडा आहे तर दूसरा साधा शिपाईबिंडा आहे, एकाकडे दुसऱ्यांचे शोषण करण्याची कुवत जास्त आहे तर दुसऱ्याकडे ती नाही आहे, वगैरे. आणि हे सगळे भेद मनाच्या आत्मकेंद्रिततेसह चालू असतात. मी सुरक्षित असावे आणि मी सुखात असावे, हा पाया असतो. मानवी जगण्याचा राडा होण्याची कारणे आपले मन वापरण्याच्या समान पद्धतीत असतात, सर्व-निरपेक्ष परिस्थिती, तथाकथित व्यवस्था वा काही आपोआप जन्माला आलेली दुष्ट माणसे अशा भ्रामक गोष्टींत नसतात, हे कुणीही पाहू इच्छित नाही. स्वत:ला भिंगाखाली घेणे, स्वत:चे मन ऐरणीवर घेणे याबाबत आपल्याला हिंमतच नसल्याने बाह्य परिस्थितीवर उपरोध वा क्रोध दाखवत राहणे एवढीच आपल्या धाडसीपणाची मर्यादा ठरते. जगण्याच्या पद्धती, मनाच्या कृती हे पाहायची निकड वाटणारे काही कवी असतात, त्यांच्यामुळे कलेच्या क्षेत्रात तात्त्विक वा आकलन-प्रक्रियांत बदल होत असतात, हे समजून घेतले पाहिजे. इथे मराठीत ते घडणे अवघडच दिसते – इथे आहे त्या मनाने केलेले पळपुटे शौर्य हेच आणखी एकदोनशे वर्षे प्रिय राहील – चलनात राहील ! ( मित्रांना

आश्वासन दिलेला मराठी कवितेवरचा लेख मी लिहिणार आहेच – त्याची पूर्वतयारी चालूच आहे. जरा नीट वाचून-पाहून ते काम करायचे असल्याने त्याला योग्य तो वेळ लागणार आहे. )

तर, न-भाषा कविता हीही भाषेतच लिहिली जाते पण, भाषेची सवयीची वैशिष्ट्ये ती नाकारते. कवितेचे ' पद्य ' असणे, तिच्यातली सांगीतिक लय, प्रतिमा, अलंकार यांचे इथे कौतुक नसते. भाषा म्हणजे कवीचा अनुभव वा आकलन वा प्रतिक्रिया व्यक्त करण्याचे माध्यम असे इथे समजले जात नाही. इथे भाषा हाच अनुभव म्हणून सादर होतो. त्यामुळे एकूणात जगण्यासारखी भग्न भाषा इथे अर्थांचे नायनाट करत राहते. कवीने स्वत:च्या जगण्यातून येणारा आशय व्यक्त करणे याला इथे महत्त्व नसते. टी. एस. एलियट ने सांगितलेली स्वत:च्या व्यक्तिमत्वापासूनची फारकत इथे अत्यंत महत्त्वाची असते. अमुक अर्थ व्यक्त करण्यासाठी नसतेच कविता. त्यामुळे, ' कवितेचे समजणे ' हे कवीचे आणि वाचकाचे समान पातळीवरचे असते. कविता समजून घेण्यात इथे कवीइतकाच वाचकाचाही सहभाग महत्त्वाचा असतो. अमुक एक अनुभव व्यक्त होत नसल्याने इथल्या मजकूरात तर सलगता नसतेच पण एकेका वाक्यातही ती नसू शकते. वाचकाने स्वत:ची कल्पनाशक्ती आणि आकलनाची कुवत वापरून ही कविता समजून घेण्याचे पूर्ण स्वातंत्र्य त्याला असते. नेटवर याबाबत बरीच माहिती आहे. माझ्याही निर्मितीप्रक्रियेत हे प्रश्न येत असल्याने मीही अनेकदा अशी कविता लिहिलेली आहे. त्यामुळे, तिकडचे नुसते कॉपीपेस्ट न करता इथे मी ' माझे ' सविस्तर लिहिलेले आहे.

आपले काही बाजारबुणगे, आत्ममग्न, सुखासीन विद्वान या अशा चिंतनाला व कवितेतल्या गंभीर कृतींना ' ही सगळी भरल्या पोटीची करमणूक आहे ' असे म्हणून मोकळे होत असतात. त्यांच्यासाठी इथे एक विशेष उल्लेख करायला हवा. ही कविता भांडवलशाही परंपरा नाकारणारी असल्याने महत्त्वाची आहे, असे म्हणणारे काही मार्क्सिस्ट विचारसरणीचे कवी व विचारवंत तिकडे झालेले आहेत. त्या अर्थाने ही ' पुरोगामी ' कविता ठरते.

इथे या सगळ्याची गरज नाही. आहे त्या चाकोऱ्या खूप सेफ आहेत – याची जाणीव असूनही, मांडून ठेवायला काय हरकत आहे, या विचाराने हे लिहिले आहे. जे वाचतील त्यांना धन्यवाद ! जे न वाचतील त्यांचेही भले होवो आणि त्यांना खूप प्रतिष्ठा मिळो, हीच शुभेच्छा !

--- ००० ---

समोर आलेली काही वर्षांपूर्वीची एक पोस्ट --

कै. शांताबाई शेळके

' सह्याद्रीच्या पाऊलखुणा ' या कार्यक्रमात आत्ताच शांताबाईंची मुलाखत पाहिली.

मराठी भाषेवर आणि शब्दांवर प्रेम करण्यासाठीच फक्त जन्माला आल्याप्रमाणे जगणे ! मी अगदीच नवखा होतो, पण, त्यांच्या आणि आरती प्रभूंच्या गप्पा काही वेळ ऐकण्याची एकदा संधी मिळाली होती. विषय होता मराठी गीते. दोघेही त्यातले मास्टर कलाकार ! त्या वेळी मुख्यतः चकित व्हायला झाले ते शांताबाईंचे पाठांतर पाहून ! महाग्रेट, बिनचूक पाठांतर ! शेकडो कविता आणि गाणी ! आणि चाललेल्या विषयाला धरून योग्य ते आठवणे ! माझ्या

आठवणीप्रमाणे ग. दि. माडगूळकर हे दोघांचेही आवडते गीतकार ! ‘ आभाळच मग ये आकारा ‘ – ही गर्दीचीच असावी ओळ – त्या ओळीवर दोघेही बेहद्द खुश होते !
या मुलाखतीत त्या म्हणाल्या की अनेक पारंपरिक गीते, परभाषेतली गीते असे ऐकून खूप गाणी सुचतात. अशी त्यांनी काही उदाहरणेही दिली. दुसरे एक त्या म्हणाल्या की आपली ‘ स्वतःची कविता ‘ कित्येकदा महिनो न महिने सुचत नाही, त्याला इलाज नसतो. दिवाळी अंक मागताहेत म्हणून मी माझ्या कविता कधी लिहिल्या नाहीत. पण, गाण्यांचे तसे नसते. स्टुडिओ, कलाकार बुक झालेले असतात आणि वेळ अशी येते की एका दिवसात गाणे लिहून हवेच असते. तसे त्यांनी अनेकदा केलेले आहे !
अशा अनेक भाषाप्रेमींनी घडवलीय, समृद्ध केलीय मराठी भाषा !
शांताबाईंच्या स्मृतीला मनःपूर्वक सादर प्रणाम !
--- 000 ---

स्वमताची वैचारिक कविता लिहिणाऱ्या कवीला ती कविता आधीच माहीत असते -- तीत अनपेक्षित काही नसते. स्वमताहून आधिक मोठा आवाका घेणाऱ्या कवितेत ही अनपेक्षितता असते. नुसतीच स्वमताची प्रतिक्रिया देणारी कविता खुजी असते.
एकरेषीय वैचारिक अर्थ -- या स्वरूपात ती कविता कधीच नाही ' समजणार ' . तो जगण्याच्या रचनेचा, प्रक्रियेचा तिच्या आंतर संबंधांसह आवाका वा भान असल्याने विचाराने वा मर्यादित निश्चितीने ' आता कळले ' असे कधीच होऊ शकणार नाही. कविता म्हणजे दगडासारखी ' निश्चित ' वस्तू नव्हे.
जेवढा अहंकार घट्ट तेवढा कलाकृतीचा आवाका कमी. जो कलावंत स्वत:च्या प्रतिक्रिया, सुखदु:खे आणि मते यांनी बद्ध असतो तो खुजा असतो. परदेश, स्वदेश यांचा संबंध नाही. या अर्थाने स्वतंत्र कलाकृती या कालजयी वा जागतिक म्हणता येतील. काफ्का, सार्त्र, पिरांदेल्लो, बेकेट, आयनेस्को -- हे अहंकारातून नाही निर्माण होत. अस्तित्ववाद तिकडचा, अद्वैतवाद इकडचा वगैरे पद्धत अहंकाराला बढावा देणारी आणि स्वातंत्र्य नाकारणारी आहे.

( १ ) कवितेची स्वायत्तता अशी शब्दयोजना इथे अनेकदा येते. काय स्वायत्तता म्हणजे ? भाषेत जर सगळे आधीच उपलब्ध आहे तर स्वतंत्र, परिणामस्वरूप नसलेले, स्वायत्त म्हणजे काय ?
( २ ) निरनिराळ्या प्रकारच्या कवितांचे उल्लेख आहेत. उपयोगी वा निरुपयोगी हे कशावर ठरणार ? जी कविता escape म्हणजे पळवाट उपलब्ध करून देते ती उपयोगी, किंवा सामाजिक-राजकीय परिवर्तन करू पाहते ती उपयोगी, असे समजावे का ?
( ३ ) कवितेतली सर्जकता म्हणजे काय ? सामाजिक वास्तव आणि अपेक्षा तसेच परंपरा आणि अनेक प्रभाव आणि कवीची जनुके या मर्यादेतच सर्जकता असते का ? सर्जकता ही प्रतिक्रिया असते का ?
( ४ ) भांडवली व्यवस्थेने सर्व काही बद्ध आणि निर्धारित असेल तर कवितेत ‘ नवे ‘ काय घडू शकते ?

( ५ ) मुळात अमुक एक कृती कविता आहे का, हे आधी ठरवायला हवे, असे म्हटले आहे. याबाबतीत असंख्य मते आहेत तर ते आधी कोण ठरवणार ? असे ठरवणे आणि दर्जा ठरवणे यांत फरक काय ?
( ६ ) कवितेचे अस्तित्व-समर्थन काय असते ?
( ७ ) कवितासंग्रहांचे खपणे हे बाजार निर्धारित करतो. इथे बाजार म्हणजे वाचकांच्या आवडी आणि गरजा. ते लक्षात घेऊन बरेच कवी कविता लिहीत नाहीत. म्हणजे त्यांना बाजार नाही. हे त्यांचे कवितेचा उत्पादक म्हणून अपयश समजावे का ? की कवी म्हणूनही अपयश समजावे ? ( राहुल पुंगलियांच्या पोस्टवरची कॉमेंट ).
वंचित-ग्रामीण कवितेची समीक्षा वेगळी आणि ' इतर ' कवितेची समीक्षा वेगळी -- असे काही असते का ? सर्व कवितांची समावेशक समीक्षा असू शकते, हे मान्य झाले तर दर्जाविषयक प्रश्नांबाबत जरा स्पष्टता येऊ शकेल.

त्या कविताच असतात -- निबंध नसतात -- याचबरोबर गद्य कविता हाही एक प्रकार आहे –

आशय हा प्रक्रियेसोबत असतो -- तो असतो किंवा नसतो -- असला तर वर्तमानातच असतो -- ' तात्पुरते ' असणे वगैरे निरर्थक असते -- मग तुम्ही म्हणाल, हे कुणी वाचणारही नाही -- हे असले प्रश्न कुणीच नाही सोडवू शकत –

घटनात्मकतेला महत्त्व न देणाऱ्या काही कविता असतात -- त्या सूक्ष्मतेकडे जातात -- पण अशा कवितांची शक्यताच फेटाळणारे विचारवंत वाचक असतात -- त्यांचा प्रश्नच येत नाही –
25-10-22.

" निरुपयोगी कविता म्हणजे ती कविता जी वास्तवाचा निर्देश करणे म्हणजेच सामाजिक व नैतिक भाष्य करणे,निसर्गाप्रति आस्था व्यक्त करणे,व्यक्तिगत भावभावनांना अभिव्यक्त करणे इत्यादी गोष्टी टाळते.ही अशी आत वळलेली म्हणजे कवितेच्या कृत्रिमतेचे रचलेपणाचे भान असलेली कविता आधुनिकतेच्या काळात,मागील दोन शतकात,जगभर उदयास आली. तर आधुनिकतेच्या काळात या कवितेचे सिद्धांतन देखील झाले.त्यामुळे कवितेतील प्रयोगशील अग्रणी प्रवाह हा स्वायत्त कवितेचा राहिला.
मराठी साहित्यात हा प्रवाह अधेमध्ये जरी डोकावला तरी बहुतांशी कविता ही अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या,अस्मितेच्या आणि समतेच्या लढ्यांमधून निर्माण झालेली होती व आहे. शिवाय संत काव्याच्या प्रबळ परंपरेनुसार जीवनाचे सार सांगणारी, उपदेश देणारी,संसाराचा अर्थ समजून सांगणारी एक प्रवृत्ती मराठी कवितेमध्ये कायमच होती " -- हे खूप महत्त्वाचे आहे. या बाबतीत एक लक्षात घ्यावे लागेल की कोणताही कवी सतत असिधारेवर नसतो -- काही कविता बोधप्रद असूही शकतात, पण, बऱ्याच ' निरुपयोगीही ' असू शकतात. कवी ऐवजी कवितेकडेच पाहिले जायला हवे. स्वायत्त कवितेला फारसे महत्त्व असणार नाही -- याचे कारण घिस्यापिट्यातच रमणे आणि आव्हाने न घेणे, या मनाच्या प्रवृत्तीत आहे. कवींनी लिहिताना या ' पाया ' ला मान द्यायचे कारण नाही. कवितेचा मर्डर करू इच्छिणारा फोर्स मराठीत खूप मोठा असला तरी स्वायत्त कविता लिहिली जाणे महत्त्वाचेच असेल. स्वायत्त म्हणजे ' कलावादी '

नव्हे -- उलट जगण्यातल्या मूलभूत आणि समावेशक प्रश्नांना भिडणारी कविता. अशी कविता ही एखाद्या गटाचे इंटरेस्ट सांभाळण्यासाठी नसते. तोच माणसाच्या जगण्यातला सांस्कृतिक प्रवाह असतो. त्यामुळे, पुंगलियांच्या या पोस्टमधले सर्वच विवेचन महत्त्वाचे आहे.
०२-११-२२.

फलज्योतिष

सध्या या निवडणुकीच्या मोसमात फार मोठमोठे लोक ज्योतिषांकडे जात आहेत. आज मीही एका फलज्योतिष अभ्यास मंडळ संस्थेत गेलो होतो. माझे कारण वेगळे होते. नोकरीत असताना सुमारे आठ ते दहा वर्षे मी माझे इतर सर्व लेखन-वाचन बंद ठेवून हस्तसामुद्रिक विद्येचा अभ्यास करत होतो. आमच्या एका बंगाली ग्राहकामुळे मला यात उत्सुकता निर्माण झाली आणि मी त्याचा वेडा किंवा व्यसनीच होऊन गेलो. अहमदनगरला असताना एकदा आमच्या बँकेचा एक पारशी सहकारी कर्मचारी संध्याकाळी टाईम पास म्हणून माझ्याकडे आला होता. असा टाईम पास करतच इकडचे, पुण्याला बदली होईपर्यंतचे दिवस पार पाडावे लागणार, हे त्याने नाइलाजाने स्वीकारलेले होते. मला त्यात धोका दिसला. वारंवार किरकोळ गप्पा मारत मला वेळ घालवायचा नव्हता. मी त्याला सांगितले, " मै पामिस्ट्री पढते रहता हूँ – मुझे टाईम नही रहता – " तर त्याने मला हे विचारले की मी याची परीक्षा देणार आहे का किंवा याचा बिझिनेस करणार आहे का – दोन्हीला माझा नकार पाहून तो म्हणाला, " फिर क्यूँ पढते हो ? " तर या विद्येच्या व्यसनासाठी माणसांना कटवणे, त्यांना काय वाटेल याचा विचार न करणे याची मला सवयच झाली होती. नुसते भारतातल्याच नव्हे तर जगातल्या अनेक प्रख्यात हस्तसामुद्रिकांची पुस्तके मी विकत घेतलेली होती. काही इकडून तिकडून कुणी कुणी दिलेली होती. मी त्या पुस्तकांनी पछाडलाच गेलेलो होतो. नोकरी आणि अत्यावश्यक कर्तव्ये वगळता माझा सर्व वेळ त्याच कामी लागावा असे मला वाटे. नंतर कधीतरी मला उपरती झाली आणि आपले बाकीचे लेखन-वाचन बंद पडणे योग्य नाही हे शहाणपण सुचले ! त्यानंतर मात्र मी ते सगळे बंद म्हणजे बंदच केले ! स्वतःचा हात आणि काही इतरांचे हात त्या काळात मी पाहिले. त्या विद्येतले खूप आडाखे बरोबर असतात असे मला दिसून आले. एकच उदाहरण सांगतो. मधले बोट म्हणजे शनीचे – त्याच्या खाली हृदयरेषा आणि मस्तकरेषा यांची कात्री झालेला एक हात माझ्यापुढे आला होता. तो माणूस त्या वेळी चोवीस-पंचवीसचा म्हणजे त्या कात्रीच्या प्रभावाखालीच होता. ते महा डेंजरस चिन्ह होते. मी त्याला नुसते म्हटले की सध्या तुम्ही अनेक संकटांतून जात आहात, तर तो माणूस घळाघळा रडायलाच लागला ! अशा अनेक गोष्टी आहेत, ते जाऊ दे.
तर मी त्या संस्थेत यासाठी गेलो होतो की माझ्याकडे असणारी या विषयावरची पस्तीस पुस्तके मला अशा संस्थेला द्यायची होती की जिथे विद्यार्थ्यांना त्यांचा उपयोग होईल. यासाठी नेटवरून माहिती काढून ' फलज्योतिष अभ्यास मंडळ, पुणे ' यांच्याशी संपर्क साधला. ती संस्था महाराष्ट्रातले प्रख्यात ज्योतिषी कै. श्रीकृष्ण जकातदार यांची आहे. गेली वीस-पंचवीस वर्षे ती संस्था श्रीकृष्ण जकातदारांचे चिरंजीव श्री. विजय जकातदार हे चालवतात. ते बी. ई.

सिव्हिल असून रिझर्व्ह बँकेतून मोठ्या पदावरून निवृत्त झालेले आहेत. तिथे ज्योतिषविषयक अनेक अभ्यासाक्रम चालतात. देशविदेशांत त्यांचे हजारो विद्यार्थी आहेत. त्यांनी माझ्याकडची पुस्तके आनंदाने स्वीकारली.
श्री. विजय जकातदार यांनी तिथे चालणाऱ्या कामाची मला माहिती दिली. ते सर्व पाहून मी थक्क आणि चकित झालो ! नुसते आहे ते ज्ञान देत राहणे एवढेच काम तिथे चाललेले नाही. या सर्व विषयांत प्रचंड संशोधनही चालू आहे. त्यांची शिक्षक टीम आणि अनेक विद्यार्थी यांनी तयार केलेले शोधनिबंध संख्येनेही बरेच आहेत. उदाहरणार्थ एच आय व्ही रुग्णांच्या हातावर वा कुंडलीत काही कॉमन गोष्टी आहेत का, हे त्यांनी शोधून काढलेले आहे. अशा शक्यतांची आधी कल्पना असल्यास माणूस काळजी घेऊ शकतो, असे ते म्हणाले.
हे कुणाला आवडो वा न आवडो, किंवा समजून घेण्यापूर्वीच ते फेटाळून लावावे, असेही काहींना वाटो, त्यांचे काम अत्यंत गंभीरपणे चाललेले आहे, हे नक्की. त्यांच्याकडच्या अभिप्राय वहीत भल्याभल्यांचे अभिप्राय आहेत.
या कामाला पुरेशी प्रसिद्धी मिळालेली नाही – या माझ्या वाक्यावर ते ‘ होय ‘ म्हणाले !
--- 000 ---

आशय आणि घाट

अरे, हा खरे तर कादंबरीचा विषय आहे, हे खरे  तर एखाद्या छोट्या कवितेत संपावे एवढाच आहे याचा जीव -- अशी वाक्ये आपल्या कानावर पडत असतात. किंवा कलेचा आशयच आपला घाट घेऊन येतो, वगैरे. या बाबतीतली माझ्या लेखनाची गुपिते आज मी उघडी करून टाकतो. फार फार तर काय होईल, माझे लेखन हे आहे त्याहून अधिकच फालतू असल्याचे ठरवायला त्याचा उपयोग होईल. नाही तरी कोण आहे इथे हरीचा लाल कोणत्याही लेखनाच्या मूल्यमापनाची जबाबदारी घेणारा ?
तर मी जेव्हा जेव्हा आता एकांकिका लिहावी, वा नाटक लिहावे वा कविता लिहावी असे ठरवले तेव्हा तेव्हा ते ते लिहिले. म्हणजे ‘ आधी ‘ ठरवून – हे लक्षात घ्या. एवढेच नाही – याहून वाईट एक गुपित सांगतो. सामान्यत: माझी कविता ए-४ च्या एका पानाची असते. कधी कधी दुसरे काही आधीच लिहिले गेलेले असल्यामुळे, दहा वा तेरा वा सातच ओळी त्या पानावर शिल्लक असतात, तर मी ठरवून तेवढ्याच ओळींत बसणारी कविता लिहितो. कधी तर मी आधीच ठरवलेले असते की आता ही कविता तीन पानी लिहायची. यात तीन पत्ती सारखे काही नसते. हो सकता है ! नेमका मी ठरवला तसा आणि तेवढाच घाट येतो ! कधी अशा घाटाची कविता, कधी तशा घाटाची, हेही मी आधी ठरवलेले असते. पण त्या त्या नाटकात वा एकांकिकेत वा कवितेत असणार काय, हे मला माहीत नसते. ते मात्र क्षणाक्षणाला नव्याने अवतरत जाते.

आशयाचा खरे तर मला प्रॉब्लेमच नसतो. कारण मला याची जाणीव असते की आशय हा मजकूरात वा घाटात वा अनुभवात नसतोच. माझी अनुपस्थिती हाच असतो ‘ माझा ’  आशय ! म्हणजे काय याचे गुपित मात्र मला फोडता येणार नाही. मला ते सिक्रेट ठेवायचे आहे म्हणून नव्हे – ते सांगताच नाही येणार, म्हणून !

कुणी म्हणेल, बसल्या बसल्या तयार केलेल्या या थापा आहेत ! चलता है ! आपण मराठीत लिहितो आहे तर मूल्यमापन हे कलाकृतीचे होणे शक्य नसून ते व्यक्ती म्हणून आपलेच असणार मूल्यमापन याची मला जाणीव असते. आणि व्यक्ती म्हणून कुणी कुणाचे मूल्यमापन करावे अशी लायकी कोणत्याच व्यक्तीत नसते, हेही मला माहीत असते. असो.

--- ००० ---

अध्यक्ष

खरे तर साहित्य संमेलनाचा आणि माझा संबंध काय ? नुसते आपले मराठीत काही लिहितो म्हणून ? ती एक वेगळीच दुनिया आहे. मला तिथे कवडीचे स्थान नाही हे मला समजते. अर्थात त्याबाबत खेद वा खंत नाही. खरे तर असेही नाही आहे. आपला काहीच संबंध राहू नये इतकी ही साहित्यपंढरी आपल्याला दुरावावी याचे वाईट वाटणेच खरे तर योग्य होईल. पण, ते जाऊ दे. कोणत्याही आसक्तीशिवाय मी या विषयावर बिनधास्त लिहू शकतो, हा या परिस्थितीचा फायदा आहे.

हा माझा दुरावा अमुक एका विचारामुळे तयार झालेला नसावा. उलट काही विचारच नसण्याच्या उडाणटप्पूपणाचाही तो परिणाम असू शकतो. पण हा महाराष्ट्र पुरोगामी असून तो विचारस्वातंत्र्याचा भोक्ता आणि सहिष्णू आहे असे म्हणायची तर आपली उदात्त परंपरा आहे. रोजचे राडे पाहता खरे तर हा पुरोगामीपणा संपलेला आहे असेच म्हणायला हवे. कालबाह्य झालेल्या परंपरा सोडण्यातच पुरोगामीपणा असतो हे खरे असले तरी ही परंपरा आपल्या पुरोगामीपणाला जिवंत ठेवणारी असल्याने कधीच मोडीत काढता  येणार नाही, हेही तितकेच खरे आहे. हा विषय मनात यायचे कारण म्हणजे – वाद टाळण्यासाठी न्या. चपळगावकरांना अध्यक्ष केलेले आहे की काय अशी शंका व्यक्त करणारी आलेली बातमी. असे खरेच असेल तर तो नवनिर्वाचित अध्यक्षांचा आणि महाराष्ट्राचा असा दोघांचाही अपमान ठरतो. हा पुरोगामी महाराष्ट्र वादाला घाबरतो ? ये तो नामुमकीन है ! अध्यक्षपदाच्या स्पर्धेत आणखी नावे कोणती होती, तर सुरेश द्वादशीवार, अच्युत गोडबोले आणि प्रवीण दवणे. या तिघांमुळे कोणते वाद निर्माण होण्याची शक्यता होती हे विचारस्वातंत्र्य आणि अभिव्यक्तिस्वातंत्र्य यांच्या भोक्त्या असलेल्या सहिष्णू मराठी जनतेला कळायलाच हवे. आणि न्या. चपळगावकर हे त्या मानाने वाद निर्माण करणार नाहीत असे का वाटले तेही ‘ मी मराठी ’ असलेल्या प्रत्येकाला कळायला हवे.

हे संमेलन सरकारी अनुदान घेते आणि यात कोणतीही देशाच्या संरक्षणाशी संबंधित गुपिते असण्याची शक्यता नाही हे पाहता आणखीही काही बाबींचा उलगडा व्हायला हवा. या आधी महेश एलकुंचवार आणि आशा बगे यांना या पदासाठी विचारले होते पण त्यांनी नकार दिला असे वाचनात आले होते. त्यांनी का दिला नकार ? कळायला हवे. तब्येतीची वा घरगुती-व्यक्तिगत असतील कारणे तर जाऊ द्या. पण, वैचारिक वा तात्त्विक असतील काही कारणे तर ती कळायला हवीत. हे संमेलन म्हणजे ठराविक सवयीत रममाण असणाऱ्यांचे बंदिस्त कुरण होऊ नये याची काळजी

घेतली जायला हवी. किंबहुना तसे कुरण ते झालेलेच असल्यामुळे तर त्यांनी नकार दिले नसतील ? यावर मोकळी चर्चा होईल असे वातावरण निर्माण करायला हवे.

आता मुख्य विषय. साहित्यात राजकारण वर्ज्य नसते असे म्हणत फक्त राजकारणावर बोलून अध्यक्षांनी आपली सुटका करून घेण्याची एक पुरोगामी पद्धत पडल्याचे अनेकदा दिसून येते. तसे होऊ नये. साहित्य संमेलनाचे अध्यक्ष आहात तर साहित्यावर थोडे तरी बोलले गेलेच पाहिजे -- मग ते प्रवासवर्णनांवर बोललात तरी चालेल – असे एक, म्हटल्यास प्रतिगामी का असे ना, बंधन अध्यक्षांवर असायलाच हवे. न्या. चपळगावकर सर मुख्यत: विचारवंत आहेत. सद्य:स्थितीच्या संदर्भात आपल्या साहित्याचे काय चाललेले आहे याची ते दखल घेतीलच याची खात्री वाटते. देणे ना घेणे पण अशा पारावरच्या गप्पा मारायला मला आवडते, एवढाच या पोस्टचा अर्थ !

--- ००० ---

लेखक-कलावंत की जय !

लेखक वा कलावंत हे समाजातल्या इतर लोकांहून अधिक शहाणे असतात वा दूरदृष्टी असलेले असतात – अशा प्रकारची मान्यता कधीपासून सुरू झाली मला माहीत नाही. पण ही मान्यता प्रचलित दिसते खरी ! काय, कोणत्या असतात लेखकाच्या खास जमेच्या बाजू ? याबाबतची शास्त्रीय माहिती उपलब्ध नाही, तरीही, विचार करू. समजा या लोकांचा बुध्यांक चांगला असतो, भावनांक चांगला असतो, यांचे वाचन चांगले असते, हे बहुश्रुत असतात, जगण्यातल्या तपशीलांची हे नोंद घेत असतात, यांची कल्पनाशक्ती चांगली असते, यांना अभिव्यक्तीचे कौशल्य आत्मसात झालेले असते, हे कष्टाळू असतात, वगैरे, वगैरे. यात, ते पदवीधर असतात असे काही म्हटलेले नाही, हे लक्षात घ्या. नाहीतर, पूर्वी काहीजण असे म्हणत की अडाण्यांना काही समजत नाही, मताधिकार फक्त पदवीधरांनाच असावा म्हणजे देशाचे लौकर भले होईल. लोकशाहीच्या प्रकारात अर्थात हे फेटाळण्यात येते आणि ते योग्यच आहे. अमूकच लोकांना जास्त कळते असे समजून फक्त त्यांनाच मताधिकार असावा असे म्हणण्याला काहीजण नवा ब्राम्हणवाद वा नवा मनूवादही म्हणतात. लोकशाहीत एक माणूस एक मत हेच तत्त्व नुसते मान्यच नव्हे तर सिंहासनाधिष्ठित असते. लेखक वा कलावंत स्वत: हुशार असतील किंवा त्यांच्या कलाकृतींमुळे हुशारीचा प्रसारही होत असेल पण याचा अर्थ ते इतरांपेक्षा जास्त ‘ शहाणे ‘ असतात हे लोकशाहीला मान्य नसते.

काही दिवसांपूर्वी अमुक एका बाबीला तीनशे लेखक-कलावंतांनी एका पत्रकाद्वारे पाठिंबा दर्शवला होता. तर लगेच दुसऱ्या बाजूच्या सहाशे शहाण्यांनी त्यांच्या विरोधी पत्रक काढले. यावरून काय समजायचे ? जास्त शहाणे जिकडे ती बाजू बरोबर ? की सर्व लेखक-कलावंतांचा दर्जा आधी ठरवून मग त्यावर बोलायचे ? आणि असा दर्जा ठरवण्याची जबाबदारी कोणत्या अतिशहाण्या ‘ ब्राम्हणावर ‘ टाकायची ? तर, ते काहीच शक्य नाही, हे लक्षात घ्यायला हवे.

दोनशे डॉक्टरांचे पत्रक, दोनशे शासकीय कारकुनांचे पत्रक, असे का नाही घडत ? दोनशे मजूरांचे वा हमालांचे पत्रक का महत्त्वाचे नाही मानायचे ? या प्रश्नाच्या खोलात आपण गेलो तर लोकशाही मूल्यांची पायमल्ली इथले बुद्धिमंतही

करत असतात, असे दिसून येते. कारण त्यांना स्वत:कडे श्रेष्ठत्व हवे असते. ‘ राजा, तू चुकलास ‘ हे सांगायची माझीच योग्यता आहे असा भ्रम त्यांना हवा असतो. पूर्वी जसे राजाला सल्ला देणारे, उपदेश देणारे ब्राह्मण गुरू असत तसा ग्रेट रोल यांना हवा असतो. हे लोक लोकशाही विरोधी तर असतातच पण एका छुप्या मार्गाने त्यांना स्वत:चे वर्णवर्चस्व तयार करायचे असते. त्या लेखक-कलावंतांना तर हे खोटे श्रेष्ठत्व हवेच असते पण दिसते असे की परंपरेच्या पगड्यामुळे इथला समाजही ते मान्य करून चालतो ! माझे निरीक्षण असे आहे की अनेकदा अंगठेबहाद्दर लोकही सुशिक्षितांपेक्षा आधिक परिपक्व असतात. त्यामुळे, असे म्हणावे लागते की असल्या पत्रकावर सही करणारे स्वत:ला श्रेष्ठ समजतात आणि ते एक नवा मनूवाद रुजवत असतात.

लोकशाहीत ‘ शहाणपण ‘ हे कोणत्याही ज्ञात वैशिष्ट्यांवर अवलंबून नाही. या अर्थाने लोकशाही ही एक आध्यात्मिक बाब आहे. आणि कळो वा न कळो, अध्यात्म फेटाळत राहायचे ही एक नवी परंपरा तयार होत आहे. या नव्या परंपरेचे पाईकच मागच्या दाराने ती श्रेष्ठत्वाची जुनी परंपरा पुनरुज्जीवित करू पाहात आहेत !

जुन्या काय वा या नव्या काय, कोणत्याच मनूवाद्यांना महत्त्व न देणे हेच शहाणपणाचे ठरेल, हे नुसते सुचवण्यासाठी ही पोस्ट दिलेली आहे. रामराम !

--- ००० ---

सॉफ्ट हिंदुत्व

सुमारे २५० मराठी लेखकांनी राहुल गांधींच्या भारत जोडो यात्रेला पाठिंबा दर्शवण्यासाठी त्यांची भेट घेतली आणि त्यांना पाच मुद्यांचे एक पत्र दिले अशी ए बी पी माझा वर बातमी पाहिली. या बातमीला इतरत्र कुठेच फारशी प्रसिद्धी मिळाली नाही हे खेदजनक आहे. या पत्रात सदर लेखकांनी मांडलेला एक मुद्दा असा आहे की राहुल गांधींनी हिंदुत्वाला सॉफ्ट हिंदुत्वाने उत्तर न देता खणखणीत भूमिका घ्यावी. आता एक तर सरळ असावे की सॉफ्ट हिंदुत्व हा काही राहुल गांधींनी राजकारणासाठी घेतलेला खोटा मुखवटा नसावा. ते त्यांच्या जगण्यातच असणार. सगळे जगणेच उलटेपालटे करून नव्याने जगणे सुरू करण्याची अशी कुवत ते कसे धारण करू शकतील ? ते जे जसे आहेत ते स्वीकारूनच त्यांना पाठिंबा देणे योग्य ठरेल असे वाटते. त्या बातमीची लिंक ---

https://www.youtube.com/watch?v=vWNZ4INrbYM

--- ००० ---

कलेतली अलिप्तता

The Four Noble Truths is the basis of Buddhism. The First Truth is that all life is suffering, pain, and misery. The Second Truth is that this suffering is caused by selfish craving and personal desire. The Third Truth is that this selfish craving can be overcome. The Fourth Truth is that the way to overcome this misery is through the Eightfold Path.

This is what he discovered: there is an end to suffering; it can happen to anybody, anywhere, here and now; and the key to ending all suffering is to remove all desire, ill will and ignorance.

यालाच बुद्धाने ' निर्वाण ' म्हटलेले आहे.

आता हे जर बुद्धाचे सार असेल तर आपण असे म्हणणार का की बुद्ध बेफिकिरी आणि असंवेदनशीलता शिकवतोय ? तुझा तू हो दुःखमुक्त, मरू देत बाकीचे – हा आहे का याचा अर्थ ?

त्याचप्रमाणे कलेतली अलिप्तता समजून घ्यावी लागेल. कलावंत काही एखादा धर्मसंस्थापक वा संत नसतो. गुन्हेगारांच्या हातूनही उत्तम कलाकृती निर्माण झाल्याची उदाहरणे आहेत. प्रत्यक्ष कलानिर्मितीच्या वेळी तो व्यक्तिगत पूर्वग्रहांतून मोकळा असतो, हा त्याचा अर्थ आहे. त्याचे आत्मकेंद्र कार्यरत नसल्याने त्याचा संवेदनशीलतेचा आवाका अमर्याद असतो. ही क्रूर बेफिकिरी नसून जिवंत सहानुभूती असते. धंद्यासाठी निर्माण होणारी करमणुकीची कला वा पठडीतला बोध देत राहणारी रटाळ कला यांत ही वैशिष्ट्ये नसतात.

तत्त्वज्ञानाचा वा धर्माचा अभ्यास, विचार करण्याकडे कल नसलेले बरेच असतात. त्यांच्यासाठी मौल्यवान कला ते काम करत असते. व्यक्तिगत वैचारिक साच्यातून जगणे म्हणजे विदीर्ण मनाचे जगणे – ते हिंसक आणि संघर्षमयच असणे भाग असते. तो फक्त स्वतःचे वर्चस्व निर्माण करण्याचा प्रयत्न असतो. त्यातून होणारी प्रत्येक कृती ही असंवेदनशील आणि बेफिकीर असते. कलानिर्मितीही.

याउलट, सर्जक कलावंताची अलिप्तता ही अमर्याद मानवी मूल्याने ओतप्रोत असते.

( समाजाच्या दृष्टीने व्यक्ती म्हणून तो कलावंत कसाही, काहीही असो. )

कलेत अलिप्तता असणे म्हणजे पूर्वग्रहदूषितता नसणे.

धर्मवादी वा जातीवादी वा विचारसरणीवादी माणूस मौल्यवान कलाकृती निर्माण करू शकत नाही.

एरवी व्यवहारात तो तसा असला तरी मौल्यवान कलानिर्मितीच्या वेळी तो तसा नसतो.

जगण्याला मानवी मूल्यात्मकतेचा स्पर्श देणारे कला हे एक माध्यम आहे.

--- 000 ---

आवर्तने

( कविता – मूल्य – आकलन )

काही महिन्यांपूर्वी काही निमित्ताने मी इथल्या मित्रांना म्हणालो होतो की मी मराठी कवितेवर झ किरण टाकणारा लेख लिहिणार आहे. त्यात, मराठी कविता खुजी का आहे यावर लिहायचे होते. पण मग विचारांती हे लक्षात आले की नुसत्याच खुज्या कवितांवर लिहिण्यात काही अर्थ नाही. त्या ऐवजी मराठीतल्या चांगल्या कविता निवडाव्यात आणि त्यांवर लिहावे. असे केल्याने बाकीच्या बऱ्याच कविता खुज्या का आहेत हे स्पष्ट होईल आणि माझ्या आकलनाप्रमाणे चांगल्या कवितांवर लिहिल्याने, मी हवेत गप्पा मारतो असेही होणार नाही. तर ते एकूण सगळे एखाद्या लेखा ऐवजी पुस्तक रूपातच प्रकाशित करावे लागणार आहे. ( एकूण मजकूर सुमारे १५ दिवसांत फायनल होईल. ) यात माझी एक दीर्घ प्रस्तावना असेल आणि दुसऱ्या भागात खालील कवींच्या काही चांगल्या कवितांवर माझे भाष्य असेल ---

१ बा. सी. मर्ढेकर

२ आरती प्रभू

३ अरुण कोलटकर

४ पु. शि. रेगे

५ दिलीप पुरुषोत्तम चित्रे

६ गुरुनाथ धुरी

७ वसंत आबाजी डहाके

८ विलास सारंग

९ प्रभा गणोरकर

१० मनोहर ओक

११ सदानंद रेगे

१२ मलिका अमर शेख

१३ प्रज्ञा दया पवार

१४ राहुल पुंगलिया

१५ सलील वाघ

१६ ओंकार कुळकर्णी

१७ अरुणा ढेरे

१८ शांता शेळके

१९ गणेश विसपुते

२० वसंत पाटणकर

२१ अनिल द्रविड

२२ रजनी परुळेकर

२३ फ. मुं. शिंदे

२४ नामदेव ढसाळ

२५ अविनाश गायकवाड

२६ संजीव खांडेकर

२७ मंगेश नारायणराव काळे

२८ श्रीधर तिळवे नाईक

२९ नामदेव कोळी

३० रवीन्द्र दामोदर लाखे

३१ दिलीप धोंडो कुलकर्णी

३२ प्रणव सखदेव

३३ प्रिया जामकर

३४ हेमंत दिवटे

३५ मन्या जोशी

--- हे कवी, मला उपलब्ध असणे आणि आवडणे या निकषांवर घेतलेले आहेत. एक स्पष्ट करतो -- एकूण कवी आवडते असण्याचा इथे प्रश्न नाही -- अमुक कविता आवडल्या म्हणून त्या घेतलेल्या आहेत. हेच का कवी वा याच का कविता, आणखी का नाहीत याचे एकच उत्तर – सदर पुस्तकाच्या आणि माझ्या मर्यादा. आणि मुख्य म्हणजे जे म्हणायचे आहे ते म्हणायला एवढे पुरे आहे. यात अर्थात, मी निवडलेल्या कवींना त्या त्यांच्या महत्त्वाच्या वा प्रातिनिधिक कविता वाटतील असे नाही. ती माझ्या आकलनाप्रमाणे मी केलेली निवड आहे.

अनुसर्जित कवितांचे पुस्तक प्रकाशित करताना जसे पेसोआ या कवीबद्दलचा विशेष आदर व्यक्त करण्यासाठी त्या पुस्तकाला ' तंबाखूची टपरी ' हे त्याच्या कवितेचे नाव दिले होते त्याचप्रमाणे आरती प्रभूंबद्दलचा विशेष आदर म्हणून या पुस्तकाला ' आवर्तने ' हे नाव योजलेले आहे. ' आवर्तने द्रुत शून्याची ' या त्यांच्या कवितेवर मी पूर्वी लिहिलेला लेख यात समाविष्ट आहे.

आता काही व्यावहारिक भाग ---

१ वरील सर्व कवींच्या आणि त्यांच्या प्रकाशकांच्या यात समाविष्ट कवितांसाठी परवानग्या मागत बसणे शक्य नाही. या प्रकाराला कुणाही कवीचा वा प्रकाशकाचा आक्षेप असेल तर आधीच कळवावे म्हणजे मी हे पुस्तक प्रकाशित करण्याचे रद्दच करू शकेन.

२ माझे संकेतस्थळ ( website ) असल्याने त्यावर हे पुस्तक मोफत उपलब्ध करून द्यायला कुणाची परवानगी लागणार नाही.

३  मराठीतल्या कोणत्याही प्रकाशकाला माझे लेखन प्रकाशित करण्यायोग्य वा त्याची तातडी वाटत नाही ही वस्तुस्थिती मी नम्रपणे स्वीकारलेली असल्याने मला प्रकाशकाची गरज असणार नाही. प्रकाशनाचा एकदा अनुभव घेतलेला असल्याने त्यात काही अवघड काम नाही, हे माहीत झालेले आहे. त्यामुळे, हे पुस्तक मी स्वखर्चाने प्रकाशित करणार आहे.

४ हे पुस्तक मी प्रकाशित केले तर ते विक्रीसाठी असणार आहे. कुणालाही ‘ सप्रेम भेट ‘ मिळणार नाही. पुस्तकाची किंमत त्याच्या पानांच्या संख्येवर न ठरवता आतल्या मजकूराच्या मला वाटणाऱ्या मूल्यावर ठरेल.

५ पुस्तक घेणाऱ्याकडून किंमत व पत्ता मिळाला की ते कुरियरने पाठवायचे काम मी व माझ्या घरचे लोक करणार आहोत.

६ या बाबतीत कुणाच्या काही सूचना असतील तर कृपया कळवाव्यात

--- 000 ---

मराठी लेखक-कवींची बौद्धिक संपदा

मराठी लेखकाची कसली बौद्धिक संपदा ? त्यांना माहीतही नसेल की आपल्या लेखनाला बौद्धिक संपदा म्हणतात ! आणि मराठी कवी ? त्याच्या कविता तर निर्बौद्धिक संपदाच म्हणाव्या लागतील ! कोण कुत्रे नाही विचारत, कुणी वाचतही नाही, शंभर प्रती खपायला दोनशे वर्षे लागतात – त्याची कसली बौद्धिक संपदा ?

ते ठीक, पण मला प्रश्न पडले. कालच मी ‘ आवर्तने ‘ या माझ्या येऊ घातलेल्या पुस्तकाबाबत पोस्ट दिली खरी पण अस्वस्थता होती. त्यात मी काही कवींच्या मी निवडलेल्या कवितांवर माझे भाष्य असे येणार आहे. आपण आपल्याच कवी बांधवांचे हक्क डावलून आपले काम रेटून नेतोय, असे तर नाही ना ? बरे सगळे कवी, प्रकाशक आणि मृत कवींचे वारस शोधून त्यांच्या परवानग्या जमवायच्या म्हणजे किमान सहा महिन्यांचे काम होणार आणि तरीही ते होईलच असे नाही. त्यापेक्षा मग पुस्तक छपाई रद्दच करून आपल्या संकेतस्थळावर आपले  हे पुस्तक मोफत उपलब्ध ठेवावे हेच बरे होईल. त्यातही एक माहिती अशी कळली की या बाबतीत कायद्याची कारवाई करायची असेल तर मूळचे लेखन बौद्धिक संपदा कार्यालयात नोंदणी झालेले असावे लागते ! ते कोण करते इथे बोंबलायला ? आर्थिक व्यवहारच नाहीय फारसा तर संपदा कसली ? पूर्वी ‘ कभी खुशी कभी गम ‘ या हिंदी सिनेमाच्या नावावरून खटला झाला होता असे ऐकिवात होते. पण तिथे कोटीत चालते काम ! इथे काय ? आणि कुठला मराठी कवी माझ्यावर असली केस घालायला जाणार आहे ? ते बरोबर आहे, पण मानवी  मनाचा काहीही भरोसा नाही एवढे साधेही कळत नसेल तर कुणी कसले लेखन करू तरी शकेल का ? – हा झाला एक विचार. पण, माझेच हे कवी बांधव – बिचारे नाही नोंदवत त्यांचे हक्क – तरीही याचा मी गैरफायदा घ्यावा का ? – हा प्रश्न आला डोक्यात !

पण आता प्रश्न सुटलेला आहे. मूळ लेखन जर अभ्यास, समीक्षा वा संशोधन या कामांसाठी वापरले जात असेल तर त्याला कायदा आड येत नाही. मी समीक्षक नसलो तरी ‘ आवर्तने ‘ चे काम  तर समीक्षात्मकच आहे ! त्यामुळे, खुल्या दिलाने मी ते पुस्तक प्रकाशित करायला हरकत नाही ! आता कोणताही पण-परंतूचा किंतू न बाळगता मी पुढे जाऊ शकतो !

एक तर मराठी साहित्यात आर्थिक व्यवहार नगण्य आहेत, ते कुणी वाचतही नाही फारसे, त्यातही कविता तर बहिष्कृतच असते आणि मी माझ्या पुस्तकात प्रत्येक कवीच्या समजा दोनतीनच कविता घेणार आहे आणि तेही ते कसे चांगले लेखन आहे ते सांगण्यासाठी – तरीही हे असे विचारमंथन कसे घडत जाते ते एक गंमत म्हणून

सांगितले !

या निमित्ताने एकच प्रार्थना करावी असे वाटते ( पण कुणाकडे ? वाचकांकडे ? ) की बाबा इथून पुढे तरी मराठी लेखकांच्या बौद्धिक संपदेला काही ना  काही हमीभाव मिळो !

--- ००० ---

गिरीश पतके यांची ३ वर्षांपूर्वीची पोस्ट ---

युजिन आयनेस्कोचे काही विचार -

=====================

१) माणसाला खऱ्या एकान्ताची गरज आहे ही तर मूळ समस्या आहे. एकान्त (सॉलिट्यूड) म्हणजे विभक्तपण (आयसोलेशन) असे समजणे चूक आहे. एकान्त ही मग्नता आणि ध्यान आहे. एकान्तामुळे नव्हे तर पुरेसा एकान्त अनुभवत नसल्याने आपण दुःखी झालो आहोत.

२) वास्तववादाचा विध्वंस करू पाहणारा कोणी 'प्रेषित' वगैरे मला व्हायचे नाही. नाटककार किंवा कोणी कलावंत यांचा उद्योग अशा दिशेने जाणारा नसतोच मुळी. जगाला आदेश द्यावा, मुक्तीच्या वाटा दाखवाव्या, हे काम धर्म-संस्थापकांचे, नीतिवाद्यांचे आणि राजकारण्यांचे. नाटककार लिहितो हेच बस्स आहे. फारात फार तो काही पुरावे सादर करतो, म्हणावे. उपदेश किंवा संदेश देतो, असे नाही. कलाकृती केवळ आदर्शवादी होते तेव्हा तिच्यातून बरेच काही निसटून गेलेले असते. आदर्शवादाचा वरचष्मा कलेला बटीक करतो.

३) मी स्वतः आणि दुसरा कोणीही, समजा अठराव्या शतकातला एखादा चांभार, यांच्यात समान काय ते शोधणे मला महत्त्वाचे वाटते. मुळातून तो आणि मी एकसारखे आहोत अशी माझी श्रद्धा आहे. कोणतेही शतक घ्या, त्यातली माणसे, आज मी जसा आहे, तशीच मरणभयाने ग्रस्त होती. या साम्याला कवटाळून राहायचा मी  प्रयत्न करतो. म्हणून एखाद्या व्यक्तीचे इतरांहून भिन्न वैशिष्ट्यांनी युक्त असे स्वभावचित्रण करायचे किंवा त्यावर भर द्यायचे मी टाळतो, नापसंत करतो. सर्वत्र विखुरलेल्या एकूण एक माणसांशी संपर्क जोडावा ही माझी निकड आहे.

४) क्रांतीमधून क्रांतीचा जन्म होणार या दंतकथेने कित्येकांना पछाडले आहे. फ्रान्समध्ये क्रांती होऊन दोनशे वर्षे होत आली...आपण कुठे आहोत? क्रांती बघताबघता नामोहरम होते अन् मूल्यध्वंस तेवढा हाती उरतो, हे अनुभवूनही आपण धडा घेत नाही. चालू घडामोडी दुसरे काय सांगत आहेत? राजकारणी माणसांचे म्हणाल, तर जनसामान्यांविषयी त्यांना बिलकूल प्रेम नसते. त्यांना ते केवळ उपकरणी समजतात आणि त्यांना वापरतात. राजकारण्यांशी समझोत्याच्या गोष्टी सफल होत नाहीत. त्यांना फक्त शक्तीवर आधारलेले संबंध मानवतात. क्रांतीचे श्रद्धाविषय तर बंधुता, एकता, सहकार्य, सुसंवाद, स्वातंत्र्य आणि संगती असे होते ना? आणि आहेत ना? त्यांचे काय झाले? क्रांतीने, फार काय क्रांत्यांनी, मैत्रभाव आणि बंधुता माणसांत  आणली नाही, किंवा पुनःस्थापित केली नाही. मग क्रांतीवर कसा म्हणून विश्वास ठेवावा? मी तर म्हणतो की क्रांतीने तसा कधी प्रयत्नही केला नाही. क्रांती दृढमूल

होते न होते तोच शिक्षा, सूड आणि भरपाई यांचा विचार ती करू लागते. प्रेमाच्या नावाने, प्रेमाच्या प्रतिष्ठापनेसाठी क्रांती कधीच झाली नाही. राजकारणाने मैत्रीची संकल्पनाच पायदळी घातली आहे.
५) पण अशातही मला वाटते, की प्रीती आणि ध्यानचिंतन (मेडिटेशन) या मूर्खकल्पना नाहीत. आध्यात्मिकतेविषयी बोलू जाता, क्रोधाची प्रतिक्रिया नाहीच झाली, तर उपहास नक्कीच अनुभवाला येतो.
६) आमचे दर्शन खुंटले आहे. भवतीच्या कोलाहलाचा आम्ही प्रतिकार करू शकत नाही की त्याचा शांतपणे एक मिनिटभर विचार करू शकत नाही. जग आपल्या किती निकट आहे, किंवा दुरावलेले आहे, हे आम्हांला कळत नाही. त्याच्या दर्शनालाच आपण मुकलो आहोत. इतक्याही कोंडीत भवताली, खाली, वर, आपल्या आत सावचित्तपणे आपण पाहू, तर जगाच्या निर्मितीच्या पहिल्या दिवशीचा आश्चर्यभाव आणि त्याचा सुकुमार ताजेपणा आपल्या प्रत्ययाचा विषय होईल.
(संदर्भ - त्र्यं. वि. सरदेशमुख यांनी आयनेस्कोच्या 'मग एकच धडकी' या रूपांतरीत केलेल्या नाटकाच्या पुस्तकातील ' युजिन आयनेस्को ' या पुनर्मुद्रित लेखातून संकलित.)
--- 000 ---

Manoj Pathak
।आवर्तने।
— चंप्र देशपांडे

ह्यात ३६ मराठी कवी आहेत.पण चंप्रंनी त्या सगळ्यांना ६३ होऊन जोखले आहे.अर्थातच हा काही 'समग्र' मराठी कवितेचा आढावा नाही, हे चंप्र म्हणतच आहेत.अनेक चांगले कवी ह्यात नाहीत(च).उदाहरणार्थ शेवटी एका 'मन्या'चे नाव आहे; पण आणखी एक 'मन्या' चंप्रंच्या तडाख्यातून अलगदपणे निसटला आहे, पण ऐनकेन प्रकारेन तो ह्या प्रकल्पाशी जोडला गेला आहे.आणि त्याला ह्याचा अपार आनंद आहे— इनफॅक्ट तो ह्या छत्तींसामध्ये असता तर हे पुस्तक प्रकाशित करण्यास संकोचला-लाजला असता.'जे होते ते चांगल्यासाठीच!' ते असे.
अर्थातच हा 'अबतक ३६' असा चंप्रंचा 'मास्टर स्ट्रोक' आहे.पुढे ६३ रांगेत आहेतच, चंप्रंनी त्यांकडे ३६ होऊन पाहावे व 'वज्राघात' करावा.
प्रकाशकांस ती अपेक्षा आहे.
चंप्र, 'आता होऊन जाऊ द्या(च)'
असो.तर मित्रहो,मैत्रिणींनो,सुहृदहो— पते की बात उर्फ धंदे की बात :
हे २६७ पानी पुस्तक ₹ ४५०/- चे आहे.प्रकाशनपूर्व सवलतीत ते ३७५/- ला घरपोच येईल.ह्यावेळी ₹ ० ते ₹ ४५० योजना नाही (कारण काहींना त्यामुळे राग येतो ना!)😊
प्री बुकिंग :
9923724550 वर्णमुद्रा पब्लिशर्स.

8624977029 पुस्तकवाला ॲण्ड कंपनी.

।आवर्तनेची अनुक्रमणिका।

अनुक्रम

•प्रस्तावना/००२

•बा. सी. मर्ढेकर/११४

•आरती प्रभू/११८

•अरुण कोलटकर/१२५

•पु. शि. रेगे/१३४

•दिलीप पुरुषोत्तम चित्रे/१४०

•गुरुनाथ धुरी/१४७

•वसंत आबाजी डहाके/१५८

•विलास सारंग/१६३

•प्रभा गणोरकर/१६८

•मनोहर ओक/१७०

•सदानंद रेगे/१७५

•मलिका अमर शेख/१७८

•प्रज्ञा दया पवार/१८१

•राहुल पुंगलिया/१८५

•सलील वाघ/१९२

•ओंकार कुळकर्णी/१९८

•अरुणा ढेरे/२०२

•शांता शेळके/२०४

•गणेश विसपुते/२०६

•नारायण कुळकर्णी कवठेकर/२०८

•वसंत पाटणकर/२१०

•अनिल द्रविड/२१२

•रजनी परुळेकर/२१४

•फ. मुं. शिंदे/२१६

•नामदेव ढसाळ/२१८

•अविनाश गायकवाड/२२०

•संजीव खांडेकर/२२२

•मंगेश नारायणराव काळे/२२८

•श्रीधर तिळवे नाईक/२३३

•नामदेव कोळी/२४२

•रवीन्द्र दामोदर लाखे/२४४

•दिलीप धोंडो कुलकर्णी/२५१

•प्रणव सखदेव/२५२

•प्रिया जामकर/२५६

•हेमंत दिवटे/२५९

•मन्या जोशी/२६३

--- 000 ---

मनोज पाठक

।आवर्तने।

(कविता-आशय-आकलन)

—चं.प्र.देशपांडे

वर्णमुद्राचे महत्त्वाचे पाऊल पडत असल्याचे घोषित करताना

' मालक-मुद्रक-प्रकाशक-

संपादक ' = मी = जैन!

--- ० ---

मनोज पाठक

।आवर्तने।

चं.प्र.देशपांडे

मधून.

--- ० ---

२०-१२-२२.

कवितेतला मी आणि स्वत: कवी एकच या समजुतीची गरज काय ?

प्रकट व प्रगट -- दोन्ही बरोबर, हे कृपया लक्षात घ्यावे. ' मराठी लेखन मार्गदर्शिका ' -- यास्मिन शेख -- या पुस्तकातही प्रकट व प्रगट दोन्ही एकच असे दिलेले आहे. हे पुस्तक आणि शब्द रत्नाकर हे मी विश्वासार्ह मानतो. तर्क म्हणाल तर माझा असा आहे की एक अक्षर बदलून वेगळ्या अर्थाचे शब्द -- यावर माझा विश्वास नाही. बोलण्याच्या वा वापराच्या ओघात एखादे अक्षर बादलले गेलेले असते आणि ते दोन्ही ग्राह्य धरले जाते, इतकेच. जसे सोयीस्कर व

सोईस्कर दोन्ही ग्राह्य असते. दृषीकोण / न वा सामग्री/ सामुग्री -- किंवा साळुंकी / खी असे दोन्ही ग्राह्य असतात. असो. प्रगट, प्रगटणे -- याबद्दल -- प्रकट, प्रकटणे पहा -- मराठी शब्द रत्नाकर -- कै. वासुदेव गोविंद आपटे.

मला जरा एक वेगळा मुद्दा दिसतो आहे -- त्याच्या सत्यतेबद्दल खात्री नाही. इतर कलांमध्ये घड्याळाचा काळ आणि मानसिक काळ या दोन्हींचे नियोजन कलावंताच्या हातात असते. चित्र आणि शिल्प हा फक्त मानसिक काळ असतो. तिथे क्रमाचे नियोजन नसते. मी असे वाचले होते की इंग्लंडमधली एक अभिनेत्री ए बी सी पासून झेड पर्यंत असे म्हणत जायची की लोकांच्या डोळ्यांत पाणी येई !

त्याने ( प्रसाद वनारसे ) आणि अतुल कुलकर्णीने चालवलेल्या रंगवर्धन या उपक्रमामुळे अनेक प्रायोगिक नाटकांचे महाराष्ट्रात बऱ्याच ठिकाणी प्रयोग होऊ शकले ! त्यांत माझे ' बुद्धिबळ आणि झब्बू ' हेही होते ! प्रिय मित्र प्रसादचे मन:पूर्वक अभिनंदन !

' मराठीतले कला-साहित्याचे क्षेत्र ( इथल्या ) मातीत घालायला जबाबदार कोण ' या विषयावर एखाद्या हौशी अभ्यासकाने इथली मराठीतली एक शेवटची डॉक्टरेट करावी, असे मी सुचवू शकतो. पण या विषयाला गाईड मिळेल का हाच एक प्रश्न आहे !

जगातल्या प्रत्येक गोष्टीचा इतर सगळ्या गोष्टींवर परिणाम होत असतो !

हे चित्र पुन्हा पाहताना दिसलेले काही वेगळे -- रेल्वेच्या जनरल डब्यातल्या बाकावर आणि खाली दाटीवाटीने बसलेली ही माणसे आहेत. डाव्या हाताला वर मोकळा भाग आहे तो म्हणजे खिडकी आहे ! -- असेही खास वाटते हे चित्र ! Sharad Tarde

एक म्हणजे मी समीक्षकही नाही आणि सर्वज्ञही नाही. कविता या विषयावर मला आस्थेने काही मांडायचे आहे, तेवढ्यापुरते हे माझे पुस्तक असणार आहे. माझ्या यादीतले सर्व कवी माझ्या आवडीचे आहेत, असे नाही. त्यांच्या काही कविता ज्या मला चांगल्या वाटतात त्या घेतल्या आहेत. पूर्ण मराठी कवितेचा परिसर धुंडाळून लिहिण्याची जबाबदारी मी घेतलेली नाही. माझ्या यादीव्यतिरिक्तही अनेक चांगले कवी व कविता असू शकतील. ते सगळे मला माहीत नाहीत, मी वाचलेलेही नसतील. मी स्वत: मला एक लेखक समजतो, त्यामुळे, या कामाला मी किती वेळ द्यावा याला मर्यादा आहे. लोक समजून घेतील, असे वाटते.

--- ००० ---

२०-१२-२२ पर्यंत आले.

पुन्हा संमेलन

खरे तर साहित्य संमेलन या महोत्सवाशी माझा काही संबंध नाही. तरीही, मीही काही लिहीत असतो त्यामुळे, एक गंभीर चाळा म्हणून यावर लिहावेसे वाटते. हे नाही लिहिले तर काय बिघडणार आहे, हे जसे खरे आहे तसेच, हे लिहिले म्हणूनही काही बिघडणार नाही, हेही खरेच आहे. तर, यंदा, न्या. नरेंद्र चपळगावकर अध्यक्ष आहेत. ते गांधीवादी विचारवंत आहेत. त्यांचे भाषण अमूकच कुणाच्या बाजूचे वा अमूकच कुणाच्या विरोधावरच केंद्रित असे नसणार याची कल्पना होती. त्याप्रमाणे साधक-बाधक विचार मांडणारे असे अनाक्रमक, समतोल भाषण त्यांनी केलेले आहे. सरकारी हुकुमशाही नसावी या मुद्याबरोबरच त्यांनी खालील मुद्देही मांडलेले आहेत ---

एक --- जो अनुभव त्याला सांगायचा आहे त्याच्याशी सूतराम संबंध नसलेले आपण लिहू नये, याची त्याने काळजी घेतली पाहिजे. कोणाची तरी बदनामी करणे अगर आपल्या मनातील कशाबद्दलची तरी नाराजी व्यक्त करणे हा लेखकाचा उद्देश असेल तर ते वाङ्मयबाह्य प्रयोजन असते. लेखकाचे स्वातंत्र्य कधीकधी त्याच्या डोळ्यावर लागलेल्या झापडामुळे आपोआप नष्ट झालेले असते. अमूक प्रकारचेच साहित्य लिहावयाचे, तेच देशहिताचे आहे, अगर आपल्या तत्त्वज्ञानाच्या समर्थनार्थच लिहिले पाहिजे, असा त्याचा चुकीचा समज झालेला असतो.

दोन --- साहित्यिकांशी हितगूज करताना विनोबांनी काही महत्त्वाच्या गोष्टी सांगितल्या. प्रथम त्यांनी सांगितले की, अनुभवाहून अलग झाल्याशिवाय साहित्य लिहिताच येत नाही. विनोबा हेही म्हणाले की, अनुभवाला आपल्या प्रतिक्रियांची आणि मतांची जोड देण्याची आपल्याला आवश्यकता भासली म्हणजे तो अनुभव साहित्यच राहत नाही.

--- हे दोन मुद्दे काहींच्या म्हणजे ‘ भूमिकावाल्यांच्या ‘ कदाचित पचनी पडणारे नाहीत, असे वाटते. पण, चपळगावकर हे गांधीवादी असल्याने ते हिंदुत्ववादी नाहीत याची सहानुभूती म्हणून एक स्ट्राटेजीचा भाग म्हणून त्यांच्या या मुद्यांना फारसा विरोध होणार नाही. ते ठीक आहे.

या निमित्ताने मला एक वेगळाच मुद्दा मांडायचा आहे. तो आहे आपण ज्याला वाचन-संस्कृती म्हणतो, त्याबाबतचा. काल मी एका पुस्तक प्रदर्शनाला गेलो होतो. तिथे लाखभर इंग्रजी पुस्तके आहेत असे कळल्याने मुद्दाम गेलो होतो. मला वाटले होते की काही ‘ आजचे ‘ ललित लेखन वा समीक्षा असलेले असे काही असेल. तर पूर्ण भ्रमनिरास झाला ! सगळी चकचकीत बांध्याची ५०० ते ६०० पानांच्या प्रामुख्याने कादंबऱ्यांची आणि उघडच निव्वळ करमणुकीची पुस्तके होती ! या जगाच्या वाचन संस्कृतीचे हे दर्शन झाल्यावर माझ्या मनात विचार आला की याला वाचन संस्कृती म्हणावे का ? हा अर्थातच विवाद्य मुद्दा आहे, पण, असली आणि इतकी प्रचंड वाचन संस्कृती इथे नाही आहे, याचे मला समाधानच वाटले. आपल्या वाचन संस्कृतीचे तितकेच घातक असे दुसरे काही दोष आहेत -- उदा ० – इतिहास-पुराणात रमणे, अस्मितांमध्ये मश्गूल राहणे, विभूतिपूजा, वगैरे. तरीही, या अध्यक्षीय भाषणाबाबत बोलताना एक विचार आला की अध्यक्षांनी यावर बोलायला हवे होते. विशेषत: ललित लेखनावर. सर्व समावेशक नाही शक्य, पण, थोडे तरी. पण लेखकांचे उल्लेख करून बोलावे तर हेच का, ते का नाहीत, असा गटनिहाय संवेदनशीलतेचा दबाव अध्यक्षांवर येत असावा. त्यामुळे, अध्यक्षांनी यावर बोलायचेच नाही अशी प्रथा पडत आहे. अभिव्यक्तिस्वातंत्र्य संकोचच म्हणावे लागेल यालाही !

– ० –

चित्र कळणे

मी काही चित्रकलेचे रीतसर प्रशिक्षण वगैरे घेतलेले नाही. थोडेफार वाचन आणि काही ' पाहणे ' हीच माझी या कलेतली संपर्क-सामुग्री. पण त्यामुळेच मी या विषयावर लिहिले पाहिजे असे वाटले. कोणतीही कला ही काही फक्त प्रशिक्षितांसाठी नसते – ती सर्वच इच्छुकांसाठी आणि उत्सुकांसाठी असते, हे जर खरे असेल तर मीही या विषयावर लिहायला हरकत नाही. काही वेळा, एखादा म्हणतो की अमुक कविता दुर्बोध आहे, तिच्यात काही ऐवजच नाही किंवा अमुक नाटक कितीही प्रामाणिकपणे पाहिले तरी ' हाताला काही लागत नाही ', म्हणजे काय असते हे हाताला लागणे ? त्यांनाही जेव्हा एखादी कलाकृती आवडते तेव्हा काय घडत असावे ? ते म्हणजे ' नको तिथंच पडला अवचित माझा हात ' असे काही असेल का ? बऱ्याच लोकांना नाटक पाहिले की ' नाट्यात्म विधान ' सापडावे लागते, म्हणजे मगच ते नाटक त्यांना समजले, असे वाटते. याचा अर्थ त्यांना त्याची एक वैचारिक कॅप्सूल करता यावी लागते, हे उघड आहे. हे असले सगळे घोळ कोणत्याही कलेच्या संपर्कात येताना असतातच. संगीत ऐकताना मनात वीरभावना निर्माण झाली, दु:ख वा विरह जाणवला म्हणजे ते कळले असे वाटत असावे.

चित्राच्या बाबतीत, फोटोग्राफिक चित्र काढता येणे हीही काही सोपी गोष्ट नसते, त्यालाही प्रचंड कौशल्य लागतेच. पण तेवढ्याच बाबीला सर्जक कला असे म्हणता येईल का, असा प्रश्न येतो. ज्याला इंप्रेशनिस्टिक किंवा ठसावादी वा प्रभाववादी कला म्हणता येईल तिच्यात आकार ओळखू येतात पण ते ' जसेच्या तसे ' नसतात. रंग, आकार, पोत, रचना हे सगळेच कॉपिबहाद्दरगिरीपासून लांब असते. हे नव्यानेच पाहणे आणि घडवणे असते. हे नवे काय आहे, वास्तवापासून यात वेगळे काय आहे, त्यामुळे काय घडते आहे – असा विचार  करत आणि ' पाहात ' गेले की त्या चित्रातली सर्जकता उलगडू लागते. कोणत्याही कलेत, तीत अंतर्भूत असलेल्या सर्जकतेबरोबर जाणे म्हणजे ती कळणे, हे इथे लक्षात घ्यावे. यासाठी, अर्थातच, पूर्वग्रहविरहित दृष्टीने चित्र पाहता यायला हवे. कळणे म्हणजे ' आपल्या सवयीत बसवणे ' हा विचार सोडला पाहिजे. संगीताच्या एखाद्या उत्तुंग आविष्कारात, आपल्याला हा अमुक राग आहे असे कळले नाही तरीही, आपण त्या गायकाच्या सर्जकतेबरोबर राहू शकतो. तसेच चित्रात आहे. चित्र ' आवडणे ' पासून ते ते ' ग्रेट आहे '  इथपर्यंत जाणे म्हणजे त्यातल्या सवयबाह्यतेचा, ' माहीत नसण्याचा ' प्रत्यय येणे.

अमूर्त चित्रकला तर ओळखीचे जग घेतच नाही संदर्भाला. हे अमुक आहे असे म्हणून तिथे काही संपत नाही. सर्जकता असलेली कोणतीही कलाकृती ही ' कळून संपली ' असे होऊ शकत नाही. म्हणजे प्रत्येक अमूर्त चित्र ग्रेट असते का ? उगीचच काहीही गिचमिड केले तर त्याला अमूर्त चित्र म्हणता येईल का ? या प्रश्नावर विचार करता हे लक्षात येते की प्रथमत: माध्यमावरची हुकूमत जाणवतेच. आणि त्या चित्रात जे काही आहे ते चित्रकाराच्या सखोल चिंतनप्रक्रियेतून आलेले असते. आता हे कशावरून ? तर ते चित्र पाहात राहावे असे आपल्याला वाटते आणि खुल्या मनाने आपण ते पाहात राहिलो तर त्या सर्जकतेच्या प्रक्रियेत आपण जाऊ शकतो. चित्र पाहावेसे वाटणे, आपले पूर्वग्रह सोडावेसे वाटणे आणि सवयबाह्य आशयाची जाणीव होणे ही चांगल्या चित्राची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत.

यावरून एक प्रश्न असा येतो की एखादे उत्तम चित्रप्रदर्शन मी पाहिले आणि आता मला त्यावर लिहायचे आहे तर मी काय, कसे लिहिणे अपेक्षित आहे ? तर, थोडक्यात, कोणकोणत्या प्रक्रियांनी ती चित्रे ‘ नवा ’ म्हणजे सवयबाह्य आशय देत आहेत, हे सांगायला हवे. तेही वैचारिक सारांश न काढता.

--- ००० ---

' मराठीतले कला-साहित्याचे क्षेत्र ( इथल्या ) मातीत घालायला जबाबदार कोण ' या विषयावर एखाद्या हौशी अभ्यासकाने इथली मराठीतली एक शेवटची डॉक्टरेट करावी, असे मी सुचवू शकतो. पण या विषयाला गाईड मिळेल का हाच एक प्रश्न आहे !

15-02-23.

द चिप्स आर डाऊन

( सध्याच्या राजकीय पेचप्रसंगामुळे आठवलेले -- )

या नावाची सार्त्रची एक कादंबरी आहे – कुठे त्याचा उल्लेख स्क्रीनप्ले असाही आहे. तर त्यात, क्रांतिकारक ग्रुपमधला एक तरुण, सैनिकाच्या गोळीने मरतो आणि दुसरीकडे एक स्त्री विषप्रयोगामुळे मरते. त्या स्त्रीची बहीण आणि तिचा नवरा यांचे लफडे वा प्रेम असते. तो तरुण आणि ती स्त्री यांचा जिवंत असताना काहीच संबंध नसतो. पण, मृतात्म्यांच्या जगात आल्यावर त्यांची तिथे भेट होते. ( ही सार्त्रची  फँटसी – कल्पना आहे – त्याला कृपया अंधश्रद्धा म्हणू नये. ) तर त्या मृतात्म्यांच्या जगात असा नियम असतो की इथे आल्यावर एखादी स्त्री आणि पुरुष यांना जर असे वाटले की जिवंत असताना आपण भेटलो असतो तर आपण एकमेकांवर प्रेम केले असते. तर अशा परिस्थितीत त्यांना पुन्हा एकदा जगण्याची संधी दिली जाते ! त्या नियमात ही दोघे बसल्यामुळे त्यांना पुन्हा एकदा जगण्याची संधी मिळते ! याचा अर्थ, ते मेले त्या क्षणापर्यंत जग मागे जाते ! ती विषप्रयोगाने मरत नाही आणि याला गोळी लागत नाही ! त्यानंतर काही घडलेच नव्हते असे जग बिनचूक तिथून पुन्हा सुरू होते !

त्या फँटसीप्रमाणे प्रत्यक्षात कसे घडू शकेल ?

त्या कादंबरीचे शेवटचे वाक्य माझ्या मेंदूत कोरले गेलेले आहे – ती दोघे नाच करत असतात – trying to live once again ! – पुन्हा एकदा जगण्याच्या प्रयत्नात !

इथे खरेच असे घडले तरी कोण कसले मोठे सर्जक दिवे लावणार आहे ?

--- ००० ---

०९-०३-२३.

एखादा माहीत असलेला ( खरे तर माहीत नसलेलाही ) गंभीर लेखक त्याचे काही ‘ वेगळेच ’ लेखन समोर ठेवतो तेव्हा अनेकांना त्याच्या आकलनात अडचणी येऊ शकतात. अशा वेळी स्वत: जरा सबूरीने समजून घेण्यापेक्षा शक्य तो ते लेखनच धुडकावून लावावे, रद्दच करावे, नाकारावे – असे मार्ग वापरून आपल्या मद्दडपणाचे रक्षण आणि

समर्थन करावे याला मराठीत एक उदात्त परंपरा आहे. तो धोका याही कादंबरीला आहेच. न- कादंबरी म्हणजे कादंबरी या साहित्य प्रकाराची अनेक ‘ मान्य ‘ वैशिष्ट्ये भिरकावून देऊन वेगळाच मार्ग चोखाळणारी कादंबरी. कथावस्तू, स्वभावचित्रण, निवेदनातली सलगता, कारण-परिणाम साखळी, काळाचा दस्तावेज उभा करणे वगैरे जी सवयीने माहीत असलेली अशी कादंबरीची लक्षणे आहेत त्यांचा इथे अभाव आहे. पु. शि. रेग्यांच्या ‘ सावित्री ‘ या कादंबरीला ‘ छापून छापून वाढवलेली कादंबरी ‘ म्हणणारे लेखक-समीक्षक इथे लिहून लिहून वाढवलेल्या कादंबऱ्या लिहीत राहिले ! कारण एकच, कादंबरी निदान ३०० पानांची तरी असायला हवी ! ही कादंबरी तीही अपेक्षा मोडीत काढणारी आहे. ही फक्त १०० पानांची भरगच्च आशयाची अशी कृती आहे. फॉर्मचा किंवा साहित्य प्रकारात होणारा हा बदलही या कादंबरीत मधून मधून चर्चिला जातो. याप्रमाणे जेव्हा एखादी साहित्यकृती स्वत:ची जाण व्यक्त करते तेव्हा तिला स्व-जाण वा meta म्हणावे.

आपल्याला जे समजत नाही किंवा जे आपल्या सवयीतले वा चाकोरीतले नाही त्याची टिंगल करणे, टवाळी करणे ही पद्धत आता तरी आपण बंद करायला हवी. अभिव्यक्तिपद्धतीत असे बदल का, कशामुळे होत असतात हेही आपण समजून घ्यायला हवे. काळानुरूप मनांचे ढाचे बदलतात, प्रतिक्रियांच्या पद्धती बदलतात, जगण्याकडे ‘ पाहणे ‘ ही बदलते. त्यामुळे परंपरा नाकारणारे असे लेखन घडत असते, हे समजून घ्यायला हवे. स्वत:ची सुटका करून घेण्यासाठी, ही कथाच नव्हे, ही कादंबरीच नव्हे, ही कविताच नव्हे अशा तुरंत-पळवाटा वापरणे घडू नये. नुसतेच स्वत:च्या कोसल्यात अंग मुडपून पडून राहणे हे कला क्षेत्राचा घात करणारे आहे.

या बदलत्या पद्धती, वेगळे ‘ पाहणे ‘ यांचे काय महत्त्व वा मूल्यात्मकता असते माणसाच्या जगण्यात ? – हा प्रश्न इथे प्रस्तुत ठरतो. बऱ्याचजणांना संदेश, बोध, नीतीप्रचार, वा काही आदर्श हे साहित्यकृतीतून पोचणे महत्त्वाचे वाटते. या सगळयाचा थोडक्यात सारांश म्हणजे, ‘ व्यवस्था बदलणे ‘. काय बदलायचे व्यवस्था म्हणजे ? आयपीसी की घटना की संसदभवन ? की मोदींच्या जागी ममता दीदी वा पवारसाहेब वा आदित्यजी वा राहुलभाई यांची स्थापना करणे ? ही बाहेरची सगळी व्यवस्था म्हणजे आपल्या मन वापरण्याच्या सामूहिक पद्धतीची अभिव्यक्ती असते, हे लक्षात घ्यायला हवे. कला क्षेत्र हे या मुळाकडे लक्ष देत असते. पाचशे पुस्तके वाचली म्हणजे मन परिपक्व होते, असे नाही. मनाला स्वत:च्या वर्तणुकीचे भान येण्याने परिपक्वता येते. त्यानेच जगण्यात मूल्यात्मकता येते. हे सर्व पाहता, कुणी निरुद्योगी, चंगीभंगी माणसे फावल्या वेळात हे असले उद्योग करतात, असे समजू नये. हे कलावंत, लेखक हे माणसाच्या जगण्याबाबत अत्यंत गंभीर आणि संवेदनशील असतात म्हणूनच त्यांच्याकडून अशा कलाकृती निर्माण होत असतात, ही प्राथमिक जाण असणे अत्यावश्यक आहे. कला मुख्यत: मानवी समस्यांचे, वर्तणुकीचे भान घेत असते -- हा कलाक्षेत्राचा पायाच असतो, असे म्हणता येईल.

--- ० ---

. हे नुसते विनोदी नाटक नाही, फार्स तर नाहीच. मग याला कृष्णनाट्य म्हणता येईल का ? मला वाटते, नाही. कृष्णनाट्याच्या मुळाशी एक अभेद्य अशी निराशा असते. तसे इथे नाही. हे अब्सर्ड वा मृषा नाट्यही नाही. कारण

तशा नाटकात एक मूलभूत अर्थशून्यता आणि हेतूहीनता असते. तसेही इथे नाही. म्हणून याला उपरोधिका म्हटले आहे.

--- ० ---

०९-०३-२३. ----

कोणताही विचारव्यूह आदर्श मानणे म्हणजे तत्त्व.

All binaries are false ! there is nothing universal ! वगैरे -- याच्या मला समजलेल्या अर्थाने मी बोलतो आहे -- त्यांची positive मान्यता कशाला आहे, ते तुम्ही सांगा.

उत्तर आधुनिकतेप्रमाणे सत्य, वैश्विकता, चांगले-वाईट यांना आहे का मान्यता ? सगळा उथळपणाच आहे -- आहे ते साजरे करू या -- असे असेल तर कसले सत्य आणि कसले ज्ञान ?

उत्तर आधुनिकता हे अभिधान जगभर वापरले जाते -- त्याला आपण भोंगळ म्हणून काय उपयोग ? -- शिवाय, मध्यमवर्गीय असे हेटाळण्याचा इथे प्रश्नच नाही -- उत्तर-आधुनिकतेत हे आहे -- सखोल काही नसते, सगळे उथळच असते -- हे उलट खोटे आदर्श बाळगणाऱ्या मध्यमवर्गीयाला पचणारे नाही --असो –

( माझ्या ‘ वस्तू ‘ या नाटकावरच्या लाख्यांच्या पोस्टवर – )

हे नाटक कै. अरविंद देशपांडे महोत्सवात झाले तेव्हा सुलभा देशपांडे आणि रोहिणी हट्टंगडी आल्या होत्या. त्या दोघींनाही नाटक खूप आवडले होते.

शैलीतले नावीन्य, चटपटीतपणा, चमकदारपणा हा वाचकांना चकित करतो, भुरळ पाडतो, हे ठीक आहे. पण तो भर ओसरतो आणि मग यात मूल्यात्मक असे काय आहे, हा प्रश्न समोर येतोच. माझ्या मते मर्ढेकरांबाबतही हा प्रश्न विचारला पाहिजे. सनसनाटी पवित्रा ठीक पण तो कस नाही ठरू शकत. ( नेमाड्यांबाबतच्या लाख्यांच्या पोस्टवर ).

०९-०३-२३.

मी सुरवातीच्या काळात एकदाच कुठल्यातरी मासिकाला कविता पाठवली होती. ती छापून आली आणि काहीतरी मनीऑर्डर आल्याचं आठवतंय.ती कविता मी कुठल्याच संग्रहात घेतली नाही.

न मागता स्वतःहून कुठे कविता पाठवण्याचं धाडस आणि चिकाटी माझ्यात नाही, हेच कारण.

एकदा कवी सतीश काळसेकरांनी माझ्याकडे कविता मागितली, पण ती छापली नाही. जेव्हा आमची भेट झाली तेव्हा मी त्यांना विचारलं,'सर, माझी कविता मिळाली होती ना?' ते म्हणाले,' हो,अरे मिळाली, पण मला ती अपूर्ण वाटली.थोडं अजून काम कर तिच्यावर.'

मी प्रतिकार केला नाही कि डिफेन्सही केला नाही.

आणि गम्मत म्हणजे तीच कविता चंप्रसरांना आवडली. ती त्यांनी त्यांच्या 'आवर्तने: कविता, आशय, आकलन' या पुस्तकात घेतली आहे.

थँक्यू चंप्रसर! --- avinash gaikvad.

Champra Deshpande

वा ! भारी आहे ही कवितेची पूर्वकथा !

पहिल्याच कवितेला अजब पारितोषिक

लाख्यांच्या पोस्टमुळे माझ्या, सत्यकथेत प्रसिद्ध झालेल्या पहिल्या कवितेची आठवण झाली. ती कविता होती, ' झुंजुन गेल्या सरी '. माझ्या १७ व्या वर्षी ती सत्यकथेत आली होती. त्या कवितेला, माझ्या मते, एक विशेष पारितोषिक मिळाले, त्याची आठवण सांगतो. जरा अघळपघळ पद्धतीने सांगतो.

डॉ. मनोज भिसे हे माझे मित्र होते. ते वाडिया कॉलेजात इंग्रजीचे प्राध्यापक होते. शिवाय ते एक उत्तम अभिनेतेही होते. त्यांनी ' घाशीराम -- ' मधला घाशीराम केला होता. तर त्यांनी एकदा, वाडिया कॉलेजात इंग्रजी विभागातर्फे होणाऱ्या एका कार्यक्रमासाठी माझे नाव सुचवले होते. कार्यक्रम असा होता की निरनिराळ्या भाषांतले कवी, कथाकार, नाटककार यांनी आपापल्या सर्जक प्रक्रियेबद्दल बोलायचे. त्यात मराठीचा प्रतिनिधी म्हणून मी माझ्या नाट्यलेखनावर बोलायचे होते. त्यानंतर प्रत्येकाकडे काही विद्यार्थीसमूह देण्यात येणार होता आणि त्यांचा एक प्रकारचा लेखन-क्लास घ्यायचा होता. तोही मी घेतला होता. मी माझे भाषण लिहून नेले होते, ते वाचून दाखवले. अध्यक्ष होत्या शोभा डे. सर्व भाषणे झाल्यावर त्यांनी मुद्दाम मला भेटून, त्यांना माझे भाषण आवडल्याचे सांगितले होते.

या कार्यक्रमातल्या माझ्या यशस्वी सहभागानंतर डॉ. मनोज भिसे यांनी माझे नाव एका कार्यक्रमासाठी अहमदनगरच्या कॉलेजाला सुचवले. तिथे इंग्रजीतून ' मराठी नाटक ' या विषयावर बोलायचे होते. तोही कार्यभाग मी नीट पार पाडला होता, ते ठीक. पण, त्या कार्यक्रमापूर्वी आदल्या दिवशी आम्ही काहीजण एका लॉजवर राहिलो होतो. तिथे मराठीतले एक विचक्षण समीक्षक डॉ. रवींद्र किंबहुने हेही होते. रात्री आम्ही गप्पा मारत बसलेलो असताना कुणितरी माझी ओळख करून दिली. किंबहुने म्हणाले, प्रत्यक्ष भेट आज झाली पण मी यांना ओळखतो. असे म्हणून त्यांनी सर्वांना जरा थांबण्याची खूण केली. आणि ते म्हणाले, तुमची सत्यकथेत आलेली पहिली कविता, ' झुंजुन गेल्या सरी '. ऐका. असे म्हणून त्यांनी ती पूर्ण कविता पाठ म्हणून दाखवली ! मला हा एक धक्काच होता !

माझी कोणतीच कविता मला स्वत:ला कधीच पाठ नसते. किंबहुन्यांनी ती कविता म्हणून दाखवणे हा मला नुसताच एक धक्का नव्हता तर ते एक अमूल्य पारितोषिकही होते !

तो  धक्का माझ्या मनात अर्थातच जपला गेलेला आहे !

ही ती ६० वर्षांपूर्वीची कविता ---

झुंजुन गेल्या सरी

झुंजुन गेल्या सरी

नभाभ्रे उन्हात भिजुन वरी

भांडुन गेली परी

नभाशी पर्वतशिखरावरी

चिंबुन गेल्या लता

फटकुनी रस्त्याशी वाकता

भंगुन गेली शिला

साहुनी डोंगर भांबावला

सांडुन गेली निशा

दिसाला चढली जेव्हा नशा

स्फुंदुन गेल्या दिठ्या

बिचाऱ्या मेघांच्या एकट्या...

--- ० ---

--- ००० ---

एक आठवण –

( मन ) हा एक एकपात्री दीर्घांक आहे -- जो नीट करेल तो नटसम्राटच !

( गोव्याच्या प्रयोगाची जाहिरात ).

हिंदीतला हा प्रयोगही बऱ्याच जणांनी पाहिला होता – ( Renovation ).

कमलाकर नाडकर्णी

एक उत्तम नाट्यसमीक्षक ! माझ्या अनेक नाटकांवरची त्यांची समीक्षणे माझ्या संग्रही आहेत ! एक गंमतीची आठवण आहे. महाराष्ट्र कल्चरल सेंटर च्या दीर्घांक स्पर्धेत माझा ' डावेदार ' हा दीर्घांक पहिला आला होता. मला लेखनाचेही पारितोषिक मिळाले होते. परीक्षक होते, कमलाकर नाडकर्णी आणि प्रतिमा कुलकर्णी. त्या दीर्घांकावर, त्यांनी तो कसा चांगला आहे याबाबत लिहिलेही होते. कालांतराने त्यांच्यातला पुरोगामी जागा झाला असावा. नंतर त्यांनी असे

काही लिहिले की ' ढोलताशे ' लिहिणारा हा लेखक ' डावेदार ' सारखे प्रतिगामी नाटक कसे काय लिहू शकतो ? ! त्यावर मी, बाहेर क्रांती होवो न होवो, नाडकर्णींच्या समीक्षणात मात्र क्रांती झालेली आहे, असा एक उपरोधिक लेख लिहिला होता. तोही प्रसिद्ध झाला होता ! अशी काही क्रांती झाली असेल तर नाडकर्णींनी यापूर्वीचे स्वत:चे सर्व लेखन नाकारायला हवे, असे मी म्हटले होते ! हा संघर्ष होऊनही आमच्या मैत्रीपूर्ण संबंधात काहीच फरक पडला नव्हता. त्यांची कन्या, नमिता वर्तक, ' आई कुठे काय करते ' या मालिकेसाठी चांगले लेखन करत आहे, तिने तिचे स्वत:चे नाटक लिहायला हवे, असे आमचे फोनवर बोलणेही झाले होते. उत्तम छान दिलखुलास मित्र ! त्यांच्या स्मृतीस अभिवादन !

--- ००० ---

वाचन संस्कृतीच्या विकासासाठी एका चॅनेलवर पुस्तकांबाबत एक कार्यक्रम असतो -- रविवारी दुपारी २/३० वाजता !

आजच्या दिलखुलास भेटीगाठी -- डॉ. दीपक बोरगावे, मी, मनोज पाठक आणि डॉ. शिरीष चिंधडे --- ( photo ).

ललित साहित्याबाबतचा एक प्रश्न ---

अर्थात इंग्रजी शिक्षण, विशेषतः विद्यापीठीय शिक्षण, मराठी समाजात व्यापकपणे पसरले नाही किंवा आजही खोलवर रुजलेले नाही. त्यामुळे सुशिक्षिता'चे साहित्य हे उच्चभ्रू अभिजनवर्गाचे क्षेत्र राहिले आणि सामाजिकदृष्ट्या संकुचित राहिले. त्यातही आधुनिक, प्रायोगिक, नावीन्याचा शोध व वेध घेणारे वाङ्मय अतिशय अल्पसंख्य राहिले आणि त्याचा समर्थक वाचकवर्गही सहसा नागरी किंवा महानगरी अभिजनवर्गाचासुद्धा अतिसूक्ष्म हिस्सा होता. ही स्थिती आजही आहे आणि पुढेही चालूच राहील. सर्वसाधारण साक्षरतेच्या प्रमाणात जो व्यापक नवसाक्षर वाचकवर्ग निर्माण झालेला आहे आणि होत राहील त्याला आपली स्वाभाविक बाजारपेठ मानणारे प्रकाशक-लेखक-विक्रेते आणि 'कलात्मक वाङ्मया'ची निर्मिती व प्रकाशन करणारे यांच्यातील अंतर कायम राहील किंवा वाढत जाईल.
--- दिलीप पुरुषोत्तम चित्रे, साहित्य आणि अस्तित्वभान भाग -- २, पान ३६४.

दिलीप पुरुषोत्तम चित्रे आणि मी

चित्र्यांचे कार्य-कर्तृत्व पाहून ‘ बाप रे ‘ म्हणावे लागते ! कविता, कथा, नाटक, समीक्षा, चित्रपट, संपादक म्हणून अनेक ठिकाणी कामे, अनुवाद, राजकीय स्तंभ, मराठी, इंग्रजी, हिंदी, गुजरातीही वाचन असे अनेक रकाने दर्जा राखून भरणारे जगणे ! भारतातल्या आणि जगातल्या अनेक मान्यवरांशी वैचारिक संपर्क, अनेक देशांतला प्रवास – असे खूप खूप खूप ! आणि  या सगळ्याच्या सूक्ष्म, तपशीलवार स्मृती ! हा माणूस राक्षस होता की देव होता की भूत होता

असा प्रश्न पडावा अशी सगळी कारकीर्द ! चित्र्यांचे लेखन ओलांडून मराठी साहित्याचा विचारच नाही करता येणार इतके काम ! आणि प्रत्येक कामात जबरदस्त बुद्धिमत्ता ! या सगळ्याच्या दर्शनाने माझी छाती दडपते आणि चकित होत ऊर भरून येतो ! सोळाव्या वर्षी या माणसाने विंदांच्या कवितासंग्रहावर परीक्षण लिहिले आणि ते सत्यकथेत का मौजेत छापले गेले ! निव्वळ चमत्कार ! मी नोकरीनिमित्त गावोगावी फिरत असल्याने माझी कधी त्यांच्याशी ओळख झाली नाही.

याच्या उलट माझी अवस्था आहे. एक किरकोळ साम्य म्हणजे सतराव्या वर्षी माझी पहिली कविता सत्यकथेत आली होती. बाकी सर्व म्हणजे प्रचंड फरक ! शाळा-कॉलेजात असताना बऱ्यापैकी वाचन झाले पण पुढे नोकरीचे क्षेत्र वेगळे असल्याने ते कमी झाले. विद्वत्ता जमवण्याचे डोक्यातच नसल्याने ते काही घडले नाही. आणि जे काही करायला जमले त्यात नंतर एक महत्त्वाची कमतरता राहिली. स्मरणशक्तीची ! माझेच लेखन मला नीट आठवत नाही. आता अलीकडेच माझी, ‘ तंबाखूची टपरी ‘ आणि ‘ आवर्तने ‘ ही दोन पुस्तके प्रकाशित झाली. ते काम करताना मी शंभर टक्के त्यात असतो पण ते काम होऊन गेले की माझ्या डोक्यातून ते आपोआप काढून टाकले जाते. त्यामुळे, आता मला माझ्याच त्या पुस्तकांबद्दल काही विचाराल तर माझी अवस्था बिकट होण्याची शक्यता आहे ! त्यामुळे, मी केलेले काम माझे नाहीच, असे मला वाटत असते ! पोलाद आणि अवजड उद्योग हे खाते मला अजिबात झेपणारे नाही.

पण, फिर भी, मेरे पास भी, कुछ तो होगा !

--- ००० ---

मॉलप्रॅक्टिस अँड द शो च्या निमित्ताने अनेकजण प्रथमच The Box : द बॉक्स ला भेट देत आहेत. मित्रवर्य अतुल पेठेच्या पुण्याईने हे क्षण बॉक्सच्या वाट्याला आले असं दिसलं तरी हे सारे आमचेही मित्रच आहेत. त्यामुळे त्यांची आणि आमची इच्छा असली तरी योग यावा लागतो तसा तो आत्ता आला आहे असं म्हणता येईल !

या अशा महत्वाच्या व्यक्तींपैकी एक म्हणजे ज्येष्ठ लेखक चं प्र देशपांडे. आपण सगळे त्यांचं चंप्र असंच नामाभिधान ठेवलं आहे, पण आपल्यापैकी सर्वांनाच त्यांच्याबद्दल अतीव आदरच आहे. ते आजकाल फार कुठे काही पाहायला जात नाहीत पण दुरून खबरबात घेत असतात, (विशेषतः इथे फेसबुकवर) कौतुकाची थाप पाठीवर मारतात, लाईक/रिॲक्ट करतात. शब्दाला आणि भाषेला नाटकाच्या वहनात, किंवा नाटकीय कलाव्यवहारात भाषिक सौंदर्याबाबतीत त्यांच्याकडून जे पूर्वी अनेकवेळा सप्रात्यक्षिक ऐकलं आहे ते मी कधीही विसरू शकत नाही. स्वतःची सर्व नाटकं सर्वांसाठी खुली करून देणारा हा असा नाटककार आपला (ज्येष्ठ) मित्र आहे याबद्दल स्वतःचाच हेवा वाटू शकतो. नाणेफेक, ढोलताशे, एक गगनभेदी किंचाळी तसंच बुद्धिबळ आणि झब्बू ही त्यांची नाटकं मला विलक्षण आवडतात. माझ्या फेसबुकवरच्या कवितांवर ते कधीकधी दाद देतात तेव्हा हुरळून जायला होतं. आजही ते बॉक्सला प्रथमच आले, पण नुसतेच नव्हे तर एक सप्रेम भेट घेऊन आले. "तंबाखूची टपरी" हा जगभरातील 58 कवींच्या कविता त्यांनी मराठीत अनुसर्जित केलेला संग्रह त्यांनी मला दिला.

चंप्रनी दिलेल्या आनंदात भर पडली ती पार जळगांववरून आलेले सन्मित्र शंभू पाटील भेटले तेव्हा. जळगांवात नाटकाचं रसरशीत काम अत्यंत सातत्यपूर्ण पद्धतीने करत आलेले पाटील काल आमच्याकडे सपत्निक आले होते. ही त्यांची The Box Pune ला पहिलीच भेट होती. आता Parivartan Jal आमच्याकडे कधी येतंय याची उत्सुकता निर्माण झाली आहे हे नक्की ! --- प्रदीप वैद्य.

एका कवीचे कवितेकडे गांभीर्याने पाहणे --

दिलीप चित्रे : ----- मी लिहितो तेव्हा कलाकृती निर्माण करीत नसतो. कविता लिहिणं ही माझी एक 'मानुष' (humanistic) कृती असते. माझ्या मते, कविता लिहिणं, ही कुणाचीही एक व्यापक मानुषतावादी कृती असते आणि तशीच ती असायला हवी. ती कलाकृतीच्या मर्यादित पातळीवर येऊ शकत नाही. जीवनाचा अखंडित प्रवाह कवितेतून नोंदला जाणं, हे मला महत्त्वाचं वाटतं. हा प्रवाहीपणा आणि सबंध जीवनाची समावेशकता कवितेतून यायला हवी, असं मला वाटतं. कवितेची रचना लवचीक असावी. जीवन हे हळूहळू विकसित होत असतं. कविता जर जीवनानुसार झाली, तर तिच्यात विकास होईल. कलेच्या रसिकांचा विशिष्ट असा एक वर्ग असतो. अशा निवडक कला रसिकांच्या कल्पनेला मी महत्त्व देत नाही. जे मी लिहितो, तो एक मानवी अनुभव असतो आणि तो कुठल्याही माणसाला येऊ शकतो. काही विशिष्ट प्रकारचे अनुभव घेऊ शकणाऱ्या लोकांमध्ये मी माझा समावेश करीत नाही, की अनुभवाविषयी काही विशिष्ट दृष्टिकोन जोपासणाऱ्या खास लोकांसाठी मी लिहीत नाही. माझे अनुभव विशिष्ट परिघातले असले असते, तर माझा कवितेविषयीचा दृष्टिकोनही बंदिस्त झाला असता.

संतोष शेणई : म्हणजे संस्करण किंवा परिष्करण.....

दिलीप चित्रे : मला मान्य नाही. कवितेवर पश्चात संस्कार करणं, हे मला नैतिकदृष्ट्या चुकीचं वाटतं. 'यशस्वी' कविता लिहिण्यासाठी मी माझी लेखणी उचललेली नसते. एक गोष्ट लक्षात घ्या, मी माझ्या पहिल्या पुस्तकापासून कवी असण्याचं भान बाळगलेलं आहे. माझ्या कवितामधून मुळात कविता लिहिण्याविषयीचे प्रश्नच उपस्थित केले आहेत. अनेक कवितांमधून मी स्वतःलाच प्रश्न विचारतो की, 'कवी असणं म्हणजे काय? कविता लिहिणं म्हणजे नेमकं काय करणं असतं?' आपल्याच नादात रस्त्यातून भटकताना, मनातल्या मनात सॉनेट्स रचणाऱ्या 'रिल्कियन कवी' ची माझी पूर्वीची कल्पना मी पुढे बाद करून टाकली. एकूण जीवनाविषयीच्या माझ्या कल्पना जसजशा बदलत गेल्या त्याचबरोबर कवितेविषयीच्या कल्पनाही बदलत गेल्या. मी एक निबंधही लिहिलाय - 'कवी काय काम करतो?' मी कवी म्हणून कुणाला प्रदर्शित करण्यासाठी वस्तू निर्माण करीत नसतो. कवी हा काही एक वस्तू उत्पादित करणारा कामगार नाही. कविता हे काम अन्य उत्पादनांप्रमाणे एक उत्पादन आहे, की ती डॉक्टर किंवा वकिली यासारखी एक सेवा आहे? 'कवितेने कोणत्या प्रकारचं मूल्य निर्माण केलं जातं?' हा प्रश्न मी निरनिराळ्या दृष्टिकोनांतून विचारला आहे.

तर मला वाटतं, की कवितेला 'यशाचा', 'पूर्णतेचा' निकष लावला, की त्याच क्षणी आपण कवितेवर अन्याय करतो. एखाद्या कवीच्या कवितांमध्ये जे चढ-उतार असतात, ते लक्षात घेऊनच त्या कविता समजून घेण आपल्याला सोपं

जातं. एखादी कविता सखोल, समृद्ध आशय व्यक्त करणारी असते; दुसरी त्या मानाने दुबळी असते. प्रत्येकाच्या आयुष्याच्या अनुभवांचा आलेख हा असाच चढ-उताराचा असतो. आपण सातत्याने एकाच पातळीवर जगत नसतो किंवा नेहमीच एकाच पातळीत विचारही करीत नसतो. आपल्या जाणिवेची तीव्रता तरी कुठे कायम सारख्या असतात? त्यामुळे कवितेत कमी-जास्त असणारच. अखेर ती तुमची कृती आहे. म्हणून आपल्या कवितेतला कमी प्रतीचा भाग काढून टाकणं म्हणजे आपल्याच चरित्रातला तुकडा पाडल्यासारखं होईल. आपल्या चरित्राची समग्रता, हाच मी ज्या प्रकारची कविता लिहितो, तिचा आधार आहे. माझ्या जीवनानुभवाची एकंदर स्वर-रचना लक्षात घेऊन कविता वाचायला हवी. मग त्याचा एखादा सूर कमी-जास्त प्रतीचा लागलेला असला तरी.

--- साहित्य आणि अस्तित्वभान भाग – २, पान ५४६-४७.

--- 000 ---

" कादंबरीकार कशाला, एखादा लघुकथाकार दाखव. जगातल्या उत्कृष्ट लघुकथाकारांच्या रांगेत नेऊन बसवता येईल असा लघुकथाकार दाखव, लघुकथेच्या या व्यावहारिक निरीक्षणातून नेमाड्यांचा लघुकथा-संस्कृतीबद्दलचा आक्षेप आलेला आहे. ' अमृतानुभव ' चा समावेश जगातल्या उत्कृष्ट दीर्घकाव्यांमध्ये केला जाईल. तुकारामाच्या कवितेला जागतिक वाङ्मयात मानाचे स्थान आहे. या काव्याचं क्लासिक स्टेचर सांगता येतं "

--- ' साहित्य आणि अस्तित्वहभान ', भाग २, दिलीप पुरुषोत्तम चित्रे, पान ५५४.

अब मेरा क्या होगा काल्या ?

उत्तरा बावकर या प्रख्यात अभिनेत्री गेल्या. त्यांचा अभिनय मी पाहिला नव्हता, पण, त्यांचे नाव ऐकून होतो. त्या ७९ व्या वर्षी गेल्याची माहिती आलेली आहे. त्यांच्या स्मृतीला अर्थातच सादर अभिवादन !

माझ्यासारख्याला ते एक सूचक घटित म्हणूनही समोर येते. पुढल्याच महिन्यात मीही ७९ व्या वर्षात पदार्पण करत आहे. तेच वर्ष असे नाही, पण, आपले स्टेशन जवळ आल्यावर आपल्या बॅगा उतरवणे, दाराच्या दिशेने जाणे हे तरी सुरू होतेच. काळाशी माझा संवाद असा होऊ शकतो --

“ अब मेरा क्या होगा काल्या ? “

“ तूने तो मेरा नमक खाया है – “

“ नमकही नही – इतने साल खाये हैं – “

“ तो फिर अब गोली खा ! “ असे म्हणून काळ दट्ट्या ओढेल ! पण सिनेमाप्रमाणे त्या गोळीचा रकाना मोकळा असल्याने मी वाचूनही जाईन ! पण नंतर मात्र ठो ठो ठो !

तर ते ठीक. हे सगळे कधी होईल तेव्हा होईल. त्याबद्दल खेदखंत नाही.

मुद्दा असा आहे की मनात काही लेखन आहे, ते पूर्ण करावे. त्यासाठी जरा काळाचे नियोजन लागेल. आपण आहोत कलेच्या क्षेत्रात तर आपण ठिकठिकाणी सहभागीही व्हायला हवे, या विचाराने मी अनेक ठिकाणी परीक्षक, अध्यक्ष वा

व्याख्याता म्हणून गेलो. अनेक कलाकृती, पुस्तके पाहून-वाचून त्यांवर अभिप्राय दिले. पण आता हे सगळे आवरते घेणार आहे. या महिन्यात ठरवल्याप्रमाणे चार कार्यक्रम पार पाडेन. शुभा गोखले यांचे चित्र प्रदर्शन, अभिराम भडकमकर यांचे अभिवाचन, प्रणव जोशी यांचे बालनाट्य ( हे माझ्या घराजवळच्या अण्णाभाऊ मध्ये आहे ) आणि गौरी रत्नपारखी यांचे पुस्तक प्रकाशन.

यापुढे मात्र कृपया कुणीही मला पुस्तके सप्रेम भेट पाठवणे अथवा अमुक नाटक वा कार्यक्रम यांसाठी निमंत्रणे पाठवणे असे काही करू नये, ही विनंती. कारण अशा गोष्टींना प्रतिसाद देणे मला जमणार नाही. वयानुसार आता कामाचे तास कमी झालेले असतात हेही कृपया समजून घ्यावे. अध्यक्ष तुम्हाला दुसरा मिळू शकतो पण माझे लेखन मलाच करावे लागेल. माझे नकार ऐकून कुणाचा गैरसमज होऊ नये म्हणून हा खुलासा केला आहे.

स्वत:चे लेखन तरी पूर्ण करायचे काय एवढे महत्त्व आहे – हा प्रश्नही बरोबरच आहे. आजवर जे लेखन केले तेही नसते केले तरी काय बिघडले असते – हाही प्रश्न योग्यच आहे. पण, इथे एक लक्षात घ्यायला हवे की एकूणच निर्बुद्ध निवडी करतच आयुष्य चाललेले आहे. त्या सर्व निवडी निरर्थक असण्याची शक्यता आहेच. तर उरलेले आयुष्यही आता तोच पॅटर्न राबवावा असे वाटते.

काही दिवसांनी, जमल्यास, अशीही वेळ येईल की आता बास – लेखन खूप झाले, आता ते बंद करावे, अशी निवड होईल ! मग मात्र कला क्षेत्र हे पूर्ण मागे टाकून मस्त रिकामा मोकळा वेळ साजरा करत जगत राहावे, असा विचार आहे !

आले ना लक्षात ? हा अर्थपूर्ण जगण्याचा प्रयत्न नाहीच आहे !

--- ००० ---

तुमच्याच काय, कुठल्याही विचारसरणीचे विभ्रम इथे अप्रस्तुत आहेत हे कृपया समजून घ्यावे. तुमच्या सहिष्णुतेच्या मर्यादेत माझे लेखन कदापि बसणार नाही, हे तुम्हाला माहीत आहे. माझ्या लेखनाच्या फंदात तुम्ही पडू नये, ही नम्र विनंती. कारण, तुम्हाला आवडणारे फडतूस वैचारिक वाद घालत बसण्यात मला इंटरेस्ट नाही. यावरही तुमचे काही हुशार वेगळे मत असेल. ते बोलत न बसता मला अनफ्रेंड केलेत तरी चालेल. मी तुच्छतावादी असल्याचे तुम्ही सुचवलेत त्या सन्मानाला मी अर्थातच शून्य किंमत देतो ! आपण एकमेकांची रजा घेणे हेच उत्तम !

भावनिक असो की वर्णनात्मक, वास्तव म्हणजेच आशय, अशा समजुतीतून लिहिलेली कविता ही ' चांगली ' असू शकत नाही. कोणतेही वास्तव हे भाषेप्रमाणेच कवितेचे माध्यम असते, हे पाहणे महत्त्वाचे आहे. याचाच अर्थ, आशय हा कवीच्या ' स्वभावाने ' दूषित झालेला नसतो. या पद्धतीने पाहता, वरील विवेचन योग्य वाटते.

( राहुल पुंगलिया यांच्या पोस्ट वरील कॉमेंट ).

कविता विशिष्ट असणार -- आशय विशिष्ट असणार नाही –

जे आहे त्याचे समग्र भान हा संदेश नसतो -- त्याला वैचारिक दिशा देणे हा संदेश असतो -- या समजुतीतून मी लिहिले आहे.
19-04-23.

हिंसा

पं. जवाहरलाल नेहरू जे. कृष्णमूर्तींची व्याख्याने ऐकत असत. इंदिरा गांधीही त्यांचे विचार आस्थेने समजून घेत. त्यांनी तर आणीबाणी उठवण्यापूर्वी जे. कृष्णमूर्तींशी चर्चा केली होती असा पुपुल जयकर लिखित त्यांच्या चरित्रात उल्लेख आहे. राहुल गांधी आणि प्रियांका गांधी यांनीही कृष्णमूर्तींच्या तत्त्वज्ञानावर चालणाऱ्या, कृष्णमूर्ती फौंडेशनच्या ऋषि व्हॅली इथल्या शाळेला भेट दिली होती. हे सगळे आठवायचे कारण वेगळे आहे.
फ्रेड्रिक ग्रोहे नामक एक लेखक काही काळ जेकेंबरोबर राहिले होते. त्या काळाच्या आठवणींवर आधारित त्यांनी ' द ब्यूटी ऑफ द मौंटेन्स ' हे एक पुस्तक लिहिलेले आहे. त्या पुस्तकातला हा उतारा बघा –
" Nevertheless, regarding Annie Besant - who was from England and whom he had loved like a mother - he said she had done more for India than Mahatma Gandhi. Using the example of Gandhi, he stated that any kind of forcing others to do what one wanted-even by the presumably peaceful means of fasting-was violent. Fasting for political reasons was violence. " ( page 47. ) म्हणजे ---
" ते काहीही असो, इंग्लंडच्या अनी बेझंट यांच्याबद्दल कृष्णमूर्तींना आईप्रमाणे प्रेम वाटे. ते म्हणाले की त्यांनी भारतासाठी महात्मा गांधींहून अधिक योगदान दिलेले आहे. गांधींचे उदाहरण पुढे नेत ते म्हणाले की तशा कोणत्याही पद्धतीने स्वत:ला जे वाटते तेच लोकांना करायला भाग पाडणे – मग ते अगदी मान्यताप्राप्त अशा शांततामय उपोषणाने का असे ना – ही हिंसाच होती. राजकीय हेतूंसाठी उपोषण करणे ही हिंसाच असते. "
यात गांधींचे मूल्यमापन वा त्यांच्याबद्दल काही मत बनवणे, हे इथे महत्त्वाचे नाही. सध्याच्या वातावरणात ' हिंसा ' हा विषय आपल्या सर्वांच्याच चिंतनात असायला हवा. एखादी व्यक्ती महत्त्वाची नसून मानवी जगण्यातली ' हिंसा ' या समस्येकडे नीट पाहिले जायला हवे.
--- ००० ---

आवर्तने -- चं. प्र. देशपांडे

चं. प्र. देशपांडे ह्यांचे आवर्तने हे एक कविंच्यासाठीही आवश्यक वाचन ह्या कॅटेगरीतील पुस्तक आहे कारण देशीवादाच्या गदारोळात आधुनिक अस्तित्वभान देण्याचा प्रयत्न ते करतं . मराठीत श्रद्धेय परंपरा , काल्पनिक पुराण व पुरोगामी इतिहास ह्यांची सद्या इतकी झुंबड उडालीय कि मराठीत व भारतातही आधुनिकता शोधणारा एक प्रवाह आहे ह्याचा सगळ्यांना विसर पडलाय मराठीत ही आधुनिकता मर्ढेकरांनी आणली हे सर्वमान्य आहे आणि चं प्र नीं

निवडलेल्या कवितांची सुरवात मर्ढेकरांच्यापासून केली आहे त्यांची दिशा इथेच स्पष्ट होते मराठीत विंदा करंदीकर , गंगाधर गाडगीळ , अरविंद गोखले , सदानंद रेगे , प्रभाकर पाध्ये , विलास सारंग , वसंत डहाके ,विजय तेंडुलकर , महेश एलकुंचवार , गुरुनाथ धुरी , गुरुनाथ सामंत, वसंत पाटणकर ह्यासारख्या अनेकांनी आधुनिकता धगधगती ठेवली काही लोक आधुनिकता आणि पुरोगामी रोमँटिसिझम ह्यांच्यात लोम्बकळते राहिले जसे आरती प्रभू (ह्यांनी सर्वांचीच गोची करून ठेवलीये ) ग्रेस व पु शि रेगे ह्यांनी सौन्दर्यवादाचा झेंडा फडफडत ठेवला अनेक आधुनिक कवींची सुरवात रोमँटिसिझमने झाली असली तरी ते पुढे आधुनिक झाले उदा सदानंद रेगे तर दिलीप चित्रे (कविता व ऑर्फियस हा कथासंग्रह शिबा राणीच्या शोधात हे आत्मकथन वा आत्मकादंबरी )व अरुण कोलटकरांचे (अरुण कोलटकरांच्या कविता ) हे पहिले संग्रह आधुनिक व नंतरचे देशीवादी आहेत

चं. प्र. देशपांडे हे अस्तित्ववादी आधुनिक धारेत मोडतात व शेवटी ज्याला मी ॲब्सर्ड अस्तित्ववाद म्हणतो तिथे पोहचतात ज्या पॉल सार्त्र , ईजीन आयनेस्को , सॅम्युएल बेकेट , हेराल्ड पिंटर , अल्बेयर काम्यू , फ्रान्झ काफ्का ह्यासारख्या अनेकांनी ही धारा समृद्ध केली आहे चं. प्र. देशपांडे ह्यांनी ही धारा आत्मसात करत पुढे वाटचाल केली आहे आणि डायलन थॉमसच्या काव्यविचाराची त्यात भर टाकून त्याला एक दिशा दिली आहे

संपूर्ण पुस्तकात एक गोष्ट जाणवते ती म्हणजे मराठी आधुनिकता , कविता आणि तिचे खुजेपण हा त्यांच्या चिंतनाचा विषय आहे ते अतिवास्तववाद व अमूर्तता ह्यांची चर्चा करतात त्यांचा अंतिम निष्कर्ष मात्र मर्ढेकरी आधुनिकवादाला साजेसा आहे मर्ढेकर आधुनिक कलावादी होते तसेच चं. प्र. देशपांडे आहेत मात्र मर्ढेकर ॲब्सर्डिटीच्या अमूर्ततेत गटांगळ्या खात नाहीत कदाचित त्यांच्या काळात अशा गटांगळ्या अस्तित्वात नसाव्यात पण चं. प्र. देशपांडे ह्यांच्या पिढीत त्या अस्तित्वात आल्याने चं. प्र. देशपांडे ह्यांना मात्र ह्या गटांगळ्यांच्या खोलात जावेसे वाटले असावे संपूर्ण पुस्तकात एक प्रकारचा रॅन्डमनेस आहे जो अब्सर्ड अस्तित्ववादाला साजेसा आहे एका अर्थाने ही बेकेटियन शैलीची मांडणी आहे पण त्यात अचानक रोमँटिक लोकसुद्धा घुसलेले दिसतात चं. प्र. देशपांडे ह्यातून वैयक्तिक आवड म्हणून सुटका करून घेतात पण चं. प्र. देशपांडे ह्यांना आपण वाचक म्हणून सुटका करून का द्यावी कारण नाही म्हंटले तरी कलावादात हे सर्व बसत असले तरी ते खटकत राहते

त्यांनी नव्वदोत्तरी कवींचाही केलेला समावेश हा ते अपडेट असल्याचा पुरावा आहे कविता दशकाची ह्या ग्रंथालीच्या पुस्तकातले काही कवी इथे आहेत ज्यांना आजकाल ऐंशोत्तरी म्हंटले जाते संतोष पवार , नितीन वाघ ह्यांच्यासारखे कवी ह्यात नसणे हे खटकते

काही इन्साईद्ध खास चं. प्र. देशपांडे स्टाईलमधल्या आहेत उदा तुकारामाच्या बीज भाजुनी केली लाही ह्या अभंगांचे त्यांनी केलेले अर्थनिर्णयन ! किंवा कवितेला प्रचार बनवू पाहणाऱ्या प्रचारवाद्यांच्यावर त्यांनी केलेले हल्ले मला त्यांच्या प्रस्तावनेतील सर्वात आवडलेला भाग कवितेची मंत्रशक्ती हा आहे मराठीत भारावून टाकणे ह्या गोष्टीचा विलक्षण गवगवा आहे तिचा भांडेफोड चं प्र नीं छान केला आहे

माझ्या कवितांचे त्यांनी केलेले अर्थनिर्णयनही मला चकित करणारे वाटले (पॉझिटिव्ह अर्थाने )मी माझ्या कविता लिहितो आणि मोकळा होतो जास्त विचार करत बसत नाही पण तरीही आपल्या कवितेकडे असेही बघता येते हे मला नवीन होते त्यासाठी मी त्यांचे आभार मानतो

एकंदरच पुस्तक नक्कीच किमान एकदा तरी वाचावे असे आहे . वर्णमुद्रां प्रकाशनाची पुस्तके दिसायला देखणी असतात हे पुस्तकही  दिसायला देखणे आहे त्यामुळे एक वाचक म्हणून त्यांचेही आभार
श्रीधर तिळवे नाईक

आदरणीय मित्रवर्य दा. गो. काळे यांचा प्राथमिक अभिप्राय -- ( सविस्तर अभिप्रायाची वाट पाहात आहे -- )
" तंबाखूची टपरी " चंप्रंचे नव्या अनुवादकांसाठी अनुसर्जनाचे गोल्डन गेट.

चं.प्र.देशपांडे यांचा मी अत्यंत आभारी आहे.हा सगळा ऐवज www.champralekhan.com या संकेतस्थळावर विनामूल्य उपलब्ध असताना मला पुस्तकाच्या रूपात उपलब्ध करून दिल्याबध्दल.त्यांच्या या प्रेमाचा,उदारपणाचा मला फायदाच झाला. कारण मी फारसा टेक्नोसेव्ही नाही.आणि माझे इंग्रजी भाषेचे वाचनही नसल्यासारखेच आहे.त्यादृष्टीने हे संकलन माझ्यासाठी तंबाखूच्या टपरीसारखे आहे.कविता वाचायची तलफ आली तेव्हा या पुस्तकातील सहजपणे उघडले जाणारे पान मी वाचण्याचा प्रयत्न करतो.त्यातील अनुसर्जनाची रित कमालीची आपल्या मातीत रूजवून पुन्हा उगवल्यासारखी वाटते.त्यातील कविंच्या अनुभवांचे स्तर जगण्यातील सूक्ष्मतीसूक्ष्म जीवन-जाणिवांनी वेढलेले असले तरी,चंप्र यांनी त्या अनुभवांना दिलेला भाषिक स्वर माझ्यासारख्या नव्या नवलाईने वाचणा-या वाचकांसारखा साधा सरळ आहे.मी त्या भाषिक अनुव्यवहाराच्या प्रेमात पडलो आहे.मला त्यात आत्मीयतेचा एक सांधणारा दूवा वाटतो.जगाच्या पार्श्वभूमीवर चाललेल्या कवितेच्या घटितांशी जोडणारा दुभाषी वाटतो.हे माझ्या बाबतीत तरी खरे आहे.

कारण मी पहिल्यांदा अनुवादीत कविता १९८५ च्या दरम्यान वसंत दावतरांच्या ' आलोचना ' या नियतकालीकात वाचल्या.तो अंक बहुतेक भारत भवन,भोपाळ यांनी आयोजित केलेल्या कविता वाचनाच्या सत्रावर केलेला होता.त्या कविता वाचनात दिलीप पुरूषोत्तम चित्रे,अरूण कोलटकर व नामदेव ढसाळ यांचा समावेश होता.त्यांच्या इंग्रजी कविता व त्या कवितांचे अनुवाद सोबत सोबत छापलेले होते.त्या वाचनात खूप मला आली होती.नंतर मला वाटते,राजीवने संवाद मध्ये अरूण कोलटकरांच्या जेजूरी मधील कवितांचे काही अनुवाद प्रसिद्ध केले होते." जेजूरीतील एका दगडावर ढुंगण टेकविणा-या माणसाच्या आशयाची कविता आहे.बोचा (ढुंगण) दगडावर टेकवल्यानंतर अंडाला होणारा दगडी दंवट स्पर्श असे मजेशीर आपल्या बोलीभाषेला समांतर जाणारे अनुवाद वाचनात आले.भविष्यात आपल्याला असे काही वाचायला मिळावे म्हणून मी विश्व कवितांचे हिंदीतील खंड विकत आणले.परंतु त्यात माझे मन रमले नाही.मी माझ्यातच त्या कवितेला न भिडण्याचे न्यूनगंड शोधत राहिलो ते तंबाखूची टपरी हातात येईपर्यंत.या सगळ्या पार्श्वभूमीवर मला जाणवले ते असे,थेट अनुवाद असो की,अनुसर्जनाची कृती असो अनुभवाला जोडणा-या भाषा व्यवहारापर्यंत कलावंताला जाता आले पाहिजे.(तुर्त ही पुस्तक मिळाल्याची व चाळल्याची आनंदी पोंच आहे.)
दा.गो.काळे

Girish Rangnekar is with Champra Deshpande.

गिरीश रांगणेकर हा माझा एक जुना मित्र आहे. पूर्वी तो ' व्यक्त-अव्यक्त ' नावाचे एक मासिक काढत असे, त्याचा मी एक सल्लागार होतो. त्याने आपुलकीने पाठवलेला अभिप्राय ---

•

'आवर्तनें : कविता, आशय, आकलन' -  चंप्र देशपांडे

 ‘आवर्तनें' या आशयसमृद्ध  पुस्तकामधून चंप्र देशपांडे सरांनी मराठीतल्या निवडक कवींच्या कवितांच्या अनुषंगाने कवितेचा आशय आणि आकलन याची अतिशय असोशीने मांडणी केली आहे. 'तंबाखूची टपरी' या काही महिन्यांपूर्वी आलेल्या त्यांच्या आणखी एका महत्त्वाच्या पुस्तकाने साहित्यातले नोबेल अथवा पुलित्झर पुरस्कार प्राप्त निवडक कवी आणि त्यांच्या कवितांची मराठी वाचकांना ओळख करून देण्याचं मोलाचं काम केलेलं होतं. पिढ्यानपिढ्या आपल्या मनःपटलावर कविता या साहित्यप्रकाराविषयी सरधोपट, बंदिस्त, राजवर्खी चौकट रुतून बसलेली आहे. या चौकटीला छेद देण्याचं काम 'तंबाखूची टपरी' नं अगदी बिनधास्तपणे केलं होतं. त्यानंतर चंप्रंचा लगोलग पुढचा असाच भव्य सर्जनशील अविष्कार म्हणजे ‘आवर्तनें : कविता, आशय, आकलन’ हे पुस्तक होय! मजकुराच्या मर्यादा ओलांडणारे भान कविता देते. आणि अशी कविता कोणत्याही साहित्यप्रकारात असू शकते. म्हणूनच 'वेटिंग फॉर गोदो' नाटक देखील एक कविताच असते असे चंप्र ‘आवर्तनें’ पुस्तकात म्हणतात. त्या अर्थाने ‘आवर्तनें’ पुस्तक देखील कवितेविषयीचे जणू एक महाकाव्य आहे!  चंप्रंनी स्वतःच पुस्तकासाठी प्रस्तावना लिहिली आहे आणि ती आहे तब्बल १०० पानी! खरेतर नवकवींचे २-३ कविता संग्रह एवढ्या पानांत छापले जातील.  या २५० पानी पुस्तकाने आरती प्रभू, बा. सी. मर्ढेकर, पु. शि. रेगे, सदानंदन रेगे, दि. पु. चित्रे, अरुणा ढेरे, शांता शेळके, वसंत आबाजी डहाके, प्रभा गणोरकर, नामदेव ढसाळ यांच्यापासून ते प्रणव सखदेव, रवींद्र लाखे अश्या नव्या पिढीपर्यंतच्या एकूण ३६ कवींच्या कवितांची लक्षवेधी मांडणी करत धांडोळा घेतला आहे.

जगात खूप साऱ्या कविता सरळ उताऱ्यांतूनदेखील लिहिल्या गेलेल्या आहेत. पुस्तकात छापलेला कवितेचा मजकूर म्हणजे खरी कविता नव्हे. मजकुराच्या दृश्य रूपाच्या बाहेरच कविता असते. अमूर्त चित्रात जसे रंग आणि आकार असतात तसे कवितेत शब्द आणि रचना असतात. अमूर्त चित्रात जर अमुक आकार वा दृश्य ओळखता येण्याची गरज नाही तर कवितेत तसा  विचार वा अनुभव ओळखण्याची गरज काय? अमूर्त कविता का असू नये असा प्रश्न चंप्र पुस्तकातून उपस्थित करतात. चंप्र म्हणतात की बातम्यांवरून वरवर दिसणारे सगळे खरे असतेच असे नाही. दिसते त्यापेक्षा वेगळेच प्लॅन शिजू शकतात आणि त्याचे विश्लेषण करणारे विद्वान निरर्थक ठरत असतात. जगण्यातली ही ऍब्सर्डिटी व्यक्त करणे हे माझ्या कवितेचे एक काम आहे असे ते ठामपणे म्हणतात आणि स्वतः कवी म्हणून असल्या लेखनाच्या उद्योगासाठी ते दिलगिरी देखील व्यक्त करतात. लेखकाची अशी पारदर्शीपणाने आपल्या मतांची स्पष्ट मांडणी हे देखील पुस्तकाचे मोठे वैशिष्ट्य ठरावे.

तुकारामाचा अभंग म्हंटले की त्यातले शब्द लक्षात न घेताही आपण डोलायला लागतो. तुकारामाच्या 'रिकामिक' किंवा 'मागेपुढे अवघा दिसे रिता ठाव' ला आपले विद्वान अध्यात्मिक म्हणून सोडून देतात आणि सार्त्रच्या

नथिंगनेसपुढे गुडघे टेकतात असे परखड निरीक्षण चंप्र 'आवर्तने' मधून नोंदवतात. दिलीप पुरुषोत्तम चित्रेंवरच्या लेखात 'साहित्य आणि अस्तित्वभान-१' हे चित्र्यांचे पुस्तक विद्वत्ता आणि मर्मदृष्टी यांचा प्रचंड आविष्कार असलेले असून अशी पुस्तके मराठीत विरळाच असे चंप्र नमूद करतात. चित्रेंचा 'कवी काय काम करतो' हा लेख मराठीतला अजरामर लेख आहे असं ते म्हणतात. मात्र हे सर्व समजून घेण्यात इंटरेस्ट कोण घेणार? 'आपल्या माती'च्या दिशेने वेगाने जाणारा हा समाज लौकरात लौकर चित्रेंना नामशेष करील" असा उद्वेग देखील ते लेखात व्यक्त करतात. चंप्र चित्रेंची तुलना नेमाडेंशी करतात. टीकास्वयंवर' वाल्या नेमाड्यांऐवजी 'साहित्य आणि अस्तित्वभान-१' वाल्या चित्र्यांना खरे तर ज्ञानपीठ मिळायला हवे होते असे चंप्रंना प्रामाणिकपणे वाटते. पु. शि. रेगे यांच्या कवितेविषयी लिहिताना, रेग्यांनी साहित्याच्या सामर्थ्याचा जो गौरव केला आहे तो चंप्र उद्धृत करतात, तो महत्वाचा आहे. -
'जीवन जगले तर साहित्य जगणार नसून साहित्य जगले तरच जगण्यासारखे काहीतरी उरणार आहे!'
प्रिया जामकरांच्या 'मरणाची प्रॅक्टिस' या कवितेत येणारी गूढता ही भाषेमुळे येणारी नसून आशयाची आहे असं चंप्र सहज लिहून जातात. कवितेने टिकली लावलीच पाहिजे, बांगड्या घातल्याच पाहिजेत, साडीच नेसली पाहिजे अशा कर्मठ अपेक्षा असलेल्या वाचकांना न जुमानता खांडेकर कविता लिहितात असं मार्मिक निरीक्षण चंप्र खांडेकरांच्या कवितेविषयी नोंदवतात. श्रीधर तिळवेंच्या कवितांवर चंप्र लिहितात "अशी ओसंडती भाषा तोच निर्माण करू शकतो ज्याच्याकडे अफाट कल्पनाशक्ती आहे." रवींद्र लाखेंच्या एका कवितेबद्दल लिहिताना "ही कविता सवयीच्या जगण्यावर तिच्या अमर्याद आशयाचा बुलडोझर फिरवते" असे प्रशस्त दृश्यात्मक वर्णन करतात. चंप्र कवितेविषयीच्या आकलनाची मांडणी करताना अशी प्रभावी शब्दयोजना आणि दृश्यात्मकतेचा वापर करून समीक्षेत नेमकेपणा आणतात. असा तजेलदार लेखन प्रतिभेचा प्रगल्भ अविष्कार अनुभवणं ही एक पर्वणी आहे.
आहे ते स्वीकारून त्यातच थोडेफार बदल करत स्वर्ग निर्माण करण्याची स्वप्ने मराठी कविता पाहत असते, तसे डहाकेंच्या कवितेत घडत नाही असे गौरवोद्गार चंप्र वसंत आबाजी डहाके ह्यांच्या कवितेविषयी काढतात. चंप्र लिहीतात, "इथे एकेका ओळीचा अर्थ सांगत जाण्याचे बीजगणित करायचे नाही आहे. कविता म्हणजे काही शब्दकोडी नव्हेत." मनोहर ओक ह्यांची "आरशातल्या आरशात वारले बेवारशी" अशी एक एकाच ओळीची कविता आहे. त्यावर कणाकणाचा अर्थ सांगत बसण्याचे मी पाप करणार नाही, मेलडी खाओ और खुद जान जाओ अशी मिश्किल टिपण्णी चंप्र करतात.
मन्या जोशी ह्या कवीविषयी लिहिताना चंप्रंची भाषा काव्यात्मक होते. हा तर आजच्या पिढीचा जादूगार कवी आहे. चार चार चेंडू हवेत उडवत-झेलत राहण्याची भाषिक किमया याच्याकडे आहे. कवितेची ही अशी भाषा मराठीत तरी मी पहिल्यांदाच पाहतो आहे. राहुल पुंगलियांच्या 'सरडा' या कवितेची तुलना चंप्र स्वतःच्या 'खेकडा' या कविताशी करतात. चंप्र म्हणतात - "तिकडे मनाचा सरडा होता तर इथे मनाचा खेकडा आहे. दोन्ही ठिकाणी आपल्या अस्तित्वाच्या मुळाला भिडणे आहे. आणि हेच तर असते कलेचे उत्तुंग कार्य!"
अनेक आशयघन कविता आपल्याला पुस्तकातून भेटतात आणि अपूर्व आनंद देतात -
दिवे - अरुण कोलटकर
काहीतरी कुजल्याचा वास यायला लागला

अन मी खिशातनं रुमाल काढणार
तोच माझी करंगळी खाली पडली
ती मी दुसऱ्या हातानं उचलून घेतली
अन रुमाल नाकावर धरणार
तर नाकच निसटून रुमालात आलं
ते रुमाल गुंडाळून मी खिशात टाकलं
काहीतरी कुजल्याचा वास येतच होता
म्हणून खिशातल्या खिशात नाक मुरडलं
अन करंगळीत आळ्या पडल्यात की काय
ते बघणार : पण तेवढ्यात दिवेच गेले

'दिवे' कवितेविषयी चंप्र लिहितात - कुजल्याचा वास, करंगळी, नाक, दिवे या सगळ्या प्रतिमा तर आहेतच पण ही पूर्ण कविताच एका सखोल प्रश्नाची प्रतिमा होते. कविता म्हणजे एसटीचे टाईमटेबल नसते. तिच्यातून अनेक अर्थवलये निघत असतात. कवितेचा एकच एक अर्थ अपेक्षिणे म्हणजे कविता नाकारणेच होय. चांगल्या कलाकृती एकदा 'कळून' संपत नाहीत!

क्षण - मलिक अमर शेख

जपमाळ घेऊन बसावी
तसे हे जख्ख म्हातारे पांढरे क्षण
मी सरकली जातेय मण्यांप्रमाणे
थंडगार, अलिप्त, वेळेच्या बोटातनं
केवळ सवयीनं निरर्थक

'A good poem is a contribution to reality. The world is never the same once a good poem has been added to it. A good poem helps to change the shape of the universe, helps to extend everyone's knowledge of himself and the world around him.' -

'आवर्तने' पुस्तकातला हा मजकुर 'तंबाखूची टपरी' आणि 'आवर्तने' या दोन्ही पुस्तकांना अगदी तंतोतंत लागू आहे. अशी अभ्यासपूर्ण पुस्तके फक्त कवितेचेच नव्हे तर आपल्या समग्र जगण्याचे देखील भान वाढवतात. एखाद्या संपूर्ण साहित्य प्रकाराविषयी वाचकाचा दृष्टिकोन विस्तीर्ण करणाऱ्या अश्या पुस्तकांविषयी चर्चा व्हायला हवी, अश्या लेखनाचा यथोचित सन्मान व्हायला हवा. त्याचाच एक भाग म्हणून 'आवर्तने' आणि 'तंबाखूची टपरी' या दोन्ही पुस्तकातल्या एकूण निवडक २५ कवितांच्या अभिवाचनाचा कार्यक्रम करण्याचा माझा मानस आहे. चंप्रंनी त्यासाठी अतिशय समर्पक नाव देखील मला सुचवलं आहे - 'कवितेचा क्रॅश कोर्स!''

'आवर्तने' वर्णमुद्रा पब्लिशर्सने प्रकाशित केले असून चंद्रमोहन कुलकर्णींचे आकर्षक मुखपृष्ठ त्याला लाभलेले आहे.

डॉ. गिरीश रांगणेकर

हा उतारा ( दोन्ही अर्थांनी ) ग्रेटच ग्रेट आहे ! प्रत्येक साहित्य संमेलनाच्या प्रवेशद्वारावर हा ढळढळीतपणे लावला जायला हवा ! मराठीत डॉक्टरेट करणाऱ्या प्रत्येकाला हा उतारा पाठ करणे बंधनकारक असावे !

Rahul Pungaliya is with Sanjeev Khandekar and 6 others

.

मराठी साहित्यिक सांस्कृतिक विश्वाची तोंड ओळख

मराठी सुसंस्कृत साहित्यिक धाटणीचे लोक सनातनी पुरोगामी म्हणवता येतील .यांच्या सनातनत्वाचा पार्श्वभूमीवर हिंदुत्ववादी देखील प्रायोगिक पुरोगामी ठरतील! धर्माची काडीची कल्पना नसल्यामुळे हे स्वतःला निधर्मी समजतात. विज्ञानाच्या मर्यादा आणि परिणाम देखील समजत नसल्यामुळे हे विज्ञानवादी ,अंधश्रद्धा विरोधी असतात. लब्धप्रतिष्ठित वरिष्ठ, कनिष्ठ, मध्यमवर्गातले असल्याने व्यवस्था अबाधित राहण्यात यांचे हित आहे. त्यामुळे त्यांचा क्रांतिकारी मार्क्सवादाला विरोध आहे. तो विरोध मार्क्सवादाला नसून हुकूमशाहीला आहे, असा पळपुटा युक्तिवाद ते नेहमीच करत आले आहेत.

साहित्य आणि कलांचे पूर्ण अज्ञान. त्यातील क्रांतिकारी शक्यता जितक्या बोथट करता येतील,वगळता येतील असा दुष्ट हेतू असल्यामुळे. हे आपल्याला परवडेल अशी मध्यमवर्गीय स्वच्छंदतावादी माफक विद्रोही मानवतावादी सर्व समावेशक दृष्टिकोन असलेल्या कलेला जोपासतात. अर्थातच ती कला नुसतीच सुमार नसते, तर ती तेलकट, गुळगुळीत आंजारणारी गोंजारणारी आणि आपल्या योग्यतेची आपल्याला खात्री देणारी असते. थोडक्यात ती नारसीस्टीक आत्मलुब्ध कला असते .

शहरी मध्यमवर्गाची ही कला आणि संस्कृती, समाजातील सर्व स्तरांना वेचक प्रतिनिधित्व देत असते. शहरी मध्यमवर्गात आता सर्वच जाती-जमाती स्त्री पुरुष यांचा भरणा असल्यामुळे सगळ्यांच्याच सोयीचे हे सांस्कृतिक अवकाश आहे. एकमेकांचे कौतुक करत, सततचा उत्सवी कोडगेपणा ही यांची भावनिक ओळख आहे. यांची 'विद्रोही' लोकशाही मूल्यांची  मागणी ही देखील गंमतीजमतीची आणि जाता जाता कॅज्युअली करायची बाब आहे. बाकी गुंतवणुकी, फार्म हाऊस जीवनशैली या गोष्टींमध्ये यांच्यात आणि यांच्या कट्टर राजकीय विरोधकांमध्ये काडीचा फरक नाही. त्यामुळे हिंदुत्ववादी जसे दलित विचारवंतांना सामावून घेतात ,सांभाळून घेतात तसेच पुरोगामींना देखील सांभाळून घेतात. त्यांच्यातील विरोध लटकाच राहतो. थोड्या थोड्या वर्षांनी काही व्यक्तींचे स्तोम माजवणे बडेजाव करणे, थोडक्यात हिंदी सिनेमामधले जसे हिरोगिरीचे कल्चर आहे, त्याच पद्धतीचे हे साहित्यिक सांस्कृतिक हिरोंच्या अवतीभोवती असलेल्यांचे कोंडाळे असते.कधी पुल कधी नेमाडे कधी अवचट तर कधी कमल देसाई आणि ढसाळ आणि असे अनेक या यादीत समावेश करता येण्याजोगे

आहेत. या विश्वाची सांस्कृतिक सहनशीलता शून्य आहे. वेगवेगळ्या प्रकारची सेंसरशिप ,यामध्ये सेल्फ सेंसरशिप देखील इथे कार्यरत असते. हिंदुत्ववाद्यांच्या हुकूमशाही बद्दल बोलण्याचा नैतिक अधिकार यांना नाही. इथे चांगली अस्सल कला फळणे फुलणे जवळजवळ अशक्य आहे. ---- राहुल पुंगलिया.

मराठीच्या प्राध्यापकाची कधी टेस्ट घ्यावीशी वाटली तर त्याला एकच प्रश्न विचारा -- केशवसुतांच्या वडिलांचे नाव काय ?

समकालीनता

मराठी साहित्यात वास्तववाद म्हणजे अजूनही सर्वेसर्वा आहे. काय म्हणावा वास्तववादाचा अर्थ ? बदलत्या भौतिक परिस्थितीवर आधारित असणे ? जुन्या काळातले अनुभव असले तरीही ते ' दिसणाऱ्या ' माहितीरूप निवेदनातून येणे, असेही एक असेल. पण, मुख्यत: वास्तव हे, जुने असो वा नवे, ते लेखकाच्या प्रतिक्रियेसहच येते. हे लक्षात घेतले तर अमुक एक वास्तव म्हणजे वास्तव, असे म्हणता येत नाही. आज लिहिणाऱ्या प्रत्येक लेखकाचे वास्तव वेगळे असते. आज लिहिणाऱ्या दोन चांगल्या लेखकांचे उदाहरण घेऊ. प्रणव सखदेव आणि रवींद्र पांढरे, हे लेखक बघा. त्यांच्या लेखनाचे अनुभवद्रव्य म्हणा की दिसणारी माहिती म्हणा, ही खूपच वेगळी आहे. याच पद्धतीने प्रत्येक लेखकाचे वास्तव वेगळे असते. हे लक्षात न घेता साहित्याची समकालीनता ही संकल्पना काहींना मूल्यात्मक वाटते, असे दिसून येते. एका ढोबळ अर्थाने प्रणव सखदेवच्या साहित्यात समजा समकालीनता आहे, असे आपण म्हटले, तर, जेव्हा कृत्रिम बुद्धिमत्तेच्या प्रभावाचा काळ येईल तेव्हा ते साहित्य कालबाह्य समजावे लागेल का ? हा एक प्रश्न तर आहेच पण काही अधिकच हेकट आणि संकुचित कल्पनाही दिसतात. समकालीन वास्तव हे लेखकाच्या मतासह, भूमिकेसह यायला हवे, ही ती कल्पना. म्हणजे आजच्या लेखनात, उदाहरणार्थ, मोदींच्या हुकूमशाहीबाबत राग वा विरोधकांच्या पोटदुखीबाबत कीव व्यक्त व्हायला हवी. इथे, एक सुचवायचे आहे की या सर्व कल्पना संकुचित, साहित्याला रटाळ करणाऱ्या आहेत.

जयंत पवार हे माझे मित्र होते, पण, त्यांचे विचार मला पटत होते, असे नव्हे. त्यांनी असा एक प्रश्न मांडला होता की वास्तव आता इतक्या वेगाने बदलते आहे की ते लेखकाला समजून त्याच्या लेखनातून व्यक्त होईपर्यंत जुने होते आहे ! मुळात, आधी वास्तव समजून घ्यायचे आणि मग ते आपल्या प्रभावासह मांडायचे – ही साहित्याची कल्पनाच खोटी आहे. प्रत्येकाचे वास्तव वेगळे असते याचा अर्थच वास्तव समजणे असे काही सत्य अस्तित्वात असू शकत नाही. आणि साहित्य म्हणजे स्वमतयुक्त वास्तवाची मांडणी किंवा त्या त्या काळाचे डॉक्युमेंटेशन वा दस्तावेजीकरण हे पटण्यासारखे नाही. दस्तावेजीकरण आता इतर अनेक मार्गांनी होत असते, ती जबाबदारी आता साहित्याने झटकायला हरकत नाही.

आपण वास्तव समजून घेण्यासाठी वा ते नोंदण्यासाठी साहित्यनिर्मिती करतो वा साहित्याच्या संपर्कात येतो ही समजूतच मुळात फार थिटी आहे. ऐतिहासिक वा पौराणिक कलाकृती, शेक्सपियरची नाटके, कोणत्याही इतर प्रांतांतली वा देशांतली नाटके आपण का वाचतो वा पाहतो ? त्यात वास्तवनिरपेक्ष आणि लेखक-निरपेक्ष अशी मानवी जगण्याच्या भानाची प्रक्रिया असते म्हणून. आणि हे जगातल्या सर्वच मौल्यवान साहित्याबाबर खरे आहे. वास्तव कोणते आहे, अनुभव कोणता आहे याला महत्त्व देण्याच्या बालिशपणामुळेच काहीजण असे समजतात की निव्वळ अनुभव धारावीतल्या जगण्याचा असल्यामुळेच काही साहित्य एखाद्या मध्यमवर्गीय अनुभवक्षेत्र असणाऱ्या साहित्याहून महत्त्वाचे असते.

माझे एक नाटक सत्तरच्या दशकातल्या हिंदी सिनेमाच्या खोट्या, रचित डोलाऱ्यातून घडत जाते. एकजण म्हणाले की आता ते आजच्या काळाशी मॅच होत नाही तर दुसरे एकजण म्हणाले की हे कधीही ‘ आजचे ‘ असणारे नाटक आहे. एक-दोन नाटकांत युनियन-मॅनेजमेंट संघर्षाचे वातावरण आहे – एकजण म्हणाले की आता कुठे उरलाय युनियनबाजीचा काळ ? त्याच्याहून किरकोळ उदाहरण म्हणजे माझ्या एका नाटकातल्या काळात फक्त लँड लाइन फोन होते, मोबाइल नव्हते ! म्हणजे गेले ते नाटक रद्दीत ? असे होत नसते. कलेचा प्रमुख सर्जक प्रवाह म्हणजे काय, हा प्रश्न स्वत:ला विचारला पाहिजे.

--- 000 ---

" Hell is other people. " म्हणजे, " नरक म्हणजे इतर माणसे " -- हे सार्त्रच्या ' नो एक्झिट ' या नाटकातल्या एका पात्राचे वाक्य आहे. याबद्दल विचारले असता सार्त्र म्हणतो, " But that’s only that side of the coin. The other side, which no one seems to mention, is also “Heaven is each other.” … Hell is separateness, uncommunicability, self-centeredness, lust for power, for riches, for fame. Heaven, on the other hand, is very simple—and very hard: caring about your fellow beings. " थोडक्यात, अलगता हाच आहे प्रश्न.

या संदर्भात, जे. कृष्णमूर्तींचे हे वाक्य बघा -- " The other is you. " म्हणजे, दुसरा वा इतर माणूस तुम्हीच आहात. ( ' A World In Crisis ' पान 2. )

दोघेही कदाचित एकच सत्य सांगत असावेत.

--- 000 ---

राम पटवर्धन

साक्षेपी, विचक्षण, विदग्ध, बहुश्रुत असे सर्व एखाद्या अत्युत्तम संपादकाला शोभतील असे शब्द लावावेत असे संपादक होते राम पटवर्धन. ‘ सत्यकथा ‘ या मराठीत इतिहास घडवणाऱ्या मासिकाचे संपादक. सत्यकथेकडे येणारे साहित्य वाचून त्यातले नेमके निवडून या मासिकातून सादर करणे हे साधे काम नव्हते. सत्यकथेबाबत काहीही असू देत वाद-प्रवाद, नारायण सुर्वे यांची, ‘ माझे विद्यापीठ ‘, आरती प्रभू आणि दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांच्या अनेक कविता, गुरुनाथ धुरी यांची ‘ वाघ ‘ ही कविता, आणि मराठीतल्या महत्त्वाच्या ठरणाऱ्या अनेक कथा, एकांकिका, ललित लेख आणि समीक्षा लेख, आणि सौन्दर्यशास्त्रावरचेही काही मौल्यवान लेख, हे सर्व सत्यकथेतून आलेले होते, हे विसरता येणार नाही. न स्वीकारार्ह वाटल्यास, करंदीकर, कुसुमाग्रज यांचे लेखनही ‘ साभार परत ‘ देणारे मासिक असा त्या मासिकाचा दबदबा होता. त्या काळात, आपल्या चार ओळी तरी सत्यकथेत याव्यात अशी अनेक लेखक-कवींची महत्त्वाकांक्षाच असे.

मी एक नवखा कॉलेज विद्यार्थी असताना माझी पटवर्धनांशी ओळख झाली होती. आमचे सर प्रा. शंकर वैद्य यांच्या घरी, तेंडुलकरांच्या ‘ एक हट्टी मुलगी ‘ या नाटकाचे वाचन होते, त्या प्रसंगी सरांनी मलाही यायला सांगितले होते.

तिथेच राम पटवर्धन, शांता शेळके आणि चिं. त्र्यं. खानोलकर यांच्याशी माझ्या ओळखी झाल्या. माझ्या कविता पटवर्धनांकडे आणि एकांकिका तेंडुलकरांकडे वैद्य सरांनीच वाचायला दिल्या होत्या. त्यातूनच पुढे, ' झुंजुन गेल्या सरी ' ही माझी कविता सत्यकथेत आली. नंतर काही एकांकिकाही आल्या. त्या काळात अनेकदा खानोलकरांसह माझे सत्यकथेच्या ऑफिसात जाणे-येणे होई. खानोलकर आणि मी दोघेही मालाडकरच असल्याने ते जमून जाई. मराठीतल्या या एवढ्या प्रतिष्ठित मासिकाचे कार्यालय साधे आणि लहान म्हणावे असेच होते. तरीही तिथे कधी कधी करंदीकर, पाडगावकर, खानोलकर अशी मंडळी जमत. अशा एकदोन मैफलींचे भाग्य मलाही लाभले होते. राम पटवर्धनांबरोबर होणारे या लोकांचे संवाद खास म्हणावेत असे असत. हा सगळा संपर्क आणि अनेक लेखक-कवींशी होणारा साधक-बाधक विचारांचा पत्रव्यवहार संभाळून पटवर्धन सत्यकथेचे दर्जेदार अंक घडवत असत. परिपूर्ण मुद्रितशोधन, उत्तम मांडणी आणि नावीन्यपूर्ण मुखपृष्ठे ही सत्यकथेची वैशिष्ट्ये होती. सत्यकथेचे दिवाळी अंक तर खास असत. त्यांनी काढलेला खानोलकरांच्या ' एक शून्य बाजीराव ' या नाटकावरचा विशेषांक तर सलाम ठोकावा असा होता.

पुढे मी नोकरीनिमित्त मुंबई सोडल्यानंतर माझे पटवर्धनांना भेटणे फारसे घडले नाही. पण एकदा, सांगली आकाशवाणी केंद्रात माझ्या एका मुलाखतीसाठी मी गेलेलो असताना मला पटवर्धनांचा ठाण्यातला पत्ता तिथे एकाकडून मिळाला. त्या पत्त्यावर जाऊन मी त्यांची भेट घेतली होती. अत्यंत साधी राहणी आणि तीच जुनी आपुलकी !

माझ्या काही कविता, एकांकिका वाचून आलेली पटवर्धनांची पत्रे मी जपून ठेवली होती. अत्यंत अपवादात्मक अशी ही व्यक्ती होती.

काल त्यांचा स्मृतिदिन होता. 2014 साली त्यांचे निधन झाले होते. शेवटी त्यांचे आयुष्य ते जगाच्या एका कोपऱ्यात व्यतीत करत होते. त्यांच्याबद्दल अनेकांना अतीव आदर होता आणि राहील.

त्यांच्या स्मृतीस मन:पूर्वक सादर अभिवादन !

--- 000 ---

रोमन लिपीत मराठी लिहिणाऱ्यांपेक्षा देवनागरीत इंग्लिश लिहिणारे परवडले !

Padmanabh Pathak तू असे म्हणतोस पण दुसरे काही मित्र म्हणतात की स्वत:ची टिमकी वाजवायला शिका जरा, नाहीतर कुणी ढुंकून दखल नाही घेणार तुमची ! यावर मी, ' कभी हां, कभी ना ' असे करत राहतो ! त्यातही, ' लहानपण दे गा देवा ' ही रणनीतीही चांगली असते, असा माझा अनुभव आहे ! या सगळ्याचे बेमालूम बॅलन्सिंग करत चालायचा माझा प्रयत्न असतो ! पण हे प्रयत्न मी फार गांभीर्याने नाही करत !

Gautam Ainapure ते जाऊ द्या सगळे -- कदाचित देवनागरी हा शब्द तुम्हाला आवडणार नाही, पण, इलाज नाही, आपल्या लिपीत लिहायला लागा की आता ! काही वर्षे झाली तुम्हाला ही विनंती करून !

अत्यंत उत्तुंग आहे हा लेख ! ग्रेट ! मराठीत याची ताबडतोब विल्हेवाट लावायचे प्रयत्न होतील. आपल्या विचारात जे बसत नाही ते फालतू -- हे इथले प्रस्थापित सत्य आहे ! टिंगल-टवाळ्या आणि शेरेबाजी हेच या लेखाचे भवितव्य असेल. " बुध्दीवाद विवेकवाद किंवा पुरोगामीपणा वगैरेंच्या बळावर एबस्ट्रॅक्शन नाकारलं जातंय. " -- हे तुमचे वाक्य हे इथले एक गलिच्छ सत्य आहे ! इथल्या कलाक्षेत्राचे मुख्य कार्य म्हणजे सर्व सांस्कृतिक प्रवाह मातीत घालत राहणे, हे आहे. सवयीचे, रद्दड, रटाळ असे ' नवे नवे ' अभिव्यक्त करत राहणे, एवढे इथे बास आहे. -- हे असे खरे तर बोलू नये, पण, लेख खूपच आवडल्याने चुकून बोलले गेले आहे. त्यामुळे, इथेच, सॉरी म्हणून मोकळा होतो ! (रवी लाखे )

फारच चांगले परीक्षण ! मराठीत चांगले नाट्यसमीक्षक वा एकूणच समीक्षक यांबाबत एक पोकळी आहे -- ती भरून काढण्याचे काम बऱ्याच प्रमाणात तू करू शकशील ! गांभीर्याने मनावर घ्यावे ! ( काठपदर वर गिरीश पतके. )

Ramesh Aundhkar कशाबद्दल ? मुळात हा संवाद पुन्हा त्याच अटीतटीने चाललेला आहे. ही पोस्ट त्या अंगाने लिहिलेली नाही. इथे आलेल्या कोमेन्टची मी दखल घेतो म्हणजे ते मला मान्य असते असे नव्हे. त्यामुळे ' तुम्ही पण ? ' असे तुम्ही का म्हणत आहात ते कळले नाही.Ramesh Aundhkar इथे अनेक कॉमेंट मला न पटणाऱ्या आहेत -- सहभागी होणाऱ्यांकडे दुर्लक्ष केले असे होऊ नये म्हणून -- दखल घेणे या अर्थी मी लाईक करत असतो. हे मी माझ्या सर्वच पोस्टवर करतो. मुकुंद कुळे यांनी तुम्हाला असे म्हणणे किंवा कुणीही कुणालाही तर ते चर्चेचे गांभीर्य घालवणारेच आहे. मला ते मान्य नाही.एक बाजू घेऊन भांडत राहिल्यास संवाद कसा निरर्थक होत जातो हे या संवादातून कळू शकते.जगातल्या प्रत्येक समस्येवरचे उत्तर समजणारे काही लोक आहेत खरे तर -- त्यांचा प्रभाव का पडत नसावा ही आणखी एक समस्या !अनेकांच्याकडे तेल न लावलेली अनेक दगडी तत्त्वज्ञाने वा प्रणाली आहेत -- ती सर्व मिळून जगणे बरबाद करत आहेत ! की एखाद्यालाच ' सत्य ' वाटणारे आणि हाती पकडता येणारे तत्त्वज्ञान सर्वांनीच आत्मसात केले पाहिजे, असे तुम्हाला वाटते ?तथाकथित धर्माचा साचा आणि विचारसरणीचा साचा हे दोन्ही सारखेच घातक असतात -- हे सगळ्यांनाच कळावे असा विशाल आशावाद बाळगायला हवा !माझ्या वा तुमच्या कुवतीपेक्षा जास्त कुवतीचे आपण काय कसे करू शकणार ?

त्याबाबत मी दुसरी पोस्ट दिलेली आहे.
बाजू घेण्याच्या तथाकथित वैचारिक स्पष्टतेमुळेच तर माणसाच्या जगण्याची बोंब होते आहे, असे दिसले तर तेच कसे करावे ? समस्या समजून घेण्यात आपण एकत्र असू शकतो पण कुणी कुणाला बोध देऊ शकत नाही -- ही माझी स्पष्टता आहे. ( शरद पोंक्षे ).

डाव्यांना दु:खमुक्ती, निर्वाण -- हे चालेल का याची शंका वाटते !

हा उतारा ( दोन्ही अर्थांनी ) ग्रेटच ग्रेट आहे ! प्रत्येक साहित्य संमेलनाच्या प्रवेशद्वारावर हा ढळढळीतपणे लावला जायला हवा ! मराठीत डॉक्टरेट करणाऱ्या प्रत्येकाला हा उतारा पाठ करणे बंधनकारक असावे ! ( राहुल पुंगलिया )

माफ करा, हा लेख वर्णनात्मक आणि मोघम झाला आहे. त्यांच्या एखाद्या कलाकृतीच्या आशयाचा ' मोठेपणा ' म्हणजे काय होते ? एखादा वैचारिक साचा की अधिक खोलातले आकलन ? बाहेर ते काहीही बोलत-वागत असोत, जगण्यातल्या आध्यात्मिक समस्यांचेही त्यांना भान होते. ते नुसतेच ' विचारी ' नाटककार नव्हते, असे वाटते.
( दीपक बोरगावे ).

कोणत्याही काळाला संबोधित करणे यासाठी कला असते असे मला दिसत नाही. कोणत्या तरी काळाचा माल तीत असतो, इतकेच.काळाला संबोधित करतच नाही म्हटल्यावर 22 व्या शतकाचा संबंधच येत नाही. मुळात आजचा काळही प्रत्येकाचा वेगळा असतो, हे वर आलेलेच आहे. असो. मतभेद तर असणार.माफ करा, तुम्ही म्हणता तेच अशक्य आहे -- माझी पोस्ट तुम्ही नीट वाचलेली नाही. आजचा काळ असे काही नसतेच, असे मी मांडले आहे. प्रत्येक माणसाचा काळ वेगळा असतो. काळ म्हणजे घड्याळ नव्हे --मानसिक काळ. प्रत्येक माणसाचा मानसिक काळ वेगळा असतो -- एकाचा 2023 चा, एकाचा 1947 चा असे म्हणता येत नाही. ढोबळपणे मांडायचे झाल्यास, जातवादी पुरोगाम्याचा काळ वेगळा, जाती-अंतवादी पुरोगाम्याचा वेगळा, हिंदुत्ववाद्याचा वेगळा, मुसलमानाचा वा कम्युनिस्टाचा वेगळा -- असे असते. कलावंत एखाद्या भ्रामक, काल्पनिक काळाला संबोधित करत नाही. तो एकूण माणसाला संबोधित करतो. त्याचे माध्यम हे त्याचा काळ असते. त्यामुळे माझा वा तुमचा मानसिक काळ सालनिहाय सांगणे हे भ्रामक असते. ( सुनील तांबे ).

मूर्षा नव्हे, तो शब्द मृषा आहे. ( absurdity ).

मी बऱ्याच वर्षांपूर्वी ' अभिनय ' हा लेख लिहिला होता -- त्यातला, इथे प्रस्तुत असणारा काही भाग --
अशा या पार्श्वभूमीवर आता एक महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो. अतीव दु:खाचा असा प्रसंग सादर करायचा असेल -- त्यात रडायचे असेल -- तर स्वत:च्या व्यक्तिगत जीवनातला एखादा तत्सम अनुभव आठवून रडावे का ? यावर कुणी असेही म्हणेल की एखादा नट तंत्र कसेही का वापरेना, त्याचा अभिनय कसा होतोय तेवढेच आपण पाहावे. ते पाहू, पण यात कायकाय घडेल ते पाहायचे टाळायचेही कारण नाही. याचा अर्थ असा होतो की एखाद्या नटाची आई वारलेली असेल आणि त्यावेळी त्याला खूप रडण्याइतक्या दु:खाचा अनुभव आला असेल तर तो अनुभव, हा नट, अभिनय चांगला होण्यासाठी वारंवार वापरत राहील ! आणि हा त्याचा अभिनय समजून प्रेक्षक त्याला दाद देत राहतील ! दु:ख विस्मृतीत जावे या निसर्गक्रमाच्या विरुध्द तर हे होईलच पण शिवाय ही प्रेक्षकांची घोर फसवणूक होईल. आपण याच्या खऱ्या
दु:खाला ' वाह् ' म्हणालो हे प्रेक्षकांना कळाले तर ?

हाच प्रश्न जरा वेगळ्या प्रकारे पाहू. अमिताभ बच्चन सुपरस्टार होण्याच्या अनेक कारणांपैकी एक महत्त्वाचे कारण हे आहे की त्याने अतिशय हाय-होल्टेज अभिनय केला. गरज पडेल तेव्हा भावनिक तीव्रता तो फारच प्रचंड वाढवू शकला -- जे दुसऱ्या कुठल्या नटाला जमले नाही. मग, असे सीन्स करताना तो कुठल्या आठवणी काढत असेल ? त्याच्या लहानपणी तो असा वागला असेल ? असे असते तर त्याच्या वडिलांना एवढ्या कविता लिहिता आल्या असत्या ?

दु:खाचेच उदाहरण पुढे चालवायचे झाले तर पात्रापात्रागणिक दु:खाच्या तऱ्हा वेगवेगळ्या असतात. एखाद्या वैयक्तित दु:खाच्या त्याच त्या आठवणीवर विसंबून -- असे हे अनेक बारकावे -- सूक्ष्म छटा दाखवणे शक्य होईल ?

लेखक जेव्हा असे प्रसंग लिहितो तेव्हा तो काय करतो ? पात्रांचे वेगळेपण तो स्वत:च्या वैयक्तिक अनुभवाच्या चाकोरीत फिट करून टाकतो ? तसे असेल तर मग नटाच्या अनुभवाच्या वैयक्तिक चाकोरीतून ते कसे व्यक्त होऊ शकणार ? ' असाध्य ते साध्य ' असा हा प्रकार आहे ?

याचे उत्तर अर्थातच ' नाही ' हेच असणार आहे. लेखक असो, नट असो, जगण्याच्या ओघात आलेली ' अनुभवांची समज ' वापरत असतात. प्रत्यक्ष वैयक्तिक अनुभव नव्हे ! आणि ज्याअर्थी एका सीनमधले दु:ख व्यक्त करण्यासाठी कुठलेतरी वैयक्तिक दु:ख वापरता येते याचा अर्थच सगळे दु:ख एकच असते. कोणत्याही दु:खाची समज आली असेल तर इतर कुठलेही दु:ख समजू शकते. दु:ख ही एक निरनिराळ्या कारणांनी निर्माण होणारी मन:स्थिती असते असे म्हणता येईल. अपमानाचे दु:ख आणि आई वारण्याचे दु:ख ही मूलत: वेगळी नसतात. ही ' समज ' असल्यावर वेगवेगळ्या प्रकारचे दु:खही व्यक्त होऊ शकेल. लेखकाचे आत्मचरित्रात्मक नाटक असले तरी नटाच्या बाबतीत हेच खरे असेल. एका एका प्रसंगाला एकाएका प्रसंगाची आठवण हा अभिनयाचा खोटा, अकलात्मक, विकृत प्रकार असून 'समज' व्यक्त होणे हेच अपेक्षित आहे. खऱ्याखोट्यात सतत हेलकावत -- फाटत राहण्याची काहीही आवश्यकता नाही. असल्या तंत्रामुळे अभिनय कसदार होणार नाही. त्यातली सहजता, उत्स्फूर्तता हरवून जाईल. आणि याहूनही सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे नटाच्या स्वत:च्या जगण्याला ही पध्दत हानिकारक ठरेल. ज्या गोष्टी विस्मृतीत जाव्यात असा निसर्गक्रम आहे त्या गोष्टी सतत ताज्या ठेवल्या जातील. जखमा भरून येणार नाहीत.

हे रोमँटिक की माझाच मार्ग बरोबर म्हणणारे रोमँटिक ?

ग्रेट नाट्यपरीक्षण ! हे सखोल लेखन ही एक कलाकृतीच आहे ! ( पुनश्च हरी ओम  वर गिरीश पतके ).

आपल्या मनाचे कंडिशनिंग हा सर्जकतेला अडथळा असतो -- हा त्याचा अर्थ आहे -- त्यातून येणारे सर्व प्रयासयुक्त असते -- आणि मलाही तो अर्थ मान्य आहे. तालमी घ्याव्या लागणे, नेपथ्य उभारावे लागणे -- या मेहनतीचा हा विषय नाही. ती लागणारच.कलावंत जगत येतो, वाचतो, पाहतो, अभ्यास करतो -- ही मेहनत असतेच ना ! तुमचा नेमका आक्षेप काय आहे ते सांगा ना --त्या वाक्याचे पुस्तक आणि पान क्रमांक माझ्याकडे नाही आहे -- ते लक्षात

राहिलेले वाक्य आहे -- ते माझेच धरून चालायला हरकत नाही. ते चुकीचे आहे असे काहींना वाटू शकते. त्याला इलाज नाही.
व्यक्तीच्या कंडिशनिंगमधून होणारी कृती ही सहेतुक, व्यक्तीच्या विचारांनी, मतांनी दिशा दिलेली असते -- सर्जकतेत ही मर्यादा नसते -- हे जगात अनेकांनी वेगवेगळ्या शब्दांत म्हटलेले आहे. तरीही काहींचे आकलन तसे नसल्याने त्यांना ते निरर्थक, चुकलेले वाटू शकते. त्याच्यापुढे चर्चेने एकमेकांना काहीच पटवणे शक्य नसते. कंडिशनिंगची कृती ही ताणयुक्त म्हणून सप्रयास असते. अमुक चुकले आहे असे तुम्ही कितीही स्पष्टपणे म्हटले तरी आपण कुणीही अशा बाबतीत ऑथॉरिटी असू शकत नाही. मी मांडतो आहे तेच बरोबर वा सत्य असा माझा कधीही दावा नसतो. असो. जाऊ द्या -- होऊ शकते असे -- थोडी चर्चा झाली पण हाती काही लागले नाही -- मी काही क्लियर करायचा प्रयत्न केला पण कुणाला काही पटवून द्यायची जबाबदारी मी कधी घेत नाही. असो. रामराम ! ( आभास आनंद ).

मी शंकर वैद्यांचा विद्यार्थी. अनेकदा मी त्यांच्या माटुंगा इथल्या ' आफ्रिका हाऊस ' मधल्या निवासस्थानी गेलो होतो. डॉ. सरोजिनी वैद्य या त्यांच्या पत्नी. त्यांनीच मला आकाशवाणीवरच्या एका विद्यार्थी कार्यक्रमात कविता वाचनासाठी नेले होते. त्यांच्या घरी एकदा मी जेवलोही होतो. त्यांच्या घरी झालेल्या अनेक गप्पा या समृद्ध करणाऱ्या होत्या. त्यांच्या स्मृतीस अभिवादन !

मौल्यवान कथांचे समतोल परीक्षण ! ( रज्जूत मज्जा वरचे लाख्यांचे समीक्षण ).
21-06-23.

चार पुरुषार्थांची चार नाटके
--- प्रस्तावना ---

धर्म, अर्थ, काम, मोक्ष या चार पुरुषार्थांवर चार नाटके लिहावीत असे काही डोक्यात नव्हते. हे कसे घडले ते क्रमाने सांगतो. आधी ‘ सेक्स ‘ ही एकांकिका लिहिली होती. तिचे उत्तम प्रयोग सादर करून ती विनायक पडवळ आणि प्रकाश बुद्धिसागर या माझ्या दिग्दर्शक मित्रांनी गाजवली होती. त्यानंतर गिरीश पतके हा दिग्दर्शक मित्र एक वेगळाच सुझाव घेऊन आला. त्याला या एकांकिकेचा दीर्घांक करून हवा होता. त्याप्रमाणे तो मी केला आणि तो ‘ बुद्धिबळ आणि झब्बू ‘ या नावाने ‘ वलय ‘ या संस्थेमार्फत सादर झाला. तोही बराच गाजला. त्याचे बरेच प्रयोग झाले. त्यानंतर गिरीश पतके आणि दीपक दामले यांच्या विचारातून, याचे पूर्ण नाटक करून ते व्यावसायिक रंगभूमीवर आणावे असे ठरले. त्यालाही मी लेखकीय प्रतिसाद दिला आणि ‘ तुमचं आमचं सेम असतं ‘ या नावाने ते नाटक व्यावसायिक म्हणून सादर झाले.

1996 साली मी स्वेच्छा निवृत्ती घेतली. गणेशोत्सवाचा धिंगाणा आणि धर्म हा विषय बरेच दिवस माझ्या डोक्यात होता. त्याचा आवाका घेणारे ‘ ढोलताशे ‘ हे नाटक लिहिले गेले. विजय केंकरे आणि ‘ आविष्कार ‘ यांच्या याबाबतच्या कृतिशीलतेमुळे ते नाटक रंगभूमीवर आले.

धर्म आणि दु:खमुक्ती या विषयाने तर मी माझ्या शालेय जीवनापासून पछाडलेला होतो. त्याबाबतचे चिंतन आणि जगण्यात घडलेल्या व पाहिलेल्या प्रत्यक्ष प्रक्रिया यांतून ‘ जणू काही वास्तव ‘ हे नाटक लिहिले गेले. तेही गिरीशच्या दिग्दर्शनाखाली ‘ आविष्कार ‘ ने रंगभूमीवर आणले.

एवढे झाल्यावर आले लक्षात की अरे वा, ही तीन तर, अर्थ सोडून इतर तीन पुरुषार्थांवरची नाटके झाली ! मग मात्र, चौकडी पूर्णच करावी या विचाराने, अर्थ या विषयावरचे नाटक लिहायचे ठरवले. इतिहास आणि राजकीय घटनांचे विश्लेषण यांत मला फारसे इंटरेस्ट नसूनही मी इराकच्या प्रश्नाचा अभ्यास केला. काही पुस्तके, लेख आणि नेटवर उपलब्ध असणारे साहित्य वाचले, त्याच्या नोटस काढल्या आणि मग ‘ इराक ‘ हे नाटक लिहिले. ते चेतन दातार, इरावती कर्णिक आणि ‘ आविष्कार ‘ यांनी रंगभूमीवर आणले. अशी ही पुरुषार्थांची चौकडी पूर्ण झाली. ( आता तो अभ्यास आणि त्यातले तपशील माझ्या डोक्यातून गेलेले आहेत. त्यांची सत्यासत्यता वा बिनचूकपणा या गोष्टी तशा अप्रस्तुतही आहेत. तसे तर दोन प्रेसिडेंट एकाच पात्रात घेणे वगैरे ‘ अवास्तव ‘ ही इथे घडलेले आहेच. आता हे जे आहे ते ‘ वास्तवा ‘ शी पडताळत न बसता ही एक ऐतिहासिक फँटसी – काल्पनिका -- म्हणून पाहावी असे मी सुचवेन. )

नंतरही या नाटकांमध्ये काही बदल, पुनर्लेखन होत गेले. ‘ इराक ‘ आणि ‘ जणू काही वास्तव ‘ यांत काही काटछाट करून आणि योग्य तिथे थोडेफार लेखन करून आता ही नाटके फायनल केलेली आहेत. या सगळ्या प्रकारांत अनेकांशी विचारविनिमय आणि चर्चा झालेल्या आहेत. त्या सर्वांचा अर्थातच मी आभारी आहे.

तर, असे हे सर्व न ठरवता घडत गेलेले आहे. हे चार पुरुषार्थ म्हणजे यात एकूण मानवी जगणेच कव्हर होते, हे लक्षात आल्याने ही चार नाटके एकत्रितपणे या पुस्तकात समाविष्ट केलेली आहेत. यापुढे बहुधा पुन्हा कधीही घडणे शक्य दिसत नाही असा हा एक मराठीतला विशेष प्रकार म्हणून पाहायला हरकत नाही.

या निमित्ताने नाटक या विषयावर काही मुद्दे मांडावेत असे वाटते. पहिली गोष्ट म्हणजे, भावभावनांचे हेलकावे आणि तशा घटनांची मालिका या प्रकारच्या नसलेल्या आणि म्हटल्यास विचार-क्रियेचा वापर अधिक असलेल्या नाटकाला ‘ चर्चानाट्य ‘ म्हणायची पद्धत कशी पडली, कोण जाणे, पण, ती पद्धत गैरसमज निर्माण करणारी आणि कदाचित नाटकाबाबत मानसिक विरोध निर्माण करणारी आहे. स्वच्छंदी वा रोमँटिक नसणाऱ्या कवितेला आपण कोणते वेगळे अभिधान देतो ? सार्त्र वा पिरांदेल्लो यांच्या नाटकांना चर्चा नाटके म्हणणे योग्य होईल का ? विचारक्रियेचा अधिक वापर करणारी नाटके म्हणजे वैचारिक चर्चा नसतात. ‘ चर्चानाट्य ‘ हा शब्द वापरणे बंद करावे असे मला वाटते. या पुस्तकातल्या चारही नाटकांना कुणी ना कुणी चर्चानाट्ये म्हटले आहे. ते मला मुळीच मान्य नाही. आशयाच्या निर्देशासाठी एक वेळ प्रायोगिक, न-नाट्य, मृषानाट्य असे प्रकार ठीक पण भावनानाट्य, विचारनाट्य वा चर्चानाट्य असली अभिधाने टाळावीत असे माझे मत आहे.

दुसरा मुद्दा अनुभव आणि काळ यांचा आहे. कोणत्याही कलाकृतीतला अनुभव-प्रकार वा काळ हा लेखकाचा व वाचकाचा वा प्रेक्षकाचा एकच असू शकत नाही. प्रत्येक कलाकृतीतले अनुभवद्रव्य वेगळे असते, हे सहज मान्य होण्यासारखे आहे. पण, कलेतला काळ म्हणजे घड्याळाचा वा दिनदर्शिकेचा काळ नव्हे तर मानसिक काळ, हे लक्षात घ्यायला हवे. तोही कधीच एकसारखा असू शकत नाही. नाटक जसे पौराणिक वा ऐतिहासिक आहे म्हणून कालबाह्य ठरत नाही तसेच ग्रामीण वा शहरी असल्याने किंवा उच्चभ्रू वा सामान्य जगतातले असल्याने अप्रस्तुत ठरत नाही. सुजाण प्रेक्षक अनुभवाच्या नमून्याची प्रस्तुतता पाहात नाहीत तर आशयाच्या प्रक्रियेची प्रस्तुतता पाहतात. तसे नसेल तर कलेच्या क्षेत्रातली वेगवेगळ्या भाषा-प्रांतांतली देवाणघेवाणच काय, एकाच भाषा-प्रांतातली संपर्कप्रक्रियाही अप्रस्तुत ठरेल. हाच मुद्दा ' समकालीनता ' म्हणजे काय या विषयावर लिहिताना मी स्पष्ट केला होता, तो असा –

समकालीनता

मराठी साहित्यात वास्तववाद म्हणजे अजूनही सर्वेसर्वा आहे. काय म्हणावा वास्तववादाचा अर्थ ? बदलत्या भौतिक परिस्थितीवर आधारित असणे ? जुन्या काळातले अनुभव असले तरीही ते ' दिसणाऱ्या ' माहितीरूप निवेदनातून येणे, असेही एक असेल. पण, मुख्यत: वास्तव हे, जुने असो वा नवे, ते लेखकाच्या प्रतिक्रियेसहच येते. हे लक्षात घेतले तर अमुक एक वास्तव म्हणजे वास्तव, असे म्हणता येत नाही. आज लिहिणाऱ्या प्रत्येक लेखकाचे वास्तव वेगळे असते. आज लिहिणाऱ्या दोन चांगल्या लेखकांचे उदाहरण घेऊ. प्रणव सखदेव आणि रवींद्र पांढरे, हे लेखक बघा. त्यांच्या लेखनाचे अनुभवद्रव्य म्हणा की दिसणारी माहिती म्हणा, ही खूपच वेगळी आहे. याच पद्धतीने प्रत्येक लेखकाचे वास्तव वेगळे असते. हे लक्षात न घेता साहित्याची समकालीनता ही संकल्पना काहींना मूल्यात्मक वाटते, असे दिसून येते. एका ढोबळ अर्थाने प्रणव सखदेवच्या साहित्यात समजा समकालीनता आहे, असे आपण म्हटले, तर, जेव्हा कृत्रिम बुद्धिमत्तेच्या प्रभावाचा काळ येईल तेव्हा ते साहित्य कालबाह्य समजावे लागेल का ? हा एक प्रश्न तर आहेच पण काही अधिकच हेकट आणि संकुचित कल्पनाही दिसतात. समकालीन वास्तव हे लेखकाच्या मतासह, भूमिकेसह यायला हवे, ही ती कल्पना. म्हणजे आजच्या लेखनात, उदाहरणार्थ, सत्ताधाऱ्यांबद्दल राग वा विरोधकांच्या क्षुद्रपणाबाबत कीव व्यक्त व्हायला हवी. इथे, एक सुचवायचे आहे की या सर्व कल्पना संकुचित, साहित्याला रटाळ करणाऱ्या आहेत.

जयंत पवार हे माझे मित्र होते, पण, त्यांचे विचार मला पटत होते, असे नव्हे. त्यांनी असा एक प्रश्न मांडला होता की वास्तव आता इतक्या वेगाने बदलते आहे की ते लेखकाला समजून त्याच्या लेखनातून व्यक्त होईपर्यंत जुने होते आहे ! मुळात, आधी वास्तव समजून घ्यायचे आणि मग ते आपल्या प्रभावासह मांडायचे – ही साहित्याची कल्पनाच खोटी आहे. प्रत्येकाचे वास्तव वेगळे असते याचा अर्थच वास्तव समजणे असे काही सत्य अस्तित्वात असू शकत नाही. आणि साहित्य म्हणजे स्वमतयुक्त वास्तवाची मांडणी किंवा त्या त्या काळाचे डॉक्युमेंटेशन वा दस्तावेजीकरण हे पटण्यासारखे नाही. दस्तावेजीकरण आता इतर अनेक मार्गांनी होत असते, ती चुकीची जबाबदारी आता साहित्याने झटकायला हरकत नाही.

आपण वास्तव समजून घेण्यासाठी वा ते नोंदण्यासाठी साहित्यनिर्मिती करतो वा साहित्याच्या संपर्कात येतो ही समजूतच मुळात फार थिटी आहे. ऐतिहासिक वा पौराणिक कलाकृती, शेक्सपियरची नाटके, कोणत्याही इतर

प्रांतांतली वा देशांतली नाटके आपण का वाचतो वा पाहतो ? त्यात वास्तवनिरपेक्ष आणि लेखक-निरपेक्ष अशी मानवी जगण्याच्या भानाची प्रक्रिया असते म्हणून. आणि हे जगातल्या सर्वच मौल्यवान साहित्याबाबत खरे आहे. वास्तव कोणते आहे, अनुभव कोणता आहे याला महत्त्व देण्याच्या बालिशपणामुळेच काहीजण असे समजतात की निव्वळ अनुभव धारावीतल्या जगण्याचा असल्यामुळेच काही साहित्य एखाद्या मध्यमवर्गीय अनुभवक्षेत्र असणाऱ्या साहित्याहून महत्त्वाचे असते !

माझे एक नाटक सत्तरच्या दशकातल्या हिंदी सिनेमाच्या खोट्या, रचित डोलाऱ्यातून घडत जाते. एकजण म्हणाले की आता ते आजच्या काळाशी मॅच होत नाही तर दुसरे एकजण म्हणाले की हे कधीही ‘ आजचे ’ असणारे नाटक आहे. एक-दोन नाटकांत युनियन-मॅनेजमेंट संघर्षाचे वातावरण आहे – एकजण म्हणाले की आता कुठे उरलाय युनियनबाजीचा काळ ? त्याच्याहून किरकोळ उदाहरण म्हणजे माझ्या एका नाटकातल्या काळात फक्त लँडलाईन फोन होते, मोबाइल नव्हते ! म्हणजे गेले ते नाटक रद्दीत ? असे होत नसते. कलेचा प्रमुख सर्जक प्रवाह म्हणजे काय, हा प्रश्न स्वत:ला विचारला पाहिजे. प्रत्येक माणसाचा मानसिक काळ वेगळा असतो -- एकाचा 2023 चा, एकाचा 1947 चा असे म्हणता येत नाही. ढोबळपणे मांडायचे झाल्यास, जातवादी पुरोगाम्याचा काळ वेगळा, जाती-अंतवादी पुरोगाम्याचा वेगळा, हिंदुत्ववाद्याचा वेगळा, मुसलमानाचा वा कम्युनिस्टाचा वेगळा -- असे असते. कलावंत एखाद्या भ्रामक, काल्पनिक काळाला संबोधित करत नाही. तो एकूण माणसाला संबोधित करतो. त्याचे माध्यम हे त्याचा काळ असते, हे खरे असले तरी. त्यामुळे माझा वा तुमचा मानसिक काळ सालनिहाय सांगणे हे भ्रामक असते. एखादे नाटक कालबाह्य आहे की नाही याबाबत बोलणे हे फक्त उथळच असू शकते. मानवी जगण्याला ते प्रस्तुत आहे की नाही हे पाहायला हवे.

कोणतीही कला काय वा नाटक काय, ती मानवी संबंधांच्या आकलनाची प्रक्रिया असते. त्यांतली सर्व गुंतागुंत, रचना पाहणे, त्या रचनांचे भान घेणे हे जिवंत कलेचे काम असते. राजकीय भूमिका व्यक्त करणारी, समाजमान्य नीतिमत्तेचे गोडवे गाणारी, विभूतिपूजक वा एखाद्या पात्राची बाजू घेऊन त्याचा गौरव करणारी अशी जी नाटके असतात ती त्यांच्यांतल्या बोधप्रदतेमुळे आणि ती एखाद्या वैचारिक साच्याला जखडली गेलेली असल्याने जन्मत:च ‘ कालबाह्य ’ झालेली असतात. ती कोणत्याच काळात प्रत्यक्ष मानवी जगण्याला प्रस्तुत नसतात. त्यामुळे, मोठमोठ्या विभूतींवरची गौरवात्मक नाटके ही अस्मितायुक्त वा स्फूर्तिदायक वगैरे असली तरी त्यांना सांस्कृतिक मूल्य नसते. या अर्थाने ती ‘ कालबाह्य ’ असतात. सांस्कृतिक मूल्य असलेल्या कलाकृती या बोध वा संदेश देणाऱ्या नसतात. याच कारणाने आपल्याकडे खूप गवगवा झालेले ‘ उद्ध्वस्त धर्मशाळा ’ हे नाटक सांस्कृतिक दृष्ट्या नापास ठरते. मानवी संबंधांचे ‘मतहीन ’ भान व्यक्त होणे हेच कलेचे सांस्कृतिक मर्म असते.

वाचन आणि अभ्यास संस्कृतीबद्दल एक मुद्दा मांडावासा वाटतो. हल्ली कोणत्याही पुस्तकाच्या साधारण शे-सव्वाशे वा दोनशे प्रती निघतात. त्यांतल्या खपणाऱ्या प्रती या सामान्यत: व्यक्तीच विकत घेतात – कॉलेजेस, विद्यापीठे वा गावोगावची वाचनालये असे फारसे कुणी काही घेताना दिसत नाही. याचा अर्थ काही वर्षांनी कुणाला अमुक एका लेखकाचे अमुक एक पुस्तक वाचायचे असले तर त्याला ते मिळवणे खूपच अवघड जाईल. त्याच्याही पुढचा प्रश्न म्हणजे एखाद्या लेखकावर पुढेमागे कुणाला डॉक्टरेट करायची असेल तर त्याचे सगळे लेखन एका ठिकाणी मिळणे

अशक्यच होईल. मग लोक डॉक्टर होणार कसे ? म्हणजे यापुढच्या सगळ्या डॉक्टरेट या फक्त पुल आणि वपु यांच्यावरच कराव्या लागतील. मराठीच्या नावाने गळे काढता येतील असा हा एक मोठा प्रश्न दिसतो. काय मार्ग असू शकेल यावर ? की हळूहळू पुस्तकांचे महत्त्वच खलास होत जाण्याची ही चिन्हे आहेत ? सध्या निदान, गांभीर्यपूर्वक, ' पुस्तके आणि संस्कृती यांचा संबंधच काय ? ' या विषयावर एखादा परिसंवाद तरी घ्यावा ! मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळणे आणि एकूण पुस्तकांची उपलब्धता नष्ट होणे हे एकाच वेळी घडेल असे दिसते. की, ' गरज ही शोधाची जननी असते ' – या सुभाषितातून निघेल काही मार्ग ? आता हा मुद्दा जरा अधिक स्पष्ट करायचा तर, कोणत्या, कसल्या पुस्तकांबद्दलचा हा प्रश्न आहे, हे विचारात घ्यावे लागेल. करमणूक, बोध, आरोग्य आणि यशस्वी होण्याचे नुस्खे देणे -- अशी उद्दिष्टे सोडून लिहिली जाणारी काही सांस्कृतिक महत्त्वाची पुस्तके -- विशेषत: सर्जक साहित्य म्हणावे अशी पुस्तके यात येतात. सवयीतला माल देणाऱ्या पुस्तकांचा अभ्यास कसला करणार ? यातही, कोणते सांस्कृतिक, कोणते सर्जक अशा प्रत्येक विषयावर बोलत राहता येईलच. वादाचे मुद्दे आहेत आणि असणारच. मुळात ही समस्या अस्तित्वातच नाहीय आणि आहे ते उत्तम चालू आहे, असे वाटणारे संतुष्ट लोकही असू शकतील. मला मात्र ही एक समस्या आहे असे वाटतेच.

शेवटी एक छोटा पण महत्त्वाचा मुद्दा. पुस्तक प्रकाशन आणि वितरण हा इथला एक गंभीर आणि रोगट म्हणावा असा प्रश्न आहे. या सगळ्या प्रकारात बाकी सर्वजण धंदेवाले आणि लेखक मात्र निरपेक्ष संत असे होऊन बसलेले आहे. लेखकांचा कचरा करणारी ही यंत्रणा आहे. पुस्तकांचा खप खूपच मर्यादित असणे हे याचे एक महत्त्वाचे कारण असू शकते. या यंत्रणेवर न विसंबता लेखक काही करू शकतो का, हे पाहण्याचा हे पुस्तक हा एक प्रयोग आहे. तांत्रिक प्रगतीच्या या नव्या जमान्यात लेखकांनी आत्मनिर्भर होणे कितपत, कसे जमेल हे पाहण्यासाठी, दिग्दर्शन, कथा, पटकथा, संवाद, संगीत, गाणी, अभिनय – सबकुछ किशोरकुमार, असा हा प्रकार करून पाहात आहे.

--- चं. प्र. देशपांडे.

--- 000 ---

## वाचन आणि अभ्यास संस्कृती

वाचन आणि अभ्यास संस्कृतीबद्दल एक मुद्दा मांडावासा वाटतो. हल्ली कोणत्याही पुस्तकाच्या साधारण शे-सव्वाशे प्रती निघतात. त्यांतल्या खपणाऱ्या प्रती या सामान्यत: व्यक्तीच विकत घेतात – कॉलेजेस, विद्यापीठे वा गावोगावची वाचनालये असे फारसे कुणी काही घेताना दिसत नाही. याचा अर्थ काही वर्षांनी कुणाला अमुक एका लेखकाचे अमुक एक पुस्तक वाचायचे असले तर त्याला ते मिळवणे खूपच अवघड जाईल. त्याच्याही पुढचा प्रश्न म्हणजे एखाद्या लेखकावर कुणाला डॉक्टरेट करायची असेल तर त्याचे सगळे लेखन एका ठिकाणी मिळणे अशक्यच होईल. मग लोक डॉक्टर होणार कसे ? म्हणजे यापुढच्या सगळ्या डॉक्टरेट या पुल आणि वपु यांच्यावरच कराव्या लागतील. मराठीच्या नावाने गळे काढता येतील असा हा एक मोठा प्रश्न दिसतो. काय मार्ग असू शकेल यावर ? की हळूहळू पुस्तकांचे महत्त्वच खलास होत जाण्याची ही चिन्हे आहेत ? सध्या निदान, ' पुस्तके आणि संस्कृती यांचा संबंधच काय ? ' या विषयावर एखादा परिसंवाद घ्यावा ! मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळणे आणि एकूण पुस्तकांची

उपलब्धता नष्ट होणे हे एकाच वेळी घडेल असे दिसते. की, ‘ गरज ही शोधाची जननी असते ‘ – या सुभाषितातून निघेल काही मार्ग ?

--- 000 ---

कविता म्हणजे ' जे आहे ते ' -- काल्पनिकाचे गोडवे गाण्याने ती आदर्श, बोधप्रद आणि खोटी होते.

' ग्रेट ' कविता लिहिणे हे जर उद्दिष्ट असेल तर तशी कविता कदापि लिहिली जाणार नाही.

परिणामकेंद्री कविता सखोल कशी असेल ?

कविता समजली नाही की काही लोक चिडून कवीचे मूल्यमापन करू लागतात !

सतत कुठे ना कुठे मात करण्याच्या विचारात व्यग्र असणाऱ्या माणसाचा कोणत्याही कलेशी संबंध कसा असेल ?

वाचकाचे स्वातंत्र्य

लेखकाचे अभिव्यक्तिस्वातंत्र्य या विषयावर आपण नेहमीच बोलत असतो. त्यांतलेच काही लोक लेखकाची वा कवीची मन:स्थिती कशी असायला हवी, त्याने कशी भूमिका घ्यायला हवी याबाबत आग्रही सल्लेही देताना दिसतात. पण, सामान्यत: जगभर लेखकाची चिंतनशीलता आणि त्याची आकलनप्रक्रिया यांचे महत्त्व मान्य असल्याचे दिसते. या विषयाकडे एका वेगळ्या दृष्टीनेही पाहायची गरज वाटते. कवितेचे विविध अर्थ शक्य असतात, अमुकच अर्थ योग्य असे काही नसते – या म्हणण्यात कितपत तथ्य असते, हा प्रश्न विचारात घ्यायला हवा.

कविता कशी वाचावी तर आपले कपडे काढून, किंवा वाचकाने स्वत:चे पूर्वग्रह बाजूला ठेवून कविता वाचायला हवी, किंवा वाचक हा सहृदय असायला हवा – असे म्हटले जाते तेव्हा वाचकाचे स्वातंत्र्य मर्यादित होते का, हा प्रश्न आहे. नोबेल विजेता गाओ म्हणतो की पेसोआ  हा विसाव्या शतकातला सर्वश्रेष्ठ कवी होता, आपल्याकडेही अनेकांना हे मान्य असते की ज्ञानेश्वर आणि तुकाराम हे मराठीतले सर्वश्रेष्ठ कवी आहेत. असतो का काही अर्थ अशा वाक्यांना ? कवीला समजा अभिव्यक्तीचे शंभर टक्के स्वातंत्र्य असते तसेच शंभर टक्के स्वातंत्र्य वाचकाला ती कविता समजून घेण्याच्या बाबतीत असते का ? समजा असेल तर त्याने अरुण कोलटकरच कशाला वाचायला हवेत ? – कोणत्याही एखाद्या संस्थेचा वार्षिक अहवाल घेऊन त्याचा त्याला हवी ती कविता समजून त्याला हवा तो अर्थ का लावू नये ?

--- हे प्रश्न काही नवे आहेत, असे नाही, पण, कलाक्षेत्रात हे प्रश्न नेहमीच चिंतनात असायला हवेत, असे वाटते. कवीचे स्वातंत्र्य महत्त्वाचेच असते आणि वाचकाला ‘ वाट्टेल तसे ‘ समजून घेण्याचे स्वातंत्र्य नसते, असेच मला वाटते. यावर जरूर चर्चा व्हावी असा हा विषय वाटल्याने ही पोस्ट दिलेली आहे.

--- ००० ---

अध्यात्म आणि पुस्तक प्रकाशन

माझे काका कै. एस. आर. देशपांडे हे पुण्यातल्या एस. पी. कॉलेजात इंग्रजीचे प्राध्यापक होते. नंतर ते कोपरगावच्या कॉलेजात प्राचार्य म्हणून गेले होते. त्यांच्याकडून मला साहित्य, कला यांतल्या अनेक गोष्टी ऐकायला मिळत. संस्कृतवर प्रभुत्व आणि शास्त्रीय संगीताची जाण हीही त्यांची वैशिष्ट्ये होती. गांभीर्याबरोबरच मिश्किलपणाही पुरेपूर असणे हे त्यांच्या व्यक्तिमत्वाचे खास वैभव होते. त्यांनी एकदा अध्यात्म आणि खेळ यांची सांगड घालत एक ज्ञानमय ओवी सांगितली होती, ती अशी –

खेळ खेळावा क्रिकेटू
मीच बॉल मीच फळकुटू
मीच माझियावेरी आपटू
मीच धावे भिरिभिरी ।।

तर त्याला धरून एक माझे पुस्तक प्रकाशित होत आहे. मीच लेखक, मीच प्रकाशक , मीच मुद्रितशोधक आणि मीच मांडणीकार, वगैरे. लेखक कितपत आत्मनिर्भर होऊ शकतो, हे पाहण्याचा हा एक प्रयोग आहे. ( मीच एकमेव वाचक, असे होऊ नये म्हणजे झाले ! ) हे जमल्यास पुढे अनेक पुस्तकांची झडच लावणार ( याच अर्थाने ' छडी लावणे ' असाही वाक्प्रचार आहे का ? ) आहे. नाटक, कविता, ललित लेख, वैचारिक-समीक्षात्मक लेखन, नाट्य-चित्रपट परीक्षणे वगैरे अनेक दालनांतली ही पुस्तके असतील.

तर यांतले पहिले पुस्तक आहे --

' चार पुरुषार्थांची चार नाटके '. ती अशी आहेत – ढोलताशे ( धर्म ), इराक ( अर्थ ), बुद्धिबळ आणि झब्बू ( काम ) आणि जणू काही वास्तव ( मोक्ष ). अशा प्रकारचे एक पुस्तक अस्तित्वात येणे ही मराठीतली एक विशेष घटना ठरावी. या पुस्तकाच्या प्रक्रियेत एक महत्त्वाची बाब लक्षात आली ती अशी की या निमित्ताने संहिता पुन्हा एकदा माझ्या नजरेखालून जातात आणि काही काटछाट, दुरुस्त्या वा पुनर्लेखन घडून त्या फायनल होतात. त्यामुळे या नाटकांच्या या पुस्तकातल्या संहिता या फायनल आहेत, असे मी म्हणू शकतो.

' ढोलताशे ' बाबत निळू फुले असे म्हणाले होते की हे नाटक जो पाहणार नाही त्याला मोक्ष मिळणार नाही. ' इराक ' हे नाटक, माझ्या माहितीप्रमाणे, मराठी लेखकाने लिहिलेले आंतरराष्ट्रीय राजकारणावरचे पहिले ओरिजिनल नाटक आहे. याच वैशिष्ट्यासाठी, हे नाटक पाहायला विजय तेंडुलकर आले होते. त्या वेळी ते नाटक बरेच विस्कळित होते. आता ते आटोपशीर आणि नेमके केलेले आहे. ' बुद्धिबळ आणि झब्बू ' हे नाटक प्रायोगिक आणि व्यावसायिक दोन्हीकडे बरेच पाहिले गेले. तेंडुलकर,या नाटकाला, मराठीतले एक जागतिक दर्जाचे नाटक असे म्हणाले होते. रत्नाकर मतकरी यांनी या नाटकाची मराठीतल्या दहा निवडक नाटकांत गणना केली होती. ' जणू काही वास्तव ' चे प्रयोग कमी झाले पण हे नाटक प्रख्यात समीक्षक गंगाधर पाटील यांना आवडले होते, अशी आठवण आहे. सारांश म्हणजे, मराठी नाट्य वाङ्मयात हे पुस्तक संग्राह्य ठरेल असा विश्वास वाटतो.

या आणि यापुढील माझ्या पुस्तकांच्या जाहिरातीही मीच करणार असलो तरी मलाच न पटणारे खोटे असे मी काही सांगणार नाही. तरीही, आपली आपण भलावण करण्याचा दोष मला पत्करावाच लागेल. त्यासाठी आधीच इथे दिलगिरी व्यक्त करून ठेवतो.

यापुढील पुस्तकांची योजना अशी आहे --

१. सहा दीर्घांक

२. चार ॲब्सर्ड नाटके.

हे एवढे झाल्यावर पुढे आणखी बरेच आहे.

सध्या इथे थांबतो.

या सदर पुस्तकाची पाने ३०० प्लस असून किंमत रु.६००/-- आहे. सवलतीची योजना व हे मिळण्याची ठिकाणे यांबाबत लौकरच माहिती देईन.

--- ००० ---

चंप्रंची ही महत्त्वाची नाटके एकत्रित उपलब्ध होणे आवश्यकच होते.

मनःपूर्वक अभिनंदन !!! ---- गिरीश पतके.

विशेष म्हणजे हे मुखपृष्ठ, नुकतीच बारावी झालेली माझी नात ( मुलाची मुलगी ) चि. श्रेया देशपांडे हिने केले आहे. तिला चित्रकलेची आवड आहेच पण या चित्रासाठी तिने बरेच कष्ट घेतलेले आहेत ! तिचे असे हे पहिलेच काम असल्याने आम्हा सर्वांनाच एक वेगळा आनंद मिळालेला आहे !

' चार पुरुषार्थांची चार नाटके ' या माझ्या पुस्तकात ' ढोलताशे ', ' इराक ', ' बुद्धिबळ आणि झब्बू ' आणि ' जणू काही वास्तव ' ही चार नाटके अनुक्रमे धर्म, अर्थ, काम व मोक्ष या पुरुषार्थांशी संबंधित आहेत. या पुस्तकाची पाने ३०० प्लस असून त्याची किंमत रु.६००/-- ( रुपये सहाशे फक्त ) आहे. सदर पुस्तकाची विक्री आता सुरू होत असून दिनांक ३१-०८-२०२३ पर्यंतची याची सवलतीची किंमत रु ४५०/-- ( रुपये चारशे पन्नास फक्त ) -- टपाल खर्चासह आहे. रक्कम पाठवण्यासाठी नंबर्स --

Chandrakant Prabhakar Deshpande

HDFC BANK Saving Account No.03591000003204

IFSC : HDFC0000359

For G pay : Mahesh Deshpande mbl 9970065875 OR

UPI ID gathaent-3@okhdfcbank

Payment ट्रान्सफर केल्यावर येणारा UTR कोड आणि पत्ता 9970065875 ह्या नंबर वर पाठवावा.

पुस्तक पाठवण्यासाठी पत्ता

' चार पुरुषार्थांची चार नाटके ' या माझ्या पुस्तकासाठी लोक पैसे पाठवत आहेत पण त्यांतले काहीजण लगेच, यू टी आर कोडसह आपला पत्ता कळवायचे विसरत आहेत. त्यामुळे, हे पैसे आले कुणाचे, पुस्तक कुठे पाठवायचे, असे प्रश्न येत आहेत. तरी, कृपया, पुस्तकासाठी पैसे पाठवताच लगेच यू टी आर कोडसह पत्ता कळवावा, ही विनंती. पैसे आले की किमान दुसऱ्या दिवशी पुस्तक रवाना व्हावे, असा प्रयत्न आहे.

--- ० ---

लौकरच वाचकांना उपलब्ध होईल ' वस्तू ---- '

आणि त्यानंतर येईल ' पाच ॲ ब्सर्ड नाटके '

( आता लागलीय लिंक तर हे पुस्तकांचे काम उरकूनच घ्यावे, असा विचार आहे. )

आदरणीय चं.प्र. सर,

अनेक वर्षांनी माझे अक्षरलेखन पुन्हा सुरू केलं. त्यासंबंधी छोटीशीच पोस्ट केली आणि ती पाहून तुमच्या पुस्तकांसाठी अक्षरलेखन मी करावं_ असा तुमचा प्रस्ताव आल्यावर आनंद अर्थातच झाला होता. पण मी व्यावसायिक अक्षरलेखन करणारा कलाकार नाही. मी कलानिर्मिती_ पूर्णवेळ व्यवसाय म्हणून करत नाही असा एक inferiority complex सुद्धा जोडीला होताच.

मी काही किरकोळ सराव करून हे काम केलं.

हे अक्षर लेखन अर्थात मी स्वतः केलं. माझे अनेक मित्र अशी कामं व्यावसायिक म्हणून करतात. मुद्दाम त्यांच्याशी ह्याबद्दल बोलले सुद्धा नाही. तुमच्याकडे जो दोन तीन दिवसांचा वेळ मागितला त्यात मुद्दाम काहीही केलं नाही. अगदी माझा रोजचा अक्षर रियाज देखील केला नाही. इतर कोणतंही काम / इतरांचं अक्षरलेखन जाणीवपूर्वक पाहिलंही नाही.

तुमचं काम हे माझ्यासाठी निव्वळ एक काम नव्हतं.....

भलेही कमी प्रशिक्षित...काहीसे कच्चं...

पण मला संपूर्ण माझं काम करायचं होतं.

एकेक रेष मला माझी असायला हवी होती. त्यावर कोणाचंही अस्तित्व, सल्ला, प्रभाव, सूचना, मार्गदर्शन_ काहीही नको होतं..जे घेणं सहजशक्य होतं, अनेकांनी ते आनंदाने केलंही असतं.माझं अनघड..अनाघ्रात असणं,संपूर्ण प्रभावहीन असणं मला हवं होतं.

तो किरकोळ अक्षर प्रवास नव्हता. स्वतःचा साचा वितळणे होतं. मुद्दाम जाणिवपूर्वक...पूर्वग्रह, प्रभावहीन , संपूर्ण स्वायत्त होता येतं का हे पाहायला हा प्रवास होता....मनोमन.

त्या रेषांमध्ये कोवळीक यावी अशी इच्छा होती .

ह्या निमित्ताने आपले काही संवाद झाले होतेच. ह्या सगळ्याचा विचार करून मला हे काम ह्या प्रकारे करावं वाटलं.

रादर...

निर्मिती प्रक्रियेत कुठलंही काम असंच केलं पाहिजे असं मला वाटतं. आणि मला खात्री आहे तुम्हीही ह्याच्याशी सहमत असाल.

काल पुस्तक तयार झालं.

माझी अक्षरं....,माझ्या हातांचा स्पर्श त्या पुस्तकाच्या कव्हरवर पाहणे हा आनंद खूप खास होता.

ह्या संधीसाठी तुमचे खूप आभार.

तुमचे आशीर्वाद असेच राहो.

प्रिया देशपांडे

....

*वस्तू आणि इतर सहा दीर्घांक*

# माझा अक्षरप्रवास

@ प्रिया देशपांडे

माझ्यातला निर्दय लेखक

काल प्रसन्न जोशी यांची माझ्या ' इराक ' या नाटकावरची पोस्ट पाहिली आणि काही जुन्या आठवणी जाग्या झाल्या. चेतन दातारने हे नाटक ' आविष्कार ' तर्फे बसवून सादर केले होते. त्या वेळची संहिता जरा सविस्तर होती. नंतर मला ती जरा फापटपसारायुक्त वाटू लागल्याने निर्दयपणे मी तीत काटछाट केली आणि थोडेफार नवीन टचेस दिले. प्रसन्नजींनी त्यांच्या पोस्ट मध्ये दिलेला संवाद हा आधीच्या संहितेतला आहे. म्हटले तर तो संवादही तसा भारी आहे. पण, असा बराच भाग मी त्या संहितेतून उडवून लावला होता. एका मुलाला हवे ते महागडे बूट न घेतल्यामुळे तो घरातून पळून गेलेला असतो. त्याला परत बोलावण्यासाठी जी जाहिरात दिली जाते तीत त्या बुटांचा फोटो छापलेला असतो. " बघ, तुला हवे ते बूट आणले आहेत – " वगैरे. स्वतंत्रपणे ते सगळे भेदक होते पण नंतर मी ते नाटक आटोपशीर आणि अधिक तीव्र करायचे ठरवल्याने तो सगळा भाग मी उडवून लावला ! आताचे सुधारित ' इराक ' हे नाटक मराठीतले एक विशेष लक्षवेधी नाटक ठरावे असे झालेले आहे. तरीही, त्याकडे कुणी फारसे लक्ष देणार नाही, हा भाग वेगळा !

तसेच, पूर्वी मी ' नरदेह ' नामक एक नाटक लिहिले होते. कालांतराने ते वाचल्यावर माझे मलाच ते भयानक बोधप्रद आणि कंटाळवाणे वाटले. मग ती पूर्ण संहिता नाकारून मी ते पूर्ण नाटक नव्याने लिहिले. ते आता ' सध्या तरी शेवट गोड ' या नावाने उपलब्ध आहे. विजय वांकर यांच्या निर्मिती-नेतृत्वाखाली भालचंद्र पानसे यांनी ते दिग्दर्शित केले आणि त्याचे २५ प्रयोग सादर केले !

माझे ' घोकंपट्टी ' हे नाटक पी डी ए या पुण्यातल्या प्रख्यात संस्थेने सादर केले. ते ' जिंदगी ख्वाब है ' या नावाने रंगमंचावर आले. अजित सातभाई, दिलीप वेंगुर्लेकर आणि संजय डोळे या नाटकातल्या प्राध्यापकत्रयीने खूप मजा

आणली. दिग्दर्शन अजित सातभाईंचे होते. याही नाटकात बऱ्यापैकी काटछाट नंतर केलेली असून आता ते अधिक नेटके झाले आहे, असे मला वाटते.

‘ जणू काही वास्तव ‘ हे माझे नाटक गिरीश पतके यांच्या दिग्दर्शनाखाली ‘ आविष्कार ‘ ने सादर केले. त्यातही जरा पसारा जास्त झालेला असून त्यामुळे मध्येच ते कंटाळा आणू शकते हे कळल्याने तेही नाटक आता जरा ‘ नीट ‘ केलेले आहे.

अर्थात अशा कामात मतभेदाला वाव असतो. “ अहो, चांगले होते की ते – उगीचच काढलेत – “ – असे होऊ शकते. पण. लेखकाला स्वत:ला त्याची कलाकृती वाचक/प्रेक्षकांपुढे कशी यायला हवी आहे, हेच शेवटी महत्त्वाचे ठरणार. यासाठी लेखकाला स्वत:च्या लेखनाकडे निर्ममपणे पाहता यावे लागते. आणि जोडीला पुरेसा निर्दयपणाही त्याच्याकडे असावा लागतो.

मी सुरुवातीला लिहिलेली, ‘ राज्य ‘, ‘ पंतप्रधान येत आहेत ‘, ‘ घटना घडतात ‘, ‘ मरणाचे स्मरण असावे ‘, ‘ मानव ‘ – ही नाटके मी स्वत:च नाकारून रद्द केलेली आहेत. ‘ हस्ताक्षर ‘, आणि ‘ निसर्गचित्र ‘ या नावांची नाटके लिहायला सुरुवात करून सोडून दिलेली आहेत. ‘ पाऊस ‘ ही एकांकिकाही अशीच रद्द केलेली आहे.

आता पुस्तके काढण्याच्या निमित्ताने सगळेच लेखन पुन्हा पाहिले जात आहे. आवश्यक ते बदल आणि माझे काही अधिकचे परिसस्पर्श करत आहे. नंतर मात्र पुन्हा ढुंकूनही या लेखनाकडे मी पाहणार नाही.

– ० –

नाट्यनि:पात

अमुक एक दिवस विशेष ठरावा अशी विश्वात काही योजना नाही. पण, माणूस मनाचा वापर खूप मोठ्या प्रमाणात करत असल्याने असे  दिवस वा दिन साजरे करण्याची पद्धत पडली. आपल्या जगण्यात काहीतरी विशेष घडते आहे याचा आनंद घेण्याची ही एक सोय निर्माण झाली. तर आज आहे रंगभूमी दिन ! त्यासाठी शिरस्त्याप्रमाणे सर्वांना शुभेच्छा ! या रंगभूमी दिनाला आणि त्याच्या आजूबाजूला आपण काही संबंधितच पण वेगळे काही काम करतो आहोत तर ते नुसते समोर मांडावे, असे ठरवले. एकजण माझ्या लेखनाबद्दल दुसऱ्याशी बोलताना असे म्हणाला होता की, “ अरे त्याची पुस्तकं कुणी काढत नाही आणि काढली तरी कुणी बघणारही नाही ! “ त्या दुसऱ्याने हे समीक्षात्मक वाक्य माझ्याकडे बिनचूक पोचवले होते. त्यातला ‘ लागट ‘ भाग जरी सोडला तरी त्यात काही तथ्यही आहे, हे नाकारता येणार नाही. अर्थात गेली काही वर्षे माझ्या संकेतस्थळावर माझे सर्व लेखन मोफत उपलब्ध असून वर्षाला तिथे चार ते पाच हजार भेटी होत असतात, हा भाग वेगळा. ते असो. काळाचा महिमा असा की आता पुस्तके प्रकाशित करणे तसे सोपे झालेले आहे. एक तर नाटक, एकांकिका आणि कविता हे पुस्तकांच्या जगात सर्वांत कमी मागणी असलेले प्रकार म्हणून कुप्रसिद्ध आहेत आणि मी नेमका तेच जास्त लिहीत आलो आहे. त्यामुळे, खप हा विषय विचारात न घेता मी स्वत:च माझे लेखन प्रकाशित करत आहे. सुरुवातीला अर्थात नाट्यलेखन ‘ संपवायचे ‘ ठरवले आहे. या वर्षात माझ्या नाट्यलेखनाचा पूर्ण नि:पात करायचा विचार आहे.

आतापर्यंत --

१ चार पुरुषार्थांची चार नाटके

२ वस्तू आणि इतर सहा दीर्घांक

--- प्रसिद्ध झाले. लौकरच --

३ पाच अब्सर्ड नाटके

५ सहा नाटके

५ निवडक एकांकिका

--- ही पुस्तके येतील. या निमित्ताने सर्वच नाट्यलेखन एकदा नजरेखालून जात असून फायनल होते आहे. एकदा हे सर्व पूर्ण झाले की पुन्हा ढुंकूनही या लेखनाकडे पाहणार नाही. काही वेगळ्याच प्रकारची नाटके लिहिण्याचे मनात आहे पण जे आहे त्याचे व्यवस्थापन पूर्ण झाल्यावरच तिकडे वळेन.

बाकीच्या लेखनावर इथे काही लिहीत नाही. माझे नाट्यलेखन हा एवढाच एक मर्यादित आणि मराठीत फारच थोड्यांना इंटरेस्ट असलेला विषय घेतला आहे. सुमारे ५०-६० वर्षे आपण मराठी नाट्यक्षेत्रात वावरतो आहोत तर तेवढा अधिकार आपल्याला आहे, असे गृहीत धरलेले आहे.

नवे रंगकर्मी, नवी नाट्यभाषा, नवे अवकाश, नव्या समस्या – अशा असंख्य गोष्टींची चर्चेत रेलचेल असताना हा एक जुना नाटककार काय स्वत:चे लिहीत बसला आहे, हे काहींना खटकू शकतेच. मी तसा लेखनातून निवृत्त वगैरे होणारा नाही. तसे तर एक प्रकारे अनेक वर्षे निवृत्त झालेले असण्याचाच तर अनुभव चालू आहे. काफ्काची हिंमत वेगळी होती – त्याने त्याचे लेखन जाळूनच टाकायला सांगितले होते. एक बारीकसा मराठी लेखक या नात्याने इथे, पुस्तके प्रकाशित करणे म्हणजे जाळून टाकण्याहून फार वेगळे काही नसते, या समजुतीतून हे काम करत आहे. आजच्या रंगभूमी दिनाच्या शुभ अवकाशात, म्हणूनच, ही नाट्यनि:पात योजना जाहीर केलेली आहे. सर्वांना रंगभूमी दिनाच्या मन:पूर्वक शुभेच्छा !

--- ००० ---

प्रिया छानच करतेय हे काम ! ' मी पाहू कशाला नभाकडे ? '

पाच ॲब्सर्ड नाटके...

ह्या पुस्तकाच्या अक्षरलेखनासाठी चं.प्र. न चा प्रस्ताव आला..

हे काम आधीच्या अक्षरलेखन पेक्षा अधिक आव्हानात्मक होतं.

चं.प्र. न साठी काम करणे जिव्हाळ्याचं तर होतंच,

एकूणच काफ्का, आणि त्याचे " ट्रायल "

हेदेखील माझ्याही विशेष आवडतं.

त्यामुळे ॲब्सर्ड ह्या शब्दाच्या अनुषंगाने...

चं.प्र. न शी झालेले संवाद _ ही अत्यंत मौलिक गोष्ट होती.

शिवाय हे काम व्यावसायिक स्तरावर अधिक ओळख देणारं देखील होतं.

एकूणच ह्या कामानिमित्ताने झालेला आपल्याच शोधाचा प्रवास सर्व अर्थाने मला समृद्ध करत गेला.

ह्यासाठी चं.प्र. न चे आभार तर आहेतच....

ह्या निमित्ताने माझी अक्षरखूण एका मौल्यवान साहित्यकृतीवर उमटलेली असेल...

ही फार मोठी गोष्ट....❤□❤□❤□❤□

# calligraphy _ priya's art studio

# अक्षरलेखन _ प्रिया देशपांडे

*** tagged people... संवाद, चर्चा, मत, मदत ह्याही वेळी घेतली नव्हती. थोडंसं वेगळं काम करताना आपल्याच कामावर, स्वतःवर असणारा विश्वास, प्रेम आणि  तुम्हा सर्वांचे प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष प्रोत्साहन ह्यासाठी तुम्हा सर्वांच्या सोबतीचा आवर्जून उल्लेख असायला हवा. म्हणून tag करत आहे.

साधक-बाधक चर्चेसाठी वा व्यक्तिगत चिंतनासाठी ---

करंदीकरांच्या कवितेने जे वस्तुतः आपल्या निर्मितीतून

टाळावे असे आपणांस वाटते ते तसेच टिकवून ठेवले आहे. याचे कारण तिला समूहमनाचा मोह होत आहे, हे तर नाही ना, अशी शंका आल्यावाचून राहात नाही. खरे म्हणजे हा प्रश्न केवळ करंदीकरांचा नाही. एकूण मराठी वाङ्मय हेच अजून नैतिक आणि मूल्यात्मक पातळी सोडू शकलेले नाही. 'काय हलाखी स्त्रीत्वाची ही- माणूसकीचे काय विडंबन' असे मर्ढेकरांनाही सांगावेसे वाटते. आम्हाला अजूनही मानवी जीवनात, केवळ मानवी जीवन म्हणून रस वाटत नाही, आम्हाला अजूनही कुतूहल वाटते ते काही नैतिक व मूल्यात्मक कल्पनांमध्ये. पायाखालची वाळू सरकत असताना कशाला तरी घट्ट पकडून ठेवावेसे वाटते, तसेच आपले सर्वांचे झाले आहे. परिस्थितीच्या प्रचंड दाबामुळे आम्ही परंपरेपासून बेदरकारपणे ढकलले जातो आहोत आणि आपण मात्र जेथून ढकलले जात आहोत तेथे पुनःपुन्हा चिकटण्याचा प्रयत्न करीत आहोत. मुलाला घराबाहेर काढताच मूल बंद दाराला जसे खिळून दार उघडण्याची वाट पाहत राहते, तसे आपलेही झाले आहे. म्हणूनच परिस्थितीच्या दाबातून जन्माला आलेल्या नव्या नव्या जाणिवांना जिद्दीने समोरे जाण्याऐवजी व असे सामोरे जाताना मोडून पडलेल्या नैतिक व मूल्यात्मक चौकटी तटस्थपणे अवलोकण्याऐवजी आपण या मोडू लागलेल्या चौकटीला खिळून बसतो आहोत. मराठी कादंबरी, नाटक आणि कविता या तिन्ही क्षेत्रांत हेच चित्र आपणांस पाहावयास मिळते आहे. म्हणून हे अपयश एकट्या करंदीकरांच्या कवितेचे नाही, तर एकूण मराठी वाङ्मयाचेच आहे असे म्हणावे लागेल.

--- डॉ. सुधीर रसाळ – ' काही मराठी कवी जाणिवा आणि शैली – पान १७५.

--- ००० ---

" जेव्हा कवीच्या जाणिवा या प्रकारच्या सांप्रदायिक श्रद्धा बनून जातात तेव्हा त्याच्या समोर कुठलेच प्रश्न शिल्लक राहात नसतात. त्याला काही पाहायचे नसते आणि काही शोधायचे नसते. वैयक्तिक काय किंवा सामाजिक काय, साऱ्याच प्रश्नांचे, सुखदु:खांचे निदान आणि त्यावरचा त्याचा इलाजही पक्का होऊन गेलेला असतो. त्याच्या कवितेत

फक्त कार्य उरलेले असते श्रद्धाप्रदर्शनाचे आणि श्रद्धासंस्काराचे. त्यामुळे पक्क्या निष्ठांची आणि श्रद्धांची कविता वक्तृत्वपूर्ण बनते. ह्या निष्ठांच्या आणि श्रद्धांच्या संदर्भात त्याचे अनुभव घटक हे अत्यंत सुलभपणे एकत्र येत असतात. ह्या श्रद्धांना आव्हान देणाऱ्या घटनांचे, परिस्थितीचे अवलोकन करण्याची शक्तीच त्याने गमावलेली असते. हे केवळ मार्क्सवादी कवितेपुरतेच खरे आहे असे नव्हे, तर कुठल्याही नैतिक किंवा धार्मिक श्रद्धांमधून जन्मलेल्या कवितेबद्दलही हे खरे आहे. किंबहुना विशुद्ध भावकवितेबद्दलही हे खरे आहे. ह्या श्रद्धांच्या पक्केपणामुळे कवीची अनुभव घेण्याची क्रियाच साचेबंद बनून जाते. "

--- डॉ. सुधीर रसाळ, काही मराठी कवी : जाणिवा आणि शैली, पान १९४-५.

--- End of 2023 posts --

मला यात काही मुद्दे प्रस्तुत वाटतात ते असे -- अतिवास्तववादी कविता, अमूर्त वा प्रति-कविता, न-भाषा कविता -- अशी अनेक प्रकारची कविता लिहिली जाणार. त्यात सबोध व अबोध मन एकत्र येणे, सबोध मनाचा कंट्रोल अगदी कमी असणे, निरर्थकतेकडेच कल असणे -- असे प्रकार असणार. त्यांचा सलग थांग लागणे शक्य नाही. तरीही त्या कविता आशय पोचवत असतात म्हणजे काय, या अंगाने विचार व्हायला हवा.

हं -- शास्त्र वा तंत्र यांतले प्रश्न सोडून इतर प्रश्नांना बौद्धिक उत्तरे नाहीत -- असली तर ती निरुपयोगी, खोटी आणि गुंता अधिकच वाढवणारी असणार –

तेवढा आवाक्याचा ऐवज नसेल तर कशाला दीर्घकविता ? की दीर्घ कविता लिहिताच मान्यता लौकर मिळते ?

कवितेतला मी म्हणजे स्वत: कवी नव्हे.

कोणताही विचारव्यूह आदर्श मानणे म्हणजे तत्त्व.

All binaries are false ! there is nothing universal ! वगैरे -- याच्या मला समजलेल्या अर्थाने मी बोलतो आहे -- त्यांची positive मान्यता कशाला आहे, ते तुम्ही सांगा.

उत्तर आधुनिकतेप्रमाणे सत्य, वैश्विकता, चांगले-वाईट यांना आहे का मान्यता ? सगळा उथळपणाच आहे -- आहे ते साजरे करू या -- असे असेल तर कसले सत्य आणि कसले ज्ञान ?

उत्तर आधुनिकता हे अभिधान जगभर वापरले जाते -- त्याला आपण भोंगळ म्हणून काय उपयोग ? -- शिवाय, मध्यमवर्गीय असे हेटाळण्याचा इथे प्रश्नच नाही -- उत्तर-आधुनिकतेत हे आहे -- सखोल काही नसते, सगळे उथळच असते -- हे उलट खोटे आदर्श बाळगणाऱ्या मध्यमवर्गीयाला पचणारे नाही --असो -- आपल्यांत आकलन-भेद आहे -- असू द्या -- शेवट गाठायची काही गरज नाही –

शैलीतले नावीन्य, चटपटीतपणा, चमकदारपणा हा वाचकांना चकित करतो, भुरळ पाडतो, हे ठीक आहे. पण तो भर ओसरतो आणि मग यात मूल्यात्मक असे काय आहे, हा प्रश्न समोर येतोच. माझ्या मते मर्ढेकरांबाबतही हा प्रश्न विचारला पाहिजे. सनसनाटी पवित्रा ठीक पण तो कस नाही ठरू शकत. ( नेमाड्यांबाबतच्या लाख्यांच्या पोस्टवर ).

कविता विशिष्ट असणार -- आशय विशिष्ट असणार नाही –

Champra Deshpande

Sudheer Rasal काही लोक तर्कदुष्ट अर्थ लावूनही मते देत आहेत. कवी हा विचारशून्य असतो असे कुणीच म्हणणार नाही. अर्थ चुकीचे लावायचे आणि त्यावर सोयीस्कर मत द्यायचे, असे घडते आहे.

कोणत्याही काळाला संबोधित करणे यासाठी कला असते असे मला दिसत नाही. कोणत्या तरी काळाचा माल तीत असतो, इतकेच.काळाला संबोधित करतच नाही म्हटल्यावर 22 व्या शतकाचा संबंधच येत नाही. मुळात आजचा काळही प्रत्येकाचा वेगळा असतो, हे वर आलेलेच आहे. असो. मतभेद तर असणार.माफ करा, तुम्ही म्हणता तेच अशक्य आहे -- माझी पोस्ट तुम्ही नीट वाचलेली नाही. आजचा काळ असे काही नसतेच, असे मी मांडले आहे. प्रत्येक माणसाचा काळ वेगळा असतो. काळ म्हणजे घड्याळ नव्हे --मानसिक काळ. प्रत्येक माणसाचा मानसिक काळ वेगळा असतो -- एकाचा 2023 चा, एकाचा 1947 चा असे म्हणता येत नाही. ढोबळपणे मांडायचे झाल्यास, जातवादी पुरोगाम्याचा काळ वेगळा, जाती-अंतवादी पुरोगाम्याचा वेगळा, हिंदुत्ववाद्याचा वेगळा, मुसलमानाचा वा कम्युनिस्टाचा वेगळा -- असे असते. कलावंत एखाद्या भ्रामक, काल्पनिक काळाला संबोधित करत नाही. तो एकूण माणसाला संबोधित करतो. त्याचे माध्यम हे त्याचा काळ असते. त्यामुळे माझा वा तुमचा मानसिक काळ सालनिहाय सांगणे हे भ्रामक असते. ( सुनील तांबे ).

पक्ष, विचार, जात, धर्म -- असे कुठेतरी समरूप न होणे म्हणजे अस्तित्वहीन होणे ! वर्चस्वाची इच्छा आणि पराभवाची वा नष्ट होण्याची भीती हे सर्व तीव्र होत चाललेले आहे -- त्यामुळे, उपाय नाही ! हा मानसिक प्रश्न असल्याने तो जातो अध्यात्माच्या क्षेत्रात -- आणि असले प्रश्न तर फेटाळल्याशिवाय तुम्ही ' हुशार ' ठरत नाही !

ही पोस्ट म्हणजे वास्तववादाचा वा केवळ माहिती निवेदनाचा पुरस्कार आहे असे कृपया समजू नये. कवितेत कल्पना, प्रतिमा, सूचकता असणारच. सार्त्र, आयनेस्को, पिरांदेल्लो यांची नाटके ' जे आहे ते ' अशीच आहेत -- कसलेही गोडवे नाहीत.

सर्व मुद्दे कव्हर करण्याचा प्रयत्न -- कल्पनाशक्ती नाकारलेली नाही. कोणतीही सर्जक प्रक्रिया ही वर्तमानात असते -- त्याबाहेरचे वैचारिक, आदर्श वा बोधप्रद हे ती प्रक्रिया बिघडवते. बोधप्रद हे सांगोवांगीच्या गोष्टींचे गोडवे गाणे असते. सार्त्रचे ' नो एक्झिट ' हे नाटक तसे पूर्ण काल्पनिक आहे पण त्यात आदर्श वा बोध काही नाही. मानवी जगणे जे जसे आहे तसे ते पाहण्याची सर्जक प्रक्रिया आहे. पण अशा चर्चेला शेवट वा एकमत होणे असे काही घडावे अशी अपेक्षाच नाही. मला दिसणारा एखादा मुद्दा मी चर्चेला देत असतो, इतकेच. यापुढचे चिंतन हे ज्याचेत्याचे, वाटल्यास, घडू शकेल.

आणि मी एक तर पांचट लिहितो किंवा कविता नसलेले ' कवितेसम ' लिहितो -- असे तुम्हाला वाटते तर हे वाचण्यात कृपया तुमचा गंभीर, सखोल आणि अर्थपूर्ण वेळ वाया घालवू नये, ही नम्र विनंती !

व्यंगशब्द हा व्यंगचित्राप्रमाणे एक नवा प्रकार ट्राय करतोय -- नीट पाहिलेत तर हे सर्वांच्यावर आहे -- जगात फक्त दोनच बाजू असतात असे समजणे योग्य नाही –

व्यंगचित्रासारखेच हे व्यंगशब्द बघा ना ! जगात दोनच बाजू असतात या कल्पनेतून बाहेर पडा -- आपल्या जगण्यातली absurdity पाहणे, हाही एक प्रकार असतो -- तुम्हाला नसेल चालत तर वाचू नये, ही विनंती –

एक बाजू घेणे हा दुसऱ्या बाजूला नुइसन्स असतो आणि absurdity पाहणे हा सर्वांनाच ! म्हणून सगळ्यांनी सगळेच बंद करावे ? मग तर अभिव्यक्तिस्वातंत्र्याची गरजच संपेल !

आंतर्विरोध, स्वत:त फूट पाडणे, बाहेर फूट पाडणे -- ही सर्व मानवी मनाची अटळ कामे आहेत !

त्या यादीत, विचारसरणी, पक्ष हेही घ्यायला हवेत. पण, तुम्ही म्हणताय ते नुसते एक स्वप्नरंजन आहे कारण कुठे ना कुठे माणूस समरूप झालेलाच असतो. जे. कृष्णमूर्ती विचारतात तोच आहे खरे तर हा प्रश्न -- कंडिशनिंग शिवाय माणसाला जगता येईल का -- हा तो प्रश्न. पण, आपण बुद्धिप्रामाण्यवादाशी कर्मठपणे समरूप झालेले असल्याने, हे असले प्रश्न क्षणात उडवून लावणे, हेच घडेल. हा प्रश्न विचारणाऱ्याला वेडा ठरवले जाईल !

कवीची आकलन प्रक्रिया ' पोचणे ' असे काही घडणारच नसेल तर कविता लिहिली का जावी ? अर्थ म्हणजे आपण ' लावलेले ' वा 'वैचारिक अर्थ ' असे तर समजत नाही ? इथे, कविता विचाराच्या क्षेत्रापुरती मर्यादित असते का, असाही प्रश्न येईल. ' वैचारिक ' कवितेत तर वाचकाला कसले स्वातंत्र्य असेल ?

सर, मला जे दिसते ते असे -- मराठी भाषा, ती बोलणाऱ्यांच्या संख्येमुळे जगात 5 वी की 12 वी राहील, पण, साहित्यकला म्हणून ती नष्ट होत चाललेली आहे. लौकरच दार्शनिक तत्त्व असणारे साहित्य इथे कालबाह्य ठरणार आहे. याची खेदखंत कुठे फारशी दिसत नसल्याने ही प्रक्रिया वेगाने होईल असे वाटते. त्यामुळे, ज्याला जे समजते, महत्त्वाचे वाटते, ते त्याने करावे आणि आपण वाळवंटात मुतलो, असे समजून विसरून जावे, असा ' विकासकाल ' चालू आहे ! या परिस्थितीला प्रतिकार न करता आपले काम करत राहणे -- असे माझे चालूआहे. ( म्हणजे, तुम्ही काय स्वत:ला तारणहार समजता की काय, असे म्हणत काहीजण यावर उसळून येतील, हे मला माहीत आहे. ) सगळेच नष्ट होणार आहे, हेच खरे समाधान !

ही सवय मला कधी लागली ते आठवत नाही पण पूर्णविराम आणि सातत्य हे दोन्ही जाणवावे, असा हेतू असावा -- हे जाणीवपूर्वक तयार केलेले व्याकरण नाही. ( इथे पूर्णविराम दिला आहे ! )
नाटकांचे संवाद लिहितानाच हे घडते. इतर गद्य लेखनात नाही. ( पूर्णविरामा ऐवजी डॅश ).

नंतर या नाटकाचे पुनर्लेखन केलेले आहे -- ' चार नाटके ' या पुस्तकात ते घेतलेले आहे -- आता ते नाटक आटोपशीर आणि राजकीय/आर्थिक भागावर अधिक केंद्रित केलेले आहे. ही सुधारित आवृत्तीही संकेतस्थळावर आहे. --- इराक नाटकाबाबत.

एक पुरवणी -- एक सांगायचे राहिले. ' हॉटेल आणि मरण यांतली सीमा ' नामक एक एकांकिका लिहिली होती. एका गावात एक वेडसर माणूस असतो. तो बोलेल ते खरे होते, अशी त्याची प्रसिद्धी असते. तिथला एक हॉटेलवाला रोज त्याला फुकट खाऊपिऊ घालत असतो. एकदा तो असा त्या हॉटेलात खात बसलेला असताना तिथे, समजा, हंबीरराव येतात. हा वेडा बोलून जातो की हे या हॉटेलबाहेर पडले की मरणार आहेत ! हंबीरराव घाबरतात. ते, हॉटेल बंद करायची वेळ झाली तरी बाहेर पडणार नाही म्हणतात. आजूबाजूच्या गावांचे लोक हंबीररावांना पाहायला जमू लागतात, वगैरे ! तीही एकांकिका नीट जमली नाही म्हणून रद्द केली ! होती गंमत पण नाही जमली -- छोड दिया !

सुमारे 50 वर्षे नाट्यलेखन करत आलो आहे. आशयाच्या पाण्यात उतरून त्यावर लिहिले गेलेले फारच थोडे आहे. हा लेख तसा आहे. त्यामुळे, लाखे मित्र असले तरीही, धन्यवाद !

' तंबाखूची टपरी ' हे माझ्या अनुसर्जित कविता संग्रहाचे नाव मी पेसोआ च्या कवितेवरूनच दिलेले आहे !

माझे ' समतोल ' म्हणजेच, ' ए, आपण चहा घ्यायचा ? ' हे नाटक पाहून एका स्त्री प्रेक्षकाने विचारले होते की, " तुम्हाला स्त्रीचे मन इतके कसे समजते ? " याचे उत्तर काय ? सगळ्या पात्रांची मने वेगवेगळीच असतात -- ती कशी समजतात ? अशा सगळ्या प्रश्नांचे एकच उत्तर -- स्वत:चे मन समजणे आणि निरीक्षणे यांचे एकीकरण !

2024 ----

लौकरच येतील माझी खालील पुस्तके --
१. नाणेफेक आणि इतर पाच नाटके
२. ओळख परेड ( एकांकिका संग्रह )
मुख्यमंत्र्यांच्या हस्ते ' रंगवाचा ' प्रसिद्ध झाला याची फारशी कुणी दखल घेऊ नये, हे इथल्या सांस्कृतिक पर्यावरणाला धरूनच आहे !

आता इंग्रजीत –
Megha Herur is with Rita Bhatia and
Solid - The New Age Theater is thrilled to announce its next show, "Dhol Tashe," a co-production with Bay Area Drama Company.
The show will be staged at Pear Theatre in March [8th -17th] 2024.
Auditions on Nov 11 & 12.
Link for audition details Link: https://bit.ly/dhol-auditions

एका लेखकाच्या मनातली ॲब्सर्डिटी ---
( सिंहासनाधिष्ठित फोटो ).

Premanand Gajvee
खूप खूप जूना मित्र... चित्रकार सतीश नाईक...
लोकप्रभा..... साप्ताहिकात तो सहसंपादक होता...
काय गच्च होते ते दिवस... १९८० चा तो कालखंड.
'लोकप्रभा' चे एकांकिका विशेषांक प्रकाशित होतं असतानाचा तो काळ.... आणि तो काळ गाजवणारं नाव ....सतीश नाईक........आनंद नाडकर्णी, प्रकाश बुद्धीसागर, चंप्र देशपांडे, प्रेमानंद गज्वी अशा दिग्गजांच्या एकांकिका एकाच विशेषांकात..... आणि INT ची ती एकांकिका स्पर्धा म्हणजे लोकप्रभा विशेषांकाचीच स्पर्धा असे......
पार्टनर,देवनवरी, संसारानु पेंडधार ..... अशा कितीतरी एकांकिका.....ते एकांकिका विशेषांक.... आत्ता हाताशी नाहीत... नाही तर सगळ्या लेखकांची नावं मी इथं दिली असती...
हे सगळं आता इथं सांगतो कारण तो चित्रकार सतीश नाईक परवा (दि. १८/१/२०२४) भेटला दादर-माटूंगा DMCC त, डॉ.मीनाक्षी पाटील यांच्या 'उत्तर आधुनिकता आणि मराठी कविता' या प्रकाशन प्रसंगी....

कित्ती वर्षांनी.... तो काळ एकदम मेंदूत नाचू लागला... कडकडून मिठी भेट झाली... म्हटलं सतीश.... अरे कित्ती वर्षांनी भेटतोयस.... आणि एक सेल्फी काढली.....ती मिठी-ती भेट.... अजरामर असेल मेंदूत...

गिरीश रांगणेकर हा त्याच्या दोन मित्रांना बरोबर घेऊन काही वर्षांपूर्वी ' व्यक्त-अव्यक्त ' हे मासिक काढत असे. त्यात त्याने मला सल्लागार ही पोस्ट दिलेली होती. त्या मासिकात मी लिहीतही असे. तेव्हापासूनचा हा माझा मित्र आहे. शिवाय, हा एक मोठा माणूस आहे. अनेक टीव्ही वाहिन्या, सिंबायोसिस मध्ये विभागप्रमुख, टिळक महाराष्ट्र विद्यापीठात डीन, अशा जबाबदाऱ्या पार पाडण्याबरोबरच, अनेक जत्रा, प्रदर्शने आयोजित करणे, अनेक शॉर्ट फिल्म्स करणे आणि मुबलक परदेश प्रवास वगैरे खूप मसाला त्याच्या गाठीला आहे. आपली आपण पुस्तके प्रकाशित करायचे मी ठरवले तेव्हा मला लगेच याचीच आठवण झाली. तो नेहमीच या कामात मला साथ देत आलेला आहे. तो स्वत: एक उत्तम संपादक आणि एक हरहुन्नरी लेखक आहे. त्याच्यामुळेच मला आवश्यक त्या व्यक्ती, तंत्रज्ञ, चित्रकार हे मिळत आलेले आहेत. या चित्रातला तीसरा आदमी सुशील शिरसाठ हाही गिरीशमुळेच माझा मित्र झालेला आहे. त्यालाही, परदेशातल्या व इथल्या अनेक जाहिरात कंपन्यांबरोबर काम करण्याचा अनुभव आहे. हा मुखपृष्ठ या विषयात जो भी मंगता है ते करून देतो. या दोघांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे संगीतप्रेम ! गिरीश गायक असून सुशील हा अनेक वाद्यांचा वादक आहे. त्यांचा एक संगीतसमूह असून ते जाहीर कार्यक्रमही सादर करतात.  आणि माझे तर विचारूच नका ! लेखन आणि पुस्तक-प्रकाशन या कामांत मला ज्या ज्या गरजा निर्माण होतात त्यांची त्यांची पूर्तता करणारी माणसे आकाशातून येऊन माझ्यापुढे हजर होतात ! तर अशा आम्हा तिघांचा हा फोटो –

चंप्रंनी लिहिलेली असंख्य महत्वपूर्ण नाटके, दीर्घांक आणि एकांकिका यांना सध्या पुस्तकरूप मिळते आहे. प्रत्येक पुस्तक छापून आल्यावर आमची निवांत डिनर भेट अगदी ठरलेली असते. अश्या भेटींचे कधी फोटो काढले गेले नाहीत. मात्र कालची भेट त्याला अपवाद! म्हंटलं, पुस्तकाच्या नावाप्रमाणेच होऊन जाऊदे एकदम "खुल्लम खुल्ला"! सोबत माझा मित्र सुशील शिरसाट, ज्याने "खुल्लम खुल्ला" सह चंप्रंच्या "पाच ऍब्सर्ड नाटके" पुस्तकाचे देखील कव्हर डिझाईन केले आहे.
खरंतर सरांच्या या प्रकाशनाच्या, छपाईच्या कामात माझा सहभाग अगदी अल्पसा आहे. मात्र चंप्र सर त्यांच्या या पुस्तकांत अनेक मातब्बर मंडळींबरोबर माझे देखील आभार मानत आले आहेत आणि वर पुस्तक गरमा गरम छापून आल्यावर लगेचच्या भेटीत पुस्तकाची प्रत देखील सहीनिशी अगदी अगत्यपूर्वक भेट देत आले आहेत! आमची ही मोकळी ढाकळी भेट जणू वैचारिक मेजवानी असते. माणसाचं एकूण जगणं, मन, बुद्धी, विचारसरणी, कलेचा उपयोग अश्या असंख्य विषयांना कवेत (प्याल्यात?) घेत आमच्या गप्पा रंगत जातात. कालचीही भेट अर्थातच अपवाद नव्हती.  धन्यवाद चंप्र सर, आणखी एका यादगार मेहेफीलीसाठी! --- गिरीश रांगणेकर.

आरती प्रभू / चिं. त्र्यं. खानोलकर हे माझे आवडते कवी / लेखक ! त्यांच्या नावाचा पुरस्कार मिळणे याचा मला आनंद आहे ! --- ( आणि निमंत्रण पत्रिका ).

*आरती प्रभू पुरस्कार-२०२४*

बाबा वर्दम थिएटर्स ही कुडाळ (जि. सिंधुदुर्ग) येथील हौशी कलाकारांची नाटयसंस्था, कुडाळ येथील कै. बाबा वर्दम, के. वामनराव पाटणकर, कै. शंकरभाई वर्दम यांच्या प्रेरणेने व श्री. चंदू शिरसाट या प्रतिभावंत दिग्दर्शकाच्या मार्गदर्शनाखाली तसेच संस्थेच्या विद्यमान अध्यक्षा सौ. वर्षा वैद्य यांच्या नेतृत्वाखाली गेली ५२ वर्षे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रात अग्रस्थानी आहे. कुडाळ मधीलच नामांकित शैक्षणिक संस्था क.म.शि.प्र. मंडळाने सन २०१३ मधे संस्थेच्या कुडाळ हायस्कूल, कुडाळ या प्रशालेचे माजी विद्यार्थी, प्रतिभावान साहित्यिक कै. चिं. त्र्यं. खानोलकर ऊर्फ आरती प्रभू यांच्या नावे आरती प्रभू कला अकादमी ही संस्था स्थापन केली. या संस्थेमार्फत नृत्य, नाट्य, संगीत याचे प्रशिक्षण दिले जाते. क.म.शि.प्र. मंडळाचे कार्याध्यक्ष मा.शशिकांत गावडे, आरती प्रभू कला अकादमीचे अध्यक्ष मा. श्री. भाईसाहेब तळेकर तसेच संस्थेचे सर कार्यवाह मा. श्री. आनंद वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली अकादमीची वाटचाल जोमाने सुरू आहे.

कै. चिं.त्र्यं. खानोलकर उर्फ आरती प्रभू हे कुडाळचे सुपुत्र. त्यांच्या लोकविलक्षण प्रतिभेबद्दल कुडाळच्या साहित्य, नाट्य व शैक्षणिक क्षेत्रात वावरणाऱ्या सर्वांना अतिशय आदर आहे. त्यांच्या स्मृती चिरंतन रहाव्यात याकरीता त्यांच्या नावाने कवी, कवयित्री आणि नाटककार यांना आरती प्रभु पुरस्कार दिला जातो.

बाबा वर्दम थिएटर्स, कुडाळ आणि आरती प्रभू कला अकादमी, कुडाळ या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने हा आरती प्रभू पुरस्कार सन २०१३ पासून कविता आणि नाट्यलेखन क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कवी किंवा नाटककारास दरवर्षी दिला जातो. रोख रु. ११,०००/-, स्मृतीचिन्ह, मानपत्र व शाल-श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरुप आहे.

सन २०१३ सालचा पहिला पुरस्कार गोवा येथील प्रसिध्द कवी व नाटककार श्री. विष्णू सूर्या वाघ, सन २०१४ सालचा पुरस्कार पुणे येथील प्रसिध्द नाटककार श्री. सतीश आळेकर, सन २०१५ सालचा पुरस्कार मुंबई येथील प्रसिध्द नाटककार श्री. शफाअत खान, सन २०१६ सालचा पुरस्कार नागपूर येथील प्रसिध्द नाटककार श्री. महेश एलकुंचवार, सन २०१७ सालचा पुरस्कार मुंबई येथील प्रसिध्द नाटककार श्रीम. सई परांजपे, सन २०१८ सालचा पुरस्कार मुंबई येथील प्रसिध्द कवी डॉ. महेश केळूसकर, सन २०१९ सालचा पुरस्कार मुंबई येथील प्रसिध्द कवी श्री. किशोर कदम उर्फ सौमित्र, सन २०२१ सालचा पुरस्कार मुंबई येथील प्रसिध्द नाटककार श्री. प्रेमानंद गज्वी, सन २०२२ सालचा पुरस्कार प्रसिध्द कवी श्री. गुरु ठाकूर, सन २०२३ सालचा पुरस्कार पुणे येथील प्रसिध्द कवयित्री श्रीम. अरुणा ढेरे यांना प्रदान करण्यात आला.

*या वर्षीचा पुरस्कार पुणे येथील ज्येष्ठ नाटककार श्री. चं. प्र. देशपांडे यांना देण्यात येणार आहे. सदर पुरस्कार वितरण रविवार दिनांक ०४ फेब्रुवारी २०२४ रोजी सायंकाळी ६.३० वा. एकनाथ ठाकूर सभागृह, संत राऊळ महाराज महाविद्यालय, कुडाळ येथे केले जाणार आहे. हा पुरस्कार वितरण सोहळा सुप्रसिध्द दिग्दर्शक, अभिनेते डॉ.

शरद भुताडिया यांच्या हस्ते तसेच बाबा वर्दम थिएटर्सचे संस्थापक श्री. चंदू शिरसाट व आरती प्रभु कला अकादमीचे अध्यक्ष श्री. अविनाश उर्फ भाईसाहेब तळेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत व बाबा वर्दम थिएटर्सच्या अध्यक्षा सौ. वर्षा वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे.*

या पुरस्कार वितरण सोहळ्याला सर्वांनी उपस्थित रहावे असे आवाहन बाबा वर्दम थिएटर्सचे कार्यवाह श्री. केदार सामंत व आरती प्रभू कला अकादमीचे कार्यवाह श्री. आनंद वैद्य यांनी केले आहे.

कै. चिं. त्र्यं. खानोलकर यांनी त्यांची ' त्रिशंकू ' ही कादंबरी मला सप्रेम भेट दिली होती -- त्याचा हा फोटो –

माझ्या ' मन ' या दीर्घांकाच्या बाबतीत आपल्या परिनिरीक्षण मंडळाचे एक पत्र आलेले असून, त्यांनी त्या संहितेतल्या शिव्या वगळायला सांगितले आहे. त्याला मी दिलेले उत्तर खालीलप्रमाणे आहे --
सप्रेम नमस्कार.
' मन ' या मी लिहिलेल्या दीर्घांकातल्या शिव्या -- भिकारचोट, भडव्या, भडवे --
या वगळण्याबाबतचे आपले पत्र पोचले.
मला ही सूचना मुळीच मान्य नाही. नुसतेच संदर्भहीन शिव्यांचे शब्द
पाहून ते वगळायला सांगणे हे पूर्णपणे चुकीचे आहे. त्या संहितेत, त्या त्या ठिकाणी
त्या शिव्या, ते शब्द आवश्यक वा योग्य आहेत की नाहीत ते पाहिले जायला हवे.
तरीही, या कारणामुळे तुमचे प्रमाणपत्र मिळणार नाही -- ही बाब -- हा विषय
मी नाट्यकर्मींच्या व इतरांच्या चर्चेसाठी जाहीर करत आहे.
कळावे.
आपला,
चं. प्र. देशपांडे.
पुणे, दिनांक -- ३१-०१-२०२४.

सन्मान आणि भाषणाची बातमी –

मुंबई विद्यापीठाच्या नाट्यशास्त्र विभागाचे संचालक योगेश सोमण, आरती प्रभू कला अकादमीचे अध्यक्ष अविनाश ऊर्फ भाऊसाहेब तळेकर, डॉ. शरद भुताडिया, मी, बाबा वर्दम थिएटर्स च्या अध्यक्षा सौ. वर्षा वैद्य, बाबा वर्दम थिएटर्स चे संस्थापक चंदू शिरसाट --- पुरस्कार वितरण सोहळा, दिनांक -- ०४-०२-२०२४. ( फोटो ).

पावन खिंडीच्या विजय स्तंभाजवळ – ( फोटो ).

कोंडुऱ्याच्या समुद्रकिनाऱ्यावर – ( फोटो ).

Dhol Tashe - Cast Introduction

Solid - The New Age Theater presents Dhol Tashe in collaboration with Bay Area Drama Company

Tickets at www.badco.art/tickets

Roshni DattaPrathyay BhandarkarKrishna DasVaishnavi SridharRita BhatiaChampra Deshpande Sandeep K Belliappa

Megha Herur

Solid - The New Age Theater in collaboration with Bay Area Drama Company invites you to our upcoming play Dhole Tashe by Champra Deshpande.

Tickets : www.badco.art/tickets

We have 6 shows :

March 8th : 8:00 p.m, PST

March 9th : 2:00 p.m, PST

March 10th : 2:00 p.m, PST

March 14th : 8:00 p.m, PST

March 15th : 8:00 p.m, PST

March 16th : 2:00 p.m, PST

Roshni DattaPrathyay BhandarkarKrishna DasAshwini VishwanathMugdha ManerkarVaishnavi SridharRita Bhatia

#DholeTashe #solidtheaterplays

आता माझी खालील पुस्तके ---

१ चार पुरुषार्थांची चार नाटके

२ वस्तू आणि इतर सहा दीर्घांक

३ पाच अब्सर्ड नाटके

४ खुल्लम खुल्ला ( एकांकिका संग्रह )

५ आवर्तने ( कविता-आशय-आकलन )

पुढील ठिकाणीही उपलब्ध आहेत ---

पुस्तकवाला अँड कंपनी,

पुणे.

फोन -- ८६२४९७७०२९.

आणि

परेश एजन्सी,

अप्पा बळवंत चौक,

पुणे.

फोन -- ८२७५४८५४८५ .

इच्छुकांनी जरूर लाभ घ्यावा.

‘ मन ‘ विषयक –

हा एक एकपात्री दीर्घांक आहे -- जो नीट करेल तो नटसम्राटच !

वर्धन कामत ची जाहिरात.

आजचे –

हा एकपात्री दीर्घांक सादर झाल्याचे हे एकच उदाहरण -- अनेकांनी प्रयत्न केले आणि मध्येच सोडून दिले -- आता सध्याही एक प्रयत्न सुरू आहे -- तपशील नंतर सांगेन -- चालू असलेल्या प्रयत्नाला अर्थातच शुभेच्छा !

एखाद्या छोट्या तपशीलाचाही कसा होतो विचार ---

Story of a Tubelight:

Often overlooked in the spectacle of a dramatic performance are the minute details that go unnoticed. The success of a play truly lies in the unassuming hustle and dedicated efforts of the cast and crew.

As the director of the ongoing play, "Dhol Tashe," I desired to incorporate tube light as a symbolic prop, representing a middle-class Indian home. This seemingly insignificant element, often overlooked as part of the household, holds immense significance in bringing life to the living room.

The Tubelight's illumination made the stage overly bright. No extra screens were available to reduce the intensity. Despite agreeing to leave the prop as is, I was disappointed, which my co-founder, Sandeep K Belliappa, noticed. This decision resulted from many trials and errors.

The next evening, Sandeep K Belliappa worked with the lighting crew, who were unfamiliar with using parchment paper. Despite their skepticism and warnings against his method, he remained steadfast. Before abandoning the idea completely, he made a final attempt, asking me to bring some parchment for the crew to experiment with. To reduce the intensity of the tube light, we wrapped it with multiple layers of parchment paper, and voila!

It created the desired effect, reducing the light's intensity. The tube light now blended seamlessly with the other set elements, resulting in a beautifully lit living room area. Sometimes, giving up in the face of a problem is tempting. However, the solution often emerges unexpectedly if you give it enough time to marinate and think it through.

3 more shows to go [Thursday - 8:00 pm PST, Friday - 8:00 pm PST, Saturday - 2:00 p.m PST]

Tickets: www.badco.art/tickets

"Dhol Tashe" is an extraordinary theatrical masterpiece that captivated me from start to finish, leaving me utterly spellbound for its entire 90-minute duration. This play skillfully navigated the intricate realms of politics, religion, and culture with a delicate touch, seamlessly weaving them together to deliver a subtle yet impactful message. This nuanced approach added layers of depth to the narrative, allowing for a rich and thought-provoking experience. The play had just enough humor to keep things fun and lively.

Moreover, the theater setup itself played a pivotal role in enhancing the overall immersion. Every element, from the set design to the lighting, contributed to creating an atmosphere that enveloped the audience completely. As a front row spectator, I felt transported into the world of the play, fully engaged and emotionally invested in every moment.

And let's talk about the actors! How on earth did they pull off those intense dialogues with such deep expressions flawlessly? It was like they were living their roles. I was completely hooked on every word they said. In a production filled with

standout performances, Roshni Datta's talent shone the brightest. Her portrayal added layers of depth and emotion to an already captivating story.

"Dhol Tashe", presented by Solid - The New Age Theater, was an incredible play that left a lasting impression on me. If you get the chance to see it, don't miss out!

माणसाला नुसतीच बाह्य परिस्थिती नसून एक मनही असते, हे समजणे हा चांगल्या कलेचा पाया असतो.

लौकरच -- एक एकपात्री दीर्घांक – ‘ मन ‘ –

Champra Deshpande यांचा " मन " हा एकपात्री दीर्घांक मला कळल्यापासून मी तो सादर करण्याचा प्रयत्न करीत राहिलो आहे. अजूनही मनात आहे - पण आजपर्यंतचा अनुभव असा की बरेचसे नट हा दीर्घांक अर्ध्यावर सोडून निघून गेले. कारण मन हा दीर्घांक शिवधनुष्य आहे.

मग मी अनेक पात्रांना घेऊन तो दीर्घांक " मनाचे शोक " या नावाने काला घोडा फेस्टिवलला केला. एकच प्रयोग झाला. चांगला वाईट असं पाहिलं गेलं तर वाईट नव्हता झाला प्रयोग.

काल एका ग्रूपवर वाचलं की अभिजित झुंजारराव त्या दीर्घांकाचा प्रयोग करतो आहे. हा दीर्घांक करण्याचं मनात येणं ही मुळात ग्रेट गोष्ट आहे. मन दीर्घांक एकपात्री आहे. पण मन अनेकपात्री असतं. ते पात्र कोण करतंय माहीत नाही. पण जो कुणी तयार झाला त्याला सलाम.

हा दीर्घांक अभिनेत्याने पेलायचा आहे. अभिजित झुंजाररावच्या अभिनय कल्याण या संस्थेला या दीर्घांकाच्या सादरीकरणासाठी मनःपूर्वक शुभेच्छा. --- रवीन्द्र दामोदर लाखे.

पुरोगामी आणि अभिव्यक्ती

पुरोगामी लोक हे अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे भोक्ते असतात, हे आपल्याला अनेकदा दिसते. पण त्याचबरोबर त्यांच्या मतांपेक्षा वेगळी मते वा आकलन-प्रक्रिया असणाऱ्यांना पाहिले की ते बिथरतात, हेही दिसते. त्यांची जणू सुरक्षितताच धोक्यात येते. या भीतीतून ते लगेच हल्ले सुरू करतात. अपशब्द वापरू लागतात. एखादा लेखक ‘ वेगळा ‘ असेल तर त्याला ते बोटचेपा, पळपुटा, कुंपणावरला, भित्रा, ब्राम्हणी, असे काही म्हणू लागतात. त्यांच्यांतले असले आंतर्विरोध हा विषय वेगळा आहे. इथे मुख्यत: कला-साहित्य-संस्कृती या क्षेत्रांतल्या सर्जक प्रक्रियांबद्दल

बोलायचे आहे. कला ही फक्त परिवर्तनाचे साधन असते एवढेच पुरोगाम्यांचे कलेबाबतचे संकुचित ज्ञान असल्याने त्यांचे लक्ष फक्त बाह्य परिस्थितीवर असते. मानवी मनाच्या कृती आणि त्याच्या समस्या यांकडे त्यांचे दुर्लक्ष होत असते. याचा परिणाम असा होतो की दलित-पीडित-वंचित यांचे अनुभव आणि वास्तववाद यांपलिकडचे सर्व कलाक्षेत्र हे असंवेदनशील, आपमतलबी लोकांचे असते, असे ते समजतात. मनाच्या अवस्था, समस्या, प्रक्रिया यांचे भान घेण्यातून येणारी सर्जक प्रक्रिया ही पूर्ण मानवात परिपक्वता निर्माण करणारी आणि पर्यायाने प्रेम आणि सौहार्द यांची निर्मिती करणारी असते, हे त्यांना समजत नाही. त्यामुळे, कलाक्षेत्रात बदलत जाणाऱ्या अभिव्यक्ति-पद्धतींचे त्यांना काही देणेघेणे नसते. त्यांना वास्तववादापलिकडे काही कळत नाही. आधुनिकता, उत्तर-आधुनिकता, अतिवास्तववाद, न-कविता वा न-नाट्य, मृषा ( अब्सर्ड ) कला, अमूर्त कला, अशा सर्व गोष्टींपासून ते फटकून असतात. इंटरेस्टच नसते. त्यामुळे, त्यातले काही कळतही नाही. याचा राग ते ‘ इतर ‘ लेखक-कवींना असंवेदनशील म्हणून काढतात.

संख्येच्या बळावर, साहित्य-कला यांचा असा तिरस्कार असूनही ते या क्षेत्रातल्या मोक्याच्या जागा पकडून बसलेले असतात. ते साहित्य संमेलनाचे अध्यक्षही होतात पण साहित्याची कवडीची समज व्यक्त न करता राजकीय भाषण ठोकून निघून जातात. पुस्तके कोणती विकत घ्यावी, कोणती अभ्यासाला लावावी, कशावर परिसंवाद घ्यावे वगैरे बाबींवर आणि प्रसिद्धी देण्यावरही त्यांच्या या संकुचिततेचा प्रभाव असतो. त्यामुळे, एकूण भाषेचा समाजातला वापरच अधिकाधिक ढोबळ होऊ लागतो. भाषेच्या सूक्ष्म अर्थांना वाव देणारे लेखन कुणी अभ्यासूही नये आणि तसे निर्माणही होऊ नये, असे त्यांना वाटते. जागतिक वाङ्मयात काय चालले आहे याच्याशी त्यांना काहीच कर्तव्य नसते. यांच्या बोलण्यात सहसा, ‘ वेटिंग फॉर गोदो ‘ किंवा त्याचा लेखक बेकेट, पिरांडेल्लो, काफ्का, जॉईस, डिकिन्सन, पेसोआ, एवढेच काय शेक्सपियरही फारसा नसतो. इंटरेस्ट नाही, त्यामुळे अभ्यास नाही, त्यामुळे कळतच नाही, अशी अवस्था. या प्रकारात समीक्षा नष्ट होते. साहित्याच्या मूल्यमापनाच्या शक्यताच नष्ट होतात. काही पुरोगामी लेखक धोरणी असतात. ते बाहेर या टोळीत राहतात पण आपल्याला लिहायचे तेच लिहितात. लेखन सतत राजकीय भूमिकेच्या डबक्यात घोळवत ठेवत नाहीत. तरीही पुरोगामी त्यांना स्वीकारत राहतात.

नीट पाहिले असता, असे दिसते की हे तथाकथित पुरोगामी सोडता, अमुक भूमिका घ्या म्हणून इतर कुणी लेखक-कलावंतांवर दबाव आणताना दिसत नाहीत. प्रत्येक चांगला लेखक स्पष्टपणे आपला पाठीराखा असावा असे त्यांनाही वाटते. पण तसे नसेल तर ते प्रत्येक ठिकाणी ढवळाढवळ करत नाहीत. हे पुरोगामी लोकच लगेच लेखक-कलावंतांची व्यक्तिगत मूल्यमापने सुरू करतात. कालपर्यंत ग्रेट असलेला आज एकदम टाकाऊ होतो ! असुरक्षितता आणि न्यूनगंड यांतून त्यांच्यांत एक प्रकारचा आक्रमकपणा येतो. कोणत्याही सत्ताधाऱ्याला इथे गरिबांचे भले केल्याशिवाय सत्तेवर राहताच येणार नाही. पण आम्हीच तारणहार, आम्हीच काय ते भले करणार अशी पुरोगाम्यांची खात्री आणि त्यातून येणारा कट्टरपणा असतो.

या सगळ्या प्रकारात मुक्त अभिव्यक्ती मार खात जाते. समाजाचा सांस्कृतिक स्तर घसरत जातो. मुख्य म्हणजे भाषेच्या शक्यता शोधणे कमी कमी होत गेल्याने भाषा फक्त उपकारापुरती उरते. मराठी माणसांच्या संख्येमुळे जगात या भाषेचा जो नंबर आहे त्याला नसतो धोका पण भाषा बेजान होत जाते.

हा काही एखादा प्रबंध नव्हे. ही आहेत इम्प्रेशन्स आणि अनुभव. हेही पुरोगाम्यांना सहन होणार नाही आणि क्षणात त्यांची सहिष्णुता खतम होईल याची मला जाणीव आहे. हे मुद्दे मी या ना त्या प्रकारे मांडत आलेलोच आहे. मी स्वत: कुणाचाही दबाव घेत नाही. माझे लेखन आवडले नाही की काही लोक लगेच व्यक्तिगत मूल्यमापनावर येणार याचा मला अंदाज असतोच. मी स्वत:ला ना पुरोगामी म्हणवतो ना हिंदुत्ववादी. पण, तत्त्वज्ञान आणि अध्यात्म ( धर्म नव्हे ) यांच्या चिंतनात्मकतेशिवाय कला-साहित्य हे व्यापकपणे मानवी जगण्याला प्रस्तुत होत नाही, असे माझे आकलन आहे. या दोन्ही गोष्टींचे पुरोगाम्यांना वावडे असते. तसे वावडे बिगर-पुरोगाम्यांना नसते. कुणा एकाच्या वा कुणा टोळीच्या मताप्रमाणे आख्खे जग होण्याची कदापि शक्यता नाही. हे सत्य समजून घेऊन कला-साहित्य-विचार ही क्षेत्रे मोकळी असण्याची आवश्यकता आहे. अन्यथा सर्वांचेच नुकसान आहे.

--- ००० ---

Champra Deshpande यांचं ढोलताशे हे नाटक

प्रतिगामींच्या विरोधात नाहीये नि ते नाटक केवळ पुरोगामी विचार प्रसृत करणारं नाटकही नाहीये. मुळात ते कुठला विचार मांडणारं नाटक नाहीये. --- लाखे.

नाव

एका व्हिडिओत जिथे माझे नाव असायला हवे तिथे ते आलेले नाही. एका ठिकाणी माझे भाषण शब्दांकन करून छापले गेले तिथेही शब्दांकनकर्त्याचे नाव आहे पण माझे, भाषणकर्त्याचे नाही. " चांगले काम हे निनावीच असते " असे मी कधी कधी म्हणत असतो -- ते नियतीने ऐकले असावे !

--- ००० ---

प्रत्येक लेखकाने कुणाला काय वाटते आणि कोणतेही फडतूस राजकीय कट्टर कॉमेंटकार काय म्हणतात याची पर्वा न करताच लिहायला हवे !

सगळ्या समस्यांचे बीज माझ्यात आहे असे मला दिसते -- मी तिकडे लक्ष देतो -- मी अमुक करत नाही म्हणजे हिम्मत नाही असे तुम्ही समजू शकता. चांगल्या कलावंतांना खरी हिम्मत कवटीच्या आत करावी लागते, हे एक दुर्लक्षित सत्य आहे. ०१-०४-२४,

कवी होणे

मी लहान असताना कधी कधी माझ्या वडिलांनी धावत्या लिपीत इंग्रजीत काही लिहिलेले मी बघत असे. आपणही का लिहू नये असे या विचाराने दोनतीनदा तसेच काही उलट्यापालट्या रेषा आणि मध्ये मध्ये थोडी जागा सोडलेली असे गिचमिडून वडिलांना मी त्याचा अर्थ विचारला होता. ते म्हणत, याला काही अर्थ नाही. त्यासाठी आधी इंग्रजी यावी लागते आणि धावती लिपी यावी लागते. यावर मी खट्टू होत असे. पुढे, मला साहित्याची आवड आहे असे गृहीत धरून मी सत्यकथा आणि मुख्यत: त्यातल्या कविता वाचू लागलो. मी त्यावर बारकाईने विचार करत असे. एकूण सूक्ष्म निरीक्षणांती मला असे लक्षात आले की एकमेकांशी संबंध नसलेले शब्द घ्यायचे आणि अर्थाचा आभास निर्माण करण्यासाठी मध्ये मध्ये आठवतील ती क्रियापदे टाकायची की होते कविता. हे माझे ज्ञान मी लगेच अंमलात आणले. तशा सुमारे दहा कविता लिहून दिल्या पाठवून सत्यकथेकडे. त्या एका आठवड्यात उलट टपाली साभार परत आल्या. एकदा नसतील कळल्या त्यांना आपल्या कविता म्हणून पुन्हा एकदा तसाच प्रयोग करून पाहिला. याही वेळी ' तुझे ठेव तुजपाशी ' म्हणून त्याही परत आल्या !

सांगायचे कारण असे की रूटीन घिसेपिटे अनुभव आणि गुळगुळीत आदर्शांच्या कल्पना एवढ्या भांडवलावर कविता होतात असे अनेकांना वाटते, असे दिसते. ते कवितेसारखे लिहिताही येते आणि जरा पैसे असले की त्याचे पुस्तक काढणेही आता फारसे अवघड राहिलेले नाही. ( मी स्वत: काढतोच आहे की माझी पुस्तके ! ) आणि गंमत म्हणजे अनेकांना असे वाटते की असे लिहीत राहिले की एखादा समीक्षक येईल आणि त्याला ग्रेट म्हणेल ! ( तसेही घडू शकण्याचा काळ आहेच ! ) केशवसुतांना कुणी विचारले होते म्हणे की मला कवी व्हायचे आहे तर काय करावे लागेल ? ते म्हणाले होते म्हणे की कविता ही वीज असते, ती भाजूनही काढू शकते, ती आहे का आपली तयारी, हे आधी पाहावे. सार्त्र म्हणतो की सर्जक लेखन करायचे असेल तर मेंदूतली हाडे मोडली जाण्याचा धोका पत्करावा लागतो ! बरे, ठीक, मला व्हायचेच आहे लेखक वा कवी तर चला, मी आहे तयार तशी वीज हातात धरायला वा मेंदूतली हाडे मोडून घ्यायला, त्यासाठी काय करू ?

आदर आणि प्रसिद्धी मिळवण्यासाठीचा, ' ग्रेट रायटर कैसे बनोगे ', असा हा सोपा मार्ग नाही असू शकत. आधी खरोखरचे जगणे, खरोखरचे प्रश्न, अशीच असणार ती प्रक्रिया. प्रसिद्धीच्या भिकारडेपणातून चांगली कविता नाही लिहिली जाणार ! स्वत:च्या जगण्याकडे गंभीरपणे पाहण्याची आच आणि निकड असणे हेच महत्त्वाचे. गंभीर याचा

अर्थ विनोदविरहित नव्हे. आधी जगणेच धगधगते हवे, मग कविता लिहिली जाईल अथवा न जाईल. कविता लिहिणे घडायलाच हवे असे वाटत नसेल तरच सर्जक कविता लिहिली जाऊ शकेल ! ( -- असे वाटते ! )

--- ००० ---

'नाणेफेक' या चंप्रंच्या नव्या पुस्तकनिमित्त बुधवारची आमची संध्याकाळ स्मरणीय झाली! चंप्र सरांबरोबरच्या गप्पा नेहमीच एक समृद्ध करणारा अनुभव असतो. गप्पा किती रंगल्या याचे थोडक्यात वर्णन -- 'कोई हमदम ना रहा', 'अकेला हूं मैं', 'साथी ना कोई मंझिल' अशी माझी काही अतिशय आवडती गाणी आहेत असे म्हणत सर मस्तपैकी गाऊ देखील लागले, म्हणजे बघा.. चंप्रंना आम्ही याची देही याची डोळा गाताना अनुभवले! खरे-खोटे करायचे झाल्यास 'नाणेफेक' आहेच!! ( गिरीश रांगणेकर आणि सुशील शिरसाठ यांच्यासह फोटो ).

मजेदार आठवण -- आता या दोघांच्या संगीत कार्यक्रमात गाण्याची ऑफर आली आहे ! काय काय करणार ? !

Satish Tambe यांच्या एका पोस्टवर दिलेली कॉमेंट ---
कवितेत, हे विशेषण अमूकच विशेष्याचे असा निर्णय होण्याची गरज नाही -- त्या अनिश्चिततेसहच कविता जाणवत जावी. बौद्धिक अनेकार्थता ठीकच पण एकूण भान या अर्थी चांगल्या कवितेला एक ' न कळणारा ' अर्थही असतो. म्हणजे जाणवतो पण त्याचे बौद्धिक निवेदन शक्य होत नाही.

मेहनत तर जोरदार चालू आहे -- प्रयोगाला शुभेच्छा ! ( मन ).

प्रयोगाला होऊ द्यात हो सात वर्षे -- माझी नाटके असतात ---
सदाहरित देव आनंद ! ( रिनोव्हेशन या हिंदी नाटकाचा फोटो ).

घोषणा --- ( गुढी पाडवा पोस्टर – मन ).

कवितेला
थोडे तरी
बातमीमूल्य असावे लागते.

DrNitin H. Deshpande is with Sandhya Kulkarni and
जीवनात कायम राहून गेलेले अनुभव !

पुण्याच्या "पी डी ए " सारखी सांगलीत "एडीए " (Amateur Dramatic Association ) नामक संस्था होती. त्यांच्या वतीने दरवर्षी भावे नाट्यगृहात एकांकिका स्पर्धा भरविल्या जात असत. त्या काळात खूप काही प्रतिसाद नसे पण सांगलीतील नाट्यकर्मी यानिमित्ताने एकत्र येत आणि दोन- तीन दिवस महाविद्यालयांमध्ये जोश भरत असत. आधीचे तालमींचे दिवस वेगळेच.

.

कायम वानवा असायची ती चांगल्या संहितांची (स्क्रिप्टसची) - जी आजही आहे ४० वर्षांनंतर. (आज सकाळी संजय मोने यांनी "मित्र म्हणे " मध्ये हीच री ओढली.) स्पर्धा म्हटलं की पारितोषिके जिंकण्याची हिरीरी अफाट. मग तेवढी रक्कम मिळवून देण्याची ताकद असलेली संहिता हवी. त्यांत आमच्या वालचंद मध्ये अट होती- रंगमंचावर आमच्या समवेत कॉलेजच्या मुली काम करणार नाहीत( त्यांच्या पालकांची लेखी परवानगी असेल तरच. अन्यथा----) मग स्त्रीपात्र विरहित एकांकिकांची अपरिहार्य शोधाशोध.

.

अशात आमच्या रमेश घोलपने (त्यावर्षीचा जी एस) हट्टाला पेटून, प्राचार्यांची समजूत घालून आमची एंट्री पाठविली. आणि वर त्यांनाच अट घातली- बक्षीस मिळाले तर बक्षीसाच्या रकमेतून महाविद्यालयात "आर्टस सर्कल " सुरु करणार. (पुण्याचा बी जे किंवा मिरज मेडिकल च्या धर्तीवर, त्याच्या उदघाटनासाठी "अष्टविनायक " च्या वंदना पंडीत यांना सांगलीत त्या "अश्वमेध " साठी आल्या असता, भेटून त्यांचा तत्वतः होकारही मिळवलेला) त्यावर्षी पुरुषोत्तम करंडकला दुसरी आलेली चं प्र देशपांडे यांची "इतिहास " एकांकिका त्याने मिळविली. पात्रे -इन मीन तीन, त्यांतही एक मूक !

.

संहितेचे वाचन झाल्यावर काही हौशी मंडळी आपोआप गळाली. चं प्र देशपांडे यांची भाषा ओठांवर चिकटवण्यात तालमीतील ४-५ दिवस गेले. विषय समकालीन असल्याने तालमींना मजा येत होती. समोरच्या विलिंग्डन च्या प्रदीपने (तोही घोलप्याचा नाट्यमित्रच) "काहूर " नामक एकांकिका बसवायला सुरुवात केली होती- पात्रे दोन आणि स्क्रिप्ट खास मुंबईच्या मित्राकडून आणलेले. अंगातलं स्पर्धेचं स्पिरीट अधिकच भिनलं. ताज्या दमाने प्रॅक्टिस केली. रंगीत तालीमही मनाजोगती झाली.

.

तीन दिवस स्पर्धा चालणार होती- तब्बल एकवीस एन्ट्रीज आल्या होत्या.

स्पर्धेचा दिवस उजाडला.(की रात्र उजाडली.) आमची एकांकिका अनुक्रमे तिसरी होती. नाट्यगृह तुफान भरलेलं आणि तरुणाई (त्याही काळी) चेकाळलेलीच असायची. पाडापाडी जोशात सुरु होती.

तितक्यात संयोजकांपैकी एकजण माझ्याजवळ एका व्यक्तीला घेऊन आले. ते साक्षात एकांकिकेचे लेखक -चं प्र होते. खास आमचा प्रयोग बघायला आलेले होते.आमचं टेन्शन वाढलं. त्यांनी आम्हांला शुभेच्छा दिल्या. बोलता बोलता म्हणाले-

" आजवर इतिहास एकांकिका कायम दुसरी आलीय. तुम्हीं तिचा हा इतिहास मोडीत काढावा."

.

प्रयोग झाला- अपेक्षेपेक्षा भन्नाट, आम्हालाही चकित करून जाणारा. नटराज रंगमंचावरील तिघांच्याही अंगी भिनला होता. रंगदेवता आमच्या मदतीला आली होती. एकांकिका झाल्यावर लेखक महोदयांनी आमचे अभिनंदन केले. आम्ही त्यांना दुसऱ्या दिवशी दुपारी वालचंदच्या मेसमध्ये जेवण्याचे निमंत्रण दिले. त्यांनीही ते अगत्याने स्वीकारले.

.

जेवणा अगोदर हॉस्टेल रूममध्ये जयंत असनारेने त्यांच्यासमोर विनोदी पद्धतीने "इतिहास" चा नाट्यांश सादर केला. स्वतःच्या अर्थवाही, धीरगंभीर लेखनाचे असे इंटरप्रिटेशन बहुधा त्यांनीही यापूर्वी बघितले नसावे. अवघ्या बारा तासांच्या अवधीत आम्ही त्यांची एकांकिका त्यांच्यासमोर दोन प्रकारे सादर केली. त्यांना दुसराही प्रयोग (?) आवडला असावा, कारण त्यांनी जयंताचे कौतुक केले.

.

स्पर्धेचा निर्णय जाहीर झाला- " इतिहास " एकांकिकेने तिचा आजवरचा इतिहास मागे टाकत पहिले बक्षीस (रुपये १०००/- साल १९७८-७९) मिळविले होते. ठरल्याप्रमाणे आम्ही "आर्टस सर्कल " ची स्थापना वालचंद मध्ये केली.
ता. क.- या पुढचे "नाट्य" विस्तारभयास्तव उद्याच्या पोस्टमध्ये !

DrNitin H. Deshpande is with Sandhya Kulkarni and
जीवनात कायम राहून गेलेले अनुभव -२ ( नाट्यगृहाबाहेरचे नाट्य)

.

मा. प्र . पु. चा.

.

रिझल्ट अनाउंस झाला. "इतिहास" पहिली आणि प्रदीपची "काहूर " दुसरी ! मात्र सगळी व्यक्तिगत (दिग्दर्शन, अभिनय) बक्षीसे प्रदीपला. सगळीकडे गारेगार वातावरण पसरलं होतं. नाट्यगृह भानावर यायला अंमळ उशीरच झाला. सगळ्यांचा आपापल्या कानांवरचा विश्वास उडाला होता. मी धरून सगळे गृहीत धरून चालले होते- " काहूर " प्रथम आणि "इतिहास" दुसरी !

.

तुम्हांला काय वाटलं -पडदा पडला या इष्टोरीवर? अहो, अजून दुसरा आणि तिसरा अंक व्हायचाय.
"इतिहास " च्या परिघाबाहेर मी होतो- अनाउंसमेंट, मेकअप , लायटींग असलं काहीबाही गरजेनुसार सांभाळत होतो. त्यामुळे नंतरच्या घटनांचा मी आपोआप मूक साक्षीदार (एकांकिकेतील "बाकी " सारखा) झालो.

.

व्यक्तिशः मला "काहूर" जास्त आवडली होती- आमच्यापेक्षाही. पण मला हेही माहित होतं -स्पर्धांचे निकाल कधीच सर्वमान्य होत नसतात. विशेषतः विजेत्यांची संख्या आणि हात हलवत परत जाणाऱ्यांची संख्या हे प्रमाण मी कायम व्यस्त असतं हे मी अनेक स्पर्धांमध्ये अनुभवलंय. स्पर्धा सगळ्यांना खूश ठेवू शकत नाही.

.

प्रेक्षकांचे आणि परीक्षकांचे तराजू वेगवेगळे असतात.

.

त्यामुळे प्रत्येक निकालानंतर अशा विषम लढाया, पार्शालिटीची ओरड, हळहळ, सेलिब्रेशन होतच असते. पण यावेळी हे सर्व तात्कालिक नव्हते. रमेश आणि प्रदीप खरेतर जानी दोस्त, पण निकालाने त्यांच्यात दरी पडली. प्रदीपने डूख धरला. दुसऱ्या दिवशी स्थानिक वृत्तपत्रात बातमी-

.

" रमेश घोलप यांनी एकांकिकेच्या वेळी नारळाऐवजी रुपयाची नोट फाडून रंगमंचाची पूजा केली."

.

अपेक्षित स्फोट झाला. वाचकांचा पत्रव्यवहार वाढला. यानिमित्ताने स्पर्धेच्या निकालावर झोड उठली.

.

या पूर्वनियोजित यादवी मागे रीतसर प्रदीप होता. आमचा ग्रुप स्वस्थ असला तरी निखळ गुणवत्तेवर मिळालेलं यश मात्र दूषित झालं होतं. रमेशच्या कर्तृत्वाचे शेण झालेलं. प्रत्येक ठिकाणी प्रदीप "काहूर" माजवून गेला.

.

पुढील आठवड्यात वरील पार्श्वभूमीवर बक्षीस समारंभ होता. पुण्याहून पी डी ए चे भालबा केळकर (आमचे वालचंदचे भालबा केळकर सरही ए डी ए च्या संस्थापकांपैकी एक होते). अध्यक्ष म्हणून आलेले होते. प्रदीप काळ्या पोशाखात हजर होता. हॉलभोवती त्याची मित्रमंडळी घोषणा देत होती. खालमानेने त्याने त्याची सगळी बक्षिसे स्वीकारली. सगळा समारंभ केविलवाणा ! वरताण म्हणजे त्याने भालबांना एक चिठ्ठी दिली.

.

पडद्यामागच्या या स्टोरीबद्दल पाहुणे सर्वथैव अनभिज्ञ ! तरीही चिठ्ठी वाचून त्यांना अदमास आला, ते मनोज्ञ बोलले-
" परीक्षक निवडायचा हक्क स्पर्धकांना नसतो. निर्णय लागल्यानंतर त्यांवर गदारोळ उठविण्यापेक्षा तो खिलाडूवृत्तीने स्वीकारायचा असतो. संयोजकांना मान हा द्यायलाच हवा. परीक्षकांचे निकष हवे तर जाणून घ्या, पण त्यांच्या निर्णयक्षमतेवर विश्वास ठेवा अन्यथा स्पर्धेत उतरू नये. किमान एवढी शिस्त, आचारसंहिता रंगकर्मींनी पाळायलाच हवी."
असं म्हणतात- स्पर्धा नेहेमीच चांगले लेखक, कलावंत, दिग्दर्शक देतात. पण या स्पर्धेने दिलं - मित्रांमधील न संपणारं वैर !
एकदाचा या वादावर पडदा पडावा म्हणून संयोजकांनी २-३ दिवसांनी आम्हाला त्यांच्या कार्यालयात बोलावले. दोघंही तिथे भांड भांडले.
" माझ्याजवळ त्या नोटेचे दोन तुकडे आहेत."- प्रदीप
"अरे, जा रे, तो वार्ताहर तुझा दोस्त, म्हणून त्या फडतूस पेपरमध्ये काहीही छापून आणलेस."- इरेला पडलेला रमेश
" माझी हिंमत दाखवू? म. टा. त बातमी आणू की मनोहर मध्ये नोटेच्या तुकड्यांचे फोटो?"

थकेपर्यंत दोघेही भांडले.

.

आता वाटतंय- स्पर्धेने एवढे भयावह वळण घ्यावे? इतके महत्वाचे असतात कां हे व्यक्तिगत जयापजय? मग अभिनयातील आनंदाचे काय करायचे? रंगमंचावरील जगलेले क्षण कशासाठी असतात?

.

कदाचित प्रदीपला पहिलं बक्षीस मिळालं असतं तर एवढं रण झालंच नसतं.

.

रंगमंचावरचं युद्ध सर्वसाक्षीने होत असतं पण इथे नाट्यगृहाबाहेर कोणामुळे झाले?
आजतागायत उत्तर मिळालं नाहीए.
आणखी एक प्रकार सांगतो. ' जागचं हलायचं नाही ' नामक माझे एक नाटक. ७० च्या दशकातल्या हिंदी सिनेमाची एक बनावट स्टोरी सादर करणारे ते नाटक. संवादांचे मात्र स्वातंत्र्य घेतलेले आहे. तर त्या नाटकात, हॉटेलमध्ये नाचणाऱ्या नर्तकीचे एक पात्र आहे. त्याचे प्रमाणपत्र मिळालेले होते. नंतर काही काळाने मी त्यातल्या काही भागाचे पुनर्लेखन केले आणि त्याचे नाव बदलून, ' गोळ्या काढलेले पिस्तूल ' असे केले. त्यामुळे, पुन्हा एकदा घ्यावे प्रमाणपत्र म्हणून मी ते या मांडळाकडे पाठवले. दरम्यानच्या काळात डान्सबारबंदी चा कायदा आला होता. त्यामुळे, या मंडळाने मला सूचना केली की ते नर्तकीचे पात्रच वगळावे लागेल ! मी त्यांना कळवले की हे सर्व पूर्वीच तुम्ही मंजूर केलेले असून, काही बदल केल्याने मी पुन्हा पाठवले आहे. त्यावर मंडळाने काही महिने चिंतन केले असावे. मग, अरुण नलावडे आल्यावर, गप गुमान ते प्रमाणपत्र माझ्याकडे पाठवण्यात आले !

कॉलेजच्या एका गाईडसाठी मी या नाटकाचा दृशयानुसार मराठीत गोषवारा तयार केला होता !
( गॅलिलिओ ).

मलाच ते पूर्ण नाव बोजड वाटत होते. चंप्र करावे असे वाटत होतेच. दरम्यानच्या काळात प्रभाकर पणाशीकरांबरोबर माझ्या एका नाटकासंबंधी बोलणी चालू होती. प्रकाश बुद्धिसागर ते बसवणार होता. पण ते काही घडले नाही. तरीही, या काळात पणाशीकरांनी मला चंप्र म्हणायला सुरुवात केली होती. म्हटले, हेच ठीक आहे. मग ते कंटिन्यू केले.

होय. आता हे आधी ( गिरीश पतके ) की पणशीकर ते आठवत नाही. हे दोन्ही मिळून योग्य ते घडले. नीलकंठ फुले यापेक्षा निळू फुले हा खूपच ग्रेट असतो !

माझे पूर्ण लेखन मग तुम्ही म्हणता तसे बोटचेपेच आहे. राजकीय भूमिका घेणारे म्हणजे शहाणे आणि शूर असे मी मानत नाही. माझ्या वेबसाईटचे नुसते होमपेज बघा जमल्यास.

होय, ते दिसतेच आहे. मी तथाकथित ' पुरोगामी ' पणे काहीच लिहीत नाही तर मला अमूकच राजकीय भूमिका घेण्याची सक्ती करू नये, एवढेच मी म्हणतो. मी एक लेखक आहे तर मी अमूकच प्रकारे लिहावे अन्यथा मी बोटचेपा वा पळपुटा आहे असे म्हणण्याला मी महत्त्व देत नाही.

इथल्या पुरोगाम्यांच्या दृष्टीने प्रतिगामीच ! पण मी त्यांच्या मताला किंमत देत नाही.

सगळ्या कॉमेंटस वाचून थोडक्यात सांगतो. मी हिंदुत्ववादी लिहीत नाही तर माझ्यासारख्या लेखकाने हिंदुत्ववादी भूमिका घ्यायला हवी, असे सांगायला एकही हिंदुत्ववादी आजवर आलेला नाही. पुरोगामीच हा आक्रमकपणा करतात. या पुरोगामीगिरीमुळे इथे जे घडले आहे वा घडते आहे ते तालिबान्यांनी बुद्धमूर्ती फोडण्यासारखेच आहे. कलेचा आणि तत्त्वज्ञान वा अध्यात्म यांचा एकजीव संबंध असतो, हा मुद्द्दाही इथे एकाला आवडलेला नाही. या मुद्यामुळे त्यांना माझी काळजी वाटते असे सचिंतपणे त्यांनी म्हटले आहे. त्यांनी व तशांनी निर्माण केलेल्या परिस्थितीबद्दल आपण सर्वांनीच चिंतन करायची गरज वाटल्याने ही पोस्ट दिलेली आहे.

सगळे विद्रोह हे सामाजिक-राजकीय परिवर्तनाच्या प्रेरणेतून येत नसतात, हे समजून घ्यायला हवे. मानसिक सवयी आणि सर्जकतेच्या नव्या शक्यता यांच्या संबंधांतून ते घडते. गालिब, पिकासो, डाली हे इथल्या पुरोगाम्यांना चालतील ? त्यांना कालिदास वा टागोरही नाही चालणार. उगीच सगळीकडे विद्रोह हा शब्द वापरून हा विषय नगण्य करता येणार नाही.

पुन्हा तेच ! मी काय करावे याचे कुणाचेही सल्ले नाही घेत हो मी ! पुरोगाम्यांना ही वाईट सवय असते म्हणून तर ही पोस्ट !

असे व्यक्तिगत मूल्यमापन करत सुटणे ही तर पुरोगाम्यांची खासियत आहे !

या सगळ्या समस्यांचे बीज माझ्यात आहे असे मला दिसते -- मी तिकडे लक्ष देतो -- मी अमुक करत नाही म्हणजे हिम्मत नाही असे तुम्ही समजू शकता. चांगल्या कलावंतांना खरी हिम्मत कवटीच्या आत करावी लागते, हे एक दुर्लक्षित सत्य आहे.

राजकीय कट्टर कॉमेंटकार काहींना महत्त्वाचे वाटत असतील पण मला ते फडतूस वाटतात -- असे असावे ते ! किंवा जरा ' जास्तच वाईट ' म्हणण्याचा प्रकार असावा.

नको ती कटकट असे वाटून गप्प बसणारे बरेच आहेत.

मी बौद्धिक मतांचे नाही लिहीत, ही माहिती देतोय. आपण बोलतोय म्हणून. अन्यथा, एकदा लिहून झाले की लेखकाचा संबंध संपतो.

कलावंत कोणत्या विचारसरणीचा आहे हेच पाहतात आधी.

घिसेपिटे अनुभव आणि गुळगुळीत आदर्शांच्या कल्पना -- असे असेल तर खोटेच !

कवितेत, हे विशेषण अमूकच विशेष्याचे असा निर्णय होण्याची गरज नाही -- त्या अनिश्चिततेसहच कविता जाणवत जावी. बौद्धिक अनेकार्थता ठीकच पण एकूण भान या अर्थी चांगल्या कवितेला एक ' न कळणारा ' अर्थही असतो. म्हणजे जाणवतो पण त्याचे बौद्धिक निवेदन शक्य होत नाही.
कवीचे मत म्हणजे आकाशवाणी असे मुळीच नाही !

योगायोग म्हणजे ही कविता १९७४ साली सत्यकथेत प्रसिद्ध झाली होती -- म्हणजेच तिची याच वर्षी पन्नाशी होत आहे !
साभिनय वाचनाला कलेचा एक वेगळा दर्जा द्यायला हवा. नाट्यप्रयोगाला जशी अनेकांच्या सर्जकतेची देन असते, तसेच हे समजावे. सर्वच कवितांचे असे वाचन होऊ शकेल, असे नाही. हे वाचन उत्तम झालेले आहे ! धन्यवाद, लाखेजी ! ( स्पर्श या कवितेचे अभिवाचन. )

हा लेखक याला आवडतो, तो त्याला आवडतो, मग चांगला लेखक म्हणजे काय -- इथून सुरुवात आहे. ज्या त्या जातीपातीचे लोक आपापल्या लेखकांचे कदाचित वाचण्याची शक्यता आहे. त्यामुळे, चिंता नसावी. ' मरू दे ' हा मंत्र आत्मसात करावा !
२०-०४-२०२४.

## । अधिसत्ता । ह्या कवितासंग्रहाच्या निमित्ताने

### — चं.प्र. देशपांडे

नमस्कार! या कार्यक्रमाला आल्याचा मोठा लाभ झाला असे मी म्हणेन.
वक्ते सगळेच चांगले बोलले परंतु त्यातील एक राहुल पुंगलिया जे बोलले त्याचा लेख तयार करून घेतला, तर तो मराठी साहित्याला केवळ आजच नव्हे तर कायमचा उपयोगी पडेल. कायम म्हणजे पाच दहा वर्षं फारतर, पाच दहा वर्षांनंतर सगळं खलासच होणार आहे. कारण काय आहे की, जसं स्पेशलायझेशन बाबत हेमाडे सर म्हणाले तसं— की, कविता ही जर त्या कवीपुरतीच मर्यादित राहिली तर ती तिथेच राहते. ती संपूर्ण मानवजातीला रेलेव्हंट होते का, प्रस्तुत होते का? होत असेल तर ती कविता असते, नाही तर मग ते आत्मनिवेदनासारखं काहीतरी असतं. सर्वांना प्रस्तुत असणाऱ्या साहित्याची निर्मितीच थांबली तर राहणार काय ?

आपल्याकडे वातावरण गेली काही वर्षं असं आहे आणि ते साहजिक ही होतं म्हणा, कारण की अपरिचित अशा अनुभवांची कविता आली, वंचित समुहातून, दलित वर्गातून कविता आली, तिचं स्वागतही झालं. पण कालांतराने तो भर ओसरला. आता तुम्ही काय करणार? कविता अमूक अनुभव व्यक्त करते म्हणून ती श्रेष्ठ का? म्हणजे एखादा कवी धारावी झोपडपट्टीत राहतो, आणि तिथला अनुभव तो आपल्या कवितेतून मांडतो म्हणून ती कविता श्रेष्ठ म्हणायची का? आणि एखाद्या मध्यमवर्गीयाने लिहिलेली, किंवा ब्राह्मणाने लिहिलेली आहे म्हणून ती फालतू असते का? आपल्याकडे दुसरेही काही प्रश्न असतात की, कालबाह्य आणि कालसापेक्ष कलाकृती. खानोलकरांच्या एका कादंबरीमधला एक प्रसंग सांगतो, त्यामध्ये एक बाई दुकानदाराला ‘ दोन पैशांचे धणे द्या हो ’ म्हणते. आता दोन पैसे हे आज विचार केला तर कधीचेच कालबाह्य झालेले आहेत. आता दोन पैशांत धणे काय, काहीच मिळत नाही, मग आता त्या कादंबरीचं काय? गेली का ती कामातून? झाली कालबाह्य? प्रश्न असा आहे की, त्या कादंबरीतून तो लेखक काय अनुभव मांडतो आहे, कवितेचं किंवा कादंबरीचं मटेरियल काय आहे, याच्यावर तिची श्रेष्ठता ठरत नाही. आता माझ्या एका नाटकात लँडलाईन टेलिफोन आहे. असा फोन आता कुणी वापरत नाही, मग आमचा तो दिग्दर्शक म्हणाला की, मी ते बदलतो आणि तिथे मोबाईल फोन वापरतो. मी म्हणालो की, अरे असे बदल तुम्ही करत गेलात तर मला ते संपूर्ण नाटकच तुम्हांला नव्याने लिहून द्यावं लागेल. असं नसतं, ऐतिहासिक नाटकातील, पौराणिक नाटकातील वेशभूषा तुम्ही बदलता का? परदेशातील तुम्ही ‘ सिक्स कॅरेक्टर्स इन सर्च ऑफ ॲन ऑथर ’ करता, किंवा ‘वेटिंग फॉर गोदो’ करता, तेव्हा त्यातील काय मॅच होत असतं तुमच्या आताच्या काळाशी? काहीच होत नाही.

ह्या स्पेशलायझेशनला धरून एक मुद्दा तुम्हांला मी सांगतो, आपल्या एका साहित्यसंमेलनाचा एक अध्यक्ष म्हणाला की, “आता आपल्या ग्रामीण साहित्याने अभिजन साहित्याला आव्हान दिले आहे.” अरे हा काय प्रकार आहे? कुस्त्या लावतो आहेस का वेड्या? कलेमध्ये आव्हान प्रतिआव्हान हा काय मूर्खपणा आहे? अरे तू संमेलनाचा अध्यक्ष आहेस, जरा काही तरी डोकं वापर. हे असं बोलणारे लोक आपल्या साहित्यसंमेलनांचे अध्यक्ष होतात. मी ह्यापूर्वी तीन साहित्य संमेलन अध्यक्षांचं भविष्य तीन महिने आधीच फेसबुकवर जाहीर केलेलं आहे, की हा गृहस्थ तिथे साहित्याविषयी एक ओळही बोलणार नाही. हे तिथे फक्त राजकीय बडबड करतील. हे असे लोक कशासाठी अध्यक्ष होतात? त्यांचं पहिलं वाक्य म्हणजे, “ साहित्याला राजकारण वर्ज्य नसतं! ” पुढचं सगळं भाषण राजकारण ह्या विषयावर ते करतात. साहित्य तिथंच राहतं, कारण त्यातील विविध प्रवाह , रिॲलिझम, सर्रिॲलिझम काही म्हणता काही ह्यांना माहिती नसतं आणि त्यात त्यांना इंटरेस्टही नसतो. अँटिपोएट्री का आली, ह्याचा त्यांना विचारच करायचा नसतो. त्यांना केवळ समाजपरिवर्तन करणे, प्रबोधन करणे एवढंच कलेचं काम वाटत असतं. असं वाटणं हे फार बाळबोध आहे हो. म्हणून पुंगलियांनी जो मुद्दा मांडला की, ज्या कलेचा उपयोग करता येतो ती कला मौल्यवान नसते, हे पटतं. उपयोगासाठी कला वापरणाऱ्यांना कलेशी काय घेणे असणार ?

म्हणून हेमाडेसरांनी मांडलेला स्पेशलायझेशनचा मुद्दा आणि हा उपयुक्ततेचा मुद्दा विचारात घेतला तर, एखाद्या कलाकृतीचं वैश्विक पातळीवर रेलेव्हंट असणं हेच तिचं मौल्यवान ठरणं असतं. चिंधडे सरांनी आपल्याला जागतिक कवितेविषयी प्लेटो, होमरविषयी सांगितलं. आपला हा कार्यक्रम त्यामुळे निश्चितच दर्जेदार झाला. आता असं पहा की, हे जे भूमिकावाले लोक असतात, त्यांचं सुरुवातीला ते सगळं चाललं. त्यांनी त्या बळावर काही पदं, जागा पटकावून घेतल्या. अर्थातच त्याचा परिणाम सबंध कलाक्षेत्रावर झाला. तो होणारच. आता अलीकडे पहा, दलित लेखकसुद्धा फेसबुक वर पोस्ट देतात की मराठी साहित्यातून समीक्षक नावाचा प्रकारच हद्दपार झाला आहे. समीक्षकाला आपण काय करायचं आहे हेच समजत नाही. भूमिका घ्या, म्हणजे काय घ्या? भूमिका म्हणजे मी जी राजकीय विचारसरणी मानतो तीच तुम्हीसुद्धा माना. त्याला म्हणतात ते भूमिका! पुन्हा हीच माणसं असंही म्हणत असतात की, लिहिणारा प्रत्येकजण हा भूमिका घेऊनच लिहीत असतो, मग हे जर असं असेल तर, तुम्ही का म्हणता की भूमिका घ्या? भूमिका असतेच नं? तुम्हीच मान्य करता नं ? तर ते असं असतं की, भूमिका घ्या म्हणजे आम्ही म्हणतो ती भूमिका घ्या. इतकं संकुचित करून टाकलं आहे ह्यांनी कलेला. ह्यापलीकडे त्यांना डोकं चालवायचं नाही आणि दुसऱ्या कुणाला ते चालवू द्यायचं नाही.

ह्याचा परिणाम असा झाला की, समीक्षा गेली. मग साहित्याचं मूल्य म्हणजे काय? कशावरून ठरवायचं? ‘ अधिसत्ता ’ असा वजनदार शब्द वापरला म्हणजे ती कविता चांगलीच असेल असं समजायचं का? ते मी नंतर सांगेन. परंतु कशावरून ठरवायचं की एखादा कवितासंग्रह चांगला आहे किंवा एखादा वाईट आहे, ह्याची चर्चाच बंद झाली आहे समाजातील. ते निकष ठरवायचेच नाहीत. मग सुरू काय आहे? फक्त परिवर्तनवाद आणि भूमिका! ते कसे वाईट

आम्ही कसे चांगले. अरे तुम्ही जर कलेतून तुमची मतं मांडायला लागलात, कवितेतून तुमचे अनुभव केवळ व्यक्त करायला लागलात तर ती खुजी होते. कविता लिहिणं म्हणजे केवळ माझं वैयक्तिक दु:खं तुमच्या डोक्यात उतरवणं असं होत नाही. आता तो कुणीतरी सापाच्या विषवाला पकडला. ते विष माफक प्रमाणात टोचून घेतलं की त्याची नशा दीर्घकाळ टिकते म्हणतात. तर मग कवितेतून हे करायचं आहे का? केवळ वैयक्तिक अनुभवाची, वैयक्तिक सुखदुःखाची कविता ही कलेच्या पातळीवर पोहचत नाही. गटांसाठी कविता असा काही प्रकार असू शकतो? ही कविता ह्या ग्रुपसाठी, ती अनुभूती फक्त एखाद्या विशिष्ट समूहाचीच, म्हणून फक्त त्यांच्यासाठी असं होवू शकतं का? कलामूल्य ह्या विषयावर विचारच करायचा नाही, त्याविषयी बोलायचंही  नाही. मला एक एका लहान गावात मराठीचे प्राध्यापक असलेले एक गृहस्थ भेटले. मी विचारलं त्यांना की, काय असतं? येतात का मुलं मराठी साहित्याला? ते म्हणाले की, येतात, पण त्यांना साहित्य शिकवायचं म्हणजे काय शिकवायचं हा प्रश्न पडतो, इतकी रद्दी पुस्तकं अभ्यासाला लावलेली असतात. कोटा ठरवून पुस्तकं लावतात. मराठवाड्यातील हे हे लोक घ्या. एवढे दलित असलेच पाहिजेत. ब्राह्मण एवढे घ्या....ही मूल्ये असतात. मग ह्या मूल्यांवर आधारित तुम्ही पुस्तकं अभ्यासाला लावणार. हे असं होत राहिलं तर त्या भाषेची बरबादी अटळ असते. आणि पाच-दहा वर्षांत सगळं खलासच होणार आहे, असं जे मी आधी म्हणालो होतो, ते हेच आहे.

समाजातील पुरोगामी, बुद्धिमान, बुद्धिप्रामाण्यवादी लोकांनीसुद्धा ही कलाप्रक्रिया काय असते हे समजून घेण्याकडेच पाठ फिरवली आहे.

आज तसं जास्त बोलायचं नव्हतं, कवितासंग्रहावर बोलण्याइतका तो मी पूर्ण वाचला नाही अजून, कारण कालच मला पीडीएफ मिळालं, त्यातील काही कविता मी वाचल्या.

आता ह्या संग्रहात काही ईश्वरविषयक कविता आहेत. हा कवी कधी त्या ईश्वराला हरामखोरही म्हणतो, कधी त्याला तळहातावरील फोडासारखा जपायचे आहे, असेही म्हणतो. आता ज्या अर्थी हा कवी दहा बारा कविता ईश्वराविषयी लिहितो तेव्हा ईश्वर ही काहीतरी एक भानगड आहे, हे त्याच्या डोक्यात आहे. अंधश्रद्धा निर्मूलनवाले जे लोक असतात, किंवा त्यासंबंधी जो कायदा आहे, त्यामध्ये ईश्वरावरची अंधश्रद्धा बसत नाही. वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगला पाहिजे असे आपण म्हणतो, तर मग त्यात हे बसतं का? जो कुणी मी वैज्ञानिक दृष्टिकोनवाला आहे असे म्हणतो, त्याने मनोजच्या ह्या कविता वाचाव्यात. तो संपर्क कसा होईल, हा प्रश्न मी उपस्थित करतो आहे. जर का कवी आपापल्या व्यक्तित्वाचीच कविता लिहीत राहिला तर दुसऱ्या पर्सनॅलिटीचा त्याच्याशी संबंध काय असतो? आणि जर असला तर तो कुठे येतो? असे काही प्रश्न मी उपस्थित करतो आहे.

मनोजच्या ह्या ज्या काही कविता मी वाचल्या— तर मनोज हा ढोंगी मनुष्य आहे. मी कसला कवी, माझं काही नाही, मी हे लिहिलं पण ती कविताच आहे का, मला नाही माहित, असं तो म्हणतो ... तर तसं नाही, मनोज बनेल आहे,

कविता खरंच चांगल्या आहेत. त्याच्या ईश्वरविषयक कविता ह्या कुठल्या धार्मिक मासिकात छापून येणाऱ्या भक्तिपर कविता नाहीयेत, तर वैयक्तिक अनुभवात, एकटेपणात त्याचा जो ईश्वर ह्या संकल्पनेचा कन्सर्न आहे त्याची कविता झाली आहे. आता एखाद्या परिवर्तनवाद्याला जसं वाटतं की, हे असं असं असायला हवं, हे बदलायला हवं इत्यादी. तर तो झाला त्याच्या पर्सनॅलिटीचा भाग. ज्यावेळी तो इतरांनी मानला पाहिजे, सहन केला पाहिजे, अशी अपेक्षा असते, तर मग मनोजच्या पर्सनॅलिटीचा हा भाग त्यांनी सहन का करू नये? हे प्रश्न आहेत. मी ह्याची उत्तरे देणार नाही. मी प्रश्न उपस्थित करून, तुम्ही ती आपापली शोधावीत असे म्हणतो. ह्याचा अर्थ, कवितेतून, कलेतून असं काय प्रतीत होत असतं की, जे केवळ त्या कलावंताची पर्सनॅलिटीच सांगणारं नसतं तर, एस्केप फ्रॉम पर्सनॅलिटी सांगणारं सुद्धा असतं. फर्नांडो पेसोआविषयी गाओ झिंग झियान म्हणाला— त्याचं जे भाषण आहे, झिंग झियानचं नोबेल पुरस्कार घेतानाचं, ती आजची गीता आहे आपली सगळ्या लिहिणारांची, असं मी म्हणेन. त्यात तो म्हणाला आहे की, पेसोआ हा विसाव्या शतकातील सर्वश्रेष्ठ कवी आहे. मी पेसोआ वाचल्यावर मला झिंग झियानचं ते म्हणणं पटलं. तर तो पेसोआ, ज्याने बाहत्तर टोपणनावांनी लिहिलं, तो म्हणतो की, हे मी नाही तर ज्या टोपणनावाने ते लिहिलंय त्या व्यक्तित्वानेच ते लिहिलंय. ह्याचा अर्थ असा की, कविता किंवा कला ही केवळ प्रतिक्रियेत नसते. मला दुःख झालं, मनोजने माझा अपमान केला, म्हणून मी आता मनोजवर कविता लिहितो, ही कविता नसते. केवळ प्रतिक्रिया ही कविता होऊ शकत नाही आणि मराठीत तर गेल्या कित्येक वर्षांपासून केवळ अशीच कविता लिहिली जाते आहे. आणि म्हणूनच ती खुजी आहे. आपण नेहमी रडतो की, आपलं साहित्य जागतिक स्तरावर पोचत नाही. कला, साहित्य हा आपला हौसेचा, सणसमारंभाचा मामला होऊन बसला आहे. आपण अशा ठिकाणी जातो आणि काहीतरी महान सांस्कृतिक कार्य पार पाडून आलो आहोत, असे समजतो. प्रत्यक्षात आहे ते काय आहे? तुमच्यात कुणाला निरोप देताना हात थरथरला का? आता वयोमानानुसार माझा थरथरतो ते सोडा, ते नाही म्हणत मी. हात थरथरला म्हणजे त्या कलेतून असं काहीतरी प्रतीत झालं की तिनं जगण्याला स्पर्श केला. 'वेटिंग फॉर गोदो'सारखं नाटक जगभरात का जातं? तुरुंगातल्या कैद्यांपासून ते जगातील महान नाट्यसमीक्षकांपर्यंत ते महत्त्वाचं का होऊन बसतं, असा विचार करायला आणि हे प्रश्न विचारायला मराठीत बंदी आहे.

'एक शून्य बाजीराव' हे मराठीतील एक श्रेष्ठ नाटक आहे, म्हणजे मी ते तसं समजतो. ह्या नाटकाचे महाराष्ट्रात किती प्रयोग व्हावेत? नऊ प्रयोगात ते नाटक संपलं. सत्यकथेने त्या नाटकावर विशेषांक काढला, तेव्हा त्यावर तत्कालीन अनेक महत्त्वाच्या लेखकांनी लिहिलं. आज अशी काही परिस्थिती दिसत नाही. सगळं विस्कळित फुटकळ असं सुरू आहे काहीतरी. कळत नाही, अजून आपल्या पुरोगाम्यांना आधुनिक म्हणजे काय हेच कळलेलं नाही तर उत्तराधुनिक म्हणजे काय हे समजण्याचा तर प्रश्नच येत नाही. एका पुरोगाम्याच्या पुस्तकाला दुसऱ्या एका पुरोगाम्याने प्रस्तावना लिहिली. त्यात तो म्हणाला की, हे लिखाण उत्तराधुनिक आहे. मी त्याला विचारले की, हे मान्य आहे का तुला? उत्तराधुनिक म्हणजे— कशालाच अर्थ नाही, कशातच काही तत्थ नाही, वैश्विक असं काही नसतं, सखोल वगैरे काही नसतं, सगळं उथळ आणि फालतू असतं, त्यामुळे आहे ते स्वीकारून त्यात राहायचं. हे म्हणणं आहे उत्तराधुनिकतेचं. मग हे मान्य आहे का? तुम्ही तर पुरोगामी आहात बाबांनो. तुम्ही स्वप्नं पाहणारे आहात, तुम्हांला

प्रगती करायची आहे. तुम्ही तरी एकमेकांना उत्तराधुनिक नका म्हणू. पण काही समजूनच घ्यायचं नाही मूळातून. हे जे स्वत:चं त्यांनी करून घेतलं आहे, तसंच आख्ख्या महाराष्ट्राचं व्हावं ही त्यांची इच्छा आहे. तो त्यांचा प्रयत्न आहे. ती माणसं , "साक्षरता खूप वाढली आहे, लिहिणारे वाढले आहेत, मराठीची चिंता करण्याची गरज नाही, तिची आता भरभराट होणारच आहे", म्हणत असतात. अरे बाबांनो ही अशी भरभराट होत नसते. ह्यासोबत काहीतरी सांस्कृतिक प्रक्रिया घडून यायला हवी असते, सांस्कृतिक प्रक्रिया म्हणजे दिवाळीचा सण किंवा गणपती उत्सव नव्हे.सांस्कृतिक प्रक्रिया म्हणजे, आपलं चाललेलं आयुष्य समजून घेण्याची प्रक्रिया. ते न करता, मतं मांडणं, त्या मतांचा प्रचार करणं आणि तीच मतं इतरांनी स्वीकारली पाहिजे अशी अपेक्षा करणं हे सुरू आहे. मराठी भाषक जगात दहा बारा कोटी आहेत, त्यामुळे ती भाषा काही लुप्त वगैरे होणार नाही, ती राहीलच. जगात ती ज्या काही आठव्या दहाव्या स्थानावर आहे, तिथेच राहील. परंतु त्या भाषेची लायकी काय असणार आहे? त्या भाषेतून तुम्ही काय वाचणार आहात? काय लिहिणार आहात?

आता पुन्हा थोडं मनोजकडे वळतो. त्याच्या ईश्वरविषयक कविता ज्या आहेत, त्यात तो स्वत:ला अडकवून घेत नाही तर, त्याकडे सर्व बाजूंनी तो पाहतो आहे. तो त्याचं मत तुमच्या गळी उतरवण्याचा प्रयत्न करत नाहीये. एखाद्या अनुभवाला तो प्रयोगशाळेत नेऊन तपासून घेत नाहीये, तर त्या वेळचं त्याचं वाटणं हे तो मांडतो आहे, ज्याविषयी त्याला स्वत:लाही काही खात्री वाटत नाही. तो त्याचे मत वा भावना तुमच्या गळी उतरवत नाहीये. त्यामुळे त्या कवितेचा आशय विस्तारतो. प्रत्येक कवीच्या अनुभवाचं एक क्षेत्र असतं, त्याचा एक विषय असतो. कवितेचं अनुभवक्षेत्र काही मोठं नसतं, ते लहानच असतं, पण कवी त्या अनुभवातून मांडतो काय हे अमर्याद असतं. म्हणजे माझ्या व्यक्तिमत्वाचं जे केंद्र आहे, ते तसंच जगातल्या अनेक कलावंतांच्या व्यक्तिमत्वाचं सुद्धा केंद्र असतं, परंतु मराठीतील भंगार वातावरणात जगभरातील असे मोठमोठे कलावंत हे कुचकामी ठरतात, कारण काय तर ते बुद्धिप्रामाण्यवादी नसतात. आता हेमाडे सरांसमोर तत्त्वज्ञ ह्या विषयावर मी बोलणं योग्य नाही, परंतु जसं त्यांनी प्लेटोचं उदाहरण दिलं की, तो तत्त्वज्ञ होताच, तसेच कविता सुद्धा लिहीत होता. कवीचं स्वत:चं एक तत्त्वज्ञान असतं, परंतु तो ते शिस्तबद्ध पद्धतीने पायऱ्या पायऱ्यांनी मांडत नसतो. कवीचं तत्त्वज्ञान हे त्याच्या आकलनात असतं, त्यातून ते प्रतीत होत असतं. तो ते तत्त्वज्ञान म्हणून मांडतही नसतो, आणि शेवटी तत्त्वज्ञान म्हणजे तरी काय, माझ्या पलीकडं ह्या जगण्यात आणखी काही आहे का? की, मी असा असा घडलो, माझ्या कॉम्प्युटरच्या कमांड ह्या अशा अशा आहेत आणि म्हणून मी असा असा असणार आहे. हेच आहे का मग आयुष्य? हा तुरुंग ?असे प्रश्न कलावंताला पडत असतात. पडले पाहिजेत. परंतु मराठीतील कलावंतांना हे प्रश्न पडतात का? पडत नाहीत, पडणारही नाहीत. जागतिकीकरणामुळे कोणत्या समाजघटकांना काय फायदा झाला, कोणाला झाला नाही, आणि जागतिकीकरणाऐवजी काय व्हायला हवे, ह्याविषयीची मतमतांतरे मांडून, आपली मते बरोबर समजणे ह्यापलीकडे काही नाही. बाकी ह्यापलीकडे आपल्याला माणसाच्या जगण्यात काही रुची असणार आहे की नाही?

पीटर शेल्डाल नावाचा एक कवी आहे, मला त्याची कविता फार आवडते. तो म्हणतो— " बाळगत नाही मी माझी मते काही तासांहून जास्त काळ " आता मग ह्या मनुष्याचं काय करणार आहात तुम्ही? रद्द करायचं त्याला, कारण की, तो काही भूमिकाच घेत नाही म्हणून? असं सगळं सुरू आहे. असो, मनोजच्या संग्रहाच्या निमित्ताने हे काही विचार मी मांडले, त्यात कदाचित काही चुकलंही असेल तर ते लक्षात आणून द्या, पण पुन्हा एकदा सांगतो की, इथे येण्याचा व्यक्तिश: मला फार लाभ झाला. चांगलं ऐकायला मिळालं. विशेष म्हणजे पुंगलियांचं जे भाषण आहे, त्याचा लेख तयार करून घेतला पाहिजे. ते म्हणतात की जगण्याच्या प्रश्नांचे साहित्य आणि त्याचे महत्त्व वाटणारे लोक कमी कमी होत चाललेले आहेत. हा महत्त्वाचा मुद्दा आहे. मराठी साहित्याचे जर कुठे चौक असतील, तर त्या चौकाचौकात या भाषणाचा तो लेख लावला पाहिजे. लोकांना सांगितले पाहिजे की, मराठीचं काही भलं करायचं असेल तर, हे वाचा आधी, नाही तर वाट लागेल. मराठीतील सूक्ष्म अर्थांच्या छटा असलेलं असं काही तुम्ही वाचणार नसाल, अभ्यासणार नसाल, तर त्या भाषेचं काय होणार मग? क्रमवारीत नोंद म्हणून ती शिल्लक राहील केवळ. असो. थोडावेळ तुमच्यासोबत गप्पा मारता आल्यामुळे आनंद झाला. धन्यवाद!

•••••

## चंप्र तथा चंद्रकांत प्रभाकर देशपांडे ह्यांनी आरती प्रभू पुरस्कार २०२४ स्वीकारताना केलेल्या भाषणाचे शब्दांकन.

**( ०४ फेब्रुवारी २०२४. )**

*******************************************************************बाबा वर्दम थिएटर्स आणि आरती प्रभू कला अकादमी, यांचे अध्यक्ष, कार्यवाहक, विविध पदाधिकारी आणि सदस्य आणि कार्यकर्ते आणि या संस्थांचे कलाकार त्याचप्रमाणे इथे उपस्थित असणारे मान्यवर, ह्या सगळ्यांना नमस्कार करून मी माझे दोन शब्द सुरु करतो. आपल्या सारखा विचक्षण श्रोता असल्यानंतर बोलताना जरा दडपण येतं, परंतु इथं रंगमंचावर आणि सभागृहामध्ये बरेचसे माझे जुने मित्र आहेत त्यामुळे माझं दडपण गेलेलं आहे. तर मी मोकळेपणाने बोलीन, आणि मला जे वाटतं ते बोलीन, कोणाला पटवण्याचा प्रयत्न मी गेली कित्येक वर्षांपूर्वी सोडून दिलेला आहे. त्यामुळे आपण खुल्या मनानं ऐकून घ्याल असं वाटतं! खानोलकरांच्या नावाचा -- आरती प्रभूंच्या नावाचा पुरस्कार मिळणं ही माझ्या दृष्टीनं विशेष आनंदाची गोष्ट आहे कारण अलीकडच्या काळातले माझ्या मते सर्वोत्कृष्ट कवी आणि लेखक हे खानोलकर आहेत. मी शाळेत असल्यापासून सत्यकथेचं वाचन करत होतो, कॉलेजातही करत होतो. माझी खानोलकरांची ओळख कशी झाली सांगतो. मुंबईचं इस्माईल युसुफ कॉलेज आहे तिथे मी प्रवेश घेतला कारण मला इंग्लिश विषय घेऊन प्रोफेसर वगैरे व्हायचं होतं. ते काही झालो नाही. पण मराठी शिकवायला आम्हाला प्राध्यापक शंकर वैद्य होते. त्यांना

मी माझ्या ज्या लिहिल्या होत्यात्या कविता आणि एकांकिका वाचायला दिल्या होत्या आणि माझा त्यावेळी सराव आजारी पडण्याचा जास्त होता. ते त्यांना वाचायला दिलं आणि मी आजारी पडलो. आठ पंधरा दिवस मी गेलोच नाही कॉलेजला, नंतर गेलो तेव्हा ते म्हणाले, "अरे तू होतास कुठं? तुझ्या कवितांचं वाचन ठेवलं आहे त्यावर एक दोघेजण बोलणार आहेत." हे झालंआणि शंकर वैद्यांना माझ्याबद्दल आपुलकी तयार झाली. त्यानंतरची घटना अशी घडली कि विजय तेंडुलकरांचं **एक हट्टी मुलगी** नावाचं नाटक होतं.त्याचं पाहिलं वाचन आमच्या वैद्य सरांच्या घरीच झालं होतं माटुंग्याला. मला वैद्य सर म्हणाले की असं असं वाचन ठेवलं आहे, तू ये तिथे. मी म्हटलं, ठीक आहे. तर त्या वाचनाला खानोलकर आलेले होते. शांत शेळके बाई आलेल्या होत्या राम पटवर्धन आलेले होते. अश्या सर्वांच्या ओळखी तिथे झाल्या. सगळा कार्यक्रम झाल्यावर मी मुद्दाम खानोलकरांना भेटलो आणि म्हणालो तुमचं लेखन, तुमच्या कविता मला खूप आवडतात. योगायोग असा की खानोलकर ही मालाडलाच राहत होते. आम्ही पण मालाडलाच राहत होतो. खानोलकर पूर्वेला आणि आम्ही पश्चिमेला राहत होतो. त्यानंतर त्यांच्या माझ्या दर आठ दहा दिवसांतून भेटीगाठी होत असत. तेव्हा मी होतो बावीस वर्षांचा आणि खानोलकर माझ्यापेक्षा पंधरा वर्षांनी मोठे होते पण आमची उत्तम मैत्री होती. उत्तम मैत्री म्हणजे एकमेकांना डायरेक्ट मूर्ख म्हणण्याइतकी आपुलकीची मैत्री आणि कोणी दुखावलं जात नव्हतं. खानोलकर कसे दुखावले जात होते हे मी नंतर सांगणार आहे तुम्हाला, त्या गमती त्यांच्या दुखावलं जाण्याच्या. खानोलकरांबद्दल मला बोलायचंच आहे पण तत्पूर्वी माझे मित्र, डॉक्टर शरद भुताडिया ह्यांच्याबद्दल.जसे काही लोक गुरुबंधू असतात, तसे आम्ही प्रत्ययबंधू आहोत. प्रत्ययबंधू म्हणजे कोल्हापूरची **प्रत्यय** ही नाट्यसंस्था. आम्ही बरीच वर्षं एकत्र त्या संस्थेचे सदस्य आहोत. यांचं वैशिष्ट्य, **राजा लियर** हे नाटक. त्यांनी ते बसवलं ही त्यांची मराठी रंगभूमीला एक खास देन आहे, असं म्हणावं लागेल. डॉक्टर सुधीर रसाळांचं **एक नाटककार आणि काही नाटके** ह्या नावाचं एक पुस्तक आहे.ह्या पुस्तकात डॉक्टर सुधीर रसाळ ह्यांनी **राजा लियर** या नाटकाबद्दल तीन मोठ्ठे लेख लिहिलेले आहेत. अगदी प्रदीर्घ लेख आहेत. त्या लेखांचं वैशिष्ट्य म्हणजे मूळ किंग लियर नाटक सुधीर रसाळांनी वाचलेलं नाही. त्याच्यावरची इंग्लिश समीक्षा वाचलेली नाही. त्यांनी फक्त विंदा करंदीकरांचा अनुवाद जो डॉक्टर भुताडियांनी सादर केला तो वाचून त्याच्यावर लेख लिहिलेले आहेत. ते इतक्या बारकाईने लिहिलेत, इतका विचार करून लिहिलेत, की प्रत्येक नाट्यकर्मीने ते वाचायला हवेत आणि ते एक नाट्य प्रशिक्षणच आहे असे समजायला हरकत नाही. म्हणजे त्याच्यात एका ठिकाणी नाटक लिहिताना शेक्सपियरचा काळ कसा चुकला आहे ते पण त्यांनी दाखवलं. अशी एखादी चूक दाखवली जाते. लेखकाची अशी चूक असू शकते. खानोलकरांच्याही अश्या चुका कोणी कोणी दाखवल्या आहेत. शेवटी लेखक मोजायचा कश्यावरुन? त्याने जी उंची गाठली त्याच्यावरून. त्याच्या चुका काय झाल्या, त्याची किती नाटकं फेल गेली, याच्यावरून लेखक मोजायचा नाही किंवा कुठलाही कलावंत मोजायचा नाही. सगळ्यात कमाल उंची म्हणजे त्याने सगळ्यात उत्तुंग काम कुठं केलं, ती त्याची उंची. जगामध्ये तसे एक एक काम करून सुद्धा लोकांच्या लक्षात राहिलेले लोक आहेत. तर हे त्यांचं काम, त्या लेखांच वैशिट्य काय आहे ? तुम्हाला मी जो डॉक्टर सुधीर रसाळ आणि त्यांच्या पुस्तकाचा आणि लेखांचा उल्लेख केला, त्यात त्यांनी ह्या राजा लियर नाटकाचे इतके बारकावे सांगितले आहेत, अक्षरशः ते नाटक घुसळून काढलं आहे त्यांनी. आणि ते नाटक संपूर्ण डोक्यात ठेवून ते लिहिलं आहे. हे लिहिताना मागचं काहीतरी आठवतं, पुढे काहीतरी लिहिताना मध्ये मध्ये त्याचे काहीतरी संदर्भ आहेत ते आठवतात. एवढं करून आपल्या रोजच्या जगण्याशी कसं हे

नाटक संबंधित आहे, हे नाटक काय देतं माणसाला इथपर्यंत सुधीर रसाळांनी त्याचा आवाका घेतलेला आहे. आवाका हा शब्द माझ्या दृष्टीनं फार महत्वाचा आहे. आता असा आवाका घेतांना काय होतं? बुद्धीने नुसता होत नाही तो आवाका, बुद्धी एकरेषीय काम करते. तुम्ही जरी अष्टावधानी असलात तरी आठ रेषांचं एकरेषीय काम असतं. बुद्धी असंख्य गोष्टींचं भान घेऊ शकत नाही.तर असंख्य गोष्टींचं भान घेणं म्हणजे काय? हे रसाळांच्या त्या लेखांमधून कळतं.

आणि माझं मत असं आहे कि आमचे मित्र डॉक्टर भुताडिया ह्यांनी ते नाटक बसवलं आणि त्यातली प्रमुख भूमिका केली ती असा आवाका घेत केली. त्यांनी एकच कुठलातरी मार्ग एकच कुठलातरी अर्थ त्या नाटकाचा, असं धोरण ठेवलं नाही. चांगल्या कलाकृतींना अमुक ठरलेली दिशा नसते, ती दुसऱ्यांनी देऊही नये तरच ती कलाकृती ओपन राहते आणि प्रत्येकाला तिचं संपूर्णत्व जाणवू शकतं. एकमार्गी एका विचारसरणीने ते करत गेलात तर तेतसं  होतं नाही. आपल्याकडे बरेच लोक भूमिका घ्या भूमिका घ्या असा आग्रह धरतात. भूमिका घ्या म्हणजे राजकीय भूमिका घ्या हे परत असतं त्याच्यात. तर हे ज्याला करायचं त्याला करू देत. परंतु माझं आकलन असं आहे, की  अशी एक भूमिका घेऊन, जे लेखन केलं जातं ते संकुचित होतं, खुजं होतं. ते संपूर्ण मानवजातीला किंवा सर्वांच्या जगण्याला प्रस्तुत असं लेखन होऊ शकत नाही. **वेटिंग फॉर गोदो** सारखी नाटकं तुम्हाला आवाका देतात भान देतात.कोणतीही एक घटना घडते त्यात अनेक फोर्सेस असतात. बुद्धीने सगळी कामे होत असती तर सगळे प्रश्न जसे की  देशाचे सीमावाद किंवा इतर प्रश्न सुटले असते.बुद्धीने चांगलं जगता येत असतं तर प्रत्येक नात्यामध्ये संघर्ष व्हायची गरज नव्हती.

माणसाची सगळी नाती ही संघर्षमय का आहेत? असा प्रश्न पडला पाहिजे. याला बौद्धिक उत्तर नाही आहे. तर अश्या ज्या कलाकृती असतात त्या तुम्हाला ह्या अवाक्यानी सादर कराव्या लागतात. तर तुम्ही ते काम करू शकता. तर तसं ‘प्रत्यय’ च हे एक विशेष काम, डॉक्टर शरद भुताडियांच्या हातून झालं, ती टीमही सगळी चांगली होती. सगळ्यांचं त्यांना सहकार्य मिळालं.अर्थातच त्यामुळे ते झालं. तर मला काय म्हणायचंय की खानोलकरांचं सगळं लिखाण हे असा सर्वांगीण आवाका घेणारं लिखाण आहे. खानोलकरांना कुठली विचारसरणी मांडायचीय का ? खानोलकरांना काही बोध द्यायचा आहे का की  असं जगा, असं जगू नका ? एकपत्नीव्रत चांगलं, जास्त लफडी नको. असं काही सांगायचंय का खानोलकरांना ? किंवा राजकीय, सामाजिक असं काही बोलायचंय का ? असं त्यांच्या लेखनात फारसं नाही. पण ते लेखन महत्वाचं का ठरतं कारण ते तुमच्या, माझ्या किंबहुना जगातल्या सगळ्या माणसांच्याजगण्याला प्रस्तुत असतं. आपले अनुभव वेगवेगळे असतात. परंतु मुळात आपलं जे जगणं आहे ते जगातल्या सगळ्या माणसांचं एक सारखं आहे. तर त्या एकसारखं जगण्यामुळे जे गोंधळ तयार होतात, ते गोंधळ पकडण्याचं काम खानोलकरांच्या लेखनानं केलेलं आहे आणि त्यासाठी, त्या गुणामुळे ते लेखन महत्वाचं ठरतं.

हा सगळा जो दृष्टिकोन आहे तो कॉन्शसली घेतलेला  नव्हता. त्यांनी ती काही ठरवून केलेली गोष्ट नाहीये. किंवा तुम्ही जर त्यांची मुलाखत घेतली तर ते काही बुद्धिमान उत्तरे देतील असे नाही. पाहिलं तर हा फाटका मनुष्य, लिहितो मराठीत ?--  असं तुम्हाला वाटेल असं खानोलकरांचं व्यक्तिमत्व होतं.

परंतु एरवी ते कसेही वागत असोत, कोणाशी काय झालं, त्यांना अडचणीकाय आल्या, त्या कश्या सोडवल्या गेल्या-- हे सगळं जाऊ द्या. पण कलावंत म्हणून जेव्हा खानोलकर लिहायला बसत असतील तेव्हा ते अक्षरशः मोकळे सुटत होते. ते संपूर्णपणे त्या कलाकृतीला स्वतःला देऊन टाकत होते आणि ती कलाकृती येऊ देत होते  असं मी म्हणतो. प्रत्येक कलाकृती. **एक शून्य बाजीराव** सारखं नाटक, पहिल्या अंकात हे घडेल, दुसऱ्या अंकात हे घडेल, तिसऱ्या अंकात हे घडेल, असं लिहिलं जात नाही.एका चित्रकाराने म्हंटल आहे की  मला जर आधीच माहीत असेल, मी चित्र काय काढणार आहे, तर चित्र काढायची गरजच काय? माहीत नसतं. बऱ्याचश्या कलाकृती अश्या असतात. तुम्ही **वेटिंग फॉर गोदो** च काय प्लॅनिंग करणार? काही तुम्हाला प्लॉट रचता येत नाही, काही करता येत नाही. पण ते लिहिताना तो मनुष्य त्या भानाच्या अवस्थेत असतो त्यामुळे तो माणसाच्या जगण्याचा सर्वांगीण आवाका  घेतो आणि त्यामुळे ती कलाकृती मोठी होते. खानोलकरांचं लेखन हे असं होतं. आता हे  त्यांच्या शैलीत पण प्रतिबिंबित झालं आहे. त्यांची लिहिण्याची पद्धत. त्याच्यात सुद्धा ते  प्रतिबिंबित होतं. मराठीतली ही एक अद्वितीय शैली आहे हे आपण लक्षात घेतलं पाहिजे. मला हे आवडत नाही, ते आवडत नाही, जा घरी. तुला आवडतं का, ह्यावर हे अवलंबून नाही आहे. आपल्याकडे इथे पद्धत काय आहे मराठीत, एक पायंडा पाडला आहे अनेकांनी. जे मला कळत नाही ते फालतू आहे किंवा त्याची टिंगलटवाळी करा. ही पद्धत पाडली आहे मराठीत. आपल्याकडचे एक महान समीक्षक **सॅम्युएल बेकेट** आणि **टी एस एलियट**  हे दुय्यम तिय्यम दर्जाचे लेखक होते असे म्हणून निघून जातात.स्पष्टीकरण न देता. ही पद्धत आहे. मला कळतं नाही. तुम्ही सरळ म्हणा ना, मला हे नाही कळत.  पण का कळत नाही, याचं कारण कलेबद्दलच्या त्यांच्या कल्पनाच ठरलेल्या आहेत, त्या खुज्या आहेत.निव्वळ वैचारिक आहेत. त्यांना कलेचा वापर करायचा आहे किंवा कलेचा उपयोग काय आहे, अश्या मार्गाने ते पाहतात.

त्यामुळे होतं काय, कला सगळी राहते वैचारिक लेव्हल वर. माणसाची बुद्धी ही अत्यंत मर्यादित आहे. खूप शोध लागू देत, आर्टिफिशिअल इंटेलिजन्स येऊ दे, काय वाटेल ते होऊ दे. पण बुद्धीला माणसाच्या जगण्याचा आवाका नाही घेता येत.

माणसाच्या संबंधांमधले प्रश्न. बुद्धीला समजत नाहीत,  सोडवता येत नाहीत. तुमचं कधी घटस्फोट घेणाऱ्या व्यक्तींशी बोलणं झालं असेल, पत्नी ही एक बाजू असते. धाडधाडधाड ! तिच्याकडे पंचवीस तपशील असतात. पतीची एक बाजू असते त्याच्याकडे धाडधाडधाड ! पंचवीस तपशील असतात. ते वेगवेगळे तपशील असतात. काय करणार तुम्ही त्याचं ? मग कायद्यात बसेल त्याप्रमाणे त्याचंकाय ते  होतं. पण दोघांनाही वाटत असतं की माझं पूर्ण बरोबर आहे.

बुद्धीचं  काम हे माणसाच्या सगळ्या आयुष्यात अपयशी काम आहे. त्यामुळंच **ॲब्सर्ड थियेटर** हे इतकं महत्वाचं ठरलेलं आहे.

मग मराठीत काही शहाणे लोक येतात, तो काळ संपला आता--  ॲब्सर्ड थियेटर संपलं आता. अरे काहीही संपत  नसतं. तुम्ही जो रोमँटिसिजम म्हणता तोही संपत नाही. सगळं चालू असतं.

आता न कळल्यामुळं गोंधळ काय होतात, आधुनिक म्हणजे काय? उत्तर आधुनिक म्हणजे काय ?तर आपल्याकडच्या बुद्धिमान लेखकांचं उदाहरण सांगतो. काही जणांना काय वाटतं की आधुनिकच्या पुढची पायरी म्हणजे जास्त ग्रेट, म्हणजे उत्तर आधुनिक.

तर तसं नाही आहे. आधुनिक हा प्रकार वेगळा आहे. आधुनिक मध्ये आदर्श मान्य आहेत, काहीतरी वैश्विक असतं हे मान्य आहे, सत्य असतं हे मान्य आहे. काहीतरी खोल असतं हे मान्य आहे. उत्तर आधुनिक मध्ये हे मान्य नाही. उत्तर आधुनिकवाले म्हणतात सगळं उथळ असतं. कश्याला महत्व द्यायचं कारण नाही. युनिव्हर्सल काही नसतं. असं म्हणणारे उत्तर आधुनिक. मग हे जे बुद्धिमान लोक आहेत, त्यांनाकंसात टाकतो, हे भूमिका घ्या म्हणणाऱ्यांतलेच आहेत. त्यातलाच एक बुद्धिमान मनुष्य दुसऱ्याला म्हणतो हे उत्तर आधुनिक आहे. दोघांनाही चालतंय का हे उत्तर आधुनिक म्हंटलेलं ? माहिती नाही. अतिवास्तवात काय घडतं? हे ॲब्सर्ड थियेटर का एवढं महत्वाचं आहे ?अँटी पोएट्री म्हणजे काय? आपल्याकडे अजून "कवितेत लय पाहिजे पाहिजे आहे, कवितेत वृत्त पाहिजे, अमुक पाहिजे, त्याला म्युझिक पाहिजे"असे म्हणतात. **मर्ढेकर** आले तेव्हा जे लोक होते त्यांना झाडूने हाकलून देऊ म्हणणारे, तसेच आजही आहेत. कारण ते एक बौद्धिक रेषेमध्ये काम करत असल्यामुळं कलाक्षेत्रात काय चाललंय याच्यात इंटरेस्टच घेत नाहीत. त्यांना समजून घ्यायचं पण नसतं. कलाक्षेत्रात ह्या माणसाचं नाव आहे आणि हा बोलत नाही ह्याच्यावर, असं कसं चालेल ? मग त्यानं काय करायचं ? हे सगळं फालतू आहे, असं म्हणून टाकायचं.

तुम्हाला गमतीचा भाग सांगतो, आपण अखिल भारतीय साहित्य संमेलन घेतो, अखिल भारतीय साहित्य संमेलन असं त्याचं नाव आहे. त्याच्यात, मी तुम्हाला अलीकडच्या काळातले चार अध्यक्ष सांगतो. साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाच्या खुर्चीवर बसायची हौस आहे पण हे सद्गृहस्थ साहित्याबद्दल एक ओळही बोलत नाहीत. फक्त राजकीय बडबड करून निघून जातात. बरं राजकीय बडबड तरी काही खास आहे का ? एखाद्या पक्षाचा गल्लीबोळातला कार्यकर्ता जे भाषण करेल तेच भाषण हे करून जातात. आणि हे असतात साहित्य संमेलनाचे अध्यक्ष ! ज्या अर्थी अशी माणसं साहित्य संमेलनाची अध्यक्ष होतात, त्या अर्थी आपल्या सगळ्यांचा त्याला पाठिंबा आहे. आपल्या सगळ्यांना ते हवं आहे आणि आपल्या सगळ्यांना ते आवडतं आहे. मग मराठी साहित्य जागतिक का होत नाही असं म्हणून रडायचा कार्यक्रम असेल तिथे मला बोलवू नका कृपया. ते ज्याला रडायचं आहे त्याला रडू देत.

ह्या गोष्टी लक्षात घेतल्या पाहिजे.

खानोलकरांची जी शैली आहे, ते पशु, पक्षी, वनस्पती, प्राणी, माणूस, निरनिराळ्या वस्तू, रस्ते काय असेल जे, हे सगळं एकत्र घेऊन ते लिहीत असतात.ते कुठल्यातरी पात्रांची नुसती गोष्ट नाही लिहीत. ही त्यांनी ठरवून आणलेली शैली नाही आहे. ही त्यांच्या आवाक्यातून तयार झालेली शैली आहे. काहीजणांना ती शैली आवडत नाही. अशा प्रकारच्या शैलीमुळे खानोलकर कळायला अवघड जातात असं त्यांचं म्हणणं आहे. काहीजण म्हणतात आम्हाला आवडत नाही. आवडत नाही हे ठीक आहे हो. होऊ शकत असं. परंतु तुम्ही तो कलावंत नाकारू शकत नाही. जेव्हा तुम्हाला माहिती आहे, हा गंभीरपणे लिहिणारा कलावंत आहे, हा काहीतरी करतोय, तर तुम्ही निदान, किमान इतकी बुद्धी बाळगायला पाहिजे, बघू या, हा काही पोरकट माणूस नाही आहे, हा काही बक्षीस मागायला आलेला माणूस नाही आहे, हा काहीतरी गंभीरपणे करतोय. मला ते पाहता आलं पाहिजे, बघू, एवढा तरी संयम ठेवला पाहिजे.

याच्या उलट उदाहरण तुम्हाला देतो, **डिलन थॉमस**ची एक कविता कुठेतरी प्रसिद्ध झाली, ती टी एस एलियटनी पहिली. एक कविता पाहून एलियट म्हंटला हा ग्रेट कवी आहे. आपल्याकडे एकाही समीक्षकाची ही कुवत नाही आणि हिंमत नाही. असा ग्रेटनेस ओळखायचा आणि आपण ते ओळखतो याची क्लॅरिटी असणं आणि ती क्लॅरिटी व्यक्त करणं, असा समीक्षक आपल्याकडे ॲव्हेलेबल नाही. नाट्यक्षेत्रात तर नाहीच आहे. तर खानोलकर जे लिहीत होते, त्याच्यात माणसाच्या मनातली जी द्वंद्वं आहेत अनेक प्रकारची, नीती अनीती असेल, अध्यात्म किंवा रोजच जगणं असेल, सेक्स असेल -- अशा सर्व बाबतींतली – ती येत होती. सेक्स ही जितकी तुम्हाला पकडून ठेवणारी प्रेरणा आहे, तितकीच अध्यात्म ही प्रेरणा हजारो वर्षं आहे. हे चार बुद्धिप्रामाण्यवादी काय म्हणतात त्याच्यावरती हे अवलंबून नाही आहे. तर हे द्वंद्वं काय आहे ? हे द्वंद्वं माणसाच्या जगण्यातलं द्वंद्वं आहे. हे कुठल्या विचारसरणीमुळे येत नाही. मी का आहे ? मला दुःख का होतंय ? माझा प्रत्येक संबंध संघर्षमय का आहे ? हे जे प्रश्न आहेत, त्यांची त्या भानामध्ये बौद्धिक उत्तरं नाही मिळत—ते प्रश्न रिझॉल्व्ह होतात. ते संघर्ष त्या भानामध्ये नाहीसे होऊ शकतात. त्याची बौद्धिक उत्तर नाही आहेत. बौद्धिक उत्तरं नसलेलं माणसाचं जगणं खानोलकरांच्या लेखनात आहे. तुम्ही ओळखा ह्या माणसाला. हा माणूस फाटका होता आक्रमक नव्हता. तो कोणावर हल्ले करत नव्हता. तो गपचूप बसायचा. चार हुशार लोक जमले तर तो कोपऱ्यात बसायचा. अरे, हा काम काय करतोय हे कधी बघणार? खानोलकरांच्या चरित्रामध्ये चिदानंदाचा मठ हे श्रद्धेचं स्थान. ते देवपूजा करत असत. अथर्वशीर्ष म्हणत असत. कोणाला माहीत नसलेली गोष्ट सांगतो जी त्यांच्या माझ्या बोलण्यात येत असे, त्यांच्या बोलण्यात अनेकदा योगवासिष्ठाचे उल्लेख येत असत .

हे जे माणसाच्या जगण्यातले प्रश्न आहेत हे समजून घ्यायला तुम्ही एकतर बुद्धाकडे जाल किंवा योगावासिष्ठाकडे जाल किंवा जे कृष्णमूर्तींच्याकडे जाल. ते प्रश्न समजून घ्यायची निकड वाटली तर तुम्ही जाल. त्यासाठी निकड वाटावी लागते. खानोलकरांच्या लेखनात हे प्रश्न समजून घेण्याची निकड आहे.

ती निकड नसलेल्या लोकांनी त्याच्याबद्दल मतप्रदर्शन करणं मला तरी उथळपणाचं वाटतं. एकजणं खानोलकरांना , त्या भाषेत मी बोलू का नको असं मला संकोचायला होतं, तरी मी बोलतो. आपण सगळे जाणकार लोक आहात. एकाने असं लिहिलंय, हा तिच्यावर झोपतो, ती ह्याच्याखाली झोपते, याच्यापलीकडे आहे काय म्हणे ह्याच्यात ? अरे हे आहे का खानोलकरांच्या सगळ्यात लेखनात? तुम्ही काय बडबडताय ? तुम्हाला ते जमत नाही, तुम्हाला ते आकलन होत नाही, याचा अर्थ तुम्ही काहीही त्याच्यावर शेरे माराल ? आणि स्वतःला जवाबदार समीक्षक म्हणवाल तुम्ही ?! हे काय चाललंय ? तर ही गोष्ट आपल्यापैकी बऱ्याच जणांनी लक्ष देण्याची गोष्ट आहे. नाही तर काय होईल, नुसता उथळपणा बोकाळत राहील आणि चांगलं जे आहे ते नष्ट करायला आपण मदत करू. तसं होऊ नये असं मला वाटतं. बुद्धिप्रामाण्यवादाबद्दल मी तुम्हाला आणखी विचित्र मत सांगतो. महत्वाकांक्षा तर असणारच हो, द्वेष तर थोडाफार असणारच, टेन्शन येणारच, वर्चस्वाची इच्छा असतेच माणसालाआणि ती असणारच.असं सगळं बुद्धिप्रामाण्यवादात मान्य करावं लागतं. बुद्धीने जगायचं आणि ह्या सगळ्या गोष्टी नसणार जगण्यात, हे शंभर टक्के अशक्य आहे. हे मान्य करावं. हे मान्य केल्यावर त्याचा परिणाम म्हणून आपण जे जगात आलो, जे बर्बाद करत आलो आपण एकमेकांचं आयुष्य तेही अटाळच ना ? एकमेकांचं आयुष्य आपण आजही घाण करतो आहे. ते चालू ठेवण्याचा हा प्रकार आहे. ते चालू

राहणारच नं ! त्यातून काय सुधारणा होईल ते बघायचं असं त्यांचं म्हणणं असतं. होतात सुधारणा, थोडी सुधारणा होते. हे गेलं ते आलं ते गेलं हे आलं.परंतु माणसाच्या जगण्यातले संघर्ष, युद्धाची भीती, युद्धातील संहार बघणं, म्हटलं तर ते करुण आहे. म्हटलं तर ते महाविनोदी आहे. काय फिती लावून फिरतोस गाढवा, कसल्या फिती लावतोस ? माणसं मारायच्या फिती ? हे आम्हांला शौर्य वाटतं. आम्ही याचा गौरव करतो. ही काय भानगड आहे ? असा प्रश्न आपल्याला पडला पाहिजे.  धर्म हा शब्द मी अध्यात्म ह्या अर्थी घेतो. हिंदू, मुसलमान नाही.  ते गेले बोंबलत, मला त्यांच्याशी घेणं नाही. मी माणसाच्या जगण्यातल्या  प्रश्नांचं म्हणतोय.

ते नसेल, त्याच्याकडे लक्षच द्यायचं नसेल आपल्याला, तर आता जी आपापली जगण्याची पद्धत आहे त्या पद्धतीत आपण जगत राहणार आहे. एकमेकाला बर्बाद करणार आहे. एकमेकांचं स्वास्थ घालवणार आहे. एकमेकांना नीट जगू द्यायचं नाही, हे आपलं स्वतःच जगणं असणार आहे.आणि तरीही आपल्याला मूल्यात्मक बोलायची हौस आहे !

आता त्याच्यातून निर्माण होणाऱ्या काहीटेक्निकल गोष्टी सांगतो. जे खानोलकरांचे दोष म्हंटले जातात. त्याबद्दल मला बोलायचंय.

त्रिशंकू ही एक कादंबरी आहे खानोलकरांची. त्रिशंकू ह्या कादंबरीत भाग एक आणि भाग दोन आहेत. ती जेव्हा श्री. पु. भागवतांना (सत्यकथावाले) वाचायला दिली, तेव्हा ते म्हणाले, "खानोलकर, दुसरा भाग पहिल्या भागाशी मेळ खात नाही, जरा विचार करा. सध्या  राहू द्या". खानोलकरांनी ते स्क्रिप्ट ठेवलं बाजूला. काही महिने ते पडून होतं. दरम्यानच्या काळात अजगर लिहिली, चानी लिहिली. नंतर पुन्हा ते श्रीपूंकडे गेले आणि म्हणाले, ह्यात काही बदल होणार नाही, हे असंच. श्रीपूंनी कलावंताच्या म्हणण्याला मान दिलाआणि छापली ती आहे तशी कादंबरी. खानोलकरांच्या लेखनात असा प्रश्न आणखीन एका ठिकाणी आला. मी तुम्हाला कोणाला माहिती नसणाऱ्या गोष्टी सांगतो आहे कारण तुम्ही मला ती संधी दिली आहे बोलायची.

त्यांचं **सगेसोयरे** नावाचं नाटक, खानोलकरांच्यामुळे तुम्ही आज जे पारितोषिकमला  दिलंत  त्या माझ्या प्रोसेस मध्ये खानोलकरांचा देखील हात आहे. कसा तर त्यांच्यामुळे मी एक शून्य बाजीरावच्या तालमी बघू शकलो होतो. ते  **विजया मेहता** बसवत होत्या. त्यांच्यामुळे मी सगेसोयरेच्या तालमी बघू शकलो. ते **अरविंद देशपांडे** बसवत होते.तर, नकळत ते ट्रेनिंग असतं. नकळत होणार शिक्षण आहे ते. ते खानोलकरांच्या मैत्रीमुळे मला मिळालं. हे ऋण सुद्धा मला इथे नोंदवायचं आहे.

तर जे सगेसोयरे नाटक आहे, त्याचा पहिला अंक गंभीर आहे दुसरा अंक विनोदी आहे. अरविंद देशपांडेंना प्रश्न पडला होता कि हे नाटक गंभीर का विनोदी ? कसं करायचं सादर ? मी पाहिलं की  त्यांनी ठरवलं की अमुक असं ठरवायचं नाही, हा अंक असा आहे तर असा करायचा, दुसरा अंक तसा आहे तर तसा करायचा.

आता हे का होतं ? मी कुठेतरी माझंच उदाहरण देतोय, माझी '**साक्ष मावळत्या सूर्याची**' नावाची एक  एकांकिका आहे. ती **पुरुषोत्तम** मध्ये सर्वोत्कृष्ट प्रायोगिक एकांकिका ठरली होती. त्या एकांकिकेत अशी दोन पात्र आहेत की  एकमेकांवर प्रेम आहे पण त्या प्रेमाला दोघांच्याही घरचा विरोध आहे, तर नको ती कटकट --  त्याच्यातून हिंसा व्हायला नको, कोणाला त्रास व्हायला नको, म्हणून ते दोघं ठरवतात की  आपण सोडून देऊ.वेगळे होऊ.  लैला मजनू किंवा इतरांची जेव्हा नावं आपण  घेतो ते आपण ते

सगळं ओलांडून येणाऱ्यांची नाव घेतो. पण त्याचबरोबर एखादं समजूतदार कपलही असू शकतं.तर ते शेवटचे भेटतातअशी ती एकांकिका आहे. ती लिहिताना काही ठराविक पानं लिहून झाल्यानंतर एकदम माझी स्टाईल सटकली, वेगळेच संवाद लिहिले गेले. चाललेलं काय आहे आणि मी लिहितो काय ! असं दोनदा झालं त्या एकांकिकेत. याचं कारण एका रेषेत हे मावत नाही, हे आहे. इथं हे संपतंय. असं काहीतरी लेखकाला त्यावेळी वाटतं आणि लेखनाचा स्तरच बदलतो. तसं खानोलकरांच्या ह्या दोन कलाकृतींमध्ये झालेलं आहे. खानोलकरांसारखे लेखक जेव्हा स्तर बदलतात तेव्हा आपण ते समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. हा एक गंभीर माणूस आहे, हा स्वतःच्या सर्जकतेतून लिहितो आहे, हे आपण लक्षात घेतलं पाहिजे.

आता खानोलकरांच्या लेखनामध्ये एक बाई येते. विश्वनाथचं किराणामालाचं दुकान आहे. ती म्हणते "दोन पैशांचे धणे द्या हो". आता दोन पैशांचे धणे ! शक्य आहे का ? गेला तो काळ. दोन पैशाचे धणे काय दोन पैसे सुद्धा बघायला नाही मिळत आता. दोनशे रुपयांचे धणे घेतले तर मिळतील. तर दोन पैशांचे धणे. चार आण्यात तुम्ही लॉज मध्ये राहू शकता. तो काळ आहे का आता ? मग कालबाह्य झालं का साहित्य हे ? असं कालबाह्य होत नाही.

त्या कलाकृतीमध्ये कोणतं वास्तव आहे ? कोणतं रॉ मटेरियल आहे ? ते रॉ मटेरियल जुनं झालं का नवं आहे याच्यावर त्या कलाकृतीचं महत्त्व वा  मूल्य ठरत नाही, हे लक्षात घ्यायला पाहिजे. आपल्या लोकांना काय वाटतं ग्रामीण भागातलं लिहिलं किंवा त्या सायनच्या झोपडपट्टीतलं लिहिलं तर ते अधिक ग्रेट, मध्यमवर्गीय माणसाचं लिहिलेलं ग्रेट नाही.

त्यातल्या अनुभवाला, मटेरियललाआपण महत्व देतो. नुसतं अनुभवाचं मटेरियल इम्पार्ट करणं, हे करणारे जे कलावंत असतात, ते मुळातच खुजे असतात. मराठीत बहुसंख्य कलावंत असे आहेत. तर ही जी मर्यादा आहे, ही ओलांडली कशी जाते ? तर ही ओलांडली जाते जेव्हा तो कलावंत ती बुद्धीची लाईन सोडून सगळ्या गोष्टींकडे पाहतो तेव्हा.

बुद्धीच्या कचाट्यातून कलावंत जेव्हा सुटतो तेव्हा ती मर्यादा ओलांडली जाते. खानोलकर हे ह्या सगळ्या दृष्टीने, महत्त्वाचे लेखक आहेत. म्हणजे, तत्वज्ञान हा त्यांचा विषय नाही, तोंडी तुम्ही त्यांना विचारलं तर तत्वज्ञान त्यांना सांगता नसतं आलं. त्याच्या लिहिण्याच्या प्रोसेस बद्दल ही फारसं काही सांगता नसतं आलं.त्यांची कविता ह्या विषयाची कविता आहे, हे ठीक आहे. तुम्ही त्यांची मुलाखत घ्यायला गेलात तर -- त्यांचं मुलाखतींचं पुस्तक वगैरे असं काही नाही आहे. मग खानोलकर छोटे धरायचे का ? ते असे बौद्धिक हुशार नव्हते. इनसाईटफुल होते.

मर्मदृष्टी ज्याला आपण म्हणतो ते. नुसती मर्मदृष्टी नाही तर जबरदस्त कौशल्य. माध्यमावर जबरदस्त पकड. याची  मी तुम्हाला दोन तीन उदाहरणं देतो. **अजब न्याय वर्तुळाचा** हे नाटक  **ब्रेख्त**च्या नाटकावरून केलं. खानोलकरांना इंग्लिश अजिबात येत नव्हतं. ते कसं वाचणारआणि मराठीत आणणार ? हे शक्य नव्हतं. विजया बाई एक एक सीन खानोलकरांना समजावून द्यायच्या आणि खानोलकर तो लिहून काढत. अतिशय अभ्यासू माणसाला सुद्धा जमणारी  ही गोष्ट नाही, हे मी नम्रपणे सांगतो. मलाही ते शक्य नाही. खानोलकरांनी ते आख्खं नाटक  ब्रेख्तच्या तोडीस तोड मराठीत आणलं. ती खानोलकरांनी क्रिएटिव्हिटी होती, त्यांना ते समजत होत.

खानोलकरांचं दुसरं एक उदाहरण,**येरे घना येरे घना** ही एकच ओळ त्यांना सुचली होती. किती वर्षं ती एकच ओळ होती. नंतर त्यांनी त्याची कविता केली. कविता केली आणि झालं! ते काही त्याच्यात अडकून पडणारे नव्हते. नवीन गोष्टीकडे ते वळत होते. एक दिवस **हृदयनाथ मंगेशकरांनी** शांता शेळकेंकडून त्यांना निरोप पाठवला की भेटायला बोलवा त्यांना. ते भेटायला गेले. हृदयनाथ मंगेशकर म्हणाली की ही अपुरी आहे कविता. एकदोन कडवी टाकली की त्याचं गाणं होईल. खानोलकर म्हणाले, "नाही, झाली ती कविता, तेवढीच ती". मग हृदयनाथांनी शांत शेळकेंना विनंती केली तुम्ही त्या कवितेची पुढची कडवी द्या लिहून. त्या लिहायला लागल्या. त्यांनी काय जे लिहिलं असेल ते वाचून दाखवलं. खानोलकर म्हणाले द्या इकडे आणि असं म्हणून त्यांनी ती पुढची कडवी लिहून दिली. आज ते गाणं आपल्यासमोर आहे

**चानी** ह्या चित्रपटाची गाणी, कोणी कल्पना करणार नाही, गाणं म्हणजे चाल असलेलं गुणगुणलेलं भावगीत असंच आपण समजतो. हृदयनाथ मंगेशकरच त्याला संगीत देणार होते. खानोलकरांनी ती गाणी त्यांच्यापुढे ठेवली. ते म्हणाले "अरे काय लिहून आणलं हे?, हे म्हणजे अग्रलेखाला चाल लावण्यासारखं होणार आहे." खानोलकर म्हणाले "हे पात्र ज्या परिस्थितीत वाढतंय आणि ज्या प्रकारचं आहे त्या पात्राची हीच गाणी आहे, आणि तू अग्रलेखाला चाल लावणारा आहेस म्हणून तर तुला इथे बोलावलं आहे " तुम्ही रे दोन दोनच माणसं, हे गाणं आपल्याला माहीत आहे.

एक गोष्ट माझ्यामुळे घडलेली तुम्हाला सांगतो. मी नोकरी निमित्त पुण्याला आलो. खानोलकर कधी कधी पुण्यात यायचे ते **पूना गेस्ट हाऊस** वर उतरायचे. मी त्यांना भेटायला जायचो. गप्पाटप्पा व्हायच्या. दरम्यानच्या काळात पुण्यात **फिल्मइन्स्टिट्यूट** मध्ये, जगातले अनेक चांगले चित्रपट दाखवले जायचे. तिथे मी शिरकाव करून घेतला होता आणि त्यातले काही चित्रपट मी पाहत असे. झेकोस्लोवाकियातला एक चित्रपट होता **'द फनी ओल्ड मॅन'** नावाचा. तो पाहून मी इतका भारून गेलो की त्या चित्रपटातला कण न कण माझ्या लक्षात राहिला. त्या सुमारास खानोलकर मला भेटले. मी तेव्हा त्याच झेक चित्रपटाच्या तंद्रीत होतो. त्यांना म्हणालो, एक ग्रेट चित्रपट मी पहिला. त्यांनी विचारलं काय होतं त्याच्यात ? मी म्हंटल मला त्यातलं सगळं आठवतंय. सांगू का तुम्हाला ? ते म्हंटले सांग. तर तो चित्रपट मी खानोलकरांना सांगितला. त्यांची **अज्ञात कबुतरे** नावाची जी कादंबरी आहे त्याच्या शेवटी लिहिलं आहे 'कल्पना एका झेक चित्रपटावरून'. तो चित्रपट खानोलकरांनी पाहिला नव्हता -- मी पहिला होता.

त्यांना स्वतःची थोरवी माहिती होती. इतरांबद्दलही माहिती होतं पण त्या प्रकारचा रिस्पॉन्स नव्हता.

त्यांनी एका ठिकाणी असं म्हंटल की साहित्यबाह्य सबबी जर बाजूला ठेवल्या तर **ज्ञानपीठ** मला मिळायला पाहिजे. माझ्या मते ते त्यांचं म्हणणं योग्य आहे. कारण साहित्य हे माणसाच्या जगण्याशी संबंधित आहे. तुम्ही सगळ्या भाषांत अनुवादित करता ती पुस्तकं. ही अवेअरनेसची क्वालिटी आहे --त्याला तुम्ही महत्त्व देत नाही. मग कसली देता पारितोषिक ?. खानोलकरांना ती खंत होती आणि ती योग्य खंत होती.

त्यांची तेंडुलकरांशी नेहमी तुलना व्हायची. ते स्वतःही करायचे. तो प्रसंग त्यांच्या चरित्रात आलेला आहे. समजा खानोलकरांनी नाटक लिहिलं आणि श्री. पु. भागवतांना फोन केला तर संवाद कसा होईल हे ते सांगायचे. तुमच्यापैकी काहीजणांना माहिती दिसत नाही म्हणून थोडक्यात सांगतो. खानोलकरांनी फोन केला.

"श्रीपु नाटक लिहिलंय"

"हो का ? कधी लिहिलं ? "

"कालच लिहून झालंय, तुम्हाला वाचून दाखवायचं होतं"

"हो वाचूया नं "

"कधी येऊ ? उद्या येऊ का ?"

"अरे उद्या काय माहीत आहे का ? माझी कॉन्फरन्स आहे आणि पुढे तीन चार दिवस मी चालतोय बाहेरगावी, मग आपण असं करूया का? पुढच्या आठवड्यात ठरवू या का ?" वगैरे.

खानोलकरांनी नाटक लिहिलं ह्याला काही महत्व नाही. पण हेच जर तेंडुलकरांचं असेल तर!

"भागवत एक नाटक लिहिलंय"

"अरे वा! कधी वाचायचं?"

हा संवाद खानोलकर स्वतःच म्हणून दाखवायचे.

एक शून्य बाजीराव ह्या नाटकाचा पहिला प्रयोग झाला तो मुंबईच्या **विल्सन कॉलेजात**. तालमीला सुद्धा मी असायचो.अनेकांनी वाखाणलं ते नाटक. आपण महाराष्ट्रीयन लोक करंटे असल्यामुळे फक्त नऊ दहा प्रयोग झाले, खूप झाले. पण आजही ते नाटक मराठीतलं अद्वितीय नाटक समजलं जातं. सत्यकथेनं ह्या नाटकावर स्वतंत्र अंक काढला होता. मराठीतलं महान नाटक आहे. ते नाटक झाल्यावर एक स्त्री समीक्षिका त्यांना सांगायला आली की फार छान नाटक आहे, मला आवडलं. त्या स्त्री समीक्षकेनी खानोलकरांच्या कवितेवर आधी वाईट लिहिलं होतं. ते त्यांच्या डोक्यात होतं. ती सांगायला आली की नाटक चांगलं आहे, मला आवडलं. ते म्हणाले, तुम्हाला काही कळत नाही, तुमच्या म्हणण्याला मी काही महत्त्व देत नाही. दुसरी एक अशी घटना आहे खानोलकरांच्या तिरसटपणाची. एका नाटककाराच्या एका नाटकाच्या पहिल्या प्रयोगाला खानोलकरांना बोलावलं होतं. तो नाटककारही त्यांच्याबरोबर बोलत होता. इतक्यात तिकडून एक कुणी सेलिब्रेटी म्हणावी अशी व्यक्ती आली. हा नाटककार खानोलकरांना सोडून पळत तिकडे गेला. जरा वेळाने त्यांच्याशी बोलून झाल्यावर आला तो. खानोलकर म्हणाले "तुम्ही ********** आहात, मी जातो" गेले निघून प्रयोग नाही आणि काही नाही.

हे खानोलकरांना चालणारच नाही. अशी ती व्यक्ती होती. मनस्वी व्यक्ती होती. सर्व तऱ्हा होत्या. असे किरकोळ अहंकार, कुठे एकमेकांबद्दल राग, असे  करणारी ही  व्यक्ती अशी निर्मिती कशी काय करू शकेल ? पुन्हा मला तेच सांगायचंय, लिहिताना हा मनुष्य माणसाच्या बौद्धिक, रागालोभाच्या ज्या क्रिया आहेत त्यातून सुटत होता.

एक गंमतीच उदाहरण सांगतो आणि संपवतो. खानोलकरांचं **'माकडाला चढली भांग'** नावाचं लोकनाट्य होतं. **शाहीर साबळेंनी** ते केलं होतं. **सुहास भालेकर** त्याच्यात काम करायचे. थोडंसं कविता, शेरो शायरी होतं, टाळ्या खूप पडायच्या, लोक खूप हसायचे. त्याच्या पंचविसाव्या प्रयोगाला **आचार्य अत्रेंना** बोलावलं होतं. खानोलकरांच्या शेजारी आचार्य अत्रे ! कल्पना करा. थियेटर मधला जबरदस्त रिस्पॉन्स. बघून अत्रेंनी त्यांच्या पाठीवर थाप मारली,

"बघ थियेटर खूष आहे तुझ्यावर"

खानोलकर म्हणाले," ते ठीक आहे पण माझ्या अजगर कादंबरीवर तुम्ही फार घाणेरडा लिहिला होता हो अग्रलेख"

तर अत्रे त्याहून सुपर. ते म्हणाले, "आम्ही लिहू तर अजगरावरच लिहू, गांडुळांवर नाही. "

खानोलकरांबद्दल बोलताना मी इथे जो आदर व्यक्त करतोय. त्याच्या आधीही  मी एक आदर व्यक्त केला आहे, ते मी थोडक्यात सांगतो. मघापासून मी सांगतोय कि आपली कविता खुजी आहे. आपण काही ठराविक चौकटीत अडकलो आहे. आपली कविता काही बाहेर पडत नाही. त्यासाठी मी जगभरातील अठ्ठावन्न कवितांचा मराठी अनुवाद केला पण ते जाऊ द्या. मी एक पुस्तक लिहिलं-- मोठमोठ्या समीक्षकांसारखं शेरे मारून पळून जायचं नाही. आपण जे काही म्हणतो त्याची कारणं  द्यायची आणि सगळं सविस्तर लिहायचं. म्हणून मी सविस्तर लिहिलं. कवितेचं पुस्तक आहे आणि त्यात मी मराठीतले छत्तीस कवी घेतले, ज्यांच्या एक दोन एक दोन कविता मला आवडल्या ते मी घेतले. इथे जाता जाता गमतीचा भाग म्हणून सांगतो की मर्ढेकर हे आपले मोठ्ठे कवी आहेत. पण मी मर्ढेकर पुन्हा वाचले तर मला त्यांची फक्त एकचं कविता महत्वाची वाटली.ती घेतली मी पुस्तकात आणि त्याच्यावर माझं भाष्य दिलं. त्या पुस्तकात खानोलकरांची **'आवर्तने द्रुत शून्याची' ही** कविता आहे, तिच्यावर मी लिहिलं आहे. या कवितेची कहाणी अशी कि पूर्वी **गो. म.कुलकर्णीं**चं पुस्तक होतं **रसग्रहण** नावाचं, त्याच्यात त्यांनी निरनिराळ्या कवितांवर अनेकांकडून लिहून घेतलं होतं. त्यात मी ह्या कवितेवर लिहिलं होतं. मी म्हंटल हे पुस्तक आपण लिहितोच आहे आणि खानोलकरांची  ती उत्तम कविता आपल्याला माहिती आहे. तेच आपण याच्यात  घेऊ. म्हणून मी ते घेतलं. नंतर माझ्या लक्षात आलं की  पुस्तकात ती जी कविता छापली आहे. ती सलग छापली आहेत. कडवी नाही आहेत. मला आठवत होतं  की त्या कवितेत कडवी आहेत. खानोलकरांच्या कुठल्याही कविता संग्रहात ती कविता नाही आहे. मग आता करावं काय?सोलापूरचे नितीन वैद्य आहेत त्यांना फोन केला. त्यांच्याकडे सत्यकथेच्या पहिल्या अंकापासून शेवटच्या अंकापर्यंत सगळ्या साहित्याची सूची आहे. त्यांनी ते तपासून पंधरा मिनटात मला सांगितलं की अमुक दिवाळी अंकात ही कविता आलेली आहे. हे सांगायचं कारण म्हणजे मी किती काळजी घेतो हे नव्हे. आपण सगळ्यांनीच गंभीर राहिलं पाहिजे कवितेबद्दल.सगळ्यांनी त्या साहित्याकडे

गांभीर्याने पाहिलं पाहिजे म्हणून मी हे उदाहरण देतोय. त्यांनी मला तो अंक सांगितला. अंक सांगितला पण कविता कुठंय ? त्या कवितेत कडवी होती हे मला कुठून कळणार ? तर माझा एक मित्र आहे गिरीश पतके म्हणून ज्याने माझी चार पाच नाटक दिग्दर्शित केली. त्याला फोन केला. तो मराठी राज्य विकास मध्ये काम करतो. तो म्हणाला मला नाही माहीत पण सुशान्त देवळेकर म्हणून आहे त्याच्याकडून होईल काम, आणि तसं झालं. त्या सुशान्त देवळेकरला माहिती होतं की एका माणसाकडे सत्यकथेचे सगळे अंक आहेत. त्याने त्या माणसाशी संपर्क साधून ह्या खानोलकरांच्या कवितेचा फोटो मला पाठवून दिला. असं गांभीर्याने काम करणारे काही लोक मराठीत आहेत. माझी वाचक म्हणून सगळ्यांना विनंती की हेच गांभीर्य आपण कवितेबद्दलआआणि इतर लेखनाबद्दल बाळगलं पाहिजे. तर ती जी कविता आहे ह्या पुस्तकात घेतलेली त्याच कवितेवरून मी माझ्या त्या पुस्तकाला ‘ आवर्तने ‘ हे नाव दिलेलं आहे.

**थोडक्यात बोलायचं म्हणून मी बरंच बोललो. त्याबद्दल दिलगिरी वगैरे कसली ? आपलेच लोक आहेत सगळे. ठीक आहे.**

**धन्यवाद !**

**********************************************************************

**शब्दांकनकार अद्वैत अविनाश सोवळे**

**पता C/O श्रीमती कमल मुजुमदार, ९६, श्रीराम अपार्टमेंट, डहाणूकर कॉलनी, ५ वीं गल्ली, कोथरुड, पुणे-३८**

**ईमेल** advaitsowale@gmail.com

**मोबाईल नंबर ९४०५५०८५५१**

**--- ००० ---**

आजच्या ' सामना, पुणे ' च्या ' उत्सव ' पुरवणीत --
हिमांशू भूषण स्मार्त यांचा लेख --- ( माझ्या ' वेषांतर ' या एकांकिकेबाबत -- )

नाव

पूर्वी बालमृत्यूंचे प्रमाण खूप होते. काहीजण त्याचा अर्थ असा लावत – खरे तर सगळे नियती घडवते. हे विसरून उपटसुंभाप्रमाणे आपल्या मुलाच्या जन्माचा आपण आनंद घेतो आणि त्याचे उत्तम नाव ठेवून जणू काय ते आपलेच कर्तृत्व आहे असे मानतो, याचा नियतीला राग येत असावा, त्यामुळे, चिडून ती आपली मुले मारत असावी. मग यावर, नकोच ती कटकट आणि आपला आनंदी अहंकार, असे म्हणून ते लोक मुलांची नावे धोंडू वा बाळ अशी ठेवत. अशा नावांची मुले जगल्याचे पाहून यामागचे समज दृढ होत. माझ्या, ‘ नातं ‘ या दीर्घांकात खालील संवाद आहे --

अनघा: तुझी फक्त कीव येतेय मला. आणि केलास समजा तू माझा खून, तर पुढं न्यायालयात तुला ज्या अनेक प्रश्नांना तोंड द्यावं लागेल तेव्हा पुन्हा तू शेणामेणाचा होशील.

अनिल: ( जरा वेळ एकटक तिच्याकडे पाहून -- ) विचार प्रश्न.( हे तिला अगदीच अनपेक्षित. कसाबसा तोल सावरते. काही क्षण पाहात राहते. मग पाहातच निश्चयानं उठते. समोर येते. तो आहे तिथे उभा. शांतता.)

अनघा: ( एखाद्या वकिलाच्या निग्रहानं ) नाव काय तुमचं ?

अनिल: अनिल हणमंत नाईक.

अनघा: वय ?

अनिल: एकोणतीस.

अनघा: शिक्षण ?

अनिल: एम..ए.

अनघा: धंदा.

अनिल: मूळचंद मिल्समध्ये कारकून.

अनघा: तुमच्या बायकोचं नाव काय होतं ?

अनिल: अनघा.

अनघा: म्हणजे लग्नात तुम्ही ठेवलेलं ?

अनिल: होय. तिचं पूर्वाश्रमीचं नाव माधुरी होतं.

अनघा: अनघा या शब्दाचा अर्थ काय ?

अनिल: निष्पाप स्त्री.

अनघा: तुम्हाला ती तशी वाटत होती ? निष्पाप ?

अनिल: वाटतही असेल...पण त्यात बहुतेक तशा अपेक्षेचाही भाग होता. आणि हे नाव मी केवळ अर्थाकडे लक्ष देऊनच ठेवलं असं नाही. थोडं नावीन्य -- ही अक्षरं -- आणि ही अक्षररचना हीही मला आवडली असतील. शिवाय नाव म्हणायला सोपं-सुटसुटीत. बायको नवऱ्याला सोपी-सहज असावी.

यात म्हणजे मी विचारी असणे आणि तरीही अर्थापेक्षा नुसत्या अक्षर रचनेचेही मला कोतुक वाटले असेल, असे म्हणणे यातून मी किती साधा, सरळ, समर्थनीय, हे सगळे येते. हे एक सकारात्मक अहंकाराचे वा व्यक्तित्वाचे लक्षण म्हणता येईल. माझ्या ' मन ' नावाच्या दीर्घांकतल्या व्यक्तीचे नाव नीलकंठ असे देवाचे नाव असूनही त्याचे व्यक्तित्व कमकुवत आहे. तो मानसिक गोंधळाने सदोदित ग्रस्त असतो.  नाव सोनऊबाई हाती कथलाचा वाळा, असे प्रकारही आपण जाणतोच. भाषा शास्त्रज्ञांनी याचाही अभ्यास केलेला आहे की बाबा आधी अर्थ अस्तित्वात असतो आणि मग त्याला एक कृत्रिम शब्द दिला जातो किंवा काय, कशी घडते ही प्रक्रिया. संरचनावाद, उत्तर-संरचनावाद आणि विरचना, यांतून ते पुढे येते. निसर्गातल्या सर्व प्राणी, वस्तू  काही नावासह अस्तित्वात आलेल्या नाहीत, ते आपले कर्तृत्व आहे. शब्द म्हणजे ती वस्तू वा वास्तव नसते. आपल्या संस्कारबद्धतेतून निर्माण होणाऱ्या त्या सगळ्या प्रतिमा असतात. आपले सगळे संबंधही प्रतिमांचेच असतात. प्रत्येक प्रतिमा इतर प्रतिमांच्या विरोधात असणे भाग असते.

त्यातूनच सतत संघर्ष, शिव्यागाळी, हिंसा हे घडत राहते. म्हणूनच जे. कृष्णमूर्ती विचारतात की तुम्ही एखाद्या झाडाकडे वा स्वत:च्या पत्नीकडे वा मुलाकडे शाब्दिक प्रतिमेशिवाय पाहू शकता का ? ते असाही प्रश्न निर्माण करतात की प्रतिमेशिवाय जगणे शक्य आहे का ? आपले जगणे इतके संघर्षमय आणि बिनडोकपणाचे चालू असते की हे प्रश्न समोर येणे अपरिहार्य असते.

आधीच खूप आहेत डोक्याला ताप, आणखी नकोत, असे आपण म्हणणार. बुद्ध किंवा तुकाराम पूर्णपणे जाणून होते की याच प्रश्नांना तोंड द्यावे लागेल. जे टाळटाळ करतील ते वेडे होऊन मरतील. आहे त्या निर्बुद्धपणातच विविधता निर्माण करत राहतील आणि एकमेकांच्या उरांवर बसत राहतील. मी अमुक धर्माचा किंवा मीच खरा मानवतावादी अशा स्वत:च्या प्रतिमा जोपासत एकमेकांना रद्द करत जगणाऱ्या मूर्खांना हे दिसणार नाही. ते त्यातल्या त्यात तरतम आणि आम्हीच कसे मौल्यवान अशा विचारांच्या भ्रमात राहतील . त्यातल्या त्यात ' हुशार ' बाजू घेत राहतील. अशी बाजू न घेणाऱ्यांना ' कुंपणावरचे ' म्हणत राहतील.

तुकाराम म्हणतो, हे अभंग मी नाही लिहिले, पेसोआ म्हणतो, या कविता मी नाही लिहिल्या. म्हणजे, प्रतिमेशिवाय जगणे यांना सापडले असेल का ? जाऊ दे. लावू या हे फेटाळून. बाजू घेऊन बोंबलत राहण्याच्या घाणीचे उत्पादन करणे हे आपल्याला नक्की जमण्यासारखे आहे. उंटाच्या ----- एवढी आपली उंचीही नाही आणि कुवतही नाही. मीच खरा समंजस आणि निरागस ही प्रतिमाच बरी आहे !

--- चं. प्र. देशपांडे.

०००

आवाजाचा नवा मार्ग

एक तर डेसिबल कित्येक पटीत लावता येतातच. तुमच्या कानठळ्या किती बसल्या हे कुणी मोजायला येणार नाही. तक्रार करायची एक तर हिंमत नाही किंवा कंटाळा आहे. होते काय की सलग गाणी लावली की मन कमी डिस्टर्ब होते -- नशा नीट येत नाही. माणूस त्या गाण्याच्या चालीत थोडाफार रमतो. त्या सातत्यात तो नाचूही शकतो -- प्रत्यक्ष वा मनाने. तर आमच्या भागातल्या लोकांनी यावर उपाय शोधून काढला आहे. आवाज जास्तीत जास्त असह्य ठेवायचाच पण आणखी एक करायचे --- कोणतेही गाणे सलग चालू द्यायचे नाही. फक्त एखाद-दुसरी ओळ -- पाचदहा सेकंद फक्त ! शंभर गाण्यांचे तुकडे घ्यायचे. नाच रे मोरा, एक दो तीन, चोली के पीछे, चार आण्याचं पीठ आणलं, नागोबा, वगैरे ! दे धमाल होते ! गाण्याचा फील अजिबात येत नाही -- पयुवर, शुद्ध आवाज ! गाण्यात विचार चालू राहतो -- हा दणदणीत गोंगाट मिळतो ! विचार शिल्लकच नाही राहात ! याला म्हणतात आवाजाची नशा !

--- ००० ---

शेवटाचं नाटक पुण्याचे बुजुर्ग नाटककार चं प्र देशपांडे ह्यांचं "बुद्धीबळ आणि झब्बू" त्यातल्या खट्याळ, चिमटे काढत, माणसांचे इरसाल नमुने दाखवत तुमच्याआमच्या नैतिकतेबद्दल अंतर्मुख करणाऱ्या ह्या नाटकाला रंगवलं

होतं बिपिन, अमृता, अनिरुद्ध आणि रूपाली ह्यांनी. ह्या नाटाकातल्या अनेक विनोदांना दणदणीत दाद मिळाली आणि नाटक संपल्यावर टाळ्यांचा कडकडाट.

संकेतस्थळाचे अद्ययावतीकरण

सुमारे वर्षभर मागे पडलेले हे काम पूर्ण झाले ! ' हाती घ्याल ते तडीस न्या ' हा मंत्र मला अनेकदा वापरावा लागतो. तांत्रिक कामांसाठी सहकार्य उपलब्ध असते ही यातली प्रचंड सकारात्मक बाजू ! बाकी मजकूरविषयक सर्व कामे मी एकहातीच करत असतो ! मराठीत हे कितपत हवेय-नकोय याचा विचार न करता आपण केलेले काम शक्य तो नीट उपलब्ध राहावे, हा प्रयत्न असतो. इतके लिहिताना आपण लाजलो नाही तर ते सुरक्षित करायला कशाला वेगळे तत्त्व वापरायचे, असा हा साळसूद विचार असतो. आता हे काम **२०-०४-२०२४** पर्यंत पूर्ण झालेले आहे. त्या तारखेपर्यंत मी केलेले सर्व लेखन तिथे उपलब्ध आहे.

बौद्धिक मतभेदांचे आदर्श अंगण ओलांडून लोकशाही आता मनोहारी शत्रुत्वाच्या प्रांगणात विहरत आहे !

Contradictions thy name is human !

म्हणून मला चं.प्र.देशपांडे अनोखे नाटककार वाटतात. त्यांनी या ‘भूमिका’ प्रकरणाचा अत्यंत नेमका समाचार घेतला आहे. पुरोगामी (तथाकथित) असणे हे सुद्धा भूमिका घेण्यासारखे आहे. माणूस जन्मतः भूमिकावान कुठे असतो ? तो प्रवाही असतो. प्रवाहाला अडथळा करणे किंवा वळण लावणे म्हणजे भूमिका घेणे.

निर्णय

" साहेब एकटेच निर्णय घेतात आणि ते सामूहिक असल्याचे भासवतात ! " -- आजितदादा पवार. यावरून एक गोष्ट आठवली, ती सांगतो. ' सामुदायिक नेतृत्व ' ही संकल्पना कै. यशवंतराव चव्हाण यांनी वापरात आणली. ही संकल्पना समस्यायुक्तच असणार हे मला जाणवले होते. त्या निमित्ताने एकूण जगण्याचा आवाका व्यक्त करावा असे वाटल्याने मी एक एकांकिका लिहिली होती. तिचे नाव होते, ' समुदाय ' ! या एकांकिकेत समुदाय नावाचे एक पात्रच होते -- तेच घेणार निर्णय !

सामुदायिक !

--- ००० ---

आजच्या ( १०-०५-२४ ) पुणे सकाळ मध्ये, अग्रलेखाच्या वर दिलेल्या तुकारामाच्या ओळी --

भेदाभेदमतें भ्रमाचे संवाद । आम्हां नको वाद त्यांशी देऊं ।।

तुका म्हणे अणु तुजविण नाही । नभाहूनि पाही वाढ आहे ।।

पहिल्या दोन ओळी विशेष आहेत. वेगवेगळी, भेदाभेद करणारी मते हे भ्रम आहेत असे म्हटले आहे. त्यांच्याशी वाद-संवाद करायची वेळ माझ्यावर आणू नकोस रे बाबा -- असे म्हणणे काय, विनवणीच आहे ! इथे काही लोक म्हणणार की तुकाराम ढोंगी आणि आपमतलबी होता -- त्याने एक बाजू घ्यायची शिकवण न देता कुंपणावर बसायचा सल्ला दिलेला आहे ! पुढच्या दोन ओळी तर आध्यात्मिकच असल्याने त्या वैज्ञानिक दृष्टिकोणात बसतच नाहीत ! -- हे असले आमचे संत ! सत्याऐवजी पळपुटेपणा शिकवणारे !!!!!

--- ००० ---

Girish Patke is with Champra Deshpande.

·

केवळ मराठीच नाही तर भारतीय रंगभूमीवरील एक महत्त्वाचे तत्त्वचिंतक नाटककार, कवी व ज्येष्ठ मित्र चं. प्र. देशपांडे यांना वाढदिवसानिमित्त खूप शुभेच्छा!

लवकरच प्रसिद्ध होणा-या त्यांच्या "ओळख परेड" या एकांकिका संग्रहात त्यांच्या एकांकिका व नाट्यकृतींवर मी लिहिलेला 'समग्र भानाची शहाणीव देणारे नाटककार- चं. प्र. देशपांडे' हा प्रदीर्घ लेख प्रकाशित होणार आहे. हीच माझ्याकडून त्यांना वाढदिवसाची भेट.

Rajesh Sonawane is with Champra Deshpande.

·

चं. प्र. सर, HAPPY BIRTHDAY !!!

श्रेष्ठ नाटककार, कवी, विचारवंत

चं.प्र. देशपांडे सर यांचा आज वाढदिवस...

काळ जसा पुढेपुढे सरकत जातो,

तसतसे आपले साहित्य आणि साहित्यिक

outdated होत जातात, असा आपला एरवीचा अनुभव.

याला जवळजवळ एकमेव, खणखणीत आणि सणसणीत अपवाद म्हणजे चं. प्र.सर.

सरांचे श्रेष्ठ साहित्य आजही नव्या पिढीशी सुसंवादी आहेच ; पण त्याच्याही पुढे जाऊन वयाच्या ७८ व्या वर्षीही सर सोशल मिडियावर कार्यरत आहेत. तेथील वाद - संवादात हिरीरीने भाग घेत आहेत. स्वतःचे सर्व साहित्य त्यांनी ' चंप्रलेखन ' http://www.champralekhan.com/ या वेबसाईटवर आणले आहे आणि त्याच्या अद्ययावतीकरणाचे जटील, क्लिष्ट कामही नुकतेच हातावेगळे केले आहे. त्यांचा हा उत्साह केवळ तरूणांचाच नव्हे ; तर तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञांनाही लाजवणारा आहे.

सर आमचे फेसबुक फ्रेंड आहेत,

हे आमच्यासाठी अत्यंत भूषणावह आहे.
सर, वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा !!
आपणास आरोग्य, दीर्घायुष्य लाभो ......

संभाजी सावंत
चंप्र थोर कवी आहेत, म्हणूनच थोर नाटककार आहेत. मराठीत त्यांच्यासारखा उत्तम सहजवादी नाटककार दुसरा नाही. असल्यास मला माहीत नाही.
चंप्र सर, वाढदिवसाच्या मन:पूर्वक शुभेच्छा!

Sameer S. Dalvi
.

'दैनिक महानगर'साठी लिहिलेला हा लेख दोन वर्षांपूर्वीचा असला, तरी चंप्रंच्या वाढदिवसानिमित्त त्याला पुन्हा उजाळा देता येऊ शकतो, असं वाटल्यामुळे पुन्हा देत आहे.
दैनिक आपलं महानगर - सारांश
जगण्यातील गधडेपणाचा शोध -
एकूणच भारतीय रंगभूमीला बहुविध आशयाची नाटकं लिहीणा-या अनेक थोर नाटककारांची परंपरा आहे. पण नाटकं लिहीता लिहीता कवी म्हणून सुद्धा आपली स्वत:ची अशी नाममुद्रा उमटवणारे मराठी नाटककार म्हणून चटकन आठवणारी नावं म्हणजे राम गणेश गडकरी, आचार्य अत्रे आणि वि. वा. शिरवाडकर होत. गडकरी 'गोविंदाग्रज' या टोपणनावाने, अत्रे 'केशवकुमार' या नावाने कविता करीत असत तर शिरवाडकरांचे 'कुसुमाग्रज' हे टोपणनाव आपल्या सगळ्यांच्या चांगलंच परिचयाचं आहे. कुठले नाटककार नाटक लिहीताना कवितेच्या प्रांतातही मुशाफिरी करत होते, हे सांगण्याचं या लेखाचं प्रयोजन नाही. परंतु नाटककार असण्यासोबतच समांतरपणे तितक्याच ताकदीची अभिव्यक्ती कवितेतून करणारे नाटककार मराठी रंगभूमीवर मोजकेच आहेत. इतकंच नव्हे तर, नाटककार हा 'कवी' असणं अपरिहार्यच आहे असं वाटावं, इतपत कवी म्हणून आपली स्वतंत्र प्रतिभा या नाटककारांनी दाखवून दिली आहे. अशा मोजक्या नाटककारांपैकी एक म्हणजे चंद्रकांत प्रभाकर देशपांडे !
नव्वदच्या दशकाच्या अखेरीस 'आविष्कार'च्या माहीमच्या जागेत जे सांस्कृतिक केंद्र दर महिन्याला चेतन दातार चालवत असे, त्याचा मी नियमित प्रेक्षक होतो. तिथे चंप्रंच्या नाटकांशी माझा पहिल्यांदा परिचय झाला. अर्थात, चंप्र त्याच्याही अनेक वर्षे आधीपासून नाटक लिहीत होतेच. पण तेव्हा पाहिलेल्या 'नाणेफेक', 'बुद्धीबळ आणि झब्बू', 'समतोल', 'डावेदार' आणि 'ढोलताशे' या नाटकांमुळे चंप्रंची एक कसदार नाटक लिहीणारे बुद्धिमान नाटककार म्हणून मला आणि माझ्या पीढीतल्या अनेक नाट्यरसिकांना ओळख झाली. पुढे उत्तरोत्तर ती ओळख त्यांच्या इतर नाटकांच्या वाचनातून दृढच होत गेली. असं असलं तरी त्या पलीकडे, नाटककार चंप्रंच्या लेखन व्यक्तिमत्वाचा आणखी एक अनोखा आयाम आहे आणि तो म्हणजे त्यांच्या कविता ! सुरूवातीला म्हटल्याप्रमाणे नाटककार हा

‘कवी’ असणं अपरिहार्यच आहे असं वाटावं इतक्या सहजतेने चंप्र कविता लिहीतात. तेव्हा त्यांच्यातल्या नाटककार आणि कवीचा जो मेळ माझ्या तोकड्या रसिकतेला जाणवला, तो थोडक्यात सांगावासा वाटतो.

नाटककार चंप्र आपल्या जवळ जवळ सगळ्याच नाटकांतून मानवी जगण्यातील ॲब्सर्डिटीचा, त्यांच्याच शब्दांत सांगायचं झालं तर जगण्यातील गधडेपणाचा उभा आडवा तिरकस शोध घेत आले आहेत. त्या शोधातून त्यांना दिसलेला गधडेपणा खुमासदार पद्धतीने संवादांतून सांगणं, हे त्यांच्या नाटकांचं मोठं वैशिष्ट्य आहे. त्याशिवाय, मानवी संबंधांतील - मग ते समाज म्हणून असोत वा स्त्री-पुरूष म्हणून असोत - गोम आणि गोची त्यातल्या खाचखळग्यांसकट दाखवून देणारी नाटकं हा चंप्रंचा नाटककार म्हणून मोठा विशेष आहे. त्यांच्या संकेतस्थळाला भेट दिली असता आपल्याला प्रश्नांची एक छोटेखानी मालिका दिसते. त्यावर चंप्रंचे असलेले उत्तर हा त्यांचा लेखक म्हणून असलेला पवित्रा अधोरेखित करते. ‘मानवी जगण्याचे प्रवाही, कृतिशील भान भाषेत व्यक्त होणे म्हणजे सर्जक लेखन’. चंप्रंचे हे विधान त्यांच्या आजवरच्या लिखाणाच्या तजुर्ब्यावर आधारलेले आहे, असं म्हटलं तर असे सर्जक लेखन करण्यासाठी त्यांना कवितेचा फॉर्म जवळचा न वाटता तरच नवल ! खरंतर नाटक लिहीता लिहीताच समांतरपणे कविता लिहीणं हे चंप्रंच्या लेखन कारकीर्दीच्या सुरूवातीपासूनच असल्याचं आढळून येतं. म्हणूनच नाटककार आणि कवी असा त्यांचा समांतरपणे सुरू असलेला लेखन प्रवास हा त्यांच्या नाटक आणि कवितेतील अभिव्यक्तीचा अन्योन्य संबंध दाखवून देणारा आहे. किंबहुना, दोन अंकी नाटकातून जे साधता येत नाही ते एका कवितेतून साधता येऊ शकते, अशी जाणीव लेखनाच्या एखाद्या टप्प्यावर चंप्रंना नक्की झाली असावी. त्या जाणिवेतूनच त्यांच्या कवितेचा इतका मोठा पैस ते निर्माण करू शकले असावेत, असं मला वाटतं.

सगळीकडेच वैयक्तिक, सामाजिक आणि परिवर्तनशील आशयाच्या कवितांचा अक्षरश: गदारोळ असतांना चंप्रंच्या कवितेने एक वेगळी वाट चोखाळलेली दिसते, ती म्हणजे नकविता, जिला इंग्रजीत आपण ॲंटी-पोएट्री या संज्ञेने ओळखतो. मध्यंतरी ‘नकविता’ लिहीणा-या जगभरातील महत्वाच्या कवींच्या कवितांचा अनुवाद करण्याचा प्रकल्प चंप्रंनी हातावेगळा केला. त्या अनुवादावरून त्यांचे नकवितेच्या वेगळ्या वाटेविषयी वाटणारे प्रेम आणि आस्था पुरेपूर जाणवते. उदाहरणादाखल त्यांची स्वत:ची एक कविता इथे उद्धृत करतो,

आपण एकटे होतो

आपण एकटे होतो
तेव्हा आपण खूप केविलवाणे होतो
आपल्याला अपमान सहावा लागतो
तेव्हा आपण खूप केविलवाणे होतो
कुणी फसवते तेव्हा
कुणी बदनामी करते तेव्हा
कुणी क्षुद्र समजते तेव्हा
कुणी गैरसमज करून घेते तेव्हा
कुणी काही आरोप करते तेव्हा

कुणाचातरी खूप राग येतो तेव्हा
कुणाला सुधारायची गरज वाटते तेव्हा
जे जसे आहे ते तसे खटकत राहते तेव्हा
मतभेद समोर येतात तेव्हा
जगात काय बदल व्हायला हवेत
हे आपल्याला जाणवते तेव्हा
सगळी माणसे स्वार्थामुळे आंधळी झाली आहेत
असे वाटते तेव्हा
आपण फार फार केविलवाणे होतो
जितके केविलवाणे तितकेच हिंसक होतो
आपले आपण संतप्त धोक्याचे

वरील कविता ही फक्त त्यांच्या नकवितेचा परिचय करून देण्यासाठी वानगीदाखल उद्धृत केलीय. त्यांच्या संकेतस्थळावर या नकवितांचा खजिना आहे. इच्छुक रसिक www.champralekhan.com या त्यांच्या संकेतस्थळाला भेट देऊन या कवितांचा आनंद घेऊ शकतात. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे चंप्रंनी नाटक आणि कवितेसहीत त्यांचे समग्र साहित्य त्यांच्या संकेतस्थळावर विनामूल्य उपलब्ध करून दिलं आहे. माझ्या माहितीनूसार, आपल्या साहित्याचं अशाप्रकारे दस्तावेजीकरण करणारे आणि ते रंगकर्मी आणि वाचकांना विनामूल्य उपलब्ध करून देणारे चं.प्र.देशपांडे हे भारतातील बहुदा एकमेव आणि विरळा लेखक असावेत.

नाटक आणि कविता या दोन्ही फॉर्ममधील त्यांच्या अभिव्यक्तीची जातकुळी आणि आशयातील वैश्विकता (Universality) लक्षात घेता चंद्रकांत प्रभाकर देशपांडे हे आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताचे प्रतिनिधीत्व करू शकतील अश्या मोजक्या लेखकांच्या पंक्तीत नि:संशयपणे बसतात, हे इथे नम्रपणे नमूद करावंसं वाटतं.

- समीर दळवी.

वाढदिवसाचे अभिष्टचिंतन, चंप्र !

रवीन्द्र दामोदर लाखे

.

माझे मित्र चंप्र देशपांडे यांचा जन्म दिवस आणि जे कृष्णमूर्ती यांचा जन्म दिवस एकाच दिवशी असतो हा योगायोग नाहीय. चंप्र देशपांडे मध्ये मला नेहमी जे कृष्णमूर्ती ऐकू येतात. पण आवाज चंप्र देशपांडेंचा असतो. अर्थात केवळ पुस्तकी जे कृष्णमुर्ती त्यांच्यात दिसत नाहीत. कृष्णमूर्तींचे तत्वज्ञान आत्मसात करून ते त्यांनी अनलर्न केलेले जाणवते.चंप्र म्हणजे एक दिलखुलास माणूस, एरवी आपल्याला जाणवतही नाही की हा माणूस लेखक आहे. ते कवी नाटककार आहेत याची यत्किंचितही जाणीव त्यांच्या सहवासात आलेल्याला आणि असलेल्याना होत नाही.

त्यांचा आज वाढदिवस आहे.

त्यांच्या आरोग्यपूर्ण दीर्घायुष्यासाठी माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा आणि प्रेम.

वाढदिवसानिमित्त दिलेल्या शुभेच्छांबद्दल सर्वांचे आभार आणि माझ्याही सर्वांना शुभेच्छा !

मी आस्तिकही नाही आणि नास्तिकही नाही -- धर्मनिरपेक्ष अध्यात्म मला अत्यंत महत्त्वाचे वाटते !

मराठी साहित्यातले स्थान

पूर्वी मराठी साहित्यक्षेत्र, आभासी का असे ना, पण एकमय होते. एखाद्या लेखकावर वा एखाद्या कलाकृतीवर अनेक समीक्षक लिहीत आहेत, असे दृश्य दिसत असे. त्यामुळे, बऱ्यापैकी काम झाल्यावर, साहजिकच, एखाद्या लेखकाला वाटे की मी ' जाण्यापूर्वी ' माझे साहित्यातले स्थान काय आहे ते मला कळायला हवे. आता तसे कुणा लेखकाच्या मनातही येणार नाही. एक तर विचक्षण समीक्षक फारसे नाहीतच आणि मुख्य म्हणजे हे साहित्यक्षेत्र खूप विखंडित झालेले आहे. आता तुम्हाला तुमचे स्थान कळायला हवे असेल तर तुमचे जे चार चाहते आहेत, ते सांगतील तेच ! बाकीचे वाचणारही नाहीत ! असले स्थान घेऊन काय चाटायचेय ? आता प्रत्येक लेखक स्थानाच्या आणि काळाच्या पलीकडे आहे !

--- ००० ---

मराठी समाजाला आत्मज्ञानाला उपयोगी पडेल अशी पोस्ट --

Rahul Pungaliya

.

मराठी साहित्यिक सांस्कृतिक विश्वाची तोंड ओळख

मराठी सुसंस्कृत साहित्यिक धाटणीचे लोक सनातनी पुरोगामी म्हणवता येतील .यांचे

सनातनत्व सनातनी हिंदुत्ववादाची हुबेहूब उलट प्रतीमा आहे.

धर्माची काडीची कल्पना नसल्यामुळे हे स्वतःला निधर्मी समजतात. विज्ञानाच्या मर्यादा उपयोग आणि परिणाम देखील समजत नसल्यामुळे हे विज्ञानवादी ,अंधश्रद्धा विरोधी असतात. भौतिक विज्ञानाच्या पद्धती मानवी समाज व मन समजून घेण्यासाठी जशाच्या तशा वापरण्याकडे यांचा कल असतो. त्यामुळे सरसकट समतावाद,सामाजिक डार्विनवाद, मेंदूच्या ज्ञानाने मनाची सर्जनशीलतेची प्रतिभेची उकल करणे इथे आढळते.

लब्धप्रतिष्ठित वरिष्ठ, कनिष्ठ, मध्यमवर्गातले असल्याने व्यवस्था अबाधित राहण्यात यांचे हित आहे. त्यामुळे त्यांचा क्रांतिकारी मार्क्सवादाला विरोध आहे. तो विरोध मार्क्सवादाला नसून हुकूमशाहीला आहे, असा पळपुटा युक्तिवाद ते नेहमीच करत आले आहेत.

यांना साहित्य आणि कलांचे पूर्ण अज्ञान आहे .सामाजिक व आर्थिक व्यवहार ,विज्ञान तंत्रज्ञान हे सोडून जे काही उरते त्यासाठी कला असतात म्हणजे भावनांची अभिव्यक्ती करण्यासाठी, आक्रोश करण्यासाठी जीवन सुशोभित करण्यासाठी कला असतात असा यांचा समज आहे. प्रस्थापित जीवन पद्धती न बदलता कलेचा उपयोग व्हावा असा सद्हेतू हे बाळगतात. प्रत्येक गोष्टीचा काही ना काही उपयोग असायलाच हवा असा उपयोजीततावाद यांचे मूळ तत्त्व आहे.

कलेतील समाजजीवन व व्यक्तीमध्ये आमुलाग्र बदल घडवणाऱ्या क्रांतिकारी शक्यता जितक्या बोथट करता येतील,वगळता येतील असा हेतू असल्यामुळे. हे आपल्याला परवडेल अशा मध्यमवर्गीय स्वच्छंदतावादी, माफक विद्रोही वास्तववादी ,मानवतावादी सर्व समावेशक दृष्टिकोन असलेल्या कलेला जोपासतात. प्रौढ साक्षरांना समजेल व थोडी गंमत वाटेल इतपतच प्रायोगिकता त्यांना रुचते.अर्थातच ती कला नुसतीच सुमार नसते, तर ती तेलकट, गुळगुळीत आंजारणारी गोंजारणारी आणि आपल्या योग्यतेची आपल्याला खात्री देणारी असते. थोडक्यात ती नारसीस्टीक आत्मलुब्ध कला असते .

शहरी मध्यमवर्गाची ही कला आणि संस्कृती, समाजातील सर्व स्तरांना वेचक प्रतिनिधित्व देत असते. शहरी मध्यमवर्गात आता सर्वच जाती-जमाती स्त्री पुरुष आणि माजी ग्रामीण जन यांचा भरणा असल्यामुळे सगळ्यांच्याच सोयीचे हे सांस्कृतिक अवकाश आहे. एकमेकांचे कौतुक करणं, सततचा उत्सवी कोडगेपणा ही यांची भावनिक ओळख आहे. पुरस्कार, संमेलनं,प्रकाशनं हे यांचे सण समारंभ आहेत. यांची 'विद्रोही' लोकशाही मूल्यांची  मागणी ही देखील गंमतीजमतीची आणि जाता जाता कॅज्युअली करायची बाब आहे. बाकी गुंतवणुकी, फार्म हाऊस चंगळवादी जीवनशैली या गोष्टींमध्ये यांच्यात आणि यांच्या कट्टर राजकीय विरोधकांमध्ये काडीचा फरक नाही. हिंदुत्ववादी जसे दलित विचारवंतांना सामावून घेतात ,सांभाळून घेतात तसेच पुरोगामी देखील एकमेकांना सांभाळून घेतात. त्यांच्यातील विरोध लटकाच राहतो.

थोड्या थोड्या वर्षांनी काही व्यक्तींचे स्तोम माजवणे बडेजाव करणे, थोडक्यात  समाजामधले जसे हिरोगिरीचे कल्चर आहे, त्याच पद्धतीचे हे साहित्यिक सांस्कृतिक हिरोंच्या अवतीभोवती असलेल्यांचे कोंडाळे असते.कधी पुल कधी नेमाडे कधी अवचट तर कधी कमल देसाई कोलटकरआणि ढसाळ आणि असे नवे नवे अनेक या यादीत समावेश करता येण्याजोगे

आहेत. जर त्यांना मोठे हिरो मिळाले नाहीत तर एकमेकांनाच ते आलटून पालटून हिरो बनवतात.

या विश्वाची सांस्कृतिक सहनशीलता शून्य आहे. वेगवेगळ्या प्रकारची सेंसरशिप ,सेल्फ सेंसरशिप ,मौलिक साहित्याकडे दुर्लक्ष करणे अशा पद्धती इथे कार्यरत आहेत हिंदुत्ववाद्यांच्या हुकूमशाहीबद्दल बोलण्याचा नैतिक अधिकार यांना नाही. हिंदुत्ववादी रानटी असभ्य आक्रमक आहेत हे तमासगीर बघे आहेत एवढाच फरक. इथे चांगली अस्सल कला फळणे,फुलणे जवळजवळ अशक्य आहे.

चलो दिल्ली --

माझ्या ' बुद्धिबळ आणि झब्बू ' या नाटकाचा हिंदी अनुवाद ' आंख मिचौली ' या नावाने २२ व २३ जूनला दिल्लीत सादर होत आहे.

जे तिकडे असतील त्यांनी पाहण्याचे जमवावे.

-- ००० ---

'मन'

Written by Champra Deshpande

Directed by Abhijeet Zunjarrao

Solo performance by Ramesh Wani

Premier at

Godrej Dance Theatre

NCPA

Sunday, 16th june 5pm

Tickets available at box office and book my show.

Do come and do share to your groups and friends.

@highlight

अभिनय, कल्याण आणि विजयलता प्रोडक्शन यांचं Champra Deshpande लिखित 'मन' हे नवीन नाटक दीर्घांक स्वरूपात रंगभूमीवर सादर करतोय.

या नाटकाची प्रस्तुती Rajeshri Shinde Bruce Guthrie 'एनसीपीए' ची असणार आहे.

या नाटकाचा शुभारंभाचा प्रयोग दिनांक १६ जून २०२४ रोजी, संध्याकाळी ५ वाजता, गोदरेज डान्स थिएटर् नरीमन पॉइंट्, एनसीपीए इथे सादर होणार आहे.

'मन' हा दीर्घांक स्वरूपात सलग १०० मिनिटांचा एकपात्री नाट्यानूभव असणार आहे. अभिनेता Rammesh Wani यात प्रमुख भूमिका साकारतोय.

याची तिकिटे book my show वर उपलब्ध झाली आहेत.

https://in.bookmyshow.com/plays/mann/ET00396072

अधिक माहितीसाठी एनसीपीए बॉक्स ऑफिस संपर्क +91 22 66 223754

नम्र विनंती आहे की आजवर माझ्या नाटकांना जसा प्रतिसाद दिलात तसा याही नाटकाला आपण भरभरून प्रतिसाद द्यावा.

आजच आपली १६ जून ही तारीख, वार रविवार आणि वेळ संध्याकाळी ५ राखून ठेवा.

आमच्या सोबत तुम्हा सगळ्यां करता हा वेगळा अनुभव असेल हे नक्की. तेंव्हा तुमच्या हाउसफुल प्रतीसादाची आम्ही सगळेच वाट बघतोय!!

Sameer S. Dalvi is with Champra Deshpande.
१३ वर्षे झाली ते समजले सुद्धा नाही चंप्र !
अभिरूचीला एक वळण दिलंत तुम्ही. मनस्वी धन्यवाद !!

समकालीनता

मराठी साहित्यात वास्तववाद म्हणजे अजूनही सर्वेसर्वा आहे. काय म्हणावा वास्तववादाचा अर्थ ? बदलत्या भौतिक परिस्थितीवर आधारित असणे ? जुन्या काळातले अनुभव असले तरीही ते ‘ दिसणाऱ्या ‘ माहितीरूप निवेदनातून येणे, असेही एक असेल. पण, मुख्यत: वास्तव हे, जुने असो वा नवे, ते लेखकाच्या प्रतिक्रियेसहच येते. हे लक्षात घेतले तर अमुक एक वास्तव म्हणजे वास्तव, असे म्हणता येत नाही. आज लिहिणाऱ्या प्रत्येक लेखकाचे वास्तव वेगळे असते. आज लिहिणाऱ्या दोन चांगल्या लेखकांचे उदाहरण घेऊ. प्रणव सखदेव आणि रवींद्र पांढरे, हे लेखक बघा. त्यांच्या लेखनाचे अनुभवद्रव्य म्हणा की दिसणारी माहिती म्हणा, ही खूपच वेगळी आहे. याच पद्धतीने प्रत्येक लेखकाचे वास्तव वेगळे असते. हे लक्षात न घेता साहित्याची समकालीनता ही संकल्पना काहींना मूल्यात्मक वाटते, असे दिसून येते. एका ढोबळ अर्थाने प्रणव सखदेवच्या साहित्यात समजा समकालीनता आहे, असे आपण म्हटले, तर, जेव्हा कृत्रिम बुद्धिमत्तेच्या प्रभावाचा काळ येईल तेव्हा ते साहित्य कालबाह्य समजावे लागेल का ? हा एक प्रश्न तर आहेच पण काही अधिकच हेकट आणि संकुचित कल्पनाही दिसतात. समकालीन वास्तव हे लेखकाच्या मतासह, भूमिकेसह यायला हवे, ही ती कल्पना. म्हणजे आजच्या लेखनात, उदाहरणार्थ, मोदींच्या हुकूमशाहीबाबत राग वा विरोधकांच्या पोटदुखीबाबत कीव व्यक्त व्हायला हवी. इथे, एक सुचवायचे आहे की या सर्व कल्पना संकुचित, साहित्याला रटाळ करणाऱ्या आहेत.

जयंत पवार हे माझे मित्र होते, पण, त्यांचे विचार मला पटत होते, असे नव्हे. त्यांनी असा एक प्रश्न मांडला होता की वास्तव आता इतक्या वेगाने बदलते आहे की ते लेखकाला समजून त्याच्या लेखनातून व्यक्त होईपर्यंत जुने होते आहे ! मुळात, आधी वास्तव समजून घ्यायचे आणि मग ते आपल्या प्रभावासह मांडायचे – ही साहित्याची कल्पनाच खोटी आहे. प्रत्येकाचे वास्तव वेगळे असते याचा अर्थच वास्तव समजणे असे काही सत्य अस्तित्वात असू शकत नाही. आणि साहित्य म्हणजे स्वमतयुक्त वास्तवाची मांडणी किंवा त्या त्या काळाचे डॉक्युमेंटेशन वा दस्तावेजीकरण हे पटण्यासारखे नाही. दस्तावेजीकरण आता इतर अनेक मार्गांनी होत असते, ती जबाबदारी आता साहित्याने झटकायला हरकत नाही.

आपण वास्तव समजून घेण्यासाठी वा ते नोंदण्यासाठी साहित्यनिर्मिती करतो वा साहित्याच्या संपर्कात येतो ही समजूतच मुळात फार थिटी आहे. ऐतिहासिक वा पौराणिक कलाकृती, शेक्सपियरची नाटके, कोणत्याही इतर

प्रांतांतली वा देशांतली नाटके आपण का वाचतो वा पाहतो ? त्यात वास्तवनिरपेक्ष आणि लेखक-निरपेक्ष अशी मानवी जगण्याच्या भानाची प्रक्रिया असते म्हणून. आणि हे जगातल्या सर्वच मौल्यवान साहित्याबाबर खरे आहे. वास्तव कोणते आहे, अनुभव कोणता आहे याला महत्त्व देण्याच्या बालिशपणामुळेच काहीजण असे समजतात की निव्वळ अनुभव धारावीतल्या जगण्याचा असल्यामुळेच काही साहित्य एखाद्या मध्यमवर्गीय अनुभवक्षेत्र असणाऱ्या साहित्याहून महत्त्वाचे असते.

माझे एक नाटक सत्तरच्या दशकातल्या हिंदी सिनेमाच्या खोट्या, रचित डोलाऱ्यातून घडत जाते. एकजण म्हणाले की आता ते आजच्या काळाशी मॅच होत नाही तर दुसरे एकजण म्हणाले की हे कधीही ‘ आजचे ‘ असणारे नाटक आहे. एक-दोन नाटकांत युनियन-मॅनेजमेंट संघर्षाचे वातावरण आहे – एकजण म्हणाले की आता कुठे उरलाय युनियनबाजीचा काळ ? त्याच्याहून किरकोळ उदाहरण म्हणजे माझ्या एका नाटकातल्या काळात फक्त लँड लाइन फोन होते, मोबाइल नव्हते ! म्हणजे गेले ते नाटक रद्दीत ? असे होत नसते. कलेचा प्रमुख सर्जक प्रवाह म्हणजे काय, हा प्रश्न स्वत:ला विचारला पाहिजे.

--- 000 ---

रवीन्द्र दामोदर लाखे

.

Champra Deshpande तुमच्या इतिहास एकांकिकेची आठवण सतत येत राहील.

घाटकोपरच्या जाहिरात फलक कोसळण्यापासून ते दिल्लीतील बालरुग्णालयाच्या आगीपर्यंत ज्या ज्या दुर्घटना घडल्या आहेत त्या सर्वांमध्ये एक समान धागा आहे .

तो धागा आहे भ्रष्टाचाराचा. या धाग्याने एक दुर्गंधयुक्त फुलांची मृत्यूमाळ निर्माण केली आहे . ती दुर्गंधयुक्त फुले म्हणजे नोकरशाही , पोलीस आणि राजकारणी .

'Governments may come and go , beaurocracy is permanent'

या जगप्रसिद्ध नियमाला अनुसरून नोकरशाही राजकारण्यांना झुलवीत असते . निवडून आलेले लोक (?)प्रतिनिधी बराच पैसा खर्च करून तिथे स्थानापन्न झालेले असतात . पुढच्या निवडणूकीत निवडून येऊ अशी खात्री नसल्याने मिळालेल्या पाच वर्षांत झालेली भांडवली गुंतवणूक आणि त्या वरील व्याजासकट नफा हे किमान उद्दीष्ट डोळ्यासमोर ठेवून हे महान लोकं कारभार सुरू करतात . या वेळी त्यांच्या असे लक्षात येते की या गुंतागुंतीच्या शासन व्यवस्थेबद्दल आपल्याला काहीही माहिती नाही . राजकारण्यांचे हे वैगुण्य नोकरशहांना बरोब्बर माहित असते . ते ' साहेबांना ' सांगतात ," तुम्ही काळजी करू नका साहेब , आम्ही कशासाठी आहोत . आम्ही तुम्हाला सांभाळतो , तुम्ही आम्हाला सांभाळा!"

इथेच nexus , मिली भगत , परस्पर हित संरक्षण वगैरे शब्दांनी मंडीत केलेला भ्रष्टाचार सुरू होतो .

ही जी व्यवस्था निर्माण झाली आहे त्यात सामान्य माणसाला कोणतेही स्थान नाही . कितीही क्षुल्लक दर्जाचं शासकीय काम असलं तरी तुम्हाला एका सांखळीतून जावे लागते . तुमच्या ओळखीच्या एखाद्या 'सद्गृहस्थाला' तुम्ही गाठता

आणि तो तुम्हाला शासकीय कार्यालयाच्या आसपास फिरत असलेल्या एजंटला भेटवतो . हा एजंट म्हणजे भ्रष्टाचाराच्या hierarchy मधला सर्वात
शेवटच्या पायरीवरला असला तरी तो सर्वात महत्त्वाचा असतो कारण तो गिऱ्हाईक पकडतो . पुढचं सगळं सांगणं न लगे !
चं.प्र. देशपांडे यांची ' इतिहास ' ही एकांकिका हा विषय अत्यंत परिणामकारकपणे मांडते . मी ही एकांकिका १९८४ साली यशस्वीरीत्या दिग्दर्शीत केली होती .
पोलीस डिपार्टमेंट हा वेगळा विषय आहे .
पूर्वी राजकीय कार्यकर्त्यांची प्रतिष्ठा त्याचे राजकिय तत्त्वज्ञान , आकलन आणि अभ्यास यावर अवलंबून असायची . आता मात्र राजकारणात पुढे यायचं असेल तर पोलीस स्टेशन मध्ये तुमची किती प्रतिष्ठा आहे याला सर्वस्वी महत्त्व आहे . पोलिसी गुन्ह्यात अडकलेल्या तथाकथित कार्यकर्त्यांना सोडवून आणणे हे राजकारणी लोकांचे आद्य कर्तव्य असते .
या सगळ्या मध्ये सामान्य माणूस भरडला जातो हे खरे असले तरीही आपणसुद्धा आरशात पाहिले पाहिजे . कळत नकळत आपण या व्यवस्थेत सामिल झालो आहोत . अनेक वेळा दुसऱ्यांच्या समस्येकडे ' आपल्याला काय करायचंय ' या attitude ने दुर्लक्ष करतो . पण ' जात्यामधले दाणे रडती , सूपातले हसती ' ही अवस्था तात्कालिक असते . कधी ना कधी तुम्ही जात्यात जाणारच .
धन्यवाद .

Every ideology is contrary to human psychology.
— Albert Camus, 1913-1960, French writer, Nobel 1957

एकेक नाटक उभ करण हे दिव्य आहे. नाटक खेळताना प्रत्येकाला हा अनुभव येतोच येतो.
गेली अनेक वर्ष 'मन' मनात घोळत होतं.
Champra Deshpande यांना अनेकदा करतो करतो सांगून बरेचदा तालमी सुरू करून नाटक काही पुढे सरकल नाही. काही ना काही कारणाने मन करायच मनातच रहायच. कारण हे नाटक तस सगळ्यांच बाबतीत फार अवघड आहे. आणि म्हणूनच ते करायच होतं खर तर.
चंप्रंच लिखाण त्यांच्या website वर मोफत उपलब्ध आहे. त्यामुळे अनेकांनी मन वाचलं असेलच. नाटक होतंय कळल्यावर अनेकांनी नाटक वाचून नाटक पहायची इच्छा सुद्धा व्यक्त केली आहे. हे छानच झालं.
आता सगळ जुळून आलं आहे.
#विजयचौगुले निर्माता म्हणून उभे राहीले आहेत.
'मन' निमित्ताने कळत्या वया पासून ज्या नटाला काम करताना बघत आलो. ज्याच काम पाहून मोहित झालो त्या Rammesh Wani या प्रचंड क्षमता असलेल्या नटाला दिग्दर्शित करण्याची आयतीच संधी या निमित्ताने मिळाली

आहे. इतक्या वर्षांपासून मनातलं नाटक नटाच्या माध्यमातून रंगभूमीवर प्रत्यक्ष सादर होत असताना बघणे म्हणजे कोणत्याही दिग्दर्शका करता सोहळा असतो. काहीसा तोच अनुभव रोज तालमीत येतोय. तुम्हाला हा अनुभव प्रत्यक्ष प्रयोग पहाताना नक्कीच येईल. खोटं नाही अगदी मनातल सांगतो आहे. मनापासून.

दादा. थँक्स फॉर धीस ट्रीट. अनेकांनी नकार दिल्यावर दादा सारखा दादा कलाकर काम करायला तयार झाला यातच सगळं आलं. त्याने या नाटका करता जबाबदारीने घेतलेली मेहनत जबरदस्त आहे. तुम्ही नाटक पहाल तर तुम्हाला ती नक्कीच जाणवेल. अर्थात पहिल्या प्रयोगाची धाकधूक आम्हा सगळ्यांच्या मनात सुरू आहेच. प्रयोग रंगण वा फसण त्या त्या दिवशी काय होईल यावर अवलंबून आहे. पण प्रोसेस जास्त महत्त्वाची मानावी आणि काम करत रहावं.

आमची टीम सोबत आहेच.

Shreyasi Vaidya Manali Rajeshree Omkar Uttam Jadhav आणि Shyam Chavan श्याम दादा जी जादू रंगमंचावर पेरणार आहे ते प्रत्यक्ष पहाण मजेशीर असणार आहे. Sumeet Patil ने अभ्यासपूर्ण नेपथ्य उभारल आहे. Dinesh Joshi यांचे चिरंजीव कृष्णा- देवा सारखी तरुण संगीतकार जोडी या निमित्ताने जोडली गेली. Pratikesh More आणि abstract digital यांनी जाहीरातीची बाजू सांभाळली आहे. Trupti Zunjarrao वेषभूषा आणि उलेश खंदारे रंगभूषा अशी महत्वाची बाजू सांभाळत आहे. Prabhakar Mathapati या मित्राने मनाचा ठाव घेणारे गाणे लिहून दिले आहे.

पहिला शुभारंभाच प्रयोग एनसीपीए सारख्या महत्त्वाच्या संस्कृतीक केंद्रात होतो आहे त्या करता

Rajeshri Shinde, Bruce Guthrie यांचे मनापासून आभार!

सरते शेवटी पण महत्त्वाच.

एल. डी. सोनावणे महाविद्यालय, कल्याण यांचे आम्ही सगळे ऋणी आहोत. तालमी करता जागा मिळवण हा मामला जरा तापदायक असतो तो सोनावणे महाविद्यालयाने अलगद सोडवला.

आम्ही सगळे मिळून तुम्हाला नम्र विनंती करतोय आपण हा प्रयोग खरंच चुकवू नका

शुभारंभाचा प्रयोग

रविवार, दिनांक १६ जून

संध्याकाळी ५ वाजता

गोदरेज डान्स थिएटर, नरीमन पॉइंट, एन.सी.पी.ए

मुंबई

(तिकीटांसाठी लिंक व एन.सी.पी.ए बॉक्स ऑफिस नंबर कॉमेंट मधे.)

ज्या कवितेचा अर्थ सांगता येतो ती कविता कमी आणि निबंध जास्त असते -- राहुल पुंगलिया, पान १६२, साहित्यातील मिथके.

प्रख्यात नाटककार आणि मराठीतील महत्त्वाचे परंतु दुर्लक्षित कवी श्री चं प्र देशपांडे यांनी मिथकावरील माझ्या एका लेखातील एक विधान आज सकाळी त्यांच्या फेसबुक भिंतीवरती उद्धृत केले. त्याला उदंड प्रतिक्रिया मिळाल्या. यातील सर्वच प्रतिक्रिया मूळ लेखातील संदर्भ पाहिल्याशिवाय होत्या.

त्यामधील बहुतेक प्रतिक्रिया त्या विधानाला, अर्थ समजून न घेता,उडवून लावणाऱ्या, ते विधान पटले असले तरी यात नवे काय आहे? अशी विचारणा करणाऱ्या,आणि प्रसंगी कुचेष्टा करणाऱ्या, उथळ अशा होत्या. त्यामुळे त्यांचा प्रतिवाद करणे गरजेचे नाही. तरी देखील या प्रतिक्रिया मराठी वाङ्मय व्यवहारातील काही महत्त्वाचे कल दर्शवणाऱ्या आहेत. एक सामाजिक विदा म्हणून त्यांचे महत्त्व आहे. काही प्रतिक्रिया मात्र त्या विधानाला दिलेला प्रामाणिक प्रतिसाद होता. म्हणून या लिखाणाचा प्रपंच!

मिळालेल्या प्रतिक्रिया ज्या क्षुल्लक आणि थिल्लर होत्या, त्यांची वर्गवारी करणे शक्य आहे.ढोबळमानाने लोकशाहीवादी, सापेक्षतावादी आणि परंपरावादी या तीन प्रकारात सर्व कमेंट्स बसतात.

१.लोकशाहीवादी मंडळींचे असे म्हणणे दिसते की कवितेचे कुठल्याही प्रकारे नियमन करू नये. कवितेची व्याख्याच करू नये. आणि प्रमाण व अप्रमाण ठरवणारे निकष कवितेबाबतीत असू नयेत. कविता हे सर्वांसाठी मुक्त संचाराचे क्षेत्र असावे. कविता लिहिण्यासाठी काही पात्रतेची गरज नाही. चांगली किंवा वाईट कविता हे निकष असू शकत नाहीत. कविता हा संवाद किंवा अभिव्यक्तीचाच थोडासा वेगळा म्हणजे आडव्या ऐवजी उभं लिहिलेला आणि अलंकृत असलेला प्रकार आहे.त्यामुळे कवी त्याच्या भावना, वृत्ती व विचार सांगण्यासाठीच लिहितो आणि वाचकाला ते समजून घेणे निव्वळ क्रमप्राप्तच नाही तर तो त्याचा मूलभूत मानवी हक्क आहे.

आता,जर कविता संवाद किंवा अभिव्यक्ती असली, तर तो संवाद गद्यात आणि सर्वसामान्य माणसे करतात त्या पद्धतीने छापील माध्यमातून आडवा, थेट, अलंकार, प्रतिमा आणि काव्यातील प्रचलित शब्द न वापरता का केला जात नाही? हा संवाद अशा विचित्र उभ्या पद्धतीने का केला जातो? याचे उत्तर लोकशाहीवादी, मानवाधिकारवादी लोकांकडे नसते.

तसेच इतर कला जशा की शिल्पकला, चित्रकला,हिंदुस्तानी शास्त्रीय गायन व नृत्य यामध्ये हा व्यक्ती स्वातंत्र्याचा आणि लोकशाहीचा जयघोष का केला जात नाही? ज्ञान विज्ञानाची क्षेत्रे व तंत्र कौशल्यात तर लोकशाहीचा संवादाचा आणि अभिव्यक्तीचा आग्रह बिलकुलच धरला जात नाही. डॉक्टरच्या अनाकलनीय बोलण्यापुढे भयभीत रुग्ण मुंडी हलवतात. तिथे अर्थाचा आग्रह धरत नाहीत. तसेच शास्त्रज्ञांच्या पायाशी लोळण घेतात. आपल्याला शष्प न कळले तरी कृष्णविवरांचे कौतुक करतात. सिंग्युलॅरिटी चा काही न कळता भक्तीभावाने उल्लेख करतात .शेअर मार्केट आणि वित्तीय भांडवल याचे अर्थशास्त्र न कळता देखील, (कवितेत हिरीरीने अर्थाची मागणी करणारे लोक), भरपूर पैसे कमवतात. असे का याचेही उत्तर या लोकांकडे नसते. उपरोल्लिखित सर्व क्षेत्रे अतिशय प्रमाणित , नियमबद्ध आणि स्पष्ट व्याख्या केलेली असताना केवळ साहित्य क्षेत्राचे प्रमाणीकरण किंवा नियमन आणि साहित्याची विशेषतः कवितेची व्याख्या करायला प्रचंड विरोध का असतो? साहित्यामध्ये हवशा, नवश्या आणि गवशांना मोकळं रान हवं असा आग्रह का असतो? या प्रश्नाचे उत्तर द्यायला हवे.

याचे एक उत्तर मला असे दिसते की साहित्य  हे मऊ क्षेत्र आहे म्हणजे ते सॉफ्ट फील्ड आहे.आणि मऊ लागले की कोपराने खणा ही सहज वृत्ती असते. आपल्या नवसाक्षर समाजात साहित्य हे कमीत कमी श्रम, तयारी, व अभ्यासात अभिव्यक्त होण्यासाठी सोपे माध्यम आहे. लिहिता वाचता आले की कवी लेखक व नाटककार होता येते.आणि तरी देखील ते सत्ताधाऱ्यांसाठी निरुपद्रवी असे क्षेत्र आहे .साहित्य क्षेत्रातील आक्रोश व टाहो चुचकारून, पुरस्कार देऊन मॅनेज करता येतात.ते व्यवस्थेला पाठबळच पुरवतात.

त्यामुळे साहित्याची  स्वायत्त बांधणी आणि  अनाकलनीयता, काठिण्य  सर्वसामान्यांसाठी व सत्ताधाऱ्यांसाठी धोकादायक असणारे आहे. सर्वसामान्य माणसाला संवाद साधल्याचे व अभिव्यक्त केल्याचे फसवे समाधान साहित्य तत्काळ पुरवते. ते विद्रोहाचा कंड शमवते व तरी देखील निरुपयोगीच असते. साहित्याला भाषेपेक्षा एक वेगळे सत्व, सत्ता शास्त्रीय स्थान व प्रयोजन आहे अशी धारणा प्रस्थापित लोकांना नकोशी वाटते. त्यांना साहित्य एक छंद किंवा समाजातील सांस्कृतिक सजावट म्हणून असणे सुरक्षित वाटते. साहित्याचे संभाषित संवादी असले, अर्थपूर्ण असले तर त्यांचा अहंकार सुखावतो. त्यांना भाषेवरती,( आडव्याच नाही तर उभ्या देखील आणि शिवाय अलंकारिक देखील,) नियंत्रण असल्याने सुरक्षित व आरामशीर वाटते.

त्यामुळे अनाकलनीय कवितेला ते प्रचंड घाबरतात. कारण ती कविता त्यांना धक्कादायक ठरू शकतील असे अर्थ आपल्या गर्भात बाळगते.त्यांचे नेहमीचे सुखासीन, रुटीन जगणे चालू राहील इतकेच चवीपुरते साहित्य त्यांना हवे असते. साहित्य  स्वतःला सुसंस्कृत कलासक्त घोषित करणारी गोष्ट असते. साहित्याच्या मूलगामी प्रश्नांना ते सामोरे जाऊ शकत नाहीत .ही मध्यमवर्गीय, सुमार माणसे साहित्याला स्वतःच्या खालच्या पातळीवरती खेचतात.

अपूर्ण --- राहुल पुंगलिया.

Sameer S. Dalvi

.

‘शब्द आणि वाक्ये वा ओळी यांच्या साहचर्यातून, क्रमवारीतून व आंतरसंबंधातून व्यक्त होणारी संसूचक अर्थवलये एका परिपूर्ण आशयाप्रत पोचवणारा एकसंध भाषिक मजकूर म्हणजे कविता'.

कविता लिहू पाहणाऱ्या, वाचू पाहणाऱ्या आणि अनेकदा प्रयत्न करून झाल्यावर पुन्हा नव्याने ती लिहू आणि वाचू पाहणाऱ्या कुणालाही, कविता म्हणजे काय किंवा कविता कशास म्हणतात या प्रश्नाचे उत्तर शोधण्यात जो गोंधळ (केऑस)  हाती लागतो, त्या गोंधळातून त्याचे बोट धरत, त्याला वाट दाखवण्याचे काम चं. प्र. देशपांडे यांची कवितेची उपरोक्त व्याख्या करते, असे मला वाटते. 'तंबाखूची टपरी आणि अनेक अनुसर्जित कविता' या त्यांच्या कवितासंग्रहातल्या, जगभरातील ५८ कवींच्या अनेक कविता एका संग्रहात वाचताना या व्याख्येचा प्रत्यय पानोपानी येतो. कवितेविषयी असलेल्या आपल्याकडील साहित्यिक आणि सांस्कृतिक समज-अपसमजांना दुरुस्त करत, कवितेच्या प्रांतात गांभीर्याने रमू पाहणाऱ्या कुणालाही अत्युत्तम दर्जाचे दिशादिग्दर्शन करू शकेल, असा कविता

विषयक मौलिक ऐवज त्यांनी या संग्रहाच्या माध्यमातून आपल्या हाती दिला आहे, त्याबद्दल त्यांचे मानावे तितके ऋण थोडेच ! माझ्यापुरती या ऐवजाची मौलिकता काय ते मी थोडक्यात सांगायचा प्रयत्न करतो.

आजवर जे काही चाळीस चव्वेचाळीस वर्षांचे जगलो, त्यात 'एखाद्या व्यक्तीचा वा घटनेचा मला जो काही अनुभव आला' किंवा 'एखाद्या व्यक्तीने वा घटनेने मला जो अनुभव दिला' असं म्हणत, असा अनुभव देण्याची जबाबदारी समोरच्या व्यक्ती किंवा घटनेवर ढकलून, मी म्हणजे कुणीतरी स्वायत्त आणि सार्वभौम व्यक्ती आहे, असा वृद्धिंगत झालेला माझा समज चंप्र त्यांच्या प्रास्ताविकात मांडलेल्या काव्यतत्त्वात दुरुस्त करून देतात. (या संग्रहात केलेले प्रास्ताविक सुद्धा समग्र कवितेच्या संदर्भात आपले कालातीत मूल्य राखून आहे) ते म्हणतात, अनुभव म्हणज काय तर जगण्यातल्या घटितांना - घटनांना येणारा व्यक्तीचा प्रतिसाद वा प्रतिक्रिया. म्हणजेच मी जे धरून चाललो होतो त्याच्या नेमके उलट. अनुभव हा प्रत्येक व्यक्तीच्या शारीर-मानसिक घडणीवर - प्रोग्रॅमिंगवर - कंडिशनिंगवर अवलंबून असतो. त्यामुळे, अनुभवाला सत्याचे मूल्य असू शकत नाही. मी स्वायत्त आणि सार्वभौम असण्याच्या माझ्या समजूतीला सुरुंग लावणारे हे काव्यतत्त्व माझ्या दृष्टीने मौलिक आहे. सध्याच्या पोस्ट मॉडर्न कालखंडात हरारी सारख्या मानववंशशास्त्रज्ञाने देखील या तत्त्वाला आपल्या लिखाणातून दुजोरा दिल्याचे अनेकांनी वाचले असावे. पण कवितेच्या संदर्भात खूपच आग्रही भूमिका घेऊन आपल्या साहित्यिक पर्यावरणात वावरत असलेल्या लोकांनी या तत्त्वाची कितपत दखल घेतली आहे, याबद्दल शंकेला प्रचंड वाव आहे. असो. माझ्यापुरते सांगायचे झाले तर या संग्रहात ज्या कविता अनुसर्जनासाठी निवडल्या आहेत त्यात, वर उल्लेख केलेल्या काव्यतत्वाचे पुरेपूर दर्शन चंप्र आपल्याला घडवतात.

वानगीदाखल मूळ इटालियन कवी, अलेसिओ झानेलीची त्यांनी अनुसर्जित केलेली एक कविता इथे देण्याचा मोह होतो आहे,

प्रतिबिंब

आपण सगळे इतर सगळे आहोत
आपल्यापैकी प्रत्येकजण
आपण जे काही आहोत वा जगण्यात
जिथे पोचतो
तेही इतर सगळ्यांमुळेच घडते
प्रत्येकजण - एकेकटा कुणीच नाहीय --
आपण इतर प्रत्येकाचे
यश आणि अपयश आहोत
आपण इतर प्रत्येकाचे
सुख आणि दुःख आहोत
आपल्याव्यतिरिक्त
इतर प्रत्येकाच्याही

जगण्याचा परिणाम आहोत

आपल्या प्रत्येकात

इतर सगळेही प्रतिबिंबित आहेत

आपण प्रत्येकजण

इतर सर्वांची बेरीज आहोत

निरपवादपणे

आपण प्रत्येकजण

दुसऱ्या कुणाचीच

आपल्याला साक्ष नसेल

तर आपण कुणीच नसू

आणि काहीच नसू

---

ही आणि संग्रहातील अशा अनेक कविता म्हणजे चं. प्र. देशपांडेंच्या अनुसर्जनाचे सौंदर्य म्हटले पाहिजे.
सगळ्या कवितांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्या त्या कवितेला योजलेली समर्पक अशी शीर्षके ! एखाद्या कवितेचे आकलन तिच्या पहिल्या वाचनात न झाल्यास ती कविता तिच्या शीर्षकाचे स्मरण ठेवत दुसऱ्यांदा वाचावी. असे केल्याने तिचे आकलन होण्यास मदत होते असा माझा अनुभव आहे. या संग्रहातल्या बहुतांश कविता मी अश्या पद्धतीने दोनदा तीनदा वाचल्या. त्यानंतर जे काही आकलन झाले त्यातून स्रोत भाषेत योजलेल्या शब्दांचा अंदाज येतो. शिवाय, लक्ष्य भाषेतील अनुसर्जनातले भाषा सौंदर्यही प्रकर्षाने जाणवते. अनुक्रमाच्या बाबतीतही सुरुवातीच्या झानेली पासून ते शेवटच्या निकॅनोर पारा पर्यंत कवितांची केलेली योजना खासच आहे. जिज्ञासूंनी हा कवितासंग्रह वाचल्यास अनुक्रमाच्या अनुषंगाने पाराच्या कवितेचे सर्वात शेवटी केलेले उपयोजन चं. प्र. देशपांडेची कवी आणि अनुसर्जक म्हणून असलेली धारणा स्पष्ट करते.
आजवरच्या माझ्या वाचन प्रवासात दोन पुस्तकांनी खांद्यावरच्या झोळीत कायमस्वरूपाचे स्थान पटकावले होते. पहिले डॉक्टर धर्मवीर भारतींचे 'अंधा युग' आणि दुसरे जयंत पवारांचे 'पासवाला'. 'तंबाखूच्या टपरी' निमित्ताने त्यात आणखी एका सोबत्याची भर पडली आहे.
तंबाखूची टपरी आणि अनेक अनुसर्जित कविता

चं. प्र. देशपांडे

©समीर दळवी

Abhijeet Zunjarrao is with Datta Patil and

15 others

at NCPA Mumbai.

· Mumbai ·

आमच्या ' मन ' या नाटकाबाबतचे दोन अभिप्राय नम्रतापूर्वक आपल्या सार्वांच्या माहितीसाठी --

पुढील प्रयोग कल्याण, दादर, नाशिक, पुणे

***

अभिजीत झुंजाररावचं पुन्हा एक नाटक पाहिलं.

काल परवा दत्ता पाटील यांचं 'कृष्णविवर' आणि आज चं. प्र. देशपांडे यांचं "मन" नावाचं, एन.सी.पी.ए.ला अभिजित झुंजारराव ने दिग्दर्शन केलेलं. त्याला लगेच कळवलं, "अभिजीत, लागोपाठ पाहिलेल्या तुझ्या दोन चांगल्या नाटकाचं 'भूत' माझ्यावरून अजून उतरत नाही. तूच ह्याला जबाबदार आहेस, चांगली नाटकं करून". हे नाटक खरंतर चं.प्र.चं जुनं नाटक आहे. नाटक बघताना आजतागायत कुणी केलं कसं नाही, याचंही नवल वाटत राहिलं. पण त्यातलं माणसाच्या मनाच्या विदिर्णतेचे/शतखंडिततेचे सूत्र आजच्या म्हणजेच उत्तर आधुनिकतेतल्या मानवी अवस्थेला, त्यातल्या कारूण्याला कवेत घेणारं आहे, किंबहुना ते सार्वकालीकच आहे, हे विशेष. योग्य वेळी केलाय अभिजीतनं हा दीर्घांक. शिवाय अशा कलाकृतींना स्थळकाळवेळेचं बंधन नसतं. फक्त अशा कलाकृती शोधण्यासाठी नजर असावी लागते नि मूळात स्वतःच्या प्रेमातून बाहेर पडावं लागतं कलावंतानं. त्यासाठी कलावंतानं पराकोटीचं 'अस्वस्थ' असावं लागतं. सध्या तरी हे मला अभिजीत झुंजाररावच्या कामातून दिसतंय, पुढचं मला माहित नाही. कलावंताचा विशिष्ट माध्यमाचा शोध घेण्याचा हा प्रयत्न अखेरीस जीवनाचाच समग्र शोध घेण्याच्या प्रयत्नांपर्यंत पोहचला पाहिजे. त्यासाठी केवळ विशिष्ट माध्यमापेक्षा माणसांचं 'जगणंच' कलावंताची सामग्री असायला /बनायला हवीत. सगळ्या मोठ्या कलावंतांचं असंच होतं. आपल्याकडच्या जी.ए.,तेंडुलकर,एलकुंचवार,आळेकर आणि चं.प्र.देशपांडे (आणि अन्य काही थोडेच) ह्यांच्याबाबतीत हे दाखवता येईल.

"मन" हा एका मध्यमवर्गीय माणसाचा एकालाप आहे. अर्थात म्हणजेच एकपात्री स्वगताचं हे नाटक. सुरूवातीला मुख्य पात्राचा (नि एकमेव असलेल्या) जरा वरचा स्वर लागला. पण नंतर मात्र आख्खं नाटक दिग्दर्शक अभिजीत झुंजाररावने छान लयीत सादर केलं. म्हटलं तर हा एक प्रयोग (experiment) होता. नेपथ्यकार, संगीतकार, प्रकाशयोजनाकार, अभिनेता रमेश वाणी आणि अर्थातच दिग्दर्शक अभिजीत झुंजाररावने हा experiment चांगला पेललाय. अभिजीत झुंजारराव हा वेगवेगळ्या शैलीत नाटकं सादर करणारा आजचा अभ्यासू दिग्दर्शक आहे. तो नाट्यमाध्यमाशी निष्ठावंत तर आहेच पण कलावंताच्या झपाटलेपणातून नाट्यमाध्यमाचा शोधही घेतोय आणि समीक्षकांपुढे नवी आव्हाने निर्माण करतोय. मराठी नाटकांना अर्थपूर्ण योगदान देणा-या ह्या दिग्दर्शकाचे प्रत्येक नाटक, त्यातल्या चुकांसह, पहायला हवे, असं माझं मत आहे. आपल्या प्रयोग सादरीकरणाने तो नाटकाच्या विकासाच्या खूप शक्यता समोर आणतो नि आपण समृद्ध होतो. खूप बोललो पण हे बोलायला नि सांगायलाच हवे, निदान मी तरी.

नीलकंठ कदम, डोंबिवली

कवी आणि समीक्षक

***

चं. प्र. देशपांडे लिखित अभिजीत झुंजारराव दिग्दर्शित 'मन' हा एकपात्री नाट्यप्रयोग म्हणजे मनाच्या गुंतागुंतीचा वेगवेगळ्या आयामांतून घेतलेला चिंतनीय वेध आहे. नीलकंठ या नायकाच्या मनाचा प्रवास या नाटकाच्या केंद्रस्थानी आहे. वैयक्तिक जीवन, व्यावसायिक जीवन, सामाजिक संबंध अशा मनाच्या अनेक कप्प्यांत तयार झालेल्या गाठी आणि त्यांचा गुंता सोडवण्याचा हा वैचारिक प्रवास आहे. नाटकात गुंफले गेलेले नायकाच्या मनाचे पदर एकरेषीय नाहीत; तर रोजच्या जगण्यातल्या छोट्या-मोठ्या प्रश्नांना भिडताना ते त्याच्या नकळत जटिल होत जातात. त्यांचा गुंता सोडवताना नायक कधी कोलमडतो, कधी भावनतिरेकाने उन्मळतो, तर कधी नेटाने उभा राहतो. कधी मनात खोलवर झिरपलेल्या अस्तित्ववादी प्रश्नांचा मागोवा घेत मनाचा तळ उपसतो. मनातील मुक्त विचारांना भीतीची वेसण घातली जाते का, विचारांवर कळत- नकळत कसली दडपणे लादली जातात, सामाजिक बांधिलकीचेही कधी ओझे होऊ शकते का, चिंता, काळजी, राग, मत्सर अशा भावनांनी बांधून ठेवलेले मनातले पिंजरे कधी उघडले जातात का, अशा विविध प्रश्नांची उत्तरे हे नाटक शोधत जाते व प्रेक्षकांना एका उत्तम नाट्यप्रयोगाचा अनुभव देते, लेखन, दिग्दर्शन, अभिनय, नेपथ्य यात सरस असलेला हा प्रयोग मनाच्या गुंतागुंतीची अनेक द्वारे प्रेक्षकांसमोर उघडत नेतो आणि चिंतनाला प्रवृत्त करतो. वेगळे काही पहायचे असेल तर 'मन' अजिबात चुकवू नका.
डॉ. अंजली जोशी
सायकोलॉजिस्ट

कधी घडूच शकणार नाही असे वाटत असलेली, हे नाटक सादर करण्याची घटना, अभिजित, रमेश आणि त्यांच्या टीमने घडवून आणली -- याचा, लेखक म्हणून मला आनंद आहे. कालचा पहिलाच प्रयोग होता. चर्चा होत राहतील, अधिक सफाई येत जाईल. हे घडणे सोपे नव्हते हे इथे नमूद करून ठेवतो.

Surendra Vithal Darekar is feeling welcome with रवीन्द्र दामोदर लाखे and
24 others

·

·

अभ्यासोनी प्रकटावे :

काल चं.प्र.देशपांडे यांनी डाॅ.राहुल पुंगलिया यांच्या लेखातील कवितेच्या संदर्भातील एक विधान उद्धृत केल्यावर वाचकांनी त्यावर विविधांगी प्रतिक्रिया दिल्या. त्याला अनुलक्षून पुंगलिया यांनी त्याचे काहीसे सडेतोड स्पष्टीकरण देखील आज दिलेले आहे. या निमित्ताने एक प्रश्न चर्चेत आला हे आजच्या परिस्थितीत स्वागतार्ह म्हणावे लागेल. इथे महत्वपूर्ण बाब म्हणजे हे विधान देशपांडे यांनी मागील पुढील संदर्भाशिवाय दिले असे वाचक धरून पुंगलिया यांचे मत आहे. पण फेसबुक ट्विटर सारखी catchy माध्यमे लक्षात घेता ते काहीसे स्वाभाविक वाटते. त्याची तयारी आपण ठेवली पाहिजे असे वाटते. देशपांडे यांचा यामागील हेतू संभावित होता हे देखील त्यांनी वाचकांच्या प्रतिक्रियेवरील समारोपात जे म्हटले त्यावरून स्पष्टच आहे.(ठीक आहे. अनेकांचे अनेक प्रतिसाद आलेले आहेत. हे

अपेक्षित होतेच. म्हणून तर ही पोस्ट दिली. आता मला हे वाक्य का महत्त्वाचे वाटते ( आणि पटते ) ते सांगतो. कविता ही निव्वळ विचारक्रिया नसते. एकरेषीय नसते. ती पूर्णतेत -- व्यामिश्रतेच्या भानात -- असते. ते भान म्हणजे एकरेषीय विचारक्रिया नसते. भावनाही अशीच वर्णनात्मकतेत सापडू शकते. विचार, भावना, मते हे सर्व व्यक्तिगत असते. भान हे पूर्ण मानवजातीचे असते. सखोल, मौल्यवान कविता ही अशी ' सर्वांची ' असते. एखाद्या उताऱ्यात तिचा अर्थ सापडू शकत नाही. निबंध हा विचाराने समजावा अशी अपेक्षा असते. कवितेत ती प्रक्रिया नसते. असो.) मला वाटते देशपांडे हे गंभीर प्रवृत्तीचे लेखक विचारक असून ते अशा प्रकारची मुल्यभानात्मक टिप्पणी एक सूत्र पकडून सातत्याने करत असतात.मला स्वतःला त्यातील प्रतिभानाचा (intuition) भाग विचारणीय वाटत आलेला आहे. त्यावर मी स्वतंत्र टीपण करण्याचा अव्यापारेषु व्यापारही प्रसंगी केलेला आहे. उदाहरणार्थ त्यांनी प्रज्ञा दया पवार यांच्या पॉप्युलर प्रकाशीत ' हिल्लोळ हरवून आतबाहेरचा' संग्रहातील 'पुनर्लेखन' या कवितेच्या निमित्ताने मांडलेला एकुणच अभिप्राय महत्वपूर्ण आहे. मला स्वतःला तो आजच्या बहुतांश काव्यविषयक भुमिकेचा मागमूस नसलेल्या व पुष्कळच उथळ उत्सवी बेसूर वातावरणात दिलासा देणारा वाटला. ही कविता देखील प्रत्ययशील चिंतनाचा एक नमुना म्हणावी अशीच आहे. अशा कवितेची अनेक आकलन-आस्वादने संभवतात याविषयी पण दुमत असायचे कारण नाही. देशपांडे यांनी या टीपणात कवितेचा 'एकात्म अनुभव' विचारात घेऊन आशय संदर्भात केलेली काही विधाने तत्वज्ञानीय ज्ञानमिमांसेकडे संकेत करत असल्याचे जाणवते. टीपणात आरंभीच्या परिच्छेदात काही मराठी लेखकांची उदाहरणे देऊन ते "कोणतेही चांगले लेखन हे व्यक्तिगत मतांच्या मर्यादेत बद्ध नसते. लेखक जेव्हा खुला असतो, मानवी जगण्यातल्या समस्यांना वैचारिक अंतिमता देणारा नसतो तेव्हाच तो काही मौल्यवान निर्मिती करू शकतो हेच अनेकदा दिसून येते. जगातल्या अनेक महान कलावंतांनीही हे सांगितलेले आहे." अशा निष्कर्षाप्रत येतात. नंतर प्रस्तूत कवितेच्या आशय संबंधाने कवयित्रीच्या अभिव्यक्तीच्या वा भुमिकेच्या अंगाने ते काही प्रश्न उपस्थित करतात.यात जर "एखादी विचारसरणी बिंबविण्याचा हेतू नसेल तर व्यक्तिगत सुखदुःख वा मनःस्थिती संक्रामित करण्याचा हेतू आहे काय? पण यात तशा प्रकारची कसलीच गुंतवणूक नसून उलटपक्षी अनुभवाला समक्ष होत त्यापासून सुटका मोकळीक करून घेणे आहे. ते देखील येथे तटस्थ साक्षीभावाने घडत नसून गोंधळ भ्रम आभासाने युक्त आहे " म्हणत अखेरच्या दोन परिच्छेदात ते कवितेत अवतीर्ण होणाऱ्या प्रतिमेच्या संदर्भात तसेच अर्थनिर्णयन व संभाव्य आस्वादनाबाबत काही महत्त्वपूर्ण विधाने करतात. यातील प्रतिमेचा पुनरावृत्त होत भासमान व्यूह तयार करून स्वतःचेच अस्तित्व प्रश्नांकित करण्याचा भाग तात्विक दृष्टिकोनातून महत्त्वाचा आहे. इथे टीपणकारांना प्रत्यक्ष जगण्यात नसलेल्या तरी अनुभवाच्या संभाव्य शक्यतांची कवितेतील प्रतिमांकित चिंतनात्मकता कविमनाच्या खुलेपणाची कलासिद्ध कसोटी वाटते. या प्रक्रियेत स्वतःचे अस्तित्व व सत्यता धोक्यात आणण्यातून प्रतिमेची निर्णायकता सिद्ध होतांना दिसते. आशयदृष्ट्या कवितेतील निवेदन व्यवहारिक हेतूने बाधीत नसणे हे एक प्रकारे खऱ्याखुऱ्या कलात्मकतेने सर्वांना व्यापकतेने उपलब्ध असणे होय. अशा 'कलात्म असण्या' तून सौहार्द आणि समज निर्माण व्हावी हीच तर कलेची मूल्यात्मकता असेही ते म्हणतात. मला वाटते हेच मत देशपांडे यांनी कमी अधिक फरकाने पुंगलिया यांच्या विधानावरील प्रतिक्रियेच्या उपरोक्त समारोपात अधोरेखित केलेले आहे. या निमित्ताने आजच्या गतीशील काळात केवळ ओळींदरम्यान(Between the lines) वाचण्याची पारंपरिक सवय

टाकून आशयबंध दरम्यान (Between the context) वाचण्याची आंतरसंहितात्मक inter(con)textual सवय लागणे व त्यासाठी तसदी घेणे आवश्यक आहे असे वाटते. पुंगलिया यांनी आपल्या सडेतोड तरी संयत प्रतिक्रियेत हेच मांडण्याचा उपक्रम केलेला आहे असे वाटते. यावर पुष्कळच बोलता येईल. परंतु विस्तारभयास्तव येथे थांबणे उचित होईल. तथापि अंकेक्षण संकेताला धरून चूभूद्येघे.

याला म्हणतात नाटक पोचणे ---

मन झाले ओझे...

सुप्रसिद्ध नाटककार, कवी चं. प्र. देशपांडे यांनी लिहिलेला 'मन' हा दीर्घांक नुकताच बघितला. काही वर्षांपूर्वी तो सरांच्या वेबसाईटवरून 'फ्री डाऊनलोड' करून वाचला होता.

आपलं मन विचारांवर विहरत असतं, ते आपल्या कह्यात नसतं आणि याची सवय अंगवळणी पडलेली असते. तरीपण, शब्दांतून व्यक्त केलेलं ते वाचताना आश्चर्य वाटलं की संदर्भ वेगळे असले तरी इतकं कसं काय ते आपल्या मनाशी मिळतं जुळतं वाटतंय?

त्यामुळेच त्याच्या सादरीकरणाविषयी उत्सुकता होती.

सांगायला आनंद होतोय की, अभिनय, कल्याण आणि विजयलता प्रॉडक्शन्स निर्मित दीर्घांकातून माणसाच्या मनातला हा गुंता सलग शंभरेक मिनिटं जराही न थांबता सादर करणं हे आव्हान अभिनेता रमेश वाणी आणि दिग्दर्शक अभिजीत झुंजारराव यांनी उत्तमरित्या पेललं आहे.

दीर्घांकाच्या पहिल्याच दृश्यासंबंधी नाटककाराने लिहिले आहे -- "पडदा उघडतो तेव्हा नीलकंठ समोर बसलेला. काहीसा थकलेला. पण विचारचक्रात. योग्य त्या ठिकाणी बिझनेस व विश्राम यावे. सतत सलग बोलणे नसावे."

या ठिकाणी दिग्दर्शकाने नायकाला जी क्रिया करताना दाखवलं आहे तिथेच त्याच्या मानसिकतेची अशी काही चुणूक दिसते, जी पुढे संपूर्ण वेळ तशीच टिकवून ठेवण्यात दिग्दर्शक यशस्वी झाला आहे.

रंगमंचावर एकदाही काळोख न करता, विंगेत न जाता वयातला जो बदल (सुरुवातीला ३५-४० आणि नंतर ६२-६३) दाखवला आहे तोही अनोखा आहे.

नाटककार लिहितात --

"स्थळ: घर किंवा एखादी भौमितिक आकारांची रचना."  नेपथ्यकार सुमित पाटील यांनी साजेसं नेपथ्य केलं आहे. जाडजूड दोरखंड, घड्याळाचे आकडे - काटे, पोपटाचा पिंजरा, बाल्कनीचं रेलिंग, इ. पूर्ण रंगमंच व्यापणारं आणि अडकलेल्या मोकाट मनाचा  वावर अन् सुटकेसाठी वृथा धडपड दर्शविता यावी यासाठी ते चपखल झालं आहे.

संगीतकार कृष्णा - देवा यांचं पार्श्वसंगीत आणि या जोडीतील देवा यांचं स्वरार्त गायन हेदेखील त्या त्या मनोवस्थेला सार्थ व्यक्त करणारं झालं आहे.

संपूर्ण प्रयोग (अतीवापराने गुळगुळीत झालेला असला तरी हाच शब्द) देखणा! अन् तोही NCPA च्या मिनी थिएटरमध्ये मोजक्या जाणकारांच्या उपस्थितीत बघताना आनंद झाला.

लेखक चंप्र त्यांच्या कुटुंबीयांसह, सुप्रसिद्ध मनोविकारतज्ज्ञ आणि लेखिका डॉ. अंजली जोशी, सुप्रसिद्ध दिग्दर्शक गिरीश पतके, सुप्रसिद्ध नाटककार प्रेमानंद गज्वी, सुप्रसिद्ध अभिनेते शैलेश दातार.

'मन ' म्हटलं की सर्वांत पहिल्यांदा आठवतात सं. रामदास स्वामींचे मनाचे श्लोक, बहिणाबाईंच्या आणि इतर कवींच्या कविता, भावगीतं, गाणी.

मनाचे श्लोक सांगतात की मन 'व्यर्थ चिंता' वाहते तसेच 'बहु हिंडता सौख्य होणार नाही'.

मनाने काय करावे अन् काय करू नये, मनाला शिस्त कशी लावावी, मनातल्या सुख-दुःखाच्याकडे कसं बघावं अथवा बघू नये हेही सुचवतात. यासाठी मनाला श्रीरामाच्या चरणी अर्पण करावं असं रामदासस्वामी म्हणतात.

कविता - गीतांमधून मनाच्या प्रतिमा साकारल्या आहेत. मन 'पाखरू पाखरू', मन 'उभ्या पिकातलं ढोर', मन 'काळोखाची गुंफा', मन 'तेजाचे राऊळ', मन 'उधाण वाऱ्याचे' इ.

मनाचे हे श्लोक अन् या प्रतिमा कशा तयार झाल्या?

मनाच्या हालचालींमुळे.

मनाच्या हालचाली म्हणजे काय?

मनात येणारे असंख्य विचार.

हे विचार नक्की काय स्वरूपाचे असतात? ते मनात का येतात? त्यांच्याशिवाय माणूस जगू शकतो का? मनात विचारांची आवर्तनं सुरू असताना माणसाचं जगणं - वागणं कसं असतं?

त्यांचे त्या माणसावर, त्याच्या नातेसंबंधांवर कसे अन् काय परिणाम होतात?

'मन' दीर्घांक मनाच्या हालचाली आपल्या पुढ्यात तंतोतंत उभ्या करतो.

या हालचालींना अमुक एक विषय किंवा दिशा नाही. सतत उलट सुलट, वेड्यावाकड्या विचारांत अडकलेल्या. मात्र एक गोष्ट अधोरेखित होत राहते की हे मन प्राप्त परिस्थितीबाबत असमाधानी असूनही नाईलाजाने तिचा स्वीकार करता करता त्यातच अधिकाधिक गुरफटत गेलं आहे. ऐन उमेदीच्या काळात आणि निवृत्तीनंतरही हे असंच!

विचारांच्या कोलाहलातून सुटका व्हावी कशी? एकीकडे 'मेलो तर बरं' म्हणावं. पण मनात मरणाची भीती आणि ते दूर पळालं म्हणून हायसं वाटणं.

यातल्या काही जागा खास नाटककाराच्या असलेल्या, जसं की ---

"चुकलेल्या क्षणांचं अहिंसक आयुष्य आहे माझं! हेच माझं नशीब? हे? मला ज्या ज्या वेळी जे जे वाटलं ते ते मी केलंच नाही! मग मला ते तसं वाटण्याचा उपयोग

काय होता? आपण जे करू शकतो तेवढंच खरं तर माणसाला वाटलं पाहिजे! सगळी अस्तित्वात न आलेल्या क्षणांची स्मृतिचित्रं का सांभाळत बसलोय मी ? आणि आत्ताच्या क्षणांचं तरी मी काय करतोय ? त्या क्षणांसाठी हेही क्षण वेस्ट करतोय ? "

पुरुष असो वा स्त्री -- मनाच्या गुंताड्यातून सुटका होण्यासाठी, मन:शांतीसाठी ओंकार साधना - भगवद्गीतापठण शिकणं, गायन - वादनात मन रमवणं, एकलकोंडा स्वभाव असूनही समाजात जगता यावं म्हणून इतरांच्यात मिसळणं

अन् पुन:पुन्हा दुष्ट विचारचक्राच्या विळख्यात सापडणं.

माणसाच्या मनाचा इतका सखोल आलेख क्वचितच कुणी मांडला असावा...

चित्रा राजेंद्र जोशी - १७.६.२४

Dinesh Jadhav is with Shyam Chavan and

2 others

The mind game....

आयुष्य हा मनाचा खेळ आहे, हे त्रिकालाबाधीत सत्य आहे आणि ते आपणच तयार केलेले आपल विश्व असत! पण हे सत्य आपणाला बऱ्याचदा उमगत नाही, जर हे अनुभवायचचं असेल तर चं.प्र. देशपांडे सरांचा चा "मन" हा दिर्घांक आपल्याला जरूर पहावयास हवा. तुमच आयुष्य प्रेरणादायी असेल, निरर्थक असेल कि सर्वसाधारण असेल हे ठरविण्याचा सर्वस्वी अधिकार हा तुमच्या मनाचा असतो. किंबहुना आपण त्याला तो अधिकार देतो आहे कारण आपण त्या मनाच्या जाळ्यात पुर्णतः अडकलोय. हॅट्स ऑफ चं.प्र. सर! फार मार्मिक पणे तुम्ही सर्वसामान्य माणसाच्या मनाच विवेचन अगदी ठळकपणे मांडलत दीर्घांकात. हा दिर्घांक तुम्हाला अस्वस्थ करतो कारण यात सतत तुम्ही स्वतःला शोधत असता. 100 मिनिटे एक अभिनेता तुम्हाला त्याच्या मनात चाललेल्या विचारांची घालमेल मांडत असतो आणि आपण त्यात आपल प्रतिबिंब उत्कटपणे पाहत असतो हा सुरेख अनुभव आपणास दिलाय "मन" च्या टिम ने. लेखक म्हणुन चं.प्र. देशपांडे सर ग्रेट आहेतच पण दिग्दर्शक अभिजीत झुंजारराव ने ज्या पद्धतीने त्याला रंगमंचीय अविष्कार दिला आहे त्याला तोड नाही. नेपथ्य हे खुपच बोलके आहे आणि त्याला जबरदस्त साथ मिळाली आहे शाम चव्हाण च्या लाईट्स ची आणि संगीतकाराची. हा प्रयोग पाहील्या नंतर मी रमेश वाणी या कलाकाराचा जबरदस्त फॅन झालोय. 100 मिनिट त्यांनी प्रेक्षागृहातील रसिकांना खिळवून ठेवलय ते ही मनाच्या अनाकलनीय भावनांच्या हिंदोळ्यावर. हा दिर्घांक कस आहे अभिनेत्याचा, दिग्दर्शकाचा आणि ईतर तंत्रज्ञ मंडळींचा जो चांगला जमुन आलाय. प्रयोगशील नाटक असल तरी त्याला व्यावसायिक दृष्टीकोनातुन आपण पाहायला हव कारण हेच अनुभव आपल्या मनाच्या कोपऱ्यात साठुन आपल आयुष्य समृध्द करत असतात हे मनात साठवुन घ्या.

संपुर्ण टिमला मनापासुन शुभेच्छा □

Abhijeet Zunjarrao

Your new experimental play " Mind", it is a solo performance, no entry, no exist, no darkness, onces curtain opened it dropped at the end, the play continued for 100 minutes, without makeup, without costume changes, you showed transformation of character on his face as per age lapses in play, the theme of play is quite strange, infinite mind, expression of mind, psychosis of mind, I think play has uncovered

real face of human beings, you have always choosen different path for directing such a play, you have created your own style of direction that is less trodden by other ,you are really praiseworthy for it, you have gifted talented artist to theare like Ramesh wani, you have explored gem, he is really a great artist who played such a wonderful and marvellous role, C P Deshpande Sir is a great playwright, I liked his buddhibal and zabu, it was a great play, I think because of you, playwright dared to find out new avenues in writing plays, you have won strong support of audience, you have been enjoying good reputation and earned good name for your Theatre group, I extend my best wishes to all of your colleagues, all technicians, all backstage artist and who directly and indirectly helped you, you will grow like waxing moon day by day.

- Sudhakar madhukar Gadhave

Playwright, Khandala Talukha, Khandala Dist Satara

Mobile Number 9881026476

‘ मन ’ बाबतचे अभिप्राय ---

नेपथ्यकार, संगीतकार, प्रकाशयोजनाकार, अभिनेता रमेश वाणी आणि अर्थातच दिग्दर्शक अभिजित झुंजाररावने हा experiment चांगला पेललाय.

--- नीलकंठ कदम ( कवी आणि समीक्षक )

चं. प्र. देशपांडे लिखित अभिजित झुंजारराव दिग्दर्शित ‘मन’ हा एकपात्री नाट्यप्रयोग म्हणजे मनाच्या गुंतागुंतीचा वेगवेगळ्या आयामांतून घेतलेला चिंतनीय वेध आहे.

वेगळे काही पहायचे असेल तर 'मन' अजिबात चुकवू नका.

--- डॉ. अंजली जोशी ( सायकोलॉजिस्ट )

अभिनय, कल्याण आणि विजयलता प्रॉडक्शन्स निर्मित ‘ मन ‘ या दीर्घांकातून माणसाच्या मनातला हा गुंता सलग शंभरेक मिनिटं जराही न थांबता सादर करणं हे आव्हान अभिनेता रमेश वाणी आणि दिग्दर्शक अभिजित झुंजारराव यांनी उत्तमरीत्या पेललं आहे.

--- चित्रा राजेंद्र जोशी ( सी. ए. )

१०० मिनिटे एक अभिनेता तुम्हाला त्याच्या मनात चाललेल्या विचारांची घालमेल मांडत असतो आणि आपण त्यात आपल प्रतिबिंब उत्कटपणे पाहत असतो हा सुरेख अनुभव आपणास दिलाय "मन" च्या टीम ने.

--- दिनेश जाधव ( एक नाट्यकर्मी )

नक्की आणि लौकरात लौकर बघा .. आपलंच ‘ मन ‘ ..

योगेश खांडेकर ( अभिनेता )

अप्रतिम, अद्वितीय, विलक्षण, अशक्य, भारी, सुंदर – अशी अनेक विशेषणे कमी पडतील इतका असा हा एक जबरदस्त प्रयोग आहे ! ' मन ' !

--- विजय घाडगे ( प्रेक्षक, मुंबई )

Rahul Pungaliya is with रवीन्द्र दामोदर लाखे and

पाच दिवसांपूर्वी श्री चं प्र देशपांडे यांच्या एका पोस्टमुळे काहीशी चर्चा झाली होती त्याला मी किंचितसे उत्तरही दिले होते. आता माझे पूर्ण म्हणणे इथे मांडत आहे---

प्रख्यात नाटककार आणि मराठीतील महत्त्वाचे परंतु दुर्लक्षित कवी श्री चं प्र देशपांडे यांनी मिथकावरील माझ्या एका लेखातील एक विधान आज सकाळी त्यांच्या फेसबुक भिंतीवरती उद्धृत केले. त्याला उदंड प्रतिक्रिया मिळाल्या. यातील सर्वच प्रतिक्रिया मूळ लेखातील संदर्भ पाहिल्याशिवाय होत्या.

त्यामधील बहुतेक प्रतिक्रिया त्या विधानाला, अर्थ समजून न घेता,उडवून लावणाऱ्या, ते विधान पटले असले तरी यात नवे काय आहे? अशी विचारणा करणाऱ्या,आणि प्रसंगी कुचेष्टा करणाऱ्या, उथळ अशा होत्या. त्यामुळे त्यांचा प्रतिवाद करणे गरजेचे नाही. तरी देखील या प्रतिक्रिया मराठी वाङ्मय व्यवहारातील काही महत्त्वाचे कल दर्शवणाऱ्या आहेत. एक सामाजिक विदा म्हणून त्यांचे महत्त्व आहे. काही प्रतिक्रिया मात्र त्या विधानाला दिलेला प्रामाणिक प्रतिसाद होता. म्हणून या लिखाणाचा प्रपंच!

मिळालेल्या प्रतिक्रिया ज्या क्षुल्लक आणि थिल्लर होत्या, त्यांची वर्गवारी करणे शक्य आहे.ढोबळमानाने लोकशाहीवादी, सापेक्षतावादी आणि परंपरावादी या तीन प्रकारात सर्व कमेंन्ट्स बसतात.

१.लोकशाहीवादी मंडळींचे असे म्हणणे दिसते की कवितेचे कुठल्याही प्रकारे नियमन करू नये. कवितेची व्याख्याच करू नये. आणि प्रमाण व अप्रमाण ठरवणारे निकष कवितेबाबतीत असू नयेत. कविता हे सर्वांसाठी मुक्त संचाराचे क्षेत्र असावे. कविता लिहिण्यासाठी काही पात्रतेची गरज नाही. चांगली किंवा वाईट कविता हे निकष असू शकत नाहीत. कविता हा संवाद किंवा अभिव्यक्तीचाच थोडासा वेगळा म्हणजे आडव्या ऐवजी उभं लिहिलेला आणि अलंकृत असलेला प्रकार आहे.त्यामुळे कवी त्याच्या भावना, वृत्ती व विचार सांगण्यासाठीच लिहितो आणि वाचकाला ते समजून घेणे निव्वळ क्रमप्राप्तच नाही तर तो त्याचा मूलभूत मानवी हक्क आहे.

आता,जर कविता संवाद किंवा अभिव्यक्ती असली, तर तो संवाद गद्यात आणि सर्वसामान्य माणसे करतात त्या पद्धतीने छापील माध्यमातून आडवा, थेट, अलंकार, प्रतिमा आणि काव्यातील प्रचलित शब्द न वापरता का केला जात नाही? हा संवाद अशा विचित्र उभ्या पद्धतीने का केला जातो? याचे उत्तर लोकशाहीवादी, मानवाधिकारवादी लोकांकडे नसते.

तसेच इतर कला जशा की शिल्पकला, चित्रकला,हिंदुस्तानी शास्त्रीय गायन व नृत्य यामध्ये हा व्यक्ती स्वातंत्र्याचा आणि लोकशाहीचा जयघोष का केला जात नाही? ज्ञान विज्ञानाची क्षेत्रे व तंत्र कौशल्यात तर लोकशाहीचा संवादाचा

आणि अभिव्यक्तीचा आग्रह बिलकुलच धरला जात नाही. डॉक्टरच्या अनाकलनीय बोलण्यापुढे भयभीत रुग्ण मुंडी हलवतात. तिथे अर्थाचा आग्रह धरत नाहीत. तसेच शास्त्रज्ञांच्या पायाशी लोळण घेतात. आपल्याला शष्प न कळले तरी कृष्णविवरांचे कौतुक करतात. सिंग्युलॅरिटी चा काही न कळता भक्तीभावाने उल्लेख करतात .शेअर मार्केट आणि वित्तीय भांडवल याचे अर्थशास्त्र न कळता देखील, कवितेत हिरीरीने अर्थाची मागणी करणारे लोक, भरपूर पैसे कमवतात. असे का याचेही उत्तर या लोकांकडे नसते. उपरोल्लिखित सर्व क्षेत्रे अतिशय प्रमाणित , नियमबद्ध आणि स्पष्ट व्याख्या केलेली असताना केवळ साहित्य क्षेत्राचे प्रमाणीकरण किंवा नियमन आणि साहित्याची विशेषतः कवितेची व्याख्या करायला प्रचंड विरोध का असतो? साहित्यामध्ये हवशा, नवश्या आणि गवशांना मोकळं रान हवं असा आग्रह का असतो? या प्रश्नाचे उत्तर द्यायला हवे.

याचे एक उत्तर मला असे दिसते की साहित्य  हे मऊ क्षेत्र आहे म्हणजे ते सॉफ्ट फील्ड आहे.आणि मऊ लागले की कोपराने खणा ही सहज वृत्ती असते. आपल्या नवसाक्षर समाजात साहित्य हे कमीत कमी श्रम, तयारी, व अभ्यासात अभिव्यक्त होण्यासाठी सोपे माध्यम आहे. लिहिता वाचता आले की कवी लेखक व नाटककार होता येते.आणि तरी देखील ते सत्ताधाऱ्यांसाठी निरुपद्रवी असे क्षेत्र आहे .साहित्य क्षेत्रातील आक्रोश व टाहो चुचकारून, पुरस्कार देऊन मॅनेज करता येतात.ते व्यवस्थेला पाठबळच पुरवतात.

त्यामुळे साहित्याची  स्वायत्त बांधणी आणि सर्वसामान्यांसाठी व सत्ताधाऱ्यांसाठी अनाकलनीयता, काठिण्य हे धोकादायक असणारे आहे. सर्वसामान्य माणसाला संवाद साधल्याचे व अभिव्यक्त केल्याचे फसवे समाधान साहित्य तत्काळ पुरवते. ते विद्रोहाचा कंड शमवते व तरी देखील निरुपयोगीच असते. साहित्याला भाषेपेक्षा एक वेगळे सत्व, सत्ता शास्त्रीय स्थान व प्रयोजन आहे अशी धारणा प्रस्थापित लोकांना नकोशी वाटते. त्यांना साहित्य एक छंद किंवा समाजातील सांस्कृतिक सजावट म्हणून असणे सुरक्षित वाटते. साहित्याचे संभाषित संवादी असले, अर्थपूर्ण असले तर त्यांचा अहंकार सुखावतो. त्यांना भाषेवरती,( आडव्याच नाही तर उभ्या देखील आणि शिवाय अलंकारिक देखील,) नियंत्रण असल्याने सुरक्षित व आरामशीर वाटते.

त्यामुळे अनाकलनीय कवितेला ते प्रचंड घाबरतात. कारण ती कविता त्यांना धक्कादायक ठरू शकतील असे अर्थ आपल्या गर्भात बाळगते.त्यांचे नेहमीचे सुखासीन, रुटीन जगणे चालू राहील इतकेच चवीपुरते साहित्य त्यांना हवे असते. साहित्य  स्वतःला सुसंस्कृत कलासक्त घोषित करणारी गोष्ट असते. साहित्याच्या मूलगामी प्रश्नांना ते सामोरे जाऊ शकत नाहीत .ही मध्यमवर्गीय, सुमार माणसे साहित्याला स्वतःच्या खालच्या पातळीवरती खेचतात. साहित्याबद्दल पद्धतशीर विधाने करून काही एक व्यवस्था शोधण्याचा प्रयत्न केला म्हणजेच साहित्याचे आत्मावलोकन करून जाणिव वाढवायचा प्रयत्न केला तर ते बऱ्याच जणांना खपत नाही. हे क्षेत्र अनियंत्रित असावे. इथे काहीशी मोकळीक मिळावी अशी अपेक्षा आहे. इतर कुठेच अशी मोकळीक मिळत नाही. आधुनिक समाज वैज्ञानिक, तांत्रिक, प्रशासकीय आणि लष्करी पद्धतीने साकार झालेला आहे. समाजामधील स्वातंत्र्य नाममात्र आणि फसवे आहे.विज्ञाने व तंत्रज्ञाने संघटित सत्ताकारणाच्या गरजांनुसार आणि मागणीनुसार "सत्य" व "वस्तुनिष्ठ तथ्यांचा" शोध घेतात हे आता लपून राहिलेले नाही.

मालमत्ताधारक वर्गाच्या हिताचे , विकासाचे कार्यक्रम  राबवताना सत्ताधाऱ्यांनी सर्वसामान्यांची सहमती मिळवण्यासाठी 'विशुद्ध ज्ञान','निर्विवाद,केवल सत्याचा शोध' हे आदर्श सिनिकली वापरलेले असतात. खरे तर सर्वच सामाजिक राजकीय आदर्श हे गोरगरिबांच्या रक्त व घामाने डागाळलेले असतात. हे देखील आता सामान्य ज्ञान झालेले आहे .आणि हे असेच चालणार असा अटळ दैववादी विश्वासही जनतेमध्ये तयार झाला आहे. आता कोणालाच कशाचेच आश्चर्य वाटत नाही.

या पार्श्वभूमीवर कला क्षेत्र विविध अभिरुचींना पटेल असे मनोरंजन पुरवणारी एक यंत्रणा व बाजारपेठ झाली आहे. मराठी साहित्याबद्दल हे प्रकर्षाने जाणवते.जसा, विज्ञानाचे कार्य आणि महत्व सर्वसामान्यांच्या गळी उतरवण्यासाठी, "सत्य, ज्ञानासाठी ज्ञान, कुतूहल, वस्तुनिष्ठता" इत्यादी  मिथ्या मूल्यांचा, जे विज्ञानाच्या प्रत्यक्ष प्रॅक्टीसमध्ये म्हणजे आचरणात बिलकुल दिसत नाहीत, त्यांचा आयडिओलॉजिकल वापर केला जातो. त्याचप्रमाणे साहित्यात देखील,"अभिव्यक्ती, कलेचा आस्वाद, सौंदर्यानुभव ,मानवतेच्या मूल्यांचा पुरस्कार, व्यक्तिनिष्ठता, भावनिकता, व्यक्ती स्वातंत्र्य, कल्पनाशक्ती, प्रतिभा, अंतर्मनाचा आविष्कार, प्रामाणिक संवाद इत्यादी मिथ्या मूल्यांचा आयडिओलॉजिकल वापर केला जातो.साहित्यातील नोकरदार (विद्यापीठीय व शासकीय ) आणि विविध साहित्य व्यावसायिकांना (यामध्ये प्रकाशक विक्रेत्यांबरोबर लेखक, कवी, नाटककार देखील आले) या आयडिओलॉजीला पूरक  व्यवहार करावा लागतो. साहित्याच्या आयडिओलॉजीमुळे समाजामधील स्वातंत्र्याचा अभाव, लोकशाहीच्या रूपातील छुपी हुकूमशाही, दडपशाही, व्यक्तीच्या मनाचे व बुद्धीचे माध्यमे व ज्ञान विज्ञान उद्योगाकडून केले गेलेले कंडीशनिंग (संस्कार),परात्मता, अनुभव, समाधान व आनंदाचे क्रयवस्तूमध्ये झालेले रूपांतर या गोष्टी झाकल्या जातात. साहित्य व्यावसायिक म्हणजे लेखक आणि साहित्याचे उपभोक्ते म्हणजे वाचक या दोघांनाही समकालीन घटनांना दिलेले थेट अपरीक्षृत प्रतिसाद म्हणजेच संवाद वाटू लागतो.त्यामुळे आज, वाचक उपभोक्त्यांच्या भावनिक वैचारिक गरजा भागवून घेण्याचे,साहित्य हे साधन झाले आहे.

ज्यांचा आग्रह कवितेने संवादी असावे आणि अर्थ निर्णयन वाचकाच्या मर्जीने चालावे असा आहे ते, भाषा,हे संवादाचे पारदर्शक माध्यम आहे हे गृहीत धरतात.आधुनिक काळात आणि कदाचित आधुनिकपूर्व समाजांमध्ये देखील भाषा पारदर्शक नाही व बहुतेक कधीच नव्हती. थेट संवाद हे मिथक आहे, आणि होते. वर उल्लेख केल्याप्रमाणे ज्ञान विज्ञान व इतर क्षेत्रांत विविध विचारधारांचे प्रवाह (आयडीओलॉजीकल फोर्सेस ) भाषेला अपारदर्शक व विशिष्ट कल असलेले, पक्षपाती माध्यम बनवतात. संवादाचे दोन्ही ध्रुव म्हणजे मी (सब्जेक्ट) आणि  वास्तव या दोन्ही गोष्टी दूषित झाल्या आहेत . 'मी ' आपल्या भावना व मनस्थितीच्या प्रामाणिक अभिव्यक्तीचा प्रयत्न करून वा आत्ताच्या व्यामिश्रतेचे समग्रभान ठेवून भाषेला पुन्हा एकदा संवादी व पारदर्शक बनवू शकत नाही.

थोडक्यात साहित्यिकाने आपले 'मी 'पण अबाधित व स्थिर आहे असे समजून, गृहीत धरून "आपण वास्तवाचा वेध प्रयत्नाने घेऊ शकतो" या भ्रमातून बाहेर यायला हवे. आधुनिक कवितेच्या सर्जन प्रक्रियेत व आस्वाद प्रक्रियेत समीक्षात्मक, चिकित्सक व सर्जनशील वृत्तींची सरमिसळ झालेली आहे. त्यामुळे कविता म्हणजे उत्स्फूर्त भावनांचा आविष्कार अशा संकल्पना आता कालबाह्य झालेल्या आहेत. कवितेचे निर्माण करताना त्याच कवितेची समीक्षा होत असते. या दोन्ही गोष्टी एकाच वेळी कवी करत असतो . आपल्याच कवितेच्या पायाखालचा आधार खेचणे अशी

विघातक कृती करण्याची धूर्त लकब कवीला वापरावी लागते. त्यामुळे चांगली कविता ही संवाद व अर्थाच्या स्वतःच निर्माण केलेल्या शक्यतांचे विघटन करत पुढे जाते.

ही आत्मघाताची व आत्म चिकित्सेची भूमिका न घेणारे लिखाण सहजच विविध सत्ता संबंधांच्या आ वासून बसलेल्या  घशांत सहजच जाते. या कवितेसाठी धोकादायक बनलेल्या आणि अतिशय चित्त थरारक (एक्साईटिंग) काळात संस्कृत काव्यशास्त्रातील वाच्यार्थ, लक्षणा व व्यंजना फारसे उपयोगाचे असू शकायचे नाहीत . कारण या अलंकारिक कारागिरीमध्ये भाषेला गृहीत धरण्याची मुभा होती. आजसारखी व्यक्तीत्व, भाषा व संस्कृतीवर पूर्ण अंमल गाजवू पाहणारी सामाजिक आर्थिक व्यवस्था त्या काळात नव्हती. तेंव्हा भाषेवरती कौशल्यपूर्वक काम करून कवितेला अनुरूप आणि विशिष्ट व्यंगात्मक, परोक्ष अर्थ निर्माणाच्या शक्यता  होत्या. आज भाषा (म्हणजेच सामाजिक व सांस्कृतिक तथ्ये व मूल्ये) इतकी निसरडी व
बेभरंवशाची झाली आहेत की भाषा आपल्याला वापरते आहे का आपण भाषेला वापरत आहोत हे कळेनासे होते.
 त्यामुळे चांगल्या कवितेत सुलभ संवादाच्या मिथकाला छेद दिला जातो. चं प्र देशपांडेंनी उद्धृत केलेल्या  विधानाला काही सापेक्षतावादी किंवा बहुलतावादी प्रतिक्रिया आल्या. त्यांचे म्हणणे असे होते की कविता अनेक प्रकारच्या आहेत आणि वाचकही अनेक प्रकारचे. त्यामुळे दोन्ही, कविता आणि त्यांचे अर्थ, अनेक असू शकतात. एकच एक अर्थ असावा अशा अपेक्षेची सक्ती नको. बाजारपेठेतील उत्पादन ग्राहकाने कसे वापरावे हे त्याचे तो ठरवतो. हे वस्तू वापरण्याचे स्वातंत्र्य भांडवली लोकशाहीमध्ये सुखद वाटते. साहित्य देखील या प्रकारची वापराची वस्तू असल्यासारखी ही अपेक्षा आहे. साहित्य हेतूपूर्वक संवाद सुलभतेला आव्हान देते . हीच साहित्याची सामाजिक बांधिलकी आहे. आणि असे साहित्य त्यामुळे सगळे आलबेल नाही याची जाणीव करून देते.
वरील विवेचन जर काही प्रमाणात ग्राह्य असले तर बहुसंख्य साहित्य जे संवादी व अर्थवाही आहे त्याचे स्थान व दर्जा (स्टेटस) काय ?
असा प्रश्न उभा राहतो .हे मुख्य प्रवाहातले साहित्य आहे. ते आपल्या समाजाच्या वैचारिक व राजकीय भूमिकेचे निदर्शक आहे. आजच्या घडीचे मध्यमवर्गीय (जरी त्यातील काही पूर्वाश्रमीचे दलित वंचित असले तरी) साहित्याचे जनक व उपभोक्ते आहेत.त्यांनी आत्ताची अधीमान्यता असलेली, प्रभुत्वशाली सांस्कृतिक व्यवस्था स्वीकारलेली आहे. या व्यवस्थेत ते आपल्या परीने भर घालीत असतात. प्रचलित मुख्य प्रवाहातील साहित्याचा मूलभूत खोटेपणा त्यांच्या लक्षातही  येणार नाही इतका अंगवळणी पडला आहे. किंवा ती स्थितीशरणता व अप्रामाणिकपणा ही या साहित्याची बेसलाईनच आहे.
पूर्ण

Facebook
Girish Rangnekar is with रवीन्द्र दामोदर लाखे and
.

“कुठेही जा, कितीही फिरा, तुम्ही एकाच ठिकाणी असता - मन! सगळ्या घटना, अनुभव, सुखदुःख घडण्याचे एकच ठिकाण - स्थळ फक्त मन! कुठं जाणं नाही आणि येणं नाही. जगणं म्हणजे फक्त मनाची हालचाल! तसं बघितलं तर प्रॉब्लेम एकच! आपलं माईंड! आपण उगीच प्रॉब्लेम्सची मोठी संख्या सांगत बसतो!” नाटकातले हे संवाद कुणाला अध्यात्मिक वाटतील तर कुणाला आधुनिक!

मराठीतले विद्वान कवि आणि नाटककार चं. प्र. देशपांडे यांनी पूर्वी लिहिलेली २२ नाटके/दीर्घांक आणि २३ एकांकिका अलिकडल्या २-३ वर्षात टप्प्या टप्प्याने पुस्तक रूपात प्रसिद्ध केल्या आहेत. "मन वेगळं, विचारसरणी वेगळी, अवेअरनेस वेगळा आणि जगणं वेगळं " - मराठीतल्या कोणत्याही साहित्य प्रकारात तशी अभावाने आढळणारी ही स्पष्टता, हा दृष्टिकोन याची थेट मांडणी चंप्र आपल्या प्रत्येक नाट्यकृतीतून करतात!

"दंगल" या त्यांच्या एकांकितेत अंतर्मुख करणारे रोखठोक सवाल येतात - "सगळीकडूनच सगळं असं संघर्षमय का? आणि असंच जर आहे तर आम्ही संघर्षमय जगलो असं सांगण्यात तरी काय अर्थ आहे? दुसरं कसं जगू शकणार होतो?" मानसशास्त्रात रस असणाऱ्यांना सरांचे लेखन नेमकेपणाने उपयोगी पडेल. चंप्र म्हणतात – “आपल्या जगण्यात आर्थिक प्रश्न किंवा एखादा महत्त्वाचा संघर्ष केंद्रस्थानी नसून केंद्रस्थानी आहे तो फक्त आपल्या मनाचा गोंधळ आणि याला शरीरातली रसायने कारणीभूत असतात!".

त्या त्या पुस्तकासाठीचे प्रूफ रिडींग, त्याचे मुखपृष्ठ, ब्लर्ब पासून ते त्याचा बार कोड तयार करण्यापर्यंतची सगळी प्रोसेस चंप्रंनी एकहाती पार पाडली आहे. त्यांच्याच शब्दांत सांगायचे तर "दिग्दर्शन, कथा, पटकथा, संवाद, संगीत, गाणी, अभिनय - सबकुछ किशोरकुमार, असा हा प्रकार आहे." त्यांच्या प्रत्येक पुस्तकातल्या "ऋणनिर्देश" पानावर त्यांनी अन्य मातब्बर नावांसोबत माझ्या नावाचा देखील आवर्जून उल्लेख केला आहे. प्रत्येक पुस्तक छापून आले की आमची भेट ठरलेली असायची. त्या प्रत्येक भेटीत चंप्र सहीनिशी ते ते पुस्तक मला भेट देखील देत आले आहेत. सरांनी भेट दिलेली ही सर्व नाटके आणि एकांकिका संग्रह मी त्या त्या वेळी टप्प्या टप्प्याने वाचत गेलो. सर्व पुस्तकांतली मिळून अंदाजे दीड-दोन हजार पाने असतील ज्याची ओळ अन ओळ मी तन्मयतेने वाचलेली आहे.

माझ्या अनुभवानुसार ऍसिडिटी वाढली की आपल्या मनात नकारात्मक विचार यायला लागतात. तर्काने विचार करायचा झाल्यास, ऍसिडिटीच्या विरुद्ध गुणधर्म असलेल्या अल्कलीचे इनपुट/ अन्न जर अशा वेळी पोटाला मिळाले तर मनातले विचार बदलू शकतात. मनाचे प्रश्न, मनोव्यापार जर असे आपल्याला नीटपणाने उमजले, आऊट ऑफ कंट्रोल परिस्थितीमध्ये जर आपण त्रयस्थपणाने त्याकडे असे पाहायचे ठरवले तर असंख्य अडचणी, यातनांमधून आपली सुटका होऊ शकते. अशी सुटकेची संधी चंप्र सरांची नाटके आपल्याला प्राप्त करून देतात.

"नाणेफेक आणि इतर ५ नाटके" या पुस्तकात दिग्दर्शक, कवि रविंद्र लाखे यांचा लेख आहे. त्या लेखात लाखे म्हणतात – “नाटकातून कुठलीही एकरेषीय अर्थनिश्चिती होवू नये असा अंतस्थ हेतू चंप्रंच्या मनात असतो. चंप्रंच्या नाटकाचा नायक मन आहे पण नाटकात मनाला महत्व नसून मनाच्या सलग, उलटसुलट किंवा एकमेकांच्या विरुद्ध घडणाऱ्या हालचालींना महत्व आहे. चंप्रंचे कोणतेही नाटक हे प्रेक्षकांचे भान हरवण्यापेक्षा त्यांना भानावर आणणारे असते!”

दिग्दर्शक गिरीश पतके यांचा देखील प्रदीर्घ लेख चंप्रंच्या "ओळख परेड" या एकांकिका संग्रहात समाविष्ट आहे. त्यात पतके लिहितात - "चंप्र सरांसाठी सर्जिक साहित्य वा नाटक ही चंगळ नसून जगण्याच्या आकलनाची गंभीर प्रक्रिया असते. -- चंप्रंना स्वतःला विविध प्रकारच्या व्यक्तिमत्त्वांच्या निर्मितीत रस नसतो तर त्या व्यक्तींच्या मनांत चाललेल्या घडामोडींशी, त्यातील नाट्याशी रस असतो. -- चं. प्र. देशपांडे हे केवळ मराठी रंगभूमीवरील महत्त्वाचे नाटककार नाहीत तर भारतीय रंगभूमीवरील महत्त्वाचे नाटककार आहेत. त्यांच्या अनेक नाट्यकृती आता पुस्तक रूपाने उपलब्ध झालेल्या आहेत. त्या विविध भाषांमध्ये भाषांतरित-रूपांतरीत होणे आवश्यक आहे."

चंप्रंच्या प्रत्येक नाटकातून, एकांकितेतून वाचक म्हणून आपल्याला सखोल काही मिळत राहते! उदाहरणार्थ - "बुद्धीचे एकूण काम हे माणसाच्या जगण्यातलं अपयशी काम आहे. संपूर्ण जगण्याचा आवाका बुद्धीला घेता येत नाही. माणसाची सगळी नाती संघर्षमय आहेत आणि त्याला बुद्धीने उत्तर देता येत नाही. बुद्धीने प्रश्न सुटायचे असते तर सीमा प्रश्न, मानवी जगण्यातले प्रश्न सुटले असते. --- All reactions create problems.--- स्वतःच्या मनाच्या कंडिशनिंगचे प्रश्न सुटले की सगळे प्रश्न सुटणार!" चं.प्र. सरांची कमालीची वैचारिक स्पष्टता आपल्याला अक्षरशः मोहवते!

माणूस जेवढा आपल्याला दिसतो त्याच्या पलीकडे आपल्याला न दिसणारा केवढा तरी पसरलेला असतो. एखादी ठराविक भूमिका  न घेता, अश्या न दिसणाऱ्या माणसाचा, त्याच्या मनाचा शोध घेणारे चंप्रंचे असे लिखाण इतर नाटककारांपेक्षा म्हणूनच वेधक आणि महान ठरते. त्यांच्या “ओळख परेड” या एकांकिकेत एक संवाद आहे - "काय झालं असतं-नसतं याला काही मर्यादा नाही. प्रत्यक्षालाच फक्त मर्यादा आहे. या प्रत्यक्षाच्या मर्यादेतच जगायचं आहे. या प्रत्यक्षाच्या चक्रातून सुटका नाही. आपली शरीरं, आपले अनुभव हेच सगळं प्रत्यक्ष रे! जाणार कुठे!."

त्यांच्या प्रत्येक पुस्तकातल्या प्रत्येक नाट्यकृतीमधून मला भावलेले काही संवाद इथे प्रस्तुत करत आहे -

चार पुरुषार्थांची चार नाटके -

१. ढोलताशे -

मन सारखं असे उत्सवात गुंतवल्यामुळं आणि अशा प्रकारे मनाला उत्सवाचं प्रदूषण झाल्यामुळे आयुष्याची काय हानी होते हे कसं कळत नाही?

अहंकाराच्या समर्पणाला भक्ती म्हणतात -- इथं तर अहंकाराचीच करमणूक चाललीय!

आनंद हा सारखा असा बाहेरून ओरबाडून हावरटासारखा खात राहावा असं वाटणं हा वेडेपणा नाही वाटत?

खरं शोधणारा घातक नसतो -- खोटं टिकवणारा घातक असतो.

सारखं दुसऱ्यांची मनं सांभाळत बसायची पध्दत घाणेरडी आहे एवढं माझ्या लक्षात आलेलं आहे. ती पध्दत पटली तर सारखं स्वतःच्याच विरुध्द वागावं लागतं.

सारखं काही ना काही साजरं करत जगायच्या रोगट पध्दतीला नकार द्यायचाय मला.

२. इराक -

ज्या विषयावर खूप मतभेद शक्य नाहीत असे विषय कलाक्षेत्रात इंटरेस्टिंग होत नाहीत. मानवी मूर्खपणाला खूप वाव असायलाच हवा!

स्वतःला भारतीय म्हणायला इथं सगळेच तयार आहेत, पण स्वतःला हिंदू म्हणवून घ्यायला काही कोटी लोक तयार नाहीत -- त्याचं काय करायचं?

कुठलीही आयडेंटिटी फिक्स करायला गेलं की हिंसेची बीजं आलीच!

वाघावर एकवेळ स्वार होता येईल पण उतरणं अवघड असतं!

माणसाचं मनच भांडवलवादी आहे, ते सतत काही ना काही जमा करत असतं -- अन्याय, सुख, दुःख, मान, अपमान, वगैरे!

३. बुद्धिबळ आणि झब्बू -

नुसते मनांचे सहवासही उत्सव होऊ शकतात.

तुला सांगतो, तुझ्या डोळ्यांतल्या तीव्र स्त्रीत्वानं मला अगदी घट्ट पकडून ठेवलं आहे. हा नजरेच्या स्पर्शाचा परिणाम. पण प्रत्यक्ष स्पर्श असतो त्याचेसुध्दा इतके हजारो प्रकार आहेत की काही विचारू नकोस ! एखाद्या ख्याल गायकीसारखं सुचत जातं एकेक. मैफल द्रुत लयीत कधी गेली ते कळतही नाही.

ज्ञानामुळं अधिकाधिक सूक्ष्मपणा येतो. सगळ्या पध्दती अधिकाधिक गुंतागुंतीच्या आणि सुंदर होत जातात.

' मी तुझं चुंबन घेतोय' किंवा ' मिठीत घेतोय' – हीच लेव्हल ते गाठतात आणि ते बायकांना नाही चालत – बाहेर कितीही पॉप म्यूझिक असलं तरी इथे शास्त्रीय संगीतच लागतं! नोमतोम, रागविस्तार -- हे सगळं पद्धतशीर व्हावं लागतं --

ज्याला स्वतःच्या वागण्याबद्दल गुप्तता ठेवावी लागते तो इतरांबद्दल संशयी आणि सावध असतो.

४. जणू काही वास्तव –

सगळी दुःखं, वेदना, संघर्ष, हिंसा यांचा उगम या मेंदूच्या नियंत्रण-ताणातून होतो.

एकमेकांपेक्षा वेगवेगळे विचार आणि वेगवेगळे स्वभाव तर असतातच! प्रॉब्लेम्स निर्माण व्हायला तेवढं पुरेसं आहे! प्रॉब्लेम्सशिवाय कुणाला जगताच येत नाही!

पराभव पचवता येणार नाही.  आपण विजयाला चटावलेले आहोत.

सगळे धर्म सतत मानसिक भाषेत बोलत राहिले! म्हणजे -- प्रेम, भीती, व्देष, हाव, हिंसकपणा, वगैरे.

काय काय कळावं असं माणसाला वाटत असतं. काळाच्या ओघात त्याला कळत जातं की काही कळायची गरजच नसते.

वास्तवाचे स्वरूप जाणून घेण्याची इच्छा हाच कला, तत्त्वज्ञान आणि विज्ञान यांना एकत्र आणणारा दुवा आहे.

एकच गुरुकिल्ली अशी सापडली पाहिजे की सगळे संघर्ष गळून पडतील.

पाच ॲब्सर्ड नाटके -

१. दिनकर पुरोहिताचा खून -

तुमचा लवकरच खून होणार आहे आणि हे तुम्हाला माहीत आहे, असं समजून मुलाखत घेतो मी तुमची.

२. एक गगनभेदी किंचाळी -

चांगलं म्हटलेलं पेलत नाही तुला.. लगेच वाहवत जातेस तू...

३. घोकंपट्टी -

जनरली माणसं एकमेकांशी हलकटपणानंच वागतात हे मला समजलेलं आहे. याचे तपशील किती भरायचे डोक्यात ?

माणसाचं मन म्हणजेच आंतर्विरोध ही साधी गोष्ट तुम्हाला समजू शकली नाही - आयुष्य संपत आलं तरीही!

अमेरिकेचे अध्यक्ष माझ्याहून खूपच मोठे ठरतात, कारण माझ्यापेक्षा खूपच प्रचंड विसंगती ते पेलतात !

लोक काय करतात, मी तंबाखू सोडली, मी तंबाखू सोडली -- असं म्हणत मानसिकदृष्ट्या सोडतच नाहीत तंबाखू!

सोडायचं पण मनानं धरून ठेवायचं मग काय अर्थ आहे?

४. गोळ्या काढलेलं पिस्तुल -

माझा खून होईपर्यंत माझा रोल आहे.

आई वारलेली दाखवायची आणि लगेच प्रेमगीत घ्यायचं -- असं करता येत नाही. गोष्ट कितीही बनावट चालते, पण सातत्याचा नियम पाळावाच लागतो.

माणूस हा मुळातच एक खोटा, अन्याय करणारा किंवा अन्याय सहन करणारा प्राणी आहे. आपण शक्यतो अन्याय करणाऱ्याच्या भूमिकेत असावं, असं माझं एक आपलं मर्यादित तत्वज्ञान आहे.

सूड, क्रोध, प्रेम, सहानुभूती -- अशा सगळ्या मनाच्या सवयी लक्षात घेऊनच रचावी लागते गोष्ट! जगण्याची ही फक्त एकच पध्दत उपलब्ध आहे का, हा प्रश्न आपण प्रत्यक्ष जगतानाही विचारात नाही, मग गोष्टीत का विचारावा !

५. ट्रायल –

हे नाटक अनुवादित असल्याने अशी वाक्ये इथे अप्रस्तुत ठरतात.

नाणेफेक आणि इतर ५ नाटके -

१. ए आपण चहा घ्यायचा? -

कितीही मोठा आवाज परवडतो पण माणसाचा त्रासिकपणा मिसळलेल्या आवाजाइतकी घाणेरडी गोष्ट जगात कुठली नसेल.

माणसं आवडीनिवडी फिक्स करत जातात ! खाद्यपदार्थ, त्यांच्या चवी, कपडे, त्यांचे रंग, एवढंच काय, विचार कुठले आवडतात ते पण फिक्स करत जातात! अरे बाबांनो, जितकं जास्त फिक्स होत जाल तितकं दुःख वाढवून घ्याल आयुष्यात! पण ऐकणार नाहीत! आपल्या आपल्या कामात खूप हुशार होतात पण जगण्याच्या कामात ढ !

लोक म्हणतात, खून करणं, हाणामारी करणं वगैरे असंस्कृतपणाची लक्षण आहेत -- आणि सुसंस्कृतपणाची लक्षणं म्हणजे ही --आपली चाललीयत ती --हळूहळू सडत राहणं म्हणजे सुसंस्कृतपणा -- प्रत्येक प्रश्न विचार करकरून पिसत राहणं आणि हळूहळू सडत राहणं --

मन सतत शून्यावर राहीलं पाहिजे.

२. धागेदोरे -

पारंपरिक सकाळ होते आहे. पारंपरिक ऊन पडत जाणे.. पारंपरिक सनई वगैरे... पारंपरिक धोंडी पारंपरिक साफसूफ करतो आहे.....

३. नाणेफेक –

भावना कमी म्हटल्यावर विचार जरा जास्त येणारच!

आपल्या विचाराच्या कक्षेत येणाऱ्या शक्यता या सगळ्या शक्यता आहेत असं समजायचं काही कारण नाही.

लोकशाहीइतका मुत्सद्दी प्रकार कुठं नसेल!

माणूस स्वतःचे निर्णय बेधडकपणे घेत असतो. पण आपल्याला आपुलकी वाटणाऱ्या दुसऱ्या माणसांचे निर्णय घ्यायला घाबरतो.

४. सध्या तरी शेवट गोड –

सध्या मी तुझं कोणतंच बोलणं अंतिम धरून चालत नाही.

सततच कल्पनाशक्ती सळसळती ठेवून वागावं लागेल.

५. सामसूम –

आदर्शवादी असण्यातही शरीरातली रसायनं कारणीभूत असतात!

तू नं सध्या एक ठराव -- सारखं चकित होत बसायचं नाही!

अन्याय दिसला की चवताळणं, धावून जाणं हे जर खरं असतं ना तर सगळीकडं सारखी धावत चाललेलीच माणसं दिसली असती !

६. झालं गेलं विसरून जाऊ (क्लॅरिटी) -

भाषा काही एखादी विचारसरणी लक्षात घेऊन तयार होत नाही! आणि या देशात इतकी गरिबी असूनही आपल्या फायद्याचं काय हे बहुसंख्यांना न कळणं हे नशीबच नाही तर काय! एक पगारवाढीचे करार सोडले तर महत्त्वाचे विषय काय, तर -- विचारस्वातंत्र्य आणि अभिव्यक्तिस्वातंत्र्य! कुणाला गरज असते यांची?...मुख्य काय?

वस्तू (७ दीर्घांक) -

१. बुद्धिबळ आणि झब्बू -

विवाहपूर्व सेक्स हवाच म्हणे नाहीतर घरात एखादं वाद्य वाजवून बघणाऱ्याला एकदम एखाद्या ऑर्केस्ट्रात वाजवायला सांगितल्यासारखं होतं.

विशेषत: हे असं गोलागोलांचं डिझाईन असलं ना की साडी नेसण्याच्या पद्धतीमुळे ते गोल कुठंही येऊ शकतात. कुठंही आले तरी ते करेक्टच वाटतं, हे कसं काय? पण तुझे तर करेक्टच आलेत म्हणा.

२. डावेदार -

प्रतारणेचं ओझं नकोय मरताना!

३. मन -

शब्दांची गर्दी होणं, गोंधळून जाणं, वेड होणं, आपल्याला जे कळतंय तेच अंतिम सत्य आहे आणि तेच बहुजनहिताचं आहे असं वाटणं हेच जिवंतपणाचे लक्षण आहे.

एका विचाराचा तथ्यहीनपणा कळला काय आणि दहा लाख विचारांचा तथ्यहीनपणा कळला काय काय फरक असणार आहे! शून्य ते शून्य!

परिस कसा टच करेल त्याचं सोनं करतो, तसं माझं माईंड! टच करेल त्याचे प्रश्न तयार करणारं!

खरंतर मी थकलोय.. सतत हा डोक्याचा कारखाना चालूच! याच माईंडनं पुनर्जन्म होईल? नकोच वाटतोय? दुसऱ्या जरा चांगल्या माईंडनं चालेल !

यशस्वी होणाऱ्या खूप लोकांना माईंड चांगलं मिळालेलं असतं याबद्दल मला शंकाच नाही ! मग त्यांचं काय कर्तृत्व?

मला खूप छोटं जग हवंय -- खूप माणसं, खूप प्रसंग नकोयत त्यात ! एखाद्या धूमकेतूसारखं बाहेरनं काही येऊन माझ्या जगावर आदळू नये, असंच मला वाटत असतं! पण वाटून उपयोग?

एका ठराविक वयानंतरही केस काळे राहिलेली माणसं क्रूर असतात, असं चिनी अंगलक्षण सांगतं म्हणे! कारण त्यांना दुसऱ्यांची काळजीच नसते, असं त्यांचं म्हणणं!

४. नातं -

खरं तर त्या माणसाचे आभारच मानते मी मनातनं... मला हवा होता तसा पुरूष तू नाहीस हे कळून आलं मला त्याच्यामुळं...बरं झालं, त्याला वाटमारीचा हेतू सोडून ही वेगळीच इच्छा झाली

५. निर्मिती -

वरवर सरळ, साध्या दिसणाऱ्या गोष्टी एखाद्या भयानक टोकाकडे नेत असतात. वरवर कंटाळवाण्या दिसणाऱ्या गोष्टींतून एखादा खूनही आकाराला येत असतो.

वातावरणातली भयानकता फक्त दबा धरून असते... आणि मग एकच क्षण असा येतो की, घडून गेलेल्या गोष्टींचे वेगळेच अर्थ दिसायला लागतात.

हसणाऱ्या व्यक्ती निःस्वार्थी, नि:स्पृह वाटतात. हा आयुष्यातला सर्वात मोठा धोका आहे…

६. प्रेमच म्हणू याला हवं तर -

ट्रूथ रिपीटेड इज अ लाय !

आचार्य रजनीश म्हणतात की विनोदाशिवाय हसा ! हसण्यासाठी विनोदाची गरज नाही !

७. वस्तू -

कन्फ्युजन म्हटलं की मनाचा कणखरपणा जातो, मिळमिळीतपणा येतो.

खुल्लम खुल्ला (एकांकिका संग्रह) -

१. बस –

नावांचा माणसांवर थोडाफार परिणाम होत असावा. अमुक एका माणसाचे नाव हे नसून दुसरं असतं, तर तो असाच असता असं वाटत नाही.

२. डावे -

आपापल्या विचारसरण्या घेऊनच जातात सगळे विद्युतदाहिनीत!

३. इतिहास -

रस्त्यावरून चालताना पायांखाली स्वच्छ मोकळा रस्ता असला तरी पायांवर अपमानित देह आहे त्याचं काय?

४. खुल्लम खुल्ला -

ज्याच्यावर भाळून केलं लग्न तोच आयुष्यभर प्रॉब्लेम होऊन बसलाय.

५. संसाराणूपेंडघार -

तू रागावलीस की माझ्या तळपायात धडधडायला लागतं.

६. सत्य -

स्वतः शिवाय दुसऱ्या कुणालाच माहीत नसलेले आपले गुन्हे क्षम्य असतात की गुन्ह्याच्या अपराधी जाणिवेचा त्रास हेच त्याचं शासन असतं?

७. सेक्स -

प्रत्येक वेळी स्त्री शरीरानंच सामील झाली पाहिजे, असं काही नसतं. नुसते मनांचे सहवासही उत्सव होऊ शकतात.

८. स्थळ दिवाणखाना -

महिन्याला दोनचार अपमान या पगारात परवडतात.

माझं समजा बावीस हजार एकशे सदतीस एकूण प्रश्नांचं आयुष्य आहे! मी आत्ता पंधरा हजार पाचशे त्र्याणवव्या प्रश्नावर आहे! आणि सध्या मला सात महत्त्वाचे प्रश्न आहेत! त्यांचं महत्त्वच कसं जोखायचं? समजा प्रश्न नंबर तीन हा सगळ्यांत महत्त्वाचा आहे -- मग मी माझ्या उपलब्ध वेळातला जास्त वेळ त्याला द्यायला नको? प्रश्न नंबर दोन किंवा सातच चुकून जास्त वेळ खाऊन जातो!

स्वतः राजकारण करणं किंवा राजकारणावर प्रभाव टाकायची क्षमता असणं या दोनच खरं तर सर्वात आदरणीय गोष्टी आहेत.

शब्दांची गर्दी होणं, गोंधळून जाणं, वेडं होणं, आपल्याला जे कळतंय तेच अंतिम सत्य आहे आणि तेच बहुजनहिताचं आहे असं वाटणं -- हेच जिवंतपणाचं लक्षण आहे.

सत्याचं फार बिनचूक वर्णन लक्षात यायला लागणं म्हणजेच वेडेपणा!!

एका विचाराचा तथ्यहीनपणा कळला काय आणि दहा लाख विचारांचा तथ्यहीनपणा कळला काय - काय फरक असणार आहे ! शून्य ते शून्य!...

कसली आलीयेत तत्त्वं ! सर सलामत तो तत्वं पचास!

९. वेषांतर -

जगायला सारखं प्रोत्साहन कशाला हवंय तुला ! तुझं जगणं चांगलंय, तुझं जगणं चांगलंय -- असं सारखं दुसऱ्यांनी म्हणायला कशाला हवंय!

१०. विरहवेदना -

मला तर वाटतंय की आपण फक्त एक तपशील आहोत एकूण परिस्थितीचा. परिस्थितीच फक्त जगत असते.

एखाद्या भव्य मंडपात लग्न सोहळा चालू असल्यासारखा वेदनेचा उत्सव माजवायचाय तुला --

कविता म्हणजे पैसे मिळवायच्या कामात अडथळे आणणारी वस्तू.

११. एकत्र -

माशा मारल्यापेक्षा गप्पा मारलेल्या बऱ्या की! अहो कुणाचा जीव घेतल्याचं पाप तरी नाही त्यात --

म्हणजे च्यायला जगण्याच्या पद्धती दोनच दिसतात एक म्हणजे प्रश्न पडू देत जगणं आणि दुसरी म्हणजे प्रश्न दडपत जगणं!

१२. मासोळी -

भयानक महाखुनी आपल्या दाराशी उभे आहेत – समजा एक लाख अमरीश पुरी, दोन लाख परेश रावल!

ओळख परेड (एकांकिका संग्रह) -

१. दंगल -

सगळे प्रश्न एकत्रितपणे एका क्षणात पाहता आले पाहिजेत! आणि पाहताक्षणी ते नाहीसे झाले पाहिजेत!

२. ओळख परेड-

स्वस्थ बसणं हे स्वतःचं महत्व माजवणारं बोलणंच आहे एक प्रकारचं!

जन्माला येताना काही माणूस ठरवून येत नाही की, आपल्याला खून करायचाय म्हणून किंवा आपल्याला खून होऊन मरायचेय म्हणून!

३. समस्या सोडवण्याचा सराव -

फक्त समस्यांची वेगवेगळी रूपं हीच आपल्या वेगवेगळ्या आयुष्यांची वैशिष्ठ्य म्हणायची का?

मुलींनी जर पुरुषांच्या दिसण्याला महत्त्व देऊ नये असं तुमचं मत आहे तर मग तुम्ही स्वतः सुंदर मुलीवर प्रेम करायचा प्रयत्न का करता?

नुसतेच कुठले विचार जिंकतात याच्यावरच काही आयुष्य चाललेलं नसतं.

४. समुदाय -

अन्यायाचा प्रतिकार जेव्हा कमीत कमी वेळात करायचा असतो आणि ताबडतोब न्यायाची प्रस्थपना करायची असते तेव्हा संतापण्याशिवाय दुसरा मार्ग नसतो.

५. अस्तित्व -

आपल्याला जे अनुभवापासून ज्ञान मिळतं त्यात एक संगतवार घटनाक्रम असणार. बाहेरच्या लहरी शरीरात-- म्हणजे मेंदूकडे जात असणार. आणि ते ज्ञान एका विशिष्ट ठिकाणी मुद्रित होत असणार. या प्रक्रियेचा आम्ही शोध घेत आहोत. जेव्हा हे पूर्ण होईल तेव्हा ज्ञानाच्या रेकॉर्डस् निघतील. आणि त्या मुद्रित ज्ञानलहरी मेंदूत सोडण्याची सोय होईल. मेंदूची क्षमता वाढवण्याचे मार्ग सापडतील. आणि मग शाळा, शिक्षक, प्राध्यापक वगैरेंची जरूरच लागणार नाही. यंत्रात डोकं ठेवलं की एकेका वेळी एकेका विषयाचा प्रगाढ पंडित करता येईल प्रत्येकाला. सगळी मानवजात प्रचंड ज्ञानी होऊन जाईल.

६. स्टालीन-

का जास्त लोकांपेक्षा कमी लोक बिनमहत्त्वाचेच असतात?

एक मिनिट हे एक वर्षापेक्षा महत्त्वाचं असतं का? दहा वर्षे ही शंभर वर्षांपेक्षा महत्त्वाची असतात का?

ज्या ध्येयाच्या आड इतकी माणसं येतात ते ध्येय बाळगावंच का माणसानं? माणसांच्या संख्येला काहीच महत्त्व नाही?

परिस्थिती माणूस घडवते हे जितकं खरं आहे तितकंच माणूस परिस्थिती घडवतो हेही खरं आहे. विनाशसुद्धा निर्मितीरूप असू शकतो.

७. ट्रेलर -

मी शब्दांपेक्षा कृतीवर जास्त भर देणारा माणूस आहे. माझ्या कृतीचा अनुभव न घेता माझ्या शब्दांवरून माझ्याबद्दल मत बनवू नका.

सगळी दुनिया समजल्यासारखे मतं सांगतात हरामजादे! मतं सांगायला भडवे सदोदित तयार!

८. खडक -

कुठल्याही खऱ्या गोष्टीत कसलाही 'पणा' नसतो; तिचं उभं राहणं किंवा अस्तित्वात असणं हे कुठल्याही कण्यावर अवलंबून असत नाही.

९. जोडपी -

ही नाती साली सगळी निश्चितता निर्माण करतात. आपल्या नात्यांत आपल्या मर्यादा गोठलेल्या असतात.

१०. ऑफिस -

खरा परमेश्वर तो आतला लेका! तू नुसता देव्हाऱ्यातला परमेश्वर! स्वतःच उदबत्ती लावायची आणि पडणारी राख बघत बसायचं!

११. रिलीफ -

आपल्या आवडीनिवडी आणि आपले फायदे-तोटे यांच्या व्यतिरिक्त कोणी करू शकतो विचार? मुळात असा विचार असू तरी शकतो का?

----

चंप्र त्यांच्या काही काही नाटकांतून आत्ता नाटक सुरू आहे याचं भान प्रेक्षकांना देत राहतात. त्यांचा स्त्रियांच्या मानसशास्त्राचा देखील अतिशय सूक्ष्म अभ्यास आहे हे जाणवत राहते. 'खलास' हा शब्द त्यांना प्रिय असावा, तो बऱ्याचदा संवादांत डोकावतो. 'नुस्खे', 'भागधेय', 'गुंताडा', 'लटांबर', 'सेन्स ऑफ वंडर', 'जागतिक निर्लज्ज साले' असेही काही हटके शब्द/शब्द प्रयोग आपली शब्द संपत्ती वाढवतात, भाषा समृद्ध करतात.

चंप्रंची व्यक्त व्हायची स्वतःची एक चंप्र स्टाईल आहे. नमुन्यादाखल काही संवाद/वाक्ये इथे प्रस्तुत करतो आहे -

- कुठलीही कपॅसिटी, न वापरता पडून राहू नये!
- ती स्वतः तशी भयंकर सूक्ष्म आहे.
- ते स्मूथनेसला टोकरणारे ठरले असते.
- हा निर्णय घेताना माझ्या मनात वैचारिक घर्षण झालंच नाही असं नाही.
- मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळणे आणि एकूण पुस्तकांची उपलब्धता नष्ट होणे हे एकाच वेळी घडेल असे दिसते.

चंप्र एके ठिकाणी म्हणतात - "आपले विचार आणि भावना या काही स्नायूपेशींतून उगम पावतात आणि आपल्या शरीरातली रसायनं त्यांचं नियंत्रण करतात." हा लेख वाचत असताना आपल्या मनात झालेल्या विचार - भावनांच्या

निर्मितीकडे जर आपण डोळसपणे पाहू लागलो, त्यापाठी काही रसायने कार्यरत असतात याची देखील दखल घेऊ लागलो तर अशी लाभलेली सजगता मानवी जगणे सुकर व्हायला मोठी मदत करणारे ठरणार आहे. कलेच्या माध्यमातून स्वतःच्या मनावर ताबा मिळवून देणारे चंप्रंचे साहित्यातले हे योगदान श्रेष्ठ आहे. किंबहुना, पुलित्झर अथवा साहित्यातल्या नोबेलच्या तोडीचे आहे, नव्हे काय?

चंप्र सरांनी त्यांच्या नाटकांमधून मांडलेल्या मनोअभ्यासाचे सर्वांनी चिंतन केले पाहिजे. एखादा विचार दीर्घकाळ धरून ठेवणे महाकठीण. आपण विसरतो आणि आपण काय विसरलो ते देखील विसरतो. विचारधनाचे असे हे डॉक्युमेंटेशन म्हणूनच तर करावेसे वाटले!

- डॉ. गिरीश रांगणेकर

काल गिरीश रांगणेकर यांनी इथे चंप्र देशपांडे यांच्या नाट्यकृतीतून काही संवाद देऊन उत्तम आढावा घेतला होता. याच आढाव्यात मी 'ओळखपरेड' पुस्तकासाठी लिहिलेल्या प्रदीर्घ लेखाचाही उल्लेख त्यांनी केलाय.

तो मूळ प्रदीर्घ लेख जिज्ञासूंनी वाचावाच पण तत्पूर्वी त्या लेखातील एक भाग इथे द्यायला हरकत नाही. तो पुढीलप्रमाणे -

------------------

खुल्लमखुल्ला व ओळखपरेड या संग्रहातील २३ एकांकिका व ९ नाट्यकृतींचे वाचन केल्यानंतर चंप्रंच्या नाट्यलेखनाची मला जाणवलेली वैशिष्ट्ये खाली नमूद केली आहेत -

०१) आपणाकडे नाट्यात्मकता मोजण्याचे जे काही मापदंड परंपरेने चालत आलेले आहेत, त्या रूढ मापदंडांत मोडणाऱ्या या संहिता नाहीत.

०२) त्यांच्या कोणत्याही एकांकिकेतील वा नाटकातील कथानक हे अनावश्यक बाह्य घटनांची मागणी करीत नाही.

०३) किंबहुना मानवी आयुष्यातील दैनंदिन जगणे जगत असताना कोणत्याही व्यक्तीला ज्या प्रश्नांना सामोरे जावे लागते अशा प्रश्नांचा सखोल उहापोह चंप्रंच्या नाटकांतून/ एकांकिकेतून केलेला असतो.

०४) तो प्रश्न कथानकाच्या मध्यवर्ती सूत्रासारखा असतो. तसेच त्या प्रश्नाच्या आजूबाजूचे, वरचेखालचे सर्व प्रदेश साकल्याने या नाट्यकृतीतून दृगोचर होत जातात. हे प्रदेश कोणत्याही स्थलकालाशी संबंधित नसतात तर ते अनेकदा मानवी मनाच्या अंधाऱ्या वा ज्यांचा फारसा विचार केला जात नाही म्हणून दुर्लक्षित केलेल्या मानसिक अडगळीतील असतात.

०५) कोणतीही पात्रे म्हणजे विशिष्ट स्वरूपाची एकच एक अशी व्यक्तिमत्वे नसतात. त्यांना त्यांची त्यांची म्हणून काही खास अशी शारीर वा सौंदर्यात्मक वैशिष्ट्ये नसतात. म्हणजेच त्यांची पात्रे ही ठरावीक नायक अथवा नायिका नसतात किंबहुना ती पात्रे एन्टी कॅरेक्टर असतात.

०६) रूढ नाट्यमय घटना किंवा सुरुवात, मध्य, शेवट अशी पारंपरिक पद्धतीची नाट्यरचना चंप्रंच्या नाटकात दिसून येत नाही. किंबहुना असे म्हणणे अधिक योग्य ठरेल, की या नाट्यरचनेच्या तंत्रात न अडकतादेखील त्यांनी

निवडलेल्या नाट्यविषयाच्या अंतरिक सुरचनेमुळे ते महत्त्वाचे व वैशिष्ट्यपूर्ण नाटककार ठरतात. ते तपशीलवार व्यक्तिचित्रणाची काळजी घेत नाहीत. अमुक एक पात्र सुष्ट व अमुक  एक पात्र दुष्ट असे त्यांच्या नाटकात नसते. ते त्यांनी निवडलेल्या प्रसंगाकडे अत्यंत तटस्थतेने पाहतात. पात्रांच्या स्वभावचित्रणापेक्षा त्या त्या प्रसंगातील माणसांच्या जगण्यातील प्रश्नांचा, त्यातील प्रक्रियेचे अंतरिक भान त्यांना नाटककार म्हणून महत्त्वाचे वाटते.

०७) त्यांच्यासाठी सर्जक साहित्य वा नाटक ही चंगळ नसून जगण्याच्या आकलनाची गंभीर प्रक्रिया असते. त्यांनीच म्हटल्याप्रमाणे, त्यांची पात्रे ही कोणत्या ना कोणत्या स्वभावबद्धतेत असतात, त्यांनी निवडलेला नाट्यप्रसंगातील प्रश्न अथवा पात्रांच्या जगण्याच्या प्रक्रियेचे भान देणारे समग्रावधानी संवाद हे त्यांचे मुख्य भांडवल असते. एक प्रकारचे प्रमेय मांडून ते लिहीत असले तरी, स्वतःच्या वैयक्तिक सुखदुःखांचे अनुभव प्रेक्षकांच्या वा वाचकांच्या मनात परावर्तित करण्यासाठी चंप्र लिहिताना दिसत नाहीत. त्यामुळे अनुभवांचे संचित, शोध या संकल्पना त्यांच्या नाटकातील आशयसूत्रांबाबत कामाच्या ठरत नाहीत.

०८) अनुभवाची समृद्धता, व्यक्तिमत्वाची समृद्धता, व्यासंग यांचे महत्त्व मान्य केले तरी त्यात सर्जकता असतेच असे नाही. केवळ या गोष्टी आहेत म्हणून कलाकृती महत्त्वाची ठरत नाही. सर्जकता म्हणजे मानवी मनाच्या अराजकतेचे एकात्म भान. आणि हे भान चंप्रंमधील नाटककाराकडे असल्याने कोणतेही बाह्य अवडंबर न माजवता केवळ अंतरिक एकात्म भानामुळे त्यांची नाटके सर्जक आणि म्हणूनच महत्त्वाची ठरतात.

०९) कोणत्याही रूढ नाट्यमय घटनांचा आधार न घेता, दैनंदिन जगण्यातील एखाद्या घटनेचा, प्रसंगाचा, त्यातील विविध स्तरांचा विचार करून त्यांचे हळुवारपणे सूक्ष्म पापुद्रे उलगडून दाखवणे हे चंप्रंच्या एकूणच लिखाणाचे वैशिष्ट्य आहे. भावना आणि विचार, विचार आणि विचार, उक्ती आणि कृती यातील द्वैत त्यांना नाटककार म्हणून भावते. त्या त्या विशिष्ट प्रसंगातील भान प्रक्रिया उलगडून दाखवतांना त्या त्या प्रश्नांच्या संदर्भातील त्यांनी निवडलेला कोणताही नाट्यप्रसंग हा नंतर केवळ एक पार्श्वभूमी म्हणून शिल्लक राहतो. त्या घटनेतील तपशीलांपेक्षा जगण्याचं, सभोवतालच्या वास्तवाचं भान, एक प्रकारचे नवीन आकलन, शहाणीव  चंप्रंची नाटके देतात.

१०) हे भान किंवा आकलन केवळ त्या त्या नाट्यप्रसंगापुरतं मर्यादित नसतं तर एकूणच जगण्याच्या संदर्भातील 'सत्याचे श्रेयस' असते आणि हे श्रेयस समग्रावधानी असते. हे समग्रावधानी भान कुठल्याही अनुभवाला Justify करत नाही किंवा Condemn देखील करत नाही. ते आशयपूर्णतेकडे जाते आणि तोच नाटकाचा उत्कर्ष बिंदू (Climax) असतो. रूढ पारंपरिक 'नाट्यात्म विधान' (Dramatic Impact) देखील चंप्रंची नाटके देताना दिसत नाहीत, ती पात्रांच्या समस्येवरील उपाय अथवा त्यांच्या प्रश्नांचं निराकरण सांगत  बसत नाहीत. याबाबतीत केवळ एकाच नाटकाचा अपवाद करणे आवश्यक आहे आणि ते नाटक म्हणजे 'जणू काही वास्तव'! या नाटकात नाटककार चंप्र उपाय सूचवतात कारण, ते नम्रता या पात्राला (म्हणजेच नाटककारालादेखील) गवसलेले कार्यात्मक सत्य आहे, व ज्यामुळे एकूणच मानवी संघर्षांचं मूळ नष्ट होईल अशी तिची धारणा आहे.

११)  'जणू काही वास्तव' तसेच  'घोकंपट्टी' या नाटकांत वास्तव तसेच अ-वास्तवातील आतंरिक सुसंगती असलेल्या तुकड्यातुकड्यांच्या दृश्यांची रचना, भास आभासात्मक पात्ररचना, लोकप्रिय अशा विविध गाण्यांचा तसेच हिंदी

चित्रपटातील लोकप्रिय व्यक्तिरेखांचा जाणिवपूर्वक वापर चंप्रंनी केलेला आहे. या प्रकारची नाट्यरचना ही त्या त्या नाटकातील आशयाला पूरक ठरणारी आहे.

१२) मराठी नाटकात प्रेक्षकांना एक लिंक लागतेच. ही पात्रे, यांचे असे झाले, मग असे झाले… अशी! बहुसंख्य प्रायोगिक म्हटली जाणारी नाटकेही हे बंधन स्वीकारताना दिसतात. चंप्रही खऱ्या-खोट्या पद्धतीने बऱ्याचदा हे स्वीकारतात. कधी ते स्वीकारल्याचा आभासही तयार करतात.

१३) सुरुवातीच्या काही एकांकिका व नाटकांचा अपवाद वगळता नाटककार म्हणून चंप्र दिग्दर्शकाला फारशा सूचना देत नाहीत. त्यांच्या नाटकातील कंस जर पाहिले तर त्यांची संख्या जवळपास नगण्य असल्याचे जाणवेल. तसेच ते नेपथ्यरचना, प्रकाशयोजना वा इतर तांत्रिक बाबतीत देखील फारसे आग्रही दिसत नाहीत. कारण त्यांच्या नाटकातील शब्द व त्यातील मोकळ्या जागांमधील अर्थ नीटपणे पोहोचले तर नाट्य प्रेक्षकांपर्यंत पोहोचायला अडचण येत नाही, याची त्यांना जाणीव असते. ही नाट्यमयता मराठी रंगभूमीवर मान्यता प्राप्त असलेल्या ढोबळ नाट्यमयतेपेक्षा भिन्न आहे.

१४) चंप्रंच्या संहितेत जर सुधारणा करण्याची आवश्यकता भासली आणि चंप्रंना जर मुद्दा पटला तर ते अत्यंत प्रामाणिकपणे दिग्दर्शकाला सहकार्य करणारे नाटककार आहेत. त्यांच्या मते कोणतीही कलाकृती कधीच परिपूर्ण नसते. त्यामुळे ते त्या क्षणाला, किंवा त्या परिस्थितीत आवश्यक असेल तितक्या सुधारणा करून देतात. असे बदल केल्याने नाटकातील आशयाची प्रतवारी कमी होत नाही. नाट्यरचना कधीच परिपूर्ण होत नसली तरी तिच्यातून येणारे आकलन मात्र परिपूर्ण असू शकते, असे चंप्र मानतात.

१५) त्यांच्या नाटकातील पात्रांसारखीच त्यांची नाट्य भाषा ही खास चंप्रंच्या शैलीची असते. चंप्रंची शैली म्हणजे पात्रानुसार त्यांची भाषा जरी ढोबळ मानाने बदलत नसली तरी त्यात रचनेची वीण असते, ती समजून घ्यायला, त्यातील अर्थांच्या विविध छटा समजून घ्यायला, ती पात्रे जिवंत करण्यासाठी दिग्दर्शकाला, कलाकारांना विशेष प्रयत्न करावे लागतात. आणि भाषेची ती वीण उकलल्याशिवाय चंप्रंची नाटके 'दिसत' नाहीत. भाषा, शब्द यांबाबतची एक प्रकारची प्राथमिक तयारी असावी लागते.

१६) चंप्रंची नाटके कोणा विशिष्ट पात्रांची नसतात किंवा ती एक प्रकारे लेखकाचीच भाषा बोलतात असे अनेकजण म्हणत असतात परंतु त्यात फारसा अर्थ नाही कारण चंप्रंना स्वतःला विविध प्रकारच्या व्यक्तिमत्वांच्या निर्मितीत रस नसतो तर त्या व्यक्तींच्या मनांत चाललेल्या घडामोडींशी, त्यांतील नाट्याशी रस असतो…त्यांची भाषादेखील त्या त्या पात्रानुसार थोडीफार बदलताना दिसते.

१७) त्यांच्या लेखनाचा विचार करताना त्यांची कलेबाबतची संकल्पना अधिकाधिक विकसित होत असल्याचे लक्षात येते. माणसातील दुःख, संघर्ष, हिंसा यांचे मूळ कारण मनाच्या अराजक अवस्थेत असून त्यापासून सुटका करणे कलेचे उद्दिष्ट असते याचे भान त्यांना आहे. समग्र भानात मनाची एकविध जाण अभिप्रेत आहे. त्यांच्या दृष्टीने तोच मोक्ष आहे. मुख्य म्हणजे हा मोक्ष आध्यात्मिक नाही तर शारीरिक आहे असे आग्रही प्रतिपादन 'जणू काही वास्तव' मधील नम्रता या पात्राचे आहे.

१८)  नाटकातील पात्रांच्या जगण्याच्या आपापल्या तर्करचना असतात. त्यांच्या संबंधांची ही नाटके असतात. भावनिकता कमी असते. कुठल्याही पात्राची अथवा पात्रसमूहाची बाजू घेतलेली नसते. परंपरागत नीतीकल्पनांचा, धर्मकल्पनांचा, अस्मितांचा पुरस्कार नसतो. कोणत्याही परिवर्तनाच्या हेतूने लेखन केलेले नसते. ते स्थितिवादीही नसते. सत्-असत्, चांगले-वाईट, नायक-खलनायक, काळे-पांढरे असे झगडे नसतात. गौरव वा हेटाळणी नसते. संदेश नसतो. समाजमान्य शेवटाचा प्रयत्नही नसतो. काही प्रश्नांच्या संदर्भात पात्रे आपापल्या पद्धतींनी वागतात, झगडतात, तडजोडी करतात, सुखी-दुःखी होतात. या सर्व गोष्टींचे भान व्यक्त होत राहते.
१९) प्रेक्षकांना भारून टाकणे, नाटक अंगावर येणे, उदास वा निराश करणे, मनात अपराधी भाव दाटवून खट्टू करणे अशा प्रकारचा नाट्यानुभव ही नाटके प्रसारित करीत नाहीत. ती आशावादी वा निराशावादी नसतात.
२०) त्यांच्यासाठी सर्जक साहित्य, नाटक वा कला ही चंगळ नसून जगण्याच्या आकलनाची गंभीर प्रक्रिया आहे. जगण्याच्या प्रक्रियेचे भान देणारे समग्रावधानी संवाद हे आपल्या नाटकांचे प्रमुख वैशिष्ट्य आहे, सर्जकता म्हणजे मनाच्या अराजकतेचे एकात्म भान असे ते मानतात. आणि हे भान त्यांच्यातल्या नाटककाराकडे असल्याने कोणत्याही विचारसरणीचे वा इझम्सचे बाह्य अवडंबर न माजवता केवळ आंतरिक एकात्म भानामुळे त्यांची नाटके तपशीलांपेक्षा जगण्याचे, सभोवतालच्या वास्तवाचे समग्रावधानी भान व्यक्त करणारी, शहाणीव देणारी आणि म्हणूनच महत्त्वाची ठरली आहेत.
२१)  मूळ प्रश्न हे मटेरिअलचे किंवा वस्तूरूपाचे म्हणजेच तपशीलांचे नसून इसेन्सेचे म्हणजे मूलद्रव्याचे असतात म्हणूनच रूढ नाट्यलेखन तंत्रामध्ये न अडकता किंवा त्याचा फारसा विचार न करता ते नाट्यलेखन करताना दिसतात. थोडक्यात कसे मांडले आहे, कोणता फॉर्म वापरला आहे यापेक्षा काय मांडले आहे, त्यातील आशय किती मूलभूत स्वरूपाचा आहे याची ते अधिक दखल घेतात. या सर्व नाटकांचा कच्चा माल (मटेरिअल) कल्पित आहे मात्र त्यातील आशय हा जगणे सांगणारा किंवा जगण्याला सखोलतेने भिडणारा आहे.
ही सर्व वैशिष्ट्ये पाहता ही नाटके  'निरुपयोगी' असतात असे म्हणायला हरकत नाही. निरुपयोगी म्हणजे ही नाटके करमणूक करणारी असली तरी त्यात करमणूकप्रधानता नसणे तसेच या नाटकांना सामाजिक-राजकीय परिवर्तनाचे हत्यार म्हणून न  वापरणे इत्यादी भौतिक असे दिसणारे उपयोग सांगता येत नाहीत. परंतु होकारात्मक भाषेत सांगायचे तर, ही नाटके एक, समज-भानयुक्त रिलॅक्सेशन देतात असे म्हणता येईल. यालाच समग्रतेची कला म्हणता येईल.
- गिरीश पतके

कळत-नकळत कविता बोधप्रद होणे
ही कवीची सर्वात मोठी समस्या असते !

Rajesh Sonawane is with रवीन्द्र दामोदर लाखे and Champra Deshpande.

.

चं. प्र. देशपांडे सर

आणि

रवींद्र दामोदर लाखे सर

यांच्या वाङ्.मयीन, वैचारिक पोस्ट

विचारप्रवर्तक असतात.

त्यांच्या विचारांशी तुम्ही भलेही सहमत नसाल ;

पण विचारांचा तळ गाठण्यास या पोस्ट भाग पाडतात, हे मान्य करावे लागेल.

आजकालच्या हायस्पीड टेक्नो काळात खरोखरच ही फार मोठी गोष्ट आहे.

आता तुम्ही म्हणाल, तरूण पिढी अशा पोस्ट वाचते काय?

मी म्हणतो. वाचत नसेल तर, वाचण्याची शिफारस

करूया तुम्ही - आम्ही.

अनेक मान्यवर साहित्यिक, विचारवंत फेसबुकवर सध्या महत्त्वाच्या वाङ्.मयीन, वैचारिक पोस्ट लिहित आहेत, ही चांगली गोष्ट आहे.

नव्या पिढीला आपण असे सकस वाचण्यासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे.

" मला भाषा थोडीफार येतेच. आता मी रोज थोडा गंभीर विचार करणार आहे. म्हणजे मला लेखक होता येईल ! "

" अनुभव असतोच गाठीशी. शिवाय माझा स्वभाव जरा विनोदीही आहे. त्यामुळे, मी लेखक व्हायचे नक्की केले आहे ! "

" मुलांच्या आग्रहामुळे माझ्या चरित्राचं पुस्तक काढलं आहे. ३०० पानांचं आहे. तुम्हाला देणार आहे वाचायला ! "

" माझी बायकोही करते कविता. तिचा पहिला कवितासंग्रह काढलाय. तुम्हाला वाचायला देणार आहे ! "

" आमच्या नात्यातले एकजण खूप विनोदी लिहितात. त्यांचे एक हस्तलिखित मी देणार आहे तुम्हाला वाचायला !अभिप्रायासाठी ! "

" आमच्या एका कर्तबगार नातेवाईकाची पंच्याहत्तरी आहे. हा मी त्यांच्यावर लिहिलेला लेख -- जरा चांगल्या भाषेत द्या ना करून ! "

" दुसऱ्या महायुद्धावरचं एक पुस्तक आहे माझ्याकडे. फार बेस्ट आहे. तुम्हाला देतो वाचायला ! "

" नर्मदा परिक्रमेवरचं एक सुंदर पुस्तक आहे माझ्याकडे. तुम्हाला हवेय का वाचायला ? "

Shailesh Sonar
आताच कल्याणला 'मन' चा प्रयोग पाहून आलोय. चंप्रंच लिखाण तर १९९८-९९ पासून वाचतोय आणि काही एकांकिका करण्याचाही विचार त्यावेळेस केला होता. पण ते काही जुळून आलं नाही. आणि पुढे नाटक करण्याशीही संबंध तुटला...आजचा प्रयोग प्रचंड आवडला. Abhijeet Zunjarrao ह्यांनी हा दिर्घांक केला ह्यासाठी त्यांच अभिनंदन आणि तो खूप उत्तम अनुभव प्रेक्षक म्हणून आम्हाला मिळवून दिल्याबद्दल मनापासून आभार.
#रमेश वाणी कुठे होतात तुम्ही? संधीचं सोनं केलंत. मला जे वाटलं ते तुम्हाला प्रत्यक्ष भेटूनही सांगता आलं. ह्याआधी कुठल्याच नाटकानंतर मी असं कुणाला भेटून काही बोललो नाही. पण, आज मला राहवलं नाही. 'मन'चे अनेक प्रयोग होत राहोत आणि हे नाटक जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचावं. मनापासून शुभेच्छा□□□

AI – artificial intelligence – कृत्रिम बुद्धिमत्ता
त्याला विचारले की बाबा, चांगली कविता म्हणजे काय ? उत्तरादाखल त्याने सविस्तर, उत्तम विवेचन केले. माझ्या आवडीचे एलियट आणि व्हिटमन  या कवींची नावेही उदाहरणादाखल त्यात होती. खरोखरच छान होते उत्तर. पण, एका बाबतीत मात्र आपल्या मराठीपेक्षा वेगळेपणा दिसला. मराठीत कसे, सामाजिक-राजकीय परिवर्तनाची भूमिका असल्याशिवाय असूच नाही शकत चांगली कविता -- ते मात्र त्याने वगळलेले दिसले. तो डेटा त्या यंत्रात भरणाऱ्या कमिटीवर बहुतेक तिथे मराठी माणूस घेतला नसावा !

माझी पुस्तके खालील ठिकाणी विक्रीसाठी उपलब्ध आहेत ---

१

परेश एजन्सी,

अप्पा बळवंत चौक,

पुणे.

फोन -- ८२७५४८५४८५ .

आणि २

पुस्तकवाला अँड कंपनी,

पुणे.

फोन -- ८६२४९७७०२९.

Avinash Kolhe

.

चं. प्र. देशपांडे (जन्म:१९४६) यांची नाटकं वेगळी असतात. काल 'मन' बघितले. खुप वर्षांपुर्वी त्यांचे "ढोलताशे" बघितले होते. 'मन' या एकपात्री नाटकात एक मध्यमवर्गीय मध्यमवयीन विवाहित एका मुलीचा बाप असलेली व्यक्ती केंद्रस्थानी आहे. हा माणूस लोकलने प्रवास करतो, ऑफिसमधील युनीयनमध्ये यथाशक्ती सहभागी होतो आणि तरीही ठार एकटा असतो. त्याला अनेकदा 'कशासाठी जगायचं' हा प्रश्न त्रस्त करतो. नाटकाचा प्रयोग दिग्दर्शक अभिजित झुंजाररावने फार कल्पकतेने उभा केला आहे. खास उल्लेखनीय म्हणजे नेपथ्य (सुमीत पाटील), प्रकाश योजना (श्याम चव्हाण) आणि अभिनय (रमेश वाणी). दोन तासांचा एकपात्री प्रयोगात प्रेक्षकांना खिळवून ठेवणं अवघड आहे. अशा अनवट नाटकाचे निर्माते विजय चौगुले यांचे विशेष आभार.

कालच्या, शिवाजी मंदिर, दादर च्या प्रयोगानंतर आलेला आणखी एक अभिप्राय ---
दुसऱ्यांचा मनाचा विचार करता करता कधी स्वतःच्या मनाचा विचार केलाय का ? खूप प्रश्न ही असतील मनात...या सर्व प्रश्नांची उत्तरं मिळतील नाही मिळतील पण मनात वाहत जाणारा हा प्रश्नांचा प्रवाह कुठल्या दिशेने गेला पाहिजे त्यासाठी नक्की बघा मन
- अभि आगवणे

धर्म, शांतता, संघर्ष आणि हिंसा

“What we call religion is merely organized belief, with its dogmas, rituals, mysteries and superstitions. Each religion has its own sacred book, its mediator, its priests and its ways of threatening and holding people.
Most of us have been conditioned to all this, which is considered religious education; but this conditioning sets man against man, it creates antagonism, not only among the believers, but also against those of other beliefs.
Though all religions assert that they worship God and say that we must love one another, they instill fear through their doctrines of reward and punishment, and through their competitive dogmas they perpetuate suspicion and antagonism.”
― Jiddu Krishnamurti, Education and the Significance of Life

कोणताही धर्म म्हणजे नुसती एक शाब्दिक-वैचारिक ओळख असते. तो एक समूह असतो – टोळी असते. तिचा भाग असण्यात माणसाला सुरक्षितता वाटते. या अशा अलगतेमुळे वेगवेगळ्या धर्मांची माणसे एकमेकांपासून दुरावतात. एकमेकांच्या संघर्षात असतात. कोणत्याही धर्माचे अनुयायी तो तो धर्म जगत नसतात. धर्म हा निर्भय आणि शांत असतो असे म्हटले तर अशी टोळी ही भय आणि हिंसा यांवर आधारलेली असते. याचा अर्थ धर्मच न मानणारे लोक

शांत, सज्जन, शहाणे असतात असा मुळीच नाही. त्यांची सुरक्षिततेची हत्यारे वेगळी असतात, इतकेच. या एकूण अवस्थेमुळेच माणूस जगाची वाट लावत जातो – विध्वंस करत जातो. हे पाहता, मध्येच चार माणसांना बाजूला घेऊन, तुमच्या जगण्यात शांतता नाही, असे म्हणणे हे बालिशपणाचे ठरते. ती तर ते म्हणणाऱ्याच्या जगण्यातही नसते. श्रद्धांनी आणि विचारांनी ‘ वेगळा ‘ जगणारा माणूस अशांतच असतो.

--- ००० ---

रमेश वाणी

या अभिनेत्यासाठी

बघा -- ' मन ' !

लोकवाङमय गृह

[11:07 am, 11/7/2024] +91 98192 45972: ढोलताशे । चं. प्र. देशपांडे । दुसरी आवृत्ती

पाने : ९२ । किंमत : २२५/-

▪ ऑनलाईन खरेदीसाठी लिंक :

https://lokvangmaybooks.in/.../%e0%a4%a2%e0%a5%8b%e0%a4.../

▪ संपर्क : ८४५४०४९०३६ । ०२२-२४३७६०४२

"...माणूस दुःखी होण्याची पद्धत जर जगभर एकच आहे तर त्यातून बाहेर पडण्याची शक्यता म्हणजे धर्म-एकच असला पाहिजे. अनेक धर्म कसे असतील? आणि धर्मात गर्दीचं काय काम? स्वतःला एकटं पाडण्याचं काम प्रत्येकानं स्वतः केलेलं आहे; तसंच तो एकटेपणा टाकणंही प्रत्येकाला स्वतःला करावं लागेल. गर्दी, प्रदर्शन, उन्मत्तपणा यांचा धर्माशी काहीही संबंध नाही..."

[11:36 am, 11/7/2024] CHAMPRA Deshpande:

Ratnakar Mahajan आहे ऐसा देव वदवावी वाणी । नाही ऐसे मनी अनुभवावे ।। -- या ओळींचा साळुंके जो अर्थ सांगतात तो आख्खी गाथा मातीत घालणारा आहे !

माझ्या बाबतीत घडलेला एकच आणि कदाचित एकमेव किस्सा सांगतो. माझे लेखन चोरायच्या फंदात सहसा कुणी पडत नाही कारण त्या बाबतीत कुणी काही प्रश्न विचारले तर फे फे उडू शकते. पण तरीही एक घटना घडलीच. मी एक ' तिढा ' नावाचे नाटक लिहिले होते. विनायक पडवळला ते आवडले होते. तो ते सादरही करणार होता. त्यातच मध्ये एकदा त्याने छबिलदास मध्ये त्या नाटकाचे वाचनही घडवून आणले होते. पण, त्याच्याकडून रंगभूमीवर ते नाटक येणे काही घडले नाही. त्यानंतर काही काळ गेला. हे सर्व तिथेच संपले. नंतर एकदा विनायक एका नाट्य स्पर्धेला परीक्षक असताना तेच नाटक ' शह-काटशह ' या नावाने त्याच्या समोर सादर झाले ! ते पाहून त्याने त्या

संबंधित लेखक-कलावंताला बोलावून घेतले आणि एकच प्रश्न विचारला, " कुणाचं आहे हे नाटक ? " तो गडबडला. " मी चंप्रंशी बोललो आहे " म्हणाला. " काय बोलला आहेस ? त्यांचं नाटक तुझ्या नावावर खपवण्याबद्दल ? " विनायकने ते नाटक त्या स्पर्धेतून बाद तर केलेच पण ते बाद करण्याचे कारणही जाहीरपणे त्याच्या भाषणात सांगितले ! ( आता हे नाटक, ' निर्मिती ' या नावाने माझ्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे ).

क्षार कमी होणे आणि पाणी कमी प्यायले जाणे -- ही दोन कारणे सांगतात. अशा वेळी जरा मीठ खाऊन पाणी प्यावे. ( पेटके येण्यावर )

नाट्यलेखनातले बरेच रस्ते त्यांनी मोकळे केले ! ( तेंडुलकरांनी )

खरे तर आवड-निवड वा साहित्यातले स्थान हे विषय किरकोळच आहेत -- त्या त्या कलाकृतीच्या सर्जक प्रक्रियेबरोबर जाणारे कुणी आहेत का, हे महत्त्वाचे.

मराठी साहित्य खतम झाल्यावर आता त्याला अभिजात साहित्याचा दर्जा मिळेल !

आपल्या कला-संस्कृतीची मृतावस्था, मद्दडपणा, रटाळपणा जाणवणे -- ही सुरुवात असणार. मग असे का, चांगली कला म्हणजे काय -- यांवर चिंतन करावे लागेल. पण, हा सुरुवातीचा बिंदू तर आधी जाणवायला हवा -- त्यासाठी ही पोस्ट महत्त्वाची आहे. ( पुंगलियांची पोस्ट )

दोन गिरीश, एक चेतन आणि बाकी सर्व टीम ! उत्तम व्हायचा प्रयोग ! ( डावेदार )

काही लोकांच्या रक्तातच सततचा उपरोध आणि कुत्सितपणा असतो –

जनतेचे सामूहिक शहाणपण असे काही नसेलच तर मग लोकशाहीचा उदो उदो तरी करण्यात काय अर्थ आहे, असा प्रश्न समोर येतो !

मधू साबणे याने केलेला उत्तम अनुवाद ! ( सोल मौंटन )

ॲब्सर्डिटी दाखवायला किंवा विनोद करायला तुमचा समाज तसा असावा लागतो. -- हे पटले नाही. ' अब्सर्डिटी दाखवणे ' नसते आणि ' विनोद करणे ' नसते. शिवाय सगळा विनोद हा अब्सर्डिटी नसतो. ज्या लेखकाला अब्सर्डिटी दिसते त्याला दुसरे काही दाखवण्याचा पर्याय नसतो.

चांगली आठवण ! ही एकांकिका अनेक स्पर्धांतून नंबरात आली होती ! धन्यवाद ! ( इतिहास )

होय -- ही एकांकिका करणारा विनायक पडवळ हा पहिला. उन्मेष स्पर्धेत त्याने ती सादर केली होती आणि त्या वेळी तिला प्रेक्षकांचा प्रथम पुरस्कार मिळाला होता.
11-07-24.

मराठी आणि मूल्यविचार

कोणत्याही एखाद्या हस्तपत्रकापासून ते खानोलकर, जीए, धुरी, तुकाराम – या सगळयालाच आपण वाचन-संस्कृती म्हणतो. रोग, यशाचे मंत्र, खाद्य वैविध्य – असे काहीही वाचले तरी ते मराठी साहित्याच्या वाचनात आपण स्वीकारतो – अशी सर्व प्रकारची पुस्तके खपत राहणे याला आपण वाचन समृद्धी म्हणतो. मराठी साहित्याच्या दृष्टीने या अराजकी कल्पना आहेत, हे लक्षात घ्यायला हवे. कारखान्यात, दुकानात वा हॉटेलातही दर्जा, गुणवत्ता या मुद्याला महत्त्व असते. फक्त साहित्य याला अपवाद कसे असू शकेल ? मूल्यविचार हा गेल्या काही वर्षांत साहित्यातून हद्दपारच झाल्याचे दिसते. त्यामुळेच, समीक्षेचा अभाव आहे. मूल्यविचाराचे महत्त्वच गेलेले असल्याने वाङमयीन लेखन, नियतकालिके मृत्यू पावलेली आहेत. गेल्या काही वर्षांतली साहित्य संमेलनांच्या अध्यक्षांची भाषणे पाहिली तर हा मूल्यविचाराचा अभाव प्रकर्षाने जाणवतो. साहित्याचे मूल्य हे समाजातला थर, जात वा प्रदेश, गट वा टोळी यांवर अवलंबून नसते, हे लक्षात घ्यायला हवे. अशा मूल्यविचाराचे महत्त्व नसेल तर त्या भाषेची सर्वांगीण अवनती होणे अटळ आहे.
--- ००० ---

वाचन

मराठी साहित्याचा परिसर तसा लहान असला तरी संख्येने खूप मोठा आहे. कुणालाही ते सगळे वाचून, अभ्यासून त्या बाबतीतला आपला आवाका वा आकलन मांडणे अवघड आहे. कुणी कादंबरीचे विशेष अभ्यासक असतात, कुणी कथेचे तर कुणी कवितेचे. ही सवलत कोणत्याही साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षाला द्यायलाच हवी. बरे, समजा कविता हा रचनाप्रकार घेतला तर त्यातलेही काही शे वर्षांचे अभ्यासून बोलणेही अवघडच आहे. पण, समजा गेल्या पन्नास वर्षांतल्या कविता किंवा गेल्या पाच वर्षांतल्या कविता – एवढे तरी ‘ पुन्हा एकदा ‘ अभ्यासून बोलता यावे असा चारसहा महिन्यांचा वेळ अध्यक्षांना उपलब्ध असतो. बरे, तेही जाऊ दे – गेल्या काही वर्षांत तुझ्या वाचनात आलेल्या चार चांगल्या कविता कुठल्या बाबा आणि त्या तुला का चांगल्या वाटतात, हे तरी सांग. एक महत्त्वाची वाटलेली कादंबरी वा कथा वा कविता – कशावरच नाही बोलणार ? चांगले काय आहे, आपण ते काय, कसे वाचायला हवे – असे काही समजेल या आशेने तिथे जमलेला बहुजन श्रोतृवर्ग अध्यक्षाचे भाषण कानात प्राण आणून ऐकत असतो. अध्यक्षाने त्याची पूर्ण निराशा करावी, हे योग्य नाही.

हे बोलायचे कारण म्हणजे गेल्या काही संमेलनांचे अध्यक्ष वाचकांची / श्रोत्यांची अशी निराशा करत आलेले आहेत. साध्या एखाद्या कवितेबद्दलही तुम्ही बोलणार नसाल तर हे चुकते आहे. मग हे या खुर्चीवर का आले, असा प्रश्न येणार. एखादा असेही म्हणणार की अध्यक्षा, तू चुकलास, निष्कारण ही जागा बळकावलीस !
आता ही एवढी अपेक्षाही जर अवाजवी असेल तर अध्यक्षाचे काम तरी काय समजावे, असा प्रश्न येतो.
--- ००० ---

माझेही थोडे बोलून ठेवतो. कलेचा काळ हा घड्याळाचा काळ नसून मानसिक काळ असतो. अनुभवाच्या आणि साचेबद्धतेच्या स्तरावर तो प्रत्येकाचा वेगवेगळा असतो. या मार्गाने कुणाला पुढचा वगैरे म्हणण्यात अर्थ नसतो. बहुसंख्य लोक साचेबद्धतेने जगत असल्याने ते समाजाचेही वैशिष्ट्य असते. साचेबद्धतेतून क्रिया-प्रतिक्रिया होत राहणे हे वेगळेपणामुळे संघर्षमय आणि हिंसक असते. या पठडीतून बाहेर पडून ' पाहणारा ' कलावंत हा या अर्थाने कोणत्याच मानसिक काळाशी बांधलेला नसतो. तो नेहमीच प्रवाही असल्याने कधीच जुना वा मृत होत नाही. या अद्वितीय जगण्या-पाहण्याला काळाचे बंधन नसते. तेव्हाच, इतरांपेक्षा वेगळे या अर्थाने ' काळाच्या पुढचा ' असे म्हटले जाते, असे मला वाटते.

मराठीतून केलेली कुचेष्टा आणि द्वेष वाचणारे कमी कमी होत जातील तसतशी ही भाषा मरत जाईल ! तिचा दुसरा काही महत्त्वाचा असा फारसा उपतोग दिसत नाही !

मूल्यविचार टाळायचीच प्रवृत्ती वाढलेली आहे.

अभियांत्रिकी, रसायनशास्त्र, वाहनाची देखभाल, अशी सर्व पुस्तके ज्ञानात्मक असतील -- इथे प्रामुख्याने वाङ्मयीन पुस्तकांचा म्हणजे कदाचित उपयोगशून्य पुस्तकांचा विचार केला आहे. कला, तत्त्वज्ञान वगैरे. सांस्कृतिक उन्नयन असे काही असेल तर त्या प्रक्रियांची पुस्तके.

माझ्या पोस्ट च्या विरोधातलेही काही लिहितो. ते असे – अहो, तिकडे नाही का, एंड ऑफ थिअरी म्हणजे उपपत्तीचा अंत झाला ना ! काही सखोल नाही, सगळे उथळच असते, वैश्विक मूल्यबिल्य काही नसते, वगैरे ! ते एवढी वर्षे मेहनत करून तिथे पोचले – आपण तर आपोआप तिथे पोचलेलो आहोत ! आपण जगाबरोबरच आहोत ! काही गरज नाही मूल्यविचाराची ! काही महत्त्वाचे नाहीच आहे तर कशाला डोक्याला व्यायाम ? छोड देने का !

सगळे ब्राम्हणी संस्कृतीचे अनुयायी ? ब्राह्मण असो की आणखी कुणी, जिवंत आहेत ना सगळे ? संस्कृती हा एक बंद ठोकळा नसतो -- ती प्रवाही गोष्ट असते. ब्राह्मण-ब्राम्हणेतर हा खेळ खेळत बसायची ती गोष्ट नसते.

सगळे अशा पराभूत, निराश अवस्थेत असतील तर मरू द्या मग -- काय करणार ?

मी सांगतो तेच मूल्य असा राजकीय टाइप कट्टरपणा नाही पण ज्याचे त्यानेही यावर चिंतन करायला हवे. तुम्ही एक लेखक आहात -- तुमचाही एक मूल्य विचार तुमच्या लेखनात पाझरत असतो. त्याबाबत अनेकांनी, ' समजून घेण्याच्या ' तयारीने -- आधी निष्कर्ष न काढता चर्चा करायला हवी. साहित्याचा कसदारपणा म्हटले तर कसदारपणा म्हणजे काय, असे होईल. तसेच पुढे जायला हवे. माझ्या आकलनाप्रमाणे जगण्यातल्या गुंतागुंतीचे पूर्ण भान म्हणजे मूल्यात्मकता. आता ' पूर्ण भान ' म्हणजे काय -- तर ही चर्चा खूप होऊ शकते. नुसतेच व्यक्तिगत अनुभव वा मतरूपी आकलन म्हणजे मूल्य नव्हे, असे म्हणता येईल. मूल्यशोध हा व्यक्तिगत हेतूने बांधलेला नसतो, असे म्हणता येईल.

11-03-25